टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत

इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)पदवीसाठी

सादर केलेला शोधप्रबंध

# सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेष संदर्भात

**(इ.स. १९१० ते १९६७)**

# Agricultural Thoughts of *Satyashodhak* Mukundrao Patil : In Special Reference with *'Deenmitra'*

(1910 to 1967)

संशोधक

**सतिश बाबासाहेब दरवडे**

मार्गदर्शक

**डॉ.के.एम.अंबाडे**

इतिहास विभाग प्रमुख

न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर.

**मार्च २०१५**

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे तात्त्विक व सामाजिक शास्त्रे शाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर केलेला 'सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेष संदर्भात (१९१०-१९६७)' हा शोध प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. हा शोधप्रबंध मी इतर कुठल्याही विदयापीठात कोणत्याही पदवीसाठी किंवा अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण- तरवडी

प्रा. सतिश बाबासाहेब दरवडे.

दिनांक- १६/०३/२०१५

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे येथे इतिहास विषयांतर्गत विदयावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला 'सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेष संदर्भात (१९१०-१९६७)' हा शोध प्रबंध प्रा.सतिश बाबासाहेब दरवडे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली लिहिलेले मूलभूत संशोधन कार्य आहे. माझ्या माहिती प्रमाणे तसेच देण्यात आलेल्या खात्रीने असे घोषित करतो की, सदर शोधप्रबंध इतर कोणत्याही विदयापीठास किंवा परीक्षण मंडळास सादर केलेला नाही.

ठिकाण- अहमदनगर

दिनांक- १६/०३/२०१५

प्रा.डॉ.किसन अंबाडे

इतिहास विभाग प्रमुख

न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज

अहमदनगर.

# ऋणनिर्देश

तरवडी हे गाव मुकुंदराव पाटील यांची कर्मभूमी आहे. इ.स.१९१० ते १९६७ या काळात येथूनच सत्यशोधक चळवळीचे मुखपत्र असणारे 'दीनमित्र' हे वृत्तपत्र प्रकाशित झाले. महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत सत्यशोधकीय आत्मभान निर्माण करणा-या ग्रंथसंपदेचे तरवडी हे माहेरघर आहे. मी याच गावचा रहिवासी असल्याने अगदी लहानपणापासून मुकुंदराव पाटील यांच्या कार्याकडे मी आकर्षित झालो. 'मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेष संदर्भात' या विषयावर संशोधन करण्याचे मी अनेक वर्षापासून योजिले होते. आज या विषयावरील प्रबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठात पीएच.डी. पदवीसाठी सादर करतांना मला आनंद होत आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध पूर्णत्वास नेण्यासाठी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॅालेज अहमदनगर चे इतिहास विभागाचे विभाग प्रमुख व माझे संशोधन मार्गदर्शक प्रा.डॉ.के.एम.अंबाडे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यात येणारी प्रत्येक अडचण त्यांनी अगदी कळकळीने सोडविण्याचा प्रयत्न केला. संशोधन करीत असतांना आवश्यक असणारी तत्त्वे, पाय-या, संदर्भ साधने, प्रबंध मांडणी या विषयी त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या या मार्गदर्शनामुळेच हे संशोधन कार्य पूर्णत्वास जावू शकले. त्यांच्या या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

टिळक महाराष्ट्र विदयापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विभागाचे अधिष्ठाता प्रा.डॉ.श्रीकांत कार्लेकर, पीएच.डी.विभाग प्रमुख डॉ.वाटे मॅडम, इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. नलिनी वाघमारे, प्रा.डॉ.संध्या पंडीत यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करुन माझ्या संशोधन कार्यास दिशा दिली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विदयापीठातील पीएच. डी. दूरशिक्षा विभागातील सर्व कर्मचारी यांनी वेळोवेळी प्रबंध सादर करणे बाबतची माहिती दिली त्यांचाही मी आभारी आहे.

मी सेवेत असलेल्या तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ, पाथर्डी या संस्थेचे आदरणीय सेक्रेटरी श्री.सतिशलालजी गुगळेसाहेब व सहसेक्रेटरी श्री.सुरेशलालजी कुचेरियासाहेब तसेच खजिनदार श्री. विजयकुमारजी छाजेडसाहेब यांच्या शुभआशीर्वादामुळेच मी हे संशोधन कार्य पूर्ण करु शकलो त्यांचा मी शतशः ऋणी आहे. या संस्थे अंतर्गत चालविले जाणारे आनंद महाविदयालय पाथर्डी चे प्राचार्य डॉ.शेषराव पवार यांचे ही शुभाशीर्वाद पाठीशी होते त्यांचा मी आभारी आहे. तसेच महाविदयालयाचे ओ.एस.श्री.कुलकर्णी सर यांचेही बहूमोल मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी ज्यांनी मला मार्गदर्शन केले असे मुकुंदराव पाटलांचे नातू श्री. उत्तमराव पाटील यांनी मुकुंदराव पाटलांच्या विचारांचा वारसा जतन करण्यासाठी सत्यशोधक मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी ही संस्था स्थापन केली आज ही संस्था मुकुंदराव पाटील यांच्यावर संशोधन करणा-या संशोधकांचे आश्रयस्थान बनली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी जी प्राथमिक व दुय्यम साधने आवश्यक होती ती साधने मुकुंदराव पाटील स्मारक समिती तरवडी येथील ग्रंथालयातून विनाविलंब उपलब्ध होऊ शकली. याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. तसेच तेथील ग्रंथपाल श्री.संपत दरवडे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी ज्यांच्याकडून मला प्रेरणा मिळाली असे आबासाहेब काकडे महाविदयालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.गजानन लोंढे, जिजामाता कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.संजय दरवडे, बाबुजी आव्हाड महाविदयालय पाथर्डी येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.अशोक कानडे, अहमदनगर महाविदयालय अहमदनगर येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.विजय कदम या सर्वांची प्रेरणा व सहकार्य विशेष मोलाचे ठरले.

मी सेवेत असलेल्या श्री.आनंद कॉलेज पाथर्डी येथील माझे सहकारी मित्र प्रा.बोरुडे सर, प्रा.साळवे सर, प्रा.राख सर, प्रा.जगदाळे सर, प्रा.घाटुळ सर, प्रा.महाजन सर, प्रा.साबळे सर, प्रा.बुधवंत सर या सर्वांच्या शुभेच्छा पाठीशी होत्या.

याशिवाय संशोधन कार्यात वेळोवेळी मदत करणारे माझे मित्र प्रा.राजू गर्जे, प्रा.डॉ.चद्रकांत काळे, प्रा.परमेश्वर ढगे, प्रा.संतोष बुट्टे, प्रा.विक्रम हराळ, प्रा.नितिन भुसाळ, प्रा.डॉ.गोविंद कदम, प्रा.अनिल पानखडे, श्री.तुवर सर, श्री.भालेराव सर, श्री.अन्नदाते सर, श्री.लांमदाडे सर, श्री.तुपे सर, श्री.कात्रस सर, श्री.मोटे सर, प्रा.ढोले सर, श्री.सुरेश गोरे, या सर्वांच्या शुभेच्छा पाठीशी होत्या.

या सर्वांबरोबर संशोधन कार्यात माझे कुटुंबीय नातेवाईक यांची प्रेरणाही तितकीच मोलाची होती. माझे वडील श्री.बाबासाहेब दरवडे, आई सौ.मंगल दरवडे, श्री.शांताराम भुजबळ, श्री.दत्तात्रय वैदय, श्री.राजेंद्र कुलांगे, यांचे आशीर्वाद पाठिशी होते त्याच बरोबर प्रदिप तांबे, विकास भुजबळ, अतुल वैदय, राजू वैदय, यांचे वेळोवेळी सहकार्य महत्त्वाचे होते. विशेष म्हणजे प्रबंध लिखानाच्या वेळी माझी पत्नी सौ.शिला, मुले सुयश व शौर्य यांचे प्रेम व जिव्हाळा यामुळे माझ्या संशोधन कार्यात मला मानसिक बळ मिळत गेले व त्यामुळेच हे संशोधन कार्य पूर्णत्त्वास जावू शकले. या सर्वांच्या ऋणातच राहणे मला आवडेल.

याशिवाय अनेक गुरुवर्य, सहकारी मित्र, यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले आहे. ज्यांचा नामोल्लेख नजर चुकीने राहून गेला त्यासर्वांचेच मन:पूर्वक आभार !

प्रा.सतिश दरवडे

संशोधक

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ऋणनिर्देश | I-III |
| १. | संशोधन पध्दती | १ - १५ |
| २. | महाराष्ट्रातील शेतीविषयक प्रश्न : स्वरुप व व्याप्ती | १६ - ५० |
| ३. | काही सत्यशोधकीय विचारवंताचे कृषिविषयक विचार | ५१ - १०८ |
| ४. | भारतातील सामाजिक परिस्थिती अणि शेतीव्यवसायः मुकुंदराव पाटील यांचे विवेचन | १०९ - १५३ |
| ५. | मुकुंदराव पाटील यांनी घेतलेला शेती प्रश्नांचा ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मीमांसा | १५४ - १७५ |
| ६. | शेतक-यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेले उपाय | १७६ - २२० |
| ७. | मुकुंदराव पाटील आणि शेतक-यांची जनजागृती | २२१ - २५४ |
| ८. | सारांश व ठळक निष्कर्ष | २५५ - २५९ |
| ९. | परिशिष्ट<br>१. मुकुंदराव पाटील यांना आलेली निवडक पत्रे<br>२. संदर्भ ग्रंथ सूची | <br>२६० - २६३<br>२६४ - २६८ |

# प्रकरण-पहिले

# संशोधन पध्दती

१. प्रास्ताविक

२. संशोधनाचे महत्त्व

३. पूर्व संशोधनाचा आढावा

४. संशोधनाची उद्दिष्टये

५. गृहितके

६. संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

७. संशोधन पध्दती

८. संदर्भ साधने

९. संशोधनाची सैध्दांतिक संकल्पना

१०.शोधप्रबंधाचे प्रकरणा नुसार स्वरुप

# प्रकरण- पहिले

# संशोधन पध्दती

## प्रास्ताविक

भारत हा कृषिप्रधान देश आहे. सत्तर टक्के जनतेचा उदरनिर्वाह शेतीच्या उत्पन्नावर चालतो. स्वातंत्र्यपूर्व काळात व तत्पूर्वीही पारंपरिक पध्दतीने शेती केली जात होती. स्वातंत्र्यानंतर आधुनिक पध्दतीने शेती केली जावू लागली. परंतु शेतकरी अशिक्षित असल्याने आधुनिक पध्दतीने शेती करण्यास त्याने प्रतिसाद दिला नाही. त्यासाठी अठराव्या शतकातच महात्मा फुले यांनी शेती बाबत उपयुक्त विचार सांगून शेतक-यांची परिस्थिती इंग्रज सरकारपुढे मांडली होती. आधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांच्या मुलांना देण्याबाबत त्यांनी आग्रही भूमिका घेतली होती. यावेळी समाज कर्मकांड करण्यात धन्यता मानत होता. ही सारी परिस्थिती महात्मा फुले यांनी पाहिली आणि बहुजन समाजाला सावकार, पुरोहितशाही पासून वाचवायचे असेल तर एका नव्या चळवळीची सुरुवात केली पाहिजे असे त्यांना वाटले त्यासाठी त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

महात्मा फुले यांच्या नंतर बदलता काळ व परिस्थितीनुसार सत्यशोधक समाजाचे नेतृत्व मुकुंदराव पाटील यांनी केले. सत्यशोधक समाजाला विकासाच्या नव्या टप्प्यावर त्यांनी आणून ठेवले होते. मुकुंदराव पाटलांनी अवघ्या चोविसाव्या वर्षी 'दीनमित्र' (इ.स.१९१०-१९६७) या वृत्तपत्राचे संपादन केले. त्यावेळी त्यांचा वैचारिक पिंड घडला होता. हुन्नरी व प्रतिभाशाली कृष्णराव भालेकरांच्या सहवासात त्यांनी सत्यशोधकी विचार व ध्येयवाद अंगिकारला होता. त्यांचे औपचारिक शिक्षण जरी दुसरी पर्यंत झाले असले तरी त्यांची अनौपचारिक ज्ञानसाधना मोठी होती.

आधुनिक महाराष्ट्राचे रुप घडविण्यामध्ये 'दीनमित्र' मधील अग्रलेखाचा महत्त्वाचा वाटा आहे. मुकुंदरावांचे 'दीनमित्र'मधील अग्रलेख शोषणाच्या वेगवेगळया व्यवस्थांच्या विरोधात जागृती घडवून आणत होते. धर्माच्या व समाजातील रुढींच्या चिकित्सेतून विवेकनिष्ठ विश्वभान घडवत होते. सत्यशोधक विचारांमधील विद्रोहाची धग जोपासुन बहुजन समाज परिर्वतनाच्या दिशेने घेवून जात होते.

जातिव्यवस्थेच्या आरिष्टामध्ये अडकलेल्या शेतीला व शेतक-याला आधुनिकतेच्या कक्षेत आणून मुक्त करण्याचा  त्यांचा प्रयत्न होता. जातीच्या निष्ठांनी ग्रस्त होवून जात उच्चभ्रूच्या मागे शेतकरी एकवटत राहिल्याने  शेतक-यांची सामुहिक चळवळ व संघर्ष दुबळा व अल्पकालीन उद्रेकांची बाब बनला आहे. जाती अस्मिता मुळे  विघटीत झालेला शेतकरी वर्ग सामुहिक हितसंबंधाची व्याख्या करणा-या विवेका अभावी परिस्थितीशरण होत चालला आहे. संघर्षाचा पर्याय समोर नसल्याने  असहाय्य, अगतिक, निराशाग्रस्त बणून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे. अशा स्थितीमध्ये मुकुंदराव पाटलांच्या 'दीनमित्र'मधील अग्रलेखातील धगधगता सत्यशोधकी  विवेक शतकानंतरही त्यांना परिवर्तनाच्या मार्गावर आणू शकतो. बदललेल्या काळातील समस्यांचा सामना करण्याची विचारशक्ती जागवू शकतो. तसेच महाराष्ट्रातील समाजक्रांतीला चालना देवू शकतो. म्हणून  प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

जागतिकीकरणाच्या पर्वातील महाराष्ट्र अनेक समस्यांनी त्रस्त झाला आहे.  नव्या पर्वातील भांडवली शेती करु न शकणारा शेतकरी दारिद्रय व कंगालीकडे लोटला जावू लागला आहे. शेतमालाला योग्य भाव न देणा-या बाजारव्यवस्थेमुळे अगतिक बनुन शेतकरी कर्जबाजारीपणाच्या विळख्यात सापडला आहे. तोटयाच्या शेतीव्यवस्थेमुळे  अधिकातअधिक गर्तेत चालला आहे. या वर्तमान समस्यांचे विवेचन सत्यशोधकीय विचारवंत मुकुंदराव पाटील यांनी आपल्या 'दीनमित्र'या वृत्तपत्रातून केलेले आहे. वर्तमान समस्यांचे मूळ इतिहासात सापडते या न्यायाने 'सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेष संदर्भात (१९१०ते १९६७)' अभ्यासल्यास वर्तमान शेतीविषयक प्रश्नांची उकल होवू शकेल असे वाटल्याने प्रस्तुत विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटले.

**पूर्वसंशोधनाचा आढावा**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात दुर्लक्षित राहिलेल्या लेखकांमध्ये अत्यंत महत्त्वाचे लेखक म्हणजे सत्यशोधक मुकुंदराव पाटील हे एक आहेत. सत्यशोधकी दृष्टी घेवून त्यांनी आयुष्यभर लेखन केले तरवडी सारख्या अत्यंत छोटया गावात त्यांनी अत्यंत कष्टाने 'दीनमित्र' वृत्तपत्र ५७ वर्ष अखंडपणे चालवले. आर्थिकच नाही तर सर्व प्रकारच्या हालअपेष्टा सहन करुन केवळ बहुजनांच्या

उध्दारासाठी मुलगामी स्वरुपाचे लेखन केले. मुकुंदराव पाटलांच्या या कार्याची दखल घेवुन या महत्त्वाच्या परंतु दुर्लक्षित अभ्यास क्षेत्राकडे संशोधकांचे लक्ष वेधलेले आहे. यामध्ये

१. एरंडे अशोक, सत्यशोधक मुकुंदराव पाटील काल आणि कर्तृत्व, सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ पुणे.

२. खराट संभाजी, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांची पत्रकारीता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.

३. काळे गोविंद, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे खंडकाव्य, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड.

४. तायड भगवान, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे वाड्मय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.

५. ढेंबरे बाळासाहेब, मुकुंदराव पाटील यांचे साहित्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.

यामध्ये मुकुंदराव पाटीलयांच्या एकूण लेखनांचा केंद्रबिंदू शेती आणि शेतकरी हाच होता. या विषयावर संशोधन झाले नसल्याने मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचारः दीनमित्रच्या विशेष संदर्भात हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास पुढील प्रमाणे उद्दिष्टये ठेवून करण्यात आलेला आहे.

१. ब्रिटिश पूर्वकालीन शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. ब्रिटिशकालीन शेतीविषयक प्रश्नांचा अभ्यास करणे.

३. सत्यशोधकीय विचारवंतांचे कृषी विषयक विचारांचा अभ्यास करणे.

४. शेतक-यांची निकृष्ठ स्थिती घालविण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेल्या उपायांची उपयुक्तता तपासणे.

५. मुकुंदराव पाटील यांनी केलेली शेतक-यांची जनजागृतीचा अभ्यास करणे.

**गृहितके ( संशोधनाची परिकल्पना)**

१. महाराष्ट्रातील सत्यशोधक विचारवंतांनी आपली स्वतंत्र भूमिका मांडत शेतीविषयक प्रश्नांची समीक्षा केली.

२. महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, शाहु महाराज, मुकुंदराव पाटील व इतर बहुजनवादी सत्यशोधक विचारवंतांच्या विचारामध्ये एक समग्र समाज परिवर्तनाची ठाम वैचारिक भूमिका होती.

३. मुकुंदराव पाटील यांनी जातीव्यवस्था विषयक विवेचन करुन जातीखंडनाच्या विचारांची मांडणी केली.

४. शेतक-यांची निकृष्ठ स्थिती घालविण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेल्या उपायांमुळे शेतक-यांच्या विकासाला चालना मिळाली.

५. मुकुंदराव पाटील यांनी शेतक-यांचे आर्थिक शोषण करणा-या कुलकर्णी या सामाजिक, राजकीय, स्थानास केलेल्या विरोधामुळे सरकारी व्यवस्थेत परिवर्तन घडून आले.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये विसाव्या शतकाचा कालखंड तत्कालीन मुंबई प्रांत व सदय महाराष्ट्र हा भौगोलिक विस्तार, बहुजनकेंद्री सत्यशोधकीय पत्रकारितेचा आशय या विषयाची व्याप्ती आहे. प्रस्तुत सत्यशोधक चळवळ महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, शाहु महाराज यांना तसेच मुकुंदराव पाटील व इतर बहुजनवादी सत्यशोधक विचारवंत अधोरेखित करुन देखील महाराष्ट्राच्या परिघ क्षेत्राबाहेर फारशी जाऊ शकलेली नाही. सदर व्यक्तींनी चर्चिलेले कृषीविषयक प्रश्न महाराष्ट्राच्याच भौगोलिक, सामाजिक व आर्थिक अवकाशापुरते मर्यादित स्वरुपात मांडण्यात आलेले आहेत.

**संशोधन पध्दती**

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्र च्या विशेष संदर्भात (इ.स. १९१०-१९६७) या संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतींचा वापर करण्यात आलेला आहे.

**संदर्भ साधने**

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार :'दीनमित्र ' च्या विशेष संदर्भात ( इ.स. १९१०-१९६७) या विषयावर संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता सत्यशोधक विचारवंतांनी चालवलेली वर्तमानपत्रे, वर्तमानपत्रातील लेख, बातम्या, भाषणे, हस्तलिखिते या सारख्या प्राथमिक साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच दुय्यम साधनांमध्ये संदर्भ ग्रंथ, चरित्रे, मासिके, स्मरणिका इ. संदर्भ साधनांचा उपयोग संशोधनासाठी केलेला आहे.

**संशोधनाची सैध्दांतिक संकल्पना**

महाराष्ट्रातील काही सत्यशोधक विचारवंत महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, शाहु महाराज, मुकुंदराव पाटील यांनी तत्कालीन समाजातील शेतक-यांचे सखोल परीक्षण केले आहे. शेतक-यांचे जे विविध दोष होते त्यातून शेतक-यांची मुक्तता करण्याचा प्रयत्न मुकुंदराव पाटील यांनी 'दीनमित्र' या वृत्तपत्रातून केला आहे. अर्थात शेतक-यांचे हे दोष त्यांना शिक्षण मिळून त्यांच्यातील अज्ञान नाहिसे होईपर्यत दूर होणे शक्य नाही. यासाठी मुकुंदराव पाटील यांनी शेतक-यांची जनजागृती केलेली होती. या बाबत संशोधन व्हावे या अनुषंगाने संशोधन कार्य केले आहे.

जरी एकोणिसाव्या शतकातील सत्यशोधक विचारवंतांच्या कृषीविषयक विचारांचा अभ्यास संशोधनात असला तरीही वर्तमानकाळाच्या दृष्टीने त्याचे संभवनीय असे उपयुक्तता मूल्य आहे.

**प्रस्तुत शोधप्रबंधाचे प्रकरणा नुसार स्वरुप**

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेष संदर्भात या विषयावरील संशोधन प्रबंधाची विभागणी एकुण आठ प्रकरणात केलेली आहे.

**प्रकरण पहिले : संशोधन पध्दती**

प्रबंधाच्या आरंभीचे प्रकरण प्रास्ताविक स्वरुपाचे आहे. त्यामध्ये प्रबंध विषयाची स्थल, काल, मर्यादा, स्पष्ट केले आहे तसेच संशोधनाचे महत्त्व, संशोधन पध्दती, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितके याविषयाची माहिती देवून प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा मांडलेली आहे.

**प्रकरण दुसरे : महाराष्ट्रातील शेतीविषयक प्रश्न स्वरुप व व्याप्ती**

या प्रकरणात ब्रिटिशपूर्व कालीन कृषिव्यवस्थेची चर्चा करून ब्रिटिश काळात या कृषीव्यवस्थेत झालेले बदल अभ्यासले आहे. त्याच प्रमाणे ब्रिटिशांनी राबवलेल्या कृषीविषयक धोरणांची चर्चा केली आहे आणि एकूणच ब्रिटिशांच्या कृषीविषयक धोरणांचे महाराष्ट्राच्या शेतीवर झालेल्या परिणामांचा संक्षिप्त आढावा घेतलेला आहे.

**प्रकरण तिसरे : काही सत्यशोधकीय विचारवंतांचे कृषी विषयक विचार**

शेतीविषयक विचार मांडणा-या विचारवंतामध्ये जोतिबा फुले ( इ.स.१८२७-१८९०) यांचे नाव महत्त्वाचे आहे. फुले हे शेतकरी वर्गातून आले असल्यामुळे शेती व शेतकरी यांच्याकडे पाहण्याचा फूल्यांचा दृष्टीकोण वेगळा होता. महात्मा फुलेंनी आपल्या ग्रंथसंपदेतून शेतक-यांच्या आर्थिक पिळवणूकीला शेटजी - भटजी - सावकार - सरकार कसे जबाबदार आहेत हे त्यांनी दाखवून दिले. महात्मा फुले आर्थिक शोषणाची चिकित्सा करून थांबत नाहीत तर त्यावर मुलगामी उपाययोजनाही सुचवितात. त्या आजच्या स्थितीतही महत्त्वाच्या वाटतात. महात्मा फुलेंचा हाच वारसा पुढे त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी चालवला. 'दीनबंधू' वृत्तपत्र चालवून तसेच 'बळीबा पाटील' कादंबरीतून शेतकरी जीवनविषयक प्रश्न व त्याची उकल करून दाखवलेली आहे. त्याच बरोबर राजर्षी शाहू महाराज, नारायण मेघाजी लोखंडे, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे या काही बहुजनवादी सहका-यांनी मांडलेल्या विचारांचा अभ्यास तिस-या प्रकरणात केलेला आहे.

**प्रकरण चौथेः हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थिती आणि शेतीव्यवसाय - मुकुंदराव पाटील यांचे विवेचन**

प्रस्तुत प्रकरणात मुकुंदराव पाटील यांनी भारतातील जाती व्यवस्था विषयक विवेचन केले आहे. शोषण व विषमतेच्या ब्राह्मणी व्यवस्थेला हादरा देणारे जाती विरोधी प्रबोधन करण्याचे सत्यशोधक समाजाचे कार्य मुकुंदराव पाटील यांनी निष्ठेने अंगिकारले होते. त्याचबरोबर त्यांनी जाती खंडणाचा विचार मांडून बहुजन विद्यार्थ्यांना जाती उन्नतीच्या मार्गाचा अवलंब करण्यास सांगितले. तसेच बलुतेदारी पध्दतीस विरोध करून ही बलुतेदारीची पध्दत शेतकरी व बलुतेदार या दोघांनाही हितकारक नाही. असे विचार मांडून ही पध्दत बंद करण्याची विनंती ते शेतकरी व

बलुतेदारांना करतात. त्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी धार्मिक प्रबोधनाची लढाई चालवली. पुरोहित शाहीचे भांडाफोड करणारे धर्मप्रबोधन 'दीनमित्र'चे वैशिष्टय राहिले. देव व भक्तामध्ये मध्यस्थ नको या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाचे अधिष्ठान स्वीकारून मुकुंदराव पाटील यांनी ब्राह्मणी पुरोहित शाहीचे खंडन केले. शेतकरी बहुजनांनी धार्मिक गुलामगिरीतून मुक्त व्हावे अशी त्यांची तळमळ असल्याचे दिसून येते. शेतक-यांच्या अडाणीपणाचा फायदा घेणा-या कुलकर्णी या सामाजिक, राजकीय स्थानास त्यांनी विरोध केलेला दिसून येतो. या काळातील सामाजिक परिस्थिती आणि शेतीव्यवसाय यांचा संक्षिप्त आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

**प्रकरण पाचवे : मुकुंदराव पाटील यांनी घेतलेला शेती प्रश्नांचा ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मीमांसा.**

प्रस्तुत प्रकरणात वसाहतपूर्व अवस्थेविषयी विवेचन करताना मुकुंदराव पाटील यांनी वसाहतपूर्व अवस्थेत शेतकरी सुखी समाधानी होता असे स्पष्ट केले आहे. यावेळी खेडी स्वयंपूर्ण होती तसेच खेडयातील गरजा खेडयातच भागवल्या जात असे. त्यामुळे शेतकरी सुखी जीवन जगत होता. वसाहतिक काळाबद्दल विचार मांडताना एका बाजूला ते वसाहतिक काळात कृषीव्यवस्थेचे झालेले विदारक चित्रण स्पष्ट करतात तर दुस-या बाजूला ब्रिटिशांनी आणलेल्या भांडवली आधुनिकतेचे स्वागतही करतात. देशातील बिकट आर्थिक परिस्थितीमुळे बंडाळी माजणे, चोरांचा उपद्रव यावर प्रतिबंध घालण्यासाठी निर्माण झालेल्या राष्ट्रीय युध्द आघाडीचे ते स्वागतही करतात. सरकार आणि शेतकरी यांचा संबंध स्पष्ट करताना सरकारने शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी भरीव अशा सुधारणा अमलात आणाव्यात यासाठी आग्रह धरताना दिसतात. जेंव्हा काँग्रेस पक्ष शेतक-यांना दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करताना दिसत नाही, तेव्हा ते काँग्रेस पक्षावर टीका करतात व स्वातंत्र्यापूर्वी शेतकऱ्यांची परिस्थिती यापेक्षा चांगली असल्याचे आपले मत मांडतात. एकूणच तत्कालीन प्रश्नांचा ऐतिहासिक वेध मुकुंदराव पाटील यांनी पाचव्या प्रकरणात घेतलेला आहे.

**प्रकरण सहावे : शेतकऱ्यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेले उपाय.**

प्रस्तुत प्रकरणात मुकुंदराव पाटील यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी विदया, ज्ञान, जूट, पंच, खर्च, शिक्षण, वेळ इ. उपाय सुचवले आहे. या उपाययोजनांचा शेतक-यांनी योग्य प्रकारे अवलंब केला तर शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल असे स्पष्ट मत ते मांडताना दिसतात. त्याच

बरोबर शेतक-यांना या बिकट परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग सांगताना त्यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितलेले आहे. सावकारांनी चालवलेल्या शेतकऱ्यांच्या पिळवणूकीचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न करतात. सरकारची या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी सरकारी व्यवस्था कशी असावी या विषयी ते आपले स्पष्ट मत मांडतात. तसेच शेतकऱ्यांच्या आजच्या या परिस्थिती विषयी ही ते आपले मत व्यक्त करतात. तसेच शेतकऱ्यांच्या आजच्या या परिस्थिती विषयी ते शेतकऱ्यांना दोष देतात. या परिस्थितीवर मात करण्यासाठी ते शेतक-यांना सामुदायिक शेती करण्यासाठी प्रवृत्त करताना दिसतात. शेतक-यांनी सामुदायिक शेती केली तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल असे मुकुंदराव पाटील यांचे मत असल्याचे दिसते. आजही सामुदायिक शेतीचा प्रयोग निश्चितच प्रेरणादायी ठरावा असा आहे.

**प्रकरण सातवे : मुकुंदराव पाटील आणि शेतकऱ्यांच्या जनजागृती**

प्रस्तुत प्रकरणात सरकारने शेती सुधारण्यासाठी कमिशन नेमून त्या कमिशनवर लाखो रूपये खर्च करण्यापेक्षा प्रथमतः शेतकरी सुधारण्याची आवश्यकता मुकुंदराव पाटील व्यक्त करतात. कारण शेती सुधारणा शेतकऱ्यांच्या सुधारणेवरच अवलंबून असल्याचे ते स्पष्ट करतात. त्यासाठी शेतकऱ्यांना सक्तीचे शिक्षण देण्याचा आग्रह धरतात. तसेच आठवडयाने भरणा-या प्रत्येक बाजारांत शेतक-यांच्या दुर्गुणावर परिणामकारक व्याख्यान देणारे वक्ते नेमण्याची आवश्यकता असल्याचे ते सांगतात. तसेच आज इतर देशातील लोक एकमेकांशी एकोप्याने राहत आहेत. पण आमचा शेतकरी एकमेकांबद्दल भेदभाव करण्यातच आपला वेळ घालवत आहे. यासाठी ते शेतक-यांना डोळे उघडा असा इशाराही देतात. शेतक-यांना सक्तीचे शिक्षण आणि शेतसारा ५० टक्के कमी करण्याचे दिलेले आश्वासन काँग्रेस पक्षाने पाळले नाही यासाठी ते शेतक-यांना विचार करा असा सल्लाही देतात. त्याचबरोबर सरकारने शेतक-यांसाठी शेती मेळावा, प्रदर्शने भरवावीत यासाठी ते आग्रही असल्याचे दिसून येते.

**प्रकरण आठवे : सारांश व निष्कर्ष**

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेषसंदर्भात या विषयावरील संशोधन प्रबंधाचे प्रकरण १ ते प्रकरण ७ यांची सारांश रूपाने मांडणी करून काही ठळक निष्कर्ष दिलेले आहेत.

**प्रकरण पहिले - संशोधन पद्धती**

प्रबंधाच्या आरंभीचे प्रकरण प्रास्ताविक स्वरुपाचे आहे. त्यामध्ये प्रबंध विषयाची स्थल, काल, मर्यादा स्पष्ट केली आहे तसेच संशोधनाचे महत्व, संशोधन पद्धती, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितके याविषयाची माहिती देवून प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा मांडलेली आहे.

**प्रकरण दुसरे - महाराष्ट्रातील शेतीविषयक प्रश्न स्वरुप व व्याप्ती**

ब्रिटिश पूर्व प्रदिर्घ काळात भारतातील ग्रामजीवन स्वयंपूर्ण असल्याचे दिसून येते. या काळात ग्रामीण भागाचा बाहय जगाशी फारसा संबंध येत नव्हता. गावातील लोक एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परांवर अवलंबून असल्याने ग्रामजीवनात सांघिक ऐक्याची व सहकार्याची भावना होती. परंतू ब्रिटीश सत्ता भारतात आल्यानंतर ब्रिटीश राज्यकर्त्यांनी महसूल व्यवस्थेत अनेक महत्वपूर्ण बदल घडवून आणले. या बदला मागे भारतीयांचे आर्थिक शोषण करणे हा एकच उद्देश कंपनी सरकार पुढे असल्याचा दिसतो. परंतू या व्यवस्थेत शेतक-यांचे खूप नूकसान झाले. व सावकारांचे प्राबल्य वाढत गेल्याचे दिसून येते.

खरे तर इंग्रज सरकारला भारतामध्ये साम्राज्य विस्तारासाठी सुशिक्षित वर्गाची आवश्यकता होती. यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक सुधारणा अमलात आणल्या. परंतू शेतक-यांना सुशिक्षित बनविण्याचे कोणतेही खास प्रयत्न इंग्रज सरकारकडून झाल्याचे दिसून येत नाही. ज्या तरुण वर्गाने इंग्रजी शिक्षण घेतले त्यांनी आपल्या अशिक्षित अडाणी शेतकरी समाजाला रुढी परंपरांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी या समाजाला शिक्षण देणे महत्वाचे समजले. यासाठी या सुशिक्षित वर्गाने समाज सुधारणेचे कार्य हाती घेतले. एकूणच शेतकरी समाजाला कठीण परिस्थितीत तग धरुन जीवन जगता यावे यासाठी त्यांच्या ठिकाणी प्रतिकार शक्ती निर्माण करण्याचे कार्य तात्कालीन समाज सुधारकांनी जाणीवपूर्वक केल्याचे दिसून येते.

**प्रकरण तिसरे - काही सत्यशोधकीय विचारवंतांचे कृषिविषयक विचार**

एकोणिसाव्या शतकात म.फुले यांनी सामाजिक प्रबोधनाची चळवळ उभी करण्यासाठी आपले सारे आयुष्य समर्पित केले. याकाळात सामाजिक आणि धार्मिक स्वरुपाचे सारे अधिकार मुठभर उच्चवर्णीयांच्या हातात एकवटलेले असल्यामुळे सर्वसामान्य मनुष्य सामाजिक आणि शैक्षणिक हक्कापासून वंचित झालेला होता. या सर्वसामान्य शेतकरी बहुजन समाजाच्या पायातील

गुलामगिरीच्या बेडया तोडून तो मुक्त व्हावा आणि त्याचे मनुष्यपण सर्वार्थाने विकसित व्हावे ही महात्मा फुले यांची भूमिका असल्याचे आपणास दिसून येते.

महात्मा फुले यांनी पाणी आणि मातीचे महत्व त्याकाळात जाणून 'पाणी अडवा पाणी जिरवा', शेतीमध्ये सेंद्रीय खतांच्या वापरावर भर, शेतक-यांसाठी शेतकी शाळा सुरु करण्याची सरकारकडे केलेली मागणी या योजना आज देशभरातील शेती संशोधनात कृषी शास्त्रज्ञांनी सव्वाशे वर्षांनंतर स्वीकारल्याचे दिसते. या सव्वाशे वर्षात भारतातील विषेशतः महाराष्ट्रातील शेतकरी 'सुधारला की खचला' ? असा प्रश्न उपस्थित केल्यास , याचे उत्तर दुर्दैवाने नक्कीच 'खचला, तोही भयंकर खचला' असेच दयावे लागते. त्यामुळे महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्व पूर्वीपेक्षा आजच्या काळात अधिकच अधोरेखित होते. हाच निकष इतर सर्व विचारवंतांच्या विचारांनाही लागू पडतो. त्यामुळे भारताच्या आजच्या स्थितीतही हे विचार तितकेच महत्वाचे आहेत. आजही म.फुल्यांचे विचार शेती व्यवस्थेला लागू पडतात यात शंका नाही.

बदलता काळ व परिस्थितीनुसार सत्यशोधक समाजाचे नेतृत्व पुढे मुकुंदराव पाटील यांनी केले. मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाला विकासाच्या नव्या टप्प्यावर आणून ठेवले होते. बहुजन समाजोन्नती ही त्यांचे कार्य आणि आदय प्रेरणा असल्यामुळे प्राप्त परिस्थितीचा सारासार विचार करुन वस्तूनिष्ठ मते नोंदविण्यावर त्यांचा विशेष भर राहिला आहे. ग्रामीण जीवनातील रुढी, प्रथा, परंपरा नष्ट होउन एकसंघ समाज निर्माण करण्यावर मुकुंदराव पाटलांनी विशेष भर दिला आहे. त्यांच्या साहित्यातून येणा-या घटना, प्रसंग असत्य व काल्पनिक आहेत असे आजही म्हणता येत नाही. इतिहासाव्दारे त्यातील सत्यता सिध्द करता येण्यासारखी आहे.

## प्रकरण चौथे - भारतातील सामाजिक परिस्थिती आणि शेती व्यवसायः मुकुंदराव पाटील यांचे विवेचन

भारतातील अपरिर्वतणीय जातीव्यवस्था हेच बहुजन समाजाच्या शोषणाचे मुलभूत कारण असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. खेडयातील शेतकरी जोपर्यंत जातीचे जोखड झुगारुन शेतीचे नवनवीन ज्ञान तंत्रज्ञान आत्मसात करत नाही. तोपर्यंत खेडयातील प्रगती अशक्य असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. समाजातील जातीभेद हा मुळात ईश्वरनिर्मित आहे. त्यामुळे तो

मान्य केलाच पाहिजे असे सर्वसामान्य शेतक-यावर बिंबवणा-या ब्राम्हणी वर्चस्वावर मुकुंदराव पाटील यांनी प्रहार केलेला दिसून येतो.

शेतक-यांची दैन्यावस्था दूर करण्याची जबाबदारी आजच्या तरुण विदयार्थ्यांवर सोपवतांना या विदयार्थ्यांनी खेडयापाडयात फिरुन बहुजन समाजाच्या अडचणींची माहिती घेवून त्या अडचणी दुर कराव्यात. तरच बहुजन समाजाचा खरा विकास होईल. असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. आजही खेडयात हिच परिस्थिती दिसून येते. खेडयातील विदयार्थी शिक्षणासाठी शहरात गेला तेथिल शिक्षण संपल्यानंतर तो शहरातच नोकरी करतो परंतू तो आपल्या कुटुंबाकडे, गावाकडे परत लक्ष देतांना दिसत नाही. आज या परिस्थितीत बदल होणे गरजेचे आहे. आजच्या सुशिक्षित तरुण विदयार्थांनी खेडयात फिरुन तेथील शेतक-यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यांना शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. तर निश्चितच त्याच्याआर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. यासाठी मुकुंदराव पाटील यांचे विचार आजही दिशादर्शक ठरतांना दिसून येते.

एकंदरीत मुकुंदराव पाटलांचे विचार अभ्यासल्यास शेतकरी हाच त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू असल्याचे दिसते. खेडयातील शेतकरी समाज आपला भरपूर वेळ व पैसा हा धार्मिक कार्यासाठी खर्च करतो. समाजातिल या प्रवृत्तीवर मुकुंदराव पाटील प्रखर टिका करतात. त्यांचा धार्मिक कृत्य करण्याला विरोध नव्हता, तर प्रत्येक व्यक्तीने आपले धार्मिक कृत्य करतांना सदभावना व मानवतेचे मूल्य जोपासून करावी. तसेच हि धार्मिक कृत्य करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही प्रत्येकाने ती स्वतः करावी. याची जाणीव मुकुंदराव पाटील करुन देतात. आज शंभर वर्षानंतरही या परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. आजही ब्राह्मणेत्तर समाज पुरोहितांशिवाय धार्मिक कृत्य करत नाही. आज समाजात धार्मिक कार्यावर खूप खर्च केला जातो. हाच पैसा जर लोकोपयोगी कार्यावर खर्च केला तर त्याचा शेतीच्या विकासासाठी शेतक-याला आणि एकंदर राष्ट्राला निश्चित फायदा होईल. यामुळेच मुकुंदराव पाटलांचे विचार निश्चितच प्रेरणादायी ठरतात.

**प्रकरण पाचवे - मुकुंदराव पाटील यांनी घेतलेला शेती प्रश्नांचा ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मिमांसा**

प्रस्तुत प्रकरणात मुकुंदराव पाटील यांनी वसाहतपूर्व काळातील शेतक-यांची स्थिती आणि वसाहतकालीन शेतक-यांची स्थिती या विवेचनातून शेतीप्रश्नांची कारणमिमांसा केलेली दिसून येते. यासाठी ते वसाहत पूर्व काळातील शेतक-यांची स्थिती अधिक चांगली असल्याचे स्पष्ट करतात.

वसाहत वादी शोषण व्यवस्थेमुळे सावकारशाहीचे प्रस्त वाढले यामुळे शेतकरी कर्जबाजारी होवून कंगाल बनू लागल्याचे दिसून येते. शेतक-यांना सतत दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागतो. यासाठी दुष्काळी परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून मुकुंदराव पाटील ज्या उपाययोजना सुचवितात त्या योजना आजच्या स्थितीतही जसेच्या तसे लागू पडतात. आजही सरकार दुष्काळी परिस्थितीवर पूर्णपणे मात करण्यास असमर्थ ठरतांना दिसत आहे. अशा वेळी सरकारने दिलेली मदत गरजू शेतक-यांना मिळण्याऐवजी ती सधन शेतक-यांनाच अधिक प्रमाणात मिळते. गरजू शेतकरी सरकारी योजनांपासून वंचित राहिलेला आजही आपणास पहावयास मिळते.

सरकारने शेतक-यांना दुष्काळी परिस्थितीत आर्थिक मदती बरोबरच विविध सवलतीही दयाव्यात. यासाठी विसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात शेतकरी आंदोलने उभी राहिली ती आजतागायत चालू आहेत. परंतू शेतक-यांना योग्य न्याय आजही मिळतांना दिसत नाही. शेतक-यांच्या प्रश्नासाठी ज्या शेतकरी संघटना आंदोलने करतात आणि यातून स्वतः चा स्वार्थ भागवून घेतात. शेतक-यांच्या वाटयाला यातून काहीही येत नाही. तो मात्र अहोरात्र काबाडकष्ट करुन जीवन जगतांना दिसतो. आज राज्य मंत्रीमंडळामध्ये बहुतेक मंत्री हे शेतकरी कुटूंबातील आहेत. परंतू तरीही महाराष्ट्रातील शेतकरीच जास्त प्रमाणात आत्महत्या करतांना दिसतो. यावरुन राज्य सरकारलाही शेतक-यांच्या प्रश्नांची किती तळमळ आहे याची आपल्याला कल्पना येवू शेकते. सरकारने जर खरोखरच शेतकरी हिताच्या योजना राबवल्या तर शेतक-यांची आर्थिक परिस्थितीत नक्कीच सुधारणा घडवून येईल. परंतू आज तसे होतांना दिसत नाही.

**प्रकरण सहावे - शेतक-यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेले उपाय**

मानवी जीवनामध्ये शिक्षणाचे अत्यंत महत्वाचे स्थान असून त्यामुळेच विकास साधता येतो. अशी मुकुंदराव पाटलांची धारणा असल्याचे दिसून येते. शेतक-यांना प्राथमिक शिक्षण तर हवेच परंतू त्याच बरोबर शेतीला उदयोगाचा दर्जा प्राप्त करुन देणारे आधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे. यासाठी मुकुंदराव पाटील सरकारकडे आग्रह धरतात. शेतक-यांची निकृष्ट स्थिती दूर करण्यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांना वायफळ खर्च थांबविण्याचा सल्ला देतात. त्याचप्रमाणे शेतक-यांनी आपल्या आयुष्यातील वेळेचा नाश न करता तो वेळ शेतीकामासाठी वापरावा तसेच शेतक-यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता जोडधंदयाची कास धरावी. ज्यामुळे शेतक-यांच्याआर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. सरकारने शेतक-यांना सुधारण्यासाठी ज्ञान

वाढविणारी योजना, धन वाढविणारी योजना, आणि ऋण फेडणारी योजना या तीन योजना अमलात आणण्याची सरकारला विनंती करतात. कारण सरकरी मदती वाचून या योजना चालू होणे शक्य नसल्याचेही मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

तत्कालीन सर्वांगीण ग्रामीण परिस्थिती पाहता दीनमित्र खेडयातून चालवणे अधिक गरजेचे होते. कारण गावगाडा जीवन पध्दतीच्या विनाशास कारण असलेली चूकीच्या निकषावर आधारीत असलेली वर्णव्यवस्था, दोषमुलक प्रथा, परंपरा , ग्रामीण अर्थकारण, धर्मकारण, उच्चवर्णियांचे अवास्तव महत्व यातून ग्रामीण शेतकरी कष्टकरी बहुजन समाजास बाहेर काढणे गरजेचे होते. दीनमित्राने ही जबाबदारी स्वीकारलेली होती. परंतू आज शतकानंतरही या विचारांची मार्गदर्शनाची शेतक-यांना गरज आहे. कारण आज समाजात शेतक-यांचे पुढारी फार आहेत. परंतू शेतक-यांसाठी खरोखर तळमळीने कार्य करणारा एकही नेता नाही. आज समाजात प्रत्येक जातीजमातीच्या संघटना दिसत आहेत. परंतू शेतक-यांसाठी तळमळीने कार्य करणारी एकही संघटना नाही. ज्या आहेत त्या आपला राजकीय स्वार्थ पाहण्यातच गुंतलेल्या आहेत. अशा परिस्थितीत वेळोवेळी पडणारा दुष्काळ अवर्षण यासारख्या संकटामुळे शेतकरी आर्थिक विवेचनात सापडला आहे. संघर्षाचा पर्याय समोर नसल्याने निराशाग्रस्त बनून शेतकरी आज आत्महत्या करतांना दिसत आहे. अशा परिस्थितीत मुकुंदराव पाटलांचे विचार शेतक-याना निश्चितच प्रेरणादायी ठरतील असे मला वाटते.

## प्रकरण सातवे - मुकुंदराव पाटील आणि शेतक-यांची जनजागृती

शेतक-यांनी राजकीय दृष्टया परिपक्व व्हावे यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांना आग्रह धरतात. येथे शेतक-यानी राजकीय पुढा-यांप्रमाणे आपली प्रगती करुन घ्यावी कारण स्वातंत्र्याचा उपयोग किंवा उपभोग घेण्याची कला पुढा-यांना जशी साधली त्याप्रमाणे शेतक-यांना साधता आली नाही. यासाठी शेतक-यांनी स्वार्थी राजकीय पुढा-यांना ओळखून शेतकरी हिताच्या योजना राबवणा-या व्यक्तीलाच मतदानाव्दारे आपले नेतृत्व करण्याची संधी दयावी. परंतू शेतकरी असे करत नाही यामुळे मुकुंदराव पाटील शेतक-यांच्या दुरावस्थेला स्वतः शेतक-यांनाच जबाबदार धरतात यासाठी ते इतर पुढारलेल्या देशातील शेतक-यांचे उदाहरण देवून त्यांची परिस्थिती यापेक्षा अधिक चांगली असल्याचे स्पष्ट करतात. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतक-यांनी एकत्र येवून संघटनेच्या माध्यमातून सरकारवर दबाव आणला पाहिजे. व शेतकरी

हिताच्या सुधारणा राबवल्या पाहिजे. सरकारनेही शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीच्या काळात आर्थिक साहाय्य केले पाहिजे. तरच शेतकरी नैसर्गिक आपत्तीतून वाचू शकेल परंतू सरकार शेतक-यांकडे पाहिजे त्याप्रमाणात लक्ष देतांना आजही दिसत नाही.

थोडक्यात विसाव्या शतकाच्या अखेरीस महराष्ट्रात अनेक शेतकरी आंदोलने उभी राहिली ती आजतागायत चालू आहेत. शेतक-यांची दयनिय अवस्था त्यामागची कारणे याला जबाबदार असलेले घटक आणि व्यक्ती याबद्दलचे मुकुंदराव पाटील यांनी केलेले विश्लेषण आजही जसेच्या तसे लागू पडतांना दिसते. फरक इतकाच पडला आहे की या सर्व घटकांची व्याप्ती आणि गहनता अधिक तीव्र होत आहे.

# प्रकरण - दुसरे

# महाराष्ट्रातील शेतीविषयक प्रश्न  स्वरुप व व्याप्ती

२.१ प्रास्ताविक

२.२ ब्रिटिश पूर्वकालीन कृषिव्यवस्था

२.२.१ जमीन व्यवस्था आणि ग्रामीण प्रशासन

२.२.२ शहरी रचना

२.२.३ धर्म आणि समाज

२.३ ब्रिटिशपूर्वकालीन आर्थिक जीवन

२.३.१ ब्रिटिशकालीन कृषी व्यवस्था

२.३.२ एल्फिस्टनचे धोरण

२.३.३ एल्फिस्टनने सांगितलेली शेतसाराविषयक तत्त्वे

२.४ जमीन महसूलविषयक धोरण

२.४.१ कायमधारा पध्दती

२.४.२ रयतवारी महसूल पध्दती

२.४.३ महालवारी  व्यवस्था

२.५ ब्रिटिशाचे कृषीविषयक धोरणांचे परिणाम

२.६ भरडला जाणारा शेतकरी

२.७ सावकारांनी केलेले शोषण

# प्रकरण - दुसरे

# महाराष्ट्रातील शेतीविषयक प्रश्न  स्वरुप व व्याप्ती

## २.१ प्रास्ताविक

प्राचीन  काळापासून भारतात शेती हा मुख्य व्यवसाय राहिला आहे. लोकसंख्येच्या ८० टक्के लोक, शेती व शेतीपुरक व्यवसायावर आपली उपजिविका भागवित असत. आजही थोडयाफार फरकाने हिच स्थिती आहे. पावसावर अवलंबून असलेली शेती व शेतीकरण्याची पारंपरिक पध्दती ही भारतीय शेतीची महत्त्वाची वैशिष्टे आहेत. शेतकरी हा इथल्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असून तो प्रामुख्याने खेडयात राहतो. शेतकरी सा-या जगाचा पोशिंदा असूनही तो स्वतः नेहमीच अर्धपोटी राहत आला आहे. विसाव्या शतकातही हिच परिस्थिती  दिसून येते. सहाजिकच  कृषिविषयक प्रश्नांचा ऐतिहासिक वेध घेणे हे इतिहास या ज्ञानशाखेच्या अभ्यासाला उपयुक्त ठरणारे आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात ब्रिटीशपूर्वकालीन व्यवस्था आणि ब्रिटीश काळातील कृषिविषयक धोरणांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## २.२ ब्रिटिश पूर्व कालीन कृषिव्यवस्था

ब्रिटिश पूर्व कालीन कृषिव्यवस्था पाहण्याबरोबरच जमीनव्यवस्था आणि ग्रामीण प्रशासन, शहरी रचना, धर्म आणि समाज, त्या काळातील सामाजिक स्थिती, जाती विरोध, ब्रिटिश पूर्वकालीन आर्थिक जीवन हे घटकही पाहणे तितकेच महत्त्वाचे वाटते.

### २.२.१  जमीन व्यवस्था आणि ग्रामीण प्रशासन

ब्रिटिश सत्ता येण्यापूर्वी मुंबई प्रांतात जमीन व्यवस्था नेमकी कशी होती  या बद्दल विद्वानांचे एकमत होताना दिसत नाही. रविंद्रकुमार, वाडिया आणि मर्चंट इत्यादींचे मत असे की, “ब्रिटिश सत्ता येईपर्यंत शेतजमिनीच्या सामुदायिक मालकीची येथे  प्रथा होती. गावाच्या शिवारातील  सर्व जमीन गावाच्या सामुदायिक मालकीची आणि गावाचा प्रमुख पाटील हा गाव पंचायतीच्या मदतीने जास्तीत जास्त उत्पादनाच्या दृष्टीने या जमिनीचे जमीन करु इच्छिणा-या  कुटुंबात  विभाजन करुन देत असे. म्हणजे शेतकरी  कुटुंबाचा तो कसत असलेल्या जमिनीवर  मालकी  हक्क नसून केवळ वहिती हक्क असे व तो वंशपरंपरेने  कुटुंबातील  वारसदाराकडे जात असे.”[१]  सामुदायिक मालकी हक्कामुळे शेतकरी जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न करत असे तसेच ही जमीन वंशपरंपरागत आपल्याच कुटुंबाला मिळावी यासाठीही शेतकरी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते .

जमिनीचे मूळ मालक साधारणतः समसमान असल्यामुळे पुढे वंशपरंपरने हस्तांतर होताना त्याचे जे फेर विभाजन होईल व त्यामुळे जी काही विषमता निर्माण होईल तेवढीच हा सिध्दांत मान्य केल्यास जमिनीची विक्री, गहाणखत पैशाच्या देवघेवित तिचे हस्तांतर या गोष्टी संभवत नाहीत. परंतु इरफान हबीब सारखे विचारवंत जमीन धारणे विषयीचा हा सिध्दांत मान्य करीत नाहीत. [२] एकूणच शेतकरी आपल्याच कुटुंबाला जमीन कसण्यास मिळावी यासाठी जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न करत असे. कारण जोपर्यंत गावच्या पंचाचा विश्वास आहे तोपर्यंत ती जमीन शेतक-यांना कसण्यासाठी मिळत असे. तरी जमीन ही वस्तू ग्रामीण जीवनातील अन्य रुढी संकेतामुळे बाजारातील क्रय वस्तू नव्हती आणि पंचायतीच्या अनुमतीशिवाय तिचे हस्तांतरण होत नव्हते हे मात्र सर्वच मान्य करताना दिसतात.

जमीनसारा संपूर्ण खेडयावर आकारला जायचा, याबद्दलही साधारणतः एकमत आहे. मामलेदार हा कोणत्या खेडयाने किती सारा दयावा हे तेथील देशमुख, पाटलांशी सल्लामसलत करुन ठरवित असे. गावचा सारा ठरल्यानंतर कोणत्या शेतकरी कुटुंबाने त्यातला किती वाटा भरावा, हे पाटील ठरवित असे आणि साधारणतः हंगामा नंतर उत्पादित वस्तूच्या स्वरुपात शेतक-याकडून सारा वसुली घेऊन पाटील ती देशमुख मामलेदार यांच्या मार्फत राज्याकडे पाठवित असे. "ग्रामीण उत्पादन आणि एकूणच अर्थव्यवस्था ही त्या गावच्या गरजांवर आधारीत होती. म्हणजे 'उपभोगासाठी उत्पादन' या तत्त्वावर उत्पादन होत असे. जातीनिहाय श्रमविभागणी झाली असल्यामुळे स्पर्धेऐवजी सहकार्याच्या अर्थकारणाचा मागमूस नव्हता. स्पर्धेऐवजी सहकार्याच्या तत्त्वावर ग्रामीण अर्थव्यवस्था उभी होती." [३] पूर्वी खेडयातील शेतक-यांच्या गरजा अत्यल्प असत या गरजांच्या पूर्ततेसाठी ही शेतकरी कुटुंबे एकमेकांवर अवलंबून असत. परंतु इंग्रज सरकारच्या आगमनाने ही स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडून पडलेली दिसून येते.

उद्योग उत्पादन त्या काळात फारसे दिसून येत नाहीत. गावचे कारागीर शेतकरी आणि इतर लोक त्यांच्या गरजांच्या वस्तू घरगुती उत्पादनातून निर्माण करीत. त्यामुळे गावात आर्थिक उलाढाल फारसी होताना दिसून येत नसे. सर्व देवघेव बहूधा वस्तुच्या स्वरुपात चालत असे. शेतीमाल किंवा उत्पादित वस्तू शहरात नेऊन विकण्याचाही फारसा प्रश्न नसल्याचे दिसून येते. कारण सारेच उत्पादन गावच्या गरजा लक्षात घेऊन होत असे. त्यामुळे खेडे हे जवळपास स्वायत्त आणि स्वयंपूर्ण गणराज्यच असल्यासारखे होते. "शेतक-यामध्ये कष्टाळूपणा, संतोषी वृत्ती, प्रामाणिकपणा,

आदरवृत्ती, अडाणीपणा, निष्कपटपणा, प्रेमळवृत्ती व सत्यनिष्ठा वसत असे."[४] संरक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था या बहुतेक बाजू ग्रामपंचायत सांभाळताना दिसून येतात. पंचायतीसमोर येणारे खटले साध्या देवघेवीसंबंधी किंवा घरगुती स्वरुपाचे असत. खटल्याच्या चौकशीमध्ये अर्थातच, कागदोपत्री पुरावे साक्षी याची आवश्यकता भासत नसे. कारण गावचे सर्व व्यवहार सर्वांनाच माहीत असत. त्यात लपविण्यासारखे काहीच नसायचे. शिवाय न्यायनिवाडा करण्यासाठी कायदयाचे फार मोठे ज्ञान असणा-या कायदेपंडितांचीही आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही.

गावच्या काही रुढी आणि परंपरा याबाबत मार्गदर्शक ठरत. उदा. देशभर सर्वत्र दामदुप्पटीची प्रथा रुढ होती. या प्रथेनुसार कर्जाचे व्याज जास्तीत जास्त मुद्दलाइतके वाढू शकते. त्यापेक्षा जास्त व्याज पाटील आणि ग्रामपंचायत नाकारीत असे. "पूर्वी गावचे पुढारी निःपक्षपाती, प्रामाणिक, वाणीने करारी होते. त्यामुळे गावपंचायती चांगल्या चालत होत्या. गुन्हयाच्या चौकशीत लाचलुचपतीसारखे प्रकार घडत नव्हते. त्यामुळे फुकटात खरा न्याय मिळत असे. पण हा प्रकार सर्व खेडयात सुरळीतपणे चालत होता असे मुळीच नाही. ज्या गावातील पंच निर्भीड, निर्लोभी आणि ख-यास धरणारे होते त्याच गावांत गावपंचायती उत्तम चालत असल्याचे दिसून येते आणि ज्या गावांतील पंच पक्षपाती, लोभी, लाच खाणारे होते त्या गावात गरीब लोकास मनस्वी त्रास होत असे."[५] जरी खेडी स्वयंपूर्ण होती तसेच खेडयातील गरजा खेडयातच भागवल्या जात असत. परंतु गावातील न्यायदानाचे कार्य करणारी पंच मंडळी ही सत्यास धरुन न्याय देणारी असणे ही तितकेच महत्त्वाचे होते. कारण जर पंच लोभी निघाले तर सामान्य शेतक-यावरच जास्त अन्याय होत असे. यामुळे ही प्रथा शेतक-यांस हिताची नव्हती. शिवाय सामान्य लोकांना वंशपंरपरागत तोच व्यवसाय करावा लागत असे. तरी शेतक-यांची स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. कोणत्याही खेडयाचा इतर खेडयांशी वा शहरांशी संपर्क बेताचाच असे. त्यामुळे या खेडयांना संकटांना एकाकीपणे तोंड दयावे लागे. शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून होती.

अवर्षण, अतिवृष्टी किंवा पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीची नासधूस झाल्यास शेतक-यास सावकाराकडे कर्जासाठी धाव घ्यावी लागे. कारण कर्जाच्या पर्यायी सुलभ व्यवस्था उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. या सावकाराचे व्याजाचे दर भरमसाठ असत. त्यामुळे एकदा कर्जबाजारी झालेला शेतकरी हा बहुधा कायम कर्जबाजारी असायचा.[६] नैसर्गिक आपत्तीमध्ये पिके वाया गेली तर शेतक-यांना कौटुंबीक खर्च भागवण्यासाठी सावकरांकडून कर्ज घ्यावे लागे शेतकरी

अशिक्षित असल्याने सावकार हे कर्ज वाढवून लावत असे. त्यामुळे शेतक-याने पिकासाठी घेतलेले कर्ज नंतर शेतक-याला पिकाने साथ न दिल्याने कर्ज फेडणे अवघड जात असे या संकटातून बाहेर पडण्यासाठी त्याला सावकाराकडे कर्जासाठी जावे लागे. हा सावकार एकदा शेतकरी आपल्याकडे आला की मग शेतक-याच्या अडाणीपणाचा फायदा घेवून शेतक-यांची लुबाडणूक करीत असल्याचे दिसून येते. खेडे आणि शहर विभाग यात सर्वसाधारण स्वरुपाचा किंवा दैनंदिन प्रशासनिक किंवा आर्थिक संबंध नसला तरी ते एकमेकापासून पूर्णतः विलग होत असे मात्र नाही. शहरात बाजारपेठा होत्या. शेतकरी त्यांचा माल विक्रीसाठी घेऊन यायचे. या शहरामध्ये कुशल कारागीर वर्ग असावयाचा. माल विकून आलेल्या पैशातून शेतकरी या शहरी कुशल कारागिरांनी तयार केलेल्या वस्तू विकत घेऊन खेडयात परत येत असत.[७]

खेडे आणि शहरी विभागातील याशिवाय दुसरा संबंध आर्थिक स्वरुपाचा सांगता येईल. खेडयातील सावकार शहरातील मोठे सावकार आणि सराफ यांच्याकडून कमी व्याजाने पैसे कर्जाऊ आणायाचा आणि जास्त दराने खेडयातील लोकांना दयायचा. हा सावकारी पातळीवरील शहर-ग्राम संबंध दिसून येतो. ग्रामीण शोषणाचा हा एक कायम मार्ग होता. अवर्षणामुळे शेतक-याकडून सारा वसूल न होऊ शकल्यास गावचा पाटील सुध्दा कधी कधी शहरातील पेढयावरुन कर्ज आणित असे आणि सरकारी सारा भरीत असे.[८]

शेतकरी हा कायमच दारिद्रयात जीवन जगत असे शिवाय शिक्षणापासून वंचित राहिल्याने त्याची जास्तीत जास्त पिळवणूक केली जात होती. पूर्वी जरी खेडी स्वयंपूर्ण होती तरीही हे सावकार शेतक-यांच्या अडाणीपणाचा फायदा घेवून शहरातील सावकाराकडून पैसे आणून ते जास्त दराने खेडयात वाटत असे. शिवाय गावचा पाटील हा सुध्दा पूर्णतः अडाणी होता. पाटील जेव्हा सरकारी शेतसारा भरण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेई परंतु दुष्काळामुळे जर सरकारने हा शेतसारा माफ केला तर सावकार पाटलांकडून व्याजासहित शेतसारा वसूल करत. एकूणच खेडयातील शेतकरी शिक्षणापासून दूर राहिल्याने त्याची मोठया प्रमाणात पिळवणूक होत असे.

### २.२.२ शहरी रचना

ब्रिटिशपूर्व काळात आजच्या सारखी शहरे फारशी नव्हती, परंतु खेडयापेक्षा काहीशी निराळी रचना असणारे हे मोठे गाव असावयाचे. ही शहरे तीन प्रकारची होती. राजधानीची शहरे, व्यापारी शहरे आणि पवित्र स्थळे.[९] पुणे, सातारा, कोल्हापूर ही राजधानीची शहरे, नाशिक, पंढरपूर

ही पवित्र स्थळे, पैठण हे पवित्र स्थळ असूनही व्यापार उदयोगाचे केंद्र या तीन प्रकारच्या गावांकडे तरी निरनिराळया मार्गानी ग्रामीण भागातील संपत्ती खेचली जात असल्याचे दिसून येते. शेतसारा आणि विविध कर यांच्या स्वरुपात ग्रामीण भागातील संपत्ती राजधानीकडे ओढली जात होती. कच्चा मालाची खरेदी या मार्गाने व्यापारी शहरे शेतक-यांचा पैसा ओढीत, तर यात्रा मोहोत्सव आणि विविध धार्मिक विधी, उपक्रम या मार्गांनी धार्मिक शहरे ग्रामीण भागातील पैसा ओढीत असे. त्यामुळे शहरी भागातील लोकांचे जीवन ग्रामीण लोकांच्या तुलनेने कमी कष्टाचे आणि जास्त ऐषआरामाचे होते. त्यांच्या विलासी जीवनामुळे अशा शहरामधून कलावंत आणि कुशल कारागीर येऊन स्थायिक होत.[१०] सतत पडणारा दुष्काळ, वाढता कर्जाचा बोजा यामुळे खेडयातील लोक आपली व कुटुंबाची उपजिविका भागविण्यासाठी शहराकडे धाव घेत असे शहरात अनेक छोटे मोठे उदयोगधंदे असल्याने मिळेल ते काम ही मंडळी करत असे.

### २.२.३ धर्म आणि समाज

ब्रिटिशपूर्व काळातील समाजव्यवस्था जातीवर आधारलेली होती. या जाती असंख्य होत्या. त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ क्रम ठरलेला असावा आणि त्यानुसार जातींना विशेष हक्क दिलेले दिसून येतात. “सर्वश्रेष्ठ असणा-या ब्राह्मण जातीला जास्तीचे अधिकार तर सर्वात कनिष्ठ मानलेल्या अतिशूद्रांना शिक्षणाची सर्वच दारे बंद होती.”[११] ब्रिटिश पूर्व काळात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. यात ब्राह्मण वर्गाणे शिक्षण घेतल्याने ते सर्व श्रेष्ठ ठरत असत. तर शूद्रांना शिक्षणाची दारे बंद होती. त्यांना गावाबाहेर रहावे लागत व या वरिष्ठ वर्गाने सांगितलेली कामे या लोकांना करावी लागत असे. त्यामुळे शूद्र वर्ण कायम स्वरुपी हीन दर्जाचे जीवन जगत असल्याचे दिसून येते.

प्राकृत शाळेतूनही धार्मिक शिक्षण पौराणिक कथांच्या स्वरुपात दिले जायचे. याशिवाय काही पाढे आणि अंकगणितातील चार प्राथमिक क्रिया एवढेच ज्ञान दिले जात असे. अतिशूद्रांप्रमाणेच स्त्री- शिक्षणावर ही पूर्ण बंदी होती. मध्यमजातींना प्राकृत शाळेचे दरवाजे खुले असले तरी सौध्दांतिक आणि कारागीर त्यांच्या मुलांना क्वचितच शाळेत पाठवायचे.

“धर्म दोन पातळयावर होता, सैध्दांतिक आणि आचरणात्मक. सैध्दांतिक धर्म शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारलेला होता. तो फक्त ब्राह्मणांनाच माहीत असे आणि त्यांच्यातच त्यावर चर्चा चालत असे. सामान्य माणसासाठी आचारात्मक धर्म होता. त्यात निरनिराळी व्रतवैकल्ये, उपास-तपास स्पृश्यास्पृशाचे नियम पाळणे. निरनिराळे सण आणि उत्सव

साजरे करणे, देव-देवतांची पूजा, भक्ती इत्यादींचा समावेश होता."[१२] या सर्व गोष्टी शुध्द अंधश्रध्देवर आधारलेल्या होत्या हे दिसून येते. या विषयी लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात की, " त्या काळातील हिंदू हा निरनिराळे देवदेवता आणि पितर भूत, पिशाच्च यांच्या दडपणाखाली होते. खेडयाची कुटुंबाची आणि समूहाची जुलूमशाही तो निमूटपणे सहन करीत असे. परंतु त्याच्या मनावरील धार्मिक अंधश्रध्देची पकड या जुलूमशाही पेक्षा अधिक तीव्र आणि भयप्रद होती. तो भुताखेतांच्या काल्पनिक जगातच जणू जगत होता."[१३] याचाच परिणाम म्हणजे अनेक देव-देवतांच्या कल्पना आणि चार वर्णाच्या ठिकाणी विविध जातीचा उगम अशाच अंधश्रध्देतून शैव, वैष्णव, शाक्त असे अनेक पंथ हिंदू धर्मात निर्माण झालेले पाहावयास मिळतात. "प्रत्येक पंथ दुस-या पंथाची मूळ तत्त्वे नाकारीत असल्याचे दिसून येते. हे विविध पंथ आणि ठिकठिकाणाच्या भिन्न प्रथा यामुळे सामान्य माणसाची अवस्था धार्मिक बाबतीत गोंधळलेली होती. त्यामुळे धर्माच्या बाबतीत ब्राह्मण सांगेल ती पूर्व दिशा. त्यामुळे समाजात ब्राह्मणांचे महत्त्व वाढले. परिणामी सामान्य माणसांच्या मनावर कर्मकांड आणि दैववादाची पकड चांगलीच घट्ट झाल्याचे दिसून येते. धर्मावरील खर्च त्यांना अपरिहार्य वाटू लागला. दारिद्रयात असूनही ब्राह्मण सांगेल तेवढा खर्च ते कर्मकांडावर करीत."[१४] या मनःस्थितीला ब्राह्मणच जबाबदार असल्याचे पाहावयास मिळते.

असा हा तत्कालीन महाराष्ट्र खुळचट रुढी, प्रथा, परंपरांमध्ये, वेडगळ धार्मिक समजूतींमध्ये अडकून पडल्याचे दिसून येते. जातिनिहाय व्यवसायामुळे स्पर्धा खुंटली. परिणामी ज्ञानवृध्दी थांबली. स्त्रियांच्या दैन्यावस्थेला तर पारावर नव्हता. शिक्षण बंदी, बालविवाह, बाल-जरठ विवाह, विधवाविवाह बंदी, बहुपत्नीकत्व, सती प्रथा इ. चालीरितीमुळे स्त्री जीवन कमालीचे हलाखीचे बनले होते. हे चित्र समाजातील राजवट कोणतीही आली तरी बदलणारे नव्हते. इंग्रज राजवट इथे प्रस्तापित झाल्या नंतरही हया चित्रात फारसा फरक पडल्याचे दिसत नाही.

## २.३ ब्रिटिशपूर्वकालीन आर्थिक जीवन

इंग्रजपूर्व काळात भारताची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व स्थिर स्वरुपाची असल्याचे दिसून येते. स्वयंपूर्ण कृषीव्यवस्था, वाढता परदेशी व्यापार, समृध्द उत्तम दर्जाची हस्तकला व भरभराटलेले उद्योग ही त्या काळची भारतीय अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्टये होती. भारतातील प्रमुख व्यवसाय शेती हा होता. शेतकरी स्वतःच्या उपजिविकेसाठी शेती करी व शेतीच्या अतिरिक्त उत्पादनातून

दैनंदिन जीवनाला लागणा-या वस्तू खरेदी करताना दिसतो. त्याकाळी वस्तू हेच विनिमयाचे साधन असल्यामुळे पिकवलेल्या धान्याच्या मोबदल्यात तो इतर आवश्यक वस्तू मिळवी. उत्पादनातील काही भाग अडीअडचणीच्या काळी उपयोगी पडावा म्हणून साठवून ठेवताना दिसून येतो. शेतसाराही धान्याच्या रुपात तो भरत असे. शेतक-यांबरोबरच गावात इतर व्यवसाय करणारे लोक असत. "महाराष्ट्रात बलुतेदार-अलूतेदार पध्दती होती. लोहार, सुतार, कुंभार इत्यादी व्यवसायिक गावातील लोकांना लागणा-या वस्तू उत्पादित करीत व धान्याच्या मोबदल्यात त्या वस्तू शेतक-यांना पुरवित. अशा प्रकारे ब्रिटिशपूर्वकाळातील ग्रामजीवन स्वयंपूर्ण असल्याचे दिसून येते. बाहय जगाशी ग्रामीण भागाचा फारचा संबंध येत नसे. गावातील लोक एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परांवर अवलंबून असल्याने ग्रामजीवनात सांघिक ऐक्याची व सहकार्याची भावना दिसुन येते. असा हा गावगाडा मध्ययुगात भारतामध्ये प्रचलित होता."[१५] ब्रिटिशपुर्व भारतीय अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती.यामुळे भारतातून खूप मोठयाप्रमाणत परदेशी व्यापार चालत असे. कापड मसाल्याचे पदार्थ निर्यात करणारा भारत हा प्रमुख देश होता. यातून मोठया प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण होत असे. खेडयात बलुतेदारी पध्दत अस्तित्वात असल्याने शेतकरी वर्ग शिक्षणापासून वंचित होता. त्यामुळे त्यांच्यात मागासलेपण होते. परंतु तरीही ते आपल्या व्यवासायाबाबत समाधानी असल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन भारताचे दुसरे वैशिष्टय म्हणजे समृध्द हस्तकला, भरभराटलेले उद्योग व वाढता व्यापार हे दिसून येते. प्राचीन काळापासुन भारताचा बाहेरच्या जगाशी व्यापार चालू होता. भारतीय कलावस्तू जगभर प्रसिध्द होत्या. उत्तम दर्जाचे सुती व रेशमी कापड, कलात्मक विणकाम केलेले कापड, साखर, ताग, शस्त्रे, धातूंची भांडी, कलात्मक दागदागिने, औषधे, मौल्यवान रत्ने इत्यादी वस्तूंची निर्यात होई. भारतीय कारागीर आपल्या कलाकौशल्यासाठी जगभर प्रसिध्द होते. महाराष्ट्र आंध्र व बंगालमध्ये जहाजबांधणीचा उदयोग चाले. येथे तयार होणारी जहाजे काही युरोपीयन कंपन्या खरेदी करीत. या परंपरागत उदयोगात सर्वात अग्रकम होता तो सुती व रेशमी कापडाचा.

अशा प्रकारे मध्ययुगात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत भारतात प्रचलित असलेली ही अर्थव्यवस्था पुढे इंग्रजांच्या शासनकाळात कोलमडून पडल्याचे दिसून येते. त्याची जागा इंग्रजांच्या आर्थिक हितसंबंधाचे शोषण करणा-या अर्थव्यवस्थेने घेतलेली दिसून येते. भारत हा इंग्लडची वसाहत बनला. इंग्लडच्या वसाहतवादाचे व साम्राज्यवादाचे तो भक्ष्य बनला.

### २.३.१ ब्रिटिशकालीन कृषी व्यवस्था

ब्रिटिशांच्या वसाहतिक शासनाचा भारतीय शेतीधंदयावर कोणता परिणाम झाला हे विचारात घेणे या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे ठरते. कारण भारत हा कृषीप्रधान देश होता. त्यामुळे येथील शेतीधंदयावर झालेल्या बदलांचा प्रभाव सर्वसामान्य लोकांच्या जीवनावर पडणे अगदी स्वाभाविक होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीय शेतीच्या अर्थव्यवस्थेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणलेले दिसतात. मात्र या बदलांचा उद्देश शेतीव्यवसायाला चालना देणे किंवा त्यामध्ये सुधारणा घडवून आणणे हा नव्हता. तर आपले आर्थिक हितसंबंध जपणे आणि त्याकरीता आपल्या स्वार्थी धोरणांची कोणतीही किंमत देऊन कार्यवाही करणे हा होता असे दिसून येते.

शेती अर्थव्यवस्थेत जमीन महसुलाचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा घटक होता कारण भांडवलशाहीपूर्व कृषीप्रधान समाजात जमीन महसुल हाच राज्याच्या उत्पादनाचा मुख्य स्त्रोत असल्याचे दिसून येते. "जुन्या काळातील भारतीय राज्यकर्त्यांनी जमीन महसुलाच्या आकारणी बाबत कोणत्याही समान सूत्राचा किंवा धोरणाचा अवलंब केलेला दिसून येत नाही. परंतु जमीन महसुलाची आकारणी करताना त्यांनी भारतीय खेडयांची परंपरागत आर्थिक स्वायत्ता धोक्यात येणार नाही याची दक्षता घेतलेली दिसून येते. त्याच बरोबर भारतीय समाजात सामान्य शेतकरी आणि इतर अनुषंगिक घटक यांच्यामध्ये जे जमीनविषयक संबंध प्रस्थापित झाले होते. त्यामध्ये फार मोठे बदल घडवून आणण्याचा प्रयत्नही त्यांनी कधी केलेला दिसून येत नाही. त्यामुळे जमीन महसुलाची पारंपरिक व्यवस्था थोडयाफार फरकाने दीर्घकाळ टिकून राहिली."[१६] ही व्यवस्था सामान्य शेतकरी व कुळे यांच्या शोषणावरच आधारीत असली तरी त्यांच्या अस्तित्वाला गंभीर धोका निर्माण होणार नाही. याची दक्षता या पारंपरिक व्यवस्थेमध्ये घेतली गेलेली आपणास पाहावयास मिळते.

### २.३.२ एल्फिस्टनचे धोरण

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नामशेष करुन हिंदुस्थानवर ब्रिटिशाचे सार्वभौमत्व स्थापन करण्याचे कार्य माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने केलेले दिसून येते. तोच मुंबई इलाख्याचा पेशवाईनंतरचा पहिला गव्हर्नर बनला. "इ.स.१८१९ पासुन १८२७ पर्यत तो मुंबईचा गव्हर्नर होता. याच काळात इ.स. १८२० ते १८२७ सर थॉमस मन्रो हा मद्रासचा गव्हर्नर होता. या दोघांनी ब्रिटिश राजनीतीला एक उदार धोरण दाखवून दिले आणि ते जाहीर करुन त्यांनी काही एतद्देशीय लोकांची

अंत:करणे आकर्षित करुन घेतल्याचे दिसून येते. हिंदुस्थानचे सार्वभौमत्व आपल्याकडे आले त्या वेळी हे सार्वभौमत्व आपण किती काळ टिकवू शकू ते अधिकात अधिक काळ कोणत्या धोरणाने टिकू शकेल आपल्या साम्राज्याची अखेर काय होईल, या संबंधीचे विचार त्यांच्या डोक्यात घोळत असणे अगदी स्वाभाविक आहे."[१७] हिंदुस्थानमध्ये राज्यकारभार करतांना तेथील शेतकरीवर्गाचा ब्रिटिश सरकारबद्दल विश्वास निर्माण व्हावा या विचारातून एल्फिस्टनने हिंदुस्थानमधील शेतक-याकडून जो शेतसारा वसूल केला जात असे. त्या शेतसारा विषयक काही तत्त्वे सांगितलेले दिसून येतात.

### २.३.३ एल्फिस्टनने सांगितलेली शेतसाराविषयक तत्त्वे

१. जेवढी जमीन लागवडीखाली असेल तेवढयाच जमिनीच्या क्षेत्रफळाचा विचार करुन त्यावर शेतसारा निश्चित करावा व उरलेल्या जमिनी शेतसा-यामधून वगळाव्या.

२. शेतक-यांना परवडेल असा शेतसारा असावा.

३. जमीन महसुलाची आकारणी व शेतसा-याचे मूल्य मुख्यत: समान असावीत.

४. नवीन कर लादू नये, तसेच जाचक व अन्यायकारक कर बंद करावे.

५. जनतेमध्ये इंग्रजांबद्दल विश्वास निर्माण होण्यासारखे वर्तन ठेवावे.

६. शेतक-यास काही अडचणी आल्यास भावनेच्या भरात वाहून न जाता वस्तुस्थितीचा अंदाज पाहून मगच त्यास शेतसा-यामध्ये सूट दयावी.

७. एखादया शेतक-यास सूट पाहिजे असल्यास त्या शेतक-याकडून दस्तऐवज लिहून घ्यावा व त्यामधील माहिती खोटी आढळल्यास त्या शेतक-यास दंडात्मक शिक्षा दयावी.[१८]

एल्फिस्टनने येथे जी शेतसाराविषयक तत्त्वे सांगितली त्यातून त्याचा दूरदृष्टीकोन लक्षात येतो. कारण ज्यांच्यावर राज्य करायचे त्यांची अंत:करणे आपण आकर्षित करणे गरजेचे आहे त्यासाठी त्यांच्यावर अन्याय होता कामा नये हे ओळखूनच एल्फिस्टनने वरील तत्त्वे अधिका-यांना सांगितलेली दिसून येतात.

एल्फिस्टनने वरील तत्त्वे यशस्वी होण्यासाठी आधिकारी वर्गाची मांडणी तयार केली. एल्फिस्टनने प्रत्येक जिल्हयावर कलेक्टरच्या जागा नेमल्या कलेक्टर्सला वसुलीविषयक अधिकार आखून दिले. मोजणीदार, कारकून व चौकशी अधिकारी यांच्या नेमणूका कलेक्टरच्या हाताखाली क्रमाने करण्यात आल्या, मामलेदारास तालुक्याच्या ठिकाणी वसुलीचे अधिकार देण्यात आले. त्यालाही त्याचे क्षेत्र ठरवून दिले व कलेक्टरचे स्थान सर्वात वरचे होते. या सर्वांना त्यांचे पगार ठरवून दिले.[१९] हिंदूस्थानमधील शेतक-यांना ब्रिटीश सरकारबद्दल विश्वास वाटेल व ब्रिटिश सरकारला हिंदूस्थानमध्ये अधिक काळ राज्यकारभार करता येईल. हा उद्देश सफल होण्यासाठी हिंदूस्थानमधील शेतक-यांवर अन्याय करुन चालणार नाही. यासाठी एल्फिस्टनने शेतसारा विषयक धोरण राबवलेले दिसून येते.

भारतावरील ब्रिटिश शासनकाळात कृषी बाबत कंपनी सरकारचे धोरण एकाच उद्दिष्टावर केंद्रित झाले होते. जास्तीत जास्त जमीन महसुल पदरात पाडून घ्यावयाचा हे ते उद्दिष्ट होते. “भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे जमीन महसुल हा उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग होता. भारताची आर्थिक लूट करावी या उद्येशाने प्रेरीत झालेल्या कंपनी सरकारने जास्तीत जास्त महसुल पदरात पाडून घेण्याच्या हेतूने आपले महसुलविषयक धोरण निर्धारीत केले. हे धोरण सर्वत्र सारखे नव्हते. ते देशाच्या निरनिराळया भागात भिन्न स्वरुपाचे होते. तसेच परिस्थितीनुसार काही अंशी त्यात बदल होत गेलेले दिसून येतात. महसुल उत्पादनाचा उपयोग शेतक-यांच्या कल्याणाकरता करण्यात आलेला दिसून येत नाही. त्या उत्पन्नातून येथील कंपनीच्या शासनाचा खर्च करण्यात आला व अतिरिक्त उत्पन्न निरनिराळया मार्गांनी इंग्लडला नेण्यात आले.”[२०] पुर्वी भारतीय राज्यकर्त्यांचा जमीन महसुल हाच उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. या राज्यकर्त्यांनी जमीन महसुलाच्या आकारणी बाबत कोणत्याही समान सूत्राचा किंवा धोरणांचा अवलंब केला नव्हता परंतु जमीन महसुलाची आकारणी करतांना त्यांनी भारतीय खेडयांची परंपरागत आर्थिक स्वायत्तता धोक्यात येणार नाही याची दक्षाता घेतली होती. ब्रिटीश सरकारने यामध्ये बदल करुन जास्तीत जास्त महसुल वाढवण्याच्या हेतूने महसुल विषयक धोरण राबवतांना शेतक-यांच्या हिताची पर्वा केलेली दिसून येत नाही.

“इंग्रजांना इ.स.१७६५ साली बंगालमध्ये दिवाणी अधिकार मिळाला. त्यानुसार महसुलाच्या उत्पन्नाचा अधिकार कंपनीच्या हाती आल्याचे दिसून येते. परंतु बंगालमध्ये राजकीय सत्ता मिळाली

असली तरी येथील कृषीव्यवस्थेची माहिती कंपनीला नसल्यामुळे आणि महसुल यंत्रणा राबविण्यासाठी क्षमता नसल्यामुळे रॉबर्ट क्लाईव्हने महसुल वसुलीचे काम भारतीय अधिका-यांच्या नायब सुभेदाराच्या हाती ठेवले. त्याने महसुल प्रचलित यंत्रणेद्वारा गोळा करावा व तो कंपनीच्या हाती सोपवावा अशी व्यवस्था क्लाईव्हने केली. वॉरन गव्हर्नरपदी आला त्यावेळी महसुलाचे उत्पन्न घटले होते. प्रचलित महसुल यंत्रणा त्याला असमाधानकारक वाटली. म्हणून त्याचा फेरविचार सुरु झाला. यावर उहापोह करताना जमिनीची मालकी कोणाची ? सरकारला सारा कोणी दयावयाचा ? जमिनीच्या उत्पन्नात सरकारचा वाटा किती असावा ? असे अनेक प्रश्न उपस्थित झाल्याचे दिसून येते. हेस्टिंगचे मत असे होते की जमिनीची मालकी सरकारची आहे. शेतकरी केवळ जमीन कसणारे खंडकरी आहेत व जमीनदार हे केवळ सारा गोळा करुन सरकारला देणारे मध्यस्थ आहेत. यामुळे शेती करणा-याला त्याच्या मेहनतीचे मोल म्हणून उत्पन्नाचा काही वाटा मिळावा. मध्यस्थाला सारा वसुलीचा मोबदला म्हणून थोडे कमिशन मिळावे व उत्पन्नाचा सर्व उर्वरीत भाग सरकारला मिळावा. इंग्लडमध्ये प्रचलित असलेल्या कृषीव्यवस्थेनुसार भारतातही भूव्यवस्था आहे असा त्याचा समज झालेला दिसून येतो. बंगालमधिल महसुलाच्या उत्पन्नातवृध्दी व्हावी हे त्याचे मूळ उद्विष्ट होते. त्या दृष्टीने हेस्टिंगने महसुल गोळा करण्याच्या अधिकाराचा लिलाव सुरु केला. प्रस्थापित व्यवस्थेतील जमीनदार या लिलावाच्या स्पर्धेत मागे पडल्याचे दिसून येतात व कृषीक्षेत्राबाहेरील बरेच लोक या क्षेत्रात शिरले. यापैकी काही कंपनीच्या अधिका-यांच्या विश्वासातील भारतीय कर्मचारी, व्यापारी सावकार वगैरे लोक होते. इ.स. १७७२ साली या पध्दतीने पाच वर्षासाठी शेतसारा निर्धारीत करण्यात आला होता.”[२१]

कंपनी सरकारच्या महसुल विषयक धोरणामुळे भारतीय शेतक-यांचे आर्थिक शोषण होत होते. त्यांनी राबवलेल्या महसुल गोळा करण्याच्या लिलाव पध्दतीमुळे जो जास्त महसुल गोळा करुन देईन त्यालाच वसुलीचा अधिकार दिला जात असे. हे वसूली अधिकरी शेतक-यांवर दडपशाही करुन त्यांच्याकडून महसुल वसुल करत असे. येथे कंपनी सरकारच्या महसुल विषयक धोरणामुळे शेतकरी हलाखीत जीवन जगतांना दिसून येत होता.

## २.४ जमीन महसुलविषयक धोरण

### २.४.१ कायमधारा पध्दती

वॉरन हेस्टिंगने प्रचलित केलेल्या महसुल व्यवस्थेमुळे बंगालमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. आर्थिक दूरावस्थेमुळे त्रस्त झालेले शेतकरी उठाव करु लागले. कंपनीचे महसुलाचे उत्पन्न स्थिर राहावयाचे असेल तर शेतक-यांची स्थिती समाधानकारक असणे आवश्यक होते. या दृष्टीने प्रचलित महसुल व्यवस्थेची व जमिनीच्या मालकी हक्काबाबतची पाहणी करण्याचे काम इंग्रज अधिकारी जॉन शोअर यांच्याकडे सोपविण्यात आले होते. त्याने आपला अहवाल इ.स. १७८९ मध्ये गव्हर्नर जनरल कॉर्नवॅालिसला सादर केला. या अहवालात जमिनदार हे जमीन मालक असल्याचे व हा त्यांचा परंपरागत अधिकार असल्याचे नमूद करण्यात आले.

शोअरने आपल्या अहवालात जी महसुल व्यवस्था दहा वर्षासाठी सुचविली होती ती व्यवस्था कॉर्नवॅालीसने इ.स.१७९३ साली कायम स्वरुपात अमलात आणली. म्हणून या व्यवस्थेला कायमधारा व्यवस्था असे म्हणण्यात येते. ही महसुलपध्दती बंगालखेरीज ओरिसा, मद्रास इलाख्याच्या उत्तरेकडील जिल्हे व वाराणसी जिल्हयात लागू केली गेली.[२२] महसुल व्यवस्थेचे मूलतः दोन भाग असल्याचे पाहावयास मिळतात. पहिला भाग म्हणजे महसुल किती असावा ? व दुसरा म्हणजे तो कोणी गोळा करावा ? या प्रक्रियेत सरकार, महसूल गोळा करणारे मध्यस्थ किंवा जमीनदार आणि शेतकरी असे तीन घटक गुंतलेले दिसून येतात. यापैकी पहिल्या दोन घटकांचा महसुलाचा वाटा कायमधारा व्यवस्थेने निश्चित केला. शेतक-याकडून घेण्यात येणा-या खंडाच्या रकमेचा ८९ टक्के भाग सरकारला तर ११ टक्के भाग जमिनदाराला मिळावा अशी तरतूद करण्यात आली. सा-याची किंमत निश्चित केल्यामुळे शेतक-याला उत्पन्नाची खात्री होईल व त्याचे उत्पादन वाढविण्याचा तो प्रयत्न करील अशी यामागील कल्पना होती. शेतक-या कडून जमीनदाराने किती खंड घ्यावा या बाबत कोणतीही तरतूद सरकारने केलेली नव्हती. या संबंधीचे करार जमिनदारांनी शेतक-यांशी करावयाचे होते. मात्र जमिनदारांचे त्यांच्या भागात शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे, लहान लहान तंटयाचा न्यायनिवाडा करण्याचे पूर्वापार चालत आलेले अधिकार मात्र या कायमधारा व्यवस्थेने काढून घेण्यात आल्याचे दिसून येते.

कायमधारा व्यवस्थेचे फायदे कमी, तर दुष्परिणाम अधिक झाले. कंपनी सरकारचे महसुलीचे उत्पन्न निश्चित झाले. या व्यवस्थेमुळे जमिनदार वर्ग सधन बनला तर शेतक-यांचे शोषण

केले गेले. कायमधारा व्यवस्थेचे बंगालच्या ग्रामीण भागावर अनेक दुष्परीणाम झाल्याचे दिसुन येते. पहिला महत्त्वाचा दुष्परिणाम म्हणजे शेतकरी जमीनमालक राहिले नाहीत. उलट जमिनीचे मालक नसलेले नवे जमिनदार मात्र जमिनमालक बनले. महसुल गोळा करणे हे जमिनदारांचे उत्पन्नाचे साधन बनल्यामुळे हे मध्यस्थ शेतक-यांवर जुलुम जबरदस्ती करुन खंडापेक्षा अधिक रक्कम गोळा करुन आपल्या पोतडया भरताना दिसतात. खंडाची रक्कम निर्धारीत वेळेपूर्वी शेतक-याने न दिल्यास त्याची जमीन काढून घेण्याचा अगर त्याची अवजारे जनावरे ताब्यात घेण्याचा अधिकार इ.स. १७९९ च्या कायदयाने जमिनदाराला देण्यात आल्यामुळे जमिनदार अधिकच शिरजोर बनल्याचे दिसून येते. खंडाची रक्कम वेळेपूर्वी देता यावी म्हणून शेतकरी कर्ज काढू लागला. यामुळे सावकारांचे फावल्याचे दिसून येते. सारा पैशाच्या रुपात देण्याची सक्ती याकाळात केली गेली. त्यामुळे पीक येताच पिकाला जी किंमत मिळेल त्या किंमतीला पीक विकणे व सारा भरणे शेतक-याला अगत्याचे झाले. याचा लाभ व्यापा-यांनी करुन घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतक-याच्या हाती पैसा राहिला नाही. सारा वेळेवर न दिलेल्या शेतक-यांना जमिनीला मुकावे लागले व उपजीविकेसाठी ते शेतमजूरी करु लागले. शेतमजुरांचा हा नवा वर्ग इंग्रज शासनकाळात अस्तित्वात आला.[२३]

अशाप्रकारे कायमधारा व्यवस्थेमुळे सरकारचे उत्पन्न स्थिर झाले. जमिनदार व मध्यस्थांना अमाप पैसा मिळविण्याचे साधन मिळाले. शेतकरी मात्र नागवला गेला. जमीनदार व शेतकरी यांच्यात दुरावा वाढत गेला. ग्रामीण भागात अनिष्ट स्वरुपाचे क्रांतिकारी बदल घडून आल्याचे आपणास पाहावयास मिळतात.

### २.४.२ रयतवारी महसुल पध्दती

कायमधारा पध्दती कंपनीच्या काही संचालकांना व वरिष्ठ अधिका-यांना हितकारक वाटली नव्हती. या व्यवस्थेमुळे अपेक्षेइतके महसुलाचे उत्पन्न मिळत नव्हते. जमिनदारांनी भरमसाठ आश्वासने देऊन महसुलाचा अधिकार मिळवला असला तरी तेवढा वसूल गोळा करणे शेतक-यांच्या दु:स्थितीमुळे शक्य होत नव्हते. त्यामुळे अधिकारी व जमिनदार यांच्यात कटकटी निर्माण झाल्याचे चित्र दिसून येते. भ्रष्टाचार वाढला होता. शेतक-यावरील जुलूम वाढला होता. शिवाय पीक चांगले आले तरी महसुलात वाढ होताना दिसलेली नाही. जमीनदारांचे प्रस्थ वाढले होते. हे सर्व दोष लक्षात घेता ही व्यवस्था देशाच्या इतर भागात लागू केली जाऊ नये अशी सूचना थॉमस मन्रो, रीड इत्यादी

इंग्रज अधिकारी करताना दिसतात. रयत व सरकार यांच्यात मध्यस्थ ठेवण्याची प्रथा हानीकारक आहे. शेतकरी जमीन कसतो म्हणून सारा सरळ त्याच्याकडूनच सरकारने गोळा करावा तसेच तो कायमचा निर्धारीत न करता ठराविक मुदतीसाठी करावा. या मुळे शेतक-यांना स्थैर्य लाभेल. महसुलाची निश्चिती झाल्याने ते शेतीत सुधारणा करतील. जमीन त्यांच्या मालकीची राहिल्यामुळे ते समाधानी व सरकारला एकनिष्ठ राहतील अशी धारणा असल्याचे दिसून येते. असे केल्यास सरकारच जमिनदार राहील. महसुल सरकारी अधिकारी गोळा करतील. त्यामुळे सरकारचा रयतेशी प्रत्यक्ष संपर्क राहील. मध्यस्थ ठेवण्यापेक्षा ही व्यवस्था सरकारलाही हिताची ठरेल असे त्यांचे मत होते.[२४]

कंपनी सरकारने थॉमस मन्रो व त्याच्या समर्थकांच्या या सूचना मान्य केल्या. दक्षिण व पश्चिम भारताचा प्रदेश हाती येताच मन्रोच्या सूचनेनुसार जमिनीचे मोजमाप, जमिनीची वर्गवारी, सीमा निर्धारण, नकाशे तयार करणे ही कामे त्या प्रदेशात करण्यात आली व जमिनीच्या उत्पन्नाचाअंदाज घेऊन शेतसारा निर्धारीत करण्यात आला. महसुल सरकारने प्रत्यक्ष रयतेकडून गोळा करावयाचा असल्याने या व्यवस्थेला रयतवारी असे म्हणण्यात आल्याचे दिसून येते. इ.स. १८२० साली ही व्यवस्था दक्षिण व पश्चिम भारतात लागू करण्यात आली. दर वीस ते तीस वर्षानी शेतसा-याचा फेरविचार व्हावयाचा होता. ही महसुल व्यवस्था मद्रास व मुंबई इलाक्यात अंमलात आणली होती.

सकृतदर्शनी रयतवारी भूव्यवस्था शेतक-यांच्या हिताची वाटत असली तरी दोन दृष्टींनी ती प्रत्यक्षात तशी राहिलेली दिसून येत नाही. एक तर कायमधारापेक्षा रयतवारी पध्दतीत सा-याचे प्रमाण अधिक होते आणि दुसरी बाब म्हणजे अधिकारी अत्यंत कठोरपणे वसुली करु लागले व निर्धारीत वेळेपूर्वी कर दिला नाही तर जमिनी जप्त करु लागले. येथे जमिनदाराचा वेगळा वर्ग अस्तित्वात आला नसला तरी सरकारच जमिनदार बनल्याचे दिसून येते. शेतक-याकडून येणारी रक्कम शेतसारा नसून खंड आहे अशी सरकारची भूमिका असल्याचे दिसून येते. जमीन हातची जाऊ नये म्हणून कर्ज काढून शेतकरी सारा देऊ लागले. यामुळे येथेही शेतकरी कर्जबाजारी झाल्याचे दिसतात. शेतक-यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार जमिनी लुबाडू लागले. यामुळे गावातील वातावरण दुषित झाल्याचे पाहावयास मिळते.

### २.४.३ महालवारी व्यवस्था

जमीन महसुल गोळा करण्याची ही पध्दत उत्तर भारत, मध्य भारताचा काही भाग, पंजाब या ठिकाणी ब्रिटीश सरकारने राबवली. तत्कालीन मुंबई प्रांतासाठी ही व्यवस्था लागू नव्हती. ब्रिटिशांच्या महसुल विषयक धोरणांचे समग्र आकलन होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत ठिकाणी महालवारीची चर्चा केलेली आहे.

उत्तर भारतातील बराच मोठा प्रदेश इ.स. १८०३ ते १८१८ च्या दरम्यान कंपनी सरकारच्या ताब्यात आसलेला होता. काही वर्षे येथील भूमिव्यवस्था तात्कालिक स्वरुपाची होती. इ.स.१८२२ साली मात्र होल्ट मॅकेन्झीच्या सल्ल्यानुसार येथे नवी महसुलव्यवस्था म्हणून प्रसिध्द आहे. या व्यवस्थेनुसार रयतेकडून प्रत्यक्ष महसुल अंमलात आणल्याचे दिसून येते. ती महालवारी म्हणून प्रसिध्द आहे. या व्यवस्थेनुसार रयतेकडून प्रत्यक्ष महसुल गोळा करण्याऐवजी सरकारने गावक-यांशी सामूहिक करार केलेला होता. प्रत्येक गावातून किती महसुल दयावा हे ठरवून दिले व ती रक्कम ग्रामप्रमुखाने सरकारला दयावी असे ठरविण्यात आले. गावाच्या एकूण उत्पन्नाचा अंदाज घेऊन गावाचा एकूण महसुल निर्धारीत केला गेला. गावातील प्रत्येक शेतक-याने एकूण गावाच्या सा-याचा किती भाग दयावयाचा हे त्यांनी आपसात विचारविनिमय करुन ठरवावयाचे होते. कराचे निर्धारण तीस वर्षासाठी केले गेले व कराच्या पुनर्निर्धारणाचे अधिकार कलेक्टर व तहसीलदार यांना दिले गेले. या पध्दतीनुसार काही गावांचा मिळून एक गट मानला. त्या गटात सुमारे पाच सहा गावे असत. तेथील उत्पन्नाचा अंदाज घेऊन या गटाच्या स्थानिक प्रमुखाकडे महसुल भरण्याची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे दिसून येते. या प्रमुखाने प्रत्येक गावाच्या उत्पन्नानुसार त्यांच्यात सारा वाटून दयावा असे ठरले. अशाप्रकारे येथील महालवारीत सारा भरणे ही सामूहिक जबादारीची बाब राहिली. येथेही महसुलाचे प्रमाण बरेच जास्त असे.[२५]

या व्यवस्थेमुळे संपूर्ण गावाला ठराविक महसुल ठरवून दिला जाई गावातील सर्व शेतक-यांनी मिळुन हा महसूल दयावयाचा होता यामध्ये प्रत्येक शेतक-याला त्याच्या महसुलाचा वाटा दयावा लागत असे यामुळे शेतकरी आपल्या वाटयाच्या जमिनीमध्ये जास्तीत जास्त उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करीत असे. यापध्दतीमुळे गावामध्ये सांख्यिक ऐक्याची भावना निर्माण झाली शेतक-यांना त्याच्या उत्पन्नापेक्षा कधी कधी जास्त महसुल भरावा लागे. अशावेळी तो कर्जबाजारी होत असे

त्यातच दुष्काळ, आवर्षण, अशा परिस्थितीतही शेतक-याला शेतसारा भरावा लागे.यामुळे महालवारी महसुल पध्दत शेतक-यांच्या दृष्टीने पूर्णतः अन्यायकारक असल्याचे दिसून येते.

### २.५ ब्रिटिशांचे कृषीविषयक धोरणांचे परिणाम

इंग्रजांनी आणलेल्या भूव्यवस्थेमुळे भारतातील प्रचलित भूव्यवस्था कोलमडून पडल्याचे दिसून येते. जमीन ही नव्या व्यवस्थेत एक खाजगी मालमत्तेची वस्तू बनली. यामुळे ती गहाण टाकणे, विकणे अगर जमीनधारकाच्या हातून काढून घेणे शक्य झाले. सरकारचे महसुलाचे उत्पन्न सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने हा बदल केला असावा असे वाटते. जमीनीच्या मालकी हक्काचे हस्तांतरण करण्याची तरतूद नसती तर सारा न भरल्यास त्याच्या हातून जमीन काढून घेणे जमिनदाराला शक्य झाले नसते. अगर शेतसारा भरण्यासाठी कर्ज काढावे लागले, तर तारण म्हणून जमिनीचा वापर शेतक-याला करता आला नसता. जमीन ही खाजगी मालमत्ता मानल्यामुळे जमिनदार व शेतकरी शेतीचे उत्पादन वाढविण्यास प्रवृत्त होतील अशी यामागे कल्पना होती. परंतु या नव्या पध्दतीमुळे जमीन कसणारा शेतकरी अडचणीत आला. आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी तो जमीन विकू लागला, अगर गहाण ठेवू लागला. यामुळे शेती गहाण टाकणे अगर विकणे यांचे प्रमाण वाढले. परिणामतः कृषीव्यवस्थेतील स्थैर्य नाहीसे झाले व सातत्य नष्ट झाले. एकूण ग्रामीण समाजव्यवस्थाच नव्या भूव्यवस्थेमुळे या काळात मोडकळीस आल्याचे दिसून येते.

ब्रिटिशांनी सर्व भारतभर जमिनीवरील मालकीला कायदेशीरपणा प्राप्त करून दिला. त्याचा उपयोग इ.स.१८५० पर्यंत जागतिक अर्थरचनेच्या कक्षेत किना-यापासून लांबला असलेला अंतर्गत भाग, कच्च्या मालाच्या दृष्टीने जागतिक भांडवली अर्थरचनेच्या कक्षेत शेतकी अर्थव्यवस्था औपचारिकपणे आणण्याकरिता झाला. ब्रिटिशांनी 'जमीनसारा'ठरवित असताना जमीनी वरील वसुलीचे दर ठरवून दिले, त्यात मूलतः दोन पध्दती होत्या. जमीनदारी पध्दतीमध्ये ब्रिटिशांची अपेक्षा 'सुधारु इच्छित असलेल्या ब्रिटिश जमीनदारांसारखा'नवीन वर्ग तयार करण्याची होती, तर रयतवारी पध्दतीमध्ये 'एक बलिष्ठ अशा शेतक-यांचा वर्ग' तयार करण्याची इच्छा होती. पण दोन्हीही फलद्रूप झाल्या नाहीत. "जमीनदारी पध्दत मुख्यतः बंगाल, उत्तर भारत आणि कोकण, विदर्भ, नागपूर हया महाराष्ट्रातील भागात होती. त्या पध्दतीत वरच्या दर्जाच्या राजकीय सत्ताधिशांच्या अखत्यारीतील व्यापक भूप्रदेशावर, ज्यांना पूर्वीच काही राजकीय व वसुलीचे अधिकार होते अशा सरंजामी वतनदार असलेल्यांना जमिनीची मालकी देण्यात आली होती. परंतु याचा परिणाम पूर्वीच्या

वतनदारांचे (जमिनीवरील) नियंत्रण कायम झाले असे नाही, कारण ब-याच वेळा हे जमीनीविषयक हक्क (व्यापारी अगर ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी यांना) विकले जात. त्याचप्रमाणे गुंतागुंतीचे असलेले त्यांच्या जमीनीवरील कुळाचे हक्कही विकले जात असत. परिणामी एक अशी गुंतागुंतीची पध्दत तयार झाली की, जमीनी वरील खंडावर हक्क सांगणारे व खंड घेणारे अनेक तयार होत. रयतवारी पध्दत ही महाराष्ट्रातील एक जास्त लोकप्रिय होत चाललेली पध्दत होती. त्यामध्ये गावातील जो प्रत्यक्ष जमीन कसतो त्याला जमीनीची मालकी दिली जात होती आणि ही पध्दत महाराष्ट्राच्या जवळ जवळ सर्व भागात लागू करण्यात आली होती."[२६] यापध्दतीमुळे शेतक-यांना मिळलेली जमीन ही त्यांच्या मालकीची झाली.

शेतक-यांची मालकी जमीनीवर प्रस्तापित झाल्यामुळे जमीन महसुल बाबत सरकार आणि शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध निर्माण झाले. येथे जमीन महसुलाचे प्रमाण जास्त असल्याने शेतक-यांना हा महसुल भरणे अत्यंत कठीण होते. तसेच सारा वसुली करतांनाही शेतक-यांना कुठलीही दयामाया न दाखवता दुष्काळी परिस्थितीतही वसूल केला जात असे.

महाराष्ट्रातील शेतकरी जीवनाचा गेल्या दिडशे वर्षाचा इतिहास पाहता, असे आढळते की, शेतकरी वर्ग सावकारशाहीच्या पंजात पूर्णपणे सापडलेला होता. या काळातील सावकारशाहीचे स्वरुप अत्यंत भयानक व अनिर्बंध होते. "इ.स. १८२७ ते १८५९ या काळात चालू असलेल्या सावकारी कायदयामुळे शेतक-यांना थोडे तरी संरक्षण मिळाले होते. या कायदयान्वये शेतक-यांच्या जरुरीचे सामान व निर्वाहाचा माल सावकार कर्जाच्या मोबदल्यात घेऊ शकत नव्हता. पण इ.स.१८५९ साली पास झालेल्या सावकारी कायदयामुळे शेतक-याची सर्व स्थावर, जंगम मिळकत कर्जाच्या मोबदल्यात घेता येऊ लागली. स्वयंपाकाची भांडीकुंडी, कपडेलत्तेही घेता येऊ लागले. कर्जवसुलीसाठी तुरुंगवासाची शिक्षाही देण्यात येऊ लागली. या कायदयामुळे सावकारांना संरक्षण, उत्तेजन मिळाले, पण शेतक-यांना मात्र कोणीच वाली राहिला नाही. इ.स.१८६४ साली पुणे जिल्हयात सावकाराच्या ताब्यात ५२९५ एकर जमीन होती. तिचा शेतसारा ३७२२ रुपये होता. इ.स. १८७४ साली सावकाराच्या ताब्यातील जमीनीचे प्रमाण दुप्पटीवर गेले. त्यांच्या मालकीची जमीन १००७५ एकरांपर्यंत व शेतसारा ७१३४ रुपयांपर्यंत गेला."[२७] फक्त दहा वर्षाच्या काळात किती

शेतक-यांना आपल्या जमिनींना मुकावे लागले असेल व त्याची किती हालाखीची अवस्था झाली असेल याची या आकडयावरुन आपणाला कल्पना येते. या परिस्थितीला गांजून पुणे व अहमदनगर जिल्हयात काही शेतक-यांनी सावकारांविरुध्द बंडे पुकारली. शेतक-यांच्या या स्थितीचा अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी सरकारने इ.स. १८७५ साली डेक्कन रायटस् कमिशन नेमले. या कमिशनच्या अहवालानुसार इ.स. १८७९ साली "डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलिफ ॲक्ट" हा कायदा संमत झाला.[२८] हा कायदा पास झाल्यामुळे शेतक-यांना संरक्षण मिळाले, पण शेतक-यांची होणारी पिळवणूक मात्र थांबली नाही. खोटेनाटे हिशोब ठेवणे, शेतक-याने कितीही पैसे भरले तरी पिढयान्पिढया त्याची कर्जातून मुक्तता न होणे, शेतक-याचे घरेदारे, शेते गिळंकृत करणे हे प्रकार चालूच राहिले. शेतक-यांच्या गळी रुतलेला हा सावकारी कर्जाचा फासा ढिला करण्याचा प्रयत्न तत्कालीन नेत्यांनी केल्याचे दिसते.

शेतक-यांना कर्ज फेडण्यासाठी जीवाचा आटापिटा करावा लागत असे. कर्ज काढल्याशिवाय जीवन जगणे मात्र केवळ अशक्य होते. लग्न कार्य, खटले इ. साठी त्याला खर्च करावाच लागत असे. मिळकतीपेक्षा जास्त खर्च करावा लागत असल्याने त्याला सावकारचे दार पुजावे लागे. साधारणपणे शंभर रुपये कर्ज काढले तर कागद (स्टॅम्प) लिहिणावळ वगैरे जाऊन ब्याण्णव रुपये त्याच्या हाती पडत. बिकट परिस्थितीमुळे तो वेळेवर कर्ज देऊ शकत नसे. मग केस कोर्टात जाई. हुकूमनामा झाल्यावर पैसे भरण्यास उशीर होताच मोट जप्त होऊन नाझरकचेरीत पडे. तेथे मोट उंदराकडून कुरतडली जाई व शेतीसाठी आवश्यक असलेले साधन हातचे जाई. पुन्हा नवी मोट करावी लागे व त्यासाठी पुन्हा खर्च येई. अशा दुष्ट चक्रात शेतकरी नेहमी सापडत असे. सावकार व सरकार या जात्याच्या दोन तळयात शेतकरी अक्षरशः भरडला जात असे.

इंग्रज सरकार शेतक-याच्या उत्पन्नातून लोकल फंड गोळा करीत असे. त्यामुळे शेतक-यांच्या उत्पन्नातून लोकल फंड गोळा करणा-या शासनाला शेतक-यांची करुण स्थिती समजावून सांगणा-या नेत्याची समाजाला त्याकाळी गरज होती व त्याहूनही महत्त्वाची बाब अशी की, गुलामगिरीच्या पाशात अडकून पडलेल्या जनतेची सुटका करणारा नेताही समाजाला हवा होता. तत्कालीन समाजातील अज्ञानी लोकांची स्थिती तुरुंगात जन्मलेल्या एखादया बालकासारखी झालेली होती. गुलामगिरीच्या वेठबिगारीच्या दुःखातच सुख मानणा-या समाजाला खरे सुख कशात आहे हे सांगण्याची अवघड कामगिरी भालेकरांना हाती घ्यावी लागली होती. शेतक-यांची ही

यातायात केवळ सरकार व सावकार यांच्यामुळे होत असे, असे नाही तर दुकानदार व व्यापारीही शेतक-याला लुटण्याला टपलेले असत. शेतातील माल दुकानदाराला दयायचा व त्या मोबदल्यात वस्तू खरेदी करावयाचा, असा शेतक-यांचा ठरलेला क्रम असे. शेतक-याकडून माल घेताना दुकानदार चोरमाप वा चोरकाटा वापरुन शेतक-याला दिवसाढवळया लुबाडत असे.[२९] व्यापारी शेतक-याकडून जो माल घेत असे त्याचा दर्जा तो बारकाईने पाहत असे, पण व्यापारी शेतक-याला जो माल देत असे, त्याचा दर्जा कसा का असेना, आवाच्या सवा किंमत शेतक-यांकडून उकळली जात असे. हिशोबाच्या बाबतीत शेतकरी त्याच्या मांडीवर माने देत असे व व्यापारी बरोबर मानेला सुरी लावत असे. अव्वल इंग्रजी काळातही शेतक-यांची ही स्थिती फारशी बदलली नाही.

सरकारने जंगले राखून ठेवायला सुरुवात केली, त्यामुळे शेतक-याचे व त्यावर अवलंबून असणा-या शेकडो जंगली व भटकणा-या जातींचे पाय आखडले गेले सरकारकडून जंगलाच्या वाटा रोखल्या गेल्यामुळे उदरनिर्वाहासाठी जंगलात फिरणारांनाही शेतीवरच अवलंबून रहावे लागले. शेतीशिवाय दुसरा धंदा न उरल्याने सर्वांचाच भार शेतीवर पडला. शिवाय इंग्रज सरकारच्या राजवटीतच जमिनीची खरेदी-विक्री सुरु झाली. जमिनीचे भाव वाढू लागले. जमिनी च्या मालकास फायदा होतो, असे कळताच जमिनीच्या मालकीसाठी झगडे सुरु झाले. इंग्रजांच्या भांडवली धोरणामुळे आपल्या समाजातील सुतार, लोहार, चांभार वगैरे हजारो धंदेवाले धंदे गमावून बसले. बलुते-अलुते पध्दत मोडकळीस आली.[३०] त्यामुळे उद्योगधंदेही मोडकळीस आले. परदेशातून येणा-या पक्क्या मालामुळे येथील व्यापार पूर्णपणे बसला. त्यामुळे नोकरी व शेती हीच निर्वाहाची साधने बनली. नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नात तरुण पिढी अडकू लागली. त्यामुळे स्वाभिमान पायदळी तुडवला जाऊ लागला. शेती करणा-यांची संख्या वाढू लागली. शेतीच्या मालकीसाठी भांडणे तंडणे होऊ लागले. त्याचा न्यायनिवाडा इंग्रज सरकारची न्यायसंस्था करु लागली. त्यांच्या न्यायदेवतेसमोर ख-याचे खोटे व खोटयाचे खरे होऊ लागले. अनेक अडाणी शेतक-यांना त्यांच्या जमिनींना मुकावे लागले. शेतक-यांची आर्थिक आबळ होऊ लागली. अनेक दरिद्री लोक अन्नास मोताद होऊ लागले. श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होऊ लागले.

"शेतक-याच्या ठिकाणी असलेला साधेपणा, अडाणीपणा भोळेपणा यामुळे अगोदरच गरीब असलेला शेतकरी दीर्घकाळापासून कंगालच राहिलेला दिसतो. तो पिढयान्‌पिढया सरकार व सावकार, जहागीरदार व भांडवलदार यांच्याकडे वारंवार गहाण पडलेला दिसतो. मात्र आपण

गहाण पडलो आहोत, आपण गुलाम बनलो आहोत, याची स्वत:शेतक-याला पुसटशी जाणीव नव्हती. ही जाणीव नसल्यामुळे शेतक-याला दुर्गती प्राप्त होते. त्याची पाऊले वाकडी पडू लागतात. तो व्यसनांच्या आहारी जातो व शेवटी सर्वस्व गमावून बसतो."[३१] शेतक-याची ही कुतरओढ थांबविणे जरुरीचे होते. शेतकरी कष्ट करुन जे पिकवतो, त्याची लूट कमी झाली तरच त्याची आर्थिक स्थिती सुधारेल व त्याची नैतिकताही वाढेल, त्यासाठी शेतक-याने जुलुमाचा प्रतिकार करण्याची व टोलेखाऊपणा कमी करण्याची तयारी ठेवली पाहिजे. शेतक-याला तग धरुन जीवन जगता यावे म्हणून त्याच्या ठिकाणी प्रतिकार शक्ती निर्माण करण्याचे कार्य तत्कालीन समाजसुधारकांनी जाणीवपूर्वक केल्याचे दिसून येते.

"स्वतःच्याच बेसावधपणामुळे शेतक-याला प्राप्त झालेली कफल्लक अवस्था सरकारच्या नजरेस आली व सरकारने इ.स.१८७९ मध्ये त्याला सावरण्यासाठी दक्षिणेतील शेतक-यास ऋणमुक्त करण्याचा कायदा पास केला. तसेच इ.स. १८८३ साली एक कायदा व इ.स. १८८४ साली आणखी एक कायदा असे दोन कायदे पास करुन सरकारकडून कर्ज देण्याची सोय ही उपलब्ध केली. त्यामुळे शेतक-याला बैल, बी, चारा यासाठी सरकारकडून कर्ज मिळू लागले व बुडणा-या शेतक-याला काडीचा का होत नाही, आधार मिळाला. पुढे सरकारने इ.स. १९१२ चा कायदा अंक २ पास केला व शेतक-याच्या "परस्पर सहाय्यक मंडळे" किंवा पतपेढया स्थापन करायला परवानगी दिली."[३२] या पतपेढया स्थापन झाल्यामुळे शेतक-यांना, धंदेवाल्यांना, मजुरांना सावकाराकडून घ्यावयाच्या अधिक व्याजाच्या कर्जापेक्षा कमी व्याजाने कर्ज मिळू लागले. शेतक-यांची सावकारी पाशातून सुटका व्हायला या पतपेढयांमुळे खूपच मदत झाली.

ऋणमुक्तीचा कायदा व पतपेढयांमुळे सरकारी व सावकारी गळफासातून शेतक-यांची सुटका झाली. पण अधूनमधून पडणा-या दुष्काळामुळे शेतक-यांचे अतोनात हाल झाले. "विशेषत: इ.स.१८७७ मध्ये जो दुष्काळ पडला त्या दुष्काळाने शेतक-यांची दाणादाण उडाली. या दुष्काळापूर्वी इ.स.१८७५ मध्ये दक्षिण हिंदुस्थानात दुष्काळ पडला होता. त्यावेळी अन्नावाचून लोक मेले नाहीत. पण इ.स.१८७७ मध्ये पडलेल्या दुष्काळात मात्र सहा लाखाहून अधिक लोक भुकेने तडफडून मेले असावेत असा त्यावेळी नेमलेल्या चौकशी आयोगाचा निष्कर्ष होता. या दुष्काळी परिस्थितीत जे थोडेफार धान्य होते ते घेण्याची लोकांची ऐपत नव्हती. त्यावेळी सरकारने काही दुष्काळी कामे हाती घेतलेली होती. पण अधिका-यांच्या कडक व सहानुभूतीशून्य धोरणामुळे लोकांचे खूप हाल झाले.

अशावेळी लोकांनी जनावरांना चारावयाच्या ज्वारी, बाजरी, गहू यांचा कोंडा खाल्ला, झाडपाला देखील संपून गेला. दुष्काळासारख्या नैसर्गिक संकटाला तोंड देता यावे म्हणून काही समाजधुरिणांनी कंत्राटी कामे सुरु केली. त्यामुळे लोकांना जीवन जगणे सोपे झाले. 'अवर्षणापासून शेतीचे रक्षण कसे करीता येईल याविषयी सूचना' या विषयावर पुण्यातील शेतक-यांच्या सभेत डॉ.विश्राम रामजी घोले यांनी व्याख्याने दिली आणि ही व्याख्याने शेतकरी वर्गास उपयोगी पडतील हे जाणून छापून प्रसिध्द केलेली पाहावयास मिळतात."[३३] यावरुन एक गोष्ट आपल्या लक्षात येते की, तत्कालीन नेतेमंडळीकडून शेतक-यांना दिलासा देण्याचे कार्य यथाशक्ती होत होते. पण शेतक-यांच्या जीवनात कायमचे स्थैर्य मात्र निर्माण होत नव्हते. शेतक-यांच्या जीवनात स्थैर्य, सुबत्ता आणावयाची असेल तर त्यांचा सर्वांगीण विकास करणा-या काही भरीव स्वरुपाच्या योजना राबवावयास हव्यात, हे लक्षात घेऊन भालेकरांनी शेतीला पूरक ठरेल अशा व्यापार उद्योगाची, सहकारी तत्त्वावर सुतगिरणी चालविण्याची योजना त्याकाळी मांडल्याचे दिसते. आपल्या देशाची मुख्य आर्थिक व्यवस्था शेतकीवर आधारलेली असून, शेतकरी हा आपल्या समाजशरीराचा मुख्य भाग आहे. हे मर्म त्यांच्या ध्यानी आले असले पाहिजे व म्हणूनच त्यांनी वर उल्लेखिलेल्या विविध योजना उपाययोजना सुचविलेल्या होत्या. म्हणजेच भालेकरांना शेतक-यांच्या हिताची किती काळजी होती हे यावरुन दिसून येते.

शेतकरी, कामकरी यांची पिछेहाट व्हायला तत्कालीन धार्मिक स्थितीही मोठया प्रमाणात कारणीभूत ठरलेली दिसते. "एकोणीसाव्या शतकातील धर्माचे स्वरुप पाहू जाता, असे आढळते की, धर्माचे खरे स्वरुप समाजात अल्पांशाने जिवंत होते. "जो समाजाची धारणा करतो तो धर्म "[३४] ही धर्माची मूळ व्याख्या, समाजात ज्या ब्राह्मणांचे वर्चस्व होते त्यांनी सोयीस्कररीत्या बदलून टाकली होती. आपणाला दान, दक्षिणा मिळण्याची, पूजाअर्चा केल्याबद्दल मोबदला मिळण्याची सोय ज्या धर्मात आहे, तोच खरा धर्म अशी त्याची पक्की समजूत होती. समाज ज्यांना धर्मगुरु मानीत होता, तो धर्मगुरु यजमानाची मनसोक्त स्तुती करणारा, इतर जातींची निंदानालस्ती करणारा होता. ब्राह्मण भोजन हाच या धर्मगुरुंचा धर्म, निरर्थक मंत्रपठण हीच त्यांची विदया व संस्कृत भाषेखेरीज इतर भाषा नर्काचे साधन आहेत असे मानणे हेच त्यांचे ज्ञान होते.[३५] अशा या धर्मगुरुंचे कोणतेही म्हणणे समाज निमूटपणे ऐकत होता आणि आजही यात फारसा फरक पडलेला दिसत नाही.

समाजातील शेतकरी कामकरी आदी सर्वसामान्य लोकांना ख-या धर्माची पारख होवू शकली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा वर्ग शिक्षणापासून वंचित राहिला होता. धर्मग्रंथामध्ये लिहून ठेवलेले वाचताच येत नसल्याने व ते संस्कृत भोषेत असल्यामुळेही धर्माचे खरे स्वरुप समजावून घेणे त्यांना शक्य झाले नाही. पण शिक्षणाच्या बाबतीत प्रारंभापासूनच आघाडीवर असलेल्या व इंग्रजी भाषेचे आगमन होण्यापूर्वी संस्कृत भाषा अवगत असलेल्या ब्राह्मण वर्गाने धर्मातील बारीक सारीक बाबीचे ज्ञान करुन घेतले. वास्तविक हा ब्राह्मण वर्ग समाजाच्या गुरुस्थानी असलेला वर्ग होता. पण या वर्गाने जाणून बुजून आपल्या वर्गाबाहेरील इतरांना शिकविले नाही. ब्राह्मणेत्तर वर्ग शिक्षणापासून वंचित रहायला जसे तो स्वतः कारणीभूत आहे. तसेच समाजातील ब्राह्मण वर्ग ही मोठया प्रमाणात कारणीभूत आहे. जर शेतकरी, शूद्र शिकले तर ते शहाणे होतील, त्यांना योग्य अयोग्य, भलेबुरे, फायदया तोटयाचे कळू लागेल. ते स्वंतत्रपणे विचार करु लागतील व मग ते आपले वर्चस्व झुगारुन देतील अशी भिती ब्राह्मण वर्गाच्या मनात प्रारंभापासून होती कारण ब्राह्मण वर्गाचे पोट या भोळया भाबडया, अडाणी जनतेच्या अज्ञानीपणावरच चालले होते.

इंग्रज सरकार आले, इंग्रजी विदया आली त्यावेळी ब्राह्मण वर्ग पुढे सरसावला व इंग्रजी विदया म्हणजेच वाघिणीचे दूध त्यांनी प्राशन केले. त्यामुळे ब्राह्मण वर्ग मानापानाच्या जागेवर जावून बसला. ब्राह्मण वर्गाच्या बरोबरीने शिक्षण घेवू पाहणारे समाजातील इतर नवशिक्षित तरुणही इंग्रजी ज्ञनभांडार पाहून अवाक झाले. इंग्रज सरकारने शिक्षण सर्वासाठी खुले केले. पण शेतकरी वर्ग यावेळीही शिक्षणापासून दूरच राहिला. ज्ञानगंगा त्याच्या उषाजवळून वाहू लागली पण तो बिचारा कोरडा ठणठणीत राहिला. त्यामुळे त्याच्या स्थितीत फारसा बदल झालाच नाही. केवळ शेतकरीच नव्हे तर ब्राह्मणेत्तर लोकात हजारात नऊशे नव्व्यान्नव लोक अज्ञानीच राहिले होते. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे त्यांची चहूकडून अवनती झाली. त्यांच्या अडाणी अज्ञानी भोळेपणामुळे ब्राह्मणांनी त्यांची नानाप्रकारे पिळवणूक केली. म्हणूनच,"सरकारने ब्राह्मणेत्तर लोकांस सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे."अशी मागणी होवू लागली. [३६] एकीकडे इंग्रज सरकारने शेतक-यांच्या सुखसोयी करीता शेकडो खाती निर्माण केली. पण दुसरीकडे शेतकरी साक्षर बनविण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. त्यामुळे इंग्रज सरकारने निर्माण केलेल्या शेकडो खात्यांचा शेतक-यांना फारसा फायदा झालाच नाही. पण शेतक-याला सुशिक्षित बनविण्याचे कोणतेही खास प्रयत्न सरकारकडून झाल्याचे दिसून येत नाहीत. प्रथम शेतक-याला साक्षर बनविणे व नंतर खाती तयार करणे असे व्हायला हवे होते.पण

दुर्देवाने तसे झाले नाही. त्यामुळे शेतकरी होता तिथेच राहिला. साक्षरतेचा प्रसार व्हावा म्हणून इंग्रज सरकारने कायदा केला पण त्याचा फायदा बहुजन समाजास न मिळता शहरवासीयांना, अल्पसंख्यांकांना मिळू लागला.

इंग्रजांनी शेती व्यवस्थेबरोबर इतर क्षेत्रातही मोठे बदल घडवून आले. त्यांनी मालमत्तेविषयी नवे कायदे आणले. नवे कोर्ट स्थापन केले. त्यामुळे कोर्ट फी आली न्यायाधिश आले, वकील आले, खरेदी विक्रीचे नवे नियम आले. शेतकरी आपली जमीन आता विकू शकत होता. यामुळे शेतक-यांचा फायदा झाला नाही मात्र सावकारशाहीचे फावले त्यातच इंग्रजांनी चढेल दरात शेतसारा लादला. तो रोख पैशात भरण्याची त्यावर सक्ती केली. तेवढा पैसा शेतकरी त्याकाळात बचत करु शकत नव्हता.

एकोणिसाव्या शतकात हळूहळू भारतीय शेतीव्यवस्था जागतिक बाजारपेठेस जोडली गेली. बाजारपेठेत धान्याची उलाढाल करणारे कमिशन एजंट्स आणि अडत दुकानदार तयार झाले. जागतिक बाजार पेठेतील तेजीमंदीचा प्रभाव आता भारतीय बाजार पेठेवर पडू लागला. त्यामुळे पिकपध्दतीत बदल घडून आला. त्यामुळे भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले. पैशावर आधारलेल्या समाजव्यवस्थेत पैशास, नाण्यास महत्त्वाचे स्थान असते. "शेतकरी आपल्या जवळचे अन्नधान्य विकून पैसा मिळवित असतो. पण इ.स. १८७० नंतर शेतमालाचे भाव गडगडले इ.स. १८७१-७२ साली ज्वारीचा भाव एका रुपयास बावीस शेर होता. पण इ.स. १८७४-७५ साली ज्वारीचा भाव एका रुपयास पंचवीस शेर व बाजरीचा भाव एका रुपयास चाळीस शेर इतका खाली आला. त्यामुळे शेतक-यांच्या रोकड उत्पन्नात घट झाली. पण इ.स.१८६६ साली इंग्रजांनी जमाबंदी करुन शेतसा-यात जवळ जवळ शेकडा ५० टक्के वाढ केली होती. कारण इ.स. १८६५-६६ साली बाजारात ज्वारीचा भाव एका रुपायास आठरा शेर होता. इ.स. १८३६-३७ साली तो एका रुपयास ४३ शेर होता. इंग्रज अधिका-यांच्या मते शेतक-यांचे उत्पन्न वाढलेले होते पण चार पाच वर्षातच ही सारा आकारणी किती ठिसूळ पायावर उभी होती हे दिसून आले."[३७]

वाढीव सारा आकारणीबरोबरच सावकरशाहीचे नवे संकट इंग्रजांनी या देशात निर्माण केले. पूर्वीच्या काळात सावकारचे हात दामदुप्पट रीवाजामुळे व शेतीच्या हस्तांतरण बंदीमुळे बांधलेले होते. पण इंग्रजी अमंलाखाली परिस्थिती बदलली. सावकारने जमीन लिहून घेवून कर्ज दयावयास सुरुवात केली. त्यांनी चक्रवाढ दराने व्याज लादावयास सुरुवात केले पण शेतमालाचे भाव

ढासाळल्यामुळे घेतलेले कर्ज परत करणे शेतक-यास शक्य झाले नाही. सावकारने सिव्हील कोर्टात शेतक-यांवर फिर्यादी केल्या त्यामुळे शेतक-यांच्या जमिनींचे हस्तांतरण व्हावयास सुरुवात झ ाली. कोर्टाचे कामकाज तालुक्याच्या ठिकाणी चालत असल्याने वारंवार तारखा लागत. शेतीची कामे सोडून शेतक-यास कोर्टात जावे लागे. वकिलाची भरमसाट फी दयावी लागे.

इंग्रजी राजवटीत नव्या कायदयामुळे व न्यायव्यवस्थेमुळे शेतक-यांचे नुकसान झाले व सावकारांचे हात बळकट झाले. त्यामुळे हजारो एकर जमीन सावकाराकडे हस्तांतरीत झाली. सावकारात मारवाडी, गुजर व ब्राह्मण या जातीतील लोक प्रमुख होते. अनेक शेतकरी कुळ म्हणून काम करु लागले. स्वतःच्या शेतात ते शेतमजूर झाले शहरात फारसा औद्योगिक विकास झालेला नसल्यामुळे शहराकडे जाण्याचा मार्ग बंद झालेला होता. त्यामुळे शेतक-यांना अतिशय त्रास झाला. कायदयाची प्रक्रिया त्यांना कळत नव्हती. यात त्यांचा पैसा व शेतक-यांचे समर्पन होत होते. त्यामुळे ४०-४० एकरांचे मालक असणारे शेतकरी सावकारांच्या पकडीत सापडत. केवळ अडीचशे तीनशे रुपयांचे कर्ज परत न करु शकल्यामुळे त्यांना आपली शेती गमवावी लागली. साम्राज्यशाहीने अशा प्रकारे शेतक-यांचे भयानक शोषण केले .

१९ व्या शतकात महाराष्ट्रात हळूहळू नवे बदल होत होते. महाराष्ट्रातील शेतकरी समाजात वेगवेगळे स्तर होते. त्याचप्रमाणे नवा सुशिक्षित मध्यम वर्ग जन्म घेत होता. नव्या शिक्षणाचा लाभ सुरुवातीच्या काळात ब्राह्मण वर्गाने घेतला पण इतर जातीतील काही मोजक्या लोकांनाही नव्या इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला पण ब्राह्मण वर्गाने इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेऊन सहकारातील मोक्याच्या जागा बळकावल्या त्यांनी सरकारला सहकार्य केले. संपूर्ण समाजावर त्यांची मक्तेदारी स्थापन झाली. इतर जातीतूनही अगदी लहान प्रमाणात मध्यम वर्ग निर्माण होत होता. कंत्राटी धंदया सारख्या धंदयात हा वर्ग जम बसवित होता. पण सगळीकडे खालच्या स्थरावर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. इंग्रजी राज्यातील या ब्राह्मणीवर्चस्वावर हल्ला करावायास याच वर्गाने सुरुवात केली. इतर क्षेत्रात वर आलेल्या तरुणांनाही उच्च वर्णीय मक्तेदारीचा त्रास सहन करावा लागला. त्यामुळे ज्योतीबा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाला ब्राह्मणोत्तर जातीतील त्याकाळातील सर्व थोर व्यक्तींनी पाठींबा दिलेला आपणास दिसतो.

डॉ.रविंद्र कुमार यांच्यामते, “त्याकाळात महाराष्ट्रातील शेतकरी समूह प्रामुख्याने तीन भागात विभागलेला होता. त्यातील शेकडा १० टक्के शेतकरी हे सुखवस्तू होते आणि त्यांच्याजवळ

चांगल्या चांगल्या मगदुराच्या जास्त जमिनी होत्या. त्यांच्याजवळ स्वतः चा बैल, बारदाना, आणि शेतीचा सरंजाम होता. शेतकरी समूहाच्या दुस-या थरात सुमारे ४० टक्के शेतक-यांचा समावेश होत होता. त्यांच्याजवळ मध्यम दर्जाची २० ते ७० एकर पर्यंत जमीन होती. हे सारे कोरडवाहू शेती करणारे शेतकरी होते. हे शेतकरी मोठया प्रमाणात कर्जबाजारी झालेले होते. अज्ञान व रोगराईने पिडलेले होते. एक दोन हंगाम खराब गेले की त्यांची परिस्थिती अतिशय खराब बनत असे. सावकारशाहीने हा वर्ग पुरता नाडला होता. उरलेले ५० टक्के शेतकरी १०-१५ एकर जमीन असणारे छोटे शेतकरी होते."[३८] त्यांची अवस्था मोठी दयनीय होती त्यांना कोणी कर्ज देत नसे. त्यांच्याजवळ बैल, बारदानाही नसे. त्यातच भाऊ हिस्से होवून शेतीचे तुकडे झाले की ते जास्तच गरीब बनत ते शेतमजूर बनत. दुष्काळात काढलेल्या कामावर खडी फोडण्यासाठी या वर्गातील शेतकरी मोठया प्रमाणावर जात असे. या शेतक-यांतील तीन घरांपैकी त्याच्या शेताला बारमाही पाणी मिळत असे. तोच शेतकरी थोडासा सुखी होता बाकी शेतकरी सरकार, सावकार, व्यापारी, दलाल, आणि नोकरशाही यांनी पिडलेले होते.

या काळात नव्या राजकारणाचा व समाजकारणाचा हळूहळू उदय होत होता. याकाळातील राजकीय व सामाजिक पुढा-यांनी शेतक-यांचे प्रश्न हाती घेतले. या प्रश्नांकडे पाहण्याची त्याकाळी दोन प्रवाह होते एक प्रवाह होता पुणे सार्वजनिक सभा आणि न्यायमुर्ती रानडे यांचा आणि दुसरा प्रवाह होता महात्मा ज्योतिराव फुले आणि सत्यशोधक समाज या दोंघाचे शेतक-यांकडे पाहण्याचे दृष्टिकोण वेगवेगळे पहावयास मिळते.

### २.६ भरडला जाणारा शेतकरी

प्राचीन काळापासून भारतात शेती हा मुख्य व्यवसाय राहिला आहे. लोकसंख्येच्या ८० टक्के लोक, शेती व शेतीपुरक व्यवसायावर आपली उपजीविका भागवित असत. आजही थोडयाफार फरकाने हीच स्थिती आहे. पावसावर अवलंबून असलेली शेती व शेतीकरण्याची पारंपरिक पध्दती ही भारतीय शेतीची महत्त्वाची वैशिष्टे आहेत. शेतकरी हा इथल्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असून तो प्रामुख्याने खेडयात राहतो. शेतकरी सा-या जगाचा पोशिंदा असूनही तो स्वतः नेहमीच अर्धपोटी राहत आला आहे.

विसाव्या शतकातही हीच परिस्थिती दिसून येते. विसाव्या शतकात दारिद्रय, दुष्काळ, आवर्षणे, रोगराई, यामुळे हैराण झालेला शेतकरी, शेतीवरील वाढते कर, सावकारी कर्ज, महागाई

यातच जिरुन जात असे. हरिशंकर श्रीवास्तव यांनी चित्रित केल्याप्रमाणे, "अधिक लगान, जमिनदारी व्दारा आर्थिक शोषण, सरकारी कर्मचारियोंव्दारा कठोरता ब्रिटिश शासन काल की एक प्रमुख विशषता बन गयी. ब्रिटिश शासन काल मे लगान नगद लिया जाता था अनाज का मूल्य बहुत कम था, इस कारण किसानो को अपनी उपज का बहूत सा भाग बेच देना पडता था अपनी आवश्यकताओं की पूर्ति तथा लगान देणे के लिए उन्हे साहूकारोंसे कर्ज लेना पडता था और यह कर्ज उन्हे साहूकारों की शर्तोपर लेना होता था कर्ज ऐवज में उहे सुद देना पडता तथा श्रम करना पडता ...सरकारी कानून साहूकारोंकी रक्षा करते और अक्सर कर्ज लेनेवाले किसानोंको अपनी जमिन बैल तथा अन्य वस्तूऔ से निलाम के व्दारा हाथ धोना पडता था l "[३९]

वरील उतारा स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतक-यांच्या आर्थिक शोषणाचे बोलके चित्र उभे करतो. मराठीप्रमाणे हिंदी साहित्यातूनही याचे पडसाद उमटले आहेत. महाराष्ट्रातील कृषिजीवन देशाच्या अन्य भागातील शेतक-यांच्या तत्कालीन स्थितीप्रमाणेच होते.

ग्रामीण जीवनात सावकार आणि ब्राह्मण हा शेतक-यांची लुबाडणूक करणारा फार मोठा वर्ग होता. "व्यापार उदीम आणि सावकारी करणारे वाणी, शेतक-यास हरत-हेने कोंडीत पकडून त्यांचे आर्थिक शोषण करण्यास तत्पर असत. व्यापारी व त्याचें दलाल नोकर अती स्वार्थी, व्यवहारदक्ष व रंग दिसेल त्याप्रमाणे वागण्यात तरबेज असल्यामुळे नुसत्या भावात शेतक-यांचा कमीत कमी शेकडा २५ तोटा होतो. हयाखेरीज हिशोबात वजनमापात, वर्ताळ्यात, व्याजात, कसरीत, मनोतीत, मोळयात आणि नोकर दलालांच्या बहाली बक्षिशीत कुणबी पुष्कळ खराबीला येतो ते वेगळेच."[४०] त्रि.ना.आत्रे यांनी चित्रित केलेली वस्तुस्थिती आजही अनुभवास येते. सावकाराकडून कर्ज घेणे, हा शेतक-यांचा नित्यक्रम असे. "कर्ज देताना सावकार कागदावर अंगठा घेत होते. कागदावरील मजकूर शेतक-याला वाचता येत नसल्यामुळे कागदवर लिहिले जाई एक व प्रत्यक्ष वाचून दाखवले जाई दुसरेच असली कागदे, दस्तावेज न्यायालयात सादर करुन शेतक-यांच्या जमिनीवर जप्ती आणली जाई. "[४१] असे प्रकार सर्रास घडत. ब्रिटीश शासन भारतीय शेतक-यांची जी पिळवणूक करत होते ही पिळवणूक शेतकरी निमूटपणे सहन करत आपल्यावर राज्य करण्यासाठीच देवाने त्यांना पाठवले आहे अशी खोटी समजूत करुन घेत शेतक-यांची ही परिस्थिती त्यांनी शिक्षण न घेतल्याने ओढवली आहे. हे मानण्यास शेतकरी तयार होत नसत. सावकार कागदावर जेवढी रक्कम

दिली ती लिहीत परंतु प्रत्यक्षात शेतक-यांकडून त्यापेक्षा कितीतरी जास्त रक्कम वसूल करत ही रक्कम देण्यासाठी शेतकरी असमर्थ दिसला की लगेच त्याच्या जमिनी सवकार ताब्यात घेत एकूनच शेतक-याने शिक्षण न घेतल्याने त्याच्यावर अन्याय होत असतानेही तो निमुटपणे सहन करताना दिसतो. शेतक-यांच्या जमिनी सावकाराने हडप केल्याची कितीतरी उदाहरणे देता येण्यासारखी आहेत.

"सावकाराप्रमाणे बाजारातील अडत्या, दलाल, हाही धाक धपटाने शेतक-यांची पिळवणूक करीत असे."[४२] परिणामी शेतकरी हा भारत देशातील सर्वात मोठा उत्पादक, सर्वात मोठा करदाता असूनही शोषणाचा बळी होता. "भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतकरी हा सर्वात मोठा उत्पादक, सर्वात मोठा करदाता, सर्वात जास्त कर्ज घेणारा आणि त्यावर सर्वात जास्त व्याज देणारा तोटयाचा मालक (उत्पादक )आहे."[४३] सुधाकर मोहोड यांच्या वरील विधानाची सत्यता पटते. २० व्या शतकातही या स्थितीत सुधारणा दिसत नाही. सावकाराप्रमाणे ब्राह्मण हा ही शेतक-यांची लुबाडणूक करणारा मोठा वर्ग होता. एकवेळ सावकारी पाशातून शेतक-यांची सुटका होणे शक्य होते पण ब्राह्मणी पाशातून सुटका होणे शक्य होत नसे. विविध व्रतवैकल्य, जप-तप, दानदक्षिणा, शिधा उपटणे यात ब्राह्मणांचा हातखंडा राहिला आहे. नैसर्गिक आपत्तींचा संबंध पापपुण्याशी जोडून शेतकरी वर्गास मानसिक गुलाम करण्याचे कार्य ब्राह्मणांनी केले. विशेषतः ग्रामीण भागात ब्राह्मणांचा प्रभाव अधिक दिसून येतो.

**२.७ सावकारांनी केलेले शोषण**

महात्मा जोतिरांवांच्या मते "शेतक-यांचे शोषण करण्यास सावकार आघाडीवर आहेत. कारण इंग्रजांच्या राजवटीत सावकारांच्या पाठीमागे त्यांची न्यायालये आणि राजसत्ता उभी राहीली. हे सावकार मुख्यतः ब्राह्मण, मारवाडी आणि गुजर या जातीतील होते. इंग्रजांच्या राजवटीत शेतसारा देण्यासाठी, इतर खर्च भागविण्यासाठी शेतक-यांना कर्ज काढावेच लागत असे. त्यामुळे सर्व शेतकरी वर्ग अट्टल कर्जबाजारी झालेला दिसून येतो. इंग्रजी राजवटीत नव्या कायदेकानूनमुळे दलाल, कमिशन एजंट आणि व्यापारी तयार झालेले पाहावयास मिळतात. त्यांची दुकाने होती ते सावकारी करीत असत. औद्योगिक मालाची विक्री करण्यासाठी आणि कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठी नव्या बाजारपेठा तयार झालेल्या पहावयास मिळतात. या खरेदी विक्रीच्या व्यवहारात

दलाली करणारे मध्यस्थ तयार झाले ते सावकारी ही करत होते शेतसा-याचा भरणा, बी- बियाणांसाठी लागणारे भांडवल, लग्नादी धार्मिक विधीतील खर्च, बैल बारदाना यांची खरेदी यासाठी शेतक-यास नड पडली की ते गुजर, मारवाडी, ब्राह्मण, सावकारांकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घेत असत."[४४] म्हणजेच शूद्र शेतक-यांच्या अज्ञानाचा व देवभोळेपणाचा फायदा घेऊन सावकार शेत जमिनीवरचा माल व्याजापोटी हडप करीत होते. पुढे त्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन दामदुपटीने व्याज गहाणवट केलेल्या जमिनीवर ते आपला कब्जा बसवताना दिसतात. त्याच जमीनीवर मूळ मालकास कूळ म्हणून राबवित. अशाप्रकारे सावकारशाहीतून गैरहजर जमीनदार तयार होताना दिसतात म.फुलेंच्या लिखाणातून शेतक-यांच्या कर्जबाजरीपणाचा व त्यांच्या सावकारांकडून होणा-या शोषणाचा सातत्याने उल्लेख होताना दिसतो. या शोषणाच्या प्रकियेचे म.फुले खालील प्रमाणे वर्णन करतात. ते लिहितात-

"हिशेबी घोळ, सर्व गोंधळ, वाढवी कर्ज डोईवर |
आतून होई सावकार | पैस देई गहाणावर |
वेळ पाहून संधी साधून | मागणी नेट त्याजवर |
तगादा धाडी पाठीवर | दाम दुप्पट, सर्व एकवट |
नोंदती गहाणखतावर दुमाला पुस्त रजिष्टर |"[४५]

म.फुले यांनी सावकरांच्या कार्यपध्दती कशी होती या विषयी वरील वर्णन केलेले आहे. सावकार हा शेतक-यांच्या अज्ञानीपणाचा फायदा घेवून हिशोबात घोळ करत असे मूळ रक्कमेपेक्षा अधिक रक्कम शेतक-यांकडून वसूल करत ही रक्कम देण्यास शेतकरी असमर्थ ठरला की शेतक-यांच्या जमिनीही ताब्यात घेतल्या जात या अन्याया विरोधात शेतक-यांनी एकत्र यावे असे म.फुले या काव्यातून स्पष्ट करतात . सावकाराबद्दल म.फुले पुढे सांगतात की ,

"हातावर देई | लेहूनी घेई |
वायदा आट स्टँपांवर |
ठोकली आर्जी अखेर | |
धन्यावर जीव |
केली मोठी कीव |

बक्षीस बिनभाडे घर ||" [४६]

शेतक-यांना लूटण्यासाठी सावकार वेगवेगळ्या योजना लढवितांना दिसतात. हे सावकार शेतक-यास सांगतात, जर तुम्ही तुमची जमीन आमच्या नावे खरेदी करुन दिली तर आम्ही कर्ज देऊ कर्जाची परतफेड वेळेत केली तर तुमच्या जमीनीचा ताबा तुम्हाला परत करु असे म्हणून हे शपथ करुन बोली करतांना दिसतात. पण त्यांच्याकडून शूद्रास त्यांच्या जमीनी परत क्वचितच मिळतांना दिसून येतात. शेतक-यास लिहिता वाचता येत नसल्यामुळे त्यांच्यावरील कर्जाच्या रकमा ते मनानेच वाढवतांना दिसतात. या सावकारांना ब्राह्मण नोकर मदत करतांना दिसून येतात. लाच खातात व शेतक-यास बुडवतात. 'शेतक-यांचा आसूड' च्या चौथ्या प्रकरणात म.फुलेंनी त्यावेळच्या कर्जबाजारी आठ बैलांचा मालक असणा-या शेतक-याची दीनवाणी परिस्थिती वर्णिली आहे. शेतसारा देता देता कर्ज काढून हा शेतकरी स्वतः च्या शेताची निगाही ठेवू शकत नाही.

म.फुलेंचे लक्ष शेतकरी व त्यांचे प्रश्न यांच्याकडे होते. "आपल्या बोच-या, सुस्पष्ट व जवळजवळ प्रत्यक्ष चित्र उभे रहावे अशा भाषेत, शेतक-यांचे दैन्य, जेमतेम पुरेल असे धान्य आणि कपडा, सावकार आणि अधिकारी यांच्या कडून होणारी छळवणूक यासंबंधी केलेल्या शेतक-यांच्या हुबेहूब वर्णनातून ते अत्यंत स्पष्ट होते. त्यांचे शेतक-याला 'बळीराजा' शी एकरुप मानणे, म्हणजे शेतक-याला जमीनीचा राजा मानण्याची जी परंपरागत पध्दत, यातून ही गोष्ट आणखी उच्चत्तर कोटीला जाताना दिसते."[४७] आणखी एक गोष्ट भर देवून मांडली पाहिजे, म.फुले हे केवळ खेडेगावच्या पुढा-याला बळीराजा समजत नव्हते. त्यांची दिशा खेडयाकडे होती. परंतु समतेच्या दृष्टीने आधुनिक असलेली खेडे त्यांच्या मनात होते. म.फुल्यांची विचारधारा शेतकरी समुदायाशी एकरुपता आणि समता व बुध्दीवाद या क्रांतिकारक मुल्यांबाबत आत्मीयता यावर आधारलेली दिसून येते.

प्रा.गो.म.कुलकुर्णी म्हणतात की, "इंग्रज राजवटीकडे ते काहींशा वेगळया दृष्टीने पहात होते. राजकीय सत्तेच्या ताबडतोबीच्या संपादनापेक्षा भटशाही कडून बहुजनसमाजाच्या होत असलेल्या पिळवणूकीचा घोर, त्यांना अधिक प्रमाणात लागून राहिला होता. इंग्रजी राजवटीकडे या परंपराप्राप्त गुलामगिरीतून मुक्त होण्याची एक चांगली संधी यादृष्टीने ते पहात होते. कारण त्यांच्या दृष्टीने बहुजनसमाजाला जो जाच सहन करावा लागत होता, तो इंग्रज राजवटीच्या आधीपासून

कितीतरी शतकेचालू होता. हा जाच इंग्रज गेले तरी चालूच राहाणार होता. तत्कालीन प्रत्यक्ष शासन व्यवहाराशी बहुजनांचा जो संबंध येई. तो इंग्रज राज्यकर्त्यापेक्षा इंग्रजांनी नियुक्त केलेल्या शासकीय अधिका-यांशी आणि हे अधिकारी फुले काळी प्राधान्याने ब्राह्मणच होते आणि या अधिका-यांची बहुजन समाजाकडे पाहण्याची भूमिका उपेक्षेची, तुच्छतेची, व पिळवणूकीची होती. या वर्गाकडून होणारा धार्मिक पिळवणूकीचा प्रकार फार जूना होता. पण पेशवेकाळात राज्यकर्ते ब्राह्मण आल्याने मग शासकीय पातळीवरुनही हा वर्ग बहुजनसमाजाचा छळ करीत राहिला आणि ही प्रथा ब्रिटिशकाळातही चालूच राहिली होती. या वस्तुस्थितीकडे फुले आपल्या लेखनातून कटाक्षाने वारंवार लक्ष वेधतात.” [४८]

अशाप्रकारे ब्रिटिशपूर्व कालखंडामध्ये भारताची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व स्थिर स्वरुपाची असल्याचे दिसून येते. स्वयंपूर्ण कृषी व्यवस्था, वाढता परदेशी व्यापार, समृध्द उत्तम दर्जाची हस्तकला व भरभराटलेले उदयोग ही त्याकाळची भारतीय अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्टये सांगता येतील. भारतातील प्रमुख व्यवसाय शेती हाच होता. ब्रिटिशपूर्वकाळातील ग्रामजीवन स्वयंपूर्ण असल्याचे दिसून येते. बाहय जगाशी ग्रामीण भागाचा फारसा संबंध येत नसे गावातील लोक एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परांवर अवलंबून असल्याने ग्रामजीवनात सांघिक ऐक्याची व सहकार्याची भावना दिसून येते. ब्रिटिश कालखंडामध्ये ब्रिटिश राज्यकत्यानी भारतीय शेतीच्या अर्थव्यवस्थेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणलेले दिसतात. मात्र या बदलांचा उद्‌देश शेती व्यवसायाला चालना देणे किंवा त्यामध्ये सुधारणा घडवून आणणे हा नव्हता तर आपले आर्थिक हितसंबंध जपणे आणि त्याकरिता आपल्या स्वार्थी धोरणांची कोणतीही किंमत देऊन कार्यवाही करणे हा होता असे दिसून येते.

भारतावरील ब्रिटीश शासनकाळात कृषीबाबत कंपनी सरकारचे धोरण एकाच उद्दीष्टावर केंद्रीत झालेले होते. जास्तीत जास्त जमीन महसुल पदरात पाडून घ्यावयाचा हे उद्दिष्ट असल्याचे दिसून येते. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे जमीन महसुल हा उत्पन्नाचा महत्वाचा भाग होता. भारताची आर्थिक लूट करावी या उद्देशाने प्रेरित झालेल्या कंपनी सरकारने जास्तीत जास्त महसुल पदरात पाडून घेण्याच्या हेतूने आपले महसुलविषयक धोरण निर्धारित केलेले पाहावयास मिळते. परिणामी या देशाचा शेतकरी कर्जबाजरी झालेला दिसून येतो. हिच परिस्थिती ब्रिटिश पार्लमेंटच्या काळातही कायम राहिली शेतक-यांच्या शोषणाविरूध्दची प्रतिक्रिया उदयोन्मुख भारतीय

बुध्दीजीवीमध्ये  निर्माण होणे स्वभाविक होते. त्यातील महात्मा जोतिबा फुले यांनी एक सुस्पष्ट भूमिका मांडत सत्यशोधकीय विचार पध्दतीने शेतक-यांच्या अवनतीचे विश्लेषण केले. हाच वारसा पुढे सत्यशोधक विचारांचे मुकुंदराव पाटील यांनी पुढे नेला त्यांच्या विचार आणि कार्याचे विश्लेषण प्रकरण ३,४,५ व ६ मध्ये स्वतंत्रपणे केले असल्याने प्रस्तुत ठिकाणी त्याचे संदर्भ देणे टाळले आहे.

## संदर्भ


१. मगर निर्मला, जोतिराव फुल्यांची समाज परिवर्तन नीती, साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, प्र.आ. २८एप्रिल १९९१ पृ.१३

२. कित्ता, पृ.१३

३. कित्ता, पृ.१३

४. बगाडे उमेश, विचार किरण (दीनमित्रमधील अग्रलेख १९१०-१५,भाग-१), दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी, ता.नेवासा, जि.अहमदनगर, प्र.आ.१० मे २००९

५. कित्ता,बगाडे उमेश, पृष्ठ ८

६. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १४

७. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १४

८. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १५

९. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १५

१०. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १५

११. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १५

१२. कित्ता, मगर निर्मला, पृष्ठ १६

१३. जोशी लक्ष्मण शास्त्री,'महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आन्दोलन', अस्मिता महाराष्ट्राची, पृष्ठ ५३५

१४. देशमुख गोपाळ हरि, (लोकहितवादी) लोकहितवादी कृत निबंधसंग्रह (सं.), अनंत काकबा प्रियोळकर, पृष्ठ ४४३

१५. वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास १७५७-१८५७, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, जुलै १९९८, चौथी आवृत्ती, सप्टेंबर २००८, पृष्ठ २८२

१६. क्षिरसागर शोभादेवी, आधुनिक भारताचा इतिहास १७५७-२००५, के. सागर प्रकाशन, पुणे, १९९४, पृष्ठ ३७

१७. जावडेकर शं.द., उध्दृत, आधुनिक भारत, कॅान्टिनेटल प्रकाशन, पुणे ३०, प्रथम आवृत्ती १९३८, पृष्ठ २९

१८. भोसले जालिंदर, भोसले सिमा, आधुनिक महाराष्ट्रातील परिर्वतनाचा इतिहास, पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २९ जूलै २००७, पृष्ठ १८९.

१९. कित्ता, पान नं.१८९.

२०. कित्ता, वैद्य सुमन, कोठेकर शांता, पृष्ठ २८५

२१. कित्ता, वैद्य सुमन, कोठेकर शांता, पृष्ठ २८६

२२. कित्ता, वैद्य सुमन, कोठेकर शांता, पृष्ठ २८७

२३. कित्ता, वैद्य सुमन, कोठेकर शांता, पृष्ठ २८८

२४. कित्ता, वैद्य सुमन, कोठेकर शांता, पृष्ठ २८९

२५. कित्ता, वैद्य सुमन, कोठेकर शांता, पृष्ठ २९०

२६. ऑमव्हेट गेल, वसाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, १९६५, पृष्ठ १४

२७. मंगुडकर मा.प., महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, आवृत्ती दुसरी, पुणे, १९६५, पृ.क्र.१४

२८. कीर धनंजय, महात्मा जोतिराव फुले, आवृत्ती दुसरी, १९७३, पृ.१७३, १७४

२९. अत्रे त्रि.ना., गावगाडा, आवृत्ती तिसरी, मुंबई १९५९, पृष्ठ १०७

३०. देशपांडे कृ.प, अग्निफुले, आवृत्ती पहिली, १९८२, पुणे, पृष्ठ ४४,४५

३१. मंगुडकर मा.प, शिंदे लेखसंग्रह, आवृत्ती पहिली, पुणे, १९६३, पृ.२७६

३२. कित्ता, गावगाडा, पृ.१३२

३३. घोले वि.रा, अवर्षणापासून शेतीचे रक्षण कसे करता येईल या विषयी सूचना, ता.१५ डिसेंबर १८८१, पुणे

३४. खांदवे भाऊसाहेब, दीनबंधू, कृष्णराव भालेकर, गाज प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती, मार्च २०००, पृ.९

३५. पाध्ये व टिकेकर, आजकालचा महाराष्ट्र,आवृत्ती पहिली, मुंबई १९३५, पृ.५८

३६. तारकुंडे सी.र, तारकुंडे यांची संक्षिप्त हकीगत, हस्तलिखित, पृ.२

३७. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाड़.मय गृह, मुंबई ४०००२५, पृ.८

३८. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.१४

३९. गुप्त शिवकुमार (संपा), आधुनिक भारत का सामाजिक तथा आर्थिक इतिहास, पंचशील प्रकाशन, जयपुर, प्र.आ., १९९९, पृ.३०९-३१०

४०. आत्रे त्रिंबक नारायण, वरदा बुक्स पुणे, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५, पृ.८६

४१. फडके य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र -खंड तिसरा, (इ.स.१९२१-२९), श्री विदया प्रकाशन, पुणे, प्र.आ., २ऑक्टोबर १९९१, पृ.१६०-६२

४२. कित्ता, पृ.२७-२८

४३. मोहोड सुधाकर, शेतकरी हिंदुस्थानचा अतिरिक्त मूल्यांचा सिध्दांत (भाग-१), भाग्योदय मुद्रण सीताबर्डी नागपूर-१२, प्र.आ, ५मे १९८०, पृ.२३-२४

४४. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.२८

४५. कित्ता, पृष्ठ २९

४६. कित्ता, पृ.२९

४७. कित्ता, पृ.३०

४८. कुलकर्णी गो.म, आधुनिक मराठी वाड्.मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ., १९९४, पृ.९९-१००

# प्रकरण-तिसरे

## काही सत्यशोधकीय विचारवंतांचे कृषिविषयक विचार

३.१ प्रास्ताविक

३.२ सत्यशोधक चळवळ

३.३ सत्यशोधक चळवळ स्वरूप

३.३.१ सत्यशोधक समाजाची मुख्य तत्त्वे

३.४ महात्मा फुले यांचें कार्य

३.४.१ महात्मा फुले यांची ध्येयदृष्टी

३.४.२ शेतक-यांचे धार्मिक शोषण

३.४.३ सांस्कृतिक शोषण

३.४.४ सावकारांनी केलेले शोषण

३.४.५ नोकरशाही कडून शेतक-यांची पिळवणूक

३.४.६ साम्राज्यशाहीची पिळवणूक

३.४.७ म.फुलेंनी सुचविलेल्या शेतीविषयक उपाययोजना

३.५ कृष्णराव भालेकर यांचे कार्य

३.६ राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य

३.६.१ सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व

३.६.२ वरिष्ठ वर्गाच्या श्रेष्ठत्वाविरुध्द संघर्ष

३.६.३ सत्यशोधक समाजाच्या शाखेची स्थापना

३.६.४ राजर्षी शाहू महाराज आणि शेती सुधारणा

३.७ नारायण मेघाजी लोखंडे

३.८ ग्यानोबा कृष्णाजी ससाणे

३.९ भास्करराव जाधव

३.१० आण्णासाहेब लट्ठे

३.११ मुकुंदराव पाटील जीवन परिचय

*३.११.१ कौटुंबिक पार्श्वभूमी*

**३.११.२ जन्मतारखेसंबंधी चर्चा**

**३.११.३ मुकुंदराव भालेकरांचे पाटील झाले**

**३.११.४ बालपण-शिक्षण**

**३.११.५ विवाह**

**३.११.६ आजारपण आणि मृत्यू**

**३.११.७ वैचारिक जडणघडन व लेखन**

**३.११.८ वृत्तपत्रविषयक लेखन**

**३.११.९ पहिले ग्रामीण पत्रकार**

**३.११.१० सामाजिक लेखन**

# प्रकरण-तिसरे

# काही सत्यशोधकीय विचारवंतांचे कृषिविषयक विचार

## ३.१ प्रास्ताविक

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक थोर विभूतींचे मोठे योगदान आहे. पर्वतप्राय उंचीच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची किती तरी माणसे इथे होऊन गेली. एकोणिसाव्या शतकात महात्मा जोतिराव फुले, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, विष्णूबुवा ब्रह्मचारी, लोकमान्य टिळक, आगरकर, राजर्षी शाहू महाराज, कृष्णराव भालेकर इ.थोर समाजसुधारक आणि समाज चिंतक होवून गेले या सर्वात महात्मा फुल्यांना अग्रक्रम दयावा लागतो. याचे कारण असे की, त्यांनी नुसते प्रबोधनाचे बोलक्या सुधारकाचे कार्य केले असे नाही तर सामाजिक क्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने सक्रिय प्रयत्न केलेले आहेत. धर्माधिष्ठीत समाज व्यवस्थेत ज्यांचे शोषण होत होते अशा स्त्रिया श्रमिक, शेतकरी, पददलितांच्या अभ्युदयासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केलेला आधुनिक महाराष्ट्राला निश्चितच माहीत आहे. या शोषित समाजाचे शोषण जसे राजसत्तेकडून होत आहे तसेच धर्मसत्तेकडूनही होत आहे, हे त्यांनी जाणले होते. यासाठी इंग्रजी राजसत्तेशी शह देण्यापेक्षाही हजारो वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेली धर्मसत्ता प्रथम खिळखिळी केली पाहिजे, याचा विचार त्यांनी केलेला होता. कर्मठ, अन्यायमुलक विषमता जोपासणारी मुठभर उच्च वर्णियांची मिरासदारी संपवून या मुठभरांच्या जाचक चक्रात अडकलेल्या अज्ञानी जीवांना आत्मभान देणे आवश्यक होते. हे भान येण्यासाठी त्यांचे अज्ञान दूर करणे आवश्यक होते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक चळवळीची संकल्पना, सत्यशोधक चळवळीचे स्वरूप, महात्मा फुले यांचे कार्य, कृष्णराव भालेकर यांचे कार्य, राजर्षी शाहूमहाराज यांचे कार्य आणि मुकुंदराव पाटील यांचा जीवन परिचय याचा विचार केलेला आहे. सत्यशोधक चळवळ पुढे नेण्यामध्ये योगदान दिलेल्या व्यक्तींची संख्या मोठी आहे ही अतीव्याप्ती टाळण्यासाठी प्रस्ततु ठिकाणी नारायण मेघाजी लोखंडे, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे यांचा प्रतिकात्मक उल्लेख केलेला आहे.

## ३.२ सत्यशोधक चळवळ

एकोणिसाव्या शतकात सामाजिक प्रबोधनाची, नवजीवनाची चळवळ उभी करण्यासाठी ज्यांनी आपले सारे आयुष्य समर्पित केले, त्यात महात्मा फुले यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावा

लागतो. फुल्यांचे कार्य क्रांतिकारी आहे. कालबाहय झालेल्या जुनाट मुळावर त्यांनी सतत कठोर प्रहार केलेले दिसून येते. धर्म आणि समाज यांची नवरचना करुन माणसाची मूलभूत प्रतिष्ठा त्या रचनेत प्रस्थापित व्हावी, यासाठी म.फुले यांनी आमरण लढा दिला. सामाजिक आणि धार्मिक स्वरुपाचे सारे अधिकार मुठभर उच्चवर्णियांच्या हातात एकवटलेले असल्यामुळे सर्वसामान्य मनुष्य सामाजिक आणि शैक्षणिक हक्कापासून वंचित झालेला होता. कनिष्ठ स्तरातील माणसांना आणि क्षूद्रातीक्षूद्रांना अज्ञानामुळे आपल्यावर होणा-या अन्यायाची पुरेशी जाणीवही नव्हती. त्यांचे शोषण धर्माच्या व ईश्वराच्या नावाखाली शतकानुशतके अनेकांनी चालवलेले होते.

म.फुले यांना या परिस्थितीची जाणीव तीव्रतेने झाल्यामुळे एक नव्या प्रगत समतावादी समाजरचनेसाठी ते बलदंडपणे झगडत राहिले. माणसाच्या पायातल्या गुलामगिरीच्या बेडया तोडून तो मुक्त व्हावा आणि त्याचे मनुष्यपण सर्वार्थाने विकसित व्हावे, ही म.फुले यांची भूमिका असल्याचे आपणास दिसून येते. माणसाच्या शोषणाला जुन्या शास्त्र पुराणाची एक तात्त्विक बैठक होती. ती उखडून टाकण्यासाठी म.फुले प्रयत्नशील होते वस्तुतः म.फुल्यांचे सारे जीवन सत्य, स्वातंत्र आणि समता या तत्त्वांच्या प्रतिष्ठेसाठी झगडण्यात व्यतीत झालेले होते. समाज परिवर्तनासाठी जे नानाविध स्वरुपाचे कार्य त्यांनी केले. त्याचेच समग्र दर्शन त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजात असल्याचे दिसून येते.

सत्यशोधक समाज स्थापन करण्यापूर्वी म.फुल्यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात केली होती. तत्कालीन सुशिक्षित तरुणात धर्मविषयक चर्चा होत होती. ज्योतीरांवानी या सर्वांशी नित्य संपर्क ठेवला होता. परमहंसांच्या सभेविषयी त्यांच्या मनात आपुलकी होती. त्यांचे तत्त्वज्ञान आणि विचार त्यांच्या मताशी मिळते जुळते होते. यासभेची धारण व कार्यपध्दती त्यांना मान्य नव्हती. सर्व चर्चा, ठराव आणि कार्य यांच्या बाबत जी गुप्तता राखली जात होती आणि सदस्यांची यादी बाहेर फुटताच त्यांची उडलेली तारांबळ या गोष्टी धर्म सुधारण्याच्या कार्याला अत्यंत विघातक होत्या. अशा भ्याडपणाचा स्वभावतःच म.फुले यांना तिटकारा असल्याचे दिसून येते.

कोणताच धर्मग्रंथ ईश्वर प्रणित नाही. “मनुष्याच्या मनात जे विचार व सद्‌भावना उत्पन्न होतात, ती मात्र ईश्वरी प्रेरणा होय, असे म्हणायचे आणि या प्रतिपादनात माझ्या पदराचा एक शब्द देखिल नाही. वेद शास्त्र यांचे विवेचन करुन पाहिले असता हाच त्यांचा मुख्य सिध्दातं होय असे सांगायचे या दोदोबांच्या प्रतिपादनातील विसंगती ज्योतीरावांना खटकल्याशिवाय राहिल्या नसतील.”[१]

तसेच परमहंस मंडळींच्या सभासदाचे कार्य सामान्यतःच शहरी पांढरपेशा समाजापुरते मर्यादित होते. ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकरी लोकांच्या जीवनाचा त्यांनी कधीच विचार केला नाही. त्यामुळे बहुजन समाजातील लोकांची आणि शूद्रातिशूद्रांची स्थिती सुधारायची असेल तर अशा फुटकळ सुधारणावर विसंबून न राहता मूलगामी समाजपरिवर्तनासाठी एक स्वतंत्र संघर्ष प्रवण संस्थेची गरज वाटल्यामुळे महात्मा ज्योतीराव फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्याचे निश्चित केले. परंपरानिष्ठ जहाल संप्रदाय आणि समन्वयशील प्रागतिक संप्रदाय या दोन्हीचे भावनात्मक अन्य अधिष्ठान, राष्ट्रवाद हेच होते. त्यामुळे प्राचीन हिंदू परंपरेची गोडवी गाणा-या आधुनिक जहाल संप्रदायाबद्दल त्यांना यतकिंचितही सहानुभूती नव्हती. या परंपरावादी लोकांचा देशाभिमान अत्यंत संकोचित स्थितीप्रिय व आपमतलबी आहे अशी त्यांची धारणा होती. कुणालाही न दुखवता नव्या जुन्यांचा समन्वय करित संथपणे सुधारणा घडवून आणण्याची नेमस्त प्रागतिक संप्रदयाची कार्यपद्धती ज्योतीरावांना सदोष वाटत होती.[२] म्हणूनच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे केली होती.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाली, त्यावेळी ज्ञानगिरी बुवा, धोंडिराम कुंभार, ग्यानोबा झगडे, रामचंद्र भालेकर, कृष्णराव भालेकर, तुकाराम हणमंता पिंजन इ. त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यावेळी "ज्ञानगिरीबुवा कबीराने केलेल्या बीजक ग्रंथातील 'विप्रमती भाग' जमलेल्या मंडळीस वाचून दाखवित बीजक ग्रंथ ब्रीज भाषेत असल्यामुळे विप्रमती भागाचा ज्ञानगिरी बुवा मराठीत तर्जुमा करुन मंडळीस सांगत असत. त्यात ब्राह्मणाच्या स्वार्थाचे, स्वभावाचे, वर्तणूक वगैरेचे फार वर्णन आहे."[३] कबीराने ब्राह्मणावर केलेली टीका ऐकूण जमलेल्या मंडळीस जोतीराव म्हणत की, "माझ्या एकट्याच्याने ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांपासून सुटका होणार नाही. मंडळी मला सहाय्य होईल तर काही करता येईल."[४] त्यावेळी या मंडळास कोणते नाव द्यावे याबद्दल बरीच चर्चा होऊन शेवटी 'सत्यशोधक समाज'स्थापन झाला.[५] सत्यशोधक समाजात नव्याने दाखल होणाऱ्या सभासदास तळी उचलून त्यातील भंडारा व गुलाल कपाळास लावावा लागे, यावरुन महात्मा फुले व त्यांचे सत्यशोधक सहकारी यांच्यावर केवळ ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा प्रभाव होता, असे वाटत नाही. "वज्रसूची सारख्या ब्राह्मणावर व जातीभेदावर झोड उठवणा-या ग्रंथातील विचारांनी किंवा कबीरासारख्या संतांच्या विचारांनी सत्यशोधकांना प्रेरणा दिली होती."[६]

### ३.३ सत्यशोधक चळवळ स्वरूप

सत्यशोधक चळवळीची स्थापना म. फुले यांच्या नेतृत्वाखाली झालेली होती. सामाजिक परिवर्तनाचा विचार मान्य असणा-या आपल्या सहका-यांची आणि अनुयायांची फुल्यांनी एक सभा पुण्यात दि. २४ सप्टेंबर १८७३ या दिवशी आयोजित केली. सत्यशोधक समाजाच्या प्रमुख उद्दिष्टांची त्यांनी माहिती दिली. शेतकरी कष्टकरी, शूद्र आणि अतिशूद्र तसेच अन्य शोषित लोक यांच्यात वैचारिक जागृती व्हावी, ते संघटित व समर्थ व्हावेत आणि परंपरागत ब्राह्मणी धर्माचे साखळदंड त्यांनी जाणीवपुर्वक झुगारुन दयावेत. आपली उन्नती विदयेच्या माध्यमातून करुन घ्यावी. हा महत्त्वाचा उद्देश सत्यशोधक समाजाचा असल्याचे त्यांनी घोषित केले. या समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष म्हणून जोतिबा फुल्यांची सर्वानुमते निवड झाली.

सत्यशोधक समाजाने पुढील कालखंडात जे स्वजात्मक कार्य केले आणि महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात जे मन्वंतर घडून आणले, हे लक्षात घेता समाज सुधारलेल्या ख-या अर्थाने आशय प्राप्त करुन देणारी ही मानव मुक्तीची चळवळ होती, असे म्हणता येईल. महात्मा फुले यांच्या मृत्युनंतर मात्र सत्यशोधक समाज आपल्या व्यापक आणि उदार अशा वैचारिक भूमिकेपासून दूरावत गेल्यामुळे या समाजातही आकुंचित जातीय विचारांची डबकी उत्पन्न झाली. पण फुल्यांच्या आयुष्यात सत्यशोधक समाजाची क्रांतिकारक म्हणूनच एक प्रतिमा सिध्द झाली होती. या समाजाने महाराष्ट्राच्या सामाजिक विचारांना समतेच्या आणि न्यायाच्या दिशेने वळविले यात संदेह नाही. या समाजाचा मुख्य उद्देश स्पष्ट करतांना म.फुले यांनी म्हटले आहे, ‘‘ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्य इ.लोकांच्या दास्यत्वापासून क्षूद्र लोकांस मुक्त करण्यासाठी व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्ष ते क्षूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आलेले आहेत. यास्तव समोपदेश व विद्याव्दारे त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहार संबंधी ब्राह्मणाचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यास मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ क्षूद्र मंडळींनी हा समाज स्थापन केला या समाजात राजकीय विचारांवर बोलणे वर्ज आहे.’’[७]

म.फुले यांनी येथे सत्यशोधक समाजाच्या स्थापने मागील आपली भूमिका स्पष्ट केल्याचे दिसून येते जो शूद्र समाज निकृष्ट दर्जाचे काम वंशपरंपरागत करत अला आहे. हा शूद्र समाज उच्च जातीतील लोकांचे दास्यत्व स्वीकारुन मिळेल ते काम करत असे. या समाजाला त्याचे अधिकार

मिळून देण्यासाठी त्यांना शिक्षण देवून समाजातील मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केल्याचे म.फुले स्पष्ट करतात.

म.फुले यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी महाराष्ट्रातील शूद्रादीशूद्र बहुजन समाजाला जागृत करुन त्यास सामाजिक अन्यायाच्या प्रतिकारासाठी सक्षम बनविले हे होय. फुलेंचा विषमता, अन्याय व शोषण यावर आधारित समाजव्यवस्थेला विरोध होता. त्यासंबंधीची आपली भूमिका अतिशय स्पष्ट व परखड शब्दात त्यांनी 'सामाजिक सत्यधर्म', 'अस्पृश्यांची कैफियत', 'ब्राह्मणांचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतक-यांचा आसूड' इ. ग्रंथातून त्यांनी मांडलेली आहे.

म.जोतीबा फुलें यांचे असे मत होते की, आपल्या समाजातील वरिष्ठ जातींनी आर्थिक राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. सर्व क्षेत्रात स्वतःची मक्तेदारी निर्माण करुन शूद्रादीशूद्र समाजाला गुलाम बनविले आहे. त्यांनी असे म्हटले होते की, जातीभेदाचे मूळ ब्राह्मणाच्या स्वार्थी धर्मांधंतेत आणि अहंकारात आहे. ब्राह्मणांनी खोटे धर्मग्रंथ निर्माण करुन कनिष्ठ जातीवर आपली मानसिक गुलामगिरी लादली आणि बहुजन समाजाला अज्ञानात ठेवून स्वतः सर्व सत्ता स्थाने बळकावली आहेत. धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात ब्राह्मणाने आपले वर्चस्व प्रस्थापित केलेच परंतु त्याच त्यांच्या जोरावर राजकीय व आर्थिक सत्तास्थानेही त्यांनी बळकावली, अशाप्रकारे वरिष्ठ ब्राह्मण वर्गाने सर्व विशेष अधिकार स्वतः कडे ठेवून कनिष्ठ वर्गाला आपल्या स्वार्थासाठी राबवून घेतले. आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात ते म्हणतात की, "ब्राह्मण लोक तुम्हाला लुटून खात आहेत, हे माझ्या शूद्र बांधवांना सांगण्याच्या हेतूने मी हा प्रस्तुत ग्रंथ लिहीत आहे."[८] असे जोतिबांनी म्हटले आहे. कनिष्ठ वर्गाने संघटित होवून आपल्या न्यायहक्कासाठी ब्राह्मणी वर्चस्वाविरुध्द संघर्ष केला पाहिजे, असे जोतिबांना वाटत होते. त्यांनी असे म्हटले होते की, झगडा केल्याशिवाय नष्ट झालेले मानवी अधिकार परत मिळणार नाहीत वरिष्ठ वर्ग स्वतः मिळालेल्या सवलती, अधिकार, सत्ता व दर्जा सहजासहजी सोडणार नाहीत म्हणूनच बहुजन समाजाने वरिष्ठ वर्गाच्या वर्चस्वाचा संघटितपणे प्रतिकार केला पाहिजे आणि हे वर्चस्व मोडून काढले पाहिजे. याच उद्देशाने म.फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केल्याचे दिसून येते.

### ३.३.१ सत्यशोधक समाजाची मुख्य तत्त्वे

१. “ईश्वर एकच असून तो निर्गुण-निराकार आहे.

२. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.

३. परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवाला अधिकार आहे.

४. परमेश्वराची भक्ती करण्यास मध्यस्थाची गरज नाही. तेव्हा कोणत्याही व्यक्तीला पुरोहित वर्गाच्या मध्यस्थीविना आपल्या प्रिय परमेश्वराची पूजा, उपासना करता येते.

५. माणसाला जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठत्व प्राप्त होते.

६. पुनर्जन्म, कर्मकांड, जपजाप्य इ.गोष्टी अज्ञान मूलक आहेत व त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीचे कारण आहेत.

७. कोणताही धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाही. सर्व धर्मग्रंथाची निर्मिती मानवानेच केली आहे.”[९]

ही मूलतत्त्वे महात्मा फुले यांच्या धर्मविचारांची स्पष्ट कल्पना देऊ शकते. फुल्यांना कोणताही धर्मग्रंथ, धर्मसंस्था आणि समाजसंस्था ईश्वर प्रणित आहे असे वाटत नव्हते.

सत्यशोधक समाजाचे आणखी एक वैशिष्ट्य नमूद केले पाहिजे. त्याचे सदस्यत्व मिळण्याच्या मार्गात कोणताही अडसर नव्हता. जातीच्या संप्रदायांच्या आणि धर्माच्या भिंती आड येऊ शकत नव्हत्या. सर्वांना मुक्तव्दार होते. ब्राह्मण, महार, मांग, ज्यू आणि मुसलमान हे आरंभीच्या कालखंडात समाजाचे सदस्य होते. दर आठवडयाला होणा-या सभेत सक्तीचे शिक्षण, दारुबंदी, पुरोहितशाहीचे स्वरुप,जातीव्यवस्था, मूर्तिपूजा इ. विषयांवर चर्चा होत असे. माणसामाणसांतील बंधुभावना वाढीस लावण्याच्या दृष्टीने विचारविनिमय होत असे. सत्यशोधकांची ही चळवळ फुल्यांच्या हयातीत जोमाने अंग धरू लागली.

सत्यशोधक समाजाच्या चळवळीमुळे ब्राह्मणेत्तर वर्गात आणि शेतकरी, कष्टकरी लोकांत उत्साह संचारला. हा वर्ग अंतर्मुख होऊन विचार करू लागला. आपल्या अज्ञानामुळे अन्यायाचे बळी ठरत आहेत, याची स्पष्ट कल्पना त्याला आली. सत्यशोधक समाजाच्या कार्याची संक्षेपाने फलश्रृती खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. “आपण आपला विकास करून घेऊ शकतो, असा आत्मप्रत्यय शेकडो वर्षे कनिष्ठ स्तरांत कुचंबत राहिलेला माणसाच्या मनात उत्पन्न होऊ लागला.

२. जातीसिध्द उच्चनीचत्वाची कल्पना ब्राह्मणेत्तरांच्या मनात परंपरेमुळे रुजून बसली होती. या कल्पनेच्या शृंखलेतून त्यांनी स्वतःला सोडवून घेतले.

३. परंपरागत धर्मसंस्था, ब्राह्मणी शास्त्रे, ब्राह्मणी वर्चस्व यांना छेद मिळू लागला. भौतिक ज्ञानाची आणि प्रगतीची आकांक्षा सामान्य माणसात वाढीला लागली. ग्रामीण भागातही ही जाणीव पसरत चालली.

४. आपले आर्थिक आणि बौध्दिक शोषण करणा-या शक्तींची स्पष्ट ओळख शेतक-यांना आणि कष्टक-यांना झाली. त्यांच्या जीवनविषयक लढयाला योग्य गती मिळाली.

५. शतकानुशतके समाजजीवनावर प्रभुत्व गाजवणारी पुरोहितशाही निष्प्रभ होऊ लागली. निरर्थक कर्मकांडाचे स्तोम कमी झाले. आपल्या घरातील धार्मिक कार्यासाठी भिक्षुकाची आवश्यकता वाटेनाशी झाली.

६. अनेक देवदेवतांच्या दडपणाखाली वावरणारा सामान्य माणूस एकेश्वरवादी बनला.

७. ख्रिस्ती धर्माकडे आकृष्ट होत चाललेल्या खालच्या वर्गातील लोकांना सत्यशोधक समाजाने नवे श्रध्दास्थान मिळवून दिले."[१०]

या सर्व परिणतीचा विचार केल्यास सत्यशोधक समाजाची तात्त्विक भूमिका व्यापक, उदात्त आणि जीवस्पर्शी होती हे स्पष्ट होते. म.फुले यांच्यासारख्या ध्येयवादी क्रांतिकारकाचे निर्भय नेतृत्व आणि व्यक्तित्त्व लाभल्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात सत्यशोधक समाज विवेकनिष्ठेची आणि क्रांतीची बीजे पेरू शकला. सर्वधर्मसमभावाची शिकवण या समाजाच्या माध्यमातून मिळत होती. जात, संप्रदाय आणि धर्म ही बंधने झुगारुन मानवी ऐक्याच्या आणि समतेच्या ध्रुवता-याकडे या समाजाची झेप होती असे दिसून येते.

महात्मा फुले यांचा इ.स.१८९० मध्ये मृत्यू झाल्यानंतर सत्यशोधक चळवळीतला विश्वकुटुंबी आशय अस्तंगत होत गेला, हे एक दुर्दैवी सत्य आहे. हळूहळू या समाजात राजकारणही येत गेले. पुरोहितशाहीला विरोध करणा-या या समाजाने वेगळया पातळीवरून तिलाच मान्यता दिली. याचा अर्थ आपल्या अंगीकृत तत्त्वधारेपासून स्वतःच हा समाज दूर जाऊ लागला. म.फुले यांचे बंड भिक्षुकशाही, वर्णव्यवस्थेविरुध्द होते, ब्राह्मणी कर्मकांडाविरुध्द होते. त्यात ब्राह्मणांचा दोष नव्हता पण पुढील कालखंडात सत्यशोधक समाजात ब्राह्मणव्देष उतरला आणि एक ब्राह्मणविरोधी संघटना अशी समाजाची प्रतिमा लोकसमाजात आकार घेऊ लागली. मूळ तत्त्वज्ञानाचा कालांतराने विपर्यास

व्हावा असे चित्र अनेक चळवळींच्या संदर्भात दिसले. पण एकेकाळी सत्यशोधक चळवळीने तत्त्वशुध्द भूमिका घेऊन खालच्या स्तरांतले लोक दीर्घकाळच्या अज्ञानातून जागे केले आणि सामाजिक व धार्मिक प्रबोधनाची पहाट जन्माला घातली हे तिचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. आता ही चळवळ पुन्हा ख-या अर्थाने गतिमान झाली आहे. म.फुल्यांच्या विरुध्द जातीनिरपेक्ष विचार तिच्यात पुन्हा संचारला असून परिवर्तनवादी भूमिका दृढ होत आहे. जातीवाद, कर्मकांड, अंधश्रध्दा यांना कडवा विरोध हा समाज करीत असल्यामुळे तो 'सत्यशोधक' या उक्तीला सर्वस्वी पात्र आहे. आज काही पुनरुज्जीवनशक्ती सर्व बाजूंनी उठाव करीत आहेत. देवधर्माच्या नावाखाली पुन्हा वर्णव्यवस्थेचे गोडवे  गायिले जात आहेत. शेतकरी आणि कामकरी व एकंदरच सारा श्रमिकवर्ग याचे बौध्दीक आणि आर्थिक शोषण करण्याची दबलेली प्रवृत्ती पुन्हा अंग धरीत आहे, असे चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. या पुनरुज्जीवनवादी प्रवृत्तींशी तीव्रपणे संघर्ष करण्याची गरज पूर्वीपेक्षाही आज अधिकांशाने आहे. हा संघर्ष सत्यशोधक समाजच संघटित करु शकेल, असा विश्वास वाटतो. कारण आजच्या सत्यशोधक समाजात नेते आणि कार्यकर्ते नवविचाराने भारलेले आहेत. त्यांच्या बुध्दिवादी, समतावादी आणि संघर्षशील विचारातून म.फुले यांना अभिप्रेत असलेला सत्यशोधक समाज दंड थोपटून उभा राहील, असे मला वाटते. राजकीय सत्ता मिळवणे हे या समाजाचे उद्दिष्ट नाही. राजकीय सत्ता हस्तगत करताना अनेक तत्त्वशून्य तडजोडी कराव्या लागतात. 'सत्यशोधक' होणे म्हणजे शुध्द ध्येयवादापासून विचलित होणे हा आहे. तो विचार बाजूला ठेवून जातीधर्मनिपरपेक्ष कर्मकांडापासून आणि पुराणमतवादी विचारापासून फुलेप्रणित ध्येयवाद स्वीकारणे हाच 'सार्वजनिक सत्यधर्म' आहे.[११] म.फुले यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून त्यांना आपल्या गुलामगिरीची जाणीव करुन दिली यामुळे हा बहुजन समाज आपल्यावर होणा-या अन्यायाविरुध्द पेटून उठला परंतु म.फुले यांच्यानंतर या समाजातील काहींनी आपल्या स्वार्थासाठी तडजोडीचे धोरण स्वीकारले त्यामुळे या बहुजन समाजाचे आजही आर्थिक शोषण होत आहे. आजही या बहुजन समाजावर पुरोहित वर्गाचे वर्चस्व निर्माण होवू पाहत आहे. याविरुध संघटितपणे प्रतिकार करणे गरजेचे आहे.  या अपेक्षांची पूर्ती आजचा सत्यशोधक समाज करू शकेल. समाज प्रबोधनाची फसलेली चळवळ पुन्हा लढाऊ आवेशाने उभी राहिली पाहिजे.

सत्यशोधक समाज मराठी भाषिक भागापुरताच मर्यादित राहिला आणि सध्या ज्याला महाराष्ट्र म्हणतात त्याच्या बाहेर तो पसरला नाही. इतर 'समाजा'च्या अखिल भारतीय स्वरुपाशी

तुलना करता त्याला एक 'प्रांतिक संघटनाच ' [१२] म्हणावी लागेल. खरे पाहता सत्यशोधक समाजाचा पाया मराठी भाषिक सामान्य जनसमुदायामध्ये असल्यामुळे, इतर भाषिकांमध्ये ही संघटना सहजपणे घुसू शकली नाही. तरीही तिचे संबंध व सहचळवळी इतरत्र होत्या. उदा. आर्यविरोधी एकजूट पुरस्कारणारी, 'द्रविड' विचारसरणीवर भर देणारी, निधर्मवादी आणि बुध्दिवादी विचारांची दिशा असलेली, त्याचप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या तिस-या दशकाच्या शेवटी, सत्यशोधक समाजाचा ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न लावण्याचा कार्यक्रम उचलून धरणारी मद्रासमधील रामस्वामी नायकर यांची 'स्वाभिमानी चळवळ'ही त्यातली सर्वात महत्त्वाची चळवळ होती.

विशेष गोष्ट म्हणजे, मुंबई व मद्रास प्रांतातील उच्चवर्णीय ब्राह्मणेत्तरांचा एकमेकांशी संबंध तयार झाल्यावर, काही काळानंतर हे सुरू झाले. या काळात सत्यशोधकांचे काही विचार पसरले असणार हे उघड आहे. जनसमुदायात व्यापक पाय पसरणा-या या जहाल चळवळीमध्ये अखिल भारतीय पातळीवर संबंध होते, हे दाखविण्याच्या दृष्टीने फारसे संशोधन झालेले दिसत नाही. परंतु ११सप्टेंबर १८९६ ला 'दीनबंधु' मद्रासहून एका हितचिंतकाकडून एक पत्र आले असून, त्याने त्यात सत्यशोधक समाजाच्या वाङ्.मयाचे तेलगू व तमिळ भाषांत भाषांतर करावे, अशी सूचना केलेली पाहावयास मिळते. काही झाले तरी हे खरे आहे की, तिस-या दशकाच्या शेवटी ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रे, मद्रासमधील 'स्वाभिमानी चळवळ'ही सत्यशोधक समाजासारखीच चळवळ आहे, अशी ग्वाही देऊ लागली आणि जरी संघटना महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहिली तरी ज्या विचाराभोवती ती उभी राहिली होती, तो विचार अखिल भारतीय पातळीवर वैशिष्टयपूर्ण ठरला होता.

### ३.४ महात्मा फुले यांचें कार्य

महात्मा जोतिराव फुले हे थोर विचारंवंत, महान समाजसुधारक, पददलितांचे आदय उध्दारक, समाज परिवर्तन चळवळीचे प्रवर्तक व स्त्री, दीन दलितांचे कैवारी होते. महात्मा फुले यांचे विविध क्षेत्रातील कार्य महान आहे. त्यांच्या क्रांतिकारी सुधारणा कार्याचा पाया मानवतावाद व समतेवर आधारलेला होता. त्यांनी विविध ग्रंथातून मांडलेल्या मौलिक विचारधनांचा सातत्याने अभ्यास करून वारंवार नवीन पिढीसमोर ठेवणे ही काळाची गरज आहे.

महात्मा फुलेंच्या समाजकार्य कक्षेत शेतकरी समाजाला फार महत्त्वाचे स्थान होते. म.जोतिराव फुले यांनी शेतक-यांचा प्रश्न केवळ आर्थिक दृष्टिकोनातून तपासला नाही. त्यांच्या हे

लक्षात आले होते की, शेतक-यांना जर स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर त्या प्रश्नाच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाजूही आपण तपासल्या पाहिजेत कारण तो वर्ग ब्राह्मणांनी सर्व बाजूंनी शोषिलेला आणि नाडलेला आहे. शेतक-याला जोपर्यंत आत्मस्थितीचे खरेखुरे ज्ञान होत नाही, आपण कोण आहोत हे जोपर्यंत त्यांच्या पूर्णपणे लक्षात येत नाही, तोपर्यंत त्यांचे शोषण चालूच राहणार आहे. म्हणून जोतिरावांनी शेतक-यांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला होता हे दिसून येते..

'शेतक-यांचा आसूड' हा जोतिरावांचा ग्रंथ अनेक दृष्टींनी अव्दितीय आहे. या ग्रंथात त्यांनी शेतक-यांच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटले आहे. शेतक-यांची पिळवणूक कशी होते, याचे सविस्तर विवेचन त्यांनी अत्यंत पोटतिडकिने केलेले आपणास पाहावयास मिळते. ते लिहितात की, "सरकारी गोरे अधिकारी हे बहुत करून ऐषआरामात गुंग असल्यामुळे त्यांना शेतक-यांच्या वास्तविक स्थितीबद्दल माहिती करुन घेण्यापुरती सवड नाही व या त्यांच्या गाफिलपणाने एकंदर सर्व सरकारी खात्यांत कामगारांचे प्राबल्य असते. या दोन्ही कारणामुळे शेतकरी लोक इतके लुटले जातात की त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाही."[१३] फक्त वर्णन करून थांबले नाहीत, तर शेतक-यांचे प्रश्न ब्रिटिश शासन दरबारी मांडले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सभेसमोर देखील त्यांनी शेतक-यांच्या प्रश्नांवर मागणी केलेली दिसून येते. शेतक-यांची चळवळ सुरू करणारे म.फुले हे पहिले नेते होते. शेतक-यांच्या दैन्याचे वर्णन करताना ते लिहितात -'उघडी नागडी रानोमाळ | पोरे फिरती सदा सर्वकाळ|'[१४] इंग्रजांच्या काळात शेतक-यांच्या दु:खाला सीमा नव्हती. त्यांची पिळवणूक सावकार व सरकार करत होते. सरकारी यंत्रणा शेतक-यांची अडवणूक करुन भ्रष्ट्राचार करत होते. शेतीसाठी काहीही सुविधा नव्हत्या, तेव्हा शेतक-यांचे दारिद्रय कमी करण्यासाठी, पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळून त्यांचे कर्जबाजारीपण कमी करण्यासाठी जोतिरावांनी गव्हर्नर जनरल साहेबांना लिहिले, "सर्व लहानमोठया सरकारी खात्यांतील अधिका-यांचे शंभर रुपयांचे वरील पगार व पेन्शन कमी करणे व जे शेतकरी आपल्या बायकामुलांसह रात्रंदिवस शेतात खपतात व ज्या शेतक-यांना दरमहा तीस रुपये ही पडत नाहीत, त्यांच्याकडे लक्ष दयावे."[१५] म.फुले यांनी वारंवार शेती प्रश्नांसंबंधी चितंन केलेले आढळून येते ते केवळ प्रश्नांचे विवेचन करून व शासनदरबारी प्रश्न मांडून थांबले नाहीत तर त्यांनी या प्रश्नांसंबंधी अनेक उपाय योजना सुध्दा सरकारला सुचविल्याचे दिसून येते. यावरुन शेती संबंधीची आधुनिक व क्रांतिकारी तत्त्वप्रणाली त्यांच्या विचारातून स्पष्ट

होते. जोतिराव प्रश्नांची उकल करतांना लिहितात की, "आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व शेतक-यांस युरोपियन शेतक-यांसारखे विद्याज्ञान देऊन त्यांस त्यांसारखी यंत्राव्दारे शेतीकामे करण्यापुरती समज येई पावेतो पशुहत्या बंद करावी म्हणजे येथील शूद्र शेतक-यां जवळ बैलांचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतांची मशागत भरपूर करता येईल. आमच्या उद्‌योगी सरकारने काळया - गो-या पोलिस खात्यांतील फालतू शिपायांकडून जागोजाग तालीवजा बंधारी अशा रितीने बांधावे की, वळणाचे पाणी एकंदर शेतातून मुरून नंतर नदीनाल्यात मिळावे, असे केल्याने शेते फार सुपिक होतील. एकंदर सर्व डोंगर टेकडयांमधील द-या खो-यात, तलाव-तळी जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावित. एकंदर सर्व शेते धुपून त्यामध्ये खोंगळया पडू नये म्हणून सरकारने शेतक-यां पासून पाणलोटांच्या बाजूने शेताच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात."[१६] म. जोतिरावांच्या विचारातून त्यांनी पाणी व मातीचे महत्त्व त्या काळात जाणून "पाणी अडवा पाणी जिरवा", पाणलोट क्षेत्र विकास व आज मृदसंधारण व कृषी अभियांत्रिकी करत असलेल्या कामासंबंधीचे महत्त्व त्याकाळी विशद केलेले पाहावयास मिळते.

आजच्या पशुविज्ञान व दुग्धशास्त्र शाखेमध्ये चालू असलेल्या संशोधनाबाबत तुलना करतांना, जोतिरावांनी त्या काळात मांडलेंले विचार किती आधुनिक व क्रांतिकारी होते, याची प्रचिती येते. म.फुले लिहितात की, "इतर देशांतील नाना प्रकारच्या उत्तम गाई, शेळया, मेंढरांची बेणी खरेदी करून या देशांत आणून त्यांची येथे अवलाद उत्पन्न केल्यास येथील एकंदर सर्व शेतांस त्यांच्या मलमूत्रांपासून झालेला महापूर पुरवठा होऊन शेते सुपिक होतील व त्याच्या लोकरीपासून क्षूद्र शेतक-यांस फायदा होईल."[१७] महात्मा फुले यांनी शेतक-यांच्या बचावाकरिता इ.स. १८८३ साली 'शेतक-यांचा आसूड' हे पुस्तक लिहून शेतीकडे पाहण्याचा नवा मार्ग प्रथम दाखविला. जोतिरावांना स्वतःच्या शेतीचा अनुभव असल्याने त्यांच्या शेतकरी भट्टीच्या मुशीतून ज्या तप्त स्वरूपात भाषा बाहेर पडली, ती भाषा अतिशय ज्वालाग्राही व मर्मग्रही होती. जोतिरावांनी पुरस्कार केलेल्या व अंगिकारलेल्या विविध शेती सुधारणा आज देशभरातील शेतीसंशोधनात कृषिशास्त्रज्ञांनी शंभर वर्षानंतर स्वीकारल्याचे आढळून येते.

सन १८७७ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. शेतकरी कुटुंबाची वाताहत झाली होती. शेतकरी कुटुंबांना मदत करण्यासाठी त्यांनी दुष्काळ विषयक कळकळीचे विनंती पत्रक काढले होते.

ते लिहितात की, "घरात दुष्काळपिडीत लोक आपली मुले सोडून जाऊ लागले आहेत, तर कित्येक अनाथ लोक आपली मुले बाळे घेऊन जमले आहेत. कधी-कधी दोन-दोन, तीन-तीन दिवसांचे उपवास काढून त्यांची हाडे मात्र उरली आहेत. शिवाय त्यांचे वस्त्रांवाचून इतके हाल होत आहेत की, त्यांचे इत्यंभूत वर्णन करण्यास मला दुःख वाटते."[१८] या विनंती पत्राव्दारे निवेदन करून त्यांनी मदतीचे आवाहन केले होते, केवळ पत्रकबाजी न करता म.फुल्यांनी "व्हिक्टोरिया बालाश्रम" स्थापन केले व मुलांचे संगोपन केले. यावरून फुले किती कृतिशील व सुधारक विचाराचे होते याची जाणीव काळजात खोलवर कोरली जाते.

### ३.४.१ महात्मा फुले यांची ध्येयदृष्टी

महात्मा जोतिराव फुले यांच्या मते ब्राह्मण लोकांनी हजारो वर्षापूर्वी शूद्रांना गुलाम केले. सुरूवातीच्या काळात माणूस अगदीच स्वतंत्र होता. निसर्गक्रमात तो हळूहळू स्थिर झाला. त्यांने कुटुंब, गाव आणि राज्य या संस्था स्थापन केल्या. समाजात श्रमविभागणी झाली. सुरुवातीच्या काळात ९६ कुळींची लोकसत्ताक राजवट सुरु झाली. पण हळूहळू हे सर्व लोकप्रतिनिधी राजे झाले. आर्यांनी शूद्रांचा पराभव करून त्यांचे राज्य हडप केले. याच इतिहासक्रमात त्यांनी वामनाच्या मदतीने कपट करून बळीराजाचे राज्य गिळंकृत केले. बळीराजा हा शेतक-यांचा राजा होता. त्याची आठवण अजून शेतक-यांना होते. म्हणून शेतक-यांच्या बायका दिवाळीच्या वेळी, "इडापिडा जाओ । बळीचे राज्य येवो ।",[१९] असा आशीर्वाद देतात. महात्मा फुले यांच्या मते बळीची परंपरा ही शेतक-यांच्या राज्याची लोकशाही परंपरा होती. भारतात ती गाडली गेलेली दिसून येते. पण युरोपात ती कायम राहिली. "सत्यधर्माचा प्रसार करणारा येशू ख्रिस्त हा बळीराजाच होता. ब्रूट्स, फ्रेंच क्रांतीतील शेतक-यांचा पुढारी लाफायते, थॉमस पेन, अमेरिकी राज्यक्रांतीचा नेता वॉशिंग्टन हे बळीचेच अनुयायी असल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या देशात लोकशाही राज्य आणले."[२०] येथे महात्मा फुले यांची ध्येयदृष्टी शासन व शोषण यांपासून मुक्त असे 'बळीचे राज्य' स्थापन करण्याची होती. त्यास कधी कधी ते 'निर्मिकाचे राज्य' असेही म्हणतात. 'निर्मिकाचे राज्य' तेंव्हाच स्थापन होईल जेव्हा सर्वांना न्यायाने व समानतेने वागणारी, सर्वधर्मसहिष्णुता व सर्वधर्मसमावेशक, विश्वकुटुंबात्मक अशी कष्टक-यांची आदर्श समाजरचना स्थापन करण्यात येईल. त्यात प्रत्येक जण भावा-बहिणी प्रमाणे (पती-पत्नीचे नाते वगळता) राहील. प्रत्येक जण वस्तुंचा श्रमाप्रमाणे उपभोग

घेईल. प्रत्येकजण सत्यधर्माप्रमाणे वागेल. या राज्यात शिपाई, पोलीस, न्यायाधीश व तुरुंग यांना फारसे स्थान असणार नाही.

जुने 'बळीचे राज्य' ब्राह्मणांच्या कपट कारस्थानामुळे नष्ट झाले. महाराष्ट्रातील शूद्र शेतकरी अनेक प्रकारच्या शोषणांनी जर्जर झालेला आहे. शेतक-यांना या शोषणापासून मुक्त केले तरच 'बळीचे राज्य' स्थापन करता येईल. फुल्यांची जी ध्येयदृष्टी आहे ती आपणास प्रत्यक्षात आणता येईल.

महात्मा फुले यांच्या मते शेतक-यांची परिस्थिती मोठी वाईट आहे. कारण त्यांचे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक शोषण होत आहे. सावकारशाही, नोकरशाही व साम्राज्यशाही या तीन जळवा त्यांचे आर्थिक शोषण करीत आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या पुस्तकांतून -विशेषतः 'गुलामगिरी', 'शेतक-याचा आसूड' या पुस्तकातून शोषणाचे हे विविध प्रकार त्यांनी सविस्तर वर्णन केले आहेत.

### ३.४.२ शेतक-यांचे धार्मिक शोषण

'शेतक-याचा आसूड' आणि 'ब्राह्मणाचे कसब' या दोन्ही पुस्तकांत जोतीरावांनी ब्राह्मण शेतक-यांचे धार्मिक शोषण कसे करतात, याचे मोठे मार्मिक विवेचन केलेले पाहावयास मिळते. मुळात शेतकरी हा धार्मिक वृत्तीचा, त्याच्या धार्मिक वृत्तीत अंधश्रध्दा दडलेली. या अंधश्रध्देचा व देवभोळेपणाचा उपयोग करून ब्राह्मणांनी त्यांच्यामागे वेगवेगळया व्रतांचे व विधीचे शुक्लकाष्ठ लावून दिले आहे . या सर्व व्रतांचा आणि विधींचा मुख्य उद्देश म्हणजे गरीब शूद्रांकडून दक्षिणा लुबाडून घेणे हा आहे. रोख दक्षिणा, धान्य, सुपारी, बदाम, कपडे इत्यादी अनेक बाबी शूद्र शेतक-यां कडून धर्माच्या नावाने ब्राह्मण लुबाडतात. ब्राह्मण खास विधी करून व सणांच्या मुहूर्तावर शेतक-यास सातत्याने लुबाडतात.

ब्राह्मण शेतक-याच्या घरात मूल जन्मास आले की, त्याच्या घरी जाऊन त्यास खोटेनाटे सांगून त्याच्याकडून पैसे उकळतात. त्याच्या मुलास ग्रहपीडा आहे असे सांगतात. मग शेतकरी म्हणतो, "ग्रह धाक पीडा म्हणे कर्ज काढू । भांडी कुंडी मोडी । सुखासाठी ॥"[२१] येथे गावातील पुरोहित वर्ग शेतक-यांच्या अडाणीपणाचा फायदा घेवून त्यांना लूबाडतात या त्रासापासून सूटका करावयाची असेल तर त्यासाठी त्यांना वेगवेगळया पूजा करण्याचा सल्ला देतात. हा अडाणी शेतकरी

स्वतः जवळ पैसे नसल्यामुळे कर्ज काढतो वेळप्रसंगी घरातील भांडी मोडावयासही हा शेतकरी तयार असतो. इतका विश्वास शेतकरी पुरोहितांवर ठेवतो. एकदा शेतकरी कर्जामध्ये गुंतला की त्याची परत त्यातून परत सुटका होत नाही. त्यातच तो पुर्णतः गुरफटला जातो. ही परिस्थिती शेतक-यांसमोर मांडण्याचा म.फुले प्रयत्न करतात.

भिक्षुकाचे त्या वेळचे मासिक उत्पन्न सुमारे वीस रुपये होते. त्यांना धान्य व इतर गोष्टी मिळत होत्या. त्या काळातील शेतक-यांचे आणि छोटया नोकरदारांचे उत्पन्न पाहता हा पैसा कमी नव्हता. जोतिरावांच्या मते ब्राह्मण यावेळी दोन गुन्हे करीत होते. पहिला गुन्हा म्हणजे धर्माचा खोटा अर्थ लावून लोकांची दिशाभूल करून ते भोळया शेतक-यास फसवून लुटीत असे. दुसरा गुन्हा म्हणजे ते कोणत्याही प्रकारचे श्रम न करता, कष्ट न करता, धर्माच्या नावावर पक्वांन्नाचे जेवण खात होते. शेतक-यांचे हे धार्मिक शोषण ब्राह्मण करतात. त्याला कारण ब्राह्मणांचे कपट आणि शूद्र शेतक-यांचा भोळेपणा हे होते. त्यामुळे जोतिरावांनी ब्राह्मणी धर्मावर अत्यंत कठोर शब्दात टीका केलेली दिसून येते. भटांची भरती करणारे सत्यनारायण पूजेसारखे प्रकार शेतक-यांनी करू नयेत असे त्यांचे सांगणे होते.

### ३.४.३ सांस्कृतिक शोषण

धार्मिक शोषणापासूनच शेतक-यांचे सांस्कृतिक शोषण झाल्याचे पाहावायास मिळते. कारण त्यांचे धार्मिक शोषण त्यांच्या अज्ञानामुळे होते. म्हणून त्यांनी आत्मस्थिती ओळखावी, आपले अधिकार ओळखावे. कारण मानवी अधिकार सर्वांना निसर्गतःच मिळालेले आहेत. त्यांचा उपभोग घ्यावा. शूद्राच्या गुलामगिरीचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे अज्ञान विदयाबंदीमुळे शूद्र अज्ञानी राहिले. आपल्या 'शेतक-याचा आसूड' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत फुले लिहितात, "विदयेविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविदयेने केले."[२२] या अविदयेने ब्राह्मणांचे सांस्कृतिक वर्चस्व तयार झालेले पाहावयास मिळते. शेतक-यांची सांस्कृतिक गुलामगिरीतून सुटका करावयाची असेल तर, त्यांना आधुनिक शिक्षण दिले पाहिजे आणि बळीस्थानाचा खरा इतिहास समजावून सांगितला पाहिजे असे म.फुले यांचे मत होते. शेतक-यांनी शहाणे व्हावे, शिकावे आणि सत्यधर्माचे तत्त्वज्ञान आचरणात आणावे असे जोतिरावांचे सांगणे होते.

### ३.४.४ सावकारांनी केलेले शोषण

महात्मा जोतीराव फुले यांच्या मते "शेतक-यांचे शोषण करण्यास सावकार आघाडीवर आहेत. कारण इंग्रजांच्या राजवटीत सावकारांच्या पाठीमागे त्याची न्यायालये आणि राजसत्ता उभी राहिली. हे सावकार मुख्यतः ब्राह्मण, मारवाडी आणि गुजर या जातीतील होते. इंग्रजांच्या राजवटीत शेतसारा देण्यासाठी, इतर खर्च भागविण्यासाठी शेतक-यांना कर्ज काढावीच लागत असे. त्यामुळे सर्व शेतकरी वर्ग अट्टल कर्जबाजारी झाला होता. इंग्रजी राजवटीत नव्या कायदेकानूनमुळे दलाल, कमिशन एजंट आणि व्यापारी तयार झाले त्यांची दुकाने होती. ते सावकारी करत होते. औदयोगिक मालाची विक्री करण्यासाठी आणि कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठी नव्या बाजारपेठा तयार झालेल्या दिसून येतात. या खरेदी विक्रीच्या व्यवहारात दलाली करणारे मध्यस्थ तयार झाले. ते सावकारीही करत होते."[२३] म.फुले येथे इंग्रज राजवटीतील शेतक-यांच्या परिस्थितीचे वर्णन करतात. ब्रिटिशांची जमीन महसुल वसूली पध्दत अतिशय काटेकोरपणे होती. दुष्काळ, रोगराई, अवर्षण, इ.संकटांमुळे शेतक-यांना उत्पादन मिळाले नाही तरी महसुल वसूलीमध्ये कुठल्याही प्रकारची सुट दिली जात नव्हती. त्यामुळे शेतसारा भरण्यासाठी शेतकरी सावकारांकडून कर्ज घेत असे शेतकरी अडाणी असल्यामुळे सावकार कर्जाची रक्कम दुप्पट वाढवून लावत असे जेंव्हा शेतकरी कर्जाची रक्कम देण्यासाठी जात असे त्यावेळी अधिक पटीने दिलेली रक्कम सावकार शेतक-यांकडून वसूल करत. यावेळी सावकरांच्या पाठीशी ब्रिटिश अधिकारी तसेच त्यांची न्यायालये असत. त्यामुळे शेतकरी ब्रिटिश शासन काळात पूर्णतः लूटला गेला होता. हा अन्याय शेतकरी सहन करत होता ही वस्तूस्थिती म.फुले स्पष्ट करतात.

शूद्र शेतक-यांच्या अज्ञानाचा व देवभोळेपणाचा फायदा घेऊन हे सावकार शेत जमिनीवरचा माल व्याजापोटी हडप करीत होते. पुढे त्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन दामदुपटीने व्याज गहाणवट केलेल्या जमिनीवर ते आपला कब्जा बसवित. त्याच जमिनीवर मूळ मालकास कूळ म्हणून राबबित. सावकारांनी शेतक-यांच्या केलेल्या शोषणाची चर्चा प्रकरण २ मध्ये 'सावकारांनी केलेले शोषण' या शिर्षकाखाली विस्ताराने केलेली असल्या कारणाने प्रस्तुत ठिकाणी त्याची पुनर्रावृत्ती करणे टाळलेले आहे.

### ३.४.५ नोकरशाही कडून शेतक-यांची पिळवणूक

"त्या काळात भारतात दोन प्रकारची नोकरशाही होती. एक युरोपीय नोकरशाही आणि दुसरी एतद्देशीय नोकरशाही. महात्मा फुले यांच्या मते इंग्रज अधिकारी लठ्ठ पगार घेऊन ऐषआरामात राहतात. आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे भट कामगारांचे फावते. ते शूद्रांच्या अज्ञानाचा आणि अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडतात. लाच खातात, आपल्या जातभाईस मदत करतात."[२४] इंग्रजी राजवटीत खालच्या पातळीवरच्या व मध्यम दर्जाच्या सर्व नोक-या ब्राह्मणांना मिळालेल्या होत्या. न्यायाधीश, मामलेदार, शिरस्तेदार, बेलिफ, इंजिनियर, शिक्षक, शिक्षणाधिकारी, फौजदार या जागा ब्राह्मणांनी बळकावलेल्या होत्या. नोकरीतील ब्राह्मणांच्या मक्तेदारीमुळे ब्राह्मणांचा शूद्र शेतक-यांवरील अन्याय वाढलेला दिसून येतो.

### ३.४.६ साम्राज्यशाहीची पिळवणूक

सरकारी धोरणे शेतक-यांच्या विरोधी आहेत. म्हणून 'शेतक-यांचा आसूड' लिहित असताना म.फुले यांची भाषा तिखट बनलेली दिसून येते.

"जोतिरावांच्या मते शेतक-यांवरील सारा दर तीस वर्षांनी शेतीमध्ये कोणतीही सुधारणा न करता वाढविण्याचे सरकारचे धोरण अन्यायकारक आहे. कारण केवळ शेतसारा देण्यासाठी त्यास कर्ज काढावे लागते. सरकारने आपल्या अधिका-यांना मोठमोठे पगार व पेन्शनी देण्यासाठी शेतसा-याचे दर वाढविलेले दिसून येते. गरीब शेतक-यांच्या गाडग्या मडक्यातून हा सारा वसूल केला. रात्रंदिवस शेतीत खपणा-या शेतक-यावर हा सारा कमी होता की काय म्हणून लोकल फंड नावाचा नवा कर त्यांच्यावर लादलेला दिसून येतो. त्याशिवाय आपले धान्य व माळव विकण्यास शेतकरी जात असताना दर सहा मैलावर जकातीचे नाके बसवून त्यांनी जकात वसूल करावयास सुरूवात केली. त्याचप्रमाणे सरकारने अकारण मिठावरही कर लादलेले दिसून येते. बाजारातील दगेबाज दलाल, मुन्सिपार्टीचे लुटारू जकात अधिकारी यांच्यापासून त्या शेतक-यांची काही सुटका होत नाही हे आपल्याला पहावयास मिळते."[२५]

ब्रिटिश सरकारने महालवारी महसुल व्यवस्थेमध्ये दर तीस वर्षाने बदल करण्याचा अधिकार स्थानिक कलेक्टर व तहसिलदारांना दिला होता. एकदा गावचा महसुल निश्चित झाला की मग तो सतत तीस वर्ष शेतक-यांनी भरत राहणे हा शेतक-यांवरील खूप मोठा अन्याय होता. शेतात पिके

आली अथवा नाही आली तरी त्याने कर्ज काढून हा सारा भरणे गरजेचे होते. शिवाय पिकवलेले धान्य बाजारामध्ये पाठविण्यासाठी शेतक-यांना जकात कर ही भरावा लागत असे. त्याशिवाय बाजारातील दलाल, लूटारू, हे ही शेतक-यांना लूबाडत असत. म्हणजे शेतक-यांना सर्व बाजूने लूटले जात असे शेतक-यांनी जमिनीमध्ये घेतलेल्या पिकांचा खर्चही वसूल होत नाही. ही वस्तूस्थिती म.फुले येथे मांडतांना दिसतात.

सरकारने जंगल खाते निर्माण करुन जंगलाच्या सर्व जमिनी आपल्या घशात घातल्या विपत्तीच्या काळात शेतकरी आणि त्याची जनावरे जंगलांच्या संपत्तीची जपणूक करून कसाबसा जंगलाच्या आधारावर दिवस काढीत असे. पण आता तेही शक्य झालेले नाही. गायरान जमिनी सरकारच्या घशात गेल्यामुळे शेतक-याचे नुकसान झाले त्याचे उत्पन्न घटले. फुल्यांचा ब्रिटिशांच्या जंगल खात्यावर फार रोष होता हे दिसून येते.

### ३.४.७ म.फुलेंनी सुचविलेल्या शेतिविषयक उपाययोजना

शेतीच्या बाबतीत जोतिरावांनी खालील सुधारणा करण्यात याव्यात, असे सुचविले आहे.

१. शेतीची योग्य प्रकारे मशागत करता यावी म्हणून चांगल्या जातीच्या गायी-बैलांची पैदास करण्यात यावी. त्यासाठी सरकारने परदेशातून चांगल्या गाईचे बेणे आणावेत. गाई न मारण्याचा कायदा करावा.

२. डोंगर टेकडयांवरील गवत, पालापाचोळा, मेलेले कीटक व श्वापद यांच्या हाडामासांचे सत्व, पानाफुलांचे कुजलेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजाग तालीवजा बंधारे बांधावेत. त्यामुळे वळवाचे पाणी एकंदरीत शेतात मुरून नदी नाल्यास मिळेल असे केल्याने शेते सुपिक होतील.

३. हे काम लष्करातील काळ्या-गो-या शिपायांकडून करून घ्यावे. त्याचप्रमाणे पोलीस व शिपायांकडून डोंगर टेकडयांमधील द-याखो-यांनी तलाव, तळी जितकी होतील तितकी सोयी-सोयीने बांधून काढावी. म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढयाखोडयांनी भर उन्हाळयात पाणी असल्यामुळे जागोजागी धरणे होतील. विहीरींना पाणी मिळेल आणि बागायती शेती वाढेल.

४. शेते धुपून त्यात खोंगळया पडू नयेत म्हणून शेतक-यांनी पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात.

५. ज्या ठिकाणी झरे सापडतील त्या ठिकाणी गावाच्या नकाशात नमूद करून विहिरी पाडाव्यात. या विहिरी स्वतः बांधणारास लहानमोठी बक्षिसे देण्याची व्यवस्था सरकारने करावी.

६. एकंदर सर्व नदीनाले व तलावातील साचलेला गाळ पूर्वीप्रमाणेच शेतक-यास फुकट नेऊ दयावा.

७. गावराने फॉरेस्ट खात्यास सामील केली असतील तर ती शेतक-यास वापस दयावीत. इमारतीसाठी जंगलातील लाकडे तोडू देऊ नयेत. पण इतर लाकूडफाटा तोडण्याची मुभा असावी.

८. उत्तम शेळयामेंढयाची पैदास वाढविण्यासाठी परदेशातून त्यांची बेणी आणावी.

९. शेतक-यांचा व त्याच्या पिकांचा जंगली जनावरांपासून बचाव करण्यासाठी गावठी तोडयाच्या बंदुका शेतक-यास दयाव्यात. शेतक-यांची पिके जर जनावरांनी खाल्ली वा त्यांची नासाडी केली तर सरकारने त्याची नुकसानभरपाई पोलीस खात्यातील वरिष्ठ अंमलदारांचे पगार कापून करावी.

१०. साल दरसाल श्रावण मासी प्रदर्शने करून अश्विन मासी शेतपिकांच्या व औत हाकण्याच्या परीक्षा घेऊन शेतक-यास बक्षिसे दयावी त्यांना पदव्या दयाव्या.

११. शेतक-याच्या मुलास लोहारी, सुतारी कामाचे शिक्षण दयावे त्यांना विलायतेतील शेतीशाळा पाहण्यास पाठवावे. तेथील सुधारणा बघून ते आपल्याकडेही त्याच प्रकारच्या सुधारणा करू शकतील.

१२. शंभर रुपये पगाराच्या वरील सर्व अंमलदारांचे पगार कमी करावेत. त्यांच्या पेन्शनी कमी कराव्यात. मात्र शेतमजूर, कारागीर, लोहार, सुतार, बिगारी, डोलीवाले यांचे पगार कमी करु नयेत.

१३. शेतक-यांच्या मुलास पुस्तके, पाटया व पेन्सिली पुरवाव्यात. तसेच शेतक-यास शेती सुधारण्यासाठी शेतीसंबंधीचे सर्व ज्ञान देऊन त्यांसबंधी ग्रंथ उपलब्ध करावे.

१४. शेतकी शाळा स्थापन कराव्या. म.फुले यांचे असे मत होते की, सरकारने शेतक-यांसाठी आणि शेतीसाठी या सुधारणा अमलात आणल्याखेरीज शेतक-यांची परिस्थिती सुधारणार नाही."[२६]

म.फुले यांनी शेतक-यांचा आसूड मध्ये अशा प्रकारे अनेक मुलग्रामी विचार मांडलेले दिसून येतात. शेतक-यांची उन्नतीची चळवळ वर सांगितलेल्या कार्यक्रमाच्या आधारावर बांधली जावी असे त्यांचे मत असल्याचे दिसून येते. त्यांचे अंतिम ध्येय बळीच्या राज्याची स्थापना करणे हे होते. त्यांच्यामते बळीचे राज्य हे शेतक-यांचे राज्य होते. आज शेतकरी ख-या अर्थाने धर्म, संस्कृती, नोकरशाही, सरकार यांच्या जुलमातून मुक्त झाला आहे असे म्हणता येणार नाही. अजूनही आपणास बारा वर्षाच्या खालील सर्व स्त्री पुरुषांना मोफत सक्तीचे शिक्षण देता आले नाही. शेकडा साठ टक्क्यांपेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. शाळेत मोठया प्रमाणात गळतीचे प्रमाण दिसून येते. दिले जाणारे शिक्षण हे निकृष्ट आहे. म्हणून शेतक-यांच्या शिक्षणा विषयीचे जोतिरावांचे विचार आजही महत्त्वाचे वाटतात.

### ३.५ कृष्णराव भालेकर यांचे कार्य

एकोणिसाव्या शतकात शेतकरी व त्याचे जीवन याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणारे फारच थोडे समाजसुधारक, विचारवंत व लेखक होवून गेलेले दिसतात. त्यापैकी एक म्हणून कै.कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. भालेकरांचा जन्म इ.स. १८५० मध्ये पुण्याजवळील भांबुर्डे (सध्याचे शिवाजीनगर)या गावी झाला. भालेकर ज्या मुनरवार(फुलमाळी) जातीत जन्माला आले होते, त्या जातीचा मुळ व्यवसाय शेती करणे हा होता. शेतीमध्ये अहोरात्र राबणारा शेतकरी स्वास्थ व सुखाला पारखा झालेला आहे, हे भालेकरांनी लहानपणीच ओळखले होते.

शेतीमध्ये काबाड कष्ट करूनही सुखाची खात्री नसल्याने भालेकरांच्या वडिलांनी स्वतःच्या मळयात राबायचे सोडून कोर्टात नोकरी पत्करली होती. हे ही भालेकरांच्या लक्षात आल्याचे दिसून येते. नेमके याच वेळी भालेकर जंगली महाराजांच्या सहवासात आले आणि धर्म, ईश्वर आदी बाबींसंबधी त्यांचे घोटाळलेले मन खुले झाले. एवढेच नाही तर "शेतकरी लोक अज्ञानामुळे बहकले आहेत व त्यांच्या बहकण्यावर ब्राह्मण लोकांच्या निर्वाहाचे तारू चालले आहे."[२७] अशी त्यांची खात्री झाल्याचे दिसून येते तत्कालीन समाजामध्ये खरे काय, खोटे काय, कोणकोणाला फसवित आहे, कोण कसा फसला जात आहे, हे भालेकरांनी प्रत्यक्ष पाहिले व जो शेतकरी -कष्टकरी वर्ग फसला जात आहे, ज्याचे शोषण होत आहे. त्याच्यासाठी आपण काही करायला हवे, अशी

समाजसुधारणाविषयक क्रांतिकारी विचारांची बीज भालेकरांच्या मनात त्यावेळी अंकुरु लागलेले दिसून येते.

समाजातील अज्ञानीजनांचे शेतक-यांचे अज्ञान नष्ट करणे, त्याचे दारिद्रय हटविणे व दुःख नाहीसे करणे यासाठी त्यांना शिक्षण देणे हा एक उपाय आहे, असे भालेकरांना समाज सुधारणेच्या कार्यारंभापासून वाटत होते. अज्ञानीजनांप्रमाणे त्यांची मुलेही शिकली पाहिजेत. त्यांना विदया मिळाली पाहिजे, असे भालेकरांना मनोमन वाटत होते. म्हणूनच लहानमोठया खेडयातील पाटील, देशमुख, इनामदार वगैरे कित्येक लोकास आणि व्यापार व नोकरीच्या निमित्ताने फिरण्यात दिवस काढणारास अनेक अडचणीमुळे आपल्या मुलास शिक्षण देता येत नाही. त्यांच्या मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून भालेकरांनी "सुशिक्षण गृह"इ.स. १८८४ मध्ये पुण्यातील कसबा पेठेत सुरू केलेले होते. या "सुशिक्षण गृहा"मध्ये विदयार्थ्यांच्या भोजनाची व राहण्याची सोय केलेली होती. विदयार्थ्यांनी या "सुशिक्षण गृहा"मध्ये रहावे, खावे व पुण्यातील शाळांमधून शिकावे असे भालेकरांना वाटत होते. "शहाणे करावे जन "या हेतूने भालेकरांनी सुरु केलेल्या या "सुशिक्षण गृहा"स त्याकाळी चांगला प्रतिसाद मिळालेला दिसून येतो. "सुशिक्षण गृहा"च्या बरोबरीनेच भालेकरांनी मागासलेल्या व अशिक्षित वर्गाच्या हितासाठी झगडणारी "दीनबंधू सार्वजनिक सभा" इ.स.१८८४ मध्येच स्थापन केलेली होती. "दीनबंधू सार्वजनिक सभा"ने हिंदुस्थानातील लोकांमध्ये दुर्व्यसनांचा झालेला फैलाव नाहीसा करणे व परदेशी वस्तुंच्या वापरामुळे उपाशी मरत असलेल्या कारागिरांना स्वदेशी जिन्नस वापरावेत म्हणून प्रसार करणे." [२८] भारतीय लोकांना स्वदेशी वस्तूंच्या किंमतीपेक्षा परदेशी वस्तू भारतात जकात मुक्त असल्याने स्वस्त मिळत असे परंतु हा परदेशी वस्तूंचा पैसा ब्रिटिश लोक आपल्या मायदेशी पाठवत असे त्यामुळे हा भारतींयांचा पैसा इंग्लंडमध्ये वापरला जातो. त्या पैशाचा भारतीयांना काहीही फायदा होत नाही. त्यासाठी भारतीय लोकांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करावा. कारण परदेशी मालाच्या वापरामुळे स्वदेशी माल तसाच पडून राहतो. यामुळे कुटीरोदयोग नाहिसे होत आहेत. यातून स्वदेशी वस्तू बनवणा-या व्यावसायिकांवर उपासमारिची वेळ आली आहे. जर भारतीयांनी स्वदेशी वस्तूचा वापर केला तर त्यातून मिळणा-या पैशातून अनेक कुटुंबांची उपजिवीका चालू शकेल. यासाठी कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधू सार्वजनिक सभे' मार्फत जनजागृती केल्याचे दिसून येते.

"दीनबंधू सार्वजनिक सभा"ने सुरू केलेल्या या कार्यामुळे पुष्कळ ब्राह्मणेत्तर लोकांमध्ये जागृती झालेली होती व लोक आपापली मुले शाळेत पाठवू लागलेले होते. "[२९] शेतकरी व कारागीर यांच्या मुलांना फुकट व सक्तीचे शिक्षण मिळावे म्हणून एक लाख सहयांचा अर्ज पार्लमेंटला पाठविण्याचे ठरले. भालेकरांनी "दीनबंधु सार्वजनिक सभा"च्या मार्फत एक लाख सहया गोळा केल्या व तसा ठराव पास करून तो पार्लमेंन्टक्डे पाठवूनही दिला. समाजसुधारणेसंबंधीचे आपल्या मनातील विचार कृतीत आणण्यासाठी भालेकर किती क्रियाशील होते ते यावरून स्पष्ट होते.

शिक्षण हे समाज परिवर्तन प्रक्रियेचे एक प्रधान अंग आहे. स्त्री शूद्र व शेतक-यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यास उपयुक्त ठरणारे ते एक महत्त्वाचे साधन आहे हा विचार भालेकरांना मनोमन पटल्याचे दिसून येते. म्हणूनच त्यांनी इ.स.१८८९ मध्ये "दीनबंधू फ्री स्कूल"पुण्यातील शुक्रवार पेठेत सुरू केले होते."[३०] इ.स.१८९० मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानच्या सफरीस आले होते, तेव्हा पुणेकरांनी त्यांचे फारच उत्तम स्वागत केल्याचे दिसून येते. प्राप्त झालेल्या संधीचा पुरेपूर फायदा उठविण्याचे व आपल्या देशातील जनतेचे विदयाहीनत्व योग्य त्या व्यक्तीसमोर व्यक्त करण्याचे भालेकरांचे कौशल्य याही ठिकाणी प्रत्ययास येते.

अज्ञानी, अशिक्षित शेतक-यांना त्यांच्या -हदयविदारक पण सत्य स्थितीचे दर्शन घडविण्यासाठी भालेकरांनी काही चित्रे काढून घेतली व प्रकाशित केली, असे दिसते. चित्रे काढून घ्यायची व त्याच्या प्रती मोफत वाटून शेतक-यांवर होणा-या अन्यायाला, जुलमाला वाचा फोडायची हा विचारच मुळी नवलपूर्ण असल्याचे दिसून येते. शेतक-यांवर जुलूम करणा-या सरकारच्या जूलमी वृत्तीवर प्रकाश टाकण्यासाठी 'राघू गाडीवानाच्या चित्रा'ची एक मालिकाच भालेकरांनी प्रसिध्द केलेली दिसते. "पहिला गाडीवान, चित्रात गाडीतून धान्य घेऊन जाणारा राघू गाडीवान दुस-या चित्रात वजनामुळे खाली बसलेला बैल व बैलाला उठविणारे इंग्रज शिपाई, चौथ्या चित्रात गाडीचा प्रवास सुरू झाल्याचे, पाचव्या चित्रात गाडी पकडणारे व राघूला मारणारे शिपाई, सहाव्या चित्रात गाडीसमोर रडत असलेला राघू, सातव्या चित्रात इंग्रज अधिका-यांचे सामान वाहून नेणारी गाडी व आठव्या चित्रात गाडी चालविणा-या राघूला मारणारे इंग्रज शिपाई दाखविलेले आहे. या सर्व चित्रांतून खरे तर चित्रपटातून राघू गाडीवानावर शेतक-यावर कशा आपत्ती कोसळत व त्याच्यावर कसा अन्याय होई याचे -हदयद्रावक दर्शन घडविलेले आहे."[३१] इंग्रज अधिका-यांचे शिपाई गाडीवानावर

शेतक-यांवर व त्यांच्या बैलांवर कशी दंडुकेशाही चालवित हे या चित्रांतून उत्कृष्टपणे दाखविलेले आहे. "व्याजाचा उंट", "शेतक-याचा देखावा", "गावगाडा" ही अशीच आणखी काही दर्दभरी चित्रे प्रकाशित करून भालेकरांनी शेतक-यांचे करूण, दु:खपूर्ण जीवन साकार केलेले आहे.

शेतकरी सुधारणेसाठी विचार, उच्चार आणि आचार या त्रिसूत्रीचा भालेकरांनी अविरत अंगिकार केलेला दिसून येतो. तसेच अज्ञानाने ग्रासलेले शेतकरी, कामगार, मजूर, कारांगिरांदींचा इंग्रज अधिकारी कसा छळ करत होते आणि हा छळ शेतकरी कामगार निमूटपणे सहन करत हे स्पष्ट करून प्राप्त परिस्थितीत शेतक-यांचे करता येईल तेवढे हित करण्याचा प्रयत्न भालेकरांनी अव्याहतपणे केला असे दिसते.

"शेतक-यांच्या दु:खपूर्ण जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी भालेकरांनी चित्रे तर काढून घेतलीच पण शेतक-याचा बावीस फूट उंचीचा एक पुतळाही उभारला होता. हा पुतळा भालेकरांनी इ.स.१८९५ मध्ये पुण्यास भरलेल्या"राष्ट्रीय सभे"पुढे उभारला होता."[३२] या शेतक-याच्या हातात मोठा बोर्ड देऊन त्यावर "आमच्या एकोणीस कोटी लोकातून आमची दु:खे व्यक्त करणारे एकोणीस तरी प्रतिनिधी या सभेत आहेत काय ?" असे वाक्य लिहिलेले होते. दरिद्री शेतक-याचे प्रतिनिधीत्व करणारे "राष्ट्रीय सभे"त कोणीच नाही, म्हणून "राष्ट्रीय सभे"स येणा-या सर्वांचेच लक्ष उभारलेल्या या शेतक-यांच्या पुतळ्याकडे खेचून घ्यायचे व शेतक-यांच्या दीन, दरिद्री स्थिती विषयी लोकांच्या मनात विचाराचे वादळ उठवायचे हा विचार भालेकरांच्या मनात हा पुतळा उभारण्यामागे असावा, असे वाटते."[३३] आपल्या मनातील विचारांना व कल्पनांना साकार करण्याची व काही योजना कृतीत आणण्याची भालेकरांची धडपड सदैव चालू होती असे दिसते. पण काही योजना मनामध्ये असूनही त्या कृतीत आणणे भालेकरांना शक्य झाले नाही. "शेतातील विहिरीतून मोटेने पाणी काढण्यासाठी शेतक-यांना खूप कष्ट पडतात. म्हणून त्यांनी विहिरीतून पाणी उपसण्याचे यंत्र तयार करण्याचा प्रयत्न केला होता. पाणी उपसण्याच्या यंत्राचे त्यांनी नकाशे, आराखडे तयार केले होते."[३४] भालेकरांच्या मनामध्ये शेतक-यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा घडवण्यासाठी वेगवेगळे प्रयोगशिल विचार घोळत असल्याचे दिसून येते. "शेतक-यांना आपले शेत नांगरताना कमी कष्ट पडावेत व शेतही चांगले नांगरले जावे, म्हणून भालेकरांनी नांगराच्या फाळाची कल्पना मांडली होती."[३५] एवढेच नाही तर नेहमी पायी प्रवास करणा-यास शेतक-याचे कष्ट वाचावेत म्हणून दुचाकी तयार करण्याचे साहित्य

खरेदी करण्यासाठी भालेकरांनी आपल्या बोटातील अंगठीही मोडली होती. "शेतक-यांची आर्थिक, शैक्षणिक प्रगती होऊन त्यांची दैन्यावस्था नष्ट व्हावी म्हणून सहकार तत्त्वावर आधारलेली शेतक-यांची एक सूत गिरणी असावी असा त्यांनी विचारही मांडलेला होता."[३६] शेतक-यांचा कैवार घेऊन त्यांचे जीवन सुसहय करण्याच्या मनोभूमिकेतूनच वरील सर्व बाबी कृतीत आणण्याची भालेकरांनी धडपड केली होती, असे यावरुन दिसून येते.

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा विचार भालेकरांच्या जणू रक्तातच भिनला होता. शेतकरी व कामकरी यांचे जीवन, त्यांच्या जीवनातील रुढी, परंपरा, शिक्षण, अर्थ आदि बाबींचा भालेकरांनी बारकाईने विचार केला व त्यासंबंधीचे विचार त्यांनी भाषणाव्दारे व्यक्त केल्याचे दिसून येते. भालेकरांच्या अंगी उत्तम प्रकारची वत्क्तृत्व कला होती. "ते बोलू लागले म्हणजे विषयाला धरून बोलत असत, त्यांचे भाषण अर्धा तास पाऊण तास चालू असले तरी श्रोते कंटाळत नसत."[३७] शेतक-यांची दु:स्थिती सुधारण्यासबंधीचे अनेक मौलिक विचार त्यांनी "कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी " या कंपनीसंबंधी केलेल्या भाषणातून व्यक्त केलेले आहेत. आपल्या देशामध्ये सहकाराचा श्रीगणेशा इ.स.१९०४ मध्ये भारतीय सहकारी कायदयान्वये झालेला आहे. त्यापूर्वी भालेकरांनी शेतकरी व्यापार व उदयोगधंदयात पडल्याशिवाय आर्थिक दृष्टया तो सबळ होणार नाही हे ओळखले व इ.स. १९०२ मध्ये करजगाव येथे शेतक-यांची औद्योगिक कंपनी काढण्याचा धाडसी प्रयत्न केला. एकोणिसाव्या शतकातील "शेतकरी चळवळी" चे स्वरुप लक्षात घेता भालेकरांचा हा प्रयत्न ठोस स्वरुपाचा वाटतो.

शेतक-यांच्या भविष्यकालीन दयनीय अवस्थेचे चित्रण करतांना भालेकर याच भाषणात म्हणतात की, "एकदोन पिढयांनंतर शेतकरी लोक इतके खालावले जातील की, ते आपल्या वतीन गावास म्हणजेच वतनी जमिनीस अजिबात मुकून भटकू लागतील. इतर धंदयाचे ज्ञान नाही, सहवास नाही, वळण नाही आणि त्यासंबंधाने चौकसपणाने कधी विचारही केला नाही. अशा शेतक-यांवर इतर उदयोग करुन पोटे भरण्याचा प्रसंग एकाएकी गुदरल्यावर त्यांच्या हालअपेष्टास काय पहावयाचे !"[३८] त्यावर उपाय सुचविताना भालेकर स्पष्टपणे म्हणतात की, "विदया आणि उदयोग हेच एक मिक्चर (मिरण) काय ते उत्तम होय." उदयोगधंदा करुन शेतक-यांनी आपले दारिद्रय दूर करावे, या व्यापक हेतूनेच त्यांनी कंपनी स्थापन करण्याचा विचार मांडलेला दिसून येतो. याशिवाय

भालेकरांनी "ब्राह्मणांकडून आपले धर्मसंबंधी विधी न करता ते आपले आपणच करावेत ब्राह्मणेत्तर लोकांनी आपल्या मुलास सुशिक्षित करावे, आपल्या लोकात मदयपानाचे व्यसन बिलकूल असू नये, आपण जमीन, घर यासंबंधी एकमेकात भांडून आपल्या द्रव्याने वकील, बॅरिस्टरांची घरे ठेचून भरून आपण भिकेस लागू नये"[३९] इ. विषयावर भाषणे दिल्याचे दिसते. ब्राह्मणेत्तर बहुजन समाजाने ब्राह्मणांच्या नादी लागून वेगवेगळे धर्म विधी करण्यात पैसा खर्च करु नये. आपल्याला वेगवेगळे धर्म विधी करण्याची जर इच्छा असेल तर ते आपण स्वतः करावे. या कामी खर्च होणारा हा पैसा मुलांच्या शिक्षणावर खर्च करुन त्यांना सुशिक्षित करावे. या शिक्षणाचा उपयोग करुन ही मुले वेगवेगळे उदयोग व्यवसाय सुरु करतील याचा फायदा होवून या मुलांबरोबरच गावातील इतरांनाही उपजिवीकेचे साधन मिळू शकेल. हे सर्व शिक्षणाने शक्य होणार आहे. शिक्षण घेतले नाही तर ही शेतक-याची मुले आपआपसात भांडून आपला पैसा व्यर्थ खर्च करतील यासाठी भालेकर ब्राह्मणेत्तर जनतेला शिक्षणाचे महत्त्व पटवून देतांना दिसतात.

शेतकरी समाजोन्नतीचे कार्य करीत असतांना भालेकरांनी अनेक उपक्रम हाती घेतले त्यांनी विविध स्वरुपाचे लेखन करुन तत्कालीन समाजाचे सत्यस्थितीचे दर्शन घडविले. लेखनाची विविध अंगे-उपांगे त्यांनी हाताळलेली दिसतात. "शेतक-यांचा कैवार"मुख्य सूत्र घेऊन लोकरंजन व लोकांचे उद्‌बोधन करणे या उद्दिष्टांनी कवितेला राबविण्यात त्यांनी मागेपुढे पाहिलेले दिसून येत नाही. भालेकरांनी "शेतक-यांचा जीर्णोध्दार"हे आपले जीवनध्येय मानलेले होते. त्यामुळे त्यांनी शेतक-यांच्या दु:खी व दरिद्री जीवनावर तर कविता लिहिल्याच पण शेतक-यांच्या जीवनात दु:ख आणि दारिद्रय आणणारे भट-भिक्षूक, पाटील-कुलकर्णी व सरकार-सावकार हेही त्यांच्या कवितेचे विषय बनलेले दिसून येते. शेतीमध्ये दिवसभर काबाडकष्ट केल्यानंतर रात्री फावल्यावेळी शेतकरी अभंगाव्दारे परमेश्वराचे गुणगाण करण्यासाठी एकत्र येत असत. एकत्र जमलेल्या या शेतक-यांना परमेश्वराचे गुणगाण गाता गाता स्वतःचेही "जीवनगाण" गाता यावे यासाठी भालेकरांनी केलेली "हितोपदेश" वा "सुबोध भजन" ही अभंग रचना आगळी वेगळीच म्हटली पाहिजे. या अभंगातून त्यांनी परमेश्वराची स्तुती केली नाही पण शेतकरी जीवनाची वस्तुस्थिती मात्र मांडलेली दिसून येते. शेतक-याचे कष्टमय, दरिद्री व करुणरसपूर्ण जीवन नजरेसमोर उभे करताना भालेकर "हितोपदेश" मध्ये म्हणतात की, "नांगर पाटी पळे | शूद्रा अंगा वस्त्र न मिळे | उन्हामध्ये तळमळे | कष्ट हातपाय

गळे ।"[४०] येथे भालेकरांनी शेतामध्ये राबणा-या बहुजन समाजाची व्यथा मांडली आहे. या शूद्र समाजाला उन्हामध्ये नांगर हाकण्याचे काम करावे लागते. हे काम करतांना या शेतक-यांच्या अंगावर अंगभर वस्त्र घालण्याचीही या समाजाची ऐपत नाही. रणरणत्या उन्हामध्ये काम करुनही या शेतक-यांच्या आयुष्यामध्ये दारिद्रय, दुःख आहे तसेच आहे. यापरिस्थितीचे भालेकरांना अतिशय दुःख होते. अशा या शूद्राला सुखसोहळे कोठून मिळणार ? बिचा-याला चटणीचे गोळे खावे लागतात. शेतक-याची ही स्थिती पाहून "कृष्ण मनी हळहळे"अशी भालेकरांची स्थिती झाल्याचे दिसून येते. शेतकरी हा भालेकरांच्या काव्याचा मूलस्त्रोत आहे. शेतक-याच्या विकासाच्या मार्गात येणा-या अज्ञान, निरक्षरता, दास्य, दारिद्रय इ. अडथळयातून शेतक-याची सुटका व्हावी म्हणून भालेकरांनी अनेक उपाय, सूचना व बोध काव्याव्दारे केलेला आहे. "शेतक-याचे मधूर गायन" हा त्यांचा कवितांचा संग्रह ही त्याला अपवाद नाही. शेतकरी हे भालेकरांच्या "प्राणाचेही प्राण"[४१] असून शेतक-यांविषयी "पाटीलकी"या कवितेमध्ये ते म्हणतात,

"शेतक-यांची सर्वाआधी मूळ झोपडी ।
नंतर नगरे राजवाडे, मूर्ती, देवळे, गाडी, घोडी ॥"[४२]

शेतक-यांची झोपडी ही लोकवस्तीचे मूळ असल्याने ती झोपडी तयार करणारा शेतकरी महत्त्वाचा आहे. असे भालेकरांना त्यातून सूचवायचे आहे. पोवाडे, लावणी, श्रीखंड ही भालेकरांची काव्यरचनाही अशीच शेतकरी, कष्टकरी यांच्या जीवनाचे दर्शन घडविते.

पदयलेखनाप्रमाणेच भालेकरांनी "बळीबा पाटील "ही शेतक-याच्या जीवनाशी जवळचे नाते सांगणारी एक आगळी नि वेगळीच कादंबरी लिहिलेली आहे. भालेकरांनी ही कादंबरी शेतक-याची कौटुंबिक कहाणी, शेतकरी जीवनाचे चित्रण, शेतकरी जीवनविषयक प्रश्न व त्याची उकल इ. सर्व काही शेतकरी जीवनाशी निगडित असा मालमसाला वापरून फुलविलेली आहे. "शेतक-यास सहजरित्या मार्ग सुचून आपली सुधारणा करून घेता यावी, हा या कादंबरी लेखनापाठीमागील उद्देश आहे, असे भालेकरांनी म्हटले आहे."[४३] शेतक-याचे पशुवत जिणे पाहून भालेकरांना खूपच वाईट वाटत असे. शेतक-यांच्या हलाकीच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी कोणी समाजसुधारक पुढे येत नाहीत, म्हणून त्यांनी खेडयातील लोक(शेतकरी) व त्यांचे पुढारी (पाटील) हयांनी आपल्या गावची व्यवस्था सर्वानुमते कशी ठेवावी , हे कादंबरीत चांगले दाखविले आहे. ऐकण्यापेक्षा पाहण्याने

विशेष ठसते. म्हणून हिंदुस्थानातील इंग्रज सरकारच्या हद्दीतील  एके गावचा बळीबा पाटील याने आपले पाटीलकीचे काम कोणत्या त-हेने चालविले होते, हे या कादंबरीत दाखविलेले दिसते. म्हणजे भालेकरांनी ही कादंबरी लिहून एका अर्थाने 'बळीबा पाटील'चे मूर्तीमंत उदाहरण संपूर्ण शेतकरी समाजापुढे ठेवलेले होते.

खेळ खेळून मनोरंजन करून घेणा-या व्यक्तीचे मनोरंजनाबरोबर उद्‌बोधनही व्हावे या उद्देशाने भालेकरांनी इ.स.१८८२ मध्ये 'पंचखेळा'चा उल्लेख 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांनी 'राष्ट्रीय गंजिफा' असा त्यामुळेच केला आहे."[४४] अज्ञान वर्गातील लोकांच्या म्हणजेच शेतक-यांच्या मुलांच्या उन्नतीसाठी त्यांनी हा खेळ तयार केल्याचे दिसते. त्यावरून शेतकरीवर्गाविषयी त्यांना असलेली कळकळ व्यक्त होताना दिसते.

शास्त्राधाराचे बुजगावणे पुढे उभे करून खेडयातील अशिक्षित, सर्व सामान्य शेतक-यांना लुबाडण्याचे काम त्याच खेडयातील सुशिक्षित ब्राह्मण, पुजारी आदि मंडळी करीत असत. ब्राह्मण, पुजारी यांची स्वार्थी मनोवृत्ती उजेडात आणण्यासाठी भालेकरांनी इ.स.१९०८ मध्ये "शास्त्राधार"हे एक छोटेसे पुस्तक लिहिले. "ब्राह्मणांनी हवे तसे स्वतंत्रतेने वागावे व इतरांनी मात्र रुढीच्या पारतंत्र्यात नेहमी गुंतून पडावे, हा भटभिक्षुकांचा "शास्त्राधार" निराधार व खुळचट आहे, हे भालेकरांनी या पुस्तकाव्दारे उत्कृष्टपणे पटवून दिलेले आहे."[४५] "शास्त्राधार"या पुस्तकाच्या निर्मितीच्या मुळाशी भालेकरांना शेतक-यांविषयी वाटणारी अपार सहानुभूती, परम जिव्हाळाच आहे, असे दिसून येते.

शेतकरी वर्गाविषयी भालेकरांना विलक्षण जिव्हाळा होता, कणव होती. म्हणून शेतक-याला भोगावे लागणारे दु:खी जीवन पाहून त्यांचे -हदय तीळ तीळ तुटताना दिसते. शेतक-याच्या जीवावर सारा समाज पोटभर खातो, अंगभर वस्त्रे नेसतो पण अन्न व वस्त्रे उत्पन्न करणारा शेतकरी मात्र उपाशी व उघडा राहतो. शेतक-याच्या या त्यागपूर्ण जीवनाचा समाजातील सुशिक्षित, बुद्धीजिवी वर्ग यत्किंचितही विचार करीत नाही, उलट ते शेतक-यांना हीन लेखतात, त्यांना लुबाडतात, छळतात व नाडतातही. कल्पनेतही सहन न होणारी ही गोष्ट प्रत्यक्ष घडताना पाहून भालेकरांचे अंत:करण पाझरू लागले व शेतक-यांना लुबाडणा-यांच्या, छळणारांच्या मगरमिठीतून शेतक-यांची सुटका व्हावी म्हणून ते आपले काही उपक्रम, योजना वा कृतिव्दारा प्रयत्नही करु लागले. त्यातूनच "सुशिक्षित गृह", "दीनबंधू फ्री स्कूल", "दीनबंधू सार्वजनिक सभा" यांचा जन्म झाला. त्यावरून

शेतक-याविषयी भालेकरांच्या मनात किती कळकळ होती ते आपणाला समजते. शेतक-याविषयी असलेल्या कळकळीतूनच त्यांच्या हातून विविध स्वरूपाची वाड्.मय निर्मिती झाल्याचेही दिसते. शेतकरी व कष्टकरी यांच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी "दीनबंधू", "दीनमित्र", "शेतक-याचा कैवारी " आदी वृत्तपत्रे पदराला खार लावून चालविलेली दिसून येतात. जीवनाच्या अखेरीपर्यंत म्हणजेच इ.स.१९१० पर्यंत वृत्तपत्र चालविण्याची धडपड चालूच होती. थोडक्यात, शेतक-यांचा कैवारी हेच भालेकरांच्या संपूर्ण विचार, उच्चार व आचाराचे सूत्र असे निर्विवादपणे सांगता येते.

## ३.६ राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य

महात्मा फुल्यांनंतरचे महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे दुसरे महान नेते म्हणून राजर्षी शाहू महाराज यांचा उल्लेख करावा लागतो. राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. ते दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानाचे अधिपती होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी कोल्हापूर राज्याची अधिकारसूत्रे आपल्या हाती घेतली. राजर्षी शाहू महाराज हे प्रजाहितदक्ष राज्यकर्ते होते. त्यांनी आपल्या सत्तेचा वापर लोककल्याणासाठी केलेला पाहावयास मिळतो. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर संस्थानात अनेक सुधारणा घडून आल्या. त्यामुळे त्यांची राजकीय कारकीर्द अनेक बाबतीत उल्लेखनीय ठरलेली दिसून येते.

"सत्यशोधक समाजाशी राजर्षी शाहू महाराजांचा प्रथम संबंध केव्हा आला, याची निश्चित तारीख उपलबध नाही. परंतु त्यासंबंधी काही अनुमान करता येते. राजर्षींचे एक प्रमुख सहकारी भास्करराव जाधव हे सत्यशोधक चळवळीतील एक प्रमुख नेते होते. भास्कररावांना महात्मा फुल्यांचे सहकारी स्वामी रामप्पा व्यंकप्पा अप्पाराव आणि प्रसिध्द इतिहासकार कृ.अ.केळुसकर यांचा सहवास लाभला होता. त्यामुळे भास्कररावांनी या चळवळीची माहिती महाराजांना दिली असावी असे अनुमान करता येते. १९०१-०२ ला कोल्हापूरात वेदोक्त प्रकरणाला आरंभ झाला आणि त्यामुळे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे अस्तित्व पुन्हा जाणवू लागल्याची नोंद न.र.फाटक यांनी आपल्या "भारतीय राष्ट्रवादाचा विकास " या ग्रंथात केली आहे."[४६]

### सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व

छत्रपती शाहू महाराजांचे सर्वात उल्लेखनीय कार्य म्हणजे त्यांनी महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीचे केलेले नेतृत्व हे होय. महात्मा फुल्यांच्या मृत्युनंतर सत्यशोधक चळवळ निष्प्राण होत

चालली होती. परंतु शाहू महाराजांनी या चळवळीला संजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण केले. राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरे वारसदार होते. महात्मा फुले यांच्याप्रमाणेच राजर्षी शाहूंनी बहुजन समाजाला संघटित करुन त्याला आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. बहुजन समाजाने संघर्ष करूनच आपले हक्क मिळविले पाहिजेत, असे त्यांचे ठाम प्रतिपादन होते.

### ३.६.२ वरिष्ठ वर्गाच्या श्रेष्ठत्वाविरुध्द संघर्ष

शाहू महाराज ज्या बहुजन समाजातून आले होते त्याची दुरावस्था त्यांनी समक्ष अनुभवली होती. हिंदुधर्मातील उच्च जातींच्या लोकांकडून कनिष्ठ जातींच्या लोकांना कशी वागणूक दिली जाते, हे त्यांनी पाहिले होते. आपल्या समाजातील हा भेदभाव व अन्याय दूर केला पाहिजे, अशी त्यांची धारणा बनली होती. खुद्द शाहू महाराजांना वेदोक्त प्रकरणात पुरोहित वर्गाच्या अहंकाराचा जो अनुभव आला त्यावरून ते अतिशय संतप्त झाले. शाहू महाराजांच्या पुरोहितानेच त्यांना असे सांगितले की, महाराज क्षत्रिय नसल्यामुळे त्यांना वेदोक्त मंत्राचा अधिकार नाही म्हणून तो पुराणोक्त पध्दतीनेच महाराजांच्या घरातील धार्मिक विधी करणार. या अनुभवावरून राजर्षींना असे वाटते की, हा पुरोहित वर्ग प्रत्यक्ष छत्रपतींशी देखील इतक्या उर्मटपणाने व मग्रुरीने वागतो तर तो सामान्य लोकांशी कशा पध्दतीने व्यवहार करीत असेल? म्हणूनच हिंदुधर्मातील वरिष्ठ वर्गाच्या श्रेष्ठत्वाविरुध्द संघर्ष सुरू करण्याचा त्यांनी निर्णय घेतलेला दिसून येतो.

### ३.६.३ सत्यशोधक समाजाच्या शाखेची स्थापना

महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाच्या पुनरुज्जीवनाचे वारे सुरू झाले असता, कोल्हापूरसारखे बहुजन समाजाचे अस्वस्थ केंद्र त्यास अपवाद म्हणून राहणे शक्य नव्हते. सत्यशोधक समाजासारख्या चळवळीला खरी गती देण्याचे सामर्थ्य या केंद्रात मौजूद होते. वेदोक्ताच्या संघर्षामुळे ब्राह्मणशाहीशी सामना करण्याचे मानसिक धैर्य येथील कार्यकर्त्यात उत्पन्न झाले होते. भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे यासारखे सत्यशोधकी बुद्धीवंत आणि बहुजनांचा कैवार घेणारे खुद्द छत्रपती शाहू महाराज यांच्या अस्तित्वाने कोल्हापूरची भूमी सत्यशोधक चळवळीच्या पुनरुज्जीवनास विलक्षण अनुकूल बनली होती. अशी परिस्थिती महाराष्ट्रात अन्यत्र कुठेच नव्हती.

दि. ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात सत्यशोधक कार्यकर्त्यांची सभा होऊन 'श्री शाहू सत्यशोधक समाज' स्थापन करण्यात आला. सभेत भास्करराव जाधवांची अध्यक्ष म्हणून,

आण्णासाहेब लठ्ठयांची उपाध्यक्ष म्हणून महादेवराव डोंगरे याची मुख्याधिकारी म्हणून तर हरिभाऊ चव्हाण यांची कार्यवाहक म्हणून निवड करण्यात आली. जाधव, लठ्ठे आणि डोंगरे हे सर्वजण संस्थानाच्या सेवेत मोठया हुदयांवर असणारी मंडळी होती.[४७] शाहू महाराजांच्या संमतीशिवाय ते अशा प्रकाराच्या कार्यात पुढाकार घेऊ शकले नसते. महाराजाची केवळ संमतीच नव्हे तर पूर्ण सक्रिय प्रोत्साहन या कार्यास मिळाले होते, हे त्यांनी पुढे सत्यशोधक समाजास केलेल्या सहाय्यावरुन स्पष्ट होते. कोल्हापुरातील सत्यशोधक नेत्यांनी आपल्या सत्यशोधक समाजाचे नाव ही 'श्री शाहू सत्यशोधक समाज' असे ठेवले होते. तेव्हा त्यांच्या पाठीमागची प्रेरणा महाराजच होते, हे उघड होते. महाराजांचे नाव जरी सत्यशोधक समाजास जोडले असले तरी त्यांची चळवळ पुढे 'सत्यशोधक चळवळ' या नावानेच प्रसिध्दीस आलेली दिसून येते.

### ३.६.४ राजर्षी शाहू महाराज आणि शेती सुधारणा

आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योगधंदे व सहकार या तिन्ही क्षेत्रात अग्रेसर आहे. तथापि या प्रगतीचा प्रारंभ स्वातंत्र्योत्तर काळातील नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात शाहू महाराजाच्या कारकीर्दीत या प्रगतीची पायाभरणी झालेली पाहावायास मिळते. त्याच काळात कोल्हापूर संस्थानात सुरू झालेली हरितक्रांती ही महाराष्ट्रातील पहिली हरितक्रांती होती. या क्रांतीचे जनकत्व महाराजांच्या दूरदृष्टीकडे व कल्याणकारी पुरोगामी धोरणाकडे जाते. हिंदुस्थानातील अन्य भागांप्रमाणे कोल्हापूर संस्थानातही बहुसंख्य प्रजाजन हे शेतकरीच होते. हा शेतकरी वर्ग अज्ञान व दारिद्रय यांच्या गर्तेत खितपत पडलेला होता. त्यास अज्ञानामुळे सामाजिक मागासलेपण तर दारिद्रयामुळे भौतिक मागासलेपण प्राप्त झालेले होते. अशा स्थितीत दुष्काळ आणि प्लेग यासारखी अस्मानी संकटे कोसळत तेव्हा या वर्गाची दैन्यावस्था पराकोटीस पोहचत असे. राज्यारोहणानंतरच्या आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या पर्वातच शाहू महाराजांना या संकटाखाली आपली रयत भरडली जात असल्याचा कटू अनुभव घ्यावा लागला. त्यावेळी राज्यकर्ता या नात्याने दुष्काळाच्या कालखंडात प्रजेला अन्नधान्यांचा व त्यांच्या गुराढोरांना गवतचा-याचा पुरवठा करून त्यांना मृत्यूच्या तडाख्यातून वाचविण्याचे कर्तव्य महाराजांनी चोखपणे पार पाडले होते. पण एवढयावर त्याचे समाधान नव्हते. दुष्काळा सारख्या संकटावर कायमची मात करण्याची मूलभूत उपाययोजना करण्याचे त्यांनी मनावर घेतले. इ.स. १९०२ साली त्यांनी आपल्या संस्थानासाठी अपूर्व असे 'सार्वत्रिक पाटबंधारे धोरण'

जाहीर केले.[४८] त्यासाठी लवकरच स्वतंत्र 'पाटबंधारे खाते' निर्माण करून त्यावर खास 'इरिगेशन ऑफिसर'ची नेमणूक करण्यात आली. या खात्यामार्फत संस्थानातील प्रत्येक गावाची पाटबंधा-याच्या दृष्टीने तपशीलवार पाहणी करण्यात आली.

नव्या जुन्या विहीरी, छोटेमोठे तलाव, लहानमोठे बंधारे या सर्वांच्या नोंदी करून त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. नव्या विहिरी, नवे तलाव व छोट छोटे बंधारे यांच्या योजना तातडीने अंमलात आणल्या जाऊ लागल्या. पावसाच्या पाण्याचा प्रत्येक स्त्रोत अडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो आणि या प्रयत्नांचा मुकुटमणी शोभेल अशी एक भव्य योजना महाराजांनी पुढे आणली. ती म्हणजे कोल्हापूरच्या पश्चिमेस सहयाद्रीच्या घाटात भोगावती नदीचा जलप्रवाह अडविणा-या धरणाची महत्त्वाकांक्षी योजना, जी पुढे कोल्हापूर जिल्हयाची वरदायिनी ठरलेली दिसून येते.

स्वातंत्र प्राप्तीनंतर आपल्या भारत सरकारने शेती व उद्योगधंदे या क्षेत्रात आधुनिकीकरणाचा स्वीकार करून शास्त्रीय पायावर आधारित असे नवनवीन प्रकल्प हाती घेतले. पण कोल्हापूर संस्थानात आधुनिकीकरणाची ही प्रक्रिया शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीतच सुरू केली होती. युरोपात शेती शास्त्रीय पध्दतीने करून अन्नधान्याचे उत्पादन आपल्यापेक्षा अनेकपटीने घेतले जाते. हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. तेव्हा आपल्या शेतक-यांतही शेतकीतील आधुनिक ज्ञानाचा प्रसार व्हायला पाहिजे, या हेतूने महाराजांनी अनेक उपक्रम हाती घेतले. संस्थानात सुधारित शेतीपध्दतीचा प्रसार करण्यासाठी इ.स. १९१२ साली त्यांनी कोल्हापूरात 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूट' ही संस्था स्थापन केली. तिला जोडूनच कोल्हापूरात आधुनिक शेती अवजांराचे एक म्युझियम सुरू करण्यात आले. शेतक-यांना सुधारित अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पध्दती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेतकी अधिका-यांच्या नेमणुका करण्यात आल्या. शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, जोतिबा यात्रा अशा प्रसंगी 'शेतकी प्रदर्शने' भरवली जाऊ लागली.[४९] अशा प्रदर्शनांतून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहितीपत्रके आदींची मांडणी केलेली असे. त्याबरोबर उत्तम पैदाशीच्या जनावरांचेही प्रदर्शन भरवले जाई. काही प्रसंगी या शेतकी प्रदर्शनाबरोबर खास 'विज्ञान प्रदर्शन'ही आयोजित केले जाई. आपल्या प्रजेत विज्ञानाविषयी गोडी

निर्माण व्हावी, असे महाराजांना वाटत होते. प्रजाजन विशेषतः शेतकरी वर्ग मोठया संख्येने अशा प्रदर्शनांकडे यावा म्हणून त्या सोबत कुस्त्यांच्या दंगली, मर्दानी खेळाचे सामने, हत्तींच्या झुंजी यासारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात.

'प्रयोगशिलता' हा आधुनिकतेचा एक महत्त्वाचा पैलू असतो. शेतीच्या क्षेत्रात शाहू महाराजांनी दाखवलेली प्रयोगशीलता खरोखरच वाखाणण्यासारखी होती. "संस्थानात ऊस, भात, ज्वारी, भुईमूग, कडधान्ये ही नेहमीची पारंपारिक पिके काढली जात होती. पण या शिवाय चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको यासारखी कधीच न घेतलेली उत्पादने इथे घेता आली तर संस्थानाच्या शेतीचा कायापालट होऊन जाईल असे महाराजांना वाटत होते. त्यासाठी संस्थानातील पश्चिम भागात मुबलक पर्जन्यमान असणा-या सहयाद्रीच्या रांगात उतार जमिनीवर त्यांनी चहा, कॉफी, रबर, यांचे मळे तयार केलेले दिसून येतात. त्यापैकी चहाच्या मळयांचा प्रयोग अपेक्षेहून यशस्वी झाला. उत्कृष्ट दर्जाचा चहा कोल्हापूर संस्थानात उत्पादित होऊ लागला. लवकरच व्यापारी तत्त्वावर चहाचे उत्पादन सुरू होऊन 'panhala tea no-4' या नावाने तो संस्थानाबाहेर, विशेषतः हिंदुस्थानातील राजेरजवाडे यांना पाठवला जाऊ लागला." [५०] शाहू महाराजानंतर चहाच्या मळयांच्या या शेती उदयोगाकडे फारसे कोणी गांभिर्याने पाहिले गेलेले दिसत नाही. दूर्देवाने कोल्हापुरचा 'पन्हाळा चहा'कालौघात इतिहासजमा झालेला दिसून येतो. त्यांच्या संपूर्ण कार्यातून दिसणारी समतेची भावना आणि पूरोगामीवृत्ती आणि ते आयुष्यभर जोपासत राहिलेले सत्यशोधक विचार यामुळे सत्यशोधक चळवळ पुढच्या टप्प्यावर येवून पोहचली हे अर्थपूर्ण आहे.

### ३.७ नारायण मेघाजी लोखंडे

नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म ठाणे येथे सन १८४८ मध्ये झाला काही अभ्यासकांच्या मते त्यांचा जन्म पुणे जिल्हयातील सासवड येथे झाला असावा थोर चरित्रलेखक धनंजय कीर आणि इतर जानकारांची मते विचारात घेता, नारायण मेघाजी लोखंडे यांचे जन्म ठिकाण ठाणे हेच होय.[५१] त्यांचे शिक्षण ठाणे येथेच झाल्याचे आपल्याला पाहावयास मिळते. मॅट्रिकपर्यत शिक्षण झाल्यानंतर उदरनिर्वाहासाठी मुंबई येथे भायखळा भागात आगमन व वास्तव्य स्वतःच्या चांगल्या नोकरीला लाथ मारून आपले सर्व कुटुंब उपासमारीने होरपळणार आहे, हे स्पष्ट दिसत असताना देशातील लक्षावधी स्त्री-पुरूष कामगारांचे संसार फुलविण्याचे असिधाराव्रत हयातभर स्वीकारल्याचे दिसून येते.[५२] गिरणी कामगारांच्या दृष्टीने स्वामीद्रोह किंवा ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने राजद्रोह म्हणून

केव्हांही काहीही घडण्याची शक्यता असताना नारायण लोखंडे यांनी सत्यशोधक समाजाच्या झेंडयाखाली कामगारांना एकत्र आणण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचा दिसून येतो.

महात्मा जोतिराव फुले यांची प्रेरणा घेवून त्यांनी मुंबई मध्ये 'बॉम्बे मिलहॅन्डस असोसिएशन' ही कामगारांची भारतातील पहिली संघटना स्थापन करून संघटनेच्या बळावर १० जून १८९० रोजी देशातील कामगारांना प्रथमच साप्ताहिक सुटी गिरणी मालकांच्याकडून मंजुर करून घेतली. हा दिवस म्हणजे भारतातील कामगार चळवळीच्या इतिहासातील एक सुवर्ण दिन होय. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी स्त्री -पुरुष मजुरांची शंभर वर्षापूर्वीची स्थिती असल्याचे दिसून येते मालकाची लहर फिरेल तशी वागणूक आणि तसा कायदा. मरेतोपर्यंत गिरणीत काम करावे आणि अल्पसा मोबदला मिळेल तेव्हा घ्यावा आणि मुकाटयाने वाटेला लागावे, अशी स्थिती होती. तथापि श्री.लोखंडे यांनी अनेक संकटांना धैर्याने सामोरे जाऊन कामगार स्त्री -पुरुषांची शक्ती संघटित केली आणि मालकांच्या मक्तेदारीला सुरुंग लावला.[५३] यामुळे मालकांना आणि ब्रिटिश सरकारला जाग येऊन त्यांनी हळूहळू कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष दिल्याचे दिसून येते. श्री.लोखंडे यांनी सादर केलेल्या तक्रारी व निवेदने यावर विचार होऊन काही चांगले निर्णय बाहेर पडू लागले. श्री.लोखंडे यांच्या या पायाभूत कार्यामुळे कामगारांना चांगले दिवस प्राप्त झाले. आज कामगारांना ज्या सोयी सवलती व संरक्षण मिळत आहे, त्यामागे त्यागाचा मोठा इतिहास असल्याचा पाहावयास मिळतो.

श्री.लोखंडे हे एक हुशार, कर्तृत्ववान व दूरदृष्टीचे सत्यशोधक होते. महात्मा फुले यांचे ते निकटवर्ती व निष्ठावान सहकारी होते. फुल्यांच्या बऱ्याच महत्त्वाच्या कार्यात त्यांचा सहभाग प्रामुख्याने असलेला आढळतो. त्यांनी मुंबई या आपल्या कर्मभूमीत कामगार कल्याणाचे जे कार्य केले ते क्रांतिकारक असे आहे ते पथदर्शक व पायाभूत असे आहे. याशिवाय 'दीनबंधू' पत्राचे एक अष्टपैलू संपादक, झुंजार पत्रकार, सत्यशोधक साहित्यिक आणि दीन दलितांचे कैवारी म्हणून त्यांनी बजावलेली सेवा अतिशय मौलिक स्वरूपाची अशीच आहे.

### ३.८ ग्यानोबा कृष्णाजी ससाणे

जोतिरावांचे ग्यानोबांशी नाते संबंध होते व ते जोतिरावाकडे जात येत होते. जोतिरावांचा सहवास त्यांना ही लाभला होता. "२४ सप्टेंबर १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना झाली, त्यावेळी ग्यानोबा ससाणे या समारंभास उपस्थित असल्याचा उल्लेख तुकाराम हनुमंता पिंजण यांनी

आपल्या टिपणात केला आहे."[५४] प्रारंभापासूनच सत्यशोधक समाजाच्या विचाराचा प्रभाव ग्यानोबा ससाणे यांच्यावर पडलेला दिसून येतो.

ग्यानोबांचे पूर्ण आयुष्य ईश्वराच्या शोधात गेले होते. त्यांनी अध्यात्मिक अनुभव घेतले होते. "आयुष्याच्या अखेरपर्यंत ईश्वरावर त्यांची निष्ठा असल्याचे दिसून येते. हे व्रत त्यांनी आयुष्यभर पाळले ते सात्विक मनोवृत्तीचे गृहस्थ होते. घरातही मंगल वातावरण होते. स्वच्छतेची आवड होती. घरात केरकचरा असलेला त्यांना सहन होत नसे त्यांचे कपडेही स्वच्छ असत. लग्नात जरी त्यांना त्रास झाला, तरी कोणासही त्यांनी दुषणे दिली नाहीत. ग्यानोंबा ससाणे यांचा विवाह ब्राह्मण पुरोहिता शिवाय झाला. ग्यानोबांच्या लग्नाने सत्यशोधक समाजाच्या चळवळीला एक इतिहास दिल्याचे जाणवते."[५५] कित्येक शतकांची परंपराच या लग्नाने मोडीत काढलेली होती. महात्मा जोतिराव फुले यांच्या विचाराला बळ मिळाले. यातूनच महात्मा फुले यांचे मनोर्धैर्य वाढले. आपल्या विचाराचा प्रत्यक्ष अविष्कार त्यांना पाहता आला. आपल्या शक्तीचा, विचाराचा आपल्या लोंकांवर किती व कसा परिणाम झाला आहे, याचा अंदाज घेता येतो.

"दुष्काळाच्या काळात ग्यानोबांनी खूप परिश्रम घेतले. गावातील माणसांना त्यांनी धान्य पुरविले. कोणाच्या कपडयालत्त्याची व्यवस्था केली. गरिबी किती भयानक असते, हे त्यांनी स्वत: अनुभवले होते."[५६] दारिद्रयाची त्यांना भिती वाटली नाही. ही भिती ज्यांना वाटते, त्यांना ती घालविण्याचा एक मार्ग त्यांनी सांगितला. आपल्या जवळ जे आहे, त्यातील काही देऊन इतरांच्या दु:खात सहभागी होत, तसेच त्यांना गरीब माणसाविषयी नेहमी आपुलकी वाटे.

शेती कशी करावी याचा लोकांना आदर्श घालून दिला. निरपेक्ष भावनेतून त्यांना सल्ला दिला आणि गावात सुधारणा घडवून आणली. सहकारी पतपेढी स्थापन करण्यात पुढाकार घेतला. गावातील लोकांच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत, ही उदात्त भावना त्यांच्या मनातून कधी गेली नाही. संत साहित्याच्या वाचनाचा हा परिणाम असेल. महात्मा फुल्यांनी लिहिलेले 'शेतकऱ्यांचा आसूड' मधील शेतकऱ्यांच्या जीवनाचे मनाला भिडणारे चित्रही त्यांच्या स्मरणात असेल. या आठवणींनी ग्यानोबा ससाणे हळहळताना दिसतात.[५७] गरिबीत असणाऱ्या माणसांच्या मदतीला ते धावून जात. दु:ख कोणी वाटून घेत नाही, पण ते होईल तेवढे हलके करण्याचा प्रयत्न माणूस करू शकतो. तेच ग्यानोबा ससाणे यांनी केलेले दिसून येते. एक सामान्य शेतकरी माणूस महात्मा

फुल्यांच्या विचाराने भारावून असामान्य कर्तृत्वाने परिसरात काय निर्माण करू शकतो याचे आदर्श उदाहरण म्हणजे ग्यानोबा ससाणे हे होय.

**३.९ भास्करराव जाधव**

भास्करराव जाधव यांचे मूळ घराणे सातारा जिल्हयातील लिंबगावे या गावचे होते. भास्करराव विठोजीराव जाधव यांचा जन्म सोमवार दिनांक १७ जून १८६७ रोजी नागाव तालुका अलिबाग येथे झाला. बिवाडी  तालुका महाड हे त्यांचे आजोबा नागोजीराव यांचे गाव. इ.स.१८८८ साली मॅट्रिक परीक्षेत भास्करराव पहिले आले. बी.ए.आणि एम.ए.मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. ते इ.स. १८९७ साली एल.एल.बी. झाले.

भास्करराव जाधव यांनी २०-२५ वर्षांच्या काळात विविध नियतकालिकांमधून लेखन केल्याचे दिसून येते. संशोधन करून अनेक ठिकाणी भाषणे दिली. त्यांना  साहित्याची आवड होती. त्यांना साहित्यिक म्हणून या काळात मान्यता होती. "इ.स. १९३५ मध्ये मुंबई येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. इ.स. १९०७ पासून म्हणजे मराठा शिक्षण परिषदेच्या स्थापने पासून या चळवळीचे नेतृत्व ते करीत होते. तर सत्यशोधक समाज अधिवेशन सुरू व्हावित यासाठी इ.स. १९११ पासून ते प्रयत्नशील राहिले आणि त्यातही त्यांना यश आले."[५८] ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रमुख नेत्यांमध्ये ते एक प्रमुख नेते होते. तत्त्वज्ञान आणि चळवळ यांचे स्थान त्यांच्या जीवनात प्रमुख असल्याचे दिसून येते. 'वर्तमानपत्राशिवाय लोकजागृती होऊ शकत नाही.'[५९] हे भास्कररावांनी त्याकाळी सुध्दा  ओळखले होते. म्हणून  इ.स. १९०१ मध्ये 'मराठा दीनबंधू' हे पत्र सुरू केले. इ.स. १९०४ ते १९१८ या कालखंडात ते कोल्हापूर नगरपालिकेचे सर्वाधिकारी होते. राजर्षी शाहू महाराज यांच्या अत्यंत विश्वासातील असल्याचे दिसून येते.

महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचा प्रभाव कमी होऊ लागला अशा अवस्थेत इ.स.१९११ साली भास्करराव जाधव यांनी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना केलेली होती. तो काळ भारतातील इंग्रज राजवटीचा होता. या राजवटीत ब्राह्मण नोकरशाही प्रभावी होती. भास्करराव जाधव हे इ.स.१९२२ साली आकारास आलेल्या ब्राह्मणेत्तर पक्षाचे शिल्पकार होते १९२२ साली मुंबई कायदे कौन्सिलात त्यांची सरकारतर्फे नियुक्ती झाली. त्यांनी या कायदेमंडळात 'ब्राह्मणेत्तर पक्ष ' आकारास आणला.[६०] म.फुले यांनी वर्णव्यवस्थेविरुध्द चालवलेले बंड त्यांच्या

मृत्यूनंतर थंडावले होते परंतु भास्करराव जाधव यांनी सत्यशोधक समाजाची चळवळ ख-या अर्थाने गतिमान केल्याचे दिसून येते.

शेतक-यांच्या दैन्यावस्तेचा चौपदरी आसूड विनतांना त्यांनी स्पष्ट केलेले ब्राह्मनांचे साम्राज्य केवळ धर्मापुरते नसून नोकऱ्या, न्यायालय आणि सावकारी क्षेत्रात त्यांचे अधिराज्य असल्याने त्यांनी सर्व बाजूने शेतकऱ्यांचे शोषन केले आहे. सर्वत्र ब्राह्मणांचे राज्य असल्याने मराठा शेतकरी हा ओझे वाहनारा बैल असून ब्राह्मण सावकारांनी त्याला पुरते नागविले आहे. शेतकरी हा समाजाचा केंद्रबिंदु असल्याने या जुलमाच्या विरोधातच सत्यशोधक चळवळ आहे. आमचा शेतकरी व मजूर अडाणी असल्याने त्याला ईश्वराच्या नावाने सर्वत्र नागवतात. हिच मंडळी अजूनही पंढरीच्या वाऱ्या करीत आहेत. तेंव्हा उपरोक्त घटकांना बौध्दीक दास्यातून मुक्त करणे हे समाजाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. [६१]

भास्करराव जाधव यांनी सत्यशोधक चळवळीचा उद्देश आणि कर्तव्य स्पष्ट करताना समाजातील सर्वसामान्य शेतकरी वर्गावर होत असलेला अन्याय दूर करणे, सावकारी पाशातुन मुक्त करणे हेच कर्तव्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### ३.१० आण्णासाहेब लट्ठे

आण्णासाहेब लट्ठे यांचा जन्म ९ डिसेंबर १८७८ रोजी कुरुंदवाडला झाला. कुरुंदवाड, मिरज व सांगली या गावी आण्णांनी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षण घेतले. पदवी पूर्व शिक्षण घेण्यासाठी आण्णा प्रथम कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात दाखल झाले. इ.स. १९०३ साली एम.ए. झाल्यानंतर १३ मार्च १९०७ रोजी राजाराम महाविद्यालयात इंग्रजी, अर्थशास्त्र व इतिहास या विषयांचे प्राध्यापक म्हणून नेमणूक होईपर्यंत आण्णांनी अन्य नोकरी केली नाही. इ.स. १९०७ च्या मार्च पासून ते फेब्रुवारी १९१४ पर्यंत आण्णांनी कोल्हापूर दरबारची सेवा केली. आण्णासाहेब लट्ठे सुरुवातीपासूनच ब्राह्मणेत्तर चळवळीकडे आकर्षित होते. पुढे त्यांनी शाहू छत्रपती, भास्करराव जाधव, वालचंद कोठारी, यांच्याबरोबर ब्राह्मणेत्तर चळवळीत काम करण्यास सुरूवात केली. [६२] आण्णासाहेब लट्ठे यांना सुरुवातीपासूनच ब्राह्मणेत्तर समाजातील लोकांबद्दल अतिशय तळमळ वाटत असे. कोल्हापूर संस्थानात असतांना मागासलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना प्रथम शिक्षण देणे आवश्यक असल्याचे त्यांनी ओळखले होते. शिक्षण घेवून या

समाजाने संघटीत व्हावे व आपल्या हक्कांसाठी लढा दयावा. असे आण्णासाहेब लठ्ठे यांचे मत असल्याचे दिसून येते.

इ.स. १९१६ सालच्या ऑगस्टमध्ये महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तरांची 'डेक्कन रयत समाज'नावाची संघटना सुरू करण्यात त्यांच्या बरोबर दीनमित्रकार मुकुंदराव पाटील, नाशिकचे रामचंद्रराव वंडेकर या सत्यशोधकाप्रमाणेच वालचंद कोठारी, सीताराम केशव बोले आणि कविवर्य नारायण वामन टिळक यांनीही वाटा उचलला होता.[६३] आण्णासाहेब लठ्ठे यांनी मध्यवर्ती विधान सभेची निवडणूक जिंकल्यानंतर ३ फेब्रुवारी १९२१ रोजी लठ्ठयांनी सभासद म्हणून शपथ घेतली. सभागृहाच्या कामकाजामध्ये लठ्ठे नेहमी हिरीरीने भाग घेत. जेंव्हा भारतातील कारखान्यांबद्दल कायदयात दुरुस्ती सुचविणारे विधेयक सरकार तर्फे मांडण्यात आले तेंव्हा लहान मुलांना सहा तासांपेक्षा जास्त वेळ काम करू देऊ नये आणि त्यांना शाळेत जाण्यास उत्तेजन दयावे, असे लठ्ठयांनी मत व्यक्त केले.[६४]

आण्णासाहेब लठ्ठे यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेवून जनतेने त्यांना आपले प्रतिनिधी म्हणून विधानसभेमध्ये पाठविले. तेथेही आण्णासाहेब लठ्ठे यांनी सामान्य जनतेच्या प्रश्नांवर चर्चा घडवून जनतेचे प्रश्न सोडविले. यामध्ये लहान मुलांचे शिक्षण व बालकामगारांचा प्रश्न इ. विषयावर त्यांनी भर दिल्याचे दिसून येते.

कोल्हापूरला छत्रपतींचे सल्लागार म्हणून काम करत असताना जेंव्हा राजाराम महाराजांना कोल्हापूरात पानसुपारी देण्यात आली. तेंव्हा त्यांनी जाहीररित्या सांगितले की, "रा.ब.लठ्ठे यांची दिवाण पदावर नेमणूक आंम्ही कोणाच्या अभिप्रायाने केली नसून आमच्या संस्थांनची उन्नती होण्याकरिता आणि विस्कटलेल्या स्थितीत राहणा-या, मागासलेल्या वर्गात संघटना निर्माण करून त्यांना पुढे आणण्याकरिता आमच्या स्वतःच्या विचारानेच रावबहादूरांना येथे आणविले आहे. ते कौन्सिलात जाऊन मिनिस्टर झाले असते, तर त्यांची योग्य सल्लामसलत आम्हाला मिळाली नसती. आणि त्यांच्या सल्ल्याने सध्या आंम्ही येथे सुधारणा घडवून आणल्या त्या घडविता आल्या असत्या की, नाही हे सांगणे अवघड आहे."[६५] आण्णासाहेब लठ्ठे कोल्हापूरला दिवाण झाल्यापासून त्यांनी संस्थानात अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या. जून १९२६ मध्ये बालविवाहास बंदी घालणारा कायदा करण्यात आला. १० वर्षाच्या आत मुलीचा विवाह होवू नये, अशी तरतूद या कायदयात करण्यात आलेली होती. हा कायदा मोडणा-या मुलांच्या पालकांना दोन हजार रुपये दंड दयावा लागेल. असेही त्यात नमूद करण्यात आले होते.

मुंबई प्रांतात मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळात आण्णासाहेब लठ्ठे यांना अर्थमंत्री पद मिळाले होते तेंव्हा १७ ऑगस्ट १९३७ रोजी लठ्ठयांनी इ.स. १९३७-३८ या आर्थिक वर्षाच्या दुस-या सहामाहीसाठी अर्थसंकल्प सादर केला आणि मंत्रिमंडळाच्या धोरणाची रूपरेखा स्पष्ट करणारे एक निवेदन विधानसभेत वाचून दाखविले त्यात ते म्हणतात की, "हिंदुस्थानात इतर प्रांतापेक्षाही मुंबई इलाख्यात करांचा बोजा सर्वात मोठा होता आणि इ.स. १९२१ पासून ७९ लक्ष रूपयांचे नवे कर बसविण्यात आले होते, असे लठ्ठयांनी सभागृहाला सांगितले. काटकसर करण्याचे प्रयत्न करूनही खर्चामध्ये पावनेतीन कोटी रुपयांची वाढ झाली होती. जागतिक मंदीच्या तडाख्यात सापडल्याने त्रस्त झालेल्या शेतक-यांकडून येणे असलेले सोळा लाख रुपये सरकारने माफ केले. कर्जबाजारी शेतक-यांना हायसे वाटेल अशा योजना आखण्याचा इरादा असल्याचे ही लठ्ठयांनी जाहीर केले होते."[६६] खेडेगावातील लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी आधीच्या सरकारने फक्त एक लाख रुपयांची तरतूद केली होती, ती दहा लाख करण्यात आली. कुटिरोद्योगांना उत्तेजन, ग्रामपंचायतीचे जाळे विणण्याची आवश्यकता या बाबींखेरीज दारुबंदीचे धोरण अंमलात आणण्यास काँग्रेस पक्ष बांधलेला आहे, असे लठ्ठयांनी स्पष्ट केल्याचे दिसते.

दलितांसाठी केल्या जाणा-या खर्चात कपात करण्याच्या आवश्यकतेवरही त्यांनी भर दिला. आपण सादर केलेला अर्थसंकल्प लोकांच्या अपेक्षेपेक्षाही अधिक सावधपणे आणि परंपरा फारशी न मोडता सादर केलेला आहे, असे लठ्ठयांनी प्रांजळपणे कबूल केल्याचे दिसून येते. ग्रामीण विकास म्हणजे नुसते पाटबंधारे किंवा कालवे एवढीच त्यासंबंधीची लठ्ठयांची मर्यादित कल्पना नव्हती. शेतक-यांना पतपुरवठा करण्यासाठी, त्यांच्या मालाची खरेदीविक्री करण्यासाठी, सहकारी बँका व सोसायटया काढून त्यांच्या मार्फत ग्रामीण विकास साधावयाचा, असे लठ्ठयांचे उद्दिष्ट असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील गरीब लोकांची स्थिती सुधारण्यासाठी सहकारी चळवळीचे लोण सर्वत्र नेले पाहिजे, यावर ते भर देत असल्याचे दिसून येते. या सर्व सत्यशोधकीय विचारवंताचा प्रभाव मुकुंदराव पाटील यांच्यावर पडलेला होता.

### ३.११ मुकुंदराव पाटील जीवन परिचय

### ३.११.१ कौटुंबिक पार्श्वभूमी

आधुनिक महाराष्ट्राच्या विचारवंतामध्ये ‘दीनमित्रकार’ मुकुंदराव पाटील याचे पत्रकार, निष्ठावंत सत्यशोधक कार्यकर्ते व साहित्यिक म्हणून गौरवास्पद स्थान असल्याचे दिसून येते. महात्मा जोतिराव फुले यांनी इ.स.१८७३ साली ‘सत्यशोधक समाजाची’स्थापना केली. या समाजास इ.स.१९११ पासून जे भरघोस यश मिळाले, त्यात मुकुंदराव पाटील यांचा फार मोलाचा वाटा आहे. महात्मा फुले व कृष्णराव भालेकर यांच्या विचारांचा नंदादीप तेवत ठेवण्यासाठी त्यांनी ‘‘दीनमित्र’’ साप्ताहिक ५७ वर्षे चिकाटीने अविरतपणे चालविले. कर्ज व अज्ञानाने हैराण झालेल्या शेतकरी व कष्टक-यांची कहाणी त्यांनी वेशीवर टांगली. त्यासाठी आपली लेखणी झिजवल्याचे दिसून येते. कथा, कादंबरी, कविता, नाटक व निबंध या वाड्.मय प्रकारातून आपल्या सत्यशोधकी तत्त्वांचा प्रसार सातत्याने केला. त्यांनी आपली दृष्टी आर्थिक लाभावर न ठेवता विचारपूर्वक वाड्.मय प्रसारावर ठेवली. त्यांचे वाड्.मयीन व सामाजिक कार्य वेगळे व नजरेत भरणारे आहे.

### ३.११.२ जन्मतारखेसंबंधी चर्चा

मुकुंदराव पाटील यांची जन्मतारीख निश्चित आढळत नाही कोणी दिलेली नाही, काही ठिकाणी त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे ती निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

१. ‘‘दीनमित्र’’साप्ताहिकाचा रौप्य महोत्सवी अंक प्रसिध्द झाला. त्यावेळी लिहिलेल्या आत्मनिवेदनात आपल्या दत्तक विधानाविषयी जो उल्लेख केला आहे त्यात म्हटले की, ‘‘सन १८९३ मध्ये मला वयाच्या ७ व्या वर्षी पाटलांच्या कुटुंबास दत्तक देण्यात आले.’’[६७]

२. २३ नोव्हे १९१० रोजी त्यांनी ‘‘दीनमित्र’’ चे पुनरुज्जीवन केले, त्यावेळी ‘‘वय अवघे २४ वर्षाचे, ’’[६८] असा उल्लेख आला आहे.

३. मुकुंदराव पाटील यांच्या निधनानंतर प्रथम पुण्यतिथी निमित्त डॉ.पंजाबराव जाधव यांनी लिहिलेल्या लेखात त्यांचा जन्म इ.स. १८८५ साली पुण्यातील शिवाजीनगर येथे झाल्याचा उल्लेख केला आहे.[६९]

४. ''दीनसेवा''साप्ताहिकातून प्रसिध्द झालेल्या जीवन परिचयातून मुकुंदराव पाटील यांचें अत्यंत जवळचे स्नेही गो.गो. बरबडे ऊर्फ भाऊ मास्तर यांनी त्यांचा जन्म ''इ.स.१८८५ साली पुण्यात भांबुर्डे येथे झाला ''[७०] असे नमुद केले आहे.

५. मुकुंदराव पाटील यांच्या पत्रव्यवहारात त्यांच्या षष्टयब्दीपूर्तीबद्दल अभिनंदन करणारे दीनमित्राच्या वाचकाचे एक पत्र उपलब्ध झाले असून त्यात २० डिसेंबर १९४५ ला आपल्या वयास ६० वर्षे पूर्ण होऊन आपण ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहात, असे म्हटले आहे.[७१] वास्तविक मुकुंदराव पाटील यांना आपली जन्मतारीख माहीत नसताना या पत्रकर्त्याला ती उपलब्ध कशी झाली असा प्रश्न पडतो.

६. जन्मतारीख निश्चित करण्यासाठी ज्या साधनांचा शोध घेतला जातो ती सर्व साधने तपासून पाहिली विशेषतः मुकुंदराव पाटील यांची समाधी त्यांचा जन्म जेथे झाला त्या भांबुर्डे गावचे पंचायतीचे दप्तर, ते ज्या शाळेत शिक्षण घेत होते त्या शाळेतील नोंदणी रजिस्टर यांचा शोध घेतला असता जन्मतारखेबाबत कोणत्याही ठिकाणी नोंद आढळत नाही. त्यांचे चिरंजीव माधवराव पाटील यांच्या मुलाखतीतून ''मुकुंदराव पाटील यांचा जन्म इ.स. १८८५ साली चिंचवड येथील मोरया गोसावी पुण्यतिथीच्या दिवशी झाला''[७२] अशी माहिती मिळते.

ही माहिती मुकुंदराव पाटलांनी आपल्या मातापित्याकडून ऐकून मुलांना सांगितलेली दिसून येते. या माहितीच्या आधारे शोध घेतला असता दरवर्षी चांद्रवर्षाप्रमाणे मिती मार्गशिर्ष वदय ६ या दिवशी मोरया गोसावी पुण्यतिथी येते, त्यानुसार इ.स. १८८५ साली ही पुण्यतिथी इंग्रजी तारखेनुसार २० डिसेंबर १८८५ साली होती. उपरोक्त षष्टयब्दीपुर्तीबद्दल पाठविलेल्या पत्रात याच तारखेचा उल्लेख आलेला आहे. कदाचित मुकुंदराव पाटील यांनी जन्माबद्दलची माहिती आपल्या मुलांप्रमाणेच या पत्रकर्त्यास कळविली असेल, त्यानुसार त्याने जन्मतारीख शोधण्याचा प्रयत्न केला असावा असे वाटते.

वरील लेखी व मौखिक पुराव्याच्या आधारे असे सिध्द करता येणे शक्य आहे की मुकुंदाराव पाटील यांचा जन्म २० डिसेंबर १८८५ साली भांबुर्डे (हल्लीचे पुण्यातील शिवाजीनगर) येथे झाला असावा, असे मानावयास आज हरकत नाही.

### ३.११.३ मुकुंदराव भालेकरांचे पाटील झाले

महात्मा फुल्यांचे प्रमुख सहकारी ''दीनबंधू'' या ब्राह्मणेतर चळवळीच्या पहिल्या वृत्तपत्राचे संस्थापक कृष्णराव पांडुरंग भालेकर (१८५० ते १९१०) हे मुकुंदरावाचे जनक वडील होते. भालेकरांच्या तरवडी ता.नेवासा (जि.अहमदनगर) येथील भगिनी काशीबाई सखाराम क्षीरसागर (पाटील) यांचा मुलगा म्हणजेच भालेकरांचे भाचे ''दीनमित्र'' मासिकाचे संपादक गणपत सखाराम पाटील (१८६५ ते १८९८) यांना अपत्य नसल्याने ५ ऑगस्ट १८९३ मध्ये भांबुर्डे येथे वयाच्या सातव्या वर्षी मुकुंदरावांनी दत्तक घेण्यात आले.[७३] त्यामुळे मुकुंदाराव भालेकरांचे क्षीरसागर (पाटील) झाले. क्षीरसागर घराण्याकडे गावची पाटीलकी असल्याने त्या घराण्याला ''पाटील ''या नावानेच ओळखले जात असे.

### ३.११.४ बालपण-शिक्षण

कृष्णराव भालेकरांनी मुकुंदराव यांना वयाच्या ८ व्या वर्षी दत्तक दिलेले असले तरी त्यांच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी भालेकरांवरच होती. मुकुंदराव वयाच्या १० व्या वर्षापर्यंत पुणे येथेच होते. त्यांचे दुसरी पर्यंतच शिक्षण वेताळ पेठेतील शाळेत जैन गुरुजींच्या मार्गदर्शनाने झाले. इ.स.१८९६ साली पुणे येथे प्लेगची भयंकर साथ आली, भीषण दुष्काळ पडला तेव्हा भालेकरांनी आपल्या कुटुंबासह पुणे सोडले. नोकरीच्या निमित्ताने त्यांना मुंबई, मनमाड, जबलपूर, करजगाव (व-हाड) येथे जावे लागले. आर्थिक अडचणीमुळे त्यांना कॉन्ट्रक्टची कामे घ्यावी लागली. भालेकर एका ठिकाणी कधीच स्थायिक झाले नाहीत. [७४] भालेकरांच्या भ्रमंतीमुळे मुकुंदरावांच्या शिक्षणावर परिणाम होऊ लागला. त्याबद्दल आपल्या वडिलांकडे ते तक्रार करू लागले, तेव्हा भालेकर त्यांची समजूत घालतांना म्हणत, ''हे बघ मी शिकवतो ते मुळी युनिव्हरसिटीतच नाही.''[७५] मुकुंदरावांच्या शालेय शिक्षणावर पाणी पडत असले तरी भालेकरांच्या समवेत समाजसेवेचे शिक्षण सुरु झालेले होते.

विद्यापीठातील चार भिंतीच्या आतील पुस्तकी शिक्षणापेक्षा प्रत्यक्ष समाजात जाऊन उपेक्षित व दीन-दुबळयांची सेवा करण्याचे व्रत हेच खरे शिक्षण आहे. याची जाणीव मुकुंदरावांना भालेकरांकडून सातत्याने होत होती. म्हणूनच तिस-या इयत्तेतून शाळा सोडून दिल्यावर मुकुंदराव पुन्हा शाळेत गेले नाहीत. भालेकरांच्या तालमीत त्यांचे समाजसेवेचे व वाड्.मयलेखनाचे पाठ सुरू

झाले. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व आकारास आले. भालेकरांचे व गणपतराव पाटील यांचे पत्रकारीतेचे अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जीद्द त्यांच्या मनात निर्माण झाली असावी.

### ३.११.५ विवाह

कृष्णराव भालेकर इ.स. १९०४-०५ साली जबलपूर येथे असतानाच मुकुंदरावांच्या विवाहाबद्दल प्रयत्न सुरू झाल्याचे दिसून येते. भालेकरांनी समाजकार्य व वृत्तपत्र काढण्यासाठी आपले घर-दार, दाग-दागिणे विकून टाकले होते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खडतर झाल्याचे पाहावयास मिळते. उदरनिर्वाहासाठी ते नोकरी करीत आणि कॅान्ट्रक्ट घेत असत. अशा भणंग झालेल्या भालेकरांच्या मुलाला मुलगी देण्याचे धैर्य कोणी करत नव्हते. एखादा वधुपिता तयार झाला तर विवाहाच्या खर्चासाठी पैशाची अडचण असल्यामुळे भालेकर नेहमी चिंताग्रस्त असल्याचे दिसून येतात. तेंव्हा मुकुंदरावांचा विवाह त्यांच्या जवळच्या नात्यातील श्री.बाळाजी अहिलाजी गोरे (गेवराई ता.नेवासा,जि.अहमदनगर) यांची कन्या लक्ष्मीबाई याच्याबरोबर मे.१९०६ मध्ये झाला.

### ३.११.६ आजारपण आणि मृत्यू

इ.स. १९१८ साली त्यांना ''फिच्युला''या आजाराने घेरले. त्यावेळी ते ३३ वर्षांचे होते. शस्त्रक्रिया करूनही काही उपयोग झाला नाही. अखेर पुणे, बेळगाव आदी ठिकाणी औषधोपचार घेतल्याने तब्बल १३ वर्षानंतर हा आजार आटोक्यात आला.[७६]

इ.स १९५१ सालापासून मधुमेह आणि रक्तदाब या आजारांनी घेरले. १० डिसेंबर १९६० रोजी त्यांना अर्धांगवायू झाला. पुढे मार्च १९६३ पासून या आजाराने अधिक जोर धरल्याने त्यांना कायमचे अंथरून धरावे लागले.

जून १९६६ पासून त्यांना कर्करोग झाल्याने सप्टेंबर महिन्यात मुंबई येथील ''टाटा मेमोरिअल हॅास्पिटल'' मध्ये त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली पण याचा काही उपयोग झाला नाही. उलट आजार वरचेवर वाढत जाऊन त्यांना मृत्यूची चाहूल लागली. १७ मे १९६७ रोजी आबासाहेबांकडे आपल्या कर्मभूमीत तरवडी येथे देह ठेवण्याची आणि ''दीनमित्र''तरवडीहून काढण्याची इच्छा व्यक्त केली. पण तातडीने छपाई सामग्री तरवडीला हलविणे शक्य झाले नाही. अखेर ''दीनमित्र ''चा ध्यास घेऊनच त्यांनी ४ डिसेंबर १९६७ रोजी देह ठेवला. [७७] रक्तदाब, मधुमेह, अर्धांगवायू, कर्करोग

यासारख्या दूर्धर रोगांनी या ध्येयनिष्ठ, निर्भीड पत्रकार, संपादक, सत्यशोधकास सतत ५० वर्षे घेरले होते.

मुकुंदराव पाटील यांच्या जीवनचरित्राचा संक्षेपाने विचार करता तो बहुजनांच्या अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी अविरत चाललेल्या चळवळीचा, सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ, तेजस्वी सत्य स्वीकारून अज्ञानांधःकारात चाचपडणा-या बहुजनांच्या कल्याणासाठी स्वतःप्रकाश बनना-या मनस्वी कार्यकर्त्याचा, सत्यशोधक चळवळीची धुरा पडझडीच्या काळात स्वतःच्या खांदयावर घेऊन ती यशस्वी करणा-या झुंजार सेनापतीचा, सत्यशोधनाच्या विरुध्द उठणा-या प्रत्येक वादळास समर्थपणे तोंड देणा-या समाजक्रांतिवीराच्या संघर्षाचा, सत्याला प्रमाण मानून साहित्यातून केवळ सत्याचीच पेरणी करणा-या सत्यभक्त साहित्यिकाचा, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी मानवतावादी मूल्यांची जोपासना करणा-या महापुरुषाचा हा इतिहास ठरतो.

### ३.११.७ वैचारिक जडणघडन व लेखन

मुकुंदराव पाटील यांची वैचारिक भूमिका एका सत्यशोधकाची होती. बहुजन समाजोन्नती त्यांच्या कार्य आणि आदय प्रेरणा असल्यामुळे प्राप्त परिस्थितीचा सारासार विचार करून वस्तुनिष्ठ मते नोंदविण्यावर त्यांचा विशेष भर राहिलेला आहे. त्यांचे वैचारिक लेखन सत्यशोधकी विचारास तात्त्विक अधिष्ठाण प्राप्त करून देण्याच्या भूमिकेतून आकारास आल्याचे दिसून येते. सत्यशोधक ब्राह्मणविरोधी का ? याचे नेमके उत्तर त्यांच्या लेखनातून सापडते. ऐतिहासिक निकषाधारे केलेले सैध्दांतिक विवेचन त्यांच्या लेखनातील जमेची बाजू ठरते.

१. हिंदू आणि ब्राह्मण इ.स. १९१०

२. विठोबाची शिकवण इ.स. १९२६

३. विचार किरण भाग १ इ.स. १९५२

४. विचार किरण भाग २ इ.स. १९५६

हे त्यांचे वैचारिक लेखन ''दीनमित्र ''मधून क्रमशः प्रकाशित झाले आहे. ''हिंदू आणि ब्राह्मण'' या ग्रंथातून त्यांनी ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर यांच्यातील चालीरीती, आचार विचार, राहणीमान, पोषाख, खानपान, धर्मविधी यातील मूलभूत भेद दर्शवून ब्राह्मण हे हिंदू नाहीत असा विचार मांडल्याचे दिसून येते. ब्राह्मणांच्या भारतातील आगमनाविषयी ऐतिहासिक पुरावे देवून वस्तुनिष्ठ

मांडणी केली आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर यांच्यातील प्रखर संघर्षाचे स्वरूप स्पष्ट केले आहे.[७८]

''विठोबाची शिकवण'' या ग्रंथातून संतांनी बहुजन समाजास जो भक्तीचा सोपा मार्ग दाखविला, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. सत्यशोधकास विरोध करणा-या, बहुजनास हरत-हेने अज्ञानी ठेवणा-या भागवतधर्मी लोकांना सणसणीत उत्तरे देऊन त्यांच्यातील ढोंगीपणा उघड केला आहे.

मुकुंदराव पाटील याचे लेखन बहुजनाचे उद्‌बोधन करणे, त्यांना कृतिशील बनविणे, सत्यशोधकी तत्त्वज्ञानातील वैचारिक बाजू स्पष्ट करणे, या भमिकेतून आकारास आले आहे. वरीलप्रमाणे मुकुंदराव पाटील यांच्या चौफेर लेखनाचा संक्षिप्त विचार करता येईल. एकाच वैचारिक भूमिकेशी मराठी वाङ्.मयातील उल्लेखनीय घटना म्हणता येईल. आधुनिक मराठी वाङ्.मयातील काही प्रवाहाची सुरूवात त्यांच्या लेखनापासून झाल्याचे दिसून येते. तसेच सत्यशोधकी आणि आधुनिक मराठी साहित्याच्या सीमा विस्तारण्याचे श्रेयही त्यांना दयावे लागते.

त्यांचे लेखन साहित्यातील सामाजिकतेची जपणूक करते. ''समाज परिवर्तन''त्यांच्या साहित्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट राहिले आहे. ''खंडन, मंडन आणि स्वीकार'' हे त्यांच्या साहित्याचे मूलतत्त्व असून ''रंजन आणि उद्‌बोधन''त्यांच्या साहित्याचे सामर्थ्य असल्याचे दिसून येते. त्यांच्या लेखनामागील हेतू एकच असल्यामुळे, स्वरूपदृष्टयाही त्यात साम्य आढळते.

मुकुंदराव पाटील यांचा पिंड एका दार्शनिक साहित्यिकाचा आहे. ग्रामीण जीवनातील अज्ञानमुलक, अन्यायमूलक, दोषमूलक, रुढी, प्रथा, परंपरा नष्ट होऊन एकसंघ समाज निर्माण करण्यावर त्यांचा विशेष भर राहिलेला दिसून येतो. त्यांच्या साहित्यातून येणारे घटना, प्रसंग असत्य व काल्पनिक आहेत असे आजही म्हणता येत नाही. इतिहासाधारे त्यातील सत्यता सिध्द करता येण्यासारखी आहे. परिणामी त्यांच्या साहित्यास ऐतिहासिक दस्तावेजाचे मूल्य प्राप्त होते. त्यांचे वैचारिक लेखन त्यांच्या प्रत्यक्ष जीवनानुभवाचे शब्दचित्र आहे.

### ३.११.८ वृत्तपत्रविषयक लेखन

मुकुंदराव पाटील हे महाराष्ट्राला विशेष करून परिचित आहेत, ते पत्रकार म्हणून. पत्रकारिता हाच त्यांचा स्थायीभाव होता. सत्यशोधक समाजातील निष्ठावंत कार्यकर्ते कृष्णराव भालेकर हे मुकुंदराव पाटील यांचे जनक पिता होते. भालेकरांनी इ.स.१८७७ साली घरदार विकून 'दीनबंधू' पत्र

सुरू केले. बहुजन समाजाच्या जागृतीसाठी निघालेले हे पहिले पत्र होय. याबरोबरच त्यांनी 'शेतक-याचा कैवारी', 'दीनमित्र' 'अंबालहरी' इ. वृत्तपत्रे सुरू करुन सत्यशोधक समाजाचा विचार घरोघर पोहोचविला होता.

मुकुंदराव पाटलांचे दत्तक पिता गणपतराव पाटील यांनी भालेकरांच्या प्रेरणेने इ.स. १८७७ साली 'दीनमित्र' मासिक पत्र सुरू केले. परंतु ऐन तरुण वयातच गणपतरावांचे इ.स.१८९२ मध्ये दुर्दैवी निधन झाले. त्यामुळे 'दीनमित्र' बंद पडले. ''शेतकरी वर्गाची गुलामगिरी दूर करणे, शेतकरी व कामकरी लोकांवर अनेकांनी अमंगल केला. त्याच्या मानसिक इच्छा नष्ट होऊन हे जगाचे सार्वजनिक गुलामच जन्मविले आहेत काय, असे त्यांना वाटते, अशा गुलाम बनलेल्या लोकांच्या उध्दारार्थ''असा होता.[७९] परंतु गणपतराव पाटलांच्या निधनानंतर 'दीनमित्र' पत्र बंद पडले. तसेच 'दीनबंधू', 'शेतक-यांचा कैवारी' इ. पत्रे आर्थिक संकटामुळे बंद झाली. वृत्तपत्र हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे, अशी भालेकरांची धारणा होती. तेव्हा एखादे वृत्तपत्र पुन्हा सुरू करण्यासाठी ते धडपड करू लागले. त्यावेळी अहमदनगर जिल्हयात सत्यशोधक समाजाच्या कार्यास गती आलेली होती. सोमठाणे (ता.पाथर्डी,जि.अहमदनगर) येथील शिदोरे बंधुंनी आर्थिक मदत केली. भालेकरांचा उत्साह वाढला. छपाईची यंत्रसामुग्री येऊ लागली परंतु वार्धक्यामुळे ७ मे १९१० रोजी कृष्णराव भालेकरांचे दु:खद निधन होवून त्यांचे स्वप्न अपुरे राहिले. 'दीनमित्र' पत्र निदान बारा वर्षे तरी चालवीन, असे वचन त्यांनी मुकुंदराव पाटील यांच्याकडून घेतल्यानंतर आपले प्राण सोडले. या वचनातून मुक्त होण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी २३ नोंव्हेंबर १९१० रोजी 'दीनमित्र' पत्राचे पुनरुज्जीवन करून आपल्या पत्रकारितेस प्रारंभ केला आणि अनेक संकटांना सामोरे जाऊन ५७ वर्षे अखंड चालविले. महाराष्ट्रात सातत्याने प्रदीर्घ काळ चाललेले हे एकमेव नियतकालिक होय. सत्यशोधक समाजाच्या या पर्वात कृष्णराव भालेकर, गणपतराव पाटील आणि मुकुंदराव पाटील यांनी अभूतपूर्व कार्य केल्याचे दिसून येते. एकाच कुटुंबातील दोन पिढयांनी शतकभर एका विचारासाठी ध्येयवेडे होणे ही घटना देशाच्या सामाजिक इतिहासात एकमेव असावी.

इ.स. १९१० साली 'दीनमित्र' हे सत्यशोधक समाजाचे एकमेव मुखपत्र होते. महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, गणपतराव पाटील, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ.विश्राम रामजी घोले इ. कार्यकर्त्यांच्या निधनांनंतर सत्यशोधक समाजाची चळवळ क्षीण झाली होती. या चळवळीस

इ.स.१९१० नंतर जे भरघोस यश आले त्यात मुकुंदराव पाटील यांच्या 'दीनमित्र'चा महत्त्वाचा वाटा आहे. महात्मा फुले आणि कृष्णराव भालेकरांच्या विचारांचा नंदादीप स्वत्वाचे तेल घालून त्यांनी आमरण तेवत ठेवला. 'दीनमित्र'च्या पहिल्या अंकात आपला उद्देश आणि धोरण स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे की, मुख्यत: शेतकरी आणि कारागिरादी लोकांच्या धार्मिक व सामाजिक स्थिती संबंधाने विशेष चर्चा होत जाईल. स्वार्थी आणि निर्दयी लोकांनी धर्माच्या शुध्द तत्त्वात ढवळाढवळ करून इतर हिंदू लोकांचा मनुष्यपणा पायाखाली तुडवीत आणला आहे, तो त्यांना पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी शक्य ते उपाय सुचवित जाईल. सुधारणेची ओळख मागासलेल्या लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत जाईल. विदयाप्रसार व शांतता यास अडथळा करण्यासारख्या ज्या ज्या चळचळी उपस्थित होत जातील, त्या सर्वांचा पूर्ण निषेध करीत जाईल. या उद्देशानुसार 'दीनमित्र'च्या प्रत्येक अंकाच्या मुखपृष्ठावर पुढील अभंग छापला जात असे.[८०]

ज्याशी दु:खांनी गांजिले |

तेचि सोयरे आपुले ||१||

ठेवी मुक्तीला गहाण |

काढि तयाकरिता ऋण ||२||

ऐसा दीनांचा कैवारी |

दीना मानी देवापरी ||३||

तोचि साधु सत्पात्र |

म्हणा तया दीनमित्र ||४||

मुकुंदराव पाटील हे बहुजन समाज प्रबोधनासाठी धडपड करणारे निष्ठावंत पत्रकार होते. त्यांची भूमिका लोकशिक्षकाची असल्याचे दिसून येते. धार्मिक व सामाजिक गुलामगिरीत खिचपत पडलेल्या बहुजन समाजाची आत्मशक्ती जागृत करून त्यांना आपल्या हक्कांसाठी लढायला प्रवृत्त करणे, हे मुकुंदरावांच्या पत्रकारितेचे सुत्र होते. नुसत्या कागदांच्या पानांची संख्या आणि लोकांच्या लेखांची धर्मशाळा म्हणजे संपादकांचे पत्र नव्हे, तर समाजाच्या दोषांचे निरीक्षण करून, त्यावर परिणामकारक स्वत:चे स्वतंत्र मत देणा-या संपादकांची आज फार आवश्यकता आहे, असे त्यांना

वाटत होते आणि त्याच भूमिकेतून त्यांनी ''दीनमित्र''पत्र चालविले. संपादक हा कोणत्याही एका जातीचा किंवा धर्माचा असू शकत नाही. संपादकाने आपली जातच विसरली पाहिजे. फार तर घरच्या गोष्टीत जातीचा विचार करावा, सार्वजनिकबाबीत त्याने पक्षनिष्ठा हीच जात मानली पाहिजे. स्वजातीचा दुराभिमान धरून लेख लिहिणे हे पक्षनाशाचे सर्वात मोठे विष होय.[८१] अशी व्यापक विशाल व सर्वसमावेशक दृष्टी ठेवूनच त्यांनी लेखन केलेले पाहावयास मिळते. पत्रकार हा कोणत्याही एक पक्षाचा किंवा जातीचा नसून तो स्वतंत्र विचारांचा असतो, त्याने सत्य आणि समाजोपयोगी गोष्टींचा सातत्याने पुरस्कार केला पाहिजे याविषयी एक पत्रकार या नात्यांने मुकुंदराव पाटील नेहमी जागरुक होते. लोकांना खूष करावे, उगवत्या मताचे देव्हारे मोजवावे, सत्ताधारी व्यक्तींची स्तोत्रे गावीत हे कार्य 'दीनमित्रा' ने केव्हाही केले नाही. याबद्दल त्यांनी प्रामाणिकपणे कबुली दिली आहे.[८२] ब्राह्मणेत्तर संघर्षात उच्चवर्णियांच्या पाठीवर ''आसूडाचे फटके'' मारण्यास त्यांची लेखणी जशी कचरली नाही तशीच मराठा मराठेत्तर वादात बहुजन समाजातील संकुचित वृत्तीवर प्रखर हल्ला करण्यास ती घाबरलेली दिसून येत नाही.

### ३.११.९ पहिले ग्रामीण पत्रकार

इ.स.१९१० च्या दरम्यान मराठी वृत्तपत्र हे मध्यम वर्ग व शहरी नागरी जीवनापुरतेच मर्यादित होते. पांढरपेशा मध्यम वर्गाच्या समस्यांना त्यातून प्राधान्य दिले जात होते. ग्रामीण जीवनातील प्रश्नांची उपेक्षा होत होती. अशा परिस्थितीत खेडयातील अज्ञानी आणि अशिक्षित समाजाच्या व्यथा वेदनांना वाचा फोडण्यासठी मुकुंदराव पाटील खंबीरपणे उभे राहिले. सावकार, सरकारी अधिकारी आणि धर्माच्या नावाखाली भट-भिक्षूक वर्ग ग्रामीण भागातील शेतक-यांचे चारी बाजूंनी शोषण करीत होता. धार्मिक कर्मकांड, अंधश्रध्दा, विवेकहीनता यांच्या आहारी गेलेल्या या समाजाला जागृत करण्यास मुकुंदराव पाटील यांनी लेखणी हातात घेतली. इतर साधनांप्रमाणेच वृत्तपत्र हा जीवनाचा आरसा असतो, अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच आपल्या सभोवतीची वास्तवता पत्रकार या नात्याने त्यांनी 'दीनमित्र'तून प्रतिबिंबित केलेली होती.

मुकुंदराव पाटील यांनी सोमठाणे, तरवडी यासारख्या अगदी लहानशा खेडयात 'दीनमित्र' हे ५७ वर्षे चालविले. या गावापर्यंत जाण्यासाठी साधी सडकही नव्हती. पाच सहाशे लोकसंख्या असलेल्या या खेडयात कंपोझिटर, प्रिंटर्स मिळणे अवघड होते. शहरातील कामगार खेडयात येण्यास

उत्सुक नव्हते. अशा प्रतिकुल परिस्थितीत मुकुंदराव पाटील अगतिक झाले नाहीत. त्यांनी शेतीवर काम करणा-या मजूरांना खिळे जुळविण्याचे व छपाईचे काम शिकवून आपल्या ध्येयाची परिपूर्ती केली. कामगार आजारी पडले किंवा काही कौटुंबिक अडचणीमुळे कामावर आले नाहीत तर मुकुंदराव स्वतः काम करीत आणि 'दीनमित्र'चा अंक वेळेवर प्रसिध्द करीत. बहुजन समाज जागृतीसाठी खेडयात राहून त्यांच्यात समरस होऊन लेखक, संपादक, कंपोझिटर, व्यवस्थापक या भूमिका पार पाडून वेळप्रसंगी या त्यांच्या ध्येयवादी व चिकाटी वृत्तीमुळे 'दीनमित्र' साप्ताहिकाने एक विशेष कौतुकाचा इतिहास घडविला. अशा शब्दात प्रबोधनकार ठाकरे यांनी मुकुंदराव पाटील यांच्या कार्याचा गौरव केला आहे.[८३] तर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून एका गैरसोयीच्या खेडेगावात सलगपणे ५७ वर्षे मुकुंदराव पाटील यांनी केलेल्या अलौकिक कार्यामुळे माधवराव बागलांनी ''असे उदाहरण महाराष्ट्रात नव्हे तर भारतातही दाखविता येणार नाही,''अशा शब्दात केलेला गौरव यथार्थच आहे, असे म्हणता येईल.[८४] इ.स. १९१० साली शहरापासून ४० मैल दूर असलेल्या आणि सहाशे-सातशे लोकवस्तीच्या खेडयात कुशल कामगारांच्या अभावी साप्ताहिक पत्र ५७ वर्षे अखंडपणे चाललेले उदाहरण आपल्या देशात दुसरे असेल असे वाटत नाही.

आजही या खेडेगावात राज्य परिवहन महामंडळाची बस जात नाही. पावसाळयात गावाचा संपर्क इतर गावांपासून तुटतो, अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच मराठवाडा विदयापीठाच्या वृत्तपत्र विदया विभागातील प्रा.सखाराम हिरवाळे यांनी ''मुकुंदराव पाटील हे भारतातील पहिले ग्रामीण पत्रकार''असल्याबद्दल त्यांचा यथोचित गौरव केला आहे.[८५] मध्यमवर्गीय नागरी जीवनापुरत्या मर्यादित असलेल्या वृत्तपत्राला ग्रामीण जीवनाचे अमर्याद क्षेत्र मुकुंदराव पाटील यांनी प्रथमच खुले केले आहे. श्रमजीवी वर्गाबद्दल त्यांच्या ठिकाणी असलेल्या ममत्वामुळे ते पहिले ग्रामीण पत्रकार ठरतात.

मुकुंदराव पाटील हे स्वतंत्र, निर्भीड व तत्त्वनिष्ठ पत्रकार होते, अलीकडे वृत्तपत्राचा व्यवसाय भांडवलदारांच्या हाती जाऊ लागला आहे. भांडवलदारांनी विकत घेतलेले संपादक त्यांच्या हातातील बाहुले होऊन तालावर नाचताना दिसतात. मुकुंदराव पाटील स्वतंत्र विचारसरणीचे पत्रकार होते. छत्रपती शाहू महाराजांनी त्यांचे कर्तृत्व ओळखून वेळोवेळी आर्थिक साहाय्य केले होते. 'दीनमित्र' मुंबई, पुणे किंवा कोल्हापूर या शहरातून प्रकाशित करण्यासाठी एक योजना मांडून त्यासाठी आर्थिक

मदत देण्याची तयारी दर्शविली होती. पण मुकुंदराव पाटील यांनी आपल्या ''स्वतंत्र प्रतिभेचे अंकुर जळून जातील'' या भयास्तव प्रतिसाद दिला नाही. शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली म्हणून त्यांच्या चुकीच्या धोरणांकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही किंवा त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्नही केला नाही. त्यांच्या सडेतोड व निर्भीड लेखांनी काही ब्राह्मणेत्तर पुढा-यांचा त्यांच्यावर रोष झाला होता. त्यांनी ब्राह्मण समाजातील दोषांवर जसे हल्ले चढविले, तसेच बहुनसमाजातील दोषांवर सुध्दा केलेले पाहावयास मिळते. बहुजन समाजातील मराठा समाजाच्या जातीयवादी धोरणावर त्यांनी परखडपणे लिहिलेले दिसून येते. ''आम्ही शूर, आम्ही क्षत्रिय, आम्ही अमूक अशा प्रचंड बाता मारणा-या मराठयांचे महाराष्ट्रात, मराठी भाषेत एकही मराठी साप्ताहिक नसावेत व त्यांच्यावर बांडगुळाप्रमाणे नुकतेच लटकलेल्या जातीत खंडोगणती पत्रे व पुस्तके असावी, यावरून मराठी अंगाने सशक्त पण बुध्दीने अशक्त आहेत.'' अशी निर्भीड टीका त्यांनी केली.[८६] प्रस्तुत विचार ब्राह्मणेत्तर पक्षाच्या हिताच्या दृष्टीनेच त्यांनी व्यक्त केलेले दिसून येते. व्यक्तीच्या हिताअहिताकडे अगर रागालोभाकडे त्यांनी लक्ष दिले नाही. निर्भीड व सडेतोड टीका मग ती व्यक्ती कोणी सन्माननीय पुढारी असो किंवा धर्मगुरु, राजा - महाराजा, असो की, सत्यशोधक समाजाचा पुढारी, कोणाची मर्जी जाईल म्हणून त्यांची लेखणी कधीही कचरली नाही विशिष्ट ध्येयवाद, सेवाभावी वृत्ती आणि समाजहितैषी दृष्टीनेच त्यांनी लेखन केलेले आपणास पाहावयास मिळते.

मुकुंदराव पाटील हे व्यावसायिक पत्रकार नव्हते. 'दीनमित्र'हे पत्र बातम्या छापणारे वर्तमान पत्र नसून, बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी प्रयत्न करणारे विचारपत्र, मतपत्र होते. सनसनाटी वार्ता, खून, चो-या, आत्महत्या, भविष्य आणि चमत्कृतीजन्य घटना यांना प्राधान्य देऊन वाचकांचे तात्पुरते लक्ष वेधून घेणारे 'दीनमित्र'हे नव्हते, तर बहुजन समाजाच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडून त्यांना आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून देणारे विचारपत्र होते. कर्मठ व सनातनी धर्मगुरु, शेतक-याचे शोषण करणारे शेठ, सावकार यांचे ढोंग त्यांनी उघडकीस आणले, बुवाबाजी, अंधश्रध्दा, रुढी व परंपरा यांच्यावर त्यांनी कोरडे ओढले.

गांधीजींचे धोरण बहुजन समाजाच्या हिताचे नाही म्हणून त्यांनी या चळवळीपासून दूर राहून शिक्षण आणि सावकाराकडून मिळणा-या सवलतींवर बहिष्कार टाकू नये म्हणून उपदेश केला. काँग्रेसच्या भ्रष्ट कारभारावर तोफा डागल्या. त्यामुळे ढोंगी पुढारी, भोंदू, धर्मगुरु, कपटी देशभक्त,

धूर्त सावकार या सर्वांच्या रोषास त्यांना बळी पडावे लागले. परंतु त्यांनी आपले विचार निर्भीडपणे व्यक्त केले. उपेक्षित कष्टकरी वर्गाची बाजू मांडणारी महाराष्ट्रात जी थोडी वृत्तपत्रे आहेत, त्यात 'दीनमित्र'चे महत्त्वाचे स्थान दिसून येते. 'संदेशकार' अच्युत बळवंत कोल्हटकरांनी महाराष्ट्रातील लोकाभिमुख आणि विचारप्रवर्तक वृत्तपत्रांचे तीन क्रमांक लावले होते. त्यात 'दीनमित्र'ला तिसरे स्थान दिले होते. कोल्हटकरांसारख्या ब्राह्मण विचारंतांने 'दीनमित्र'चा केलेला गौरव म्हणजे मुकुंदराव पाटलांच्या पुरोगामी विचारवंताचा गौरव आहे. त्यांना जनतेचे लोकरंजन करून लोकप्रियता मिळवायची नव्हती तर हिंदू जनतेला आपल्या अधःपतनापासून वाचविण्यासाठी दिव्य संदेश होता. व-हाड, खानदेश, गोवा, जम्मू काश्मीर, पेशावर, कराची, बेळगाव, धारवाड, कोकण अशा दूरवर 'दीनमित्र'चा वाचक पसरलेला होता, असे त्यांच्या वितरणाच्या यादीवरून लक्षात येते.

इ.स. १९३४ नंतर मुंबई इलाख्यातील ब्राह्मणेतर वंशातील मोठा गट केशवराव जेधेच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये गेला. तसेच व-हाड, मध्य प्रांतातील ब्राह्मणेत्तर पक्षांचे लोक मुख्यमंत्री खेर यांच्या पदच्युतीनंतर कॉग्रेस संघटनेत गेले. ब्राह्मणेतर पक्षाचे विघटन होऊन त्या पक्षाची मंडळी काँग्रेसमध्ये गेली, तरी मुकुंदराव पाटील यांनी काँग्रेसला विरोध करण्याचा महात्मा फुल्यांचा वारसा तसाच पुढे चालविलेला दिसून येतो. सत्तेचा मोह त्यांना भुरळ घालू शकला नाही. म्हणूनच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यांचा गौरव करतांना म्हटले की, ''अनेक नामवंत सत्यशोधकांनी आपले क्षेत्र सोडून राजकारणात प्रवेश केला पण फार थोडी धीराची व चिकाटीची माणसे आपल्या क्षेत्रात आपला नांगर एकाकी चालवित राहिली, त्यांच्याच पैकी मुकुंदराव पाटील हे एक आहेत.''[८७] देशाला स्वातंत्र मिळाल्या नंतर अनेक पक्ष सत्तेचे राजकारण करण्यात पुढे सरसावले. मुकुंदराव पाटील हे नेहमीच सत्ताविन्मुख राहून शेतक-यांच्या प्रश्नासाठी संघर्ष करीत राहिले. ते स्वतः शेतकरी समाजातील असल्यामुळे त्या वर्गाची दुःखे त्यांनी अनुभवली होती. त्यांना वेशीवर टांगण्यासाठी आयुष्यभर पत्रकारितेचे व्रत त्यांनी स्वीकारले होते.

शेतकरी, ग्रामीण भागातील मागासलेल्या समाजातील प्रश्न प्रभावीपणे मांडले जावेत आणि वृत्तपत्रांनी समाजप्रबोधनाचे साधन बनून समाजाची उन्नती घडवून आणावी हा विचार विसाव्या शतकाच्या आरंभी आग्रहपूर्वक मांडणारे मुकुंदराव पाटील हे थोर विचारवंत व निर्भीड पत्रकार होते. आर्थिक बळ नाही, पाठीशी कोणतीही संघटना नाही, ज्या सामाजिक घटकांचे प्रबोधन करण्यासाठी

वृत्तपत्र चालवायचे तो शेतकरी समाज कमालीचा मागासलेला व अशिक्षित होता. उच्चवर्णीयांचा विरोध सातत्याने होत होता. अशा प्रतिकूल वातावरणात ''केवळ समाज प्रबोधनाचे उद्दिष्ट पुढे ठेवून ध्येयवेडे होऊन जीवनभर त्याग करून वृत्तपत्र व्यवसायासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारा मुकुंदराव पाटील यांच्या सारखा वृत्तपत्रकार म्हणजे महाराष्ट्राच्या थोर समाजसुधारकांच्या मालिकेतील एक श्रेष्ठ नररत्न होय. अशा शब्दात त्यांची थोरवी माजी केंद्रीय कृषिराज्यमंत्री डॉ.आण्णासाहेब शिंदे यांनी गाईली आहे.''[८८]

मुकुंदराव पाटील यांनी एका समाजशिक्षकाच्या भूमिकेतून विपुल वृत्तपत्रीय लेखन केलेले पाहावयास मिळते. अग्रलेख, स्तंभलेख, विविध सदरांच्या माध्यमातून सत्यशोधकी विचारांचा प्रचार आणि प्रसार केला. जे 'दीनमित्र' मधून क्रमशः प्रकाशित होत गेले. सत्यशोधक चळवळीस भक्कम जनाधार प्राप्त करून देण्यात 'दीनमित्र'चे मोलाचे योगदान राहिलेले दिसून येते. एकीकडे सत्यशोधक विचारातील तात्त्विक बाजू सांभाळणे आणि दुसरीकडे 'दीनमित्र'ची लोकप्रियता टिकवून ठेवणे, या दुहेरी भूमिकेतून 'दीनमित्र' मधील वृत्तपत्रीय लेखन सिध्द झाले आहे.

**३.११.१० सामाजिक लेखन**

'सामाजिक बांधीलकी' हे साहित्यिकाने स्वीकारलेले जीवित तत्त्व असते. तो केवळ एक विचार म्हणून ते स्वीकारत नसून ती त्याच्या जगण्याचीही रीत असते. समान स्थिती, गती, परिस्थिती असतानाही काही साहित्यिक जाणीवपूर्वक परिवर्तनवादी साहित्य लिहितात. प्रस्थापितांचा प्रचंड विरोध पचवून जननिष्ठ साहित्याची परंपरा जोपासतात, तेव्हा तीव्र स्वरुपाची सामाजिक बांधीलकी हे त्याचे मूलभूत कारण असते. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे काही देणे लागतो ही माणुसपणाची भावना सामाजिक बांधिलकीच्या मुळाशी असते.

''समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही एका राजकीय आणि वैचारिक भूमिकेचा आणि कार्यक्रमाचा पुरस्कार आपल्या कलाकृतींमधून करणारा लेखक 'प्रतिशब्द' अथवा 'बांधील' म्हणून ओळखला जातो. त्याची त्याच्या भूमिकेशी आणि समाजाशी बांधीलकी असते.''[८९]

वर्षानुवर्षापासून चालत आलेले स्त्री, शूद्र, बहुजनांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय शोषण थांबविणे, मानवीय मूल्यधिष्ठित एकसंघ समाज निर्माण करणे, तसेच बहुजनांना त्यांचे नैसर्गिक अधिकार प्राप्त करून देणे यासाठी ब्राह्मणादी उच्चवर्णियांचे वर्चस्व हनन

करून, त्यांच्या एकाधिकारशाहीला शह देणे, हे सत्यशोधकांनी आवश्यक कार्य म्हणून स्वीकारलेले दिसून येते. त्यांचे साहित्यही याच भूमिकेतून निर्माण झाले आहे. स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निवारण, अज्ञाननिवारण आदी कार्यातून सत्यशोधकांनी बहुजनांची वैचारिक जागृती घडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. वृत्तपत्रे, विविध सभा, संमेलने, परिषदेतील भाषणे, साहित्यलेखनातून समाजसुधारणेसाठी पोषक वातावरण निर्माण केले. बहुजनांच्या न्याय हक्काची मागणी सरकार दरबारी केली. जगातील इतर आणि भारतीय हिंदू समाजाची स्थिती, अधोगतीचा तुलनात्मक विचार करून सामाजिक परिवर्तनाची अपरिहार्यता स्पष्ट केली. प्रसंगी उच्चवर्णीय तसेच अज्ञानी बहुजनांकडून छळ होऊनही सत्यशोधकी भूमिकेशी तडजोड न करण्याचे जे नीतिधैर्य दाखविले, त्याचे उच्चकोटीची सामाजिक बांधिलकी हे एक महत्त्वाचे कारण ठरते.

आधुनिक महाराष्ट्रात सत्यशोधकीपरंपरेतील माळी समाजाने सत्यशोधक चळवळ आणि सत्यशोधकी साहित्य परंपरेच्या रुपाने मराठी समाजाची प्रदीर्घ काळापासून सेवा केली आहे. "पूर्वग्रहदुषितपणा आणि जातीगंडनिर्मित संकुचितपणा बाजूला सारून देशी वाङ्मयाचा बारकाईने अभ्यास केल्यास, आधुनिक मराठीवाङ्मयाच्या किती तरी प्रवाहाची मुहूर्तमेढ सत्यशोधकी संप्रदायाने रोवल्याचे स्पष्ट होते. फुले, भालेकर, लोखंडे हे तिघेही माळी समाजाचे "[९०] सत्यशोधक समाजाचे संस्थापक सदस्य होते. पैकी कृष्णराव भालेकर हे मुकुंदराव पाटील यांचे जनकपिता आहेत. त्यांचे दत्तकपिता गणपतराव पाटील नात्याने भालेकरांचे भाचे होते. अर्थात १९ व्या शतकात सुरु झालेले समाजसुधारणेचे कार्य मुकुंदराव पाटील यांच्या रुपाने पुढे चालू राहिले.

सत्यशोधकांनी स्त्री, शूद्र, शेतकरी वर्गाच्या विकासासाठी दीर्घकाळ प्रयत्न करणे, ही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वाची घटना ठरते. कोणत्याही आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रलोभनास बळी न पडता, निष्ठेने आणि धैर्याने परिवर्तनवादी विचार समाजात पेरणे, यातून प्रचंड सामाजिक बांधिलकी आणि जननिष्ठा स्पष्ट होते. ही सामाजिक बांधिलकी मुकुंदराव पाटील यांना वंशपरंपरेने प्राप्त झालेली दिसून येते. ते भालेकर कुटुंबातील दुसरे मोठे सत्यशोधक ठरतात. हिंदूस्थानातील सामाजिक परिस्थिती आणि शेतीव्यवसाय या विषयी मुकुंदराव पाटलांच्या विचारांचे विस्तृत विवेचन प्रकरण ४ मध्ये केलेले आहे.

## संदर्भ


१. महात्मा फुले गौरवग्रंथ, अनुक्रमणिका, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई १९८२, पृष्ठ ८३

२. कित्ता, पृष्ठ ८८

३. एरंडे अशोक विष्णुपंत, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, स्फूर्ती प्रकाशन, नगर प्र.आ, १२ नोव्हे १९९६, पृष्ठ १८

४. कित्ता, पृष्ठ १८

५. पाटील मुकुंदराव, पत्रसंग्रह, तुकाराम पिंजन याचे पाटील मुकुंदराव यांना पत्र, दि.११ जुलै १९२३

६. फडके य.दि., व्यक्ती आणि विचार, श्री विदया प्रकाशन, पुणे १९७९, पृ.४३

७. फडकुले निर्मलकुमार संपा.(एरंडे अशोक), अखिल भारतीय सत्यशोधक समाज, २८ वे अधिवेशन, १९९९, तरवडी (मुकुंदनगर) पृ.१-२

८. क्षीरसागर व्ही.एस, आधुनिक भारताचा इतिहास १७५७-२००५, के. सागर प्रकाशन, १९९४, पृ.१५४

९. क्षीरसागर शोभादेवी, आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते २००५), के. सागर प्रकाशन, पुणे, १९९४, पृष्ठ १५५

१०. कित्ता, अखिल भारतीय सत्यशोधक समाज, पृ.३,४

११. कित्ता, अखिल भारतीय सत्यशोधक समाज, पृ.४

१२. गेल ऑमव्हेट, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१५ ऑगस्ट १९९५, पृ.१२५

१३. ढगे अशोकराव, संपा.(एरंडे अशोक), अखिल भारतीय सत्यशोधक समाज, २८ वे अधिवेशन, १९९९ तरवडी (मुकुंदनगर), पृ.३९

१४. कित्ता, पृ.३९

१५. कित्ता, पृ.३९

१६. कित्ता, पृ.४०

१७. कित्ता, पृ.४०

१८. कित्ता, पृ.४०

१९. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मय गृह, पाचवी आवृत्ती, डिसेंबर २००७, पृ.२३

२०. चौसाळकर अशोक, महात्मा फुले यांचे लोकशाही विषयक विचार, नवभारत, सप्टेंबर, १९८२, पृ.२८-२९

२१. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.२५

२२. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.२७

२३. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.२८

२४. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.३०

२५. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.३२

२६. कित्ता, चौसाळकर अशोक, पृ.४२, ४३

२७. रायकर सी.(संपादक), कृष्णराव भालेकर समग्र वाड्.मय, आ-१, पुणे, १९८३, पृ.२०५

२८. तारकुंडे सी.र., बाह्मणेत्तर व मराठे हयांच्या चळवळीचा पूर्वेतिहास आणि मराठयांची पूर्वपिठीका, आ.१, पुणे, १९२२, पृ. १९

२९. कित्ता, पृ.२१

३०. कित्ता, एरंडे अशोक, पृष्ठ ५०

३१. कित्ता, एरंडे अशोक, पृष्ठ ५०

३२. 'दीनमित्र', वर्षे ४४, अंक.१५, दि.१३-१-१९५४

३३. कित्ता, एरंडे अशोक, पृष्ठ ५०, ५१

३४. माळी गजमल, गेल्या शतकातील थोर पुरुष, जोतिविचार, दीपावली १९८२, पृ.२७

३५. कित्ता, पृ.२७

३६. कवले ह.दा.(संपादक), रा.रा.कृ.पा.ंभालेकरांची भाषणे, १ जाने १९०३, जबलपूर

३७. कित्ता, तारकुंडे सी.र., पृ.२०

३८. कित्ता, कवले ह.दा.(संपादक), पृ.३

३९. कित्ता, एरंडे अशोक (संपा), पृ.५१

४०. कित्ता, एरंडे अशोक, (संपा), पृष्ठ ५२

४१.	कित्ता, भालेकरांची भाषणे, पृ.३

४२.	कित्ता, एरंडे अशोक (संपा), पृष्ठ ५२

४३.	'दीनमित्र', एप्रिल १८८८, वर्षे.१, अंक.१, पृ.११

४४.	'दीनमित्र', डिसेंबर १९५४, वर्षे.४५, अंक. ११, पृ.२

४५.	बनकर र.दे.(संपादक), भालेकरकृत शास्त्राधार, आ-१, मुंबई, १९२२, पृ.२८

४६.	फाटक न.र., भारतीय राष्ट्रवादाचा विकास, १९५१, पृ.४०

४७.	पवार जयसिंगराव (संपा)., राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्र.आ., जानेवारी २००१, पृ.१४०

४८.	कित्ता, पृ.१४०

४९.	कित्ता, पृ.१४०

५०.	कित्ता, पृ.२०३

५१.	माळी मा.गो, रा.ब.नारायण मेघाजी लोखंडे चरित्र आणि समग्र वाङ्मय, निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, प्र.आ., जानेवारी २०१०, पृ.१०

५२.	कित्ता, पृ.५

५३.	कित्ता, पृ.६

५४.	माळी गजमल, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, राजमुद्रा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., ऑगस्ट १९९६, पृ.६६

५५.	कित्ता, पृ.६२

५६.	कित्ता, पृ.१९८

५७.	कित्ता, पृ.२०७

५८.	गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकी साहित्याचा इतिहास, (खंड दुसरा) सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर, प्र.आ.,४ नोव्हेंबर २०१३, पृ.४३७

५९.	वाबळे विश्वनाथराव, शिवनेर, अखिल भारतीय सत्यशोधक समाज विशेषांक, १९९८, पृ.४४

६०.	कित्ता, पृ.४४

६१.	कित्ता, पृ.४४

६२. फडके य.दि., आण्णासाहेब लठ्ठे , श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ४११०३०, प्र.आ.,२१ मे १९८९, पृ.४४

६३. कित्ता, पृ.६४

६४. कित्ता, पृ.११५

६५. कित्ता, पृ.१३७

६६. कित्ता, पृ.१५६

६७. ‘दीनमित्र’ सिल्व्हर ज्युबली अंक, २६ जानेवारी १९३८, पृ.२

६८. कित्ता, पृ.२

६९. जाधव पंजाबराव, दीनमित्रकार पाटील मुकुंदराव, चक्रमुद्रित लेख, (प्रथम पुण्यतिथी निमित्त लेख), ४ डिसेंबर १९६८

७०. सा.दीनसेवा, ४ डिसेंबर १९६८

७१. पाटील मुकुंदराव, पत्रव्यवहार, श्री.शंकर लाठोरे यांचे मुकुंदराव पाटील यांना पत्र, दि.१९ डिसेंबर १९४५.

७२. ‘दीनमित्र’ सिल्व्हर ज्युबली अंक, पृ.२

७३. बरबडे गो.गो., भालेकर कृष्णराव पांडुरंग यांचा संक्षिप्त इतिहास, हस्तलिखित

७४. बागल माधवराव (संपा), सत्यशोधक हिरक महोत्सव ग्रंथ, रा.पाटील मुकुंदराव व दीनमित्राचे कार्य, कोल्हापूर, १९३४, पृ.१३

७५. पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्षे २२, अंक १, ४ नोव्हें. १९३१, पृ.४८-४९

७६. पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्षे ५०, अंक १, १०डिसेंबर १९६०, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, पृ.५८

७७. कित्ता, पृ.६०

७८. काळे गोविंद, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांची खंडकाव्ये, पृ.६७

७९. पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, २३ नोव्हें.१९१०, वर्ष १, अंक १

८०. कित्ता, वर्ष ३२, अंक २

८१. कित्ता, वर्ष ४५, अंक १

८२. ठाकरे प्रबोधनकार, म.फुले पंथीय अखेरचा सत्यशोधकीय हरपला, मार्मिक, ४ डिसेंबर १९६७

८३. बागल माधवराव, बहुजन समाजाचे शिल्पकार, ठोकळ प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९६६, पृ.१६६

८४. हिवराळे सुखराम, भारतातील पहिले ग्रामीण पत्रकार मुकुंदराव पाटील, दै. लोकमत, ३ जानेवारी १९८८

८५. कित्ता, ‘दीनमित्र’, वर्ष ३, अंक ३८

८६. पाटील मुकुंदराव, विचार किरण भाग १, दीनमित्र प्रेस, तरवडी, १९५२, प्रस्तावना, पृ.३

८७. शिंदे आण्णासाहेब, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील, महाराष्ट्र टाईम्स, २५ सप्टेंबर १९८३

८८. डहाळे वसंत, गणोरकर प्रभा, व इतर (संपा), मराठी वाङ्मयीन संज्ञा, संकल्पना कोश, जी.आर. भटकळ फाऊण्डेशन, मुंबई, प्र.आ., डिसेंबर २००१, पृ.२७९

८९. कित्ता, ‘दीनबंधू’कृष्णराव भालेकर, पृ.१३९

९०. कित्ता, ‘दीनबंधू’कृष्णराव भालेकर, पृ.१३९

# प्रकरण चौथे

# भारतातील सामाजिक परिस्थिती आणि शेतीव्यवसाय :

# मुकुंदराव पाटील यांचे विवेचन

४.१ प्रास्ताविक

४.२ भारतातील जातीव्यवस्था विषयक मुकुंदराव पाटील यांचे विवेचन

४.३ जातीखंडनाचा विचार

४.४ बलुतेदारी पद्धतीस विरोध

४.५ धार्मिक प्रबोधाची लढाई

४.६ ब्राम्हणी पुरोहितशाही विरोधी संघर्ष

४.७ कुलकर्णी या सामाजिक राजकीय स्थानास विरोध

४.७.१ गावातील कुलकर्ण्यांचे स्थान

४.७.२ कुलकर्ण्यानी शेतक-यांची चालवलेली पिळवणूक

# प्रकरण -चौथे

# भारतातील सामाजिक परिस्थिती आणि शेतीव्यवसाय : मुकुंदराव पाटील यांचे विवेचन

## ४.१ प्रास्ताविक

शेतकरी जगाचा पोशिंदा, बळीराजा, शेतकरी राजा हे तत्वतः खरे असले तरी केवळ एवढयाने शेतक-याचे समग्र जीवन प्रतिबिंबित होत नाही. उलट कधी ही शेतशिवार न पाहिलेल्या, जाणीवपूर्वक हातापायाला माती लागू न देण्याची कायम तसदी घेणा-या प्रतिष्ठित सुधारणावाद्यांनी असे गुळगुळीत शब्द वरवर वापरुन शेतकरी आणि येणा-या नवीन पिढीची कायम दिशाभूल केलेली दिसते. वास्तविक राष्ट्रीय संपत्तीची निर्मिती फक्त शेतकरी आणि कामगार करीत असतात. संपूर्ण जगाच्या कल्याणाशी त्यांचे श्रम जोडलेले असतात. पण त्यांचेच जगणे मात्र अत्यंत हालाखीचे कष्टप्रद असते. त्यांच्या दुःखाशी नाळ जोडण्याची गरज मात्र कधीच कुणाला वाटत नाही. यातून शेतकरी आणि इतर समाज यांच्यात एक प्रचंड कृष्णविवर निर्माण होते. जे दुर्लक्ष, अपेक्षा, अनुदान अवहेलना, उपहास यांनी कायम भरलेली असते. शेतकरी आणि समाज यांच्यात निर्माण झालेले तुटलेपण आज पर्यंत कायम आहे. शेतक-याच्या कष्टावर पोसलेली, प्रत्यक्ष श्रमाशी नाते असलेली परोपजीवी बांडगुळे, तरीही धर्म, अर्थ आणि राज्यसभेत केंद्रस्थानी आहेत. प्रतिष्ठा, मानसन्मान उपभोगतांना  दिसत आहेत. दुर्देवाने हे मान्य करावे लागते. शेतक-यांच्या सुखदुःखात सहभागी झाल्याचे नाटक करणारे पैशाला पासरीभर सापडतील पण अंतःकरणातून शेतक-याशी समरस होवू पाहणारा विरळाच म्हटला पाहिजे. मुकुंदराव पाटील यांचे नाव शेतक-यांविषयी अत्यंत तळमळीने कार्य आणि लेखन करणा-यांमध्ये अत्यंत आदराने आणि अग्रक्रमाने घ्यावे लागते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारतातील जातीव्यवस्थेविषयक मुकुंदराव पाटील यांचे विवेचन, जातीखंडणाचा विचार, बलुतेदारी पध्दतीस विरोध, ब्राह्मणी पुरोहितशाही विरोधी संघर्ष, कुलकर्णी या सामाजिक राजकीय स्थानास विरोध यांचा विचार केलेला आहे.

## ४.२. भारतातील जातीव्यवस्था विषयक मुकुंदराव पाटील यांचे विवेचन

अपरिवर्तनीय जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे खास वैशिष्ट राहिले आहे आणि तेच बहुजन समाजाच्या शोषणाचे मूलभूत कारणही राहिलेले आहे. जातीव्यवस्थाविषयक अनेक विचारवंतांनी आजवर कठोर चिकित्सा केली आहे. परंतु सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांनी या संदर्भात केलेले विवेचन जाती व्यवस्थेच्या श्रृंखला शिथिल होण्यास उपयुक्त ठरणारे आहेत. त्याचा वेध प्रस्तुत ठिकाणी घेतलेला आहे.

भारतात वैदिक काळापासूनच वर्णव्यवस्था प्रचलित झाली होती. याच वर्ण व्यवस्थेचे पुढे हळूहळू जातीव्यवस्थेमध्ये रुपांतर झाले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, क्षूद्र, ही वर्ण व्यवस्थेची चार अंगे पुढे जाती व्यवस्थेची स्तंभ बनली. समाजाची विभागणी या जातीव्यवस्थेत होत गेली. यात ब्राह्मण सर्वात श्रेष्ठ मानले जात. यातून पुढे खेडयात बारा बलुतेदारी पध्दत अस्तित्वात आलेली होती. या पध्दतीने खेडे स्वयंपूर्ण बनले खरे पण प्रत्येक जातीतील लोंकाना आपल्या जातीचीच कामे करावी लागत होती. क्षूद्र जातीतील लोकांना तर गावकुसाबाहेर रहावे लागत असे व त्यांना अहोरात्र गावातील पाटील, कुलकर्णी यांच्या जमिनीवर राबावे लागत असे. ब्राह्मण जातीतील लोकांनी राजांकडून जमिनदानाच्या रुपाने खुप जमीनी मिळविल्या व या जमिनीवरील महसुल वसूलीची कामे स्वतः ब्राह्मण करु लागले. त्यामुळे गावपातळीवरील कुलकर्णी हा अधिकारी महत्त्वाचा बनला होता. ज्ञानाच्या अभावामुळेच ही सर्व प्रतिकुल परिस्थिती शेतक-यावर निर्माण झाली होती.

शेतक-यांची ही बिकट परिस्थिती शेतक-यांच्या अज्ञानी, अंधश्रध्दाळूपणा यामुळे ओढवली आहे. या अंधश्रध्देतून शेतक-यांना बाहेर काढायचे तर त्यासाठी त्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे. असे मुकुंदराव पाटलांना वाटत होते. त्यांच्या मते, “जोपर्यंत खेडयातील शेतकरी जातीचे जोखड झुगारुन शेतीचे नवनवीन ज्ञान तंत्रज्ञान आत्मसात करत नाही तोपर्यंत खेडयातील प्रगती अशक्य आहे.”[१] खेडयातील शेतक-यांचा त्याच्या अज्ञानापोटी उच्च जातीतील लोक छळ करत आहेत. हा छळ मुकुंदराव पाटलांना सहन होत नव्हता. त्यामुळे त्यांनी आपल्या लेखनीव्दारे ‘दीनमित्र’ या वृत्तपत्रातून या लूटीविरोधी प्रहार केला.

प्रत्येक जातीतील लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असावे. शेतक-याच्या अज्ञानीपणाचा फायदाच जास्त घेतला जातोय याबद्दल मुकुंदराव पाटील 'आपल्या आपण काय केले ?' या लेखात म्हणतात की, "आपल्या शेतकरी समाजाच्या आश्रयाने कित्येक जातींनी स्वतःच्या उदरनिर्वाहाची तरतुद लावून ठेवली आहे. ब्राह्मण, भट बडवे, पुजारी, जोगी, वगैरे जातींची लाखो कुटुंबे आणखी शेतकरी समाजाच्या आश्रयाने पोट भरीत आहे. तीर्थ देवस्थाने वगैरे शेकडो संस्था आपल्या लोकांच्या पैशातून चालत आहे. प्रत्येक तीर्थाच्या ठिकाणी दरमहा किंवा दरसाल तुपपोळीची ब्राह्मण भोजने उडत आहेत. ती आपल्या पोटाला चिमटा बसून घडत आहेत. दरोबस्त तीर्थाच्या ठिकाणच्या पूजा-यांच्या येथे सोन्याचांदीचे दागीने भरले आहेत. ते सर्व आपल्या लोकांच्या स्त्रीयांच्या नाकात बाभळीचे काटे बसून साचले आहेत. असा हा आपला समाज दुस-यांच्या तरतुदी करण्यास कर्णापेक्षाही कर्ण आहे. आणि स्वतःच्या सुधारणेकडे लक्ष देण्यास मुर्खापेक्षाही मुर्ख आहे."[२] मुकुंदराव पाटील येथे स्पष्ट करतात की, जसे इतर जातीच्या पुढा-यांनी आपल्या जातीच्या सोयी साठी व उदर निर्वाहासाठी देवस्थाने स्थापन केली. या देवस्थानांना देणगी देण्याचा प्रघात या ब्राह्मण पूजारी मंडळींनी सुरु केला. आज ती देवस्थाने आपल्या लोकांच्या कष्टातूनच चालत आहे.

सामान्य लोक ब्राह्मणाच्या नादी लागून आपल्या जवळचा पैसा धार्मिक कार्यासाठी खर्च करतात प्रसंगी घरातील स्त्रीयांची दागिने मोडली जातात व ब्राह्मणांना मंदिरांना देणगी दिली जाते. यामुळे या सामान्य जातीतील शेतक-यांचा काय फायदा होतो. आपल्या पैशातूनच देवस्थानचा खर्च चालवला जातो. त्याही पेक्षा महत्त्वाचे म्हणजे ही ब्राह्मण मंडळी जी या देवस्थानचा कारभार बघतात ती या पैशातूनच दिवसेंदिवस श्रीमंत होत चालली आहेत. ही दरी नाहीशी करायला पाहिजे यासाठी मुकुंदराव पाटील खेडयातील जाती व्यवस्थेला दोष देतात.

खेडयात जी बलुतेदारी पध्दत आहे तीच मुळात चुकीची आहे. त्यामुळे खेडयातील लोंकांची उपजीविका चालते खरी पण शेतक-यांच्या जवळ काहीही शिल्लक राहत नाही. त्यासाठी सामान्य जातीतील लोकांना शिक्षण देणे आवश्यक आहे. सामान्य जातीतील लोकांप्रमाणे शेतक-यांसाठी शेतकी शाळा सुरु कराव्यात अशी त्यांची इच्छा होती. शेतकी शाळेमुळे शेतक-यांना कमी कष्ठात जास्त उत्पादन कसे मिळते याचे ज्ञान होईल व हा विविध जातीतील शेतकरी तीच जून्या पध्दतीची

औजारे वापरतो त्यामुळे त्याला वेळ लागतो आणि उत्पादनही कमी मिळते त्यासाठी मुकुंदराव पाटील शेतीचे आधुनिक तंत्रज्ञानांनी बनवलेले औजारे वापरण्याचा सल्ला देतात. जुन्या चालीरीती सोडल्या तर आपला शेतकरी ही चांगली प्रगती घडवून आणील असा विश्वास मुकुंदराव पाटील व्यक्त करताना दिसतात. त्यासाठी शेतक-याने जातीव्यवस्थेच्या गर्तेतून बाहेर आले पाहिजे व सर्व जून्या चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत लोक वडीलांच्या चालीरीतीलाच घट्ट धरुन बसले आहेत.

जूने सोडून नवे घडण्यात काय अर्थ असे विचार आपला शेतकरी करतो. कृष्णावतारातील बळरामाचा नांगर व आताच्या बळीबा पाटलाचा नांगर यात तीळभरही फरक झाला नाही मग आपली प्रगती कशी होणार, यासाठी मुकुंदराव पाटील म्हणतात, “तुम्ही वडलांची चाल सोडून काही करीत नाही व तसे करणे चांगले नाही असे जर तुम्हास वाटते तर ज्यांच्या वडलांस पूर्वी सत्यनारायण कसा होता हे माहितीसुध्दा नव्हते, त्यांची मुले आपल्या वडलांची चाल सोडून हे नवीन सत्यनारायण का बरे घालतात.”[३] आजचा आपला शेतकरी अंधश्रध्दाळू बनला आहे तो जून्या चालीरीती जूने व्यवसाय सोडत नाही व त्यात आधुनिकताही आणत नाही वडीलोपार्जीत चालत आलेला व्यवसाय मुले करतात परंतू पूर्वीचा खर्च व मिळणारे उत्पन्न, आणि आजचे उत्पन्न व खर्च यात मोठी तफावत आहे. मग बदलत्या काळाबरोबर आपण आपल्या व्यवसायांतही बदल केला पाहिजे.

मुकुंदराव पाटील येथे ब्राह्मणेत्तर जातीतील लोकांना सांगण्याचा प्रयत्न करतात की, तुम्ही वडलोपार्जीत कामे सोडून देवून आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय करण्यास सुरुवात करावी तसेच त्या व्यवसायामध्ये नवनवीन तंत्रज्ञान अवगत करणे आवश्यक आहे म्हणून खेडयातील लोकांना शिक्षणासाठी शेतकी शाळा सुरु करण्याचा आग्रह धरतांना दिसतात. येथे मुकुंदराव पाटील खेडयातील लोकांनी जूनी अवजारे बदलून नवीन अवजारे घ्यावी कारण यामुळे कमी वेळेत जास्त काम करता येवू शकते यासाठी आग्रह धरताना दिसतात.

खेडयातील आजच्या परिस्थितीवर मुकुंदराव पाटील आपल्या लेखणीव्दारे प्रहार करतांना ते म्हणतात की, खेडयात एवढा जातीभेद मानतात की एका जातीतील लोक तो अमुक एका जातीतील आहे म्हणून त्याला स्पर्श करायचा नाही याच पद्धतीमुळे खेडयातील प्रगती होऊ शकली नाही. हा स्पृश्य अस्पृश्य भेदभाव जो केला जातो त्याची कारणे विषद करतांना मुकुंदराव पाटील

सांगतात की, "प्राचीन काळी ऋषींनी त्यांच्या तपःसाधनेमध्ये व्यत्यय यायला नको म्हणून ही प्रथा चालवली व आपण आजही ही प्रथा डोळे झाकून चालवतो. खरे म्हणजे माणूस हा जन्मतःच स्वतंत्र असतो. परंतु भोवतालच्या परिस्थितीने तो जखडला जातो व जातीबंधनात अडकतो. या जातींची बंधने सोडून सर्वानी एकत्र येऊन काम केले तरच समाजात एकता नांदू शकते स्वतःला श्रेष्ठ म्हणविणा-यांनी आपल्या स्वार्थाचा झरा अव्याहत चालवण्यासाठीच हे सोवळेबंड उपस्थित केले आहे. याचा परिणाम आमच्या इतर जातीवर इतका आहे की आमचे लोक पोथी म्हणताना किंवा पूजा करतांना पत्नीचा किंवा पोटच्या तान्हया मुलाचाही स्पर्श सहन करत नाही एवढे आपण या श्रेष्ठजातीतील लोकांच्या आहारी गेलो आहोत."[४] ब्राह्मण हा श्रेष्ठ जातीत जन्माला आला आहे. त्यामुळे इतर जातींवर वर्चस्व गाजवण्याचा अधिकार ब्राह्मणांनाच आहे. त्यात त्यांनी शिक्षण घेतल्यामुळे खेडयातील सर्व व्यवहार ब्राह्मणच पाहत असे. इतर जातीतील लोक अडाणी असल्याने गावातील सर्व व्यवहार, शेतीविषयीचे करारपत्र खरेदी विक्री, तसेच शेतीचे कोणतेही वाद यात गावातील कुलकर्ण्यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची असे. त्यामुळे गावात एक प्रकारे या उच्च जातींचे वर्चस्व असे. मग त्यांनी कसेही वागले गावातील लोकांत कितीही भांडणे लावली तरी त्यांच्या विरोधी कोणीही बोलत नसे ही मंडळी भांडणे लावत व परत भांडणे मिटवण्यासाठी लोकांकडून पैसे उकळत परंतु हा अन्याय अत्याचार इतर जातीतील लोक निमुटपणे सहन करतात.

"जाती जातीमधील ही दरी दूर करण्यासाठी आपल्या मागासलेल्या जातींतील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे जेव्हा खालच्या जातीतील मुले शिक्षण घेऊन मोठी होतील व नंतर आपल्या कुटुंबाचा जातीचा, समाजाचा, विकास करण्यासाठी प्रयत्न करतील तेंव्हाच ही जातीयतेची दरी नाहीशी होईल कारण स्वतःला उच्च समजणा-या समाजाने इतर जातीवर आपले सामाजिक राजकीय, धार्मिक वर्चस्व निर्माण केले आहे."[५] प्रत्येक जातीला एका साच्यातच ठेवण्याचा प्रयत्न केला गेला तेंव्हा आजच्या तरुण पिढीला ही खूप मोठी जबाबदारी पार पाडावयाची आहे. त्यांना आपल्या जातीवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे आवश्यक आहे.

जोपर्यंत ते ज्ञानी बनत नाहीत, तोपर्यंत ते आपल्यावरील अन्याय, अत्याचार असाच निमुटपणे सहन करतील म्हणून मुकुंदराव पाटील आपल्या, 'आमच्या प्रौढ विद्यार्थ्यांची आजची

कर्तव्य' या लेखात असे म्हणतात की, "मागासलेल्या एकंदर वर्गसंबंधानी किंवा जातीसंबंधाने आमच्या प्रौढ विद्यार्थ्यांची जी कर्तव्य आहेत ती फारच महत्त्वाची आहेत. याच कर्तव्याच्या अंमलबजावणीवर राष्ट्रोन्नतीची इमारत उभी होणार आहे. कुणबी, माळी, साळी, कोष्टी, कुंभार, चांभार, महार, मांग वगैरे वर्गाचे आपल्याच कुटुंबातील विभाग आहेत. हे जरी धंदयावरुन कायमचे विभागलेले दिसत असले तरी ते मुळात एकत्रच होते व पुढेही एकत्रच होतील आज जो त्यांच्यात विभक्तपणा आला अथवा आणविला गेला तो लटक्या देवधर्माच्या पूजा-यांनी आणला हे आता ठरुन चुकले आहे तेंव्हा असला विभक्तपणा जेणेकरुन मोडकळीस येईल अशा प्रकारचे वर्तन ठेवणे व जे या विभक्तपणास साधुत्वाच्या पडदयाअडून प्रोत्साहन देत असतील त्यांच्याशी स्पष्ट निषेधपुर्वक आचरण ठेवणे हे आता प्रौढ विदयार्थ्यांची कर्तव्ये आहेत. "[६] या सर्व परिस्थितीला मध्यस्थ जबाबदार आहेत. या मध्यस्त वर्गाचे उच्चाटन झाले पाहिजे. हे त्यांचे विवेचन यथार्थ वाटते.

आज समाजात ज्या विविध जाती निर्माण झाल्या आहेत त्या वेगवेगळया जाती नसून एकाच कुटुंबातील विभाग आहेत. आज ते वेगवेगळे व्यवसाय करत आहेत म्हणून वेगवेगळे आहेत असे नाही. ते मुळात एकच आहेत आणि भविष्यात ही एकत्रच रहावे काही पुजा-यांनी देवधर्माच्या नावाखाली जातीजातींमध्ये तेढ निर्माण केले आहे. त्यामुळे आपले लोक आपआपसात भांडत आहेत. आणि ही भांडणे सोडवण्याचे काम परत ही उच्चभ्रु मंडळी करत आहे. त्यासाठी ते सामान्य लोकांकडून पैसे घेतात. तसेच शेतक-यांना कर्जाऊ पैसा देतात त्याबद्दल त्यांच्या जमिनी लुबाडून घेतात. कर्जाचे पैसे वसूल करतांना अडाणी लोकांवर जुलूम करतात. त्यामुळे मुकुंदराव पाटील सांगतात की, " हा जुलूम काही ठराविक जातीतील लोक करतात देवघरापासून ते चावडीपर्यंत शेतीच्या बांदापासून ते सरकारदरबारापर्यंत ब्राह्मणी मंडळींची एकहाती सत्ता होती त्यासाठी आजच्या विदयार्थ्यांवर ही जातीजातीतील तेढ दूर करण्याची मोठी जबाबदारी आहे."[७] हा विभक्तपणा, तसेच जातीजातींची भांडणे घडवण्यास प्रोत्साहन देणा-या मंडळीचा स्पष्ट निषेध करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आपल्या समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी खेडयामध्ये शेतकी शाळा स्थापन करण्यासाठी प्रयत्न करावा ही जबाबदारी मुकुंदराव पाटील आजच्या विदयार्थ्यांवर टाकताना दिसतात. त्याचप्रमाणे ते पुढे सांगतात की "आजचा हिंदू

धर्म हा जातीभेदांचे अनेक ठिगळे बनून जणू एक गोधडीच बनला आहे. हिंदू समाजातील हा जाती जातीमधील भेद, उच्च-निचतेची दरी, रुढी, परंपरा जातीच्या उचनिचपणापासून पडली आहे त्यामुळे सुशिक्षित विदयार्थी खालच्या जातीतील कितीही शिकला तरी त्यास काल्पनिक श्रेष्ठ बनलेल्या जातीत योग्य न्याय मिळत नाही. ही श्रेष्ठ म्हणून घेणारी मंडळी आपल्या पुढे कोणालाही जाऊ देत नाही."[८] खालच्या जातीतील मुले शिकले तर ती आपल्या व्यवसायाला विरोध करतील ही भीती या ब्राह्मणमंडळींना, होती त्यामुळे ते आपल्यापेक्षा श्रेष्ठ दुस-याला म्हणून घेत नसे. त्यामुळे आजच्या सुशिक्षित विदयार्थ्यांने हा जातीभेद दूर केला पाहिजे व स्वतःच्या कर्तृत्वाने आपल्या कुटुंबाचे नाव उज्ज्वल केले पाहिजे असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतांना दिसतात.

मुकुंदराव पाटील विदयार्थ्यांना या संदर्भात असा उपदेश करतात की, "आपण कनिष्ठ जातीत जन्माला आलो म्हणून कोणीही प्रौढ विदयार्थ्यांने मनास खाऊ नये किंवा आपल्या आप्तेष्टांची दरिद्री अवस्था पाहुन मनात लाजू नये किंवा आपला कनिष्ठपणा आठवून दुस-यांच्या श्रेष्ठपणाचे दडपण स्वतःचे मनावर पडू देवू नये, किंवा परिस्थितीचे रडगाणे गाऊन माझ्या ठिकाणी दुसरे कोणी असते तर त्यासही असेच दुःख भोगावे लागले असते, असल्या प्रयत्नान्तक वेदान्तांकही पडू नये ब्राह्मणेतर बहुतेक सर्व विदयार्थी सामाजिक व धार्मिक बाबतीत समदुःखीच आहेत. हे प्रौढ विदयार्थ्याने नीट लक्षात ठेवले पाहिजे."[९] एकूणच मुकुंदराव पाटील कनिष्ठ जातीतील विदयार्थ्यांना उपदेश करतात की, आपण कनिष्ठ जातीत जन्माला आलो म्हणून आपल्याला हीन दर्जाची वागणूक मिळते आपण कनिष्ठ जातीतील आहोत म्हणून आपल्याला पडेल ते काम करावे लागते म्हणून स्वतःला दोष न देता आपल्या ज्ञानाने आपले श्रेष्ठत्व सिद्ध करावे हे करत असतांना दुस-यांच्या श्रेष्ठपणाचे दडपण स्वतःचे मनावर पडू देवू नये व आपल्या परिस्थितीबाबत रडगाणे न गाता त्या परिस्थितीतून मार्ग काढून आपले श्रेष्ठत्व सिध्द करावे यासाठी आग्रही असल्याचे दिसून येतात.

मुकुंदराव पाटील येथे सर्व ब्राह्मणेत्तर विदयार्थ्यांची परिस्थिती सारखीच असल्याचे नमूद करतात. आपल्या या परिस्थितीवर मात करण्याचा सल्ला देतात. त्यासाठी आपला समाज ज्ञानवंत, शुद्ध, स्वच्छ, झाला पाहिजे. तो तसा झाला म्हणजे आपोआपच आपली कनिष्ठता नष्ट होईल व

समाजामध्ये आपण इतरांप्रमाणे श्रेष्ठ म्हणून गणले जाऊ त्यासाठी कनिष्ठ जातीतील मुलांनी आपल्याला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा असे स्पष्ट कले.

ब्राह्मणी राष्ट्रवादाच्या प्रभावाखाली स्वजातीहितापासून बहुजन विदयार्थी दूर जातात. याबाबत मुकुंदराव पाटील इशारा देतात. "स्वजातीच्या मागासलेपणाच्या विचारातून जातीव्यवस्थेच्या विरोधात बंड करण्याची दिशा मिळत असल्यामुळे त्यांनी बहुजन विदयार्थ्यांना जाती उन्नतीच्या मार्गाचा अवलंब करण्यास सांगितले व प्रभूत्वशाली ब्राह्मणी विचारसरणीच्या दबावाखाली न येण्याचा उपदेश केला. एकंदरीतच शोषण व विषमतेच्या ब्राह्मणी व्यवस्थेला हादरा देणारे जाती विरोधी प्रबोधन करण्याचे सत्यशोधक समाजाचे कार्य मुकुंदराव पाटील यांनी निष्ठेने अंगिकारले होते असे दिसून येते."[१०] आपल्या या कार्यासाठी त्यांनी कनिष्ठ जातीतील लोकांशी शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान, शेती करण्याच्या श्रमातून मुक्त करु शकणारे नव्या व्यवसायाचे ज्ञानकौशल्य यासंबंधीची विदया शेतक-यांनी आत्मसात केली पाहिजे. त्याच बरोबर आत्मबोध घडवणारे दारिद्रय, अस्वच्छता, अज्ञान, शोषण, दडपणूक या चक्रातून मुक्त करणारे प्रकृतीचा मार्ग दाखवणारे, ज्ञान ब्राह्मणेत्तर वर्गाने अंगिकारले पाहिजे असा मुकुंदराव पाटील यांचा आग्रह होता. जातीव्यवस्थेच्या अरिष्टामध्ये अडकलेल्या शेतीला व शेतक-यांला आधुनिकतेच्या कक्षेत आणून मुक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे दिसून येते.

## ४.३ जातीखंडनाचा विचार

महात्मा जोतिराव फुले यांचा वैचारिक वारसा मुकुंदराव पाटील हे समर्थपणे पुढे नेणारे कृतीशील विचारवंत होते. त्यांमुळे त्यांची वैचारिक जडणघडण फुल्यांच्या विचारांनी प्रभावित झालेली होती. म.फुले विद्यार्थी दशेत असतानाच त्यांना बहुजन समाजाच्या दुरावस्थेची प्रकर्षाने जाणीव झालेली दिसून येते. त्यांनी बहुजन समाजाच्या या दुरावस्थेच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना असे आढळून आले की, "जातीव्यवस्थेने वरिष्ठ जातींना दिलेले विशेषाधिकार व कनिष्ठ जातीवर लादलेले नानाविध निर्बंध हेच सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यांचे मूळ आहे. तेंव्हा जातीव्यवस्थेचे जाचक निर्बंध दूर केल्याशिवाय बहुजन समाजाला न्याय मिळणार नाही किंवा त्यांचे शोषण थांबविता येणार नाही."[११] त्यामुळे म.फुले यांनी वरिष्ठ

जातींच्या सामाजिक वर्चस्वाविरुध्द लढा उभारुन शूद्रातिशूद्र बहुजन समाजाला जागृत करण्याचा चंग बांधला. त्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केलेली होती.

म.ज्योतिबा फुले यांचे असे मत होते की, आपल्या समाजातील वरिष्ठ जातींनी आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी सर्व क्षेत्रात स्वतःची मक्तेदारी निर्माण करुन शूद्रातिशूद्र बहुजन समाजाला गुलाम बनविले आहे. जातीभेदाचे मूळ ब्राह्मणाच्या स्वार्थी धर्मांधतेत आणि अहंकारात आहे. ब्राह्मणांनी खोटे धर्मग्रंथ निर्माण करुन कनिष्ठ जातीवर आपली मानसिक गुलामगिरी लादली आणि बहुजन समाजाला अज्ञानात ठेवून स्वतः सर्व सत्तास्थाने बळकाविली. धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात तर ब्राह्मणांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केलेच परंतु त्यांच्या जोरावर राजकीय व आर्थिक सत्तास्थानेही त्यांनी बळकाविली. अशाप्रकारे वरिष्ठ ब्राह्मण वर्गाने सर्व विशेषाधिकार स्वतःकडे ठेऊन कनिष्ठ वर्गांना आपल्या स्वार्थासाठी राबवून घेतले.

आपल्या 'गुलामगिरी'या ग्रंथात, "ब्राह्मण लोक तुम्हाला लुटून खात आहेत हे माझ्या शूद्र बांधवांना सांगण्याच्या हेतूनेच मी हा प्रस्तुत ग्रंथ लिहित आहे." [१२] असे ज्योतिबांनी म्हंटले आहे. समाजातील ब्राह्मणी व्यवस्थेने चालवलेले जाती-व्यवस्थेचे शोषण या शोषणामुळे होणारे ब्राह्मणेत्तरांचे हाल न बघवणारे होते. ब्राह्मण जात ही श्रेष्ठ आहे. त्यांना इतर जातींवर वर्चस्व गाजवण्याचा पुर्ण अधिकार आहे. इतर जातीतील लोक अज्ञानी, अंधश्रध्दाळू असल्याने ते आपले होणारे शोषण निमुटपणे सहन करत परंतु या विरोधात आवाज उठवण्याची हिंमत सामान्य लोक करत नसत आणि दुस-या बाजूला जातीभेद हा मुळात ईश्वरनिर्मित आहे त्यामुळे तो मान्य केलाच पाहिजे असा विचार सनातन्यांनी इतरांवर बिंबवला होता. या ब्राह्मणी वर्चस्वावर मुकुंदराव पाटलां-नी सत्यशोधकीय शैलीने प्रहार केला. ब्राह्मणांना असलेला सत्ता, संपत्ती, पदाचा हव्यास हा स्वार्थी वृत्तीचे प्रतिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ब्राह्मणीवर्चस्व ईश्वरप्रणीत नसून ते आपले वर्चस्व आबाधित ठेवण्यासाठी सनातन्यांनीच रचलेला तर्क आहे. यासाठी जातीखंडनाचा विचार मुकुंदराव पाटील यांनी मांडलेला होता.

'धर्ममार्तंडाचा अंधार' या लेखामध्ये मुकुंदराव पाटील यांनी जातीभेदाचे खंडन केले आहे. बौध्दधर्माचे अहिंसेचे तत्त्वज्ञान सामान्य लोकांना हिंसेपासून परावृत्त करणारे ठरले, त्यामुळे

ब्राह्मणांना बौध्द धर्म हा आपल्या धर्मावर आलेल्या वर्चस्वाचा घाला आहे असे वाटू लागले होते. ही ब्राह्मणी प्रतिक्रिया मुकुंदराव पाटील यांनी आपल्या लेखात व्यक्त केली आहे. "जातीभेद ईश्वर निर्मित असून ते मोडणे हे पाप आहे हे पाप जर या हिंदू धर्मात प्रथम कोणी केले असेल तर ते बुध्दानेच केले, तसेच वेद, ब्राह्मण यांच्याविषयी ब्राह्मणेत्तरांच्या मनात मत्सर भरवणारा बुध्दच! अर्थात बुध्दापूर्वी ब्राह्मण ब्राह्मणेत्तर गुण्योगोविंदाने नांदत होते व चार्तुवर्ण्याची घडी मुळीच बिघडली नव्हती. सध्या हिंदू धर्माची जी नासाडी झाली आहे, ब्राह्मण ब्राह्मणेत्तरांत जो द्वेष माजला आहे, त्या सर्वांचे मूळ कारण क्षत्रियादी ब्राह्मणेत्तर लोकांचीच दुर्वासना हे होय. ब्राह्मण ब्राह्मणेतरांसाठी पूर्वीपासून झीज सोसत आले आहेत ब्राह्मणेतर अक्षरशत्रू राहण्याचे कारण बुध्दच आहे." [१३] एकूणच बौध्द धर्माने ब्राह्मणेतरांमध्ये एकात्मतेची शिकवण देण्याचे कार्य चालवले होते यामुळे ब्राह्मण वर्गाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. त्यांच्या मनातील द्वेष मुकुंदराव पाटील यांनी दाखविलेला दिसून येतो.

गौतम बुद्धांनी जो समतेचा मार्ग दाखवला तो समाजाला पटला त्यामुळे बौध्द धर्माला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. परंतु बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन ब्राह्मणेतरांनी हिंसा सोडून दिली. बौद्ध धर्मात वेद, वैदिक, वाड्.मयाला थारा नव्हता मानवाची सेवा हिच ईश्वरसेवा आहे हे तत्त्वज्ञान बौद्ध धर्माने सांगितले त्यासाठी पुजा-अर्चा, जप-तप, करण्याची आवश्यकता नाही हे बुद्धांनी दाखवल्यामुळे ब्राह्मण वर्ग बुद्धांचा तिरस्कार करु लागला होता.

बौध्द धर्माने संस्कृत भाषेची उचलबांगडी केली व कलाकौशल्याची मान मोडली हे दोन आरोप धर्ममार्तंडाने बौद्ध धर्मावर केले आहेत ते साफ खोटे आहेत, असे मुकुंदराव पाटलांचे म्हणणे होते. त्यासाठी ते म्हणतात की, "ब्राह्मण धर्माच्या कोणत्याही कलाकौशल्यास खाली मान घालावयास लावतील अशी उत्तमोत्तम शिल्पकामे बौद्धांनी व जैनांनी हजारो लेणी उभारली, विहारे स्तूप, मंदिरे ही अदयाप हयात आहेत. खरे म्हटले तर ब्राह्मण धर्माने पोटाच्या कौशल्यापलीकडे मुळीच लक्ष दिले नाही आणि आमच्या या विधानास बळकट पुरावा धर्ममार्तंडाच्या लाडक्या मनुस्मृतीतच आहे."[१४] बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान सामान्य माणसास आचरणात आणण्यास सोपे होते. परंतु इतर जातींतील लोक ब्राह्मण धर्माचा पाठिंबा काढून बौद्ध धर्माकडे वळत आहेत. कारण ब्राह्मण धर्माच्या तुलनेत बौद्ध तत्त्वज्ञान उदार व लोकशाहीवादी होते. परंतु ब्राह्मणधर्माने

वेदप्रामाण्य, धार्मिक कर्मकांड यांमुळे इतर जातींना आपल्या अधिकारकक्षेत ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु बौद्ध व जैन धर्माने हजारो लेणी स्तूप, मंदिरे उभारली. खरोखरच ती अदयाप हयात आहेत. मग ब्राह्मण धर्माने अशा कलाकृती का निर्माण केल्या नाहीत ? असा सवाल मुकुंदराव पाटील हिंदू धर्ममार्तंडांना विचारताना आपणास दिसतात. येथे मुकुंदराव पाटलांचे जातीखंडन वज्रसूचीच्या तर्कावरच बेतले असल्याचे दिसून येते. अश्वघोषाच्या वज्रसूचीने जातीव्यवस्था विरोधाचा तात्त्विक आधार पुरवला त्यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रात धर्मचळवळींनी जातीभेदाचे खंडन केले महानुभाव, नाथसंप्रदाय, वारकरी संप्रदाय, दादोबा पांडुरंग, महात्मा फुले यांच्या जातीव्यवस्थाविरोधाच्या धार्मिक विद्रोहाला वज्रसूचीची प्रेरणा होती. मुकुंदरावांनी वज्रसूचीचे तत्त्वाधार जातीविरोधासाठी उधृत केले आहेत. जन्माने कोणी ब्राह्मण ठरत नाही. अचल, केशपिंगल, अगस्ती, कौशिक, कपिल, गौतम, द्रोणाचार्य, व्यास, विश्वामित्र, वशिष्ठ हे ऋषी अनैतिक संबंधातून वा माणूस-पशू संबंधातून जन्माला आल्याच्या पुराणकथांचा आधार देऊन ब्राह्मणांच्या लैंगिक पावित्र्याचा, वंशशुद्धतेचा व त्या अनुषंगाने येणा-या श्रेष्ठत्वाचा प्रतिवाद केला होता. मुकुंदरावांनी वज्रसूचीच्या प्रेरणेमधून मनुष्य व पशु यांच्या संकरातून जन्म पावलेल्या ऋषींची उदाहरणे पेश करुन ब्राह्मण श्रेष्ठत्वाच्या कल्पनेला चुड लावली. [१५] मुकुंदराव पाटील येथे स्पष्टपणे सांगतात की, जन्माने कोणीही ब्राम्हण ठरत नाही आपल्या या मताला त्यांनी पुराणकथांचा आधार दिलेला आहे. हा जातीवाद नष्ट व्हावा यासाठी विविध धर्मसुधारणा चळवळींनीही या जातीभेदाविरोधी चालवलेला लढा आणि वेळोवेळी त्यांनी केलेले जातीभेदाचे खंडन याचेही उदाहरण मुकुंदराव पाटील देतात.

आपल्या विचाराच्या समर्थनार्थ मुकुंदराव पाटील मनुस्मृतीचा संदर्भ देतांना सांगतात की, “ही सनातनी मंडळी गुणकर्मानुसार वर्णव्यवस्था ठरत असल्याचे स्पष्ट करतात आणि त्यासाठी गीतेचे वचन उधृत करुन जातीव्यवस्थेचे समर्थन करण्याची चलाखी दाखवतात. ज्या ज्या वेळी ब्राह्मणेत्तर जाती आपली जात सोडून दुसरा व्यवसाय करण्याचा प्रयत्न करतात त्यावेळी ही मंडळी हे समाजविघातक कृत्य असल्याचे सांगून तो व्यवसाय बंद करण्यास प्रवृत्त करतात. जर एखादयाने त्यांचे ऐकले नाही तर प्रसंगी त्याला मानसिक, शारीरिक त्रास देण्यासही ते मागे बघत नाही. कारण आपल्या समाजातील श्रेष्ठत्वाला कुठल्याही प्रकारची बाधा येऊ दयायची नाही हिच त्यांची मुख्य भूमिका होती.”[१६] याविषयी सांगतांना ते तुकाराम महाराजांच्या काळाचे उदाहरण देतात व ब्राह्मण

ब्राह्मणेत्तर यांच्यामधील संबंध त्यावेळी किती कडक होते हे दाखवून देतात. त्यासाठी ते कपाळाच्या गंधात किंवा कमरेच्या धोतरात जर कोणा ब्राह्मणेत्तराने ब्राह्मणाप्रमाणे पेहराव केला तर तेवढयानेच ब्राह्मणेत्तराकडून मोठा अपराध झाला असे समजून त्यास शिक्षा होत असे मग प्रत्यक्ष ब्राह्मणाप्रमाणे श्रुतिस्मृतीचा अर्थ लोकांस सांगणे हा केवढा भयंकर अपराध होत असेल याची कल्पना केली तरी अंगावर काटा यावा अशी परिस्थिती असतानाही तुकाराम महाराजांनी या ब्राह्मणांकडून होणा-या त्रासाची पर्वा न करता लोकांना आपल्या निर्भीड वाणीने मार्गदर्शन केले. याचा परिणाम त्यांना या सनातनी मंडळींकडून छळ सहन करावा लागला.

'आधुनिक रामेश्वरभट्ट' या लेखात मुकुंदराव पाटील सांगतात की, "रामदास स्वामी तुकाराम महाराजांच्या काळीच होते, परंतु त्यांचा छळ झाला नाही शिवाजी महाराज तुकारामासही गुरु मानीत असत व रामदासासही गुरु समजत असत पण रामदासाचा छळ न होता तुकारामाचा छळ शिवाजीच्या कारकीर्दीत झाला यावरुन त्याकाळी उत्तम क्षत्रियाच्या तलवारीपेक्षा, ब्राह्मणांच्या पळीला देखील किती महत्त्व होते हे वाचकांनीच ओळखून घ्यावे."[१७] मुकुंदराव पाटील यांनी येथे तुकाराम महाराजांना या ब्राह्मण मंडळी कडून होणाऱ्या त्रासाचे वर्णन करतांना दिसतात जर तुकाराम महाराज आणि रामदास स्वामी यांचा काळ एकच होता. शिवाजी महाराज तुकाराम महाराज आणि रामदास स्वामी यांना गुरु मानत, तर मग फक्त तुकाराम महाराजांनाच या मंडळीकडून त्रास कसा होतो. म्हणजेच शिवाजी महाराजांच्या काळातही या ब्राह्मण मंडळींचे वर्चस्व होते अशा ब्राह्मणेत्तर साधुसंत मंडळींना ज्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रुढी परंपरा, उच्चनीचभाव दूर व्हावा यासाठी संपूर्ण आयुष्य झिजवले अशा साधुमंडळीचा छळ होणे ही गोष्ट योग्य वाटत नाही. आज जरी ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर यांच्यातील ब्रह्मदेवकृत बंधारे ठिसूळ झाले असले तरी आजचे आधुनिक रामेश्वरभट्ट सार्वजनिक देवालयात एखादया ब्राह्मणेतर साधूचे कीर्तन बंद पाडून त्यास धोपटून काढण्याची हुक्की त्यांना यावी या बद्दल ते चिंता व्यक्त करतात आणि म्हणून आजच्या ब्राह्मणांना ते आधुनिक रामेश्वरभट्ट म्हणताना दिसतात.

आज जरी ब्राह्मण ब्राह्मणेतर मंडळी मागे झाले गेले विसरुन आपण एकच आहोत असे क्षणभर म्हणत असले तरी त्यांना जेंव्हा वाटेल तेव्हा ते दुस-याला त्रास देण्याचा प्रयत्न करतात म्हणजे एक प्रकारे आपले श्रेष्ठत्व बिंबवण्याचा ते आजही प्रयत्न करतच आहेत. जोपर्यंत हा

अत्याचार ते बंद करत नाहीत तोपर्यंत ब्राह्मणेतर समाज दडपणाखाली वागत राहील यासाठी मुकुंदराव पाटील यांना खेडयातील ब्राह्मणेतर शेतकरी समाज सुशिक्षित होणे गरजेचे वाटते. त्यांच्या मते या ब्राह्मणेतर मंडळींना हा अन्याय शिक्षणाद्वारेच कळून येईल. यासाठी ते खेडयातील आजच्या तरुण सुशिक्षित वर्गावर आपल्या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून सोडण्याची जबाबदारी सोपवतात.

मुकुंदराव पाटील 'आमच्या प्रौढ विदयार्थ्यांची आजची कर्तव्ये' या लेखामध्ये म्हणतात की, "जोपर्यंत बहुजन समाजाच्या हितास्तव खेड्याकडे जाण्याची ओढ प्रौढ विदयार्थ्यांच्या पावलास बसणार नाही, जोपर्यंत बहुजन समाजाची नित्कृष्ठस्थिती अवलोकन करण्याची आतुरता त्यांच्या नेत्रास होणार नाही, जोपर्यंत बहुजन समाजास हिताच्या दोन गोष्टी धैर्याने सांगण्याची स्फूर्ती त्यांच्या जिव्हेस होणार नाही, तोपर्यंत आमच्या प्रौढ विदयार्थ्यांनी शहरात बसून कितीही भाषणे ऐकली किंवा केली तर ती सर्व व्यर्थ होत." [१८] येथे मुकुंदराव पाटील खंत व्यक्त करताना दिसतात. आजचा तरुण सुशिक्षित बहुजन विद्यार्थी शिक्षण घेतल्यानंतर शहरात गेला की परत आपल्या कुटुंबाच्या विकासाकडे, गावाच्या विकासाकडे व इतर बहुजन समाजासाठी काही भरीव कार्ये करताना दिसत नाही फार तर शहरात बहुजन समाजाने शिक्षण घ्यावे यासाठी भाषण करतात परंतु खरा बहुजन अशिक्षित समाज खेडयात गेल्याशिवाय दिसत नाही म्हणून या प्रौढ विद्यार्थ्यांना खेडयातील लोकांचे दैन्य, दु:ख अन्याय प्रत्यक्ष खेडयात गेल्यावरच समजेल आणि तो अन्याय जर तुम्ही डोळ्यांनी बघितला तर नक्कीच तुम्ही त्या विरोधी लढा देण्यासाठी त्यांना प्रवृत्त कराल हे करणे आज फार आवश्यक आहे.

बहुजन समाजास असे वाटते की या ब्राह्मण मंडळींना आपल्यावर वर्चस्व गाजवण्याचा अधिकार पुर्वापार चालत आलेला आहे त्यामुळे हा अन्याय आपण निमुटपणे सहन केला पाहिजे त्यांची ही मनोवृत्ती बदलण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे आवश्यक आहे हे जेव्हा ब्राह्मणेतर जातींना कळेल तेंव्हाच ते या अन्याय अत्याचारविरोधी लढा देण्यासाठी तयार होतील हे सर्व घडवण्यासाठी प्रथमतः आमच्या प्रौढ विद्यार्थ्यांना खेडयात जाऊन प्रत्यक्ष त्या लोकांवर होणारा अन्याय बघावा लागेल हेच आजच्या प्रौढ विदयार्थ्यांचे खरे कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य बजावले तरच स्वजाती हितासाठी झटल्याचे समाधान मिळेल. नुसते स्वजाती हिनतेचा

न्यूनगंड बाळगून विदयार्थ्यांनी दु:खी कष्टी होऊ नये तर मानवतेची व परोपकाराची भावना बाळगूण स्वजातीच्या हितासाठी व जातीशोषणाचा व दमनाचा अनुभव घेणा-या अन्य श्रमिक जातीच्या उद्धारासाठी झटावे, असा त्यांनी उपदेश केला.

मुकुंदराव पाटील येथे स्पष्ट करतात की, “आपल्या देशात पृथ्वीच्या पाठीवर कोठेही नाहीत असे विलक्षण जातीभेद असल्यामुळे धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात ऐक्य निर्माण होऊ शकले नाही. जातीवरुन किंवा जन्मावरुन मनुष्यास श्रेष्ठ कनिष्ठ ठरविणे सृष्टीक्रमास सोडून आहे मूल ज्या परिस्थितीत वाढते त्या परिस्थितीच्या संस्कारानुसार त्याचे गुणावगुण विकास पावत असतात. त्यामुळे अमुक एका जातीच्या गटात कोणी मनुष्य कसातरी जन्माला आला म्हणजे त्यास इतर जातींवर श्रेष्ठत्व मिरवण्याची सनद प्राप्त होते तर मग या श्रेष्ठाचा कान धरुन त्याला तू श्रेष्ठ आणि आम्ही कनिष्ठ का? असा प्रश्न विचारण्याचा अधिकार खालच्या जातीत जन्मलेल्या प्रत्येक समंजस व्यक्तीस नाही का ? असा प्रश्न विचारु न ते येवढयावरच थांबत नाहीत तर कामाच्या कनिष्ठपणावरुन मनुष्यास अस्पृश्य, कनिष्ठ मानणे त्यांचा तिरस्कार करणा-या या श्रेष्ठांच्या श्रेष्ठपणाचा ते धिक्कार करतात. ही मंडळी बहुजनांना तुम्ही सुशिक्षित झाल्यावर आम्ही तुम्हांला जवळ घेऊ अशी आश्वासने देतात हा एक प्रकारे बहुजनांवर होणारा अन्याय आहे.” [१९] म्हणजे एखादया तहानलेल्याला तू पाणी घेवून ये मग तुला प्यायला देऊ असे म्हटल्यासारखे आहे ही दांभीक प्रवृत्ती आमच्या प्रौढ विद्यार्थ्यांच्या लक्षात येत नाही त्यामुळे ते स्वतः च्या कनिष्ठपणाचा दोष स्वत:च्याच माथ्यावर मारुन घेतात. ही या सुशिक्षित विद्यार्थ्यांची मोठी चूक ठरत असल्याचे मुकुंदराव पाटील या ठिकाणी स्पष्ट करतात.

आमच्या बहुजन समाजाला अज्ञानांधकारात परंपरेने कुचंबत मारणा-या या निर्दयी श्रेष्ठ वर्गाने वेळोवेळी त्यांना त्यांच्या कनिष्ठपणाची जाणीव करुन दिली आहे. जे स्वत:ला सुशिक्षित व शुद्ध मानतात अशांनी दुस-या सुशिक्षित व शुद्ध माणसांस जवळ घेण्यात मुळीच शहाणपणा नसल्याचे ते स्पष्ट करतात. उलट जे अडाणी आहेत आणि गलिच्छ राहतात अशा व्यक्तीस जवळ करुन सज्ञान व स्वच्छ केले तर हिच भूतदया हेच साधुत्व आणि हेच खरे प्रेम ठरत असल्याचे ते सांगतात. तसेच आपण कनिष्ठ जातीतील आहोत म्हणून मनास न खाता परिस्थितीचे रडगाणे न गाता या परिस्थितीला तोंड देत आपल्या बहुजन समाजाला या अंधकारातून बाहेर काढण्यासाठी

प्रयत्न करावे असे त्यांचे मत होते. त्यामुळे आमच्या प्रौढ विद्यार्थ्यानेे देशाच्या सुधारणेची कळकळ बाळगणे योग्यच आहे. परंतु त्याहीपेक्षा स्वजाती व स्वसमाज यांच्या अधोगतीकडे आधी लक्ष देण्याची ते सल्ला देतात.

"स्वजाती किंवा स्वसमाज यांच्या अधोगतीकडे दुर्लक्ष करुन देशाची उन्नती कशी होते हे गूढ आम्हास मुळीच समजत नाहीच, पायापूर्वी शिखर तयार करणे जितके अशक्य आहे, तितकेच समाजाची सामाजिक व धार्मिक उन्नती करण्यापूर्वी देशोन्नती करणे अशक्य असावे असे आम्हास वाटते. देशोन्नती म्हणजे दगड धोंडयाची उन्नती नव्हे. देशोन्नती म्हणजे एका विशिष्ट जातीचे अनुकरण करणे नव्हे, देशोन्नती म्हणजे अमुक एका समाजाच्या मतानुकूल वागणे नव्हे, किंवा देशोन्नती म्हणजे एका समाजाचे गोडवे गाणे नव्हे, तर सर्व समाजात शांतता, समता, ममता यांचा प्रचार करून सर्व मागासलेल्या वर्गाची विद्यादेवीच्या मंदिरात परस्परांशी ओळख पटविणे, देशबंधुत्व अनुभवास आणून देणे आणि कृतकर्मे प्रांजलपणे कबुल करणे ही देशोन्नतीची अंगे होत."[२०] थोडक्यात आजच्या प्रौढ विद्यार्थ्यांने आधी आपला समाज आपल्या जातीचा विकास केल्याशिवाय देशोन्नती करणे अशक्य आहे कारण जसे पाया बांधुनच नंतर मंदिर शिखरापर्यंत नेले जाते तसे, आधी बहुजन समाज जो मागासलेला आहे, अशिक्षित आहे तो ज्ञानी झाला तर समाजातील मागासलेपण आपोआपच दूर होईल. त्यासाठी समाजातील सर्व जातीधर्माच्या लोकांना शिक्षण कसे दिले जाईल यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. नुसता एखादा समाज शिकला म्हणजे देशाची उन्नती होणार नाही, तर सर्व थरातील जनतेचा विकास घडून आणण्यासाठी त्यांना शिक्षणाची आवश्यकता आहे ते जेंव्हा शिक्षण घेतील समाजात समानतेने राहतील आणि आपण सर्व एकच असून एकमेकांबद्दल बंधुत्वाची भावना ज्यावेळी त्यांच्या मनात निर्माण होईल त्यावेळी खरी देशोन्नती घडून येईल. त्यासाठी आजच्या प्रौढ विद्यार्थ्यांनी खेडयातील लोकांच्या अडचणीत सामील होऊन त्यांचे वाटेकरी बनावे अशी मुकुंदराव पाटील यांची इच्छा होती.

जेंव्हा प्रौढ विद्यार्थी खेडयापाडयात फिरुन बहुजन समाजाच्या अडचणीची माहिती करुन घेवून त्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करतील तेंव्हाच बहुजन समाजाचा खरा विकास होईल. असा विश्वास मुकुंदराव पाटील यांना होता. मुकुंदराव पाटील यांचे बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्ये हे सत्यशोधक समाजाद्वारे चालू होते. त्यावेळी ते सत्यशोधक समाजाचे कार्ये सांगण्यासाठी

विसरत नाहीत सत्यशोधक समाज, जातीभेद, धर्मभेद, पंथभेद, नाकारणारा समतेच्या व मानवतेच्या आधारावरचा पर्याय देणारा समाज असल्याने त्यामध्ये कोणत्याही एका जातीला महत्त्व लाभत नाही हे ही ते निक्षूण सांगतात. त्यासाठी 'भट आणि तट' या लेखात ते म्हणतात की, "अहो तुम्ही खेडयातील शेतकरी कारागीर जनहो, सत्यशोधक समाज हा काही कोणा एका पक्षाची बाजू धरण्यासाठी अवतरला नाही पक्षभेद वर्णभेद व समाजाचा मुळीच संबंध नाही. समाज हा ज्ञानसूर्य आहे. ज्या प्रमाणे सूर्याचे उगवणे कोणा एका जातीच्या अथवा पंथांच्या हितासाठी नसते, तद्वत समाजाचे उद्देशही कोणा एका पक्षाच्याच बाजूचे असतात असे नाही."[२१] येथे मुकुंदराव पाटील आपल्या सत्यशोधक समाजाचा उद्देश स्पष्ट करताना दिसतात. मुकुंदराव पाटील आपले सर्व कार्ये या सत्यशोधक समाजाद्वारेच चालवतात परंतु इतरांनी या समाजावर कोणा एका जातीसाठी पक्ष चालवला असा आरोप होऊ नये म्हणून ते आधीच सत्यशोधक समाजाचा उद्देश सांगताना दिसतात.

जेंव्हा ॲनी बेझंट भारतीयांना स्वातंत्र्य मिळावे त्यांना त्यांचे अधिकार मिळावे यासाठी थिऑसफीकल सोसायटीची स्थापना करून त्याद्वारे भारतीयांमध्ये जागृती घडवून आणण्याचे कार्ये चालवत होत्या व ब्रिटिश शासनाकडे भारतीयांना स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्न करत होत्या. मद्रास येथे भरलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेपुढे अस्पृश्यांच्या जाती उन्नती करण्याविषयी, ठराव मांडला त्यावेळी त्यांनी मांडलेल्या विचारावर मुकुंदराव पाटील यांनी प्रखर टीका केली. 'ॲनी बेझंट बाईचे सुधारलेले सोवळे,' या लेखात सांगतात की, "अंत्यंजांच्या शिक्षणासाठी स्थापन केलेल्या शाळांत, त्यांच्या मुलांना वरिष्ठ वर्णाच्या कुलीन घराण्यातील मुलांत मिसळून प्रथम बसवू नये, अंत्यंजाच्या मुलांना प्रथम चांगल्या चालीरीती शिकवाव्यात म्हणजे पुढे त्यांचा सहवास झाल्याने वरिष्ठ वर्गाच्या मुलांचे शारीरिक नुकसान होणार नाही."[२२]

ॲनी बेझंट यांनी सुध्दा येथे एक प्रकारे स्पृश्य-अस्पृश्यता पाळण्याचे संकेत दिल्याचे जाणवतात. एकूणच ब्राह्मण व अस्पृश्य हे भिन्न भिन्न असल्याचे ॲनी बेझंट स्पष्ट करतात. अस्पृश्यतेचे व जातीभेदाचे एक प्रकारे समर्थन करतात. परंतु मुकुंदराव पाटील यांनी अस्पृश्यता निर्मुलनाचा दुसूत्री कार्यक्रम अनुसरला एका बाजूला अस्पृश्यता व जातीविषयतेच्या आधारभूत विचारसणीचे खंडण करणे व समतेच्या प्रस्थापनेसाठी जनप्रबोधन करणे त्यांनी आवश्यक मानले

तर दुस-या बाजूला अस्पृश्यतेचा आधार असलेल्या आर्थिक स्थितीमध्ये बदल घडवून अस्पृश्यांना आर्थिक व शैक्षणिकदृष्टया समर्थ बनवण्याचा मार्ग त्यांनी कळकळीने पुरस्कारलेला दिसून येतो.

**४.४ बलुतेदारी पद्धतीस विरोध**

बलुतेदारी व्यवस्थेमुळे समाज विविध जाती धर्मात विभागला गेला आहे. प्रत्येक जातीतील व्यक्तीला आपल्या जातीचाच वडीलोपार्जीत व्यवसाय करावा लागतो त्यांत सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, कासार, भट, परीट, इ. प्रमाणे वेगवेगळया जातीची कामे करून आपली व कुटुंबाची उपजिविका भागवत असे यामुळे एका खेडयातील व्यक्तीचा दुस-या खेडयातील व्यक्तीशी संबंध येत नव्हता. बाहेरील ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञानाविषयी माहिती या व्यवस्थेतील लोकांना होत नव्हती.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे बलुतेदारांना मिळणारा मोबदला हा एकजिनसी म्हणजे शेतात पिकणा-या मालाच्या रुपाने मिळत असे. हा मोबदला ठरलेला असे या व्यवस्थेमध्ये शेतक-यांना बलुतेदारांना वाजवीपेक्षा जास्त मोबदला दयावा लागत असे. म्हणून ही पद्धत शेतक-यांना व बलुतेदारांना हितकारक नाही ही वस्तुस्थिती मुकुंदराव पाटील या ठिकाणी दाखवून देण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ‘बारा बलुतेदारी’या लेखात मुकुंदराव पाटील सांगतात की, “पूर्वी व्यवहारात नाणे वापरण्यात नव्हते. त्यामुळे पदार्थ घेवून कामे करुन घ्यावी लागत होती. म्हणजे एखादया शेतक-यास नवा नांगर भरुन घ्यावयाचा असल्यास त्याने सुतारास दोन किंवा चार पायल्या धान्य घालून त्याची मजूरी चुकती करावी. मग सुतारास घोंगडीची जरुर असली तरी त्यांने ते धान्य धनगराकडे न्यावे अशी रीत पूर्वी सगळया प्रकारच्या व्यवहारात होती. आणि तीच अजून बलुत्याच्या रुपाने खेडयापाडयाने उरली आहे. ही बलुत्याची रीत सोडून बाकीचे सर्व व्यवहार अलीकडे नाण्यांनी चालू झाले आहेत. परंतु शेतक-यांनीच ही जूनी रीत अजून का चालू ठेवली हे समजत नाही.” [२३]

मुकुंदराव पाटलांना या ठिकाणी असे स्पष्ट करायचे आहे की, पूर्वी जोपर्यंत व्यवहारात नाणे वापरात नव्हते तोपर्यंत धान्याच्या रुपाने वस्तूंची देवाण-घेवाण होत होती परंतु आता खेड्यात सुध्दा व्यवहारात चलनी नाण्यांचा वापर करुन व्यवहार केले जातात. तर मग खेडयात ही बलुतेदारीची पध्दत का चालू आहे या पद्धतीने शेतक-यांचा तोटा तर होतोच परंतु एकुण एका जातीतील लोकांनी तोच व्यवसाय करावा त्याची दुसरा व्यवसाय वर्षानुवर्ष करण्याची इच्छा असली तरीही त्याला

नाविलाजाने वडीलोपार्जित व्यवसाय करावा लागतो. हा एक प्रकारे अन्यायच आहे आणि खेडयातील शेतकरी तो निमुटपणे सहन करत असे. तर तो सहन न करता कोणत्याही जातीतील व्यक्तीने त्याला जो व्यवसाय आवडतो तो चालवावा उच्च जातीतील लोकांनी ही गुलामगिरी इतर जातीतील लोकांवर चालवली आहे तिचा प्रतिकार करुन बलुतेदारी बंद करावी. यासाठी ते प्रयत्न करताना दिसतात.

जर एखादया वर्षी पाऊस कमी पडला व पिके वाया गेली तर शेतकरी बलुतेदारांना त्यांचा मोबदला कोठून देणार ? मग ही बलुतेदार मंडळी शेतक-यांना त्रास देतात. याचवेळी महारांचे बलुत्याचे वतन रद्द करावे असा आग्रह धरतात. कारण ही मंडळी सुगीच्या वेळी शेतक-यांना त्रास देतात. ब्रिटिश राजवटीत ब्रिटीशांकडून होणा-या अवाजवी महसूलाच्या मागणीमुळे व सावकारी शोषणामुळे शेतकरी आणखी भरडला गेला. ब्रिटीशांनी चलन व्यवस्था अमलात आणल्याने खेडयातील व्यवहारही रोख पैशाच्या रुपात होवू लागले. शेतकरी आपला महसूल रोख स्वरुपात भरत असे. मग बलुतेदारी व्यवस्थाच धान्याच्या रुपात का चालवली जाते असे मुकुंदराव पाटील यांचे मत होते. यामुळे ते बलुतेदारी व्यवस्थेला विरोध करत होते.

'शेतक-याची निकृष्ठ स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय' या लेखात बारा बलुतेदारी विषयी मुकुंदराव पाटील असे सांगतात की, "बलुतेदारी व्यवस्थेमुळे केंव्हा केंव्हा बलुत्यांचेही नुकसान होत असते बारा महिने चांभाराने मोट आसूड सांधावा सुताराने नांगर, औतास पाचर ठोकावी, मांगाने नाडे आखून दयावे आणि एकाएकी शेतक-यांच्या पिकावर रोग पडला आणि ते जळून गेले म्हणजे सर्वांनी चूप चुरमुरे खात बसावे, तेंव्हा ही कृष्णावतारातील बलुत्यांची रीत आताच्या इंग्रजांवतारात चालू ठेवणे उभयपक्षांत हितकारक नाही."[२४] असे स्पष्ट मत मुकुंदराव पाटलांचे असल्याचे आपणास दिसून येते. बलुतेदारी पद्धत ही शेतकरी व बलुतेदार या दोघांनाही तोटयाची आहे. येथे प्रत्येक जण हा दुस-यावर अवलंबून आहे.

शेतकरी हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. शेतक-यांच्या शेतात चांगले पीक आले तर इतर बलुतेदारांची उपजिविका चांगली चालत असे. परंतु एखादया वर्षी जर शेतक-यांचे पीक जळून गेले तर मग इतरांना काहीही मिळत नाही. त्यामुळे ही एकप्रकारची जूनी पद्धत खेडयात चालू आहे. यात इतर जातीपेक्षा शेतक-यांचे खूप नुकसान होते. त्यामुळे शेतक-यांची स्थिती निकृष्ठ होत

आहे. जर गावातील बाकी सर्व व्यवहार नाण्यांने चालू झाले आहेत तर मग ही बलुत्याची पद्धत पदार्थ देवून का चालवली जाते असे सांगून मुकुंदराव पाटील या बलुतेदारी पद्धतीस ठाम विरोध करताना दिसतात. पूर्वी जोपर्यंत नाणे चलनात नव्हते त्यावेळेस ही पद्धत अस्तित्वात आली. त्यामुळे ती त्यावेळच्या परिस्थितीला धरुन होती. परंतु आता ब्रिटिशांनी भारतात चलनामध्ये नाण्यांचा वापर सुरु केल्याने व्यवहारासाठी नाणी उपयुक्त आहेत. त्यासाठी शेतक-यांनीही ही जूनी पद्धत सोडून दयावी आणि असे न करता जर जून्याच पद्धतीला शेतकरी कवटाळून बसला याच स्थितीत दिवस ढकलू लागला तर पुढे फार फजिती झाल्याशिवाय राहणार नाही. यासाठी आपल्या पुढा-यांनी बलुत्याची पद्धत बंद करुन शेतक-यांना आधुनिक पद्धतीने शेतीचे मार्गदर्शन करावे.

पुढा-यांनी जर शेतक-यांकडे दुर्लक्ष केले तर शेतक-यांची परिस्थिती एवढी बिकट होईल की या शेतक-याला आपल्या वतनी जमिनीस मुकावे लागेल आणि मग कामाच्या शोधात भटकंती करत फिरावे लागेल. ते सांगतात की, तुम्ही कधी इतर धंदयाविषयी विचार केला नाही आपल्या जातीचा व्यवसाय सोडून दुस-या जातीचा व्यवसाय करण्याची वेळ एकाएकी आल्यावर तुमचे खूप हाल होतील. ही पुढची परिस्थीती मला स्पष्टपणे दिसत आहे. या सर्व परिस्थितीचा विचार मनात आला तरी वाईट वाटते आणि तुम्ही जर असेच आळशीपणे दिवस घालवत राहिलात तर यापेक्षाही कठीण परिस्थिती निर्माण होवू शकते. त्यामुळे या जून्या पद्धती सोडून आपल्या व्यवसायात प्रगती घडवून आणणे आपल्याला आवश्यक आहे.

मुकुंदराव पाटील पुढे खेडयातील महार त्रास देतात म्हणून महार बलुत्याचे वतन रद्द करण्याची मागणी करतात. ही मंडळी सरकारी कामे केली तरी त्याचा मोबदला म्हणून शेतक-या कडून बलुते वसुल करतो. त्याविषयी मुकुंदराव पाटील सांगतात की, “शेतक-यांनी बलुते दिले नाही तर शेतक-यांचा माल घराला येऊ लागला म्हणजे महार लोक त्यांच्या गाडीस आडवे होतात शिवीगाळ करतात आणि वेळेवर दांडगाई करतात. इतके ही करुन जर त्या शेतक-याने महारास त्यांच्या मर्जी प्रमाणे बलुते भरपूर न दिले तर ती शेतक-यांची जनावरे विषप्रयोगाने ठार मारुन, मांस, कातडी, हाडे वगैरे मालांच्या विक्रीने बलुत्याची भरपाई घेतात. दुसरी घातक त-हा म्हटली म्हणजे चारा वैरणीच्या गंजा जाळणे ही एक आहे.”[२५] शेतक-यांना होणा-या या त्रासामुळे मुकुंदराव पाटील यांना बलुतेदारीची पद्धत चुकीची वाटत होती कारण महार बलुतेदार त्याच्या हक्कासाठी

शेतक-यांना नडत होता. जर शेतक-याकडून नैसर्गिक आपत्तीमुळे महाराला वतनाचा मोबदला मिळाला नाही तर महार शेतक-यांकडून मिळणा-या वतनासाठी शेतक-यांची जनावरे मारत असे प्रसंगी चाऱ्याच्या गंजाही पेटून देत म्हणजे शेतक-याला जास्तीतजास्त त्रास देण्याची भूमिका महार वतनदाराची असे त्यामुळे शेतक-यांवर अन्याय होत असे आणि शेतक-यावरील हा अन्याय मुकुंदराव पाटलांना नको होता.

मुकुंदराव पाटलांच्या मते, शेतकरी हा स्वतंत्र असावा त्याच्या वर इतर लोकांकडून अन्याय होवू नये कारण शेतक-यांनी शेतातील पिकांची मळणी होऊन धान्य घरात येईपर्यंत त्यांना अनेक आपत्तींना तोंड दयावे लागत असे अशा परिस्थितीत जर वतनदारांनी त्यांना त्रास दिला तर तो पूर्णतः मोडून पडेन म्हणून बलुतेदारी पद्धत बंद व्हावी अशी भूमिका मुकुंदराव पाटलांची होती. अशा परिस्थितीतही शेतक-याने थोडाफार भाजीपाला पिकवून तो बाजारामध्ये विकण्यासाठी आणला तर बाजारातही शेतक-यांकडून वर्गणी म्हणून पैसा किंवा मग भाजीपाल्याच्या जूडया उचलून नेल्या जातात जर शेतक-याने याला विरोध केला तर शेतक-याला हाणमार होते त्यामुळे शेतकऱ्याला या वतनदाराना ठाराविक रक्कम दयावीच लागते. परिणामी बलुतेदारांना वाटून जो काही थोडाफार माल शिल्लक राहतो त्यालाही बाजारात लूटले जाते.

शेतक-यांचे लचके तोडण्यास ही बलुतेदार मंडळी कशी टपूण असतात याचे वर्णन मुकुंदराव पाटील 'हा जूलूम केंव्हा बंद होणार' या लेखामध्ये करतात की, "महार पाटील, हिजडे, आराधी, फकीर, शिरफोडे वगैरे लोकांनी बाजारकरु जवळून भाजीपाला दाणापैसा सक्तीने देण्याचा प्रघातच पाडला आहे व अशा त-हेचा जूलूम बाजारात होणे हा विशेष मोठासा गुन्हा आहे असेही कोणास वाटेनासे झाले आहे."[२६] शेतक-यावर एवढया मोठया प्रमाणात जूलूम होतो तरीही शेतकरी तो निमूटपणे सहन करतो कारण विरोध केला तर त्याला त्रास दिला जातो. या त्रासापेक्षा तो अन्याय सहन करतो. कारण अन्यायापेक्षा विरोध केल्यानंतर होणारा त्रास खूप मोठा असतो. त्यावेळी स्वतःला शेतक-यांचे पुढारी म्हणवून मिरवणारे काय करतात ? असा प्रश्न मुकुंदराव पाटील पुढा-यांना विचारतात कारण इतर वेळी ते स्वतःला आम्ही शेतक-यांचे नेते आहोत आम्ही शेतक-यांवर कुठलाही अन्याय होऊ देणार नाही अशा फुशारकी मारतात मग शेतक-याला बाजारात लुटले जाते यावेळी ही मंडळी का गप्प बसतात. या विषयी त्यांनी शेतक-यांची बाजू घेऊन बोलले

पाहिजे कारण शेतकरी अडाणी, अशिक्षित असून त्याला नेहमी हेच सांगितले जाते की शेतक-याने अन्याय सहन केला पाहिजे नाही तर ही इतर मंडळी शेतक-याच्या पिकाचे नुकसान करतात. याविषयी पुढारी म्हणवणा-या मंडळींनी गप्प बसू नये त्यासाठी मुकुंदराव पाटील सांगतात की, “शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी ज्या ठिकाणी सभा भरतात त्याच ठिकाणी शेतक-यास भर बाजारात नाडणारे प्रकार घडावेत हे फार वाईट आहे शेतक-यांच्या हितासाठी झटणारे पुढारी या कामी जर लक्ष देत नाहीत तर त्यांचा पुढारीपणा नाटकी आहे असे का समजू नये ?” [२७]

मुकुंदराव पाटील सांगतात की, ही वतनदार बलुतेदारी मंडळीची लूट ब्रिटिश काळातही अस्तित्वात होती. परंतु आपण जर कष्ट केले तर त्याचा मोबदला आपल्याला अवश्य मिळालाच पाहिजे त्यासाठी ते पुढे सांगतात की, “ब्रिटिश हद्दीतही महारांचे बलुते वसूल करण्याच्या कामी तालुक्यातून मदत देण्याचा नियम आहे, परंतु तसा प्रसंग बहुतेक येत नाही खरे म्हटले तर ‘केली नोकरी तर मागावी भाकरी’ हा सरळ मार्ग आहे. पण नोकरी न करता भाकरी केवळ वतनदारीच्या जोरावर मागायची म्हणजे हा एक जुलूमच आहे तो केंव्हा बंद होईल तर होवो.”[२८] येथे मुकुंदराव पाटील शेतक-यांची ही बलुतेदारी मंडळी कशी लूट करतात व आमचा अडाणी शेतकरी ही लूट निमुटपणे कसा सहन करतो. याचे विवेचन केलेले आहे. काहीही काम न करता नुसताच मोबदला मागायचा ही पद्धत चुकीची आहे. हा एक प्रकारचा शेतक-यांवर होणारा जुलूम आहे आणि हा जुलूम केंव्हा बंद होणार अशी चिंता मुकुंदराव पाटील या ठिकाणी व्यक्त करतात.

जर ही बलुतेदारीची पद्धत बंद झाली तर ती शेतक-यांबरोबर महारांसही हितावह आहे. महार मांगादी लोकांची समजूत अशी आहे की ही हलकट कामे फक्त आम्हीच करावी, कारण ही आमची वतनदारी आहे असे म्हणून ही मंडळी ही पद्धत सोडण्यास तयार नाही. सरकारला ही बलुतेदारी पद्धत जर बंद करण्याची इच्छा नसेल तर सरकारने यामध्ये सुधारणा करावी जेणेकरुन शेतकरी व बलुतेदार या दोघांनाही त्रास होणार नाही महार बलुते ही बाब अगदी लहान आहे परंतु तिच्यापासून शेतक-यांना होणारा त्रास खुपच आहे. या पद्धतीमुळे तोटा दोघांचाही आहे कारण महारांसही ती हितावह नाही आणि शेतक-यांच्याही ती हिताची नाही त्यामुळे ती बंद झाली तर दोघांचाही फायदाच होणार आहे. ही महार वतनदारी नष्ट करण्याची सरकारची इच्छा नसल्यास तिला सुधारण्यासाठी तरी सरकारने आजच लक्ष्य दयावे असे मुकुंदराव पाटलांचे स्पष्ट मत असल्याचे दिसून येते.

मुकुंदराव पाटील यांनी येथे शेतक-यांची बाजू घेताना दुस-या बाजने महारवतन बरखास्त करणे महारांच्याही हिताचे असल्याचे त्यांनी सांगितले वेस सांभाळणे, ढोरे फोडणे, खरकटी खाणे ही अमंगल कामे सोडणे महारांच्याही उन्नतीसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले. वतन खालसा  झाल्याने घाणीची कामे सवर्ण हिंदुंना करावी लागतील हे भयदेखील त्यांनी गैरलागू मानले. युरोपीयनांसारखी आधुनिक दृष्टी बाळगून घाणीचा बंदोबस्त करण्याची सूचनाही त्यांनी केली.[२९] बलुतेदारी पद्धत बंद करण्याचा आग्रह धरताना दुसरीकडे शेतक-यांना जर प्रगती घडवून आणायची असेल तर त्यांनी आधी शिक्षण घेतले पाहिजे. यासाठी शिक्षणाचा आग्रह त्यांनी धरल्याचे दिसून येते.

"आज अमेरिकेतील लोक जमिनीच्या छोटयाशा तुकडयावर  आधुनिक पद्धतीने शेती करुन चांगले उत्पन्न काढतात. नवनवीन खते रासायनिक द्रव्ये वापरुन ते चांगले पीक घेतात हे सर्व त्यांनी घेतलेल्या शिक्षणामुळेच त्यांना शक्य झाले आहे. त्यासाठी आमच्या शेतक-यांने आपली मुले तरी शाळेत घालावीत यासाठी ते आग्रह धरतात."[३०] आज खेडयामध्ये जी बलुतेदारीची पद्धत चालू आहे त्याविरोधात शेतकरी जर एक झाला नाही तर तो कधीही प्रगती करु शकणार नाही. आज अमेरिकेतील शेतकरी चांगल्या पद्धतीने नियोजन करुन उत्पन्न काढतो व आपला शेतकरी हा मिळणारे उत्पन्न बलुतेदारांना वाटण्यातच खर्च करतो. यामुळे बलुतेदारी व्यवस्थेला त्यांचा विरोध होता असे त्यांच्या एकंदर विवेचनावरुन स्पष्ट होते. शिवाय बलुतेदारांच्या इच्छेप्रमाणे मोबदला मिळाला नाही तर ते शेतक-याला त्रास देतात. त्यामुळे बलुतेदारी पद्धतीला मुकुंदराव पाटील विरोध करतांना दिसतात.

ब्रिटिश आमदणीमध्ये तर सरकारने व सावकारांनी चालवलेली लूट वाढत गेल्यामुळे महारांच्या वतनाचा मोबदला शेतक-यांना जड वाटू लागला. मुकुंदरावांना ही सावकारशाही सुध्दा सरकारने बंद करावी असा सरकारकडे आग्रह धरला होता. जर वेळेवर पाऊस पडला नाही पीक हाताशी आले नाही, तर ही सावकार मंडळी बलुतेदारांबरोबर शेतक-यांना त्रास देत प्रसंगी त्यांच्या जमिनीही आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असत. त्यामुळे मुकुंदराव पाटील ही बलुतेदारी पद्धत बंद करण्याचा आग्रह धरताना दिसून येतात.

## ४.५ धार्मिक प्रबोधनाची लढाई

हिंदू धर्मातील धार्मिक विधीला जोतिबा फुले यांनी कडाडून विरोध केलेला होता. सारा बहुजन समाज कसा धार्मिक विधीत गुंतून स्वतः हालाकीचे जीवन जगतो. कारण नसताना दुसऱ्याच्या सांगण्यावरुन कसे कर्ज काढतो हे त्यांनी आपल्या भाषणातून, लेखनातून जनतेला सांगितले.[३१] इथला शेठ-सावकार, पुरोहित कसा वागतो, अडाणी समाजावर त्यांचे वर्चस्व कसे स्थापन झाले आदि संदर्भात त्यांनी जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

शेतकरी बहुजन समाजाची ब्राह्मण जातीकडून विविध मार्गाने लूट होत होती. "वैदिक कर्मकांड, शास्त्रप्रामाण्य, स्पृश्यापृश्यता इ. मार्गाने ही लूट चालू होती. त्यातच बहुजन समाजामध्ये असलेले अज्ञान, अंधश्रध्दा, भोळेपणा यामुळे सावकार, पुरोहित व नोकरशाहीने शेतकऱ्याला लुटले गेल्याचे आपल्याला दिसून येते. धर्मश्रध्दांच्या अशा प्रभावापुढे आत्मभान गमावलेल्या बहुजन जातींनी आपल्या वाटयाला आलेल्या अन्याय व विषमते विरोधात लढण्याऐवजी जातीच्या शोषण व दडपणूकीला दैव, ईश्वरीइच्छा, म्हणून पत्करण्याची प्रवृत्ती दाखवली यामुळे ब्राह्मण जातींनी या ब्राह्मणेतर समाजाला लुटले, धार्मिक दास्याचे हे दुष्परिणाम शेतकरी व बहुजन जातींची हालअपेष्टा वाढत असल्याने मुकुंदरावांनी धर्मप्रबोधनाची लढाई अग्रक्रमाची मानली होती."[३२] राजकीय, सामाजिक मुक्तीसाठी धर्मप्रबोधन अनिवार्य असल्याच्या धारणेमधून त्यांनी ब्राह्मणी धर्मांची चिकीत्सा मोठया कळकळीने केलेली आपणास दिसून येते.

धार्मिक शोषण व्यवस्थेचे अधिष्ठान असलेल्या ब्राह्मणी श्रेष्ठत्त्वाच्या तत्त्वालाच भालेकर व मुकुंदराव पाटील यांनी लक्ष्य केले होते. "देव देवता, कर्मकांड, व धर्मग्रंथाच्या रचनेमध्ये ब्राह्मण पुरोहितांना सर्वाधिकार मिळाले होते. विश्व देवाधीन देव मंत्राधीन आणि मंत्र ब्राह्मणांच्या अधिन असल्याने हिंदूधर्मात ब्राह्मण पुरोहिताला भूदेवाचे स्थान प्राप्त झाले."[३३] यामुळे ब्राह्मण पुरोहितशाही ने ब्राह्मणेतरांच्या मनात ब्राह्मण श्रेष्ठत्त्वाचे महत्त्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे ब्राह्मणी पुरोहितशाहीची भांडाफोड करणारे धर्मप्रबोधन दीनमित्राचे वैशिष्टय राहिले आहे. देव व भक्तामध्ये मध्यस्थ नको या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाचे अधिष्ठान स्वीकारुन मुकुंदरावांनी ब्राह्मणी पुरोहितशाही चे खंडन केलेले होते.

आपला समाज हा या ब्राह्मणी पुरोहितशाहीच्या किती आहारी गेला आहे हे दाखवून देण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी वेगवेगळी उदाहरणे देऊन समाजाला जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला आहे की, आपला समाज स्वतःच्या कुटुंबाचा विचार न करता ही ब्राह्मण मंडळी सांगेन त्याच पद्धतीने वागतो जो समाज ब्राह्मणी वर्चस्वापुढे नतमस्तक झाला त्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न मुकुंदराव पाटील यांनी केला आहे.

आपल्या 'दोन गारुडी' या लेखामध्ये त्यांनी पुंगी गारुडी व पंचांग गारुडी यांची तुलना केली आहे. त्यांच्यामते "एकवेळेस पुंगी गारुडी हातचलाखी दाखवून पैसे मिळवतो व स्वतःची उपजिविका चालवतो. परंतु हा पंचांग गारुडी तीन चलाखी एक हातचलाखी, तोंडचलाखी, तिसरी ग्रंथचलाखी, चालवून शेतक-यांस लुटतो. पुंगी गारुडी चलचल म्हणून आंब्याचे झाड बनवतो पण पंचांग गारुडी हळदी कुंकवाची चिमूट टाकून सुपारीचा चटकन गणपती बनवितो. पुंगी गारुडी छाछू करुन रिकामा लोटा पाण्याने वारंवार भरुन दाखवितो. परंतु पंचांग गारुडी एक मंत्राच्या सपाटयात गंगागोदावरी सारख्या प्रचंड नदया एका तांब्यात आणून सोडतो."[३४] पुरोहित मंडळी आपल्या भोळया भाबडया अज्ञानी लोकांना त्यांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन कसे लूटतात हे मुकुंदराव पाटील स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. कारण हा समाज अंधश्रद्धाळू आहे अशिक्षित आहे म्हणून तो लुटला जातो. जर एखादयाने पंचांग गारुड्याच्या गारुडावर शंका घेतली तर हे त्याला नरकात टाकण्याची भीती घालतात या लुबाडया चव्हाटयावर आणण्याचे काम मुकुंदराव पाटील यांनी केले जेणेकरुन यातील वस्तुस्थिती समाजासमोर येईल व हा शेतकरी वर्ग या मंडळीच्या तोंडचलाखी पासून दूर राहील.

शेतक-यांला आज आपल्या स्वतःच्या कुटुंबाची उपजिविका चालवणे कठीण आहे, कारण तो अनेक मार्गात लुटला जातो. यातला पुरोहितवर्ग हाच शेतक-याला मोठ्या प्रमाणात लुटत आहे या वर्गाने आपल्या आयुष्यभराचा उदरनिर्वाह चालवण्याची उपाययोजना तर केलीच परंतु पुढील पिढीचाही उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे चालू शकेल त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये याचीही उपाययोजना त्यांनी करुन ठेवलेली दिसून येते. हे स्पष्ट करतांना मुकुंदराव पाटील पुढे सांगतात की, "आपल्या पुढील पिढीस कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून यांनी ठिकठिकाणी खेळस्थाने उर्फ देवस्थाने स्थापन केली आहेत. पुंगी गारुडयाप्रमाणे ढोल वाजवून लोकास

जमविण्याचा देखील त्यांनी त्रास ठेवला नाही दरमहा अथवा दर वर्षास लोकांनी बिनचूक यावे अशी अपूर्व योजना करुन  ठेवली आहे. शिवाय राजेरजवाडयाकडून काही ठराविक वर्षासनेही बांधून घेतली आहेत."[३५] ब्राह्मण पुरोहितांनी आपला उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे चालावा त्यासाठी ब्राह्मणेतर समाजाकडून मंदिरे बांधून घेतली व त्या मंदिराची देखरेख पाहणे, पूजा करणे यासाठी ब्राह्मणेतर जातींकडून दरमहा किंवा वर्षाने पैसा मिळेल याची तजविज करुन ठेवली आहे. शिवाय राजेरजवाडयांकडूनही वर्षासने मिळवली त्याबदल्यात राज्यातील धार्मिक कामे ही मंडळी बघत असत. म्हणजेच यातून मुकुंदराव पाटील यांनी एक गोष्ट नमूद केली की या ब्राह्मण पुरोहितांनी एवढा पुढचा विचार करुन व्यवसाय चालवला की आमचा शेतकरी त्याला विचारल्याशिवाय कोणताही विधी करत नाही. बारश्यापासून ते थेट श्राद्धापर्यंत सर्व विधी, मुहूर्त हे ब्राह्मणांना विचारुनच केले जातात. आणि हीच पद्धत शेतक-यांना घातक ठरत आहे ज्यामुळे त्यांचा विकास होण्याऐवजी त्यांची अधोगतीच चालू आहे. असे स्पष्ट मत म.फुले यांच्या प्रमाणेच मुकुंदरावांनी मांडलेले दिसते.

हजारो वर्षापासून या पुरोहितांनी निरर्थक ग्रंथ रचून निरोपयोगी तिर्थक्षेत्रे स्थापन करून अज्ञानी लोकांची खूप लूट केली आहे. आपण पृथ्वीवरील भूदेव आहोत, देवाचेही देव आहोत. आमची पूजा करुन संतुष्ट ठेवले म्हणजे स्वर्गात सुख मिळेल. इ. गोष्टी  अज्ञानी लोकांच्या मनावर  काल्पनिक  धर्मग्रंथ रचून बिंबवल्या व स्वतःचा स्वार्थ साधला असे मुकुंदराव पाटील यांचे मत होते. त्यामुळे पुरोहित वर्गाबद्दल त्यांना राग होता. त्यांच्या धार्मिक दास्यात बद्ध झालेल्या अज्ञानी  बहुजन समाजाला वास्तवाची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केलेला होता.

धार्मिक कृत्य करण्याला त्यांचा विरोध नव्हता. तर प्रत्येक माणसाने आपले धार्मिक कृत्य करतांना सदभावना व मानवतेची मूल्ये जोपासून करावीत असे त्यांचे मत होते ही धार्मिक कृत्ये करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही. प्रत्येकाने ती  स्वतः करावी कोणत्याही विधीला मंत्राची पुरोहिताची  जरुरी नव्हती याची जाणीव त्यांनी करुन दिली. "अमुक अमुक समपर्यामी अमुक अमुक अहंकारिष्ये ही क्रियापदे प्रथम पुरुषी आहेत. यावरुन हे सर्व विधी स्वतः केले जात होते. परंतु ब्राह्मण पुराहितांनी आपली उपजिविका सहजसुलभ व्हावी या स्वार्थी हेतूने ही कामे

आपल्याकडे घेतली आहेत. स्टेशनवरील सामान वाहणारे हमाल हे जसे उतारुचे बोजा पुरोहीत आहेत तसेच यजमानाने करावयाची पूजा करणारे सध्याचे भटजी हे पुजापुरोहित आहेत."[३६] अशा कडवट शब्दात या पुरोहितांनी चालवलेली लूट बघूनच मुकुंदराव पाटील यांनी या परिस्थीतीवर प्रहार केला आहे.

मुकुंदराव पाटील पुढे समाजात असलेल्या पानाडे आणि देवाडे यांची तुलना आपल्या 'पानाडे आणि देवाडे' या लेखात केली आहे. या लेखाद्वारे शेतक-यांना लुटणारे ही दोन प्रकारचे लोक त्यांनी सांगितले आहे. "पानाडी हा पाणी सांगतो व मनुष्याची शारीरिक तृष्णा पूर्ण करतो. तर दुसरा देवाचे ठिकाण सांगून आत्मिक तृष्णा पुर्ण करतो. परंतु या दोघांतील फरक अतिशय प्रगल्भतेने दाखण्याचा प्रयत्न मुकुंदराव पाटील करताना दिसतात. वास्तविक पाहता या दोन्ही वर्गाची कामे ही ठोकताळेच असतात. पानाडयाला जमिनीच्या आतमध्ये पाणी कोठे आहे हे माहीत नसते. तर देवाडयालाही नेमका देव आहे का हे ठाऊक नाही या दोघांवर विश्वास ठेवून शेतकरी लूटला जातो हेच मुकुंदराव पाटील यांनी दाखवण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे."[३७] पुढे या दोन वर्गातील फरक दाखवत असतांनी त्यांनी हे स्पष्टपणे नमूद केले आहे की, पानाडे हे विविध जातीधर्मातील लोक असतात व ते पाणी सांगून आपली उपजिविका चालवतात परंतु देवाडे लोक ही एकाच जातीतील आहेत. ते आपला व्यवसाय दुस-यांना करु देत नाही.

पाणाडयांचा हा ढोंगीपणा आपल्या शेतक-यांना समजावा म्हणून ते सांगतात की, "पाणाडयाच्या वर्गात सर्व धंदयाची जातीची माणसे सापडतात. पण दुस-या वर्गात म्हणजे देवाडयाच्या कळपात एकाच धंदयाची जातीची माणसे सापडतात. म्हणजे पाणाडेपणाचा धंदा करण्यास कोणास अटकाव नाही. परंतु देवाडेपणाचा धंदा करणा-या देवाडयांचा या कामी मोठाच अटकाव आहे. आमच्याशिवाय हा धंदा इतरांनी करु नये असे यांचे आग्रहाचे म्हणणे आहे या म्हणण्यास भक्कम पुरावा म्हणून ते मोठमोठया शास्त्रांचा व दांडग्या दांडग्या देवाचा दाखला देतात."[३८] मुकुंदराव पाटील यांनी या लेखाद्वारे पानाडे आणि देवाडे यांचा ढोंगीपणा दाखवला आहे हे लोक शेतक-यांना अक्षरशः लुटतात परंतु यातही ही देवाडे मंडळींचा ढोंगीपणा फक्त आपल्याच

जातीतील लोकांनीच हा व्यवसाय करावा यासाठी त्यांनी घातलेली अनेक प्रकारची भीती यातून होणारी शेतक-यांची दैन्यावस्था दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मुकुंदराव पाटील यांनी मूर्तीपूजा आणि त्यावर उपजिविका करणारा पुरोहितवर्ग यांच्यावर प्रखर हल्ला केला आहे. या पुरोहितवर्गावर विश्वास ठेवून समाजाचा आणि राष्ट्राचा नाश कसा झाला याविषयी परखड विचार मांडले आहेत तेंव्हा कर्मठ सनातनी पुरोहिताचे पितळ उघडे पडू लागले त्यांची बाजू घेऊन केसरी ने ९ नोव्हेंबर १९२० च्या अंकातून सातारा जिल्हयाचे कलेक्टर रॉयसी यांच्याकडे तक्रार करताना म्हटले की, सत्यशोधक तमासगीर जशी हिंदू देवतांची निंदा करतात तशी येशू ख्रिस्ताची व पोपची निंदा करणारा तमाशा करण्याची परवाणगी सरकार देईल काय ? या तक्रारीस मुकुंदराव पाटील यांनी उत्तर देताना म्हटले की, “हिंदू देवतांची बेअब्रू सत्यशोधक समाजाने केली नसून जातभाईनीच केली आहे. सत्यशोधक समाजाने एखादी शिंगा शेपटाची देवता निर्माण करुन परमेश्वराची निंदा कधीही केली नाही तर देवता निंदक धर्मगुरुची कान उघाडणीच त्यांनी केली आहे. देवतांची पूजा अर्चा करण्यासाठी लाखो रुपये खाल्ले, जी खोटी पुराणे खरडली, त्याच पुराणातील वर्णने जर कोणी वाचून दाखवू लागला त्याच्या फोलपणा संबंधाने जर जनतेस कोणी सावध करु लागला तर ती देवतांची निंदा होणार नाही.”[३९] अशी तिखट प्रतिक्रिया व्यक्त करुन मुकुंदराव पाटील यांनी देवतांची खरी विटंबना ब्राह्मण समाजानेच अधिक केली आहे हे स्पष्ट केले.

मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाने हिंदू देवतांची बेअब्रु केली आहे असा जो सत्यशोधक समाजावर आरोप ब्राह्मण वर्गाकडून केला जातो तो आरोप चुकीचा असून सत्यशोधक समाजाने देवतांनिंदक धर्मगुरुंची कानउघाडणी करुन सत्य परिस्थिती मांडलेली आहे. सत्यशोधक समाज हा कोणी एका जातीविरोधी नसून त्या जातीतील लोकांच्या प्रवृत्तीविरोधी आहे हेच त्यांनी दाखवून दिले आहे. त्यासाठी देवदेवतांच्या मूर्तीपूजेत धन्यता मानणा-या कर्मठ भक्तांची प्रखर शब्दात त्यांनी अवहेलना केलेली दिसून येते.

इ.स.१९१३ मध्ये धारवाड जिल्हयात बडगेरी धर्ममार्तंडांनी कोटी लिंगार्चन सुरु झाले तेंव्हा मातीचे एकेक लिंग याप्रमाणे शंभर लाख लिंग करण्याचा हा एक प्रचंड कारखानाच उभारण्यात

आला होता. सर्व लिंग संख्या ब्राह्मणांच्याच हातून व्हावयाची होती, तेंव्हा मुकुंदराव पाटील यांनी या कर्मकांडाचा समाचार घेताना म्हटले की, "कोटीलींगार्चन करणे हा धर्मोन्नतीचा आत्मोन्नतीचा किंवा राष्ट्रोन्नतीचा मार्ग नव्हे, ही एक आडवाट आहे ही ईश्वरभक्ती नसून धुर्ताचे बिनभांडवली चिखलाचे दुकान आहे."[४०] म्हणजेच कोटीलींगार्चन करण्यात वेळ घालवण्यापेक्षा तो वेळ आणि त्यासाठी लागणारे श्रमाचा उपयोग करुन त्या मातीपासून चार पाच लोकांची घरे बांधून दिली असती तर काहीसे उपयुक्त झाले असते परंतु या कोटीलिंगार्चन करुन कुठल्याही प्रकारचा पुण्यांचा संचय होणार नाही तर हे फक्त धर्माच्या नावाखाली अंधश्रध्दाळू शेतक-यांची चाललेली लूट आहे.

निरर्थक वेळ घालविण्यापेक्षा समाजाची सेवा करण्यातच खरा धर्म असल्याचे मुकुंदराव पाटील यांनी दाखवून दिले होते पुण्य संचय करायचाच असेल तर समाजाची निस्वार्थी भावनेने सेवा करावी हेही पुरोहित वर्गाला सांगितले आहे. मुकुंदराव पाटील पुढे आपल्या 'सत्यशोधक समाज आणि जगद्‌गुरु' या अग्रलेखात स्पष्ट करतात की "आईला विनविण्यास किंवा बापाला संतुष्ट करण्यास जशी मध्यस्थांची जरुर पडत नाही, तशी भक्तांना ईश्वराची भक्ती करण्यास उपाध्याय किंवा धर्मगुरु असल्या मध्यस्थांची जरुर नाही."[४१] ईश्वराची भक्ती करण्यासाठी भक्तांना धर्मगुरुंची आवश्यकता नाही तर मग ईश्वराची भक्ती करण्यासाठी मध्यस्थ का लागतो कारण हा सगळा उठाठेव पुरोहितवर्गाने चालवलेला आहे हे मुकुंदराव पाटील यांनी ब्राह्मणेतर वर्गाला दाखवून देण्यासाठी समर्पक असे उदाहरण दिलेले होते.

मुकुंदराव पाटील यांनी या ब्राह्मणी वर्गाने ब्राह्मणेतर वर्गाची फसवणूक केल्याचा आणखी एक मार्ग उघड केला आहे. ते सांगतात की, "शेकडो वर्षापासून ब्राह्मणेतर जाती मृत वडलांची श्राध्दे करीत आल्या आहेत. या श्राध्दात कोणकोणती मंत्रतंत्र असावी आणि भटब्राम्हणांस धनधान्य अधिकाधिक कसे मिळेल यासाठीच पंचांग लिहिले आहे. परंतू श्राध्दाविषयी लोंकांची शोधक बुध्दी होईल अशी एकही पोथी का लिहीली गेली नाही तसेच भाद्रपद महिण्यातच मृत वडलास भटकावळयामार्फत अन्न पाठविता येते व इतर महिण्यात का पाठविता येत नाही. तसेच स्वर्गात माल अगदी बिनचूक पोहचतोच असे कशावरुन."[४२] असे विचारुन ही ब्राह्मणेतर वर्गाची चालवलेली लुबाडणूक आहे हेच दाखवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. बहुजन समाजातील कोणी

मनात शंका घेऊ  नये म्हणून दडपण आणण्यांचा प्रयत्न केला जात आहे जर कोणी शंका घेतली तर त्याला नरकात पडावे लागते. पशुपक्षांच्या जन्माला जाऊन दु:खे भोगावी लागतात अशा प्रकारचे दडपण बहुजन समाजावर बसवल्याने तो निमुटपणे ब्राह्मणमंडळी सांगेन त्या पध्दतीने वागतो. परंतु या बहुजन समाजाने हे दडपण झुगारुन या  प्रथा बंद केल्या पाहिजेत यासाठी मुकुंदराव पाटील आग्रह धरताना दिसतात.

ब्राह्मणेत्तर वर्गाला सांगितलेल्या या सर्व धर्मविधी  ब्राह्मणांच्या उत्पन्नाच्या बाबी असल्यामुळे त्या करण्याचा ते आग्रह करतात त्यासाठी ते 'आपल्या वडिलांस भोजन की कावळयास जेवण' या लेखात म्हणतात की, "भटाने सांगावे आणि इतरांनी ऐकावे हा हिंदुधर्माचा सर्वसाधारण सिध्दांत असल्यामुळे व प्रत्येक धर्मविधी ही भटाच्या उत्पन्नाची बाब असल्यामुळे, त्यांनी अनेक वेडगळ आचार विचार धर्माच्या नावाखाली सुरु केले आहेत. धार्मिक विधीत जर भटास कवडीचेही   उत्पन्न नसते तर श्राध्दासारखी धर्मकृत्ये प्रचारात केव्हाही आली नसती दूर कशाला, सध्या वदय भाद्रपदांत शहरोशहरी व खेडोखेडी श्राध्दांची जी एकच गडबड उडते, तीत भटांस दाळतांदूळ, पीठगूळ, भाजीपाला, चवलीपावली,  वगैरे काही एक न मिळू लागले व सर्व प्रकारचे धर्मविधी परोपकारार्थ फुकट करावे असे ठरले तर श्राध्दांचे कायमचे श्राध्द होईल, शिवाय या पोरखेळात काही अर्थ नाही म्हणून हेच भटजोशी प्रसिध्द पणे म्हणू लागतील."[४३] मुकुंदराव पाटील यांनी या ठिकाणी ब्राह्मणेतरांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे की, जर या ब्राह्मण मंडळीला या धार्मिक विधीतून काहीच उत्पन्न मिळाले नसते तर त्यांनीच  ब्राह्मणेतरांना या विधी कशा चुकीच्या आहेत आणि यामुळे शेतक-यांचा वेळ वाया जातो असे सांगून या विधी त्यांनी बंद केल्या असत्या. परंतु त्यातून त्यांना उत्पन्न मिळते त्यामुळे त्या करणे बंधनकारक ठरवले गेले जर एखादयाने या धार्मिक विधीस विरोध केला तर त्याला एवढा त्रास दिला जातो की त्या त्रासापेक्षा तो या विधी करणे चांगले मानतो.

मुकुंदराव पाटील यांनी या ब्राह्मणेतर बहुजन समाजाला या ब्राह्मण मंडळींनी विविध धार्मिक विधीच्या रुपाने कसे देशोधडीला लावले जात आहे. हेच वेळोवेळी समजावण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लिखाणातून आणि प्रचारातून केलेला आहे. या प्रथा जर बंद केल्या तर बहुजन समाजाला काही फरक पडणार नाही परंतु ब्राह्मणमंडळीची गरीबांना लूटण्याची दुकाने चालणार नाही म्हणून या विधी आजतागायत चालू असल्याचे दिसून  येतात. जोपर्यंत बहुजन समाजाला या धार्मिक

विधीतून होणाऱ्या लुबाडणूकीमुळे आपण नागवले जात आहोत याची जाणीव होणार नाही तो पर्यत या प्रथा ही मंडळी चालूच ठेवतील म्हणून मुकुंदराव पाटील बहुजन समाजाचे प्रबोधन करतात त्यासाठी बहुजन समाजात चालू असलेल्या प्रथा या फक्त ब्राह्मणजांतींनी आपली उपजिवीका चालवण्यासाठीच चालू ठेवल्या आहेत हे ठणकावून त्यांनी सांगितले होते. व या प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडलेली होती. या संदर्भात मुकुंदराव पाटील सांगतात की, "जर एखादयाने या परंपरांना विरोध केला तर ही ब्राह्मण मंडळी या व्यक्तीने आपला धर्म बुडवला म्हणून अपप्रचार करतात. त्यांच्यावर वेगवेगळे आरोप करतात या ब्राह्मणजातींना धर्म म्हणजे नेमके काय ? हे माहित आहे का ? "[४४] या धर्माविषयी मुकुंदराव पाटील आपला विचार मांडतांना सांगतात की, धर्म हा मनुष्याच्या उत्कर्षाप्रमाणेच उत्कर्ष पावत जाणारा असतो तो सदैव संक्रमणावस्थेत असतो. नदीतील वाहत्या पाण्याप्रमाणे तो प्रवाही असतो. त्याचा ओघ अडवून त्यांची डबकी निर्माण करणे हे धर्म बुद्धीस घातक आहे.

ब्राह्मणजांतीनी धर्माला जे संकुचित बनवण्याचा प्रयत्न चालवला, त्यामुळे हिंदू धर्माला आलेली मरगळ मुकुंदराव पाटील यांना मान्य नव्हती. त्यांच्या मते धर्म हा सर्वांना समान वाटणारा असावा व तो नेहमी आपल्या बरोबर समाजालाही गतिमान बनवणारा असावा अशी त्यांची धर्माबद्दलची भूमिका होती. याचवेळी मुकुंदराव पाटील यांची मतलबी धर्मग्रंथावर हल्ला केला. या संदर्भात ते सांगतात की, "आपली एकतंत्री सत्ता सर्वत्र निर्वेदपणे चालावी. यासाठी धर्मगुरुंनी श्रृती, स्मृती, पुराणे इ. ग्रंथ निर्माण केले आहेत. त्याचे पालन सर्वानी काटेकोरपणे करावे. म्हणून बहिष्कार, नरककुंड, हद्दपार इ. शिक्षा सांगितल्या आहेत. भोळयाभाबडया लोकांनी या धर्मग्रंथातील वचनाचे पालन करावे यासाठी प्रत्येक पोथीच्या अध्याय समाप्ती नंतर या ग्रंथास जो खोटे मानील, यातील कथा जो असत्य म्हणेल अथवा त्यासंबंधाने शंका किंवा संशय घेईल तो नरकात पडेल, त्याच्या जिभेत किडे वळवळ करतील, यम रेतकुंडात लोटेल, डुक्कराच्या जन्मास जावे लागेल, आजेपंजे स्वर्गातून नरकात पडतील अशी भीती दाखवली आहे."[४५] अज्ञानी लोकांची धर्मग्रंथाचा आधार घेऊन लुबाडणूक कशी केली जाते. या वस्तुस्थितीवर मुकुंदराव पाटील यांनी प्रकाश टाकून भाकडकथांनी भरलेल्या पोथ्या पुराणांच्या कुचक्या पायावर हिंदुधर्माची इमारत उभारली आहे. तो पायाच प्रथम खणून जमीनदोस्त केला तरच हिंदू धर्माची इष्ट व अपेक्षित सुधारणा होऊ शकेल असे

स्पष्ट मत त्यांचे होते. तसेच मुकुंदराव पाटील यांनी ब्राह्मणधर्मगुरु आणि पुरोहित वर्गावर घणाघाती टीका केली म्हणून ते ब्राह्मण द्वेष्टे होते. अशी त्यांच्यावर टीका केली. परंतु त्यांनी ब्राह्मण वर्गावर प्रहार केला नसून त्यातील ब्राह्मण्यावर, कर्मठ आचार विचारांवर आणि स्वार्थी-लबाड वृत्तीवर प्रहार केले आहेत. पुरोगामी व सुधारणावादी ब्राह्मणांचे त्यांनी तोंडभरुन कौतुक केले आहे.

"शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी इ.स. १९३६ साली मुंबई येथे निकाळजे या अस्पृश्य गृहस्थाच्या मुलीचा नामकरण विधी केला. आणि त्या मुलीला मांडीवर घेतले त्याबद्दल त्यांचे हार्दीक अभिनंदन त्यांनी केले आहे. तसेच श्री. वासुदेवराव भावे यांनी पुण्याजवळ चांभार जातीच्या लोकांच्या उध्दारासाठी एक संस्था स्थापन केली आणि डॉ.कुर्तकोटी यांनी त्या संस्थेचे उद्घाटन केले याबद्दल मुकुंदराव पाटील यांनी उभयतांचा गौरव केला. तसेच ब्राह्मण पुरोहितास डावलून सत्यशोधक समाजाने विवाह लावले. त्यावेळी दक्षिणा बुडाल्याचे दावे पुरोहितवर्गाने दाखल केले यावेळी डॉ. मुकुंदराव जयकर यांनी ब्राह्मणेतर दाव्याचे वकिलपत्र स्विकारुन विनामुल्य काम केले."[४६] याबद्दल त्यांची प्रशंसा मुकुंदराव पाटील यांनी केली होती. यावरुन मुकुंदराव पाटील यांनी ब्राह्मण समाजाविरोधी आपली लेखणी चालवली असली तरी त्यांचा रोष हा या समाजातील स्वार्थी ब्राह्मणी प्रवृत्ती विरोधी होता.

ज्या लोकांनी ब्राह्मणेतर बहुजन समाजाच्या अज्ञानाचा, त्यांच्या अंधश्रध्दाळू प्रवृत्तीचा फायदा उठवला व आपल्या स्वार्थासाठी वेगवेगळया मार्गाने ब्राह्मणेतर लोकांना लूटले या वर्गाविषयी मुकुंदराव पाटील यांना चिड होती. म्हणून या ब्राह्मणी प्रवृत्तीच्या लोकांविरोधी त्यांनी आपली लेखणी चालवलेली होती हे या वरुन दिसून येते. बहुजन समाज जो अज्ञान अंधकारात खितपत पडला आहे या समाजाला जागे करण्याचा व त्यांना शिक्षीत करुन समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याची त्यांची ईच्छा होती. या ध्येयापोटी त्यांनी 'दीनमित्र' वृत्तपत्राद्वारे धार्मिक प्रबोधनाची लढाई चालवली. आजही आधुनिक युगात पुरोहित वर्गाने चालवलेल्या या प्रथा अस्तित्वात असल्याच्या दिसतात. त्यामुळे आजच्या आधुनिक युगातील समाजाला मुकुंदराव पाटील यांचे विचार अंर्तमुख केल्याशिवाय राहणार नाहीत. यातून आधुनिक समाजाला हे विचार निश्चित प्रेरणादायी ठरतील.

## ४.६ ब्राम्हणी पुरोहितशाही विरोधी संघर्ष

ब्राह्मणी पुरोहितशाही विरोधी बोलताना जोतिबा फुले म्हणतात की, "अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पुरोहितशाही शिगेला पोहचली होती. ब्राह्मणांची मानसिक व बौध्दीक अधोगती झाली होती, स्वार्थ बोकाळला होता. धर्माच्या नावाखाली  जातीवाद वाढला होता. गरीब, अज्ञानी, कष्टाळू, शूद्र शेतकरी आणि अस्पृशादि अतिशूद्रांचे शोषण वाढले होते, इंग्रजांचे राज्य आलेले होते. पण ब्राह्मणांनी  इंग्रजी शिक्षण घेऊन विविध सरकारी खात्यांमध्ये सरकारी नोकऱ्या मिळवल्या. खेड्यात कुलकर्ण्याच्या स्वरुपात तोच प्रशासक होता. शिक्षक, वकील, पोलीस, भिक्षूक तोच, सावकारही तोच. अशा सर्व स्तरांवर ब्राह्मणी वर्चस्व प्रस्थापित झालेले होते. मालकी हक्कामुळे सावकारी व्यवसायाला  तारण मिळू लागले. सामाजिक, धार्मिक शोषणात आर्थिक शोषणाचे नवीन हत्यार आले. राज्य इंग्रजांचे, कारभार ब्राह्मणांचा."[४७] अशी अवस्था झालेली आपणास पहावयास मिळते. ही कोंडी फोडायची असेल तर ब्राह्मणशाहीच्या कचाट्यातून शूद्रादिशूद्रांची सुटका करणे जोतिराव फुले यांना महत्त्वाचे वाटले. म्हणून त्यांनी इ.स. १८८३ मध्ये "शेतकऱ्यांचा आसूड" हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिलेला होता.

छत्रपती शाहू महाराजांनाही पुरोहित शाहीचे वर्चस्व पूर्णपणे नष्ट करावयाचे होते. परंतु "एकदम सर्व जुन्या गोष्टी नष्ट करणे लोकांना पचत नाही, रुचत नाही म्हणून पायरी पायरीने सर्व हालचाली ते करीत होते."[४८] असा विचार खंडेराव बागल मांडताना दिसतात. यावरुन शाहू महाराजांचा पुरोहितशाही हळूहळू पूर्णपणे नष्ट करण्याचा विचार आपल्या लक्षात येतो. शेतकरी बहुजन समाज हा अज्ञानी अंधश्रध्दाळू बनण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे धर्म व्यवस्थेमध्ये वैदिक कर्मकांड करण्याचा अधिकार ब्राह्मण पुरोहिताला दिलेला होता.

आपले श्रेष्ठत्व निर्माण करण्यासाठी या पुरोहित वर्गाने धर्मग्रंथाची रचनाच आपल्या इच्छेप्रमाणे आपले श्रेष्ठत्व बहुजनावर निर्माण होईल या पध्दतीने बनवली. यामुळे बहुजन समाज पुरोहित सांगतील त्यापध्दतीने वागू लागला. याचा परिणाम म्हणजे बहुजन समाजावर अन्याय अत्याचार होऊ लागला. या  अन्याया विरोधी लढण्याऐवजी बहुजन समाज हा अन्याय निमुटपणे सहन करत होता. याला जर कोणी विरोध करण्याचा प्रयत्न केला तर त्याला भीती दाखवली जात

असे. तुम्हाला नरकात जावे लागेल. यामुळे हा समाज पुरोहितवर्गाची लुट निमुटपणे ईश्वरी इच्छा म्हणून सहन करत असे हा अज्ञानी समाज जाती व्यवस्थेमध्ये गुंतलेला होता याचा फायदा पुरोहितवर्ग घेतो. म्हणून या ब्राह्मणेतर समाजाला अन्यायापासून मुक्त करण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी बहुजन समाजाची चाललेल्या लुटीची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता.

मुकुंदराव पाटील असे सांगतात की, ब्राह्मणांनी काहीही केले कसेही वागले तरी ते धर्माला धरुन असते व बहुजनांनी जर एखादे चांगले काम ब्राह्मणांना न विचारता करायचे म्हटले तर ते धर्मविरोधी ठरते. आमच्या लोकांचा या ब्राह्मण मंडळीवर एवढा विश्वास आहे की, ते ब्राह्मणांना देव मानतात या आंधळया देव वादा पुढे नतमस्तक होतात परंतु ही मंडळी किती पाप करतात हे कोणी बघत नाही. या मंडळींनी कोणतीही कामे केली तरी ती चांगली ठरतात.

मुकुंदराव पाटील आपल्या 'देवपूजा' या लेखात सांगतात की, "बार्शीच्या एका साधारण ब्राह्मणाने औरतीचा तमाशा उभा करुन बीभत्स नाचरंग केला तर तो मोठा दोषार्ह आहे, असे ठरत नाही. असे कोणी म्हणू लागल्यास त्याची समजूत घालण्याच्या भानगडीत ब्रह्मदेवही पडणार नाही. मग आम्ही दूरच राहणार हे उघड आहे. ब्राह्मणाने तमाशा करावा का न करावा हे ठरवित बसण्याची आम्हास आवश्यकता नाही आमचे लोक ज्यास आंधळयाप्रमाणे देव मानतात व ज्याच्या पायावर द्रव्याचे ढीगच्या ढीग घालतात ते कसे वागत आहेत व त्याचे कासेतून पुण्य व पापाचे दूध निघत आहे. हे गोब्राह्मणास पिणा-या भक्त वत्सास कळावे म्हणून आम्हास पुन्हा पुन्हा एकाच विषयावर लिहिणे भाग पडते."[४९] वाटेल तसे दूराचरण करुनही जर कोणी ब्राह्मण ब्राह्मण समाजात बहिष्कृत ठरत नाही मग आमच्या समाजातील लोकांनी आपल्या जातीव्यतीरिक्त उदयोगधंदा केला किंवा गावातील लोकांना पोथी म्हणून दाखवू लागला, लग्न लावू लागला, तर हे ब्राह्मण मंडळी त्यांने पाप केले म्हणून त्याला त्रास देतात. त्याच्या चार पिढया नरकात जातील असा आशीर्वाद देतात त्यांनी तमाशात नाचकाम केले तरी चालते परंतु ब्राह्मणेतर जातींनी ब्राह्मणांच्या आशीर्वादाशिवाय कोणतेही कार्य करु नये अशी या ब्राह्मण जातीतील लोंकाची अपेक्षा असते व आमच्या बहुजन समाजातील लोक ज्या ब्राह्मण लोकांना देव मानतात त्यांना दक्षिणा म्हणून पैसा वाटतात, परंतु ते काय कार्य करतात, पाप करतात की पुण्य याचा कधीही विचार करत नाही. घरात पोथी वाचतांना आपले लहान मूल खेळत खेळत त्यांना शिवले तर ते त्याला मारतात. एवढा या ब्राह्मण जातीच्या

आहारी बहुजन समाज गेला आहे. हा धर्मभोळे पणा नाहीसा व्हावा, म्हणून पुन्हा पुन्हा एकाच विषयावर लिहिणे मला भाग पडते असे मुकुंदराव पाटील कळकळीने सांगताना दिसतात. यातूनच या बहुजन समाजाबद्दलची तळमळ आपुलकी त्यांना असल्याची दिसून येते.

ज्या व्यक्तीला पुण्यसंचय व्हावा यासाठी आपण दानधर्म करतो त्या व्यक्तीची वागणूक आपल्याला माहीत असतांनाही फक्त आपले पुण्य वाढले पाहिजे या एकाच गोष्टीसाठी आपल्या कष्टाचा पैसा पुरोहित वर्गाला दान करतो. परंतु या पैशावर ती मंडळी कोणकोणती ढोंगे करतात हे आपणाला दिसत असतांनाही आपण असे वागतो यामुळे आपला प्रपंच अधोगतीला चालला आहे. जो काही कष्टाचा पैसा जमा होतो तो जर पुण्य संचय वाढावा म्हणून पुरोहितांना दान धर्म करण्यासाठी खर्च केला तर आपल्याला शिल्लक काय राहणार ? याची या अज्ञानी लोकांना जाणीव करुन देण्याचा प्रयत्न मुकुंदराव पाटील करताना आपणास दिसतात.

मुकुंदराव पाटील पुढे सांगतात की, “सर्वात मोठी आर्श्चयाची गोष्ट म्हणजे आपण ज्याला दान करीत आहोत त्याची बरी वाईट वर्तणूक दिसत असतांना तिकडे डोळे झाक करुण आपल्या कष्टाचा पैका त्याला दान करायचा म्हणजे तो पायखाण्यात टाकायचा ! व पुण्य गाठीस बांधले म्हणून समजूत करुन घ्यायची. हा किती मुर्खपणा म्हणावे बरे ? सारांश काय की आपले लोक स्वतःचा पैसा व आयुष्याचे अनमोल दिवस खर्च करुन पुण्य संपादण्यासाठी ज्या क्षेत्रोपाध्यांना लाखो रुपये पाण्यात भिजवून देतात ते त्या दानाच्या पैशावर मस्त होऊन कसे ढंग करतात याचा विचार आमच्या मंडळीने आवश्य केला पाहिजे.”[५०] बहुजन समाजाने शेतात राबराब राबायचे त्यातून जो काही माल पिकेल तो बाजारात विकून जो पैसा मिळतो तो पैसा आपल्या कुटुंबासाठी खर्च न करता या पुरोहित मंडळींना दानधर्म करुन पुण्य मिळाले अशी मनाची समजूत करायची हा खरोखरच किती मुर्खपणा आहे. हे दाखवण्याचे काम त्यांनी केले ते पुढे सांगतात की या लोकांचे या ढोंगीपणाकडे लक्ष वेधण्यासाठी तीर्थशुद्धीमंडळ नावाची एखादी संस्था स्थापन होणे आवश्यक आहे. ज्याद्वारे या अज्ञात लोकांना आपण काय करतो याची जाणीव होईल.

बहुजन समाजातील जर कोणी समाजोद्धाराचे कार्य केले तर हा पुरोहितवर्ग त्यांना त्रास देतो. ब्राह्मणेतर वर्गातील एका कीर्तनकाराने कीर्तन सांगण्यास सुरुवात केल्यानंतर कीर्तन बंद करुन

त्याला देवळा बाहेर हाकून दिले. कारण या किर्तनाला लोक भरपूर जमत असत व या कीर्तनाद्वारे ते लोकांना त्यांच्यावरील अन्यायाची जाणीव करुन देत असे त्यांचे किर्तनाला गावातील लोकांचा मिळणारा प्रतिसाद बघून आपल्या उत्पन्नाला मोठा धक्का बसेल या उद्देशाने या पुरोहित वर्गाने त्यांना मंदिराबाहेर हाकलले. परंतु या महाराजाने दुस-या मठाचा आश्रय घेतल्याने या पुरोहितांने तिथे जाऊन त्यांना शिव्या दिल्या व कीर्तनकार बुवास कीर्तन करु दिले नाही म्हणजेच या पुरोहितवर्गास पुजाविधी करण्याचा अधिकार जसा आहे तसा पोथीपुराण सांगण्याचा अधिकार ही या पुरोहित वर्गालाच आहे, अशी त्यांची भूमिका बनली होती.

ब्राह्मणेतर वर्गातील कुणी समाजासाठी चांगले कार्य करण्याचा प्रयत्न केला तर या पुरोहितवर्गाने हा आमच्या धर्मावर घाला घालतो आहे असे समजून त्याला त्रास दिला जातो. त्यासाठी अनेक अडचणी त्या व्यक्ती समोर निर्माण केल्या जातात. या साठी मुकुंदराव पाटील "आधुनिक रामेश्वर भट" या लेखात सांगतात की,"आमच्या जवळच बाबुराव बुवा म्हणून एक मराठे जातीचे कीर्तनकार व वारकरी आहेत हे ही नेहमी पैठण, पंढरपूर वगैरे ठिकाणी जातात त्याच्या बरोबर बराच मोठा भजनी समूह असतो आणि अलिकडे तो वाढत आहे. काही सत्यशोधक समाजातील मंडळीच्या परिचयामुळे बुवांच्या कीर्तन शैलीत किंचित बदल झाला असला तरी मोठाले थवे घेवून क्षेत्रस्थानी वाऱ्या करण्याविषयी आमचा मतभेद आहे तथापी ब्राह्मणेतर जातीचे बुवा असल्याने इतर ब्राह्मण जातीच्या बुवांनी यांचा चालवलेला छळ पाहिला म्हणजे कोणत्याही विचारी मनास वाईट वाटल्यावाचून राहणार नाही. नेवाशास तर या बाबुराव बुवांच्या सामानावरुन एका तामसी ब्राह्मण बुवाने बैलगाडी मुद्दाम घालवून अन्नाचा व इतर सामानाचा चुराडा केला."[५१] आज ब्राह्मणेतर बहुजन समाज ब्राह्मण पुरोहितांनी चालवलेल्या छळाला कंटाळला आहे. अशा परिस्थितीत जर ब्राह्मणेतर जातीतील कोणी समाजाच्या उध्दारासाठी चांगले कार्य केले तर हा पुरोहित वर्ग त्यांचा कसा छळ करतो याचे उदाहरण मुकुंदराव पाटील यांनी येथे दिले आहे.

पुरोहित वर्गाच्या इच्छेशिवाय इतर समाजातील लोकांनी कोणताही व्यवसाय व कोणतेही कार्य करु नये अशी या पुरोहित वर्गाची ठाम भूमिका होती. याच पुरोहितांच्या पंचाग मुहूर्त, ज्योतिष यांच्यावर विश्वास ठेवून शेतकऱ्याचे कसे नुकसान होते हे 'मुहूर्ताने म्हैस मारली' या कथेत दाखवले आहे. या कथेतील सदुबाची हरवलेली म्हैस गावाच्या पूर्वेस दोन कोसावर एका वडाच्या

झाडाखाली असल्याचे शिवराम भटजी सांगतात तर त्याच्या मुलाला दुस-या गावचा भटजी गावच्या पश्चिमेस एका पोह-यास असल्याचे सांगतो दोन्ही ठिकाणी शोध घेऊनही म्हैस सापडत नाही तेंव्हा आपल्या दुर्दैवाला दोष देवून ते गप्प बसतात. दुसऱ्या दिवशी गावचा वेसकर (महार) एका पडक्या विहीरीत म्हैस पडली असल्याचा निरोप घेवून येतो. तेव्हा रात्रभर उपाशी असलेली म्हैस वर काढतांना मृत होते आपण ज्योतिष पाहण्याच्या नादी लागलो नसतो आणि प्रथम गावाभोवती पूर्ण तपास केला असता तर म्हैस खात्रीने मेली नसती असे हताश होवून सदोबा म्हणतो [५२] या कथेतून मुकुंदराव पाटील यांनी या पुरोहितवर्गाच्या पंचांगावर विश्वास ठेवून आपले कधीही चांगले होणार नाही उलट नुकसानच जास्त होते हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

जर सदुबाने हरवलेली म्हैस पुरोहितांच्या म्हणण्याप्रमाणे न बघता स्वतःसंपुर्ण गावाभोवती तपास केला असता तर म्हैस वाचली असती परंतु हा सदोबा पुरोहितांच्या म्हणण्याप्रमाणे बघु लागला व यातच वेळ निघून गेला. म्हणजेच या कथेतून मुकुंदराव पाटील यांनी भट, भटजी, ज्योतिष यांच्या नादी न लागता आपले काम आपण आपल्या स्वतः वर विश्वास ठेवूनच आपल्या प्रयत्नाने करावे हेच बहुजनांना दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचवेळी स्वतः पुरोगामी वृत्तीचा आव आणणा-या सुधारकांची खिल्लीसुद्धा त्यांनी उडवलेली आपणास दिसते.

### ४.७ **कुलकर्णी या सामाजिक राजकीय स्थानास विरोध**

प्राचीन काळात खेडी स्वयंपूर्ण होती. खेडयातील गरजा खेडयातच भागवल्या जात असत खेडयामध्ये बलुतेदारी पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे एका खेडयातील व्यक्तीचा दुस-या खेडयातील व्यक्तीशी संबंध येत नसे. गावात पाटील हा प्रमुख असे त्यांच्या मदतीला कुलकर्णी हा वतनदार काम करत असे पाटील अशिक्षीत असल्यामुळे गावचा सर्व व्यवहार कुलकर्णी बघत असे. कुलकर्णी हा ब्राह्मण असल्यामुळे गावात त्याला महत्त्वाचे स्थान होते परंतु तो गावातील लोकांच्या अडाणीपणाचा, अज्ञानी, अंधश्रध्दाळू पणाचा फायदा घेत असे. गावात एक प्रकारे त्याची हुकूमत चालत असे.

कुलकर्णी शिक्षीत असल्याने गावातील कारभार त्याच्या शिवाय चालत नव्हता. त्याचे इतर ठिकाणच्या वरिष्ठ अधिका-यांशी संबंध असे. कोर्टकचेरी तालुक्याच्या ठिकाणचे अधिकारी

यांच्याशीही त्याचे घनिष्ठ संबंध असत. त्यामुळे कुलकर्ण्याने गावातील लोकांना कितीही त्रास दिला तरी त्याविरोधी कोणीही शब्द सुद्धा काढत नसे. कारण गावातील लोंकांची अशी समजूत असे की आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार आपण निमूटपणे सहन केला पाहिजे. आपल्यावर अन्याय करण्यासाठीच कुलकर्णीला सरकारने पाठवले आहे. अशी खेडयातील शेतक-याची समजूत होती. कुलकर्णी हा शेतक-यांची लूट करत असे त्यांना फसवून त्यांच्या जमिनी गिळंकृत करीत असे. हा अन्याय दूर करण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी कुलकर्णी या वतनाला विरोध केला व हा कुलकर्णी खेडयातील शेतक-यांना कसा नागवितो हे त्यांनी आपल्या लेखणीद्वारे स्पष्ट केले. त्यासाठी त्यांनी 'दीनमित्र' मधून कुलकर्णी लिला स्पष्ट केल्याचे आपणास दिसून येते.

### ४.७.१ गावातील कुलकर्ण्यांचे स्थान

वतनदार कुलकर्णी हा परंपराधिष्ठीत चालत आलेल्या अधिकारामुळे गावात त्याचे महत्त्वाचे स्थान असे गावात फक्त कुलकर्णीच शिकलेला असे. गावात पाटील प्रमुख असूनही त्याच्या अडाणीपणामुळे गावाचा कारभार कुलकर्णी बघत असे कुलकर्णी गावातील लोकांना हवे तसे वागवत असे. या अन्यायावर मुकुंदराव पाटील यांनी कुलकर्ण्यावर टीका केली या टीकेमुळे ब्राह्मण मंडळींनी केसरीमधून त्यांच्या प्रत्युत्तरा दाखल लेख लिहीले. यात न. चि. केळकर म्हणतात की, मुकुंदराव पाटलांचा कुलकर्ण्यावर खरा रोष ते कुलकर्णी आहे म्हणून नव्हे तर ते ब्राह्मण आहेत म्हणूनच आहे. परंतु हा आरोप कसा चुकीचा आहे हे कुलकर्ण्याच्या एकूणच कारवाया पाहिल्यावर लक्षात येते. कारण हे पद परंपरागत ब्राम्हणांनी जास्त उपभोगले आहे. त्यामुळे त्यांनी शेतक-यांना दिलेल्या त्रासामुळे त्यांच्यावर टीका होणे साहजिकच आहे.

मुकुंदराव पाटील यांनी सामान्य शेतक-यांना ते सहन करत असलेल्या अन्यायाची जाणीव करुन त्यांना या अन्यायाला प्रतिकार करण्यास प्रेरित केले व कुलकर्णी वतन रद्द करुन त्यांच्या ऐवजी तलाठयांची निर्मिती करावी यासाठी त्यांनी सरकारकडे मागणी केली. हा कुलकर्णी खेडयातील शेतक-यांचा अडाणी पणाचा फायदा घेतो. खेडयातील ग्रामप्रमुख पाटील हा सुध्दा अडाणी असल्याने सर्व कारभार कुलकर्णीच बघत असे तो ग्रामप्रमुखाचा लेखणिक म्हणून काम बघत असे. त्याच्या कामाविषयी मुकुंदराव पाटील सांगतात, "शिवाराचे पत्र, कमाल पत्र, आकार

व वर्णन  हयांचा आकार बंद, शेतवार पत्रक, लावणीपत्रक, पडपत्रक, सरकारी देण्याचे असामीवार वसुलीबाकी पत्रक व त्यांची बाब, वार फाळणी आणि जमा खर्च गुरांची  व माणसांची गणती  वगैरे मुलकी कागदपत्र दिवाणी कामातील पंचायतीचे सारांश व फैसल नामे, फौजदारी कामाचे कागद वगैरे लेखी कामे कुलकर्णी करी  या खेरीज गावक-यांची पत्रे, देण्या-घेण्याचे दस्तऐवज पावत्या व त्यांची सावकारी, सरकारी देण्याचे जमा खर्च हे ही लिहीणे तो लिही. यामुळे समाजात कुलकर्ण्याचे स्थान खूप महत्त्वाचे असे.''[५३] गावातील सर्व प्रशासकीय व्यवहार तोच बघत असे गावप्रमुख पाटलाची  निशाणी नांगर असे त्यामुळे कुलकर्ण्याच्या मर्जी प्रमाणे गावातील लोकांना वागावे लागे.

दुष्काळ, रोगराई, आवर्षण, यातही कुलकर्णी गावातील लोकांकडून पैसा उकळत असे. यामुळे सामान्य   जनतेचे होणारे हाल पाहून  मुकुंदराव पाटील यांनी कुलकर्णी यांच्या सामाजिक राजकीय स्थानावर आपल्या लेखनीद्वारे प्रहार केल्याचे दिसून येते  व कुलकर्णी हा खेडयातील शेतक-यांची कशी पिळवणूक करतो हे त्यांनी या ठिकाणी दाखवून दिले होते.

### ४.७.२ कुलकर्ण्यानी शेतक-यांची चालवलेली पिळवणूक

कुलकर्णी हा वास्तविक पाहता खेडयातील शेतकरी आणि सरकार यांच्यातील महत्त्वाचा घटक होता. तो खेडयातील शेतक-यांना अडीअडचणीला सरकारी कर्जाचे वाटप करत असे. त्याच बरोबर शेतसारा वसूली, शेतीची खरेदीविक्री, नोंद, प्रतवार, यांची माहिती ठेवण्याचे काम करत असे. शिवाय शेतीविषयी वाद निर्माण झाल्यास कुलकर्ण्याची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे शेतकरी कुलकर्ण्याना भीत असत. त्यांच्याविरोधात कोणीही बोलत नसे. याचा फायदा कुलकर्णी उठवत असे.

शेतीची  सर्व माहिती  सरकार दरबारी पाठवण्याची जबाबदारी कुलकर्ण्याची असे तसेच शेतसारा वसूल करणे, व त्याची रितसर पावत्या देणे ही कामे कुलकर्ण्यांची असे. परंतु शेतक-यांच्या अज्ञानाचा फायदा कुलकर्णी घेत असल्याने शेतक-यांना रितसर पावत्या मिळत नसत. दुष्काळामुळे जर सरकारने शेतसारा माफ केला तर त्याची माहिती शेतक-यांना न देता कुलकर्णी उलट त्यांच्याकडे जमिनी जप्तीची भीती घालून शेतसारा वसूल करत असे. याविषयी

मुकुंदराव पाटील यांनी आपल्या 'कुलकर्णी लिलामृत' या खंडकाव्यातून कुलकर्णी शेतक-यांची कशी पिळवणूक करतो या विषयी ते म्हणतात की ,

" पडला दुष्काळ अतिदारुण | नुरले कुळापाशी त्राण |
सरकारे दयाळू होवून | सारामाफ पै केला ||
कोंडाजी पाटील अडाणी गोळा | त्यासी नव्हता तिसरा डोळा |
कुलकर्ण्याचा ब्रम्हघोटाळा | केंवी कळे तयाला ||
सारामाफ हुकुम झाला | परि तो दप्तरी बांधिला |
कुलकर्ण्याने न केला | गांवामाजी बभ्रा तो ||२२|| [५४]

कुलकर्णी हा येथे गावातील पाटलांच्या अडाणीपणाचा फायदा घेतो गावातील कोंडाजी पाटलाला दुष्काळामध्ये पूर्णपणे लुटतो कारण दुष्काळामुळे शेतक-याबरोबर गावातील पाटीलही कुलकर्ण्याकडे सारामाफीसाठी विनवणी करतो व आधीच माफ झालेला शेतसारा माफ करण्यासाठी कुलकर्णी पानसुपारी उपटतो. कोंडाजी पाटलाकडून शेतसारा म्हणून चार मन ज्वारी घेतो. पुढे दुष्काळाची तीव्रता वाढल्याने हाच पाटील कुलकर्ण्याकडे धान्य मागायला जातो तेंव्हा कुलकर्णी चार मन ज्वारी देतो व पुढील वर्षी आठ मन दयावी असे तोंडी करार करतो पुढील वर्षी पाऊस चांगला पडल्याने उत्पन्न चांगले निघते जेंव्हा पाटील चार मन ज्वारी देण्यासाठी जातो तेंव्हा कुलकर्णी ज्वारी न घेता दोनशे रुपये व्याजासहीत मागतो व पाटलावर फिर्याद देतो. शेवटी गावातील चार चौघे मंडळी तंटा येथेच मिटवण्याची विनंती करतात. चार मन ज्वारीसाठी कुलकर्ण्याला दहा बीघे जमीन दयायचे ठरते. यातून मुकुंदराव पाटील यांनी कुलकर्ण्याचा कपटी आणि संधीसाधूपणा स्पष्ट केला आहे.

कुलकर्ण्याप्रती शेतक-यांचा असणारा विश्वास, श्रद्धा, आदर, आणि विश्वासघातकी कुलकर्णी यांतून मुकुंदराव पाटील यांनी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी कुलकर्णी एक भ्रष्ट, लालची, स्वार्थी, शेतक-यांचे शोषण करणारा आहे. हे वास्तव चित्र समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. जेणे करुन अन्याय सहन करणारा शेतकरी जागा होईल व आपल्यावरील अन्यायाला प्रतिकार करील ही भूमिका मुकुंदराव पाटलांची होती. यासाठी त्यांनी

‘कुलकर्णी लिलामृत’ या ओवीबध्द कथानक काव्याची निर्मिती केली. यात त्यांनी मांडलेल्या साध्या व सामान्य शेतक-याला समजेल अशा काव्यरुप भाषेमध्ये जनप्रबोधन घडवण्याचा प्रयत्न केला शाहू महाराजांनी या ग्रंथाचे महत्त्व ओळखून हा काव्य ग्रंथ प्रकाशित करुन मोठ्या प्रमाणात प्रसारित केला. “सत्यशोधक चळवळीच्या जातीसंघर्षाला या काव्यग्रंथाच्या मेंढीचे कातडे पांघरलेला लांडगा आहे. तेंव्हा या लांडग्यास गोळीने ठार मारले पाहिजे किंवा विंचवासारखा जागीच ठेचला पाहिजे अशी जहरी टीका केळकरांनी केसरीमधून केली. एका बाजूला त्यांनी काव्यग्रंथामधील कल्पनांचा ओघ, प्रसादयुक्त वाणी व शुध्द भाषा या गुणांचा गौरव केला असला तरी ब्राह्मण जातीच्या हितसंबंधावरचा हा आघात त्यांना सहन झाला नाही. हे काव्य म्हणजे अमृतरुपी विष काही तरी सैतानी कृत्य करण्यास अवतरले आहे. असा हल्ला केळकरांनी चढवला.”[५५] कुलकर्णी वतनदारांनी जन्माधिष्ठीत वर्णश्रेष्ठता देवोत्पन्न असल्याचे भासविले कारण परंपरेने चालत आलेल्या वर्णश्रेष्ठतेला तडा गेला तर ब्राह्मणांचे महत्त्व कमी होणार होते.

शूद्र अंत्यज्यांनी आपल्या वाटयाला आलेले काम निमूटपणे करावे ही व्यवस्था देवाने निर्माण केल्याचे कुलकर्ण्याने भासविले यामुळे सामान्य शेतकरी कुलकर्ण्याचा अत्याचार निमुटपणे सहन करत असे. परंतु मुकुंदराव पाटील यांच्या लेखणीमुळे कुलकर्ण्यांचा खरा चेहरा समाजासमोर आला यामुळे त्यांना ब्राह्मण मंडळींकडून त्रास सहन करावा लागला परंतु या त्रासाला, कारवायांना न डगमगता मुकुंदराव पाटील यांनी कुलकर्णी वतन रद्द करण्यासाठी मोहिम उभारली होती. कुलकर्णी वतनाविरुध्द जनमत तयार होवू लागले होते.

“इ.स.१९१५ साली वतनदार कुलकर्णी काढून टाकण्याचा प्रश्न मुंबई कौन्सील मध्ये बहुजन समाजाच्या पुढा-यांनी उपस्थित केला. तेंव्हा त्यावेळच्या कौन्सील मधील ना. बेळवी यांनी त्याला कडाडून विरोध केला कुलकर्ण्यांच्या वतना संबंधी खेडयातील लोकांची मुळीच तक्रार नसतांना सरकारने त्यांची वतने काढून घेणे गैर आहे. लोकांत असंतोष पसरविणे योग्य होणार नाही. अशी जाणीव सरकारला करुन दिली यावेळी मुकुंदराव पाटील कोल्हापूर येथे होते यासंदर्भात ना.भास्करराव जाधव यांच्याबरोबर त्यांनी चर्चा केली कुलकर्ण्यांच्या असहय जाचाच्या विरुध्द सरकारकडे अर्ज पाठवून लोकमताची जाणीव करुन देण्याची आवश्यकता ना.जाधव यांनी व्यक्त केली. तेंव्हा मुकुंदराव पाटील यांनी त्यांच्या मदतीने अर्जाचा नमुना तयार केला आणि स्वत:खर्चाने

दहा हजार अर्ज छापून ते सर्व जिल्हयातून गर्व्हनर साहेबांकडे पाठवण्याची व्यवस्था केली."[५६] सत्यशोधक समाजाने जनमत जागृत करुन कुलकर्णी वतना विरुध्द आवाज उठवला आणि ही परंपरागत चालत आलेली अमाणुष पध्दत बंद करण्यास सरकारला भाग पाडले. यासाठी मुकुंदराव पाटील यांनी पुढाकार घेतला होता.

कुलकर्ण्याच्या त्रासामुळे शेतकरी जो नाडला जात होता त्या कुलकर्णी वतनाविरुध्द मुकुंदराव पाटील यांनी आवाज उठवल्याने आज प्रत्येक गावात तलाठी या पदाची निर्मिती शासनाने केली. तलाठयाची नेमणूक याचे सर्व श्रेय मुकुंदराव पाटील यांना जाते. याचबरोबर छत्रपती शाहु महाराजांचे ही खूप मोठे सहकार्य मुकुंदराव पाटील यांना या कामी मिळाले. यामुळेच मुकुंदराव पाटील सामान्य शेतक-यांची या भ्रष्ट, लाचार, कुलकर्ण्यांच्या जाचातून सुटका करु शकले हे या सत्यशोधक चळवळीचे खूप मोठे कार्य मान्य करावे लागते.

## संदर्भ


१. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ ले, अंक-२, ७ डिसें.१९१०.

२. कित्ता

३. कित्ता

४. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ ले, अंक ३८, ९ ऑगस्ट १९११

५. कित्ता

६. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे २ रे, अंक २२, २४ एप्रिल १९१२.

७. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे २ रे, अंक १८, २० मार्च १९१२.

८. कित्ता

९. बागडे उमेश ( संपा.) विचारकिरण, दीनमित्रमधील अग्रेलख (१९१० ते १९१५) भाग १, दीनमित्रकार मुकुंदरराव पाटील स्मारक समिती तरवडी, ता. नेवासा जि. अहमदनगर, प्रथमावृत्ती, १० मे २००९, पृ.२०

१०. कित्ता, पृ.१९,

११. क्षीरसागर शोभादेवी, आधुनिक भारताचा इतिहास, के सागर प्रकाशन, १९९४, पृ.१५३

१२. कित्ता, पृ.१५४,

१३. पाटील मुकुंदराव, दीनमित्र, वर्ष ५, अंक १२, ३ फेब्रुवारी १९९५

१४. कित्ता

१५. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ ले, अंक ६, २८ डिसेंबर १९११

१६. कित्ता

१७. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष २, अंक २५, २९ मे १९१२

१८. कित्ता, बगाडे उमेश, प्रस्तावना, पृ.२७

१९. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष २, अंक १८, २० मार्च १९१२.

२०. एरंडे अशोक, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, स्फुर्ती प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर १९९६, पृ.१५९.

२१. कित्ता, पृ.१५९.

२२. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ५, अंक ११, २७ जानेवारी १९१५.

२३. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ ले अंक ५, २८ डिसेंबर १९१०

२४. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ४ थे, अंक ३३, १ जून १९१४.

२५. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ५ अंक ४४, १५ सप्टेंबर १९१५.

२६. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ५ अंक २४, २८ एप्रिल १९१५

२७. कित्ता

२८. कित्ता

२९. कित्ता, बगाडे उमेश, प्रस्तावना, पृ.२३.

३०. कित्ता, प्रस्तावना, पृ.२५.

३१. एरंडे अशोक, स्मरणिका, अखिल भारतीय सत्यशोधक समाज, २८ वे अधिवेशन, तरवडी, १९९९ पृ.२०

३२. कित्ता, बगाडे उमेश, प्रस्तावना, पृ.३२

३३. कित्ता, बगाडे उमेश, प्रस्तावना, पृ.३३

३४. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ ले, अंक २६, १७ जून १९११

३५. कित्ता

३६. कित्ता, एरंडे अशोक, पृ.१५२.

३७. कित्ता, बगाडे उमेश, प्रस्तावना, पृ.३२

३८. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष २, अंक ६, २५ डिसेंबर १९१२.

३९. कित्ता, एरंडे अशोक, पृ.१४९

४०. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३, अंक १०, २२ जानेवारी १९१३.

४१. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १२, अंक ३१, जून १९२२.

४२. कित्ता

४३. कित्ता

४४. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', अंक २, १३ सप्टेंबर १९११.

४५. कित्ता, एरंडे अशोक, पृ.१५३

४६. कित्ता, एरंडे अशोक, पृ.१५३

४७. मुलाटे वासुदेव, शेतक-यांचा असूड, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, सहावी आवृत्ती, ५ सप्टेंबर २०१०, पृष्ठ २.

४८. कित्ता, एरंडे अशोक, स्मरणिका, अखिल भारतीय सत्यशोधक समाज, पृ.५७

४९. कित्ता, एरंडे अशोक, पृ.१५३

५०. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ४, अंक २४, २९ एप्रिल १९१४.

५१. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ४, अंक २३, २२ एप्रिल १९१४.

५२. कित्ता, एरंडे अशोक, पृ.८४

५३. कित्ता, एरंडे अशोक, (संपा.) मुकुंदरायकृत कुलकर्णी लीलामृत, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी, आवृत्ती ४ थी , पृ.१९.

५४. कित्ता, पृ.५

५५. कित्ता, बगाडे उमेश, प्रस्तावना, पृ.१२

५६. कित्ता, एंरडे अशोक, पृ.३८.

# प्रकरण- ५ वे

# मुकुंदराव पाटील यांनी घेतलेला शेती प्रश्नांचा ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मीमांसा

**५.१ प्रस्तावना**

**५.२ वसाहतपूर्व अवस्थेविषयी विवेचन**

**५.३ वसाहतिक काळातील कृषिव्यवस्थेचे विदारक चित्रण**

**५.४ ब्रिटिश आधुनिकतेचे स्वागत**

**५.५ शेतक-यांची राजकीय भूमिका आणि प्रबोधन**

**५.६ काँग्रेस आणि शेतकरी**

**५.७ शेतकरी आणि राष्ट्रीययुध्द आघाडी**

**५.८ सरकार आणि शेतकरी**

# प्रकरण- पाचवे

# मुकुंदराव पाटील यांनी  घेतलेला शेती प्रश्नांचा ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मीमांसा

## ५.१ प्रस्तावना

'शेतकरी' हा मुकुंदरावांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. कुलकर्णी वतनाविरुध्द लढण्याचे कारण म्हणजे कुलकर्ण्यांने चालविलेले शेतक-यांचे शोषण हे असल्याचे दिसून येते. परंतु फक्त कुलकर्णीच तेवढा शेतक-यांचे शोषण करीत होता असे नाही. तर गावाची आर्थिक व्यवस्था ज्या बलुतेदारी पध्दतीवर आधारित होती ती बलुतेदारीही शेतक-यांच्या शोषणाला अनुकूल असल्याचे मुकुंदरावांना जाणवले. ही पध्दत कालबाहय झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. अर्थात शेतकरी नागवला गेला तर त्याचा परिणाम बलुतेदारांच्या बलुत्यावरही होतो हा चक्रबंधही त्यांना दिसू लागला. म्हणून त्यांनी या पध्दतीवरही टीका केल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्ररणामध्ये मुकुंदराव पाटील यांनी शेती प्रश्नांचा घेतलेला ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मीमांसा यांचा विचार केलेला आहे.

## ५.२ वसाहतपूर्व अवस्थेविषयी विवेचन

शेतक-यांचा उन्नतीचा व सुधारणेचा उद्‌देश बाळगूनच मुकुंदरावांनी 'दीनमित्र'चे पुनरुज्जीवन केले होते. प्रायः धर्मातील ब्राह्मणी हस्तक्षेपामुळे अवनतीला पोहोचलेल्या (ब्राह्मणेतर) हिंदूचा माणूसपणा त्यांना पुन्हा प्राप्त करुन देणे, इंग्रजी राज्यामुळे भारतात दाखल  झालेल्या आधुनिकतेचा प्रसार करणे, ज्ञानप्रसार व आधुनिकतेच्या विरोधात कार्य करणा-या चळवळींना विरोध करणे अशा तीन तत्त्वांचा स्वीकार त्यांनी केल्याचे दिसून येते. शेतकरी हितसंबंधांना केंद्रिभूत ठेवून जनजागृती करण्याचे धोरण त्यांनी अवलंबिले होते.

मुकुंदरावाची शेतीप्रश्नाची मीमांसा म.फुले यांच्या प्रेरणेतून विकसित झालेली होती. म.फुले यांच्या 'शेतक-यांचा आसूड' मधील शेतीप्रश्नाचे वास्तवदर्शन घडवणारी विवरणपध्दती त्यांनी स्वीकारली होती. "शेती प्रश्नाचा ऐतिहासिक वेध घेवून शेतकरी जीवनाच्या वास्तवाच्या सुक्ष्मतेने व शास्त्रशुध्दपणे उलगडा करणारी त्यांची मीमांसा शेतीप्रश्नाच्या सोडवणुकीचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करते."[१]

वसाहतपूर्व काळातील शेतक-यांची स्थिती आणि वसाहतकालीन शेतक-यांची स्थिती या विवेचनातून त्यांनी शेतीप्रश्नांची कारणमींमासा केलेली दिसून येते.

वसाहतपूर्व काळात शेतकरी खाऊन पिऊन सुखी होता. पाऊस पाणी उत्तम असल्यामुळे पीकही उत्तम येत असे. रेल्वे, रस्ते अशा दळणवळणाच्या सोयी नसल्याने खेडयातील धान्य खेडयातच राही व स्वस्तही असे. पण दुष्काळ वा अन्य आपत्तीमुळे पीकांची हानी झाल्यास दळणवळणाच्या अभावी शेजारच्या मुलखाकडून अन्नधान्य आणता येत नसल्याने विलक्षण दुर्भिक्षाचा सामना करावा लागत असे. भांडवलशाहीतून होत असलेल्या आर्थिक एकवटीकरणाच्या अभावी प्रादेशिक स्तरावरचा हा विषम अनुभव नित्याचा होता. शेतक-यांच्या गरजा साध्या व किमान स्वरुपाच्या असत.

वसाहतपूर्वकाळात शेतक-यांचा खर्चही बेताचा असे. धार्मिक शोषण तुलनेने कमी होते. उत्पन्नापेक्षा फाजील खर्च करण्याची प्रवृत्ती कमी होती. मात्र  ज्ञानाच्या व धनसंपत्तीच्या बाबतीत विलक्षण विषमता नांदत असल्याचे दिसून येते. “एक हजार शेतक-यांच्या घरात जितके सोने-नाणे असायचे तेवढे एका सरदाराच्या हत्ती घोडयास असायचे. तसेच एक लाख खेडयातील शेतक-यांपेक्षा सहस्त्रपट अधिक विदया पूर्वी एका भटाच्या घरात असायची. शेतक-यांमध्ये कष्टाळूपणा, संतोषी वृत्ती, प्रामाणिकपणा, आदरवृत्ती, अडाणीपणा, निष्कपटपणा, प्रेमळवृत्ती व सत्यनिष्ठा वसत असे. त्यांचे पुढारी निपक्षपाती, प्रामाणिक व वाणीने करारी असत. तत्कालीन राज्यसंस्थेचे स्वरुप लुटारू, शोषक व बळजोरीचे होते. प्रजा म्हणजे हरिण, बकरे असे तर राजे म्हणजे सिंह, वाघ व चित्ते असे स्वरुप होते.”[२]  ब्रिटिश काळात हे चित्र बदलले. या काळात स्थिती खालावली हे लक्षात आणून देण्यासाठी मुकुंदरावांनी वसाहतपूर्वकाळात शेतक-यांचे स्थितीचे काही चांगले पैलू मांडले. परंतु डॉ.उमेश बगाडे यांनी दाखवून दिल्याप्रमाणे, “शेतक-यांच्या पूर्वस्थितीचे गौरवीकरण व आदर्शीकरण करण्याची प्रवृत्ती त्यांनी स्वीकारली नव्हती.” शेतक-यांचे अज्ञान व मागासलेपण, राज्यसंस्थेचे लुटारु व दमनखोर स्वरुप, ज्ञान व संपत्तीबाबतची तीव्र विषमता याकडे त्यांनी लक्ष वेधलेले दिसून येते.

“शे दोनशे घरांचा एक  समूह त्या सभोवती लहानसा तट गांवकूस, एक वेस, आंतल्या बाजूस वेसकरांच्या दोन देवडया, पलिकडे चावडी, बाजूस शिंगाडयांचा उंच बुरुज असे हे चिमुकले शहर यातून प्रात:काळी आपापल्या बैलाच्या गळयांत शिवळा अडकवून वेशीवाटे बाहेर जाणारे

आणि सायंकाळी पुन्हा आत येणारे शेतकरी, आणि त्यांच्या नांगर औतास पाचर ठोकून देणारा सुतार, फाळपास शेवटून देणारा लोहार, रांजणपरळ देणारा कुंभार, घोंगडी पुरविणारा धनगर, हजामत करणारा न्हावी, धुणे धुणारा परीट, गावंचे रक्षण करणारा वेसकर वगैरे बलुते हे सगळी प्रजा आणि या सर्वांचा मालक पाटील अशा या संस्थानाची व्यवस्था पूर्वीच्या काळानुसार चालली होती."[३] तेव्हांच्या शेतक-यांस आताच्या शेतक-याप्रमाणे पोटास मिळविण्याची तीक्ष्ण विवंचना नव्हती आणि ज्या होत्या त्या निराळया प्रकारच्या होत्या. त्या आताच्या शेतक-यांस मुळींच नाहीत.

पूर्वीचे शेतकरी खाऊन पिऊन सुखी  असल्याचे दिसून येतात. याची कारणे अनेक आहेत. पूर्वी पाऊस पाणी उत्तम होत असे. अर्थात पीकेही चांगली येत असत. आगगाडी सडका वगैरे व्यापारांच्या सोई नसल्यामुळे खेडयांतील धान्य बहुतेक खेडयातच राहत असे. त्यामुळे धान्य अगदी स्वस्तात मिळत असे पण केंव्हा केंव्हा असे होई की, "वीस कोसावरच्या गांवी पाऊस न पडल्यामुळे किंवा एखादया रोगामुळे पीके बुडाली असली तर तेथल्या लोकास रुपायाचे पायलीभर धान्य मिळत नसे. आणि दुसरीकडे रुपयांच्या दहा पायल्या विकत असत. कारण धान्य ने आण करण्याच्या सोई तेव्हा फारच त्रासाच्या व धोक्यांच्या असल्यामुळे असा प्रकार घडत होता. तसेच पूर्वीच्या लोकांच्या गरजा अगदी साध्या होत्या. धर्मगुरुंच्या स्वार्थामुळे सगळे शेतकरी सोळा अणे अक्षरशत्रू असायचे. एकास लिहिता वाचता येत नसायचे गावांत जे दंडेल व लुटालुट करणारे असत, त्यांच्या येथे साधारण थोडेसे दागदागिने असायचे."[४] येथे मुकुंदराव पाटील पूर्वी खेडयातील शेतक-यांचे जीवन सुखी समाधानी असल्याचे स्पष्ट करतांना दिसतात. बाराबलुतेदारी पध्दतीमुळे खेडयातील लोकांच्या गरजा खेडयातच भागवल्या जात असत.

पूर्वी आजच्या सारख्या विविध चैनीच्या वस्तूंची आवश्यकता सर्वसामान्य शेतक-यांना पडत नसे सामान्य जनतेचा पोशाखही साधा असे. बहुतेक शेतक-यांच्या घरामध्ये गाडग्या मडक्याचीच भांडी असत. तांबे पितळेची भांडी क्वचितच एखादया शेतक-यांकडे असत. परंतु गावातील पुरोहित धर्मगुरुंच्या स्वार्थी वृत्तीमुळे गावात कोणीही शिक्षण घेत नसे. गावातील लोकांच्या या अडाणीपणामुळे पुरोहित सांगतिल त्याप्रमाणे लोक वागत असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतांना दिसतात.

पूर्वीच्या शेतक-यांचा खर्चही अगदी बेताबेताचा असल्याने त्यांना त्यांचे उत्पन्न पुरुन उरत असे. "आताच्या शेतक-यांच्या लग्नात दिवाबत्ती, पानसुपारी किंवा वाजंत्री यास जितका खर्च होतो, तितक्याच खर्चात पूर्वीच्या शेतक-याचे सगळे लग्न आटोपत असे आणि कित्येक गरीबांची तर

दोन-दोन लग्ने उरकत असत. सत्यनारायणाचा त्यावेळी जन्मही झाला नव्हता. मग दरमहा सत्यनारायण घालून सालाच्या काठी शेसव्वाशाला बुडणारे शेतकरी मुळीच नव्हते, पंढरपूर, काशी, प्रयाग वगैरे क्षेत्रेतर कित्येकांच्या पिढीजात पाहण्यांत नव्हती. मग प्रवासाचा त्रास व खर्च सोसून बडव्यांची भरती करणारे तेव्हाचे शेतकरी फारच क्वचित लाखांत एक असत. सारांश पूर्वीचे शेतकरी खाऊन पिऊन सुखी असत याचे कारण हेंच की, ते आताच्या शेतक-यांप्रमाणे उत्पन्नापेक्षा फाजील खर्च कधीही करत नव्हते. ऋण काढून सण करण्याची तर त्यांना सवय नव्हती. अर्थात वरचढांची लग्ने करुन, बायकोचे दागिने शेटजीच्या येथे गहाण टाकण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधीच येत नसे."[५] अंग मोडून मेहनत करावी, थोडया सुखात संतुष्ट रहावे, घरांत एकमेकांच्या आज्ञेत वागावे, सर्वांशी प्रामाणिकपणाने वागावे, परस्परांचा सन्मान ठेवावा असे त्यांचे वर्तन असल्यामुळे त्यांना संसारात भांडणाचे प्रसंग फारसे येत नसत. ते जरी शिकले सवरलेले नव्हते, अगदी अडाणी होते तरी त्यांच्यात निष्कपटपणा, प्रेमळपणा आणि खरेपणाही फार होता. त्यामुळे त्यांची कित्येक महत्त्वाची कामे तोंडीच होत असत. या लोकांच्या गरजा कमी असल्याने आहे त्या उत्पन्नामध्ये ते सुखी समाधानी जीवन जगत असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

"पूर्वी गावचे पुढारी निःपक्षपाती, प्रामाणिक, वाणीने करारी होते. त्यामुळे गावपंचायती चांगल्या चालत होत्या. कोणत्याही गुन्हयाच्या चौकशीत लाचलुचपतीसारखे प्रकार घडत नव्हते. त्यामुळे खरा न्याय मिळत असे."[६] पण हा प्रकार सर्व खेडयात सुरळीतपणे चालत होता असे मुळीच नाही. ज्या गावांतील पंच निर्भीड, निर्लोभी आणि ख-यास धरणारे होते त्याच गावांत गावपंचायती उत्तम चालत असल्याचे दिसून येते आणि ज्या गावांतील पंच पक्षपाती, लोभी लाच खाणारे होते त्या गांवात गरीब लोकास मनस्वी त्रास होत असे.

मुकुंदराव पाटील सांगतात की, "पुर्वीचे शेतकरी जरी खाऊन पिऊन सुखी होते, तरी त्यांचे सुख हिरव्यागार कुरणात मनसोक्त चरणा-या लठ्ठ हरणांच्या सुखासारखे असल्याचे दिसून येते. पूर्वी सगळी प्रजा म्हणजे हरीण, बकरे, ससे आणि राजे म्हणजे सिंह, वाघ, चित्ते पाहिजे त्याने पाहिजे तेथे पाहिजे त्यास पकडावे आणि पाहिजे तसे गट्ट करावे, अशी तर स्थिती होती नुसते पोटाला पोटभर खाणे आणि डोळाभर झोप घेणे यातच मानव जातीचे सुख अटले असे नाही. या सुखापेक्षाही अत्यंत महत्त्वाचे सुख वेगळेच आहे. मनुष्य प्राणी हा इतर पशुपक्षादि प्राण्याप्रमाणे नियमित सुख दुःखांनी बध्द झालेला नाही. त्याची सुख दुःखे अपरिमित आहेत. या अपरिमिततेचे मूलबीज किंवा मनुष्य

प्राण्याची उत्तरोत्तर वाढत जाणा-या उन्नतिलतिकेचे बीज म्हटले म्हणजे विदया ही होय. उदया जर जगातून एकाएकी विदया नाहीशी झाली, तर मनुष्य आणि इतर पशु यांच्यामध्ये शरीर रचनेच्या भिन्नत्वापलिकडे फरकच राहणार नाही. तेंव्हा मनुष्याच्या ख-या सुखास अत्यंत आवश्यक जी विद्या, ती पूर्वी धर्मगुरुंनी शेतक-यास मिळू दिली नाही. त्यामुळे शेतकरी ख-या सुखापासून जे बाजूस राहिले ते राहिलेच आहेत." [७] मुकुंदराव पाटील येथे स्पष्ट करतात की, पुर्वीचे शेतकरी सुखी समाधानी होते परंतु या शेतक-यांना आपली प्रगती करण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे होते. हे शिक्षण त्याकाळातील धर्मगुरुंनी शेतक-यांना मिळू दिले नाही. त्यांना अशिक्षित अडाणी ठेवले कारण या शेतक-यांनी जर शिक्षण घेतले तर ते आपल्यावर होणा-या अन्यायाविरुध्द लढले असते. आपले हक्क अधिकार त्यांनी मिळवले असते त्यामुळे शेतक-यांना अशिक्षित अडाणी ठेवनेच या पुरोहितांनी योग्य समजले. जर शिक्षण मिळाले नाही तर मग इतर पशु मध्ये आणि मानवामध्ये शरीररचनेपुरताच फरक राहतो. हेच या धर्मगुरुंना अपेक्षित होते. हा सामान्य जनतेवर झालेला अन्याय आहे हा अन्याय दूर करणे सुशिक्षितांचे कर्तव्य असल्याचे मुकुंदराव पाटील येथे सांगतात.

## ५.३ वसाहतिक काळातील कृषिव्यवस्थेचे विदारक चित्रण

वसाहतवादी शोषणामुळे शेतक-यांची स्थिती बिघडली हे दाखवण्यासाठी पूर्वस्थितीचे गौरवीकरण करण्याची प्रवृत्ती राष्ट्रवादी प्रवाहाने बाळगली असल्याचे दिसून येते. "महात्मा गांधीनी 'हिंदस्वराज्य' मध्ये ब्रिटिशपूर्व स्थितीचे आदर्शीकरण केले होते. पूर्वस्थितीच्या अचिकित्सक गौरवातून यंत्रधारीत उदयोगांना विरोध करायच्या भूमिकेमुळे गांधीजींचा ग्रामस्वराज्याकडे परत जाण्याचा मार्ग भांडवली कक्षेतील शेतीप्रश्नाची सोडवणूक करण्यास अपयशी ठरला."[८] मुकुंदरावांनी भांडवलशाहीत तीव्र होत असलेल्या शेती शोषणाविरोधात भूमिका घेतली असली तरी नव्या भांडवली तंत्रज्ञानाच्या स्वीकार शेती विकासासाठी आवश्यक मानला होता.

जातीव्यवस्थेने शेतक-यांचे आरिष्ट उभे केले आहे. जातीव्यवस्थेने शेतक-यांना शेतीशिवाय अन्य व्यवसाय व कौशल्ये प्राप्त करण्यास प्रतिबंधित केले होते. ब्रिटिश काळात असा प्रतिबंध नसला तरी जातीपेक्षा वेगळा व्यवसाय वा कौशल्य स्वीकारण्यासाठी जातीबध्द व्यवसायरचनेने व ज्ञानाच्या अभावामुळे प्रतिकूल स्थितीच निर्माण केल्याचे दिसून येते. ओझी उचलणे, भांडी घासणे, धुणी धुणे अशी कामेच वतनभ्रष्ट शेतक-यांच्या वाटयाला येत असत. "जातीव्यवस्थाक उत्पादन पध्दतीतील कमी उत्पन्न देणा-या, अधिक श्रम लागणा-या शेतीच्या तंत्रज्ञानालाच शेतकरी चिटकून

राहत असत. श्रम, वेळ व गुंतवणुकीचे व्यवस्थापन बेशिस्तीचे असल्यामुळे श्रमाचा व गुंतवणुकीचा अपव्यय होऊन उत्पन्न कमी येई. प्रतिष्ठेच्या कल्पनांमुळे विनाकारण खर्च करण्याची प्रवृत्ती शेतक-यामध्ये असे. स्वच्छतेचा अभाव, शिक्षणाबद्दल आनास्था ही शेतीजीवनाची वैशिष्टये होती. शेतक-यांमध्ये दारु, तंबाखू, तमाशा, वेश्यागमन अशा व्यसनांच्या आधीन होण्याचे प्रमाण वाढले होते. माणुसपण खालावल्यामुळे नात्यागोत्यातील स्नेह व आदराचे भान नष्ट पावले होते. शेतीमध्ये भाऊ हिस्से अधिक होत गेल्यामुळे शेतीचे नुकसान होत होते" [९] वसाहतवादाच्या नव्या संदर्भात जातीव्यवस्थाक शोषणाने जर्जर झालेल्या शेतक-यांच्या अवस्थेचे असे मार्मीक वर्णन मुकुंदरावांनी केलेले दिसून येते. प्रतिभाशक्ती शब्दकलेने रेखाटलेले शेतक-यांच्या दुरावस्थेचे हे चित्र शेतीजीवनाच्या विदारक वास्तवाचा प्रत्यय देते.

वसाहतवादी व्यवस्थेमुळे शेतीजीवनामध्ये महत्त्वाचे बदल घडू लागले. पारंपारिक शोषणाच्या पध्दतीशी जुळवून घेतच वसाहतवादी शोषणव्यवस्थेने आपला अंमल प्रस्थापित केला. रयतवारी महसुल पध्दती, शेतजमिनीचे क्रयवस्तूकरण, सर्वांना समानता देणारी पण खर्चिक व दिरंगाईची न्यायव्यवस्था व भांडवली शेतीचा आग्रह यामुळे सावकारशाहीचे प्रस्थ माजलेले दिसून येते. शेतकरी कर्जबाजारी होऊन कंगाल बनू लागले हे विदारक वास्तव मुकुंदरावांना बोचत असल्यामुळे त्यांनी शेतक-यांची पूर्वस्थिती चांगली असल्याचे चित्र रेखाटले व समकालीन शेतीजीवनातील भीषणता अभिव्यक्त केली.

ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणांमुळे भारत आंतरराष्ट्रीय बाजाराशी जोडला गेला. शेतमालाच्या निर्यातीद्वारे लूट करण्याच्या धोरणामुळे नगदी पिकांच्या लागवडीचा विस्तार होऊ लागला. "सावकारी, धार्मिक व सरकारी लुटीची तीव्रता वाढल्यामुळे शेतक-यांची क्रयशक्ती खचत गेली, दुष्काळाची वारंवारिता वाढून शेतकरी देशोधडीला लागला. या अरिष्टातून मार्ग काढण्यासाठी व विशेषतः निर्यातीसाठीच्या पीकांची लागवड करण्यासाठी ब्रिटिश सरकारने पाटबंधारे योजना आणल्या. नगदी पीकांचे अधिक उत्पन्न देणारे वाण प्रसारीत करण्याचा प्रयत्न केला. शेतीच्या ज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा प्रसार करुन उत्पादनवाढीस चालना दिली. पीकांची चांगली पैदास करण्यासाठी प्रदर्शने भरवली. इ.स. १९०४ मध्ये सहकाराचा कायदा करुन सहकारी पतसंस्थांच्या व उदयोगांच्या उभारणीला व वाढीला प्रोत्साहन दिले. बी-बीयाणे, तगाई अशा गोष्टी सरकारने शेतक-यांसाठी केल्या."[१०] मुकुंदरावांनी सरकारच्या अशा प्रयत्नांचे कौतुक केले व त्यासंबंधात

वेळोवेळी ठोस व महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. एकाबाजूला ते वसाहतवादाखाली विदारक झालेल्या दुरावस्थेचे चित्रण करतात तर दुस-या बाजूंनी ब्रिटिशांनी आणलेल्या भांडवली आधुनिकतेचे स्वागतही करतात. ब्रिटिशाच्या भांडवली आधुनिकतेच्या शेती धोरणांकडे पाहून वसाहतवाद आणि शेतक-यांच्या हितसंबंधामध्ये असलेला विरोध मुकुंदरावांनी लक्षात घेतलेला दिसून येत नाही.

शेतक-यांचे प्रत्यक्ष शोषण करणा-या सावकारशाहीचा, कुलकर्ण्यांचा व ब्राह्मणी पुरोहितशाही विरोधात उग्र संघर्ष करण्याचा त्यांचा पवित्रा असल्याचे दिसून येते. चिपळूणकर टिळकांच्या तथाकथित राष्ट्रवादी चळवळीने वसाहतवाद विरोधात भारतीय जनता असा आंतरविरोध उभा करुन शेतक-यांच्या प्रत्यक्ष शोषकांना अभय देण्याची भूमिका घेतलेली दिसून येते. त्याचा विरोध करण्यासाठी मुकुंदरावांनी वसाहतवादी राज्यामधील स्थिरता, शांतता व आधुनिकतेकडे नेणा-या सुधारणांना गौरवले व राष्ट्रवादयांचा आर्थिक लुटीचा सिध्दांत नाकारलेला दिसून येतो. “मुक्त व्यापार धोरणातून, शेतसारा जुलमी पध्दतीने वाढवून, नवनवे कर बसवून, भांडवल गुंतवणूकीतून अधिका-यांचे पगार व पेन्शनवरील खर्चामार्फत ब्रिटिश सरकार शेतक-यांचे शोषण करते हे महात्मा फुले यांनी लक्षात आणून दिले होते.”[११] परंतु ब्राह्मणशाही शोषणाला विरोध करण्याच्या प्राथमिकतेने व ब्राह्मणी राष्ट्रवादयांच्या प्रभुत्वशाली राजकारणाला शह देण्यासाठी मुकुंदरावांनी सुरुवातीच्या काळात वसाहतवादी सरकारवर टीकास्त्र उचललेले दिसून येत नाही. उलट ब्राह्मणी राष्ट्रवादयांच्या पोकळ देशभक्तीला उघडे पाडण्याचे धोरण स्वीकारले.

ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणाविरोधात ओरड करणा-या ब्राह्मणी राष्ट्रवादयांनी शेतक-याच्या, शूद्रातिशूद्रांच्या शोषणातून ब्राह्मणांकडे गोळा होणारे धन देशातच राहते असा बचाव केल्याचे निदर्शनात येते. त्याला उत्तर देताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, “अनीती आणि अन्याय कोठेही असो त्याच्या प्रतिकारासाठी अल्पसा का प्रयत्न होत नाही व तो सदैव स्त्युत्यच समजला पाहिजे. थापाडयाने किंवा गपाडयाने लोकांस ठकवून, घरातील बायको पोरांपासून तो थेट कुत्री घोडीपर्यंत सर्वांस दागिण्यांनी सजवून काढले, तर ते धन देशातच राहणारे आहे हे खरे पण अशा धुर्तांचे धन योग्य मार्गाने त्यांच्या घरातून नाहिसे करुन इतरांच्या घरात आणल्याने तेही धन देशातच राहणारे आहे.” [१२] मुकुंदरावांची वसाहतवादाबरोबर भारतात दाखल झालेल्या भांडवली आधुनिकतेच्या स्वीकाराची भूमिका असली तरी त्यांचे अंधानुकरण करण्याची भुमीका नव्हती. शेतक-यांच्या हितसंबंधाला केंद्रवर्ती ठेवूनच प्रगतशील आधुनिकतेचा त्यांनी अंगिकार केल्याचे दिसून येते.

विद्या, ज्ञान व शेतक-यांच्या एकजुटीतून शेतीच्या, शेतक-यांच्या दुरावस्थेचा निरास होईल असा मुकुंदराव पाटलांना विश्वास वाटत होता. विद्या म्हणजे भौतिक प्रगतीला आधारभूत असलेले विज्ञान व तंत्रज्ञान यासंबंधीची विद्या व ज्ञान म्हणजे समाजव्यवहारामध्ये स्वत:च्या व समाजाच्या हिताचा विवेक अशी त्यांची अनुक्रमे विद्या व ज्ञानविषयक धारणा होती. शेतीचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान, शेती करण्याच्या श्रमातून मुक्त करु शकणारे नव्या व्यवसायांचे ज्ञानकौशल्यासंबंधीची विद्या शेतक-यांनी आत्मसात केली पाहिजे. त्याचबरोबर आत्मबोध घडवणारे, दारिद्रय, अस्वच्छता, अज्ञान, शोषण, दडपणूक या चक्रातून मुक्त करणारे, प्रगतीचा मार्ग दाखविणारे ज्ञान शेतक-यांनी अंगिकारले पाहिजे असा मुकुंदराव पाटलांचा आग्रह होता. शेतक-यांच्या अज्ञानामुळे सावकार त्यांना लुबाडतात व त्यांच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन ब्राह्मण - पुरोहित त्यांना लुटतात त्यापासून सोडवणूक करण्याचा मार्ग विद्या व ज्ञानप्राप्तीच आहे अशी त्यांची भूमिका असल्याचे दिसून येते.

वसाहतवादी अर्थव्यवस्थेच्या प्रभावातून महाराष्ट्रात सधन शेतक-यांचा एक वर्ग निर्माण होऊ लागला होता. ऊस, कापूस अशा नगदी पीकांची लागवड करणा-या शेतक-यापैकी काहींच्या हाती पैसा खेळू लागला. जातीच्या पारंपरिक समाज व संस्कृती व्यवहारामध्येच गुंतून राहिलेल्या शेतक-यांच्या प्रतिष्ठेच्या कल्पनांमुळे हा पैसा वायफळ मार्गाने खर्च होऊ लागला. लग्न वा तत्सम समारंभामध्ये शेतकरी चढाओढीने खर्च करु लागले. शेतकरी समाजामध्ये ठाण मारुन बसलेल्या व्यसनीपणाच्या दुर्गुणांमुळेही पैशाला वाटा फुटल्या. “कापसाच्या लागवडीमधून संपन्न झालेले खानदेशमधील शेतकरी अत्तराच्या दिव्याच्या प्रकाशात वेश्यांशी संभाषण करण्यात धन्यता मानू लागले. विनाकारण खर्च करण्याची ही प्रवृत्ती शेतक-यांना कर्जबाजारी बनवत होती. धर्मभोळेपणा, शिक्षणाचा अभाव, अस्वच्छता, नव्या तंत्रज्ञानाची नावड, वेळेचे श्रमाचे व गुंतवणुकीचे गैरव्यवस्थापन, भाऊबंदकी, व्यसनाधिनता हे जातीसमाजातील शेतक-यांचे दुर्गूण वसाहतवादी व्यवस्थेतही अबाधित राहिले. उलट वसाहतवादी रचनेमध्ये शेतक-यांच्या जातीव्यवस्थाजन्य प्रश्नांची व दोषांची तीव्रता वाढतच गेल्याचे दिसून येते.”[१३] वसाहतवादी व्यवस्थेत शिक्षणाच्या अभावामुळे बहुतांश शेतकरी हा मागासलेलाच राहिला. ज्या शेतक-यांनी थोडेफार शिक्षण घेतले त्यांनी आपल्या ज्ञानाव्दारे नगदी पिके घेवून पैसा मिळवला. परंतु ते पैशाचे योग्य नियोजन करु शकले नाही. त्यामुळे ते चैनी व विलासी जीवन जगू लागले. या शेतक-यांचे व्यसन एवढे वाढले की

हा शेतकरी कर्ज काढून आपले व्यसन पूर्ण करु लागला. हाच शेतकरी पुढे विविध समस्यांनी ग्रस्त होवून जात उच्चभ्रूंच्या मागे एकवटू लागल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. शेतक-यांच्या जातीजन्य संस्कृतीचे दोष व शेतक-यांच्या पारंपरिक जाणिवेतील गतानुगतिकता दूर करण्यासाठी विदया व ज्ञानाचा अवलंब करण्याची मुकुंदरावांची धडपड असल्याचे दिसून येते.

जातीसमाजातील शेतक-यांची जाणीव एकजुट निर्माण करु शकत नाही. समान हितसंबंध असतानासुध्दा शेतकरी भावंडामध्ये एकोपा नसतो. समान हितसंबंधासाठी त्यांना एकत्र यावेसे वाटत नाही. "गावामध्येच शेतक-यांमध्ये दोन फळया परस्परांशी वैमनस्य टिकवण्यामध्ये गुंतून राहतात. फुटीमुळे होणारी हानी ना शेतक-यांना कळते ना त्यांच्या पुढा-यांना कळते. जातीपंचायतीच्या पातळीवर जातीचे जे संघटन उभे राहते ते जातीचे पंच बळजोरीने, मनमानीने स्वहितासाठी वाकवतात. पंचाच्या माध्यमातून जातीची समुदाय सत्ता व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आणते. वाळीत टाकण्याच्या हत्याराचा उपयोग करुन व्यक्तीला समुदायसत्तेच्या आधीन बनवते. जातपंचाच्या या दुर्गुणांमुळे जातीची जूट शोषणाविरोधात व जाती सुधारणासाठी कार्यरत होऊ शकत नाही."[१४] मुकुंदरावांना वर्ग म्हणून शेतक-यांची एकी अपेक्षित असल्यामुळे त्यांनी विदया व ज्ञान याची आवश्यकता प्रतिपादली आहे. शेतक-यांच्या सुधारणांसाठी संस्था उभारण्याचा वर्गीय कार्यक्रम सूचवला. मात्र शेतक-यांच्या वर्गोन्नतीसाठी जात्योन्नतीचा मार्गही आवश्यक मानला.

पारशांनी स्वजातीची सुधारणा घडवून वर्गोन्नतीचे उद्दिष्ट प्राप्त केले होते. त्यांचा आदर्श शेतक-यांनी घ्यावा असे मुकुंदरावांनी आवाहन केले. ते लिहितात की, "(पारशांनी) आपल्या बुध्दीच्या जोरावर आपल्या जातीची सुधारणा करण्याकरिता जितके प्रयत्न केले आहेत. जितका पैसा खर्च केला आहे, जितके श्रम सोसले आहेत, तितका प्रयत्न तितका पैसा आणि तितके श्रम, हिंदुस्थानांत दुस-या कोणत्याही जातीने सोसले नाहीत ! आज काशीपासून ते रामेश्वरापर्यंत जरी आपण गेलो तरी, आपणास एकही पार्शी माणूस रस्त्यांतून भीक मागंताना दिसणार नाही. केवढी ही जातीची सुधारणा आणि केवढा हा त्यांच्या पंचाचा प्रयत्न!"[१५] जातीच्या कोशामध्ये विश्वभान गोठवणा-या शेतक-यांच्या जाणिवेला वर्गोन्नतीचा आदर्श देण्याचा मुकुंदरावांचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. अन्य जातीचे विशेषतः काही हीन जातीचे लोक आधुनिकतेचा स्वीकार करुन शेतकरी बनतील. निम्न जातीतील मुली शिकून कलेक्टर बनतील. त्यांची सामाजिक प्रत वाढल्यामुळे शेतकरी समाजातील प्रतिष्ठीत पाटलांना त्यांना नमस्कार करावा लागेल. असे चित्र रेखाटून

शेतक-यांच्या जाती अस्मितांना चुचकारुन त्यांना सुधारणांसाठी उदयुक्त करण्याचे धोरणही मुकुंदरावांनी स्वीकारलेले दिसून येते.

## ५.४ ब्रिटिश आधुनिकतेचे स्वागत

मुकुंदराव पाटील यांनी ब्रिटीश सत्ता भारतात येण्यापूर्वीची परिस्थिती आणि ब्रिटीश काळातील भारतीयांची स्थिती यांची तुलना केली आहे. ही तुलना करतांना ते ब्रिटीशांपूर्वी भारत हा मागासलेला देश होता हे दाखवतांना या मागासलेपणाचा दोष तत्कालीन धर्मगुरुंना देतांना दिसतात त्यासाठी ते म्हणतात की, "या देशावर इंग्रज सरकारचे राज्य स्थापन होण्यापूर्वी, अनेक देशीय अनेक राजांची राज्ये, अनेक काळापर्यंत अबाधितपणे चालली होती. कित्येकांनी मोठमोठे शब्दज्ञानी बाळगून नाना प्रकारचे ग्रंथ तयार केलेले दिसून येतात. कित्येकांनी लाखो रुपये शेकडो महिने खर्चून डोंगरात लेणी खोदल्याचे पाहावयास मिळतात. कित्येकांनी कोटयावधी रुपये उधळून दिलेली पाहावयास मिळतात. कित्येकांनी खजिने पालथे करुन नदयास घाट बांधले कित्येकांनी प्रजेची घरेदारे जाळून भव्य इमारती उठविल्या, याप्रमाणे अनेक राज्यांनी अनेक प्रकारची कामे या देशात केलेली पाहावयास मिळतात. परंतु सर्वात अत्यंत महत्त्वाचे असे जे विद्यादानाचे काम ते एकानेही केलेले दिसून येत नाही. ही जशी पूर्वीच्या राज्यकर्त्यांकडून भयंकर चुकी झाली आहे तशीच धर्मगुरु म्हणविणा-या वर्गाकडूनही या बाबतीत भयंकर चुकी झाली आहे."[१६] सर्वात उपयुक्त असे सर्वोपयोगी विद्यामहत्त्वाचा एखादा वेद, शास्त्र, लिहिलेले पाहावयास मिळत नाही. ही धर्म गुरुंकडून चुकी झाली असे नव्हे, तर त्यांनी ती मुद्दाम केली आणि म्हणूनच हिंदू बहुजन समूहास विदयेत मागासलेले न म्हणता मागासविलेले म्हटले तर त्यास वावगे वाटणार नाही असे मुकुंदराव पाटलांना वाटत होते.

ब्रिटीश शासनाच्या काळात त्यांनी भारतात केलेल्या शिक्षण विषयक सुधारणांमुळे भारतीयांच्या झालेल्या प्रगतीविषयी आपले मत स्पष्ट करतांना ते म्हणतात की, "इंग्रज लोकांच्या प्रतापाने, प्रयत्नाने, कृपेने, सहवासाने आणि त्यांच्या राजनीतिने आज देशात ज्ञान व धन प्राप्त करुन घेण्याची साधने सर्व लोकास जशी राजरोसपणे वापरण्यास मुभा मिळाली आहे, तशी पूर्वी कोणत्याही राज्याच्या कारकीर्दीत नव्हती. त्यामुळे सरस्वती आणि लक्ष्मी यांचे विशिष्ट वर्गातच सदैव वास्तव्य असायचे. परंतु आता तो काळ गेला आणि म्हणूनच इंग्रजी राज्यात इंग्रजी ज्ञानाच्या बळावर भिक्षुकांची म्हणजे भिका-यांची मुले पण सोने, मोती, चांदी यांनी बायका

मढवून काढू लागले आहे भिक्षुकांची मुले पण उंच उंच हवेल्यात गादीवर लोळू लागले आहेत! भिक्षुकांची मुले पण इंग्रजी ज्ञानाने डॉक्टर होऊन प्रेतांची चिरफाड करुन पुष्कळ कमाई करु लागली आहेत. भिक्षुकांची मुले पण वकील बॅरिस्टर होऊन वादी प्रतिवादीचे धन गोळा करु लागली आहेत. भिक्षुकांची मुले पण मामलेदार, मॅजिस्ट्रेट, चिटणीस, हेडक्लार्क, डेप्यूटी कलेक्टर, सबजज्ज, तारमास्तर, शाळामास्तर, इंजिनिअर, रजिष्ट्रार असे इंग्रज सरकारच्या हरेक दर्जाच्या नोकरीत शिरुन मौजा मारीत आहेत!"[१७] शेती व्यवस्थेच्या बाबतीत विचार केला असता वसाहतवादी व्यवस्थेमुळे शेतीजीवनामध्ये महत्त्वाचे बदल घडू लागले. पारंपरिक शोषणाच्या पध्दतीशी जुळवून घेतच वसाहतवादी शोषण व्यवस्थेने आपला अंमल प्रस्थापित केला. रयतवारी महसुल पध्दती, शेतजमिनीचे क्रयवस्तूकरण, सर्वांना समानता देणारी पण खर्चिक व दिरंगाईची न्यायव्यवस्था व भांडवली शेतीचा आग्रह यामुळे सावरकारशाहीचे प्रस्थ माजले.

शेतकरी कर्जबाजारी होऊन कंगाल बनू लागले हे विदारक वास्तव मुकुंदरावांना बोचत असल्यामुळे त्यांनी शेतक-यांची पूर्वस्थिती चांगली असल्याचे चित्र रेखाटले व समकालीन शेतीजीवनातील भीषणता अभिव्यक्त केली. "ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणांमुळे भारत आंतरराष्ट्रीय बाजाराशी जोडला गेला. शेतमालाच्या निर्यातीद्वारे लूट करण्याच्या धोरणामुळे नगदी पीकांच्या लागवडीचा विस्तार होऊ लागला. सावकारी धार्मिक व सरकारी लुटीची तिव्रता वाढल्यामुळे शेतक-यांची क्रयशक्ती खचत गेली, दुष्काळाची वारंवारिता वाढून शेतकरी देशोधडीला लागला. या अरिष्टातून मार्ग काढण्यासाठी व विशेषतः निर्यातीसाठीच्या पिकांची लागवड करण्यासाठी ब्रिटिश सरकारने पाटबंधारे योजना आणल्या, नगदी पीकांचे अधिक उत्पन्न देणारे वाण प्रसारीत करण्याचा प्रयत्न केला. शेतीच्या ज्ञानाच्या व तंत्रज्ञानाचा प्रसार करुन उत्पादनवाढीस चालना दिली. पीकांची चांगली पैदास करण्यासाठी प्रदर्शने भरवली. इ.स. १९०४ मध्ये सहकाराचा कायदा करुन सहकारी पतसंस्थांच्या व उदयोगांच्या उभारणीला व वाढीला प्रोत्साहन दिले. बी-बीयाणे, तगाई अशा गोष्टी सरकारने शेतक-यासांठी केल्या."[१८]

मुकुंदरावांनी सरकारच्या अशा प्रयत्नांचे कौतुक केले व त्यासंबंधात वेळोवेळी ठोस व महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. एका बाजुला वसाहतवादाखाली विदारक झालेल्या दुरावस्थेचे चित्रण करतात तर दुस-या बाजूला ब्रिटिशांनी आणलेल्या भांडवली आधुनिकतेचे स्वागतही करताना दिसतात.

## ५.५ शेतक-यांची राजकीय भूमिका आणि प्रबोधन

शेतकरी प्रबोधनाचे काम करणारे वर्तमानपत्र 'दीनमित्र'अव्याहतपणे शेतीप्रश्न शोषणाचे स्वरुप उघड करतांना दिसते. मुंकुंदराव पाटील शेतक-यास चौकस करण्याचे काम करीत होते. शेतकरी चौकस असावा. त्याने राजकीय पक्षाची बाजू घेतांना तो आपल्या जातीचा, धर्माचा, गटाचा आहे म्हणून त्याची बाजू घेऊ नये. जर त्या पक्षातील पुढारी कोण आहे त्याचा शेतक-याविषयी दृष्टीकोन कसा आहे. याचा विचार करावा आणि पक्षातील कर्तृत्वान, गुणवान लोकांची पाहणी करुनच त्या राजकीय पक्षाची बाजू घ्यावी. शेतक-यांचा पाठिंबा असलेले नेते, पक्ष शेतक-यांचे हित पाहतील. आणि शेतक-यांचे शोषणापासून मुक्त करण्याचे काम ते करतील.

शेतक-यांनी कुठल्याही पक्षाला किंवा पक्षाच्या नेत्याला पाठिंबा देण्यापूर्वी त्या पक्षाचा किंवा व्यक्तीचा राजकीय इतिहास बघावा. त्यांने अत्तापर्यंत शेतक-यांसाठी काही योजना अमलात आणल्या आहेत काय किंवा शेतक-यांच्या प्रश्नाविषयी सरकारकडे मागणी केली आहे काय या संदर्भात ज्या उमेदवारांनी शेतकरी हितासाठी संघर्ष केला अशाच उमेदवाराला मतदान करुन आपला नेता निवडावा कि जो शेतक-यांना शोषणापासून मुक्त करु शकेल असे मुकुंदराव पाटलांना वाटत होते.

## ५.६ काँग्रेस आणि शेतकरी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्याचवेळी पाकिस्तानची निर्मिती झाली. तेव्हा स्वातंत्र्यातून वाईट निर्माण होण्याची भीती मुंकुंदराव पाटील यांनी व्यक्त केलेली होती. त्यांच्या मते, "हिंदुस्थानला मिळालेले स्वातंत्र्य इंग्लंडच्या टेबलावरच्या फुलपात्राप्रमाणे आहे किंवा कुंडीतील फुलझाडीप्रमाणे आहे. कारण त्याला फुले येत असली तरी त्याचे खरे मूळ जमिनीत रुजलेले नसते. ते वरचेवर मिळणा-या झारीच्या पाण्यावर टवटवीत रहाते. तशीच अवस्था भारताच्या स्वातंत्र्याची आहे. हे स्वातंत्र्य खरे स्वातंत्र्य नाही. इतकेच नव्हे तर हे स्वातंत्र्यस्वरुपाचे संकट आहे."[१९] राष्ट्रातील जनतेत ऐक्य आणि राष्ट्रीयता नसेल तर स्वातंत्र्याला धोका निर्माण होऊ शकतो. असे मुंकुंदरावांना दूरदृष्टीने जाणवल्याचे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात हाच अनुभव आपणास येताना दिसतो. म्हणूनच त्यांनी व्यक्त केलेल्या समस्त जनताच जेव्हा खरीखुरी राष्ट्रीयतेने तन्मय होते. तेव्हाच राष्ट्रात स्वातंत्र्य खेळू शकते. [२०] या विचारांची आठवण आपणास येते. यावरुन मुंकुंदराव पाटील हे सामाजिक सुधारणावादी असल्याचे

दिसून येते. म्हणूनच त्यांनी राजकीय स्वातंत्र्यापेक्षा व्यक्ती स्वातंत्र्य, समानता या तत्त्वांना अधिक महत्त्व दिलेले होते. त्यांच्या मते, "देशातील प्रत्येक मनुष्यास राष्ट्राच्या उन्नतीस साहाय्यभूत होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, देशातील प्रत्येक व्यक्ती ही राष्ट्राची शक्ती आहे तिला पुढे येण्यास जर धार्मिक अथवा सामाजिक कुंपणे आड आली तर राष्ट्राची अधोगती झाल्याशिवाय राहत नाही. समाजातल्या सर्व थरातल्या माणसांच्या कर्तबगारीस वाव ठेवल्याशिवाय त्यांच्या शक्तीची राष्ट्रोध्दारास मदत मिळणार नाही."[२१] जोपर्यंत समाजातील सामान्य माणसाला स्वातंत्र्य प्राप्त होत नाही व विशिष्ट मूठभर लोकांच्या हातातील सत्ता जात नाही, तोपर्यत देशाला मिळालेले स्वातंत्र्य त्यांना अर्थहीन आहे असे वाटते.

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी राष्ट्रीय सभेची स्थापना झालेली होती. हे स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर काँग्रेसने राजकीय पक्षात रुपांतर न करता तिने सेवाभावी संस्था म्हणून काम करावे अशी महात्मा गांधीची उत्कट इच्छा होती. मुकुंदराव पाटील यांनाही असेच वाटत होते. परंतु सत्तापिपासू काँग्रेस पुढा-यांनी गांधीजींच्या मताची कदर केली नाही.[२२] भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस सत्तेवर आली. त्यावेळी काँग्रेसच्या पुढा-यांनी सत्तास्थानी आपल्या लोकांची वर्णी लावण्याची संधी सोडली नाही. तेव्हा मुकुंदराव पाटलांनी म्हटले की, "मिळालेल्या स्वातंत्र्याची लयलूट करण्यास हे गांधीवादी सहकुटुंब सहपरिवार इतकी धांदवले आहेत की, भाऊ, बहिणी, व्याहीजावई, मित्रमंडळी यांच्या वर्ण्या लावण्यात हे गढून गेले. खरे पाहिले तर ज्या इंग्रज लोकांना आम्ही नादान-लबाड ठरवून त्यांच्या पासून स्वातंत्र्य घेतले, त्या इंग्रजापेक्षा आम्ही राष्ट्रकार्य करण्यास अधिक पात्र आहोत हे दाखवायला हवे होते पण ही राष्ट्रीय जनहिताची दृष्टी बाजूस ठेवून आपल्या मित्रमंडळी व नातेवाईकांच्या नेमणूका करण्याचा वाह्यातपणा या पाग्यांच्या अंगात शेवटी संचारला. स्वातंत्र्य जन्माच्या पहिल्या दिवशी हे अशुभ चिन्ह होत असता घरात हे असले अनिष्ठ प्रकार निर्माण व्हावेत हे ख-या अर्थाने राष्ट्रीय पात्रतेचे लक्षणच नव्हे. शेतकरी आणि मजूर यांचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न आजचे काँग्रेस पुढारी करणार आहेत असे सांगण्यात येत असले तरी त्यावर शेतकरी-मजूर यांनी विश्वास ठेवता कामा नये. त्यांचे गुळचट बोल फक्त सत्ताधिकाराला चिकटून बसण्यापूरतेच खरे आहेत."[२३] येथे काँग्रेस पक्षाने शेतक-यांना दिलेले आश्वासन पाळले नाही म्हणून शेतकरी आणि मजूरांनी यापुढे काँग्रेस पक्षाच्या आश्वासनांना बळी पडू नये असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. तसेच काँग्रेसच्या सत्तालोभी वृत्तीवर मुकुंदरावांनी प्रहार करुन काँग्रेसने नव्या धोरणांची आखणी

केली नाही तर राष्ट्रास मोठा धोका प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केलेले होते.

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने गांधीवादाचा स्वीकार केलेला होता. परंतु प्रत्यक्षात काँग्रेस कार्यकर्ते सत्ता आणि स्वार्थ यांच्या आहारी गेल्यामुळे ते गांधीवादाचे मारेकरी आहेत असे मुकुंदरावांना वाटत होते. "मोठया व्यक्तीचा अंगारा लावून आणि त्या व्यक्तीच्या तत्त्वाचा नगारा बडवून कर्तबगारीचा उगाच गोंगाट करणे ही देशसेवा नसून राष्ट्रीय फसगत आहे."[२४] अशा शब्दात त्यांनी काँग्रेसमधील व्यक्तीपूजेवर घणाघाती टीका करुन हिंदूस्थानातील बहुजन समाज इंग्रजांच्या पारतंत्र्याच्या आगीतून निघून तो काँग्रेसच्या फुफाटयात सापडला आहे. अशी प्रतिक्रिया व्यक्त केलेली होती. आजही तीच परिस्थती आपल्याला दिसते. आमचे पुढारी फक्त निवडणुकांपुरते आंम्हाला आश्वासने देतात, शेतक-यांचा कळवळा दाखवतात. परंतु निवडणुकीनंतर शेतक-यांच्या वाटयाला हे आश्वासने नावालाच राहतात. एकूणच शेतक-यांची ही फरपट स्वातंत्र्यापूर्वीपेक्षाही आज जास्त झालेली दिसते. आणि या परिस्थितीला सरकारचे अकर्तबगार शून्य धोरणच जबाबदार आहे.

सामान्य शेतक-यांचे प्रश्न, दुष्काळाची परिस्थिती, वेगवेगळया योजना यांच्याकडे काँग्रेस सरकारने दुर्लक्ष केले असून केवळ सत्ता टिकविण्यासाठी जातीय राजकारण केले जात असल्याबददल मुकुंदराव पाटील यांनी खेद व्यक्त केलेला होता. "शेतक-यांच्या जमिनी काढून घेण्याचा सिलींग कायदा सरकारने चांगल्या हेतूसाठी अंमलात आणला असला तरी त्याचा अंमल केवळ शेती व्यवसायासाठीच मर्यादित ठेवल्याबद्दल त्यांनी सरकारवर टीका केलेली होती. भांडवलदार, व्यापारी, श्रीमंत यांच्या मालमत्तेवर सिलिंगचा कायदा सरकारने बसविला नाही. यावरुन सरकार पंथशाही व भांडवलशाही वृत्तीचे पोषण करते."[२५] अशी जळजळीत टीका मुकुंदराव पाटलांनी केली होती. काँग्रेसच्या राजवटीवर मुकुंदराव पाटलांनी 'दीनमित्रा' तून अनेक अग्रलेख लिहून घणाघाती टीका केलेली दिसून येते. दडपशाही आणि लोकशाही हे रामराज्य की पोलीसराज्य, ही मंत्रीशाही की लोकशाही, ही लोकशाही की लोभशाही, काँग्रेस संस्था की कारस्थान संस्था, राष्ट्रात लोकशाही प्राण आहे का ? इत्यादी अग्रलेखांच्या शीर्षकावरून काँग्रेसच्या कारभारातील दोषांची जाणीव आपल्याला झाल्याशिवाय राहणार नाही.

## ५.७ शेतकरी आणि राष्ट्रीययुध्द आघाडी

'राष्ट्रीय युध्द आघाडी' ही चळवळ सन १९४२ च्या आसपास चालू झालेली होती. यावेळी देशात अराजकता माजलेली होती एकीकडे जागतिक पातळीवर दुसरे महायुध्द चालू होते तर भारत पारतंत्र्यात असल्यामुळे भारतावर ब्रिटीशांचे वर्चस्व होते. याचवेळी भारतातही स्वातंत्र्यचळवळ चालू झाली होती. मुस्लिम लिग स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करत होते अशा परिस्थितीत येथील खेडयातील लोकांना लूटण्याचे प्रकार घडत होते. यामुळे सामान्य जनतेला स्वसंरक्षण करता यावे याउद्देशाने ही 'राष्ट्रीय युध्द आघाडी' सामान्य जनतेनेच चालवलेली दिसून येते.

लोकांची मने कलुषित करणे, लोकांत भय उत्पन्न करणे, देशात बंडाळी माजणे, चोर दरोडेखोरांचा उपद्रव उद्भवणे, पदार्थाच्या किंमती वाढणे असले अनिष्ट प्रकार तत्कालीन परिस्थितीत उत्पन्न झाल्याचे पाहावयास मिळते. मुकंदराव पाटील या आघाडी विषयी म्हणतात की, "दोषाचे निवारण कसे करायचे याचा विचार करण्यासाठी आणि त्यावर उपचार योजण्यासाठी ही राष्ट्रीय आघाडी निर्माण झाली आहे. शहरे आणि खेडी यांच्याशी हिचा सारखाच संबंध असला तरी या संबंधाचा अधिक भाग खेडी आणि शेतकरी यांच्याशी येत आहे."[२६] या चळवळीचे सूत्रधार सरकारी अधिकारी नाहीत तर ते लोकांतील असल्याचे दिसते. तरी पण या चळवळीला सरकारी अधिका-यांचे आणि सरकारी पैशाचे पाठबळ असल्याचे दिसते.

राष्ट्रीय युध्द आघाडीबद्दल आपली भूमिका स्पष्ट करतांना मुकुंदराव पाटील म्हणतात की, "वास्तविक पाहिले तर हे राष्ट्रीय आघाडीचे कार्य सर्व प्रकारे लोकांनीच करावयास पाहिजे होते. कारण लोकांचे संरक्षण होणे हे या चळवळीचे ध्येय असल्यामुळे लोकांनीच या बाबतीच एकत्र जमून कार्यक्रम आखावयास पाहिजे होता. इंग्लड, अमेरिका आसल्या राष्ट्रांत हे असले काम प्रजा आपण होऊनच करते. कारण तिकडील प्रजा शंभरात ९९ टक्के शिकलेली असते. तर इकडे शंभरांत ७ देखील शिकलेली नाही. यामुळे येथील अडाणी माणसांस सध्याच्या युध्दाचे रुप काय आहे हे समजत नाही. आणि आपल्या राष्ट्राचा अभिमान कसा धरायचा हेही कळत नाही. यामुळे हे लोकांचे काम सरकाराला थोडया फार अंशाने चालवावे लागत आहेत. येथे हिंदू-मुसलमानांची भांडणे आहेत, येथे अल्पसंख्याक लोकांचे हीत राखले जात नाही, येथील लोक अशिक्षित आहेत, तेव्हा अशा लोकांना राष्ट्रीय आघाडीचे काम करता येणार नाही. असली सबब या राष्ट्रीय आघाडीत घातलेली नाही. सध्याच्या भयंकर युद्धामुळे देशांत ज्या अडचणी उत्पन्न झाल्या त्या दूर करण्यात कोणा एका

धर्माच्या, समाजाच्या, पक्षाच्या अथवा पंथाच्या लोकांचे हीत आहे आणि इतरांचे नाही असे कोणासही म्हणता येणार नाही."[२७] हे राष्ट्रीययुद्ध आघाडीचे काम सर्वांचे आहे. सर्वांसाठी आहेत आणि सर्वतोपरी उपयुक्त असे आहे. गावच्या लोकांत ऐक्य - एकजुटपणा निर्माण करणे आणि लहानसहान शस्त्रे वापरणे, शत्रुशी सामना करण्याचे शिक्षण घेणे ही कामे खेडयापाडयातील लोकांना या आघाडीच्या द्वारा शिकविली जाणार आहेत.

सामान्य जनता कोणत्याही कारणामुळे का होत नाही पण स्वतःचे संरक्षण करण्यास शिकले तर सरकारला या वेळी त्यांनी मोठी मदत केल्याप्रमाणे होणार आहे. या संधीचा लोकांनी आवश्य फायदा करुन घेतला पाहिजे. दोन हात करणे याचे शिक्षण जवळ जवळ दिडशे वर्षापूर्वी खेडयापाडयातील लोकांना घरबसल्या मिळत असे प्रत्येक गावास गावकुस असे आणि प्रत्येक गावातील प्रत्येक सशक्त माणूस आपल्या गावाचे आपल्या घराचे आणि आपल्या माणसांचे रक्षण करण्यास सिध्द असे पण अलिकडे सर्वच गोष्टीचे रक्षण करण्याचे काम सरकारने आपल्या हातात घेतले होते. असे परखड मत मुकुंदराव पाटलांनी मांडल्याचे दिसते.

### ५.८ सरकार आणि शेतकरी

शेतक-यांच्या शेतीची अवस्था दिवसेदिवस बिकट होत चाललेली आहे. शेतकरी दिवसेंदिवस मजुर बनत चाललेले आहेत. खेडी ओसाड पडत चालली आहे. थोडक्यात सांगायचे तर शेती, शेतकरी आणि त्यांची स्थिती यांचा नाश होताना दिसतो आहे. असे होण्याची अनेक कारणे मुकुंदरावांनी सांगितलेली आहे, "शेतकरी अज्ञानी आहेत हे तर प्रमुख कारण आहेच आहे पण इतरही अनेक कारणे आहेत, कोटयावधी शेतक-यास शिक्षित करणे हे चार दोन वर्षाचे काम नाही, तो ब-याच मोठया कालावधीचा प्रश्न आहे. तथापि आहे याच स्थितीत शेतक-यांची अवस्था सुधारण्यासाठी काय केले पाहिजे, याकडे सरकार व पुढारी यांचे लक्ष थोडे फार लागले आहे आणि जो तो प्रयत्नही करीत आहे. पण दुःखाची गोष्ट ही की, त्यांचे हे प्रयत्न आणि त्यांचे शेतक-यांशी घडणारे प्रासंगिक वर्तन यांत मुळीच मेळ नसतो. यामुळे शेतक-यांचे हे समजस कैवारी एका हाताने जे हीत करतात, तेच हीत ते दुस-या हाताने कळत न कळत लंगडे करुन टाकतात."[२८] खरे पाहिल तर शेतक-यांचा धंदा सर्वात मोठा नाजुक आहे शेतकी हे एक मोठे रसायन आहे. पंच महाभुतांच्या मिश्रणावर बरी वाईट उतरणारी ही एक भट्टी आहे. पावसाने थोडी कमी अधिक गडबड केली की, शेतीवर तिचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. वा-याने वाकडया तिकडया उडया मारल्या की,

याचा शेतकीवर परिणाम झालाच. सूर्याने कमी जास्त उष्णता केली की तिचा शेतीवर परिणाम होतो. पोकळ ढगांनी जरी आकाशात फेरफाटका मारला तरी त्याचा शेतीवर परिणाम होतो. याखेरीज पशुपक्षी, किडामुंगी यांच्या उपद्रवाचा होणारा परिणाम तो वेगळाच. "शेतीचा धंदा अगदी आटोक्यात नसणा-या पाऊस वा-यावर अवलंबुन असल्यामुळे, शेतक-यास मेहनतीच्या मानाने उत्पन्न फारच थोडे होते. त्यातच शेतक-याचा मोठा शत्रू दुष्काळ याचे हल्ले वरचेवर आल्यावर शेतक-याची सात सात पिढयांची पाळेमुळे पार उपटून जातात."[२९] असले वाईट प्रसंग शेतक-यावर आले तर त्यातून त्यांचा बचाव व्हावा म्हणुन सरकार काही लाखांची तरतूद करणार असल्याचे समजते. सरकारची योजना चांगली आहे. परंतु दुष्काळ ठरविण्याच्या पध्दतीत व सारा वसूल करण्याच्या पध्दतीत फरक केल्याशिवाय सरकारच्या योजनेच्या फायदा शेतक-यांच्या अंगी मुरणार नाही.

शेतकरी हे अन्न पिकणारे असल्यामुळे त्यांच्याकडे सरकारने अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. मुकुंदराव पाटील यांच्या मते, "इंग्रज सरकार परकीय असल्यामुळे त्यांचे शेतक-यांकडे स्वार्थापलिकडे लक्ष गेले नाही. पण आज शेतक-यांचे राज्य झाले असे काँग्रेसमधील सच्चे आणि सत्य ठरलेले देशभक्त अहोरात्र सांगत फिरु लागल्यामुळे, शेतक-यांना सर्वस्वी आनंद वाटावा यांत नवल कसले ? पण या शेतक-यांच्या नामधारी राज्यांत शेतक-यांचीच दुर्दशा अधिकाधिक उडु लागली आहे. शेतक-यांचे प्राण कासावीस होत आहेत. शेतक-यांचे कल्याण करावे अशी सरकारची हिमालयीन इच्छा असली तरी शेतक-यांचे रतीमात्र हीत करण्याची तिळमात्र पात्रता सध्याच्या सरकारांत नाही."[३०] सरकार म्हणजे आता कोणी वंश परंपरेची गादी नाही, लोकनियुक्त सत्ताधा-यांचा कारभार म्हणजे सरकार. मुकंदराव पाटील यांच्या मते ज्यांना कारभार चालवणे जमत नाही, उलट चुका करणेच अधिक जमत आहे. अशा कारभा-यांनी चुकाबददल जनतेस जाब का देऊ नये ? पण आज चुका करुनही सरकार दुस-यांनाच ब्रह्मज्ञान सांगत आहे. यासंबंधाने सरकारची एक ताजी चूक दाखविता येईल. शेतक-यांकडुन लेव्हीचे धान्य वसुल करण्याचे हुकुम सुटले आहेत. ठरीव क्षेत्रांत ठरीव उत्पन्न होतेच असे ग्रहित धरुन ही लेव्ही आकारलेली आहे. पण हे उत्पन्नाचे प्रमाण सर्वस्वी निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असल्यामुळे उत्पन्न होणारच अशी खात्री देता येत नाही. तेव्हा लेव्ही वसुलीच्या बाबतीत आताच्या कॉग्रेसी सरकारने शेतक-यांच्या अडचणी लक्षात घेऊन लेव्ही वसुल करण्याच्या पध्दतीत सुधारण केली पाहिजे असे मत मुकुंदराव पाटलांनी मांडले होते.[३१] मुकुंदराव पाटील यांनी शेतक-यांचे शोषण किंमतीमुळे होते असे म्हटले आहे. कारण शेतक-यांचे धान्य

म्हणजेच फळे, भाजीपाला होय. याच धान्याची किंमत मात्र शहरातील दलाल ठरवातांना दिसतात. उत्पादनावर मालकी हक्क नसताना देखील केवळ मध्यस्ती करुन वरकड पैसे लाटतात. याला शेतक-याचे अज्ञानच कारणीभूत असल्याचे दिसून येते.

मुकुंदराव पाटील पुढा-यांचे वर्णन करताना म्हणतात की, "धान्याच्या किंमतीमुळे शेतकरी मरतो, ठार होतो. या शेतक-यांच्या वाईट स्थितीची खबर घेणारे आणि स्वतःस शेतक-यांचे प्रतिनिधी म्हणवुन घेणारे प्रतिनिधी देखील यश मिळेपर्यंत शेतक-यांचे प्रतिनिधीत्व करतात. मात्र नंतर ते प्रतिनिधी शेतक-याच्या होणा-या शोषनाकडे लक्ष देत नाहीत. तर त्याचे शोषन करतात. हे कायदेमंडळातील पुढारी म्हणजेच मधमाश्या आहेत. "[३२] कारण जो पर्यंत मध आहे तोपर्यंत हे पुढारी राहतात. मध संपल्यानंतर मात्र उडून जातात तशीच आवस्था पुढा-यांची आहे असे मुकुंदराव पाटील सांगतात.

मुकुंदराव पाटलांच्या लिखाणावरुन एक निष्कर्ष काढता येतो की, तत्कालीन काँग्रेसमधील पुढारी स्वार्थी, लबाड, स्वहीत लाटणारे खोटारडे कर्तृत्वशून्य बहुजन शेतक-यांच्या प्रश्नांशी काहीही देणं-घेणं नसणारे लबाड पुढारी होते आणि हया पुढा-यांच्या हातात संपूर्ण देशाची सूत्रे एकवटली होती. हे स्वार्थी पुढारीची देशाला तारणारे होते. या म्हणण्याला मुकुंदराव पाटलांचे लिखान छेद देताना दिसते. मुकुंदराव पाटलांनी कर्तृत्वशून्य काँग्रेस मधील पुढा-यांना शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी लक्ष वेधण्यास 'दीनमित्र' मधून अवाहन केलेले होते हे त्यांच्या लिखानातून आपणास निश्चित जाणवते. कारण मुकुंदरावांची दृष्टी ही कितीतरी पुढे होती. म्हणून शेतक-याचे होणा-या शोषणास वाचा फोडण्याचे काम 'दीनमित्र' पार पाडीत असल्याचे दिसून येते.

शेतक-याच्या सुधारण्यासाठी मुकुंदरावांनी काँग्रेस आणि सरकारला 'दीनमित्र' वर्तमान पत्रातून विनंती केली होती. मात्र काँग्रेसमधील नेत्यांनी त्याच्या प्रश्नाक्डे पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे जाणवते. कारण शेतकऱ्यांच्या स्थितीत तसूभर देखील फरक पडलेला त्यावेळी आणि आजही दिसून येत नाही. अशाप्रकारे वसाहतपूर्व काळात शेतकरी व खाऊन पिऊन सुखी असल्याचे दिसते. याउलट वसाहतिक काळात, वसाहतिक शोषणामुळे शेतक-यांची स्थिती बिघडल्याचे दिसून येते. वसाहतवादी व्यवस्थेमुळे शेतीजीवनामध्ये महत्त्वाचे बदल घडून आले. याच कालखंडात सावकारशाहीचे प्रस्थ माजलेले ही पाहावयास मिळते. जमीन महसुलाच्या विविध पध्दतीचा अवलंब केलेला दिसून येतो. ब्रिटीशांच्या वसाहतवादी धोरणांमुळे भारत आंतरराष्ट्रीय बाजाराशी जोडला गेला

शेतमालाच्या निर्यातीद्वारे लूट करण्याच्या धोरणामूळे नगदी पिकांच्या लागवडीचा विस्तार होऊ लागल्याचेही दिसते. तसेच आर्थिक लूटीच्या सिध्दांतालाही मुकुंदराव पाटील यांनी विरोध केलेला आपल्याला पाहावयास मिळतो.

ब्रिटीशांच्या भांडवली आधुनिकतेच्या शेती धोरणांकडे पाहून वसाहतवाद आणि शेतक-यांच्या हितसंबंधामध्ये असलेला विरोध मुकुंदरावांनी लक्षात घेतलेला दिसून येत नाही. जोपर्यत समाजातील सामान्य माणसाला स्वातंत्र्य प्राप्त होत नाही व विशिष्ट मूठभर लोकांच्या हातातील सत्ता जात नाही, तोपर्यत देशाला मिळालेले स्वातंत्र्य मुकुंदराव पाटलांना अर्थहीन आहे असे वाटते.

विसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात शेतकरी आंदोलने उभी राहिली ती आजतागायत चालू आहेत. शेतक-यांची दैन्यावस्था त्यामागची कारणे त्याला जबाबदार असलेले घटक आणि व्यक्ती याबद्दलचे मुकुंदरावांनी केलेले विश्लेषण आजही जसेच्या तसे लागू पडतांना दिसते. फरक इतकाच पडला आहे की या सर्वघटकांची व्याप्ती आणि गहनता अधिक तीव्र होत आहे. मात्र आजची राजकीय व्यवस्था शेतक-यांचे हीत जोपासण्यात अपयशी ठरत आहे हे मात्र सांगावेसे वाटते.

## संदर्भ


१) बगाडे उमेश (संपा.), विचार किरण ('दीनमित्र', मधील अग्रलेख १९१०-१५) भाग १, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी, ता.नेवासा जि. अहमदनगर, प्रथम आवृत्ती, १० मे २००९, प्रस्तावना , पृ.१५

२. कित्ता, प्रस्तावना, पृ.१६

३. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', शेतक-यांची निकृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय, वर्ष १ले, अंक २ रा, दि.०७/१२/१९१०

४. कित्ता

५ कित्ता

६. कित्ता

७. कित्ता, वर्ष १ले, अंक ३, दि.१४/१२/१९१०

८. कित्ता, प्रस्तावना, पृ.१६

९. कित्ता, प्रस्तावना, पृ.१७

१० कित्ता, प्रस्तावना, पृ.१८

११ कित्ता, प्रस्तावना, पृ.१८

१२. कित्ता, प्रस्तावना, पृ.१९

१३. कित्ता, प्रस्तावना, पृ.२०

१४ कित्ता, प्रस्तावना, पृ.२०-२१

१५. कित्ता, 'दीनमित्र', वर्ष १ ले, अंक ३ व ४, दि.१४/१२/१९१० व दि.२१/१२/१९१०

१६ पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ले, अंक १९, दि.२९/३/१९११

१७ कित्ता

१८ कित्ता, बगाडे उमेश, विचार किरण, प्रस्तावना, पृ.१८

१९ एरंडे अशोक, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, 'दीनमित्र', स्फूर्ती प्रकाशन नगर, प्रथम आवृत्ती, १२ नोव्हें. १९९६, पृ.१९१/१९२.

२० पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३८, अंक ९, दि. २२ सप्टेंबर १९२०

२१ कित्ता

२२ कित्ता, एरंडे अशोक, पृ.१९२

२३ कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र' वर्ष ३८, अंक ४७, दि. ११ सप्टेंबर १९४८

२४ कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र' वर्ष ३९, अंक १६, दि. २६ जानेवारी १९४९

२५ कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र' वर्ष ४२, अंक ४८, दि. ०३ सप्टेंबर १९५२

२६ कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र' वर्षे ३२, अंक ४२, दि. ५ ऑगस्ट १९४२.

२७ कित्ता

२८ पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १५, अंक २३, दि. १५ एप्रिल १९२५

२९ कित्ता

३० पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३९, अंक १६, दि. २६ जाने. १९४९.

३१ कित्ता

३२ सावंत भाऊसाहेब (संपा.), 'दीनमित्र', शताब्दी महोत्सव, स्मरणिका २०१०, पृ.४३.

## प्रकरण सहावे

## शेतकऱ्यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटलांनी सुचविलेले उपाय

६.१ प्रास्ताविक

६.२ सप्तसूत्री

६.२.१ विद्या

६.२.२ ज्ञान

६.२.३ जूट

६.२.४ पंच

६.२.५ खर्च

६.२.६ वेळ

६.२.७ शिक्षण व दुर्व्यसने

६.३ शिक्षणविषयक विचार

६.४ सावकारशाही निर्मुलन विषयी विचार

६.५ शेतकरी ऋणमुक्त कसे होणार

६.६ शेतकऱ्यांसाठी सरकारी व्यवस्था

६.७ दुष्काळ प्रश्नाविषयी विचार

६.८ शेतकरी आणि कर्ज

६.९ सामुदायिक शेती

६.१० शेतकऱ्यांना जपले पाहिजे

# प्रकरण सहावे

# शेतकऱ्यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटलांनी सुचविलेले उपाय

## ६.१ प्रास्ताविक

मुकुंदराव पाटील यांनी आपले विचार 'दीनमित्र' वर्तमान पत्रामधून मांडलेले होते. २० व्या शतकाच्या अगोदर आणि त्यानंतरच्या काळातील शेतक-यांची आणि २१ व्या शतकातील शेतक-यांच्या परिस्थतीत फारसा फरक पडलेला आपणास आजही दिसून येत नाही. ग्रामीण पातळीवर आजही शेतकऱ्याचे शोषण होताना दिसते आहे. शेतकऱ्याच्या कौटुंबिक स्थितीत भर पडली आहे ती केवळ दारिद्र्याची. त्याला जबाबदार आहे सरकारचे शेतकऱ्यासंबंधीचे धोरण. आज ग्रामीण भागात शेतकरी आत्महत्या करताना आपणास दिसतात. जो जगाचा पोशिंदा त्याला मात्र आज जागतिकीकरणाच्या काळात आत्महत्या करावी लागते. मग २० व्या शतकातील शेतक-याची परिस्थिती काय असेल त्याचा आपण विचार न केलेला बरा. सद्यस्थितीत शेतकऱ्यांचे शोषण ग्रामीण पातळीपासून शहरी पातळीपर्यंत होते. ग्रामीण भागात छोटे-छोटे सावकार तर शहरी पातळीवर दलाला मार्फत माल विकतांना त्याची प्रचंड लूट होते. हे आपण पहात आहे. आजदेखील शेतकरी नागवला जात असल्याचे दिसून येते. आजच्या स्थितीतही मुकुंदरावांचे विचार अगदी जसेच्या तसे लागू पडताना दिसून येतात. शेतक-याच्या एकंदर परिस्थितीविषयी मुकुंदराव पाटलांनी सुचविलेले उपाय आजच्या दृष्टीनेही महत्त्वाचे वाटल्याशिवाय राहणार नाही. मुकुंदराव पाटील यांनी 'दीनमित्रा'तून आणि आपल्या इतर लिखाणातून शेतक-यांच्या एकंदर स्थितीवर काही उपाय सुचवलेले आहेत.

## ६.२ सप्तसूत्री

इ.स.१९१० पूर्वीच्या शेतक-यांच्या दूरावस्थेचे वर्णन मुकुंदराव पाटील यांनी प्रस्तुत ठिकाणी केलेले आहे. यामध्ये ते म्हणतात की, "अलिकडे आपणा शेतकऱ्यांची स्थिती फारच खालावलेली दिसून येते. वेळेवर पाऊस पडत नाही, त्यामुळे म्हणावे असे भरपूर पीक पिकत नाही. जे थोडे बहुत येते ते सावकाराच्या वहीखात्याची व शेतसाऱ्याची बरोबरी करण्यातच जाते. मग वर्षाची दाणा-वैरण,

धडुत घोंगडी यांची जी ताणाताण चालावयाची ती चालूच राहते. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतूंत जनावरांबरोबर, जनावराप्रमाणे काम करावे आणि शेवटी हाल अपष्टेंत मरावे अशी शेतकऱ्यांची स्थिती झालेली पाहावयास मिळते. जो दिवस उगवत आहे तो वाईटच निघत आहे. दहा वर्षामागे आपली जितकी कुटुंबे शेतीवर पोट भरीत होती त्यापैकी आज निम्मी कुटुंबे वतनदारास मुकून मोलमजूरीने पोटाची खळगी भरत असताना दिसते. आणि हा आपल्या जातभाईचा देशोधडीस लागण्याचा क्रम बंद झाला असेही नाही. तो चालूच आहे."[१] शेतक-यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंनदिवस अतिशय बिकट होत असल्याचे मुकुंदराव पाटील येथे स्पष्ट करतात. पुरेशा पावसाचा अभाव, दुष्काळ, यासारख्या संकटांमुळे शेतीमध्ये शेतक-यांना उत्पन्न कमी निघते. जे थोडेफार धान्य पिकते ते ही सावकारांकडे कर्जापायी दयावे लागते. येवढे कष्ट करुनही शेतक-यांच्या वाटयाला काहीही शिल्लक राहत नाही. उलट सावकारांचे कर्ज आणखी वाढत जाते. यामुळे सामान्य शेतकरी पूर्णतः लुटला जात आहे. यासाठी शेतक-यांवरील हा अन्याय दूर करणे हे आजच्या तरुण वर्गाचे कर्तव्य असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

शेतकऱ्यांस दारिद्र्याचा भयंकर रोग लागला आहे. तो दिवसेंदिवस अधिक वाढत चालला आहे. मुकुंदराव पाटील यांच्या मते, "या भयंकर रोगाचा बीमोड करण्यास आपण कंबर बांधली पाहिजे. आणि जर आपण असे करणार नाही तर आपली पुढील पिढी कुत्र्यामांजरापेक्षाही नीच स्थितीत खिदबू खिदबू मरेल यांत बिलकूल शंका नाही. आपल्या या व्याधीचा बंदोबस्त करण्याकरिता सरकारने जागजागी शेतकरी कॉलेजे, शेतकी प्रदर्शन दवाखाने वगैरे घातले आहेत. पण आपल्या अज्ञानपणामुळे आपणाला त्याचा उपयोग करुन घेता येत नाही. रोग एकास आणि औषध भलत्यास असा प्रकार होतो. तरी हा दोष आपणांतील पुढाऱ्यांचाच आहे."[२] मुकुंदराव पाटील येथे शेतक-याने आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने स्थापन केलेल्या शाळा, शेतकी प्रदर्शनामध्ये भाग घेवून शेती विषयक ज्ञान आत्मसात करण्याचा सल्ला देतात. शेतक-यांनी शेतीत उत्तम पिक घेतले तर शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारणा होईल हे स्पष्ट करतात. शेतक-यांवरील अन्याय अत्याचार असाच चालू राहिला तर पुढच्या पिढीला आपली उपजिविका चालवण्यासाठी याच सावकारांकडे गुलामाप्रमाणे राबावे लागेल. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शेतक-यांना शिक्षण

देवून त्यांना आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी मार्गदर्शन करावे असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती घालविण्यासाठी मुकुंदराव पाटील यांनी काही उपाय सुचविलेले होते. त्यालाच सप्तसूत्री असे म्हणतात. त्यामध्ये विद्या, ज्ञान, जूट, पंच, खर्च, वेळ, शिक्षण व दुर्व्यसने या उपाययोजनांचा आपल्याला आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

### ६.२.२ विद्या

शेतक-यांना विद्येचे महत्त्व पटवून देतांना मुकुंदराव पाटील म्हणतात की, "विद्येला तिसरा डोळा म्हणतात. पण आम्ही म्हणतो, जे दिसत नाही ते तिसऱ्या डोळ्याने दिसते. दोन कानांनी जे ऐकू येत नाही ते या तिसऱ्या कानाने ऐकू येते. दोन हातांनी जे होत नाही, ते या तिसऱ्या हाताने होते. दोन पायांनी जे चढवत नाही, ते या तिसऱ्या पायाने चढवते. असा या विद्येचा प्रताप आपल्याला पहावयास मिळतो. मुकुंदराव पाटील यांच्या मते, आगगाडी लाखो खंडीचे ओझे घेऊन पळते, तिच्यात ही अद्‌भुत शक्ती आली कोठून ? समुद्रात आगबोट हजारो कोसांचा प्रवास करते याचे कारण काय ? नुसती आगगाडी ओढल्याबरोबर विस्तव का होतो ? वगैरे या यंत्रामध्ये ही अद्‌भुत शक्ती कशाची आहे बरे ? विद्येची ! विद्या हे मृत्यूलोकींचे अमृत आहे. पूर्वी मेलेल्या माणसांस जिवंत करण्यासाठी, स्वर्गाहून अमक्या ऋषीने अमृत आणले व अमक्यास जिवंत केले. असे आपण पुराण कथेत नेहमी ऐकतो. पण ते अमृत खरे होते हे सांगण्यास सध्या एकाही पुराणकाचा पुरावा देणारा मनुष्य जिवंत नाही. व तशा अर्थाची पुराणात एखादी कथाही नाही परंतु या विद्यामृताने एक नव्हे लाखो माणसे मेल्याप्रमाणे भूमीस भार झालेली सुध्दा जिवंत ज्ञानवत झाली आहेत. ती सर्व माणसे या विद्यामृताचा चमत्कार आपणास दाखवित आहेत. पूर्वीच्या अमृताने नुसते माणुस जिवंत होत होते म्हणतात. पण या अमृताने दगडलोखंडही जिवंत होते ! ते माणसाप्रमाणे गाणी गाते ! आपण आजकाल जी नवी अद्‌भुत यंत्रे पाहत आहोत, ती सर्व या विद्यामृताने जिवंत झालेल्या माणसांनी काढलेली आहेत."[३] इतर देश आपल्यापेक्षा प्रगतशिल बनले आहेत ही प्रगती जर आपल्या देशात घडवून आणावयाची असेल तर प्रथमतः आपल्या देशातील जनतेला विदयेचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. शेतक-यांनी आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे शेतीमध्ये बदल करुन आपली प्रगती घडवून आणावी यासाठी मुकुंदराव

पाटील आग्रही असल्याचे दिसतात. तत्कालीन स्थितीत सुध्दा मुकुंदराव पाटलांनी विद्येचे महत्त्व समजावून सांगण्याचा जो प्रयत्न केला तो आजही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

### ६.२.३ ज्ञान

शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती घालविण्यासाठी ज्ञानाचा कशाप्रकारे उपयोग शेतकऱ्यांच्या जीवनात होतो हे मुकुंदराव पाटील यांनी सांगितलेले आहे. त्यांच्या मते, "आपले कोठे चुकत आहे आणि ते कशाने सुधारेल हे समजणे यालाच साधारणपणे ज्ञान म्हणतात. आपल्या लोकांत पूर्वीपासून विद्याप्रसार मुळीच झाला नसल्यामुळे, आपले ज्ञान वाढले नाही. तरी आपल्या लोकांत ज्ञान नाही असे नाही. आहे पण ते जुन्या चालीचे आहे. ते आताच्या नव्या चालीच्या जगात चालेनासे झाले आहे. गंजून गेले आहे, त्याला विद्यारुपी भट्टीत घालून खूप आंच दिली पाहिजे आणि मग त्यास सध्याच्या नव्या चालीच्या ज्ञानाचे पाणी दिले पाहिजे. त्याशिवाय हे आपले बोथट ज्ञान भरभर चालणार नाही. युरोप अमेरिकेतील शेतकरी आपल्या थोड्याशा जमिनीत खंडोगणती पीक कसे काढतात, त्यांची हत्यारे कशी असतात, हे तर आपणास माहीत नाही, तर त्यांच्या खतांत कोणकोणती रासायनिक द्रव्ये किती प्रमाणाने मिळविली आहेत हे समजणे दूरच राहिले. "[४] आजचा शेतकरी हा जुन्याच परंपरागत औजारांचा वापर करत आहे. त्यांने या अवजांरामध्ये आधुनिकता आणावी जेणे करुन त्याला कमी वेळेमध्ये, शेतीतील कामे करता येतील. त्याच बरोबर त्याने आपल्या पारंपरिक व्यवसायामध्येसुध्दा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा हेच मुकुंदराव पाटील येथे स्पष्ट करतांना दिसतात.

### ६.२.४ जूट (शेतक-यांची एकजूट)

शेतक-याने कुटुंबामध्ये आपल्या भावांबरोबर तसेच गावत इतरांबरोबर भांडण्यामध्ये वेळ वाया न घालवता एकजुटीने रहावे. व या एकजुटीने होणा-या प्रगतीचा आदर्श समाजासमोर निर्माण करावा. जेणेकरुन इतर व्यक्तींना त्या एकजुटीचे महत्त्व समजून येईल. यासाठी मुकुंदराव पाटील जूट या लेखामध्ये म्हणतात की, "आपले ज्ञान आणि आपले शिक्षण यावरुनच आपणात जूट किती आहे ती स्पष्ट दिसत नाही. एका भावाचा बैल, दुसऱ्या भावाच्या बांधाला चरत गेला तर त्यावर कुऱ्हाड

घालणारा सख्खा भाऊ मागे पुढे पहात नाही. इतके आपणास बंधुप्रेम आहे. एका भावाच्या शेतात जनावरे चरत असली किंवा चोर चोरी करीत असला तर, दुसरा भाऊ त्यास हाकून लावणार नाही. उलट चोरांच्या मोटा बांधू लागेल ! हा तर आपल्या भावाभावांचा सलोखा मग जावा जावांत किती गोडी असेल हे ज्याचे त्यानेच आपल्या मनास विचारावे. एकमेकांस पाण्यात पहाणे, एकमेकांचे नुकसान करणे, यांतच आपले लोक बराच वेळ खर्ची घालीत असतात. बहुतेक गावात तर बहुत करुन दोन फळ्या असायाच्याच ! एका फळीत मुलगा तर दुसऱ्या फळीत बाप ! एका फळीत सासरा तर दुसरींत जावई ! कोणी जेवायास बोलविले तर हे फळीदार गृहस्थ एकत्र एक पंक्तीत जेवणार नाहीत. आम्ही अमक्याच्या पंक्तीस जेवणार नाही. आणि तमक्याशी बोलणार नाही अशी गावोगाव तऱ्हा असते. ही तर आपल्या लोकांची जूट आपल्या लोकांच्या या विसंगत फळ्यामुळे, समाजरुपी गृहाचा दरवाजा चांगला जुस्त बसत नाही. त्या दोन्ही फळ्यामध्ये एवढी मोठी सांपट रहाते की, तिच्यांतून कोणीही खुशाल घरात शिरावे ! आपल्या या आपसांतील फुटीमुळे आपले किती वाटोळे झाले, याचे आपणांतील समंजस पुढाऱ्यांना समजत नाही असे नाही. सर्व समजते पण आपण लोकांना स्वतःचा नाश करुन घेण्याची तलपच लागल्यामुळे, आपण आपल्या सख्या भावाविरुध्द निव्वळ खोटी साक्ष देण्यात भीत नाही."[५] शेतक-यांच्या सदयस्थितीचे वर्णन मुकुंदराव पाटील येथे करतांना दिसतात. शेतकरी हा आपला वेळ आपल्या भावाबरोबर तसेच आपल्या शेजा-यांबरोबर भांडणात खर्च करतो याचा फायदा गावातील इतर लोक घेवून ही भांडणे मिटवण्याऐवजी त्यांच्या मनात एकमेकांबद्दल आणखी व्देष भरुन देतात. यामुळे शेतक-यांचे खूप नुकसान होत आहे. हे शेतक-यांना समजत असूनही तो आपला वेळ व्यर्थ भांडणांत खर्च करतो. शेतक-यांनी हा वेळ शेती कामामध्ये खर्च करुन जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न करावा असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

## ६.२.४ पंच

आजपर्यंत आपल्या शेतकरी समाजात आपल्या पंचांनी काय काय केले असा जर आपण आपल्याच मनाला प्रश्न केला तर उत्तर काहीच केले नाही असे मिळेल. म्हणून मुकुंदराव पाटील यांच्या मते, "आपल्या शेतकरी लोकांत जातीसंबंधाने एखादा तंटा किंवा जातीविरुध्द एखादी गोष्ट घडल्यास त्याचा फैसला पंचामार्फत होत असतो. आणि हे पंच म्हणजे गावांतील वागते, बोलते चार

चौघे असतात. समाजाच्या सोईच्या दृष्टीने पाहिले असता, जातीत दुर्वर्तन वगैरे प्रकार होऊ नयेत, त्यांच्यावर दाब असावा, म्हणून ही पंचाची योजना फारच उत्तम आहे. परंतु 'यथा राजा तथा प्रजा'या न्यायाने खुद्द पंचच दुर्वर्तनी असले म्हणजे, मग जाती प्रकरणाच्या फैसल्याची गोष्ट विचारायालाच नको. गांवातील एखाद्या गरीब दुबळ्यांची गृहछिद्रे पाहून पराचा कावळा करावा, त्याला पंचात म्हणजे या चारचौघांनी जमविलेल्या दहाविसांत ओढून आणावे, त्यावर तू अमक्याचे खाल्लेस, सबब तुझे आमंत्रण बंद केले आहे. जातीला दंड दिल्यावाचून,आम्हाशी तुझा रोटी बेटी व्यवहार होणार नाही. आता आम्ही तुझ्या नावाच्या वाळी-चिट्ट्या बहिष्कारपत्रे गांवोगांव पाठविणार आहोत. लौकर उमज आणि दंड देऊन टाक. पंचाने तुला पन्नास रुपये दंड ठरवला आहे. नाही तर एक डाळ रोटीची पंगत घाल ! असा हा पंचाचा हुकूम एखाद्या हातभाग्यावर झाला म्हणजे त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय तो रद्द व्हावयाचा नाही."[६] मुकुंदराव पाटील येथे पंचांची भूमिका गावात कशी असावी या विषयी सांगतात की शेतक-यांचा आपआपसात झालेला वाद, गावातील जातीजातींमधील झालेला वाद शांततेने मिटवण्यासाठी गावातील जेष्ठ , वयोवृद्ध व्यक्तींना न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असे.

पंच मंडळी खरेतर ब-याचदा आपल्या पदाचा गैरवापर करतात. एखादया शेतक-यांवर अन्याय होत असतांनाही शांत बसतात प्रसंगी भांडण मिटवण्यासाठी पैसे घेतात पैस दिले नाही तर त्याला वाळीत टाकण्याची धमकी देतात हा शेतक-यांवर होणारा अन्याय आहे. हा अन्याय दूर करण्यासाठी पंचाच्या प्रवृत्तीवर मुकुंदराव पाटील प्रहार करतात व पंचाकडून न्यायनिवाडा करण्याची पध्दत बंद करण्याची मागणी करतांना दिसतात. खरे म्हणजे पंच म्हणजे पाच जणांनी निवडलेला, पाच जणांस आवडलेला जो मनुष्य तो पंच. पण ब-याचदा आपल्याकडे पंच मंडळी गुन्हेगारी प्रवृत्तीची असतात. त्यामुळे गुन्हेगारांना अभय देण्यासाठी हे पंच कधी कधी सामान्य जनतेवर अन्याय करतात यामुळे मुकुंदराव पाटलांना ही न्यायदानाची पध्दत चुकीची वाटते. ही पंच मंडळी गरीब शेतक-यांच्या अज्ञानीपणाचा गैरफायदा घेतात. सामान्य जनतेवर होणा-या अन्यायामुळे मुकुंदराव पाटील पंचांना विरोध करतांना दिसतात .

### ६.२.५ खर्च

शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती होण्यास खर्च कसा कारणीभूत आहे हे मुकुंदराव पाटील यांनी स्पष्ट करुन सांगितलेले आहे. त्यांच्या मते, "आपल्या दारिद्र्यास जी अनेक कारणे घडली आहेत, त्यात निष्फळ खर्च हे एक मोठे कारण झाले आहे. आपणा लोकांना विनाकारण खर्च करण्याची जणो तलपच लागली आहे. लोकांनी चांगले म्हणावे, गावात बायकापोरांच्या तोंडी कारभाऱ्यांचे नाव निघावे म्हणून आपले लोक वाजवीपेक्षा फाजील खर्च करीत असतात. आणि अलिकडे या सत्यनारायणाच्या बंडाने तर फारच धुमाकूळ घातला आहे. या नारायणाच्या पायी आपले लोक दरसाल लाखो रुपयास बुडत आहेत ! सत्यनारायणापासून संपत्ती, संतती लागेल तितकी मिळते, असे आपणास भट, जोशी सांगत असतात पण हा सगळा भ्रम आहे. दोन चार केळीचे खुंट उभे केले, तीनचार दिवे लावले, ब्राम्हण जेवू घातले, असा वीस पंचवीस रुपयांचा खर्च केला म्हणजे आपण केलेले हे पाप पार धुऊन जाते असे तुम्ही समजता काय ? दहा वीस रुपये खर्च केल्याने जर मनुष्याचे पाप जाते जर, मोठमोठे श्रीमान सहा दिवस मनमानेल तशी पापे करुन, सातवे दिवशी सत्यनारायण घालते ! शिवाय जो कोणी श्रीमंत निपुत्रिक आहेत, ते तर हे असले सत्यनारायण दररोज घालते. परंतु बाबांनो, हे सगळे आशेचे नाटक आहे यात खरी भक्ती नाही यांत खरा देव नाही." [७] मन करारे प्रसन्न सर्व सिध्दीचे कारण या तुकाराम महाराजांच्या अनुभवाप्रमाणे, मनाचे नैराश्य घालविण्यास मनच प्रसन्न केले पाहिजे व आपल्या ताब्यात आणले पाहिजे. पापाच्या योगाने आपल्या मनास त्यांचे डाग पडले आहे, ते डाग नाहिसे होण्यास तसे पाप पुन्हा आपल्या हातून होणार नाही, असा आपला दृढनिश्चय झाला पाहिजे त्याशिवाय ते कधीही बंद होणार नाही असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

विनाकारण खर्च करण्याची पध्दत शेतकरी जोपर्यंत बंद करत नाही तो पर्यंत शेतकऱ्याची स्थिती सुधारणार नाही. तेंव्हा शेतकऱ्याने वायफळ खर्च थांबविण्यातच त्याचा फायदा असल्याचा सल्ला मुकुंदराव पाटील प्रकर्षाने सांगताना आपणास दिसून येतात.

### ६.२.६ वेळ

शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती सुधारण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी वेळेचं महत्त्व समजावून सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांच्या मते, "आपणा लोकांना शेतीची कामे करुनही पुष्कळ

वेळ मिळत असतो. परंतु किंमत कळत नसल्यामुळे तो गप्पागोष्टीत नाच-तमाशांत जातो. वेळेचा नाश करण्याची व्यासपीठे म्हटली म्हणजे गावांत चव्हाट्याची जागा, न्हाव्याचा ओटा, सुताराचा पार, ही स्थळे रिकामटेकड्या माणसांनी नेहमी भरलेली असावयाची ! सकाळची वेळ असली म्हणजे दहावीस जणांनी जमावे, उन्हाकडे पाठ करावी, एकाने मुंडासे तर दुसऱ्याने कुडते काढावे. आणि बोलता-बोलता उंवांची तपासणी करावी ! न्हाव्याने हातात शेंडी धरुन, हजामत करता करता हुकार देत जावा ! तसेच सुताराने ही काही तासता तासता एखाद्या गोष्टीस आरंभ करावा, आणि प्रत्येक धलपी मागे त्या गोष्टीची धलपी काढीत असावे ! आणि जर का गावातील एखाद्या इसमाचा खटला यांचे पुढे उभा राहिला म्हणजे त्यावर एकएकाचे तासाचे तास भाषण चालावयाचे ! तितक्यांत कोणी कामाचा माणूस यांचे पुढून जाताना दिसला की, त्याची त्यांच्याकडून भरपूर टवाळी झाल्याशिवाय रहावयाची नाही. घरची माणसे चारचार पाचपाच वेळा हाका मारुन थकून जातात. पण ही रिकामटेकडी मंडळी तेथून काही केल्या हालत नसते ! घरीं शेतात पुष्कळ कामे करावयाची पडलेली असतात ती वेळच्या वेळी करु लागल्यास, जेवणास सुध्दा सवड होणार नाही पण आपले लोक एखादे वेळी मरेपर्यंत काम कर कर करतील आणि एखादे वेळेस या यात्रेहून त्या यात्रेस आणि त्या यात्रेहून या यात्रेस असे कित्येक दिवस फिरतील ! हा केवढा वेळेचा नाश ! हा वेळेचा नव्हे आपल्या स्वतःचा नाश ! आपण गप्पा गोष्टीत किंवा कोणाची टवाळी करण्यात, आपले आयुष्य खर्ची पाडतो ! एकदा हातातून आपल्या आयुष्याचा एकेक दिवस फुकट गेला म्हणजे तो पुनः कधीही परत मिळायचा नाही. तो गेलाच."[८] आपला शेतकरी वर्ग हा आपली शेतीची कामे सोडून गावात गप्पा मारण्यात वेळ वाया घालवतात. गावात चारचौघेजण एकत्र आले की मग गावातील नको त्या विषयावर चर्चा करत बसतात परंतु ही चर्चा गावात एखादा नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्याविषयी नसते. या चर्चेतून काहीही निष्पन्न होत नाही मग उगाचच आपला वेळ वाया घालवण्यात काय अर्थ आहे हाच वेळ आपल्या शेतात काम करण्यासाठी घालवला तर नक्कीच उत्पन्नात वाढ होईल. त्यासाठी वेळेचा सदुपयोग करण्याचा सल्ला मुकुंदराव पाटील शेतक-यांना देताना दिसतात.

### ६.२.७ शिक्षण व दुर्व्यसने

आज दीन दुबळ्या शेतकरी वर्गाचा जो ऱ्हास झाला आहे, त्याला जी अनेक कारणे आहेत त्यापैकी शिक्षण व दुर्व्यसने ही कारणे ही सांगता येतील. मुकुंदराव पाटील यांनी शिक्षणाचे महत्त्व व दुर्व्यसनाचे तोटे समजावून सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "आज अमेरिका, जपान वगैरे राष्ट्रांकडे दृष्टी फेकल्यास तेथील शेतकरी वर्ग आपल्या शिक्षणाच्या सहाय्याने निरनिराळ्या यांत्रिक सुधारणा घडवून आणून त्यांच्या मदतीने आपल्या शेतीची वाढ करण्यात अगदी चूर होऊन गेलेला आहे. केवळ वाडवडिलांपासून चालत आलेल्या शेतकी साधनांवरच अवलंबून न राहता, त्यांत नवीन नवीन शोध लावून ती अधिक फलदायी कशी करता येईल इकडे त्यांचे लक्ष आज गुंतलेले आहे. शक्य तितक्या थोड्या श्रमांत, थोड्या वेळांत थोडक्या जमिनीत भरपूर पीक काढण्यांत कोणकोणत्या युक्त्या योजाव्यात, या कामी ते आपले जीवित अधिकाधिक सुखमय बनवुं लागले आहेत. परंतु आपल्या शेतकऱ्यांचे पहावे तो आपले प्रतिगामी धोरण ! त्रेता युगातल्या कुठल्याशा सोम्यागोम्या पूर्वजाने शोधून काढलेल्या वीतभर लांब लाकडी नांगराच्या जीवावर आमचा शेतकरी व त्याला हत्यारांची पुरवणी करणारा कारागीर वर्ग हे बिचारे आपला संसार थाटण्याचे कार्य अशक्य करण्यात मग्न झाले आहेत !" [१] सरकारने तरी या बाबतीत पुढाकार घेऊन, लहान मोठ्या प्रत्येक गावांतून शेतकी शाळा काढण्याचे कार्य करावे हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. सरकारी वसूलाचा शेकडा ऐंशी इतका भाग शेतकऱ्यांकडूनच वसूल केला जातो.

शेतक-यांकडून होणा-या वसूलाच्या प्रमाणात खर्च करुन शेतकऱ्यांची उन्नति साधने हे सरकारचे काम नव्हे काय ? यापुढे तरी मुळीच हयगय न करता सरकारने प्रत्येक गावात शेतकी शाळा काढून शास्त्रीयरित्या जमिनीची मशागत करणे, तिचे भरपूर पीक येण्यास उपयोगी असे तुकडे पाडणे, निरनिराळी खते कशी तयार करावी व त्यांचा कुठल्या जमिनीत खतांचा किती भाग घालावा, शेतातील पिकांवर पडणारे रोग व ते नाहीशे करण्याचे उपाय शोधून काढणे, थोड्या जमिनीत भरपूर पीक काढण्यास कोणत्या गोष्टी योजाव्यात, निरनिराळी खते थोडक्या खर्चात व आपल्या आजूबाजूस पडलेल्या निरुपयोगी वस्तूपासूनच कशी तयार करावी. शेतास लागणारी बहुतेक हत्यारे स्वतः तयार करणे, झाडांची लागवड करणे, अनेक प्रकारच्या झाडांची कलमे करुन उत्पन्न वाढविणे, पाणी कुठे

सापडेल हे जाणणे, शेतकी शास्त्राचे नवीन नवीन शोध लावण्यात तरबेज होणे वगैरे गोष्टींचे शिक्षण देण्यास ताबडतोब सुरुवात केली पाहिजे. [१०] अशा पध्दतीने रीतसर शिक्षण मिळू लागल्यास शेतकऱ्यांच्या बुध्दीस गती मिळून तो चौकस बनेल. आपले शेत भरभराटीस कसे आणावे या गोष्टीकडे शेतकरी आपले बुध्दीकौशल्य खर्ची घालून, नवीन नवीन शोध अस्तित्वात आणील. त्याची निरीक्षण शक्ती वाढून तो आपल्या मार्गातील अडथळे दूर करण्यात तरबेज होईल.

दुर्व्यसनाविषयी मुकुंदराव पाटील सांगतात की, "आपल्या शेतकऱ्यांचा बराचसा वेळ हा रानात पशुपक्षांच्या सहवासात जात असल्यामुळे त्यास दुर्व्यसने जडण्यास फारच क्वचित संभव असतो. परंतु अलिकडे आपल्या शेतकऱ्यांत एकेक दुर्व्यसने शिरु लागली आहेत. शहराच्या आसपासच्या बहुतेक खेड्यांत दारुची बाटली शिरली आहे. आणि कित्येकांना तर तिचे दररोज दर्शन घेतल्यावाचून चैन पडेनासे झाले आहे. ही दारुबाजाची भयंकर चाल आपणांत हळूहळू प्रसार पावत चालली आहे ! दारुबाज दारु पीत नाही तर तो आपली कीर्ती पितो व निःसंग बनतो. दारुबाज दारु पीत नाही तो आपली लाजलज्जा कोळून पितो आणि निर्लज्ज बनतो."[११] आज बराचसा शेतकरी हा व्यसनाच्या आहारी गेला आहे. यामुळे शेतक-यांची प्रगती खुंटली आहे. तसेच कित्येक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. शेतीच्या उत्पन्नातून जो पैसा मिळतो तो हा शेतकरी दारुसाठी खर्च करतो. याव्यसना पासून शेतक-यांनी अलिप्त व्हावे व आपल्या कुटुंबाला दुर्दशा होण्यापासून वाचवावे यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांचे प्रबोधन करतात.

कारखाने उदयोगधंदे या व्यसनामुळे कसे उध्वस्त झाले याविषयी मुकुंदराव पाटील पुढे सांगतात की, " दारु पासून पिणाराची व घरादाराची कशी दुर्दशा होते हे सांगितले पाहिजे असे नाही. ते दारु पिणारास चांगले माहीत असते. एकदा तिचा चटकदार चटका लागल्यामुळे त्याला कोणाचीच पर्वा वाटेनाशी होते. या दारुच्यापायी मोठमोठ्या जहागिरांच्या जहागिऱ्या, श्रीमंताची संपत्ती, कारखानदारांचे कारखाने, ही सगळी बाटलीत गडप झाली आहेत ! शेतकऱ्यांनो डोळे उघडा ! या दारुच्या तलपीस लक्षाधीसाचे लाखो रुपये पुरले नाहीत. मग तुम्हासारख्या मिरचीभाकर खाऊन, चुना तमाखू फाकणाऱ्याची वीतभर जमीन पुरेल असे कधीच व्हावयाचे नाहीत. दारु प्याल्याने अंगात शक्ती वाढते असेही नाही. [१२] म्हणून मुकुंदराव पाटील यांनी शेतकऱ्यांना सावधानतेचा संदेश दिलेला होता हे आपणास पाहावयास मिळते. शेतकऱ्यांनो सावध व्हा आणि आपल्या मुलांच्या वर्तनावर

नजर ठेवा. शेतक-यांनी या व्यसनापासून दूर राहीले तरच शेतक-यांची प्रगती होवू शकते. यासाठी मुकुंदराव पाटील व्यसनापासून होणा-या परिणामांची शेतक-यांना जाणीव करुन देतात. तरच तुम्ही सगळ्या संसारात नजर ठेवल्याचा सार होईल. थोडक्यात या सप्तसुत्रीचे जर शेतक-यांनी पालन केले तर दुरावस्था दूर होवून शेतक-यांना चांगले दिवस येतील हे मुकुंदराव पाटलांचे विचार कोणत्याही समाजगटासाठी उपयुक्त ठरणारे आहेत.

### ६.३ शिक्षणविषयक विचार

देशातील प्रत्येक मणुष्याला लिहिता वाचता आल्याशिवाय राष्ट्राची भरभराट होत नाही, असा ठाम सिध्दांत आपल्या या देशात इंग्रजी सत्ता सुरु झाल्यापासून सर्व जाणत्या माणसाच्या ऱ्हदयात बिंबवलेला दिसून येतो. पूर्वी शिक्षणासंबंधाने आताप्रमाणे लोकमत मुळीच नव्हते. याबद्दल मुकुंदराव पाटील सांगतात की, “ब्राह्मणवर्णाने वेदाध्यायन करावे, क्षत्रिय वर्णाने शस्त्राध्ययन करावे, वैश्यवर्णाने वाणीज्याध्ययन करावे आणि शूद्रवर्णाने सेवाध्यायन करावे म्हणजे राष्ट्राची उन्नती झाली असे जूने लोकमत असल्याचे दिसून येते. पहिल्या वर्णाची इच्छाच अशी होती व त्याची इच्छा म्हणजे जे मत तेच लोकमत असा शास्त्रोक्त समज असल्यामुळे शिक्षणाच्या फैलावास वर्णभेदाने मोठाच अडथळा झालेला दिसून येतो. वेदवेदांगे मुखोध्दगत झाली, न्याय मीमांसा, तर्क वगैरे शास्त्राचे उत्तम अध्ययन झाले म्हणजे आपले कर्तव्य संपले, आपला जन्म सफल झाला असा ब्राह्मणवर्णाचा समज झालेला दिसून येतो. तलवारीचे हात सपासप मारता आले, तीर अचूक सोडता आला, गदा युध्दात नैपुण्य मिळवले म्हणजे आपले कर्तव्य संपले, आपल्या जन्माचे सार्थक झाले असा क्षत्रियवर्णाचा समज झाला. व्यापारधंदा चलाखीने करता येऊ लागला, दोन पैसे संग्रहांत ठेवता आले, म्हणजे आपण पूर्ण शहाणे झालो, आपले आता काही कर्तव्य उरले नाही असा समज वैश्यवर्णाचा झाला. वाटेल त्या वर्णाची सेवा करता आली कोणी कितीही झिडकारले, मारिले तरी राग न आणता चाकरी बजावता आली म्हणजे आपले कर्तव्य आटोपले. आपल्या जन्माचे सार्थक झाले असे शूद्रवर्ण समजत आला.”[१३] म्हणजे ब्रह्मदेवाने उत्पन्न केलेल्या चार वर्णांनो, शास्त्र पुराणांनी सांगितलेल्या कायद्याप्रमाणे वागले म्हणजे देशाची व धर्माची पूर्ण सुधारणा झाली असे पूर्वीचे लोकमत असल्याचे दिसून येते. देशातील कोणत्याही वर्णाच कसाही मनुष्य असो त्यास

लिहिता वाचता आलेच पाहिजे. त्याशिवाय देशाची सुधारणा होणार नाही हे आताचे नवे लोकमत त्याकाळी कोणाच्या स्वप्नीही नव्हते.

इ.स.१८१८ साली पेशवाईचा अस्त झाला. सबंध देशावर इंग्रजांचा एक छत्री अंमल सुरु झाला. इंग्रजी विद्या व संस्कृतीच्या परिशीलनाने आपल्या सर्वांगीण जीवनात बदल होऊ लागले. पाश्चात्य देशांनी जी आश्चर्चकारक प्रगती केली त्याचे मूळ ज्ञानसाधनेत आहे याची जाणीव समाजचिंतकांना झाली. त्यामुळे 'शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशव्दार' आहे.[१४] या सूत्रावर एकोणीसाव्या शतकातील सुधारकांनी भर दिलेला पहावयास मिळतो. महात्मा फुल्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्याला अग्रक्रम दिला होता. शूद्र व अतिशूद्र समाजातील लोकांना शिक्षणाची संधी कशी उपलब्ध करुन देता येईल हा विचार त्यांच्या मनात रात्रंदिवस घोळत होता. खेड्यातील लोक निरक्षर असल्यामुळे त्यांना व्यवहार कळत नाही, कायद्याची माहिती नाही. त्यामुळे सरकारी अधिकारी व सावकार त्यांची फसवणूक करताना दिसतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अशिक्षितपणा होय अशी म.फुल्यांची धारणा होती.

मुकुंदराव पाटील महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची किती आवश्यकता आहे याची जाणीव त्यांनी सातत्याने करुन दिलेली होती. हिंदूधर्मात चातुवर्ण्याधिष्ठित समाजरचनेमुळे शिक्षणाची मक्तेदारी ठराविक वर्गात निर्माण झालेली होती. त्यामुळे कष्टकरी बहुजन समाज आणि अस्पृश्य शिक्षणापासून वंचित झाले होते. धर्माचे वर्चस्व समाजातील सर्व क्षेत्रात असल्यामुळे सामान्य माणसाच्या मनावर धार्मिक कल्पनांचा पगडा बसला होता. उच्चवर्णीयांनी पोथ्या-पुराणे लिहून या कल्पना अधिकच दृढ केल्या आहेत. असे मुकुंदराव पाटील यांचे मत होते. उच्चवर्णियांच्या स्वार्थी वृत्तीवर कोरडे ओढताना त्यांनी म्हटले की, " गुरुश्रेष्ठांच्या कोंडवाड्यात हजारो वर्षापासून कोट्यावधी माणसे अज्ञानात रहात आली आहेत. पण त्या माणसातून त्यांनी एकासही सज्ञान केले नाही."[१५] आपले धर्मग्रंथातील ज्ञान टाकाऊ, कालबाह्य, निरुपयोगी, अव्यवहारी, अदूरदर्शी आहे असे मुकुंदराव पाटील यांना वाटत होते.

मानवी जीवनामध्ये शिक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे स्थान असून त्यामुळेच विकास साधता येतो अशी मुकुंदराव पाटील यांची धारणा असल्याचे दिसून येते. "शिक्षण हा तिसरा डोळा आहे असे मानले जाते. परंतु मुकुंदराव पाटलांच्या मते शिक्षण हा तिसरा डोळा आहे त्याचप्रमाणे तो तिसरा

कान, तिसरा हात व तिसरा पाय आहे. यंत्रामध्ये अद्‌भुत शक्ती या विद्येमुळेच येते. म्हणून विद्या हे मृत्युलोकीचे अमृत आहे. या अमृताने दगडलोखंडही जिवंत होतात. ते माणसाप्रमाणे गाणी गाते."[१६] असे शिक्षणाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट करुन पाश्चात्य राष्ट्रांची प्रगती यामुळे कशी झाली हे स्पष्ट केलेले होते. कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशात किती माणसे आहेत यावर अवलंबून नसते तर ती माणसे किती विद्यमान आणि स्वार्थत्यागी आहेत यावर असते. म्हणूनच शिक्षणाशिवाय देशाची प्रगती होऊ शकणार नाही असे मुकुंदरावांचे ठाम मत होते.

आपले कोठे चुकले आहे आणि ते कशामुळे सुधारेल हे समजणे म्हणजेच 'ज्ञान' होय. अशी ज्ञानाची व्याख्या त्यांनी करुन अशाप्रकारचे ज्ञान आपल्या देशातील लोकांना पूर्वीपासून मिळाले नसल्यामुळे समाजाचा विकास होऊ शकला नाही. तेंव्हा हे प्राचीन ज्ञान विद्यारुपी भट्टीत घालून त्याला नवीन विचारांची सिलाई दिली पाहिजे असे त्यांचे मत होते. "मनुष्याच्या बाह्योपचारात प्रथम सुधारणा होण्यापेक्षा त्याच्या बुध्दीत प्रथम सुधारणा झाली पाहिजे. ती होण्यासाठी एकच रामबाण औषध आहे ते म्हणजे विद्या होय."[१७] अशाप्रकारे बुध्दीचा विकास करणारी विद्या आपल्या समाजात हजारो वर्षापासून निर्माण झाली नाही. बहुजनसमाज तर सर्व प्रकारच्या ज्ञानापासून उपेक्षित होता. इंग्रजी राज्यात प्रथमच ही संधी प्राप्त झाली आहे असे मुकुंदराव पाटलांना वाटते. म्हणूनच इंग्रजी राज्याविषयी त्यांचे चांगले मत झाल्याचे दिसून येते.

वेद हे हिंदूचे आद्य धर्मशास्त्र असून ते प्रत्यक्ष देवाने निर्माण केले आहे असे मानले जाते. त्या वेदांची ओळख हजारो वर्षात बावीस कोटी लोकांतून बावीस माणसांना अद्याप नाही. धर्मशास्त्राचे महान सिध्दांत अमेरिकेत जाऊन सांगणाऱ्या विवेकानंदाच्या देशात शेकडा पाच माणसे साक्षर नसावी याचे कारण मुकुंदराव पाटील यांनी शिक्षणाचा अभाव असे दिले आहे.[१८] काही पौराणिक दाखले देऊन त्यांनी शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. दि. २८ जुलै १९३० रोजी नेवासे येथे मोहिनीराज बोर्डींगच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्याअध्यक्षस्थानावरुन बोलताना त्यांनी म्हटले की, "पृथ्वीवरील सर्व सुधारणांचे मूळ विद्याभ्यासात आहे. अमृताचा कुंभ राक्षसाने पळविला तेव्हा विष्णूने मोहिनीरुप घेतले या पौराणिक कथेचे सार पाहिले तर असेच दिसून येईल की, विद्यामृताची किंमत देवापेक्षाही श्रेष्ठ आहे. विद्येपुढे देवांचे देवपण लंगडे पडते. विद्येमुळे दैत्यही देवापुढे श्रेष्ठ होऊ शकतात. विद्येच्या वापरामुळे इंग्रज जगावर राज्य करीत आहेत. अमृतरसांचे मुख्य स्थळ म्हणजे

वाचनालये असून शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय आपलेच खरे रुप काय आहे हे नीट कळणार नाही."[१९] या बहुजन समाजाने शिक्षण घेतले तरच त्याची प्रगती होवू शकते. अशी मुकुंदराव पाटील यांची खात्री होती यासाठी बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व मुकुंदराव पाटील हे "दीनमित्रा"तून सातत्यातून पटवून देत होते.

इंग्रजी राज्यात सर्वसामान्य माणसाला शिक्षणाची व्दारे खुली झाली या घटनेचे मुकुंदराव पाटील यांनी स्वागत केलेले दिसून येते. "यापूर्वी आपल्या देशात हजारो वर्षापासून एकही शूद्र, अतिशूद्र शिक्षण घेऊ शकला नाही. परंतु इंग्रजी राज्यकर्त्यांनी विद्यामंदिराची व्दारे अस्पश्यांपासून ब्राह्मणांपर्यंत सर्वांना मोकळी केली."[२०] या धोरणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याचे दिसून येते. इंग्रजी सरकारसारखा अद्‌भुत पंचाक्षरी या रुदीपिशाच्चग्रस्त देशास ईश्वरकृपेने लाभल्यामुळे या देशातील सर्वधर्माच्या, सर्वपंथाच्या लोकांत नवीन आचारविचारांचे रक्त खेळू लागले आहे अशी मुकुंदराव पाटलांची धारणा होती.

इंग्रजी राज्यात सर्वांना शिक्षणाची दारे खुली झाली याबद्दल मुकुंदराव पाटील यांनी सरकारचे ऋण व्यक्त केले. परंतु इंग्रजांचे शैक्षणिक धोरण मुकुंदरावांना मान्य नव्हते. त्यांच्या मते "भारतातील समाजव्यवस्थेचा अभ्यास न करता सर्व दर्जाच्या लोकांना एकच अभ्यासक्रम इंग्रजांनी तयार केलेला आहे. हा या शिक्षण पध्दतीतील महत्त्वाचा दोष होय. ज्या देशात शेकडा ७५ लोक शेतीचा धंदा करतात, त्या देशात शेतकऱ्यांना उपयुक्त असा शिक्षणक्रम नसावा ही राष्ट्रीय चूक आहे."[२१] सरकारने तयार केलेले अभ्यासक्रम बहुजनसमाजाच्या दृष्टीने कसे दोषपूर्ण आहे. याची जाणीव मुकुंदरावांनी करुन दिलेली आपणास पाहावयास मिळते. आपल्या भोवतालच्या जीवनातील प्रश्नांची उकल शिक्षणातून झाली पाहिजे असा त्यांचा व्यापक दृष्टीकोन असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

शेतकऱ्यांना डोळसपणा येण्यासाठी सर्वसामान्य शिक्षण तर हवेच परंतु त्याच बरोबर शेतीला उद्योगाचा दर्जा प्राप्त करुन देणारे आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे यासाठी मुकुंदरावांनी शेतकऱ्यांच्या वास्तविक स्थितीचे भान आणून देऊन आपल्या विचारातून परिवर्तनाची दिशा दिली आहे. मुकुंदराव पाटील हे शेतकऱ्यांचे नेते होते. भारतासारख्या शेतीप्रधान देशात शेतकरी हाच एक उपेक्षित घटक असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडली.

शेतीचा विकास झाल्याशिवाय देशाच्या अर्थव्यवस्थेत परिवर्तन घडून येणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणूनच मुकुंदराव पाटलांनी वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना करण्यासंबंधी सरकारला सूचना केल्या आहेत. "शेती अर्थव्यवस्थेचा कणा असलेली जनावरे ही उत्तम पध्दतीने पैदास करुन तयार केली पाहिजेत. तसेच अत्याधुनिक यंत्र सामुग्री खते व बी-बियाणे वेळेवर पुरविली पाहिजेत. शेतकऱ्यांना शेठ व सावकारांच्या जाचातून मुक्त करायचे असले तर त्यांना सरकारने अल्प दरात पतपुरवठा केला पाहिजे."[२२] तसेच शेतकऱ्यांवर जो शेतसारा लादला जातो तो कमी केला पाहिजे. शेतकऱ्यांच्या हितासाठी तालुका व गाव पातळीवर शेतकरी संघ स्थापन केले पाहिजेत. शेती मालाला योग्य भाव मिळण्याची हमी सरकारने दिली पाहिजे आणि शेतकऱ्यांचा माल विकण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली पाहिजे. अशा प्रकारच्या अनेक मागण्या मुकुंदराव पाटलांनी सरकारकडे करुन शेतकऱ्यांचे दु:ख वेशीवर टांगले होते.

शेतकऱ्यांच्या समस्याच त्यांनी केवळ मांडल्या नाहीत तर त्यांच्या दोषावरही प्रहार केलेला होता. " दैवतवादी वृत्ती, निरर्थक धार्मिक रुढी, अंधश्रध्दा, भाऊबंदकी, खर्चिक वृत्ती, दानधर्म, शिक्षणाविषयी अनास्था, आळस, दैववाद या गोष्टींचा त्याग केला पाहिजे."[२३] याबद्दल त्यांनी शेतक-यांना जाणीव करुन दिल्याचे आपल्याला पहावयास मिळते. शेतकरी हाच मुकुंदराव पाटील यांच्या विचाराचा केंद्रबिंदू होता. धार्मिक सामाजिक गुलामगिरीत अडकलेल्या, कर्जाच्या ओझ्याने दबलेल्या, दैववादाने पिचलेल्या शेतकऱ्याची उन्नती झाली पाहिजे हाच विचार त्यांनी सातत्याने केलेला दिसून येतो.

शेतकऱ्यांची उन्नती झाली तरच राष्ट्राची प्रगती होऊ शकेल असे मुकुंदराव पाटील यांचे मत असल्याचे दिसून येते. "सध्याची शिक्षण पध्दती ही केवळ उच्चवर्णीय समाजाला अनुकूल असून शेतकरी व कष्टकरी समाजाला त्याचा काहीच फायदा झाला नाही. तेंव्हा बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे अशी मागणी मुकुंदराव पाटील यांनी केलेली होती. तसेच केवळ पुस्तकी शिक्षण न देता धंदेशिक्षण आणि शेतीशिक्षणाची मागणी त्यांनी सरकारकडे केली होती."[२४] येथे मुकुंदराव पाटील सध्याच्या शिक्षण पध्दती दोषपूर्ण असल्याचे स्पष्ट करतात. सध्याची शिक्षण पध्दती ही उच्चवर्णीयांनाच अनुकूल असल्याचे ते सांगतात. या शिक्षण पध्दतीव्दारे बहुजन समाजाला व्यवसायिक शिक्षण मिळाले तर हा समाज छोटया मोठया

व्यवसायाव्दारे कुटुंबाची उपजिवीका भागवू शकतो. यासाठी बहुजन समाजाला व्यवसायिक शिक्षणाचा आग्रह मुकुंदराव पाटील धरतांना दिसतात.

इ.स.१९२१ साली सरकारने रयतेच्या हातात शिक्षण खाते दिले होते. तेव्हा बहुजन समाजातील कार्यकत्यांनी लक्ष घालून मुलामुलींच्या शिक्षणाची सोय करावी. शिक्षण नसल्यामुळे हा समाज केवळ दोन पायांची जनावरे बनला आहे. तेव्हा त्यांचा पशूपणा घालविण्यासाठी सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह मुकुंदराव पाटील यांनी धरलेला दिसून येतो. बहुजनसमाजात शिक्षण प्रसार वेगाने का होत नाही याची कारणमीमांसा करुन त्यावर उपाय योजना त्यांनी सुचविली आहे.[२५] या शिक्षण प्रसारात त्यांच्या मते पैसा, लोकांची अंधसमजूत आणि कार्याच्या आखणीची अडचण या तीन अडचणी प्रामुख्याने असून त्या सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविताना त्यांनी म्हटले की, नोकरशाहीच्या वाढत्या पगारात काटकसर करावी, ५० रुपयावरील जमीन सारा देणारे व दोन हजारावर उत्पन्न असणाऱ्या व्यापाऱ्यांवर कर बसवावे, देवस्थानास मिळणाऱ्या नेमणुकात फक्त देवांचा योगक्षेम चालेल इतका खर्च ठेवून बाकीची रक्कम शिक्षणाकडे जमा करावी. म्हणजे सक्तीच्या शिक्षणावरील आर्थिक तूट भरुन निघेल.

अशा रितीने बहुजनसमाजातील शिक्षण प्रसारातील अडचणींचा मागोवा घेऊन त्या सोडविण्यासाठी काय करावे याचे मार्ग त्यांनी लक्षात आणून दिले आणि बहुजनसमाजातील शिक्षणाच्या प्रश्नाला वाचा फोडल्याचे दिसून येते. इ.स.१९२२ साली पुणे येथील मराठा सल्लागार मंडळाने सक्तीच्या शिक्षणासंबंधी जनतेकडून काही मते मागितली होती. मुकुंदराव पाटील यांनी या मंडळाकडे पुढील सूचना पाठविल्या होत्या.

१) "हिंदुस्थानास सक्तीच्या शिक्षणाची फार जरुरी आहे.

२) शिक्षण मोफत असावे.

३) ग्रामपंचायतीमार्फत नादान मुलांची निवड करुन त्यांना पाटीपुस्तके, कपडे मोफत द्यावेत.

४) शाळेसाठी इमारत नसेल तर शाळा, देवळे, धर्मशाळा, चावडी वगैरे ठिकाणी भरवावी.

५) चौथीपर्यंत सर्व शिक्षक शक्य तितक्या स्त्रिया नेमाव्यात.

६) गावाच्या बहुमतावर अस्पृश्यांना एकत्र किंवा वेगळे बसवावे.

७) मुलामुलींना प्राथमिक शिक्षण एकत्र द्यावे.

८) शिक्षणासाठी खर्च होईल अशा अटीवर पाहिजे तर थोडा कर बसवावा."[२६]

मुकुंदराव पाटील यांनी केलेल्या सूचनांतून बहुजन समाजाच्या शिक्षणाविषयी असलेली तळमळ दिसून येते. अशा रीतीने मुकुंदराव पाटील यांनी शिक्षणातील अडचणींना तपशीलवार विचार करुन शिक्षण विषयक धोरण ठरविताना प्रथम जनतेची स्थिती लक्षात घेऊन शिक्षण कोणत्या स्वरुपाचे द्यावे, कसे द्यावे आणि त्यासाठी लागणाऱ्या अर्थकारणाची तरतूद कशी करावी या अंगाचा सूक्ष्मपणे विचार केलेला दिसतो.

## ६.४ सावकारशाही निर्मुलन विषयी विचार

सावकारशाहीमुळे महाराष्ट्रातील शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडला आहे. या कर्जामुळे शेतक-याला सावकाराला आपले घरदार जमीन विकावी लागत असे त्यामुळे या सावकारांच्या आत्याचारापासून शेतक-यांची सुटका व्हावी यासाठी मुकुंदराव पाटील सावकारशाही बद्दल दीनमित्र मधून प्रहार करतात. याविषयी ते सांगतात की, " सावकारशाही म्हणजे चलाखीबाज, फसवेगिरीची एक संस्था आहे. त्याने आपल्या अकलेच्या जोरावर व्यापाऱ्याचे ढोंग करुन, सर्व गरीब भोळ्या अशा शेतकऱ्यांच्या भोवती आज कित्येक वर्ष थैमान सुरु केले आहे. मोसमामध्ये शेतकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांना गोडगोड गोष्टी सांगण्याची त्यांची नेहमी पध्दत असते. सावकारशाही ऊर्फ शेटजी महाराष्ट्राच्या बाहेरचे रहिवाशी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात त्यांना पूर्वी जमीन जुमला, घरदार नसल्याचे आपल्याला पहावयास मिळते. परंतु ह्या सावकारांनी आमच्या शेतकऱ्यांच्या घरी येऊन, खोलीचे भाडे न देता दुकान थाटावयाचे, त्यांची उधारी शेतकऱ्यांवर करुन, उधारीवर व्याज उभारावयाचे व शेवटी पैसे फिटेनासे झाले तर जमिनी लिहून घेण्याचा उपक्रम सुरु करावयाचा, त्यात तारण म्हणून खरेदी लिहावयाचे व आडवा तिडवा हिशोब करुन जमिनी बळकावून बसायचे."[२७] सावकार शेतक-यांच्या अडाणीपणाचा फायदा घेवून त्यांना लुटतात व त्यांच्या जमिनी व्याजापोटी आपल्या ताब्यात घेतात. सावकारांचा हा ढोंगीपणा समाजासमोर उघड व्हावा व सावकारांचे खरे रुप समाजाला कळावे असे मुकुंदराव पाटलांना वाटत असल्याचे दिसून येते.

शेतकऱ्याने आपल्या शेतात दिवसभर उन्हातान्हांतून खपून माल तयार करावा व नंतर शेटजींच्या दुकानावर विकावयास न्यावा, परंतु ह्या विश्वासू शेटजीने मालाची किंमत न देता हजारो

नसत्या भानगडी उत्पन्न करुन, शेतकऱ्यांच्या जवळून अडवून माल घ्यावयाचा ! हल्ली सरकारने को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांची जोड दुकाने शेतकऱ्यांच्या करीता सुरु केलेली आहेत. हा स्तुत्य उपक्रम सुरु झाल्यामुळे शेतकऱ्यांना सावकारशाही च्या जबड्यांतून सुटण्याचा मार्ग मोकळा झालेला दिसून येतो. [२८] सावकारशाहीच्या स्वार्थी मतलबामुळे ज्यांचा माल त्यांचे हाल कसे होत आहे हे स्पष्ट होते. आज आपल्यामध्ये शेकडा नव्वद शेतीवर उपजिविका करणारे आहेत. त्या शेतकऱ्यांकडे बारकाईने पाहिले म्हणजे खरोखर सहृदयाच्या माणसास हुंदका आल्याशिवाय राहत नाही. आपल्या श्रमाचा वाटा ज्या प्रमाणात मिळावा त्या प्रमाणांत आपणांस मिळताना दिसत नाही. याकरिता आमच्या मते तुंम्ही संघशक्तीने वागा. संघामार्फत आपले दुकान चालवून योग्य दरात आपला माल विका म्हणजे आपली स्थिती सुधारेल ! संघ शक्तीच्या कार्यात कितीही अडचणी आल्या तरी संघशक्तीने त्या पार पाडता येतात. म्हणून सहकार्य करणे जरुरीचे आहे. शेटजीवर विश्वास ठेवून बसाल, तर तुम्हास कामाचे श्रेय योग्य प्रमाणात मिळणार नाही हे लक्षात ठेवा. असा उपदेश मुकुंदराव पाटील आपल्या शेतकऱ्यांना वारंवार करताना दिसतात.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "या जगात अमेरिकेच्या खालोखाल हिंदुस्थान हा एक कृषिप्रधान देश आहे. या दोन देशांतील सर्व लोक शेतकीच्या धंद्यावर उपजिविका करतात. तथापि तुलनेच्या दृष्टीने या दोन देशांतील शेतकऱ्यांच्या स्थितीत जमीन अस्मानचा फरक आहे. अमेरिकेतील शेतकरी स्वावलंबन, चिकाटी, दीर्घोद्योग यायोगे संपन्न स्थितीत आहेत. त्यांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे. सर्व बाजूंनी त्यांनी आपली उन्नती करुन घेतली आहे. कोणत्याही कारणाने त्यांना दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावे लागत नाही. याउलट हिंदुस्थानातील बहुतेक सर्वच शेतकरी निर्धन-अत्यंत दरिद्री दिसतात. हिंदुस्थानातील आमच्या शेतकरी बंधूची इतकी निकृष्टावस्था कशाने झाली, त्यांच्या कपाळी असे सोळाविश्वे दारिद्र्य काय कारणाने आले हे समजणे अगत्याचे आहे."[२९] आमच्या शेतकरी बंधूच्या अधोगतीचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे त्यांना शिक्षण नाही हेच होय. शिक्षणाच्या अभावी त्यांचे सर्व बाजूने भयंकर नुकसान झाले आहे व अजूनही होताना दिसताहेत. अडाणीपणामुळे रोजच्या व्यवहारात पावलो पावली त्यांची फसगत होताना दिसते. धूर्त व लबाड लोक त्यांना बेमालूम रीतीने फसविताना दिसतात.

शिक्षणप्रसार नसल्याकारणाने यांच्या आधीच खिळखिळया झालेल्या संसाराची सर्वस्वी धुळधाण झाली आहे. त्यांची ही शोचनीय स्थिती सुधारण्याचे सरकारचे थोडे बहुत प्रयत्न सुरु असले तरी दुर्दैवाने यांचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा तसा मिळताना दिसत नाही. "आपली गाऱ्हाणी सरकारात मांडणे व ती दूर करुन घेणे, शेतकऱ्यांना अज्ञानपणामुळे साधत नाही. कारण सरकार व शेतकरी यांच्या मध्ये मध्यस्थी करावयाला धूर्त ब्राह्मण कज्जेदलाल अगदी टपून बसलेले असतात. ते शेतकऱ्याच्या खऱ्याखुऱ्या अडचणी बरोबर रितीने सरकारपुढे मांडीत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची गाऱ्हाणी ऐकून घेऊन ती दूर करण्यास सरकारची इच्छा असूनही केवळ परस्पर मनोगत बरोबर न कळल्यामुळे सरकारची इच्छा सरकारजवळ राहते आणि शेतकऱ्यांची गाऱ्हाणी तशीच राहून जातात."[३०] वकिलांची ही कज्जेदलाली कमी होईल तेव्हाच उपयोग होणार. शेतात पीक चार-दोन आणे नसले तरी मामलेदार, तलाठी व भाग कारकुन ते फुगवून बारा बारा आण्यापर्यंत लावताना दिसतात.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "आमच्या दीनदुबळ्या बळीराजांना कितीतरी संकटांना तोंड द्यावे लागते. इतकीही दुःखे ते सहन करतात. पण त्या सर्वात सावकार लोकांकडून जो छळ होतो तो पुसू नये. गरीब शेतकऱ्यांना आपल्या कर्जासाठी सळो की पळो करुन सोडणारे, जिवंतपणी त्यांचे रक्त जळवारुपाने शोषण करणारे जगात जर कोणी प्राणी असतील तर हे सावकार होय ! सावकार लोकांत गुजर, मारवाडी, ब्राह्मण वगैरे लोकांचा समावेश होतो. शेतकऱ्यांशी पैशाच्या देवघेवीचा अल्प काळात धंदा सुरु करुन पुढे लक्षाधीश झालेले हजारो लोक आढळतात. त्यांचे मुळचे भांडवल म्हणजे स्वदेशाहून आणलेला रस्सी व लोटा होय. एखाद्या अल्प भांडवलावर येथे येऊन ते श्रीमंत बनतात. त्यांनी ही श्रीमंती भोळ्या शेतकऱ्यांना फसवून व खोटे हिशोब ठेवूनच मिळवलेली असते. पाचपन्नास रुपयांच्या कर्जासाठी पन्नास पन्नास बिघ्यांचे डाग गमावून बसलेल्या शेतकऱ्याची हजारो उदाहरणे दाखविता येतील."[३१] सावकार शेतकऱ्यांचे शोषण, शेतकऱ्यांचा छळ कशा प्रकारे करतात याचे ज्वलंत उदाहरण देवून सावकारशाहीचे समूळ उच्चाटन होणे गरजेचे आहे. यासाठी मुकुंदराव पाटील प्रयत्न करताना दिसतात.

वतने, इनामे, सावकारी इत्यादी भांडवलशाहीचे वेगवेगळे प्रकार नष्ट झाल्याशिवाय समाजाचा उत्कर्ष साधला जाणार नाही. याची जाणीव मुकुंदराव पाटील यांना होती. म्हणूनच त्यांनी

कुलकर्णी लीलामृतातून कुलकर्ण्यांच्या वतनदारीवर तोफ डागली तर शेटजी प्रतापातून सावकाराकडून होणाऱ्या शोषणाचे चित्रण केलेले दिसून येते. समाजवादी विचारांचा पुरस्कार केल्याशिवाय बहुजन समाजाचे हित साधणार नाही याचीही जाणीव मुकुंदराव पाटील यांना होती.

सावकाराकडून होणाऱ्या शोषणाविरुध्द शेतक-यांना जागृत करण्यासाठी मुकुंदरावांना कधी कधी शब्दांचे उग्र रुप धारण करणे भाग पडले आहे. म्हणून भांडवलशाहीचा प्रभाव असणाऱ्या कालखंडामध्ये मुकुंदरावांनी केलेल्या काव्याचे मोल सामाजिक दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.[३२] मारवाडी, सावकार शेतकऱ्यांचे शोषण कसे करतात यांचे वर्णन मुकुंदराव पाटील यांनी केले आहे. त्यांच्या दारिद्र्याचे व मागासलेपणाची कारणे शोधलेली दिसून येतात. त्यांच्या या स्थितीला कोण आणि कसे जबाबदार आहेत याची मांडणी केलेली होती.

सावकारशाहीचे निर्मूलन करण्यासाठी मुकुंदराव पाटील सांगतात की, “आजवर आपला व्यवहार म्हणजे आंधळे दळते व कुत्रे पीठ खाते असाच झाला व सध्याही तोच क्रम सुरु आहे. पण ही आळशी वर्तणूक आता बदललीच पाहिजे. आजच यापुढे सावध होऊन प्रत्येक गावच्या शेतकऱ्यांनी अमेरिकेतल्या शेतकऱ्यांप्रमाणे संघशक्तीने, एकविचाराने व एकजूटीने वागून आपल्या नांदल्या संसारात माती कालवणारा, आपल्या बायकापोरांना अन्नान्न करावयास लावणारा, आपल्या सर्वस्वाची राखरांगोळी करणारा आपला भयंकर शत्रू जो सावकार त्यास शुध्दीवर आणण्यास व त्याच्या डोळ्यावरची धुंदी उतरवण्यास सत्याग्रहासारखा दुसरा रामबाण उपाय नाही. त्याचबरोबर आपली सांपत्तिक स्थितीत सुधारणा झाल्याशिवाय सावकारांशी असलेला त्यांचा परस्पर संबंध तुटला असे कदापि म्हणता यावयाचे नाही. सांपत्तिक स्थिती सुधारली म्हणजे सावकाराचे कर्ज काढण्याचा प्रसंग कधीच येणार नाही व शेतकरी कर्जबाजारीही होणार नाही. धान्याचे कोठे स्थापन करणे, वैरणीचा साठा करणे, को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स काढणे वगैरे सुधारणा केल्यापासून दुष्काळी दिवसांत शेतकऱ्यांना कर्ज काढण्याची गरज पडणार नाही. कारण त्यांना लागणाऱ्या आवश्यक वस्तू सदर सहकारी संस्थेतून सवलतीने मिळतील.”[३३] सावकाराच्या जाचातून शेतक-यांना मुक्त करण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्यावर भर दिला आहे. शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारली तर त्यांना सावकाराकडे कर्जासाठी जाण्याची वेळ येणार नाही. शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी ज्या उपाययोजना सुचवल्या त्या शेतक-यांनी एकजुटीने

अमलात आणल्या तर खरोखरच शेतकरी हा सावकारांच्या कर्जातून मुक्त होईल. यासाठी या उपाययोजना अतिशय महत्त्वाच्या वाटतात. आजही शेतकरी कर्जाला कंटाळून आत्महत्या करतांना दिसतो. अशा परिस्थितीत या उपाययोजना प्रेरणादायी ठरतील.

### ६.५ शेतकरी ऋणमुक्त कसे होणार

मुकुंदराव पाटील हे सत्यशोधक चळवळीतील शेवटच्या टप्प्याचे प्रतिनिधीत्व करणारे ग्रामीण पत्रकार होत. त्यांचे 'दीनमित्र' वर्तमानपत्र शेतकऱ्याला पूर्णतः वाहिलेले पत्र असल्याचे दिसून येते. याच वर्तमानपत्राच्या माध्यमातून मुकुंदरावांनी शेतकरी शोषणाविरोधी बंडाचे हत्यार उपसले होते. त्यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून शेती शोषणाची संगती लावली होती. सत्यशोधक समाजाची स्थापना करुन ब्राह्मणेतर चळवळीस मदत केल्याचे दिसून येते. मुकुंदरावांनी 'दीनमित्र' ह्या वर्तमानपत्रातील अग्रलेखनातून शेतकरी प्रश्नांना वाचा फोडल्या. आणि शेतकरी कसा सुखी होईल याकडे लक्ष दिले. मुकुंदरावांनी 'दीनमित्रा'च्या पहिल्याच अंकापासून म्हणजेच दि.२३ नोव्हेंबर १९१० पासून शेतकऱ्याची नित्कृष्ट स्थिती आणि ती घालविण्याचे उपाय ही लेखमाला अंकामध्ये प्रकाशित केल्याचे दिसते.

मुकुंदरावांनी शेतकऱ्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे हालाखीचे जीवन शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे आहे आणि हे अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे असे ते म्हणतात. मुकुंदराव पाटील यांच्या मते "शेतकरी आपल्या जमिनीत काहीही उत्पन्न येत नाही तरीही अशाप्रकारे निष्फळ वेळ आणि खर्च वाया घालवितो आणि कंगाल होतो. म्हणजे तो अज्ञानातच जगत आहे. आणि हे अज्ञान दूर होण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक आहे. [३४] असे त्यांना वाटते. शेती सुधारण्यासाठी मुकुंदरावांनी काही उपाय सुचविलेले दिसून येतात.

शेतकऱ्याने आपली शेती सुधारण्यासाठी जुन्या पारंपरिक हत्याराचा वापर करु नये. कारण जुन्या हत्याराचा परिणाम असा होतो की, उत्पादन कमी प्राप्त होते. आणि वेळ जास्तीत जास्त खर्च होतो. यासाठी नवनवीन हत्याराचा जास्तीत जास्त वापर करावा. जेणे करुन शेती उत्पादनात वाढ होईल. "शेतकऱ्याची शेती सुधारण्यासाठी शेती प्रदर्शन आवश्यक आहेत. याशिवाय शेती संबंधी पुस्तकांचे वाटप शेतकऱ्यापर्यंत करावे आणि ग्रामीण पातळीवर शेतकऱ्यांचे प्रदर्शने आणि

पुस्तकाच्या माध्यमातून अज्ञान दूर करावे असे मुकुंदराव पाटील म्हणतात. शेतकऱ्यांसाठी नवीन बी-बियाणांची व्यवस्था सरकार मार्फत करण्याची आणि शेतीची शाळा महाविद्यालयामधून शेती प्रश्नांची माहिती द्यावी. जणेकरुन शेतकऱ्यांचे अज्ञान दूर होईल आणि शेतकरी सुखी होईल."[३५] वरील उपायाव्दारे शेतकऱ्याचे शोषण कमी होण्यास आणि अज्ञान दूर होण्यास मदत होऊ शकते. हे मुकुंदरावांनी 'दीनमित्र' मधून सांगितले आहे. तसेच मुकुंदराव पाटील यांनी शेतकरी ऋणमुक्त होण्यासाठी काही उपाययोजना सुचविलेल्या दिसून येतात. "शेतकऱ्यांनी आपले जेवढे उत्पन्न आहे त्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करु नये. कारण आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च श्राध्द, लग्न, दिवस यासाठी खर्च करतो आणि रुढी परंपरांचे जतन करतो. या रुढी परंपराच नष्ट व्हाव्यात अशी अपेक्षा मुकुंदरावांना आहे. निष्फळ खर्चावर मर्यादा आणून तोच खर्च जर विहिरीसाठी पाणी अडविण्यासाठी वृक्षारोपनासाठी खर्च केला तर त्याचा फायदा होऊन उत्पादनात वाढ होऊ शकते, असे त्यांना वाटते. मुकुंदरावांनी केवळ उत्पादन साधणात बदल होऊन महत्त्वाचे नाही तर केवळ शेतीवर शेतकऱ्यांनी अवलंबून न राहता जोडधंद्याची देखील कास धरावी जेणेकरुन शेतकऱ्याच्या स्थितीत सुधारणा होईल."[३६] मुकुंदराव पाटील यांना शेतकऱ्याचे शोषण होते याची जाणीव असल्याचे कारण म्हणजे लहानपणापासून सत्यशोधक विचारांचा त्यांच्यावरील संस्कार आणि ते स्वतः शेतकरी असल्याचे वास्तव मुकुंदराव पाटलांची साधी राहणी उच्च विचार सरणी होती. मुकुंदराव पाटील यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्ये म्हणजे गावातील पाटील, शेतकरी आणि त्यांचे होणारे शोषण याला केंद्रस्थानी धरुन केले आहे.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "आपली शेतकी चांगली भरभराटीस येण्यास आपण काही तरी खटपट केलीच पाहिजे. कोणत्याही कामात वेळ आणि खर्च ही वांचतील याकडे लक्ष देणे किंवा तशा तऱ्हेच्या आपल्या शेतीत काही सुधारणा करणे हीच काय ती धंदा भरभराटीस आणण्याची गुरुकिल्ली आहे. ही गुरुकिल्ली प्राप्त करुन घेण्यास कोणाला सव्वा रुपया किंवा नारळ दक्षिणा द्यावी लागत नाही. मात्र आपण आपल्या अंगातला आळस, गळ्यातील वडलांच्या चालींचे ओढणे, पायांतील रुढीचा खोडा या असल्या आडकाठ्या बाजूस सारल्या पाहिजेत. सरकारने आपणा लोकांची शेतीची सुधारणा व्हावी म्हणून अलिकडे पुष्कळ प्रयत्न चालविले आहेत. लाखो रुपये खर्चून मोठमोठ्या शहरी कॉलेजे स्थापन केली आहेत. त्यावर शेतकी संबंधाची ज्यास चांगली माहिती

आहे  अशा मनुष्यास पगारी नोकर ठेवून, शेतकऱ्यांस शेतीचे ज्ञान पाजण्याच्या जणो जागजागी पाणपोया घातल्या आहेत!"[३७] मुकुंदराव पाटील यांनी शेतकी संबंधात होता होईल तितकी अधिक माहिती मिळविणे व या बाबींकडे अधिकाधिक लक्ष घालण्यास सांगितलेले दिसून येते. आजही शेतकरी म्हणावे तशा आधुनिक पध्दतीचा उपयोग करतांना दिसत नाही.आज शेतक-यांनी आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे बनवलेल्या अवजारांच्या सहाय्याने शेती करावी आज संशोधनाव्दारे कमी कालावधीत जास्त उत्पादन देणारी बी - बियाणे बाजारात उपलब्ध आहेत. त्याचा शेतक-यांनी वापर करावा. तसेच चांगल्या दर्जाचे खते वापरावीत ज्याव्दारे शेतक-यांना भरपूर उत्पादन मिळेल. व शेतक-यांना कर्ज घेण्याची वेळ येणार नाही.

आजही शेतक-यांची बिकट आर्थिक परिस्थिती आपणास पहावायास मिळते. सरकारने आज ठिबक सिंचनसारखी सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यामुळे पाण्याची बचत होवून शेतक-यांना कष्टही कमी लागतात. विशेष म्हणजे त्यासाठी सरकार शेतक-यांना अनुदानही देते. तरीही ग्रामीण भागातील शेतकरी या सुविधांचा वापर आजही करतांना दिसत नाही.  मुकुंदराव पाटील यांच्या  मते, " पावसाने दोन दिवस ताण देताच शेतकऱ्याचे डोळे कसे पांढरे होतात, याचा अनुभव पुष्कळ जिल्ह्यांना आला आहे. त्याचप्रमाणे पाऊस थोडा अधिक पडून पिके बुडाली म्हणजे शेतकऱ्यांचा प्राण, पाण्यात बुडणाऱ्या माणसाप्रमाणे कसा होतो याचाही अनुभव आलेला आहे. उत्पन्नास थोडा जरी धक्का बसला तरी शेतकरी कोलमडून पडतो. हे निर्विवाद सिध्द   झाले आहे. म्हणजे शेतकरी अशक्त आणि फिकट झालेल्या माणसाप्रमाणे रोगी बनला आहे. थोडा पाऊस जास्त झाला की त्याला सर्दी होते आणि थोडे ऊन तापले की तो सुकून जातो. याचे कारण शेतकऱ्यांच्या अंगात उत्साह कोठून असणार ? आणि उत्साह नसल्यामुळे शेताची मशागत तरी कशी होणार ? अर्थातच शेतकऱ्याची दैना चालूच आहे. देशातल्या सडका सुधारल्या, गटारे सुधारली, संडासदेखील सुधारले पण शेतकरी मात्र जसेचे तसे दीनदुबळेच राहिले. ते काही केल्या सुधरत नाही."[३८] शेतक-यांची आर्थिक परिस्थिती  वर्षानूवर्षे सारखीच असते. या परिस्थितीत सुधारणा होणे गरजेचे आहे. शहरी आणि ग्रामीण भागात  झपाटयाने विकास होत आहे. परंतु शेतक-यांचा विकास झालेला दिसून येत नाही. पाऊस पडण्यामध्ये किंवा हवामानामध्ये थोडा जरी बदल झाला तरी शेतकरी अस्वस्थ होतो. या

साठी शेतक-यांनी आपली आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे शेती करणे आवश्यक असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

शेतकऱ्यांनी ऋणमुक्त व्हावे म्हणून सरकार कर्ज देणाऱ्या संस्था वेगवेगळ्या क्लुप्त्या काढीत आहे. पण अशाप्रकारे कर्ज देणाऱ्या प्रकारात उलटपालट केल्याने शेतकरी ऋणमुक्त होणार नाहीत. कर्ज कोणत्याही प्रकारे दिले तरी ते कर्जच. त्याला येणारे व्याजाचे काटे दोन वर्षांनी आले काय किंवा दहा वर्षांनी आले काय ते काटेच. त्यांच्या बोचणाऱ्या प्रसंगात फार तर अंतर पडेल. तेंव्हा हे कर्जाचे काटे शेतकऱ्यांना बोचणार नाही असा त्यांच्या अंगी उत्पादनाचा टणकपणा आणला तरच शेतकरी ऋणमुक्त होऊ शकतील. असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात व सरकारने शेतक-यांसाठी करावयाच्या उपाययोजनाबद्दल सांगतात की, “हा टणकपणा शेतकऱ्यांच्या अंगी येण्यास शेतकऱ्यांच्या मालाचा खप चांगल्याप्रकारे झाला पाहिजे. आणि व्यवहारातील खाचखळगे त्यांना समजतील इतके तरी त्यांना प्राथमिक शिक्षण सक्तीने मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याची गुरुकिल्ली सर्वस्वी सरकारच्या हाती आहे. सरकारी तत्त्वाने वागणाऱ्या शेतकऱ्यांनी पिकविलेला माल आणि बाजारपेठ यांची नाळ बसली पाहिजे. शेतकऱ्याा माल पिकविताना जो खर्च येतो तो फिटून त्यास काही नफा मिळेल असे आयात निर्यातीचे धोरण सरकारने ठरविल्याशिवाय हिंदी शेतकरी सुधारणार नाहीत. शेतक-यांनी संघशक्तीने भांडवल जमवून यांत्रिक साहाय्याने शेती केल्यावाचून शेतकरी सुधारणार नाहीत. पण ते अफाट लोकसंख्येच्या हिंदुस्थानास उपयुक्त ठरणार नाही. संघशक्तीने मोठे भांडवल जमते आणि त्याच्या बळावर उत्पन्नही मोठ्या प्रमाणात मिळते. पण ह्या यांत्रिक योजनेमुळे मनुष्याच्या अंगातील शक्ती व्यर्थ घालविली जाते. बेकार लोकांची पैदास अधिक वाढते. त्यामुळे संप, अत्याचार, दरवडे, खून अशा कृत्यांची पैदास जोरात होते.”[३९]

शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याचा प्रश्न केवळ कर्ज देण्याचा फेरबदलाने सुटणारा नसून त्यासाठी सरकारने रिझर्व बँकेच्या मदतीनेच हा प्रश्न सोडविला पाहिजे असे मुकुंदराव पाटील यांना वाटते. प्रत्येक शेतकऱ्याजवळ भांडवल व बळ पाहिजे. आणि त्याच्या मालास योग्य किंमत येईल अशी सरकारी बाजारपेठेची व्यवस्था पाहिजे. तरच शेतकरी ऋणमुक्त होईल. असा विश्वास मुकुंदराव पाटील यांना वाटतो. शंभर वर्षापूर्वीची परिस्थिती आणि आजची परिस्थिती फारशी

बदललेली दिसत नाही. आजही तेच प्रश्न शेतक-यांसमोर उभे आहेत. त्यासाठी मुकुंदराव पाटलांनी सुचविलेल्या उपाय योजना आजही निश्चितच प्रेरणादायी ठरतांना दिसतात.

## ६.६ शेतकऱ्यांसाठी सरकारी व्यवस्था

शेतकऱ्यांसाठी सरकारी व्यवस्था कशी असावी या संदर्भात मुकुंदराव पाटील, असे सांगतात की, "शेतकऱ्यांची अधिक धान्य पदार्थ पिकवावे म्हणून सरकारचे प्रयत्न इंग्रजी अंमलापासून चालू आहेत. पण त्यास म्हणावे तसे यश आलेले नाही. याची अनेक कारणे असली तरी या बाबींत खेड्यातील शेतकऱ्यांच्या खऱ्या अडचणी काय आहेत हे मर्म जाणणाऱ्या लोकांची मोठी उणीव अधिकारी वर्गात असणे हे मुख्य कारण आहे. धान्य अधिक पिकावे अशी प्रत्येक शेतकऱ्याची इच्छा असतेच. अधिक धान्य पिकविल्यास अधिक पैसा मिळेल हेही त्यास समजत असते पण अधिक पीक आणि अधिक पैसा ही मात्र सहसा शेतकऱ्यांच्या पदरी पडत नाहीत. शेतकऱ्यांत आळसी, व्यसनी निघतील पण असे फारच थोडे."[४०] अशा शेतकऱ्यांची गोष्ट सोडली तरी पण जे शेतांत बैलासह जनावराप्रमाणे रात्रंदिवस राबतात त्यांच्याही पदरी अधिक धान्य पडताना दिसत नाही. बी-बियाणे पाऊसपाणी, खतमाती यांची योग्य वेळी प्राप्ती होणे आवश्यक असते. शेतकऱ्यांची ही गरज यथासांग पुरविली जात नाही. सरकारी योजना आखूड आणि शेतकरी समाज मोठा, यामुळे याबाबतीत मोठी दरी निर्माण होताना दिसत आहे. पण जे शेतकरी कष्ट करुन, कर्ज काढून अधिक पीक काढतात त्यांची काळजी घेणारी अशी एखादी सरकारी योजना असावी असे मुकुंदराव पाटील यांना वाटते हे यावरुन स्पष्टपणे दिसून येते.

मुकुंदराव पाटील यांच्या मते " मागील वर्षी शेतकऱ्यांनी शेतावर पुष्कळसा गूळ केला. भाव घसरले तरी एक वेळ चालेल पण मालाचा उठाव न झाल्यामुळे शेतकरी पेचांत सापडले. मजूरीचे दर वाढले, भावाची घट झाली, माल तुंबून पडला, याचा परिणाम असा झाला की, कर्जपाणी काढून लावलेला ऊस शेतकऱ्यांना शेतातच पेटवून द्यावा लागला आणि तयार झालेल्या गुळाचा उठाव न झाल्यामुळे तोही पडून राहिला. पुष्कळसा गूळ गोदामाच्या अभावी पावसाळी वाऱ्याने नासून गेला. म्हणजे ऊस लावून तो तयार झाल्यावर त्याचा गूळ महाग मजूरीने करवून शेवटी त्याचा नाशच झाला. घरादारांत त्याची घाण सुटली, मुंग्या, मुंगळे यांची पीडा वाढली, अशाप्रकारे तो माल उकीरड्यावर फेकण्यासाठी पुनः कष्ट करावे लागले !"[४१] शेतक-यांच्या शेतीमालाला निश्चित

हमीभाव मिळाला पाहिजे कारण शेतक-यांने अहोरात्र शेतात काबाडकष्ट करून शेतात निघणा-या मालाला मातीमोल भाव मिळाला तर शेतकरी पूर्णतः मोडून पडतो. त्याच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर तसाच वाढत जातो. यातून शेतक-यांना वाचवण्यासाठी सरकारने शेतक-यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळेल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असा सल्ला मुकुंदराव पाटील देतांना दिसतात. आजही आपल्याकडे तिच परिस्थिती पाहावयास मिळते. शेतकरी माल पिकेपर्यंत त्यामालाला भाव असतो. परंतु तो बाजारात विकण्यासाठी आणला की लगेच भाव कमी होतो. हा शेतक-यांवर होणारा अन्याय आजही चालू आहे. हा अन्याय दूर करण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी सुचविलेल्या उपाययोजना प्रेरणादायी ठरतांना दिसतात.

शेतकऱ्यांसाठी सरकारी व्यवस्था कशी असावी याविषयी मुकुंदराव पाटील म्हणतात की, “अधिक धान्य पिकविण्याबाबतही सरकारने रुढ धोरणाहून काही विशेष योजना आखली पाहिजे. सध्या बी-बियाणे देणे, खत पुरविणे अशी कामे सरकारमार्फत केली जातात. पण शेतकऱ्यांची खरी अडचण पैशासंबंधीची असते. मालाच्या तारणावर शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या सोसायट्या काही ठिकाणी आहेत पण त्या अपुऱ्या आणि बिनबोभाट काम करणाऱ्या तर फार थोड्या ! सावकार कायदा, कूळ कायदा यामुळे शेतकऱ्यांचे हीत झाल्यासारखे वाटते पण खरा प्रकार उलटच आढळतो. याबाबतीत शेतकऱ्यांच्या साक्षी घेतल्यास खरे काय ते कळून येईल. शेतकऱ्यांनी धान्य पिकविल्याबरोबर ते बाजारात नेण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो कारण पैसा मिळविण्याचे त्यास दुसरे साधनच नसते. हे धान्य सेल-परचेस सोसायट्यांत ठेवावे आणि त्याचे तारणावर कर्ज काढावे, तर तो व्यवहार चोख करणाऱ्या संस्था फारच थोड्या. सहकारी सोसायट्यांतून मिळणारे कर्ज जमिनीच्या तारणावर आणि ठरीव संस्कारानंतर मिळत असल्यामुळे शेतक-यांना ते वेळेवर मिळू शकत नाही. आता तर सरकारकडून कर्ज देणे बंद झाले. अशा पेचांत सापडलेला शेतकरी अधिक धान्य उत्पन्न करणार कसा ? आज सामुदायिक शेती करण्यास सरकारचीही तयारी नाही. तेव्हा अधिक धान्य पिकविणे, धान्य टंचाई दूर करणे आणि शेतकऱ्यांना सुखी करणे ही सरकारची कर्तव्ये कशी पार पाडायची याबद्दल आज तरी सरकारने तयार केलेली कसलीही योजना आढळत नाही. [४२] तेव्हा शेतकऱ्याला वेळेवर पुरेसे कर्ज मिळण्यासाठी सरकारने पहिले काम केले पाहिजे की, मिळालेले कर्ज शेतकरी इतर कामी खर्च करतात परंतु असा प्रसंग त्यांच्यावर का येतो याचीही सरकारने चौकशी केली पाहिजे असे मुकुंदराव पाटील यांना वाटते.

शेतक-यांची परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने करावयाच्या उपाययोजनामध्ये दुसरे महत्त्वाचे कार्य काय केली पाहिजे हे सांगताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, " शेतकऱ्यांच्या मालाचा उठाव अथवा विक्री झाली पाहिजे. शेतमालाच्या रुपात शेतसारा द्यावा सरकारला ही योजना व्यवहारीकदृष्ट्या त्रासाची वाटेल, पण शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पाहिल्यास ती आमलांत आणताना सरकारला शेतकऱ्यांचे हित सहज साधता येईल. धान्याच्या भावाच्या प्रमाणात कापड, लोखंड वगैरे शेतकऱ्यांस लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचे भाव ठाम करावे लागतील. असे केले तरच, धान्याच्या रुपांत शेतसारा वसूल करणे योग्य होईल. पण सरकार या भानगडीत पडणार नाही. सरकार त्याकडे कानाडोळा करील."[४२] असे मुकुंदराव पाटील यांना वाटत होते.

शेतक-यांसाठी सरकारने करावयाची तिसरी योजना सांगताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, "शक्य तितके पाटबंधारे आणि वाहतूकीसाठी रस्ते हे तयार केले पाहिजेत. मजूरासाठी म्हणून मोठाल्या गिरणीवाल्यांच्या शहरांत, सरकारी चाळी बांधल्या जात आहेत. पण खेड्यांनी शेतकऱ्यांना चांगली घरे मिळत नाहीत. तेव्हा शेतकऱ्यांसाठी थोडक्यात घरे बांधून देणारी योजना सरकारने हाती घेणे आवश्यक आहे. आज शेतकरी सामान्यतः धान्य, पैसा, कपडा, घर यांनी उघडा पडला आहे. सरकारला याबाबतीत योग्य मार्गदर्शन करणारे, आणि सरकारला योग्य ती मदत करणारे पुष्कळ लोक पुढे येतील पण सरकारने त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे."[४३] यासाठी पक्षांकित राजकारण सुटण्याची गरज असल्याचे मुकुंदराव पाटलांना वाटते. सरकारने शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी सुचवलेल्या उपाययोजना खरोखरच अतिशय स्तुत्य आहे. सरकारने या योजना राबवल्या तर शेतक-यांची आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल परंतु आजही सरकारी धोरण शेतक-याबाबत उदासिन असल्याचे दिसून येते.

### ६.७ दुष्काळ प्रश्नाविषयी विचार

इ.स. १९४५-४६ च्या सुमाराने भारतात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. तत्कालीन काळामध्ये मुकुंदराव पाटील दुष्काळ प्रश्नाविषयी विचार मांडत असताना ते म्हणतात की, "सबंध हिंदुस्थानात दुष्काळ पडणार असे सरकारी मुखांतून बाहेर पडत आहे ! सबंध हिंदुस्थानात या वर्षी पाऊस पडला नाही असे मुळीच नाही. पुष्कळ प्रांतातून तो प्रमाणाबाहेर पडल्याच्या बातम्या प्रसिध्द

झाल्या होत्या. तसेच काही भागात पाऊस योग्य प्रमाणात पडून पिकांची स्थिती समाधानकारक आहे असेही प्रसिध्द झाले होते. काही भागात मात्र पावसाच्या उणीवेमुळे पिके गेली असे ऐकू आले होते. म्हणजे संबंध हिंदुस्थानात धान्य मुळीच पिकले नाही असे म्हणता येत नाही. महाराष्ट्रातील काही जिल्हयात तर दुष्काळी म्हणून काही गावेच निवडली गेली आहेत. मग हिंदुस्थानात दुष्काळ पडणार या सरकारी भविष्याचा अर्थ काय हे समजत नाही."[४५] सरकार आज दुष्काळ पडणार असे जाहीर करत आहे या दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारने या पूर्वी उपाययोजना अमलात आणणे गरजेचे होते दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यावर त्यावर उपाययोजना करणे चुकीचे आहे असे मुकुंदराव पाटलांना वाटते. जास्त धान्य खर्च करायचे नाही अशी सावधगिरी ठेवायची म्हणावे तर रेशनिंगमुळे लोकांजवळ धान्यच कुठे राहिले आहे ? बरे मिळतो तो शिधा जपून खावा असे म्हणावे तर, ते शिधाच मुळी पुरेसा नसतो. मग जपून खाण्याचा प्रश्नच उत्पन्न होतो कुठे ? मग दुष्काळाचा हा गाजावाजा होण्याचे कारण काय ? असा प्रश्न मुकुंदराव पाटील यांना पडलेला होता. त्यांच्या मते, सरकारी दुकानांत पुरेसा धान्यासाठा आहे की, नाही हे लोकांनी पहावे आणि त्या बाबतीत सरकारला सावध करावे असाच असला पाहिजे. यावरुन सरकार भारतीय लोकांची काळजी किती तरी घेत आहे हे वेगळे सांगावयास नको. पण भारतीय लोक अजून समंजस अथवा जागृत झालेले नसल्यामुळे सरकारी अमिषाचा त्यांना उपयोग करुन घेता येत नाही. सरकारनेच या बाबतीत अधिक दक्ष आणि दयाळू होऊन पुढील गोष्टींचा खुलासा करावा-

१) हिंदुस्थानात एकंदर धान्य किती पैदा होईल ?

२) हे सर्व धान्य येथेच राहील की यांतला काही भाग परदेशात पाठविला जाईल.

३) साम्राज्यांतील इतर देशांतून किती धान्य गोळा करण्यात आले ?

४) बाहेरुन कोठून किती धान्य हिंदुस्थानास पुरविले जाईल ? [४६]

या चार गोष्टींचा खुलासा झाल्यास, दुष्काळ पडण्याच्या बातमीमुळे भयभीत झालेल्या लोकांस पुष्कळ समाधान वाटेल. असे मुकुंदरावांना वाटते. पण हा भयंकर दुष्काळ टाळण्यास धान्याचा साठा करणे याखेरीज आज तरी दुसरा शास्त्रीय तोडगा उपलब्ध झालेला नाही. तेव्हा देशातले धान्य बाहेर न जाईल आणि बाहेरचे शक्य तितके देशांत आणले जाईल या दोन गोष्टी करणे सरकारलाच शक्य आहे. असा विश्वास मुकुंदराव पाटलांना वाटतो. अर्थात या भावी भयंकर दुष्काळांत लोक मरण

पावल्याचा दोष सरकारवर बसू नये असा प्रयत्न पुढाऱ्यांनी करीत राहिले पाहिजे असेही मुकुंदराव पाटील यांना वाटत होते हे यावरून स्पष्ट होते.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "शेतीचा धंदा पावसावर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्यास मेहनतीच्या मानाने उत्पन्न फारच थोडे होते त्यातच दुष्काळ यांचे हल्ले वारंवार आल्यावर शेतकऱ्याची सात सात पिढ्यांची पाळेमुळे पार उपटून जातात ! असले वाईट प्रसंग शेतकऱ्यावर आले तर त्यातून त्यांचा बचाव व्हावा म्हणून सरकार काही लाखांची तरतूद करणार असल्याचे समजते. सरकारची योजना चांगली आहे. परंतु दुष्काळ ठरविण्याच्या पध्दतीत व सारा वसूल करण्याच्या पध्दतीत फरक केल्याशिवाय सरकारच्या योजनेचा फायदा शेतकऱ्यांच्या अंगी मुरणार नाही."[४७] असा विश्वास मुकुंदराव पाटलांना वाटत होता. पिकांची आणेवारी ठरविण्यासंबंधी मुकुंदराव पाटील म्हणतात की, पिकांची आणेवारी ठरविण्याच्या पध्दतीत फरक करावा. यासंबंधाने सरकार कमिटीमार्फत चौकशी करणार आहे. सरकार चौकशी करुन जे काही ठरवायचे ते ठरवेलच. तथापि यासंबंधात शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांनी आपापली मते उघडपणे प्रसिध्द करणे आवश्यक आहे. पिकांची आणेवारी ठरविताना पंचानुमते ठरविण्यात यावी. [४८] येथे शेतक-यांच्या प्रतिनिधींनी शेतक-यांना सरकारी योजना संबंधी मार्गदर्शन करावे तसेच दुष्काळी परिस्थितीत सरकारने शेतक-यांना शेतसारा माफ करावा यासंबंधी शेतक-यांच्या प्रतिनिधींनी सरकारकडे आग्रह धरणे आवश्यक असल्याचे मुकुंदराव पाटील यांना वाटते.

सरकारने शेतक-यांसाठी जंगलखात्याचे नियम शिथील करावे. गावालगत असणारे जंगल गावातील ग्रामपंचायतीकडे दयावे. जेणेकरुन शेतक-यांना शेतीसाठी लागणा-या औजारांसाठी या जंगलातील लाकडांचा उपयोग होईल. यासाठी मुकुंदराव पाटील यांनी जंगलखात्यासंबंधीही काही सूचना केलेल्या होत्या त्या संदर्भात ते असे म्हणतात की, "जंगलखात्याचे नियमही सौम्य केले पाहिजेत. शेतकऱ्यांची पीके खाणारी व शेतकऱ्यास शत्रूप्रमाणे त्रास देणारी जनावरे, जंगलातील गवत फक्कड खातात. व या गवताचा उद्योग शेतकऱ्यास महाग पडतो. झाडाच्या संरक्षणाचे नियम ठेवून जंगलातील गवत चारा शेतकऱ्यास अगदी थोडक्यात मिळणे जरुरीचे आहे. शेतीच्या अवजारास लागणारे लाकूडही जंगलातून सवलतीने मिळाले पाहिजे. अर्थात हे खातेही ग्रामपंचायतीच्या हाती देणे आवश्यक आहे." [४९] तसेच दुष्काळामध्ये सरकार शेतकऱ्यांना काही कामे

देतात. त्या कामासंदर्भात काही महत्त्वाच्या सूचना सरकारला देताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, दुष्काळ पडल्यावर सरकार शेतकऱ्यांसाठी दुष्काळी कामे काढीत असते. पण ती बहुतेक एकाच साच्याची असतात. बैलगाडीच्या सडका, रेल्वेरस्ता, पाटबंधारे वगैरे होत. ही कामे उपयुक्त असतात यात शंका नाही. पण प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या उपयुक्त पडतील अशी कामे दुष्काळात होणे जरुरीची आहेत. अशा प्रकारच्या कामात पुढील गोष्टींचा समावेश करता यईल.

१. गावांतील रस्तेदुरुस्ती

२. शिवारातील रस्तेदुरुस्ती

३. गावापुरते तळे बांधणे.

४. गावांतील निवडुंग वगैरे घाण काढून गाव स्वच्छ करणे. [५०]

ही असली कामे गावोगाव सुरु झाल्यास शेतकऱ्यांना घरेदारे सोडून दूरवर जाण्याचा प्रसंग येणार नाही. गाव स्वच्छ होतील, हजारो लोक एकत्र जमल्याने आरोग्य नीती यांना जो धक्का बसतो तोही बसणार नाही. शिवाय उगाच दहा दहा वर्षे पडून राहणारे रेल्वेचे भराव व त्यात गुंतणारा पैसा, शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उपयोगासाठी गुंतला जाईल. ही कामे ग्रामपंचायतीस करता येण्यासारखी आहेत किंवा लोकल बोर्डासही ही कामे हाती घेण्यासारखी आहेत. असे मुकुंदराव पाटलांना वाटत होते.

सरकारने दुष्काळी परिस्थितीत सर्वसामान्य जनतेची उपजिविका चालवण्यासाठी जी दुष्काळी कामे सुरु केली होती या कामाबद्दल मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेले विचार अतिशय महत्त्वाचे वाटतात. त्यांच्यामते सरकारने ही दुष्काळी कामे प्रत्येक गावात ग्रामपंचायती मार्फत गावाच्या विकासाच्या दृष्टीने राबवाव्यात जेणेकरून सामान्य जनतेला आपल्या उपजिविकेसाठी स्थलांतर करण्याची आवश्यकता पडणार नाही व शेतक-यांना या योजनांचा फायदा होईल हे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते. शेतक-यांच्या हिताचा किती विचार ते तळमळीने करीत होते हे यावरून स्पष्ट होते. आज मात्र अशा तळमळीने विचार करणारा राजकीय नेता अपवादाने सापडतो.

## ६.८ शेतकरी आणि कर्ज

शेतकऱ्यांच्या कर्ज प्रश्नाविषयी आपले मत मांडताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, “सर्व ठिकाणचे शेतकरी अलिकडे कर्जबाजारी झाले आहेत. धान्याच्या वाढत्या भावातही शेतकऱ्यांना कर्ज

झाले, मग आता पडत्याभावात ते आणखी वाढले तर त्यात नवल कसले ? सिंध प्रांत वगळून मुंबई इलाख्यातील शेतकऱ्यांवर ५० ते ६० कोटींचे कर्ज आहे. आणि ते हळूहळू वाढतच आहेत. हे कर्ज का वाढते याचा विचार केला तर त्याचे तीन भाग पडतात, प्रापंचिक खर्च, धार्मिक खर्च आणि शेतीविषयक खर्च. पूर्वपरंपरा, चालीरिती याची पकड सुशिक्षितांच्या मनावरची लवकर निघत नाही तर अशिक्षित शेतकऱ्यांची मने रुढीने जखडली जावी यात काहीच नवल नाही. प्रपंचाचा खर्च आवश्यकच असतो. पण तो पुष्कळ वेळा वाजवीपेक्षा पुष्कळ जादा असा असतो."[५१] येथे मुकुंदराव पाटील शेतक-यांना ते जपत असलेल्या सामाजिक, धार्मिक, रुढी परंपरा याबद्दल दोष देतात. कारण शेतकरी कर्ज घेवून सण उत्सव साजरा करतो व यामध्ये वाजवीपेक्षा जास्त पैसा खर्च करतो. कर्ज घेवून सण साजरा करणे चूकीचे असल्याचे मुकुंदराव पाटील सांगतात. जोपर्यंत शेतकरी आपल्या रुढी परंपरा सोडून आधुनिक पध्दतीने शेती करत नाही तोपर्यंत शेतकरी हा नेहमी कर्जाच्या विळख्यातच आडकलेला आपणास दिसून येईल. शेतक-याच्या मनातील अंधश्रध्देच्या बुडाशी पूर्वापार चालत आलेल्या सामाजिक आणि धार्मिक समजूतीच असतात. संकटे दूर होण्यासाठी किंवा स्वर्गात सुख मिळण्यासाठी अथवा लोकांनी नावे ठेवू नये म्हणून शेतकरी लोक शेकडा तीस टक्के व्यर्थ खर्च करतात. इतकी काळजी घेऊन देखील बिचाऱ्याच्या मागचे दु:ख दारिद्रय मिटले नाही, उलट त्याची वाढ अधिकच झाली आहे.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "पुष्कळ पतपेढ्यांतील शिष्टमंडळाने लबाड्या केल्या, वसूलाच्या बाबतीत हयगय केली, मेंबरांनी खर्च बेसुमार केला, पीके बरोबर आली नाहीत आणि भाव पडले यामुळे कर्ज फेडणे अशक्य झाले. व्याज वाढीला कायद्याने धरबंधन नसल्यामुळे दामदुपट्टीवर व्याजाचा बोजा गेला. एकंदरीत सोसायटींचे कर्ज थोड्या व्याजाचे असून ते शेतकऱ्यांना फेडता आले नाहीत. आजही सोसायट्यांची स्थिती चांगली नाही. यापूर्वीही सोसायट्यांची स्थिती समाधानकारक नव्हती, याची मुख्य दोन कारणे असावीत, शेतकऱ्यांच्या वाढलेल्या गरजा आणि त्यांच्यात उदय पावलेला अप्रामाणिकपणा पतपेढीचे कर्ज मंजूर करणे आणि ते वसूल करणे यासंबंधाने पंचांना पुष्कळ स्वातंत्र्य मिळालेले असते. त्याचा उपयोग ते प्रामाणिकपणे करीत नाही. यामुळे कर्ज वसूल होण्याच्या बाबतीत लबाड्या होतात."[५२] शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करणे आज जितके आवश्यक

आहे तितकेच किंबहूना त्यापेक्षा अधिक शेतकऱ्यांना अज्ञानमुक्त करणे आवश्यक असल्याचे मुकुंदराव पाटील यांना वाटते.

शेतकऱ्यांच्या समजूती बदलल्याशिवाय त्यांच्या खर्चास आळा बसणार नाही. यासाठी सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या धड्याची क्रमिक पुस्तके तयार झाली पाहिजेत. शक्य तितका वाद टाळून सामाजिक आणि धार्मिक वेडांचा फोलपणा स्पष्ट केला पाहिजे. हे काम चांगले उपदेशक नेमूणच केले पाहिजे. त्याखेरीज शेतकऱ्यांची सुधारणा मुळापासून होणार नाही. अज्ञानी शेतकऱ्याच्या हातात नुसता पैसा दिल्याने शेतकरी सुखी होणार नाहीत. उलट अधिक दु:खी होण्याचा संभव आहे. तेव्हा पैशाबरोबर ज्ञानही देण्याची व्यवस्था झाली पाहिजे आणि ही जबाबदारी सरकारवरच येऊन पडते. शेतक-यांना कर्जमुक्त करण्यासाठी सरकार जे जे प्रयत्न करील त्याला जोडूनच शेतकऱ्यांना अज्ञानमुक्त करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. असाही सल्ला ते सरकारला देतात.

सरकारने शेतक-यांसाठी काही नवीन उपाययोजना अमलात आणावयास पाहिजेत. याविषयी मुकुंदराव पाटील म्हणतात की, "नवीन राजकीय घटनेमुळे हिंदी लोकांच्या हातात पुष्कळ सत्ता आली आहे. दारुबंदी, सक्तीचे शिक्षण इत्यादी प्रश्न हाती घेऊन लोकमान्य टिळकांनी शेतकऱ्यासंबंधाने थोडे फार कार्य केले आहे. अर्थात शेतकऱ्यांना मुद्याम सुज्ञ करण्यासाठी एखादा कायदा अथवा कायदेशिर एखादी योजना सरकारने तयार केली पाहिजे. म्हणजे शेतकऱ्यांना सुधारण्यासाठी सरकारने तीन योजना आणल्या पाहिजेत. ज्ञानवाढविणारी योजना, धन वाढविणारी योजना, आणि ऋण फेडणारी योजना."[५३] सरकारच्या मदतीवाचून या योजना चालू होणे शक्य नाही असा विश्वास मुकुंदराव पाटील यांना वाटतो. शिक्षणमंत्री, अर्थमंत्री आणि उद्योगमंत्री अशा तीन दिवाणांची कर्तव्ये म्हणजे ही योजनात्रयी आहे.

ज्ञान वाढविण्यासाठी मिशनरी पध्दतीप्रमाणे चांगले कसलेले उपदेशक, सोप्या भाषेत लिहिलेली लहान मोठी पुस्तके, मोठाले बाजार, यात्रा, तीर्थक्षेत्रे, लग्न समारंभ अशा प्रसंगांचा उपयोग करुन घेणे. धन वाढविण्यासाठी ग्रामोद्योगासारखी आणि अल्प भांडवलावर चालणारी कामे, उपयुक्त यंत्रे खरेदी करुन ती ठिकठिकाणी ठेवणे. शेताची मशागत करणारी ट्रॅक्टर सारखी यांत्रिक औते तगाईच्या रुपाने भाड्याने पुरविणे, शेतकऱ्यांचा माल सरकारने खरेदी करणे आणि तो पुन:

शेतकऱ्यांना पुरविणे. ही कामे अगदी व्यवस्थित आणि कायद्याच्या आधारावर झाली पाहिजेत असे मुकुंदराव पाटील यांना वाटते असे त्यांच्या विचारावरून दिसून येते.

मुकुंदराव पाटील हे सरकारने शेतक-यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासंदर्भात सरकारला सूचना करताना म्हणतात की, "लांब मुदतीच्या आणि कमी व्याजाच्या कर्ज नोटा काढून सरकारने आपल्या पतीवर त्या सावकारांना देऊन शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा हलका करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकार जामीन राहिल्याने सावकारांना असल्या नोटा घेण्यास भय वाटणार नाही. हे कर्ज सरकारने योग्य टक्क्याने शेतकऱ्यांकडून फेडून घ्यावे. काही प्रांतात हप्त्यांनी कर्ज फेडण्याची योजना आखली आहे. पण उत्पादक धंदे पुरेसे नसल्यामुळे नुसते हप्त्यांची योजना चालू केल्याने शेतकरी ऋणमुक्त होणार नाही. तसेच वरचेवर सूट देऊनही शेतकरी सुधारणार नाही. शेतकऱ्यांच्या अंगात उद्योगाचे नवे रक्त आणल्याशिवाय वरवरच्या तेलपाण्याने त्याची प्रकृती सुधारणार नाही."[५४] येथे मुकुंदराव पाटलांना शेतक-यांवरील कर्ज सरकारने कमी करणे जसे अपेक्षित आहे तसे शेतक-यांना नवीन उदयोगधंदयांचे प्रशिक्षणही सरकारने दयावे ज्यामुळे शेतीला उदयोगधंदयाची जोड मिळेल. शेतक-याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होवून तो कर्जातून मुक्त होईल. असे मुकुंदराव पाटील यांना वाटत होते. आजही शेतक-यांवरील आर्थिक संकटांतून शेतक-यांना वाचविण्यासाठी मुकुंदराव पाटील यांचे विचार आपल्याला मार्गदर्शक ठरतात.

शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी सरकारने गेल्या ५० /६० वर्षापासून कायदे केले पण त्यांचा म्हणावा तसा उपयोग झालेला दिसून येत नाही. शेतकऱ्यांना हलक्या व्याजाने आणि सचोटीच्या व्यवहाराने कर्ज मिळावे म्हणून सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या पतपेढ्या चालू झाल्या. पण यांचाही उपयोग समाधानकारक ठरला नाही. पूर्वीचे सरकार परके असल्यामुळे त्यास शेतकऱ्यांची खरी उन्नती व्हावी अशी इच्छा नव्हती. राज्याच्या उत्पादनात तूट पडू नये या धोरणाने पूर्वीचे सरकार रयतेची काळजी घेत असे. पण आता स्वदेशी सरकार आले आहे. तेव्हा शेतकऱ्याची खरी खुरी सुधारणा करण्यासाठी सरकार अनेक कायदे करताना दिसताहेत. त्यांतच सावकारीस आळा घालणारा कायदा होत आहे. यापुढे सावकारी करणारास सरकारची परवानगी काढावी लागेल. कुळास वेळच्या वेळी हिशोब द्यावे लागतील. व्याज प्रमाणाबाहेर मिळणार नाही इत्यादी कलमे या कायद्यात असल्याचे दिसून येते. शेतक-यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी मुकुंदराव पाटील सरकारने

करावयाच्या उपाययोजना सांगतांना एकीकडे सरकारने शेतक-यांना आर्थिक मदत करणे गरजेचे असल्याचे सांगतात. तसेच पूर्वीचे सरकार परकीय असल्याने त्यांनी शेतक-यांचे सावकारांकडून होणारे शोषण थांबवण्यासाठी सावकारांना प्रतिबंध केला नाही. परंतु आताचे महाराष्ट्र शासन सावकारांनी शेतक-यांचे चालवलेले शोषण थांबवण्यासाठी कायदे अमलात आणत असल्याबद्दल कौतुक करतात. सावकारशाही विरोधात मुकुंदराव पाटील म्हणतात की, "लोकांचा भोळेपणा आणि गरजूपणा यांचा फायदा घेऊन सावकार हे कुळांना पिळीत आले आहेत. यात शंका नाही. सावकारांच्या या निष्ठुरपणामुळे पुष्कळ ठिकाणी चिडलेल्या कुळांनी त्यांचे खून केले आहेत. एकंदरीत सावकारांच्या चाळ्यांना आळा घालणारा कायदा मुंबई सरकार करीत आहेत. कायदा झाला म्हणजे शेतकरी कर्ज मुक्त झाला असे होत नाही, हे सरकार ओळखून आहे. आणि म्हणूनच शेतकऱ्यांना सहकारी संस्थामार्फत कर्ज देण्याची व्यवस्था सरकार करीत आहे. सरकारची ही योजना योग्य आहे. पण सध्या चालू असलेल्या पतपेढ्यांची कर्ज देण्याची पध्दत फारच सदोष आहे."[५५] तसेच मुकुंदराव पाटील यांनी पतपेढ्यांची कर्ज देण्याची पध्दतीतील दोष सांगण्याचा प्रयत्न केलेला होता. त्यांनी या पध्दतीतील एकूण पाच दोष सांगितलेले होते त्या संदर्भात ते म्हणतात की, "या पध्दतीतील पहिला दोष म्हणजे शेतकऱ्यास वेळेवर कर्ज मिळू शकत नाही. कर्ज मागणीचे तक्ते सेक्रेटरी तयार करतो. मग ते युनियन मार्फत बँक इन्स्पेक्टरकडे जातात. तेथून ते सिनियर इन्स्पेक्टरव्दारे मुंबईच्या मुख्य ऑफीसात जातात. तेथून ते पुन्हा मुक्काम करीत करीत परत येतात. या सुखसोहळ्यांत कधी कधी चार चार महिने जातात. इकडे तर शेतकऱ्यास त्याच्या शेतकी कामाची वेळ चुकू नये म्हणून सारखी तळमळ लागलेली असते. अर्थात कर्ज वेळेवर न मिळाल्यास त्यास दुसरीकडून कर्ज काढणे भाग पडते. कर्ज देणारी एक व्यक्ती नसून अनेक असल्यामुळे असा विलंब प्रकार घडणे साहजिकच आहे. कारण प्रत्येकजण आपल्या अधिकाराबरोबर जाऊ शकत नाही. यामुळे क्रमाक्रमाने शिफारशी आणि निरीक्षण होण्यात वेळ जायचाच ! जरी बँक इन्स्पेक्टरला कर्जतक्ते मंजूर होऊन येण्यापूर्वी शेकडा ५०/६० टक्के कर्ज देण्याचा अधिकार असला तरी बाकीचे राहिलेले कर्ज संस्काराच्या चक्रात सापडलेलेच असते. तेही वेळेवर हाती पडणे कठीण होते. यामुळे सोसायटीच्या मेंबराचा हेतू वेळीच पूर्ण न झाल्यामुळे तो असंतुष्ट असतो. दुसरा दोष कर्ज मागणीच्या आकड्यांत कापाकापीचा काही शेतकरी गैरवाजवी कर्ज मागत असतात. पण कर्ज रकमेची कपात नेहमीच योग्य कारणामुळे होते असे नाही. पुष्कळ वेळा अनुमान धपक्यामुळे त्यांत कपात होते. ही

कपातीची पध्दत शेतकऱ्यांना उमगल्यावर तो दोनशे रुपये कर्ज पाहिजे असेल तर पाचशे रुपयांची मागणी करतो. मग त्यावर युनियन, बँक, सिनिअर इन्स्पेक्टर, रजिस्टार वगैरेंच्या मखलाशा होत होत ती रक्कम दोनशे वर येऊन टेकते. तिसरा दोष सोसायट्यांच्या कर्जास व्याजाच्या वाढीची मर्यादा नसते. कर्ज मुद्दल १०० रुपये असेल तर व्याज २०० च्या वरही वसूल होऊन पुन्हा मुद्दल कायमच. चौथा दोष थकबाकीदार झाला म्हणजे त्यास व्याजाचा दर वाढविण्यांत येतो. पण वसूल होत नाही. अशा प्रकारे त्यांचे कर्जास गोठलेले रुप आल्यावर बँक मग शेकडा ५० टक्के सूट देऊन वसूल करते. याचा परिणाम असा होतो की, जे वेळच्या वेळी फेड करीत गेले त्यांच्याकडून अधिक व्याज वसूल झाले आणि जे कर्ज गोठवीत आले त्यांना सूटीचा फायदा मिळाला. पाचवा दोष वसूल हा नेहमीच पैशाच्या रुपात होतो. यामुळे शेतकऱ्यांजवळील धान्य, चारा, बैल वगैरे माल कसा तरी विकून टाकला जातो. याखेरीज किरकोळ दोष आहेत."[५६] येथे सरकारने शेतक-यांना दिलेल्या कर्जामध्ये असलेले दोष मुकुंदराव पाटील यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारने हे दोष दूर करुन शेतक-यांना कर्जाचा पुरवठा केला तर नक्कीच शेतक-यांना याचा फायदा होईल. आजही आपणास या परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाही.

## ६.९ सामुदायिक शेती

मुकुंदराव पाटील यांनी सामुदायिक शेती ही उपाय योजना सन १९४४ च्या आसपास मांडलेली होती. सामुदायिक शेतीचे महत्त्व मुकुंदराव पाटील यांनी सरकारला समजावून सांगितलेले होते आजही सामुदायिक शेतीची आपल्याला आवश्यकता आहे. आज शेतीचे छोटे छोटे तुकडे झाले आहेत. त्या संदर्भात मुकुंदराव पाटील म्हणतात की, "धान्य पिकविण्यासंबंधाने सरकारची नवी योजना तयार झाल्याचे समजते. या योजनेचा रोख एवढाच आहे की, धान्य अधिक पिकावे. आणि तेवढ्यांसाठी तंबाखू, कापूस, ताग, हळद, ऊस अशा पिकांना कायद्याने आळा घालावा ! सरकार असे का करीत आहे अशी चिकित्सा करण्याचे कारण नाही. युध्दाच्या दणक्यामुळे असल्या गोष्टी सरकारला करणे भाग पडते. खरोखर शेतकऱ्यांना अधिकाधिक धान्याचीच गरज आहे. शेतकऱ्यांना घोड्याच्या शर्यतीची मैदाने नको आहेत. शेतकऱ्यांना क्रिकेट ग्राऊंडस् नको आहेत. शेतकऱ्यांना पोहण्याची तळी नको आहेत, तर शेतकऱ्यांना पोटभर अन्न पाहिजे आहे." [५७] सरकार शेतक-यांनी धान्याचे उत्पन्न अधिक घ्यावे यासाठी प्रयत्न करत आहे. आज शेतकरी ऊस, हळद, कापूस,

यासारखी मोबदला देणारी पिके घेत आहे. याप्रमाणात धान्याचे उत्पादन देणारी पिके घेण्यासाठी सरकार शेतक-यांना प्रोत्साहन देत आहे. देशातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता धान्य उत्पादन वाढवणे गरजेचे असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

दुस-या महायुध्दामुळे भारतात निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीमध्ये शेतकरी अडचणीत सापडलेला दिसून येतो. अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी मुकुंदराव पाटील काही उपाययोजना सूचविताना दिसून येतात. या संदर्भात मुकुंदराव पाटील म्हणतात की, "शेतकऱ्यांची पहिली अडचण बैलांची. युध्द परिस्थितीने शेतकऱ्यांचे धान्य तर खाल्लेच पण त्यांचे बैलही खाल्ले. यामुळे आज बाजारात बैलांची किंमत चौपटीने वाढली आहे. धान्य किंमतही तिपटीने वाढली असली तरी लोखंड-कपड्याच्या किंमतीचे ओझे झेपण्याइतकी धान्याची किंमत कणखर बनली नाही. यामुळे धान्याची थोडी वाढलेली किंमत शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यास समर्थ झाल्या नाहीत. हिंदी शेतकऱ्यांची शेती, सर्वस्वी बैलाच्या शक्तीने कसली जात असल्यामुळे बैलांच्या महागाईचा परिणाम शेतीवर फार मोठा झाल्याचे दिसून येईल !"[५८] तेव्हा शेतीची मशागत हा प्रश्न सरकारने प्रथम हाती घेतला पाहिजे. हा प्रश्न हाती घ्यायचा म्हणजे गटपध्दतीने जमिनीची निगा करण्याची योजना आखली पाहिजे.

युध्दाच्या अडचणींमुळे यांत्रिक नांगर सर्वत्र पुरविले जाणे शक्य नाही. तथापि बैल-नांगरांची व्यवस्था करणे पुष्कळसे शक्य आहे. बी-बियाणे केवळ बैलांच्या अभावी पडीत आहेत. त्यांच्या निगेची व्यवस्था लागल्यावाचून त्यांत पीक येणार कसे ? तेव्हा प्रत्येक तालुक्यास सरकारी बैल ठेवण्याची व्यवस्था झाल्यास, शेतकऱ्यांना त्यांचा फार उपयोग होईल. आता सरकारी बैल ठेवणे फार खर्चाचे आणि त्रासाचे काम होऊन बसेल- किंबहुना ते अव्यवहार्यही वाटेल, पण सध्यांची महत्त्वाची वेळ लक्षात आणली तर ही बैलांची योजना विशेष अडचणींची म्हणता येणार नाही. मोटारी उदयाला येण्यापूर्वी सरकार तोफखाना इत्यादी लढाईच्या कामासाठी घोडे ठेवीतच होते ! युध्द जरी दरसाल होत नव्हते, तरी घोडे बाळगणे सरकारला परवडत असे. तेव्हा थोडा त्रास आणि खर्च वाढण्याचा संभव असला तरी सरकारने शेतकऱ्यांना बैल पुरविण्याची व्यवस्था कोणत्याही पध्दतीने पण करावी. या कामी सरकारने माघार घेता कामा नये. किंवा जो कोणी आपली पडीत जमीन लागवडीस आणणार नाही त्यांची ती जमिन दुसऱ्यांस लागवडीसाठी दिली जाईल. असला

दडपशाहीचा उपाय योजू नये ! लोकांत संतोष नांदणे हे अधिक धान्यापेक्षाही अधिक उपयुक्त आहे. यासंबंधाने पाहिजे तर सरकारने अशा पडीत जमीनी सामुदायिक पध्दत स्वीकारुन लागवडीस आणाव्या. म्हणजे सरकारी खर्चाने जमिनी नांगरुन पेरुन शेतकऱ्यांच्या स्वाधीन कराव्या. हा सरकारी खर्च पिकावर वसूल करुन घेण्यात यावा आणि शेतमालकास मालकी हक्काबद्दल योग्य तो हिस्सा देण्यांत शक्य तितकी जमीन नांगरुन पेरुन काढण्याची योजना तयार करावी. सर्व ठिकाणी हे प्रयोग करुन पाहणे सरकारला जमत नसेल तर काही गावे या प्रयोगासाठी निवडून घ्यावीत. सामुदायिक पध्दतीने जमिनी करण्यात खर्च थोडा येऊन धान्य अधिक पिकणार ! शिवाय संघटितपणे जमिनी कसल्याने कसा फायदा होतो याचा प्रत्यक्ष अनुभव शेतकऱ्यास मिळेल. आणि शेतात उत्पन्न कसे आणि कितपत होऊ शकते याचा अनुभव सरकारलाही येईल.[५९] म्हणून मुकुंदराव पाटील यांनी सामुदायिक शेती करणे कसे फायदेशीर राहील याबद्दल आपले विचार मांडल्याचे दिसून येते. तसेच शेतकऱ्यांना काही विशेष सवलतीचीही आवश्यकता असल्याचेही मुकुंदराव पाटीलांनी नमूद केलेल्या आहेत.

शेतकऱ्यांना सरकारने ज्या विविध सवलती दिल्या पाहिजेत याबद्दल ते म्हणतात की, "धान्य पेरीच्या क्षेत्रावर, धान्याच्या तारणावर आगाऊ पैसा देणे, खत-पेंड सध्याच्या सवलतीच्या भावापेक्षा निम्म्या भावाने देणे, युध्द बंद होऊन तीन वर्ष पूर्ण होईपर्यंत बिनव्याजी तगाई देणे, पाणी लागेल की नाही, अशी पाहणी करुन शक्य तेथे सरकारी विहिरी पाडणे, त्यावर इंजिन बसवून ते पाणी शेतकऱ्यांना कमी मोबदल्याने देणे."[६०] या उपाययोजना सांगत असताना मुकुंदराव पाटील यांना असे वाटते की, अधिक धान्य पिकविण्यांत अधिक फायदा आहे अशी शेतकऱ्यांची खात्री झाली पाहिजे. देशाच्या अभिमानासाठी म्हणजे हिंदुस्थानाच्या संरक्षणसाठी शेतकऱ्यांनी थोडा स्वार्थत्याग केला पाहिजे.

एकंदरीत अडाणी अशिक्षित बहुजन समाजाच्या राष्ट्रांत ऐन प्रसंगी अधिक धान्य पिकविणे फार कठीण काम आहे. तेव्हा अशिक्षित शेतकऱ्यांना जगातल्या थोर राष्ट्रांचे उदात्त हेतू मुळीच कळत नाहीत. आणि ते जाणून घेण्याची त्यांची तयारी पण दिसून येत नाही. त्यांना केवळ पोटाची जाणीव असते. पोटास भरपूर खाण्यास मिळाले म्हणजे ते जनावराप्रमाणे कठीण कष्ट करण्यास मागे पुढे पहात नाहीत. सरकारच्या धान्याचा संबंध, शेतकऱ्यांच्या पोटाशी येत असल्यामुळे त्यांना सांभाळून

घेण्याकडे सरकारने विशेष दक्षता-योजना-सवलती इत्यादी गोष्टींचा उपयोग सढळ हाताने केला पाहिजे ! हे सर्व यथायोग्य प्रमाणांत साधायला सरकारने सामुदायिक शेतीचा प्रयोगच करुन पाहिला पाहिजे. असे मुकुंदराव पाटलांना वाटते.

सामुदायिक शेतीच्या संदर्भात श्रीपतराव शिंदे यांचे विचारही मुकुंदराव पाटलांच्या विचारांशी मिळतांना दिसतात. सहकारी तत्त्वावर संघशक्तीच्या माध्यमातून शेती करण्याचा नावीन्यपूर्ण विचार मांडलेला होता. अमेरिकेसारख्या प्रगत देशात शेतकरी एकत्र येऊन सामुहिक शेती करतात. त्यामुळे खर्च व वेळ वाचतो. आपल्या शेतकऱ्यांनी सामुहिक शेतीचा प्रयोग केल्यास त्यांचे दारिद्र्य व भाऊबंदकी कमी होईल असे शिंदे यांना वाटत होते. भाऊबंदकीच्या हिस्यामुळे शेतजमिनीचे छोटे छोटे तुकडे झाले आहेत. त्यामध्ये औतकाठी करणे मुष्कील झाल्यामुळे जमिनी पडीक पडल्या आहेत.

वारंवार पडणारे दुष्काळ व तुकड्या-तुकड्यांची शेती यामुळे शेतकऱ्यांची स्थिती खालावत चालली आहे. म्हणून शेतकऱ्यांनी भाऊबंदकीची आत्मघातकी परंपरा सोडून ऐक्यभाव जोपासावा. दहा-पाच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी शेती संघ स्थापन करावा. त्यांच्या मालकीच्या जमिनीचा एक गट करुन संघामार्फत जमिनीची मशागत करावी. सुधारित यांत्रिक अवजारे घेऊन आधुनिक पध्दतीने शेती करावी. सरकारने नद्यांवर धरणे बांधून शेतकऱ्यांना पाणी पुरवावे. सहकारी संघानेही लहान ओढ्यांना बांध घालून, ताली बांधून पाणी अडवावे. [६१] अशा पध्दतीने सामुहिक तत्त्वावर शेती केल्यास शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारेल असे शिंदे यांनी सुचविलेले होते. या ठिकाणी रामराव जोतीराव शिंदे यांनी सहकारी शेतीची ही कल्पना उचलून धरलेली आपल्याला पहावयास मिळते. सामुहिक शेती केल्यास खर्चात बचत होईल. संघाची कल्पना लोकांना पटल्यानंतर उत्तरोत्तर संघाची वाढ होईल. इतर शेतकरीही त्यामध्ये सहभागी होतील. सामुहिक शेतीच्या फायद्याबरोबरच रामराव शिंदे आवर्जून सांगतात की, इथले शेतकरी अडाणी असल्यामुळे शेतवाड्याचे संघीकरण यशस्वी करण्यासाठी कायद्याचे अवलंबन करण्याशिवाय गत्यंतर नाही.[६२] शेतकऱ्याचे अज्ञान व गतानुगतिक मानसिकता यांमुळे नवे विचार ते सहजासहजी स्वीकारत नाहीत. म्हणून कायदा करुन सक्तीने बदल करण्याची गरज त्यांना वाटते. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र सरकारने तुकडेबंदीचा कायदा करुन

शेतीचे एकत्रीकरण केल्याचे दिसून येते. त्याची प्राथमिक चर्चा सत्यशोधक लेखकांनी केलेली होती हे लक्षात घेतले म्हणजे त्यांची दूरदृष्टी प्रकर्षाने जाणवते.

केशवराव देशकर यांनी सहकाराची महती विशद करताना म्हटले होते की, "सहकार चळवळीची व्याप्ती फार मोठी असून ती जातीभेद, वर्णभेद, सुशिक्षित, अशिक्षित, पक्षभेद, धनवान, निर्धन इत्यादी नाना भेदांना अवसर सापडत नाही. ही चळवळ लोकसत्तेच्या कारभाराचा प्रत्यय देते."[६३] सामाजिक समता व लोकशाही अस्तित्त्वात आणण्याचे सामर्थ्य सहकारामध्ये असल्याची सत्यशोधकांची भूमिका होती. सहकार म्हणजे शेतकऱ्यांची आणि दीनदुबळ्या प्रजेच्या कल्याणाची कामधेनू आहे अशा यथार्थ शब्दांमध्ये व्यंकटराव गोडे यांनी सहकाराचे महत्त्व विशद केलेले आपल्याला पहावयास मिळते.

सत्यशोधक चळवळीच्या नियतकालिकांमधून मांडलेला सहकाराचा विचार हा प्रस्थापितांच्या अर्थसत्तेत नागवलेल्या, शोषलेल्या पशुवत जीवन जगणाऱ्या गरीब शेतकऱ्यांच्या मुक्तीचा क्रांतीकारी विचार होता. सामान्य शेतकऱ्यांनी संघीय भावनेने एकत्र येऊन शोषणमुक्त व आर्थिकदृष्ट्या सक्षम समाज निर्माण करण्यासाठी सहकार हा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. सहकाराचे बीज शेतकऱ्यांच्या विचार-आचारामधून रुजविण्याचा प्रयत्न सत्यशोधकांनी केलेला दिसून येतो. त्यामुळे सहकार चळवळीची बीजे रोवली गेली. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीने फार मोठे रुप धारण केले आहे. ग्रामीण भागात परिवर्तनाचे व समृध्दीचे पर्व अवतरेलेले आपल्याला पहावयास मिळते. याचा पाया सत्यशोधक चळवळ व साहित्याने घातलेला होता.

### ६.१० शेतकऱ्यांना जपले पाहिजे

भारत हा शेतकरी, कष्टकरी जनसमूहांचा देश आहे. सिंधू संस्कृतीपासून आजतागायत शेती ही भारतातील बहुतांश लोकांच्या चरितार्थाचे मुख्य साधन आहे. जमीन, जल आणि निसर्गाशी सतत बध्द असल्याने कृषिजनांची एक वैशिष्ट्यूपर्ण भुमीनिष्ठ संस्कृती आकारास आली. परस्परावलंबित्त्व आणि सहजीवनाच्या गरजेतून गावगाड्यासारखी स्वयंपूर्ण व्यवस्था निर्माण झाली. समूहभाव, भूमिनिष्ठा, नैतिकता, विश्वास, श्रमपरायणता अशा मूल्यांवर आधारित एक जीवनरीत अस्तित्त्वात आली. 'जगा आणि जगवा' हा कृषिजन संस्कृतीचा धर्म आहे. शेती आणि शेतकरी हे

कृषिजन संस्कृतीच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते. शेतकरी अहोरात्र काबाडकष्ट करीत अन्नधान्य, भाजीपाला, दुधदुभते अशा अनेक जीवनावश्यक गोष्टी पिकवत गावगाड्यासह उर्वरित जगाला जगवताना दिसतो. भांडवल, पाणी आणि घाम या गोष्टींची शेतीला सतत गरज असते. त्यामुळे मरेपर्यंत राबराब राबणे म्हणजेच कुणब्यांचा धर्म निभावणे हे शेतकऱ्यांचे जीवनसार असते. शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलाची, साधनांची, कामांची जुळणी करण्यात कुणब्यांच्या पिढ्यान्पिढ्या खर्ची पडत आलेल्या दिसतात.

शेतकरी हा या देशातील सर्वाधिक शोषित, सोशीक आणि उपेक्षित घटक आहे. सर्वांना पोसण्यासाठीच शेतकरी जन्माला आला आहे, अशी इतरांची पक्की धारणा झालेली दिसून येते. पोशिंदा हा शब्द त्याचेच एक प्रतीक आहे. भारताचा सामाजिक इतिहास हा शेतकऱ्यांच्या अमर्याद शोषणाचे आणि उपेक्षेचे दुःखद वास्तव आहे. धर्मसंस्था, राज्यसंस्था, सरंजामी समाजव्यवस्था अशा अनेक घटकांनी कृषिजनांची मनमानी लूटमार केली. [६४] कुणब्यांच्या श्रमावर, घामावर, रक्तावर विलास केले. धर्मसंस्थेने देव-धर्म, शास्त्रपुराणे, विधी, कर्मकांडे, यज्ञ, स्वर्ग-नरक अशा शेकडो कल्पित गोष्टी रचून ऐशआरामात जगण्याची एक शाश्वत व्यवस्था निर्माण केली. राज्यसंस्था व तिच्या सरंजामी हस्तकांनी शेतकऱ्यांची लूटमार करण्याचे कर्तव्य पार पाडल्याचे बहुधा दिसून येते. मोहिमा, लढाया यामध्ये शेती व गावांचा सर्वप्रथम बळी जाई. नासाडी व लूटमारीने गावेच्या गावे उद्ध्वस्त होत. अस्मानी-सुलतानी आपत्तींनी शेतकरी देशोधडीस लागला.

शेतकऱ्याला बळीराजा असे संबोधले जात असले तरी प्रत्यक्षात त्याचा बळी घेण्याचा प्रकार प्रस्थापित व्यवस्थेतील सर्व घटकांकडून पध्दतशीर चालू असल्याचे दिसून येते. काही सन्माननीय अपवाद वगळता भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्.मयीन इतिहासामध्ये कृषिजनांची गांभीर्याने दखल घेतलेली आढळत नाही. एकंदर व्यवस्थेमध्ये शेकडा सत्तर ऐंशी टक्क्यांच्या आसपास संख्या असणाऱ्या कृषिजनसमूहाची अशी घनघोर उपेक्षा ही भारतीयांच्या संवेदनशीलतेला मुळापासून प्रश्नचिंन्हाकित करणारी गंभीर बाब आहे. एकंदरीत दारिद्र्य, दुःख, भूक, कर्ज, शोषण आणि उपेक्षा यांमध्येच कृषिजन संस्कृतीचा इतिहास सामावलेला दिसून येतो. म्हणून मुकुंदराव पाटील नेहमी शेतकऱ्यांना जपले पाहिजे, शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मदत केली पाहिजे असे वारंवार सांगताना दिसतात.

अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटलांनी सुचविलेले अनेक उपाय आजही महत्त्वाचे वाटतात. सप्तसूत्री मध्ये विद्या, ज्ञान, जूट, पंच, खर्च, वेळ, शिक्षण व दुर्व्यवसनापासून अलिप्तता या सर्वांचे महत्त्व शेतकऱ्यांसाठी कसे फायदेशीर आहेत हे प्रस्तुत प्रकरणात सांगितलेले आहे. शेतकरी जर सुधारायचा असले तर त्याला शिक्षणाचा कसा उपयोग होतो याचे विवेचनही या प्रकरणात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच सावकारशाही निर्मुलनाविषयीचे विचार, शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठीच्या उपाययोजना, शेतकऱ्यांसाठी सरकारी व्यवस्था कोणत्या असाव्यात, दुष्काळ प्रश्नाविषयीचे विचार, शेतकरी आणि कर्ज यांचा संबंध, सामुदायिक शेतीचे महत्त्व व गरज, शेतकऱ्यांना कसे जपले पाहिजे या सर्व गोष्टींचे विवेचन प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेले उपाय आजही तितकेच महत्वाचे ठरतात. आज आधुनिक काळातही खेडयातील शेतकरी पारंपरीक पध्दतीने शेती करतांना दिसतो. आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे शेती करण्यास खेडयातील शेतकरी आजही तयार होतांना दिसत नाही. अशा परिस्थितीत मुकुंदराव पाटील यांचे विचार या शेतक-यांना निश्चितच प्रेरणादायी ठरतील.

## संदर्भ


१. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ले, अंक ३, दि.७/१२/१९१०

२. कित्ता

३. बगाडे उमेश, विचार किरण- भाग १, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, तरवडी, ता.नेवासा, जि.अ.नगर, पृ.१२.

४. कित्ता, पृष्ठ १३, १४

५. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १ ले, अंक ३ व ४, दि. १४/१२/१९१०, २१/१२/१९१०

६. कित्ता

७. कित्ता

८. कित्ता

९. शिंदे अरुण, सत्यशोधकांचे शेतकरी विषयक विचार, दर्या प्रकाशन, प्र.आ., १५ ऑगस्ट २०१२, पृ. १८०.

१०. कित्ता, शिंदे अरुण, पृ. १८०

११. कित्ता, शिंदे अरुण, पृ. १०१

१२. कित्ता, शिंदे अरुण, पृ. १०२

१३. कित्ता, पाटील मुकुंदराव, वर्ष ५, अंक४, दि.९ डिसेंबर १९१४.

१४. एरंडे अशोक, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, स्फुर्ती प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ. १२नोव्हें.१९९६, पृ.१९९.

१५. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', २० मार्च १९१२, वर्ष २, अंक १८.

१६. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३, अंक ४६, दि.१/१०/१९१३

१७. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३, अंक ४६, दि.१/१०/१९१३

१८. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १३, अंक २०, दि.२८/३/१९२३

१९. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष २०, अंक ४०, दि.६/८/१९३०

२०. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १, अंक ४४, दि.२०/९/१९११

२१. कित्ता, पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ९, अंक ५२, दि.१०/११/१९१९

२२. कित्ता, पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष २८, अंक ६, दि.१/१२/१९३७

२३. कित्ता, पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष १, अंक ४, दि.१४/१२/१९१०

२४. कित्ता, पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष ११, अंक ११, दि.२६/१/१९२१

२५. कित्ता, पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष ११, अंक ४७, दि.५/१०/१९२१

२६. कित्ता, पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष १२, अंक २५, दि.३/५/१९२२

२७. कित्ता, शिंदे अरुण, पृ .२०६.

२८. कित्ता, शिंदे अरुण, पृ .२०६.

२९. कित्ता, शिंदे अरुण, पृ .१४५.

३०. कित्ता, शिंदे अरुण, पृ .१४६.

३१. कित्ता, शिंदे अरुण, पृ .१४६.

३२. ढेंबरे बाळासाहेब, मुकुंदराव पाटील यांचे साहित्य, अनुराधा पब्लिकेशन्स नांदेड, प्र.आ., जुलै २०१३, पृ.७०.

३३. कित्ता, शिंदे अरुण, पृ .१४८.

३४. सावंत भाऊसाहेब, ‘दीनमित्र’,शताब्दी महोत्सव, स्मरणिका, २०१०, पृ.४२.

३५. कित्ता, पृ.४२

३६. कित्ता, पृ.४२

३७. कित्ता, शदे अरुण, पृ .११०.

३८. पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष २७, अंक १०, दि. ३० डिसेंबर १९३६.

३९. कित्ता

४०. पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष ३८, अंक ४७, दि. १ सप्टेंबर १९४८.

४१. कित्ता

४२. कित्ता

४३. कित्ता

४४. कित्ता

४५. पाटील मुकुंदराव, ‘दीनमित्र’, वर्ष ३६, अंक १८, दि. १३ फेब्रुवारी १९४६.

४६. कित्ता

४७. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष १५, अंक २३, दि. १५ एप्रिल १९२५.

४८. कित्ता

४९. कित्ता

५०. कित्ता

५१. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष २८, अंक ३३, दि. ८ जून १९३८.

५२. कित्ता

५३. कित्ता

५४. कित्ता

५५. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३६, अंक ५१, दि. २ ऑक्टोबर १९४६.

५६. कित्ता

५७. पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्ष ३४, अंक २७, दि. १९ एप्रिल १९४४.

५८. कित्ता

५९. कित्ता

६०. कित्ता

६१. कित्ता, शिंदे अरुण, पृ .३९.

६२. शिंदे श्रीपतीराव, विजयी मराठा, १६ एप्रिल १९२३.

६३. पाळेकर भगवंतराव, ब्राम्हणेतर १५ डिसें. १९२६.

६४. कित्ता, शिंदे अरुण, प्रस्तावना.

# प्रकरण सातवे

# मुकुंदराव पाटील आणि शेतकऱ्यांची जनजागृती

७.१ प्रास्ताविक

७.२ शेती नव्हे शेतकरी सुधारा

७.३ सत्ता आणि शेतकरी

७.४ शेतकऱ्यांनो डोळे उघडा

७.५ शेतकरी आणि चळवळ

७.५.१ शेतकऱ्यांनो विचार करा

७.५.२ शेतकरी हाच खरा राष्ट्राचा संसार पुरुष

७.५.३ गरिबांनीच सावध झाले पाहिजे

७.६ शेतकऱ्यांसाठी शेती मेळावा आवश्यक

७.७ शेतकऱ्यांस विहिरी खणून व बांधून देण्याची सोय पाहिजे

# प्रकरण सातवे

# मुकुंदराव पाटील आणि शेतकऱ्यांची जनजागृती

## ७.१ प्रास्ताविक

'दीनमित्र' चे वृत्तपत्रीय योगदान वादातीत आहे. मुकुंदराव पाटील यांनी जाणीवपूर्वक 'दीनमित्र' तरवडीहून चालविले होते हा त्यांचा नाइलाज नव्हता. तत्कालीन सर्वांगीण ग्रामीण परिस्थिती पाहता 'दीनमित्र' खेड्यातून चालविणे अधिक गरजेचे होते असे त्यांचे स्पष्ट मत होते. गावगाडा जीवनपध्दतीच्या विनाशास कारण असलेली चुकीच्या निकषावर आधारित असलेली वर्णव्यवस्था, दोषमुलक प्रथा, परंपरा, ग्रामीण अर्थकारण, धर्मकारण, उच्चवर्णीयांचे अवास्तव महत्त्व यातून ग्रामीण शेतकरी, कष्टकरी बहुजनास बाहेर काढणे गरजेचे होते. 'दीनमित्र' ने ही जबाबदारी स्वीकारलेली होती.

मुकुंदराव पाटील यांच्या दृष्टीने पत्रकारिता हा व्यवसाय नसून समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम होते. एका संपादक पत्रकाराकडून त्यांनी व्यक्त केलेली अपेक्षा, त्यांची वैचारिक मनोभूमिका स्पष्ट करते. नुसत्या कागदांच्या पानांची संख्या आणि लोकांच्या लेखांची धर्मशाळा म्हणजे संपादकाचे पत्र नव्हे तर समाजाच्या दोषाचे निरीक्षण करुन त्यावर परिणामकारक स्वतःचे स्वतंत्र मत देणाऱ्या संपादकाची आज फार आवश्यकता असल्याचे दिसून येते. केवळ लोकांना खूष करणे, उगवत्या सूर्याचे देव्हारे बांधणे, सत्ताधाऱ्यांची भटगिरी करणे वा अर्थिक लाभाची अपेक्षा करणे हे कार्य 'दीनमित्र' ने कधीच केले नव्हते.

ग्रामीण जीवन त्यांचे प्रमुख कार्यक्षेत्र होते. ग्रामीण भागातील समस्या, गरजा, इच्छा, अपेक्षांची जाणीव त्यांना असल्याचे दिसून येते. केवळ मंदिर प्रवेशाने वा पाणवठ्यावर पाणी भरण्याने बहुजनांचे सर्व प्रश्न सुटणार नाहीत, तर समाज उन्नतीसाठी ज्ञानमंदिर, व्यवसायमंदिर आणि द्रव्यमंदिर या त्रिदेव मंदिर प्रवेशाची नितांत गरज त्यांनी स्पष्ट केल्याचे दिसून येते. केवळ मतदानाच्या अधिकाराने स्वातंत्र्य प्राप्त होत नाही तर सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन राजकारणाची किरणे बहुजनांच्या

घरीदारी पोहचल्याशिवाय गुलामगिरीचा अंधःकार नष्ट होणे शक्य नाही, याचा त्यांनी सतत पाठपुरावा केला होता.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मुकुंदराव पाटील यांनी शेतकऱ्यांसाठी केलेली जनजागृती, शेतकऱ्यांसाठी शेती मेळावा कसा आवश्यक आहे, शेतकऱ्यांची सद्यस्थिती आजच्या स्थितीत मुकुंदराव पाटील यांचे विचार कसे उपयुक्त ठरतात या सर्व बाबींचा विचार केलेला आहे.

### ७.२ शेती नव्हे शेतकरी सुधारा

ब्रिटिश सरकारने शेतक-यांना शेती मध्ये चांगले उत्पन्न मिळावे व शेतक-याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी भारतात शेतकी कमिशन नेमले होते. या कमिशनवर सरकारने खुप खर्च ही केला. परंतु या कमिशनमुळे शेतक-यांच्या परिस्थितीत काहीही फरक पडला नाही. त्यामुळे मुकुंदराव पाटलांनी या कमिशनला विरोध केला होता. त्यांच्या मते शेतीपेक्षा शेतकरी वर्गाला शिक्षण देणे गरजेचे आहे. शेतकरी शिकला की शेती अपोआप सुधारेल. या विषयी ‘शेती नव्हे शेतकरी सुधारा’ या लेखामध्ये जी प्रतिक्रिया दिली ती फार बोलकी आहे.

मुकुंदराव पाटील अशी दंतकथा सांगतात की, ‘शहाजान बादशाच्या बागेत बागेची निगा राखण्यासाठी १२५ शेतकरी राहत असत. बादशहा हा त्यांना भरपूर पगार देत असे, पण त्यांचे दारिद्र्य कमी होत नसे. असे का होते आणि या लोकांची स्थिती कशाने सुधारेल याचा विचार करण्यासाठी प्रांतातील मोठमोठे सरदार, दूरचा प्रवास करुन आले. राज्याची सगळी कामे बाजूस ठेवून बागेतल्या शेतकऱ्यांच्या शेती संबंधाने मोठमोठे सरदार ढाल तलवारी सावरुन कडाक्याचा वाद-विवाद करु लागले. असा हा वाद सतत एक महिनाभर चालला. अनेक सरदारांनी अनेक सूचना केल्यानंतर सर्व सरदार आपापल्या प्रांतात निघून गेले. जाताना बादशहाने त्यांना मोठमोठ्या देणग्या दिल्या. एक महिन्यांत सर्व सरदारांस खाना, पानसुपारी, अत्तर फुले वगैरे बाबींत साडे सात लक्ष रुपये खर्च आला. बरे एवढा खर्च करुन या शहाण्या सरदारांनी सांगितले काय ? तर आंब्याची कलमे चांगली बांधा, खतासाठी पेंड-भासे घाला, रस्ते भक्कम करा, माल साठवण्यास उत्तर चुनेगच्ची घरे बांधा, अत्तरांचा कारखाना काढा, बागेची हद्द वाढवून शेतीचे क्षेत्र मोठे करा, बी-बियाणे उत्तम घ्या. वगैरे बादशाहाने हे सर्व पुराण शेतकऱ्यांस वाचून दाखविले आणि या कामी जो साडे सात लक्ष रुपये

खर्च आला तो खर्च बागेतील शेतकऱ्यावर कर बसवून वसूल करण्याचे फर्मान काढले आणि शेतकऱ्यांस आनंदपूर्वक कळविले की, नवीन सूचनांच्या बळावर कर फेडण्यास तुम्हास आता मुळीच जड वाटणार नाही.' [१] बादशहाच्या या विचित्र हुकमामुळे सर्व शेतकरी ती बाग सोडून दुसरीकडे गेले. अर्थात बाग सुधारण्याची चौकशी बागेच्या नाशासच कारणीभूत झालेली होती. येथे मुकुंदराव पाटील यांनी बादशहाचे उदाहरण देवून शेतक-यांबद्दल सरकार खरोखर कसे लक्ष देते हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारकडून ज्या विविध योजना राबविल्या जातात तसेच वेळोवेळी कमिशन नेमले जातात परंतु या सर्वांचा होणारा खर्च हा परत शेतकऱ्यांकडून वसुल केलो जातो. ही पध्दत कशी दोषपूर्ण आहे. हे दाखविण्यासाठी मुकुंदराव पाटील वरील उदाहरण देतात. असाच काहिसा प्रकार सरकारने नेमलेल्या शेतकी कमिशनचा झाला आहे असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात व शेतकरी सुधारण्यासाठी आपले मत स्पष्ट करतांना ते म्हणतात की , "शेती सुधारण्यासाठी काय काय करावे याचा विचार या कमिशनने वर्षभर हिंडून फिरुन केला. पुष्कळ ठिकाणी पुष्कळ लोकांच्या साक्षी घेतल्या. त्या सर्वांचे रिपोर्ट प्रसिध्द झाला आहे. या शेतकी चौकशीच्या रिपोर्टची पानेच जवळ जवळ एक हजार आहेत आणि या सर्व कामास पावणे चौदा लक्ष रुपये खर्च आला. एवढा खर्च करुन शेतीच्या सुधारणेसाठी या लक्षाधीश लोकांनी सांगितले काय ? तर अमूक खत घाला नि तमुक अवजारे घ्या. कर्ज असे काढा नि फेड तशी करा. रस्ते असे बांधा नि जमीन तशी मोठी करा. जणो या सूचना शोधून काढायला पावणे चौदा लक्ष रुपयेच लागत होते. सूचनांचा काही भाग उपयुक्तही असेल, पण एवढ्या महागाच्या उपयुक्तपणाची गरज हिंदुस्थानच्या शेतकीस नको आहे. खरे पाहिले तर शेती सुधारण्याची कमिशने किंवा कमिट्या मुळीच नकोत आणि सरकारनेही यापुढे असा अनाठायी खर्च करुन शेतकऱ्यांचा पैसा व्यर्थ घालवू नये. कारण आज आम्हास शेतीपेक्षा शेतकरी सुधारण्याची फार फार आवश्यकता आहे."[२] सरकारने शेतकरी सुधारणे साठी नवीन नवीन उपाययोजना अमलात आणने गरजेचे आहे. कारण शेतक-याला शिक्षण मिळाले तर तो आपल्या कुटुंबाला शिक्षण देईल तसेच आपल्या शिक्षणाचा उपयोग करुन तो आपल्या शेतीत चांगल्या प्रकारचे उत्पन्न घेवू शकेल. त्यासाठी सरकारने शेती सुधारणेकडे लक्ष देण्या पेक्षा शेतकरी सुधारण्यासाठी शिक्षण देणे गरजेचे आहे.

मुकुंदराव पाटील यांनी शेतीपेक्षा शेतकरी सुधारणे का गरजेचे आहे हे सांगितलेले होते. आजही हिच परिस्थिती आपणास पहावयास मिळते. मुकुंदराव पाटील यांच्या मते, शेती आणखी काही वर्षे आहे याच स्थितीत राहिली तरी शेतकरी दु:ख सहन करण्यास डगमगणार नाहीत. कारण शेतीचे कबाडकष्ट करुन पशुतुल्य अवस्थेत जगण्याची सवय त्यांना भरभक्कम लागलेली आहे. तेव्हा शेतीच्या सुधारणेकडे सरकारने तूर्त कानाडोळाच करावा आणि असेन नसेन तेवढा सगळा कळवळा शेतकरी सुधारणेकडे खर्च करावा. कारण शेतकीची सुधारणा शेतकऱ्यांच्या सुधारणेवरच अवलंबून असल्यामुळे त्यांनाच प्रथम सुधारण्याचा यशस्वी प्रयत्न झाला पाहिजे.

"केवळ शेतकरीच सुधारल्याशिवाय शेती सुधारणे शक्य नाही. शेतकी सुधारण्याचे तत्त्व हे असे सोपे असता सरकार जमिनीच्या लहान तुकड्यांची सुधारणा करण्यास दांत खाऊन धावते, पण अनेक अज्ञानाना मुळे प्रचंड शेतीचे तुकडे पडले आहेत. त्याचे एकीकरण करण्याचे सरकारास सूचत नाही. तेव्हा प्रथम शेतकऱ्यास सुधारण्यासाठी काय करावे याची चौकशी करायला हवी आणि ही चौकशी युरोपियन लोकांच्या हातून करण्यात मुळीच फायदा नाही. कारण हिंदी संस्कृतीचा आणि मनोघटनेचा पोंच युरोपियन जमिनदारास मुळीच नसतो. शिवाय हिंदुस्थानात अनेक प्रकारचे शेतकरी आहेत, त्या सर्वांच्या अधोगतीची कारणे जर शोधायची झाली, तर त्या त्या प्रांतातील ते जर नेमले गेले तर ते खात्रीने पुढील प्रमाणे शिफारशी करतील.

१. शेतकऱ्यास सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे.
२. प्रत्येक तालुक्यास शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांकरिता बोर्डिंग, स्कुले काढली पाहिजेत.
३. प्रत्येक एक हजार लोक वस्तीच्या गावात एक दवाखाना आणि एक वाचनालय ठेवले पाहिजे.
४. आठवड्याने भरणाऱ्या प्रत्येक बाजारांत शेतकऱ्यांच्या दुर्गुणावर परिणामकारक व्याख्यान देणारे वक्ते नेमले पाहिजेत.
५. शेतकऱ्यांच्या जनावरांस चरण्यास फी नसली पाहिजे.
६. पोळ्याच्या सणास बैलाच्या प्रदर्शनाचे रुप देऊन ज्यांची जनावरे चांगली असतील त्यांना बक्षिसे प्रत्येक गावी काढली जावी.
७. उदरनिर्वाहाचे कारण सोडून शेतकऱ्यास इतर कारणासाठी कर्ज काढायचे झाले तर, सरकारच्या परवाणगी वाचून ते काढता येऊ नये.

८. अमूक एकर ज्याची शेती आहे त्याने अमूक रकमेच्या वर खर्च, लग्नादी कार्यात करू नये, केल्यास तो गुन्हा समजला जावा.

९. सारा थकला तर कोणतीही जमीन खालसा केली जाऊ नये. लिलाव करुन सारा वसूल करावा.

१०. शेतकऱ्यांच्या पिकांचा नाश क्रूर व रानटी जनावरांनी केल्यास त्याची जबाबदारी सरकारने आपल्या माथ्यावर घ्यावी. कारण प्रजा जर निःशस्त्र आहे, तर तिच्या वित्तांचे रक्षण करण्याचे काम सरकारवरच येऊन पडते. गावांतल्या एखाद्या मनुष्याने शेतातला एक भाराभर माल लांबविला तर ती ताबडतोब चोरी ठरुन पोलीस पार्टी तेथे धाऊन जाते. पण दहा भारे माल रानटी जनावरांनी नासून टाकला तर सरकार काहीच काळजी घेत नाही, हा प्रकार बदलला पाहिजे.

११. प्रत्यक्ष शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांस दुष्काळाच्या प्रत्येक साली, साऱ्याची पूर्ण सुट दिली पाहिजे."[३] ज्या शेतकऱ्यांच्या मनोवृत्तीची चर्चा मुकुंदराव पाटलांनी आपल्या लेखात केली तशीच शेतक-यांची मनोवृत्ती आजही आपणास पहावयास मिळते. हे विचार मांडून साधारणतः शंभर वर्षे होत आली तरीही या वर शासन स्तरावर फारशी उपाय योजना केली गेलेली नाही. जी आहे ती अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे या ठिकाणी असे लक्षात येते की, प्रथमतः शेतकऱ्यास सवलत देऊन सुधारल्यावर शेतकी सुधारण्याचा प्रश्न याच सुधारलेल्या शेतकऱ्यांच्या संमतीने, सरकारने सोडवला पाहिजे. यांतच शेतकीची खरी व टिकावू सुधारणा होऊ शकते. लक्षावधी रुपयांचा चुराडा करुन आणि शेतकरी सोडून शेतकी सुधारण्याचा प्रयत्न सरकारने कितीही जरी केला तर तो दिखाऊच ठरेल असे मुकुंदराव पाटील सांगतात.

### ७.३ सत्ता आणि शेतकरी

ब्रिटिश सरकारने भारतीयांना स्वातंत्र्य दिल्या नंतर भारतातील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली पाहिजे. कारण भारत पारतंत्र्यात असताना ब्रिटिशांनी भारतीय शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक शोषण केले. यासाठी स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सरकारने शेतकरी हिताच्या योजना आमलात आणल्या पाहिजे व या सत्तेचा उपयोग शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी केला पाहिजे. या साठी मुकुंदराव पाटील प्रस्तुत लेखा मध्ये म्हणतात की, "जगाच्या बदलत्या रंगाप्रमाणे हिंदुस्थानातील असंतोषाला आपल्या सोयीचे वळण लागावे असे इंग्रज लोकांना वाटणे स्वाभाविक आहे. आणि त्यांची ही इच्छा हिंदुस्थानास स्वातंत्र्याचे काही हक्क

दिल्यानेच पूर्ण होणार असल्यामुळे ब्रिटीश सरकार व्हॉइसराय यांच्यामार्फत हिंदी पुढाऱ्यांशी एकसारख्या वाटाघाटी करीत आले आहे, आणि शेवटी हिंदुस्थानास स्वातंत्र्य दिल्याचे ब्रिटीश सरकारने जाहिर केले. हे स्वातंत्र्य पूर्ण नाही हे खरे, त्यांच्या मतानुसार काँग्रेसलाही आज स्वातंत्र्य पाहण्याचे भाग्य लाभले आहे. याबद्दल तिचे अभिनंदन केले पाहिजे. हिंदुस्थान अखंड ठेवण्याची काँग्रेसची प्रतिशाही अशीच अभिनंदनीय आहे आणि हे अखंडत्त्व राहण्यासाठीच मिळालेल्या स्वातंत्र्याच्या सत्तेत अनेक खंड मान्य करुन, ऐक्य घडवून आणण्याची काँग्रेसची धडाडीही मनन करण्यासारखी आहे."[४] भारतीय जनतेमध्ये ब्रिटिश सरकार बद्दल जो असंतोष होता हा असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने भारतीयांना काही सुधारणा दिल्या परंतू यामध्ये भारताचे वेगवेगळे तुकडे होत असूनही काँग्रेसने याला पाठिंबा देवून ऐक्य घडवून आणले. आता या काँग्रेस सरकारने भारताला मिळालेले स्वातंत्र्याचा उपयोग करुन शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी जास्तीत जास्त योजना राबवाव्यात. यासाठी शेतक-यांच्या प्रतिनिधींनी ने सरकारकडे सतत पाठपुरावा करणे गरजेचे असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. कलकत्ता वगैरे ठिकाणी जे दंगे झाले ते आणि पुढे होऊ पाहतील ते सर्व सशस्त्र प्रतिकाराच्या बळावर मोडून काढण्याचा निश्चय काँग्रेस मंत्र्यांनी एकमताने व्यक्त केलेला वाटतो हे ही कौतुक करण्यासारखे आहे. इंग्रज सरकारला येथून हकलून दिले पाहिजे ही घोषणा बंद ठेवून, इंग्रजांच्या लष्करी सामर्थ्याने आपसातले तंटे मिटविण्याचा प्रयत्न केला. हे ही तिच्या मुत्सद्दीपणास शोभण्यासारखेच आहे. एकंदरीत पं.नेहरुंनी हिंदी सरकारचा राज्यकारभार नेटाने चालण्याचे जाहीर केले. त्यांच्या या अपूर्व धैर्याचे आम्ही अभिनंदन करतो. परराष्ट्रसंबंध लष्करी सत्ता, परराष्ट्र व्यापार असल्या खोल पाण्याचा तूर्त आम्ही विचार करीत नाही. हे स्वातंत्र्य शेतकऱ्यांस सत्वर हितावह व्हावे एवढीच इच्छा आम्हास आज व्यक्त करायाची आहे. हिंदुस्थानांत शेतकरी आणि मजूर यांचे राज्य स्थापन करण्यासाठी खरे तर काँग्रेस सरकारने मनापासून प्रयत्न करावयास हवेत. येथे मुकुंदराव पाटलांना हिंदुस्थानला मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग सरकारने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी जास्तीत जास्त करावा. कारण शेतकरी सुधारला की, देशाची प्रगती आपोआप होईल असे त्यांना वाटत होते.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "हिंदुस्थान हा शेतकऱ्यांचाच देश असल्यामुळे त्यांचे कल्याण हेच राष्ट्राचे कल्याण आहे. शेतकऱ्यांचा शेतीचा धंदा फायदेशीर कसा होईल याकडे काँग्रेस सरकारने प्रथम लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्यांचा धंदा फायदेशीर झाला तरच मजुरांचा धंदा नीट

चालणार. शेतकऱ्यांनी कर्ज काढू नये, शेतकऱ्यांनी शेतात बंधारे घालावेत, शेतकऱ्यांनी सुधारलेली औते वापरावीत, शेतकऱ्यांनी फावल्या वेळांत सूत कातावे वगैरे वगैरे प्रकारचा हितोपदेश त्यांना करण्यात येतो, याबद्दल ते समंजस झाल्यावर उपदेशकाचे अंतःकरणपूर्वक आभार मानल्याशिवाय राहणार नाहीत. पण आज या सगळ्या उपदेशापेक्षा त्यांना त्यांच्या पोटाचे समाधान करण्याची फार फार आवश्यकता आहे. मजूरापासून तो हुजुरापर्यंत सगळयांची उत्पन्ने चौपटीपेक्षा अधिक वाढली आहेत, पण शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत नाही."[५] आता ही परिस्थिती बदलली पाहिजे असे मुकुंदराव पाटील यांना वाटत होते हे त्यांच्या विचारावरून दिसून येते. कारण शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी कॉंग्रेस सरकारने शेतक-यांना कठिण परिस्थितीत आर्थिक मदत करावी असे त्यांचे मत होते.

भारतात शेतकरी कपाशीचे उत्पन्न जास्त घेत होते. या मालाला जपान कडून भरपूर मागणी ही होती. परंतु दुसऱ्या महायुध्दात भारत जपानच्या विरुध्द लढला यामुळे जपानने भारतीय माल घेणे बंद केले. परिणामी याचा फटका भारतीय शेतकऱ्यांना बसला. म्हणून कापसाला योग्य भाव मिळावा या साठी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी जे मंत्री म्हणून सरकारमध्ये काम करतात यांनी शेतकऱ्यांकडे लक्ष दयावे व शेतकऱ्यांच्या मालाला योग्य तो हमीभाव दयावा. असे मुकुंदराव पाटील यांचे स्पष्ट मत होते. आजही हीच परिस्थिती आपणास पहावयास मिळते शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळतांना दिसत नाही. आज कपाशी पिकवणारा शेतकरी बघितला तर शेतक-यांना उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत आहे.

सरकारने जो हमीभाव ठरवून दिला त्या हमीभावामध्ये कापूस विकणे शेतक-यांना परवडत नाही परंतु तरीही पैशाची अडचण असल्याने शेतक-यांना हा कापूस विकावा लागतो. या अडचणीमुळे आज शेतकरी जास्त प्रमाणात आत्महत्या करत आहे. या परिस्थितीतून शेतक-यांना वाचवण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी सुचविलेल्या योजना आजही उपयुक्त ठरतात.आज सरकार दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यावर वेगवेगळया योजना अमलात आणत आहे परंतू मुकुंदराव पाटील यांच्या मते दुष्काळ पडण्यापूर्वी सरकारने दुष्काळी परिस्थिती निर्माण होवू नये यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मुकुंदराव पाटील पुढे म्हणतात की, "शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून जे कायदेमंडळात निवडून गेले आहेत त्यांनी आता आपले कर्तव्य ओळखले पाहिजे. मध्यवर्ती सरकार आता कॉंग्रेसच्या हातात आले आहे. तेंव्हा शेतकऱ्यांच्या पिकास वाढत्या गरजांच्या प्रमाणांत किंमत देण्याची प्रथम व्यवस्था झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या धान्यादी मालाच्या किंमती वाढविल्यावाचून अथवा शेतकऱ्यास लागणारे कापड-लोखंड-किराणामाल यांच्या किंमती प्रमाणबध्द उतरविल्या वाचून शेतकऱ्यांची दैना दूर होणार नाही. शेतकऱ्यांना बळी राजे करु असे नुसते बोलल्याने शेतकऱ्यांचे राज्य होणार नाही. शेतकऱ्यांना आपल्या मालाचा योग्य मोबदला मिळालाच पाहिजे. आणि हे सर्व घडवून आणण्याची सत्ता आता कॉंग्रेस सरकारच्या हाती आली आहे. तिचा उपयोग कॉंग्रेस मंत्र्यांनी केला पाहिजे. आज सत्ता आणि शेतकरी ही जोडी कॉंग्रेस सरकारपुढे उभी आहे. शेतकऱ्यांस सत्तेचा उपयोग कसा काय होतो ते आता कळून येईल. शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळावा यासाठी आता शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनीच कसोशीने प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मुकुंदराव पाटील यांना वाटत होते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आता मंत्र्याच्या तोंडाकडे पाहून स्वातंत्र्याचा उपयोग कसा करुन घ्यायचा हे ठाम ठरवले पाहिजे. जर शेतकरी या बाबतीत आळस अथवा हयगय करतील तर स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या पुढाऱ्यांच्या श्रमाचे चीज झाले नाही असेच म्हणावे लागेल."[६] कॉंग्रेस पक्ष सत्तेत असल्याने या पक्षाने शेतक-यांना परवडेल असा हमीभाव शेतीमालाला दिला पाहिजे यासाठी शेतक-यांच्या पुढा-यांनी सरकारकडे वेळोवेळी मागणी केली पाहिजे आता कॉंग्रेस पक्षाकडे सत्ता असल्याने या सरकारकडून शेतक-यांच्या हिताच्या जास्तीत जास्त योजना अमलात आणणे हे काम शेतक-यांच्या प्रतिनिधींचे आहे. यासाठी त्यांनी सतत प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मुकुंदराव पाटील सांगतात.

मुकुंदराव पाटील यांच्या मते, "आज देशात अन्न, पाणी, वस्त्र यांची केवढी टंचाई आहे. तसेच निर्वासित, लाचलुचपत, काळाबाजार, कम्युनिष्ट अशी नाना प्रकारची संकटे थैमान घालीत आहेत. पण त्या सर्वांकडे दुर्लक्ष करुन जनतेच्या हितासाठी मंत्री दौऱ्यावर दौरे काढण्यास अनेक ठिकाणचे समारंभ करण्यास प्रसिध्दी पत्रके-नियतकालिके छापण्यास मोठ्या उत्साहाने लाखो रुपये खर्च करीत आहेत कारण स्वातंत्र्याचा पुरेपूर उपयोग त्यांना करुन घ्यावयाचा आहे. हे मंत्री आणि त्यांच्या प्रभावळीत फिरणारे उपमंत्री शेतकऱ्यांना उपदेश करतात. निवडून येईपर्यंत माहित नसलेला

माणूस मंत्री होताच, मंत्र फुंकल्याप्रमाणे त्याच्या अंगात एकदम श्रेष्ठत्त्व आणि कर्तृत्त्व संचारते. स्वातंत्र्याचा प्रभाव म्हणतात तो हा ! शेतकऱ्यांनो तुम्हावरही हा स्वातंत्र्याचा प्रभाव व्हावयास पाहिजे. पण तसे काहीच दिसत नाही. तुम्ही आपले पूर्वीचे आमदानीतल्या शेतकऱ्याप्रमाणेच वागत आहात. मग इंग्रजांनी स्वातंत्र्य देताना हिंदू-मुसलमान असा ज्याप्रमाणे डाव साधला, तसा पुढारी आणि शेतकरी असाही त्यांनी डावांत डाव साधला की काय ? पुढाऱ्यांत आणि शेतकऱ्यांत भांडणे लागतील असे स्वातंत्र्याचे स्वरुप त्या कावेबाज इंग्रजांनी घडवले असावे. त्याखेरीज आज किसान आणि पुढारी यांच्यात बेबनाव माजला नसावा पण हे तितके स्पष्ट सत्य दिसत नाही. स्वातंत्र्याचा उपयोग किंवा उपभोग घेण्याची कला पुढाऱ्यांना जशी साधली तशी कला शेतकऱ्यांस साधली नाही. शेतकरी हे रात्रंदिवस औतकाठी-बैल यांच्याच सहवासात असल्यामुळे त्यांना पुढाऱ्यांप्रमाणे स्वातंत्र्याची चव चाखता येताना दिसत नाही."[७] महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी मुकुंदराव पाटील शेतकऱ्यांना जो उपदेश करतात तो खरोखरच महत्त्वाचा आहे. शेतकरी हा नेहमी आपल्या शेतीच्या कामात व्यस्त असतो शेती मध्ये आहोरात्र कष्ट करूनही शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळत नाही.

जर महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे सरकार सत्तेवर आले आहे तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आपल्या प्रतिनिधींना शेतकरी हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडावे. स्वातंत्र्यानंतर सर्वथरातील लोकांची प्रगती होत आहे. परंतु शेतकरी वर्ग आजही कर्जबाजारी आहे. ही परिस्थिती महाराष्ट्रातील नवीन मंत्री मंडळाने बदलावी व शेतक-यावरील आर्थिक संकट दूर करावे करावे. जर स्वातंत्र्य मिळवून ही शेतक-यांच्या परिस्थितीत सुधारणा होत नसेल तर जसे इंग्रजांनी हिंदू मुस्लिम असा भेदभाव केला तसा शेतकरी पुढारी असा भेद भाव केला तर नाही ना ! असे मत मुकुंदराव पाटील येथे व्यक्त करताना दिसतात. शेतकऱ्यांच्या अडाणी पणाबद्दल ते पुढे म्हणतात की, "शेतकऱ्यांनी गोचिडाप्रमाणे वडलांची चाल म्हणून कासेंत तोंड खुपसून बसू नये. आतां परकीय गवळी गेले, आता आपलेच लोक गवळी बनले आहेत. तशी शेतकऱ्यांनो तुम्हावर आज फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. आपल्या लोकांचा चांगुलपणा आणि स्वातंत्र्य याचा उपयोग करुन घेण्याचे राष्ट्रकार्य तुम्हास करायाचे आहे. परकिय लोक येथील राज्यकारभार करीत होते, तेंव्हा तुम्हां शेतकऱ्यांना बैलामागे फिरण्यापलीकडे दुसरे कामच नव्हते, पण आता स्वातंत्र्य लाभल्यामुळे तुम्हास आता पुढारी वळण्याचे फार मोठे कार्य करायाचे आहे आणि त्यांतले त्यात आता जातीयता मानायाची नसल्यामुळे

तुंम्हाला जे दुसऱ्या जातीचे पुढारी सुदैवाने लाभले आहेत त्यांच्या जातीवंत भलेपणाचा उपयोग करुन घेणे हे सर्वस्वी तुमचेच काम आहे."[८] शेतक-यांनी राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग आपली व्यक्तीगत परिस्थिती सुधारण्यासाठी करावा असा सल्ला मुकुंदराव पाटील शेतकऱ्यांना देताना दिसतात.

## ७.४ शेतकऱ्यांनो डोळे उघडा

शेतक-यांच्या दुरावस्थेला स्वतः शेतकरी जबाबदार आहे. इतर पुढारलेल्या देशातील शेतक-यांची परिस्थिती आणि भारतीय शेतक-यांची परिस्थिती यांच्यात मोठे अंतर आहे. आपल्या दूरावस्थेला शेतकरी स्वतःच कसा जबाबदार आहे. हे स्पष्ट करताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, " इ.स.१९१९ सालच्या आरंभी जगात काय गडबड चालली आहे इकडे थोडे विहंगम दृष्टीने पाहिले तर युरोपांत राजांची जुलमी सत्ता, मूठभर लोकांचे अन्याय श्रेष्ठपण, श्रीमंताचा फाजील गर्व वगैरे राष्ट्र घातक दुर्गुण मावळत चालले आहेत. मि लॉईड जॉर्ज, प्रे.विल्सन वगैरे राष्ट्रगुरु समता, ममता, एकता इत्यादी सद्गुणांची लागवड करीत आहेत. त्याचप्रमाणे आशियांतही चीन, जपान, मुसलमान आपापल्या परीने समताममतेचा विकास करुन घेत आहेत. धर्मसंबंधी किंवा समाजसंबंधी कसलाही उच-निच पणाचा भेद न करता सर्व चीनी, सर्व जपानी, सर्व मुसलमान आपापल्या राष्ट्रांत अन्नव्यवहाराने व शरीरसबंधाने एकाच कुटुंबातली माणसे आहोत असे भासवित आहेत. पण आमच्या हिंदु लोकांकडे पाहिले तर ते आज काय करीत आहेत ? मी उच्च तू निच, मी श्रेष्ठ तू कनिष्ठ, मी योग्य तू अयोग्य, मी अधिकारी तू अनाधिकारी, मी स्पृश्य तू अस्पृश्य, मी धर्म तू अधर्म असला मीतूपणाचा भेदभावांचा, घातनाशांचा उपदेश, मुंडलेले गुरु, पढलेले शास्त्री, शिकलेले विव्दान उजळमाथ्याने करीत आहेत."[९] पुढारलेल्या देशातील शेतकरी भेदभाव न करता आनंदाने एकमेकाबरोबर एकाच कुटुंबातील असल्या प्रमाणे सामंजष्याने राहतात त्यामुळेच इतर देशांची प्रगती झाली आहे.

आपल्या देशातील लोक उच्च-निचतेच्या भेदभावांमध्ये गुंतलेला आहे. त्यामुळे आपल्या देशाची प्रगती होऊ शकली नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी आपल्या देशातील लोकांनी एकमेकांबरोबर सामंजष्याने राहून आपली प्रगती केली पाहिजे. असे मुकुंदराव पाटील आपले मत मांडताना दिसतात. मुकुंदराव पाटीलांचे हे विचार आजच्या परिस्थितीतही तितकेच महत्त्वाचे वाटताना दिसतात.

“स्वातंत्र्यासाठी मोठ्या नेटाने देशभर खळबळ उडवून देणाऱ्या लाखो देशभक्तांनी देश भरला असता देशात धान्याची भयंकर टंचाई असावी ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. देशातले धान्य इंग्रज पळवतात, देशातला पैसा इंग्रज पळवतात, असे पूर्वी पुढारी भर सभेत सांगत असत आणि ते सत्य बोलतात असा विश्वास शेतकरी वगैरे जनता बाळगीत असे. पण आता इंग्रज जाऊन बरेच वर्षे झाली तरी शेतकरी मजुरांची दुर्दशा ओसरली नाही. उलट शेतकरी मजूर यांच्या दुर्दशेत नवी भरच पडली. देशातले सगळे भलेबुरे देशभक्त आपल्या सगळ्या शहाणपणाचा नेटाने उपयोग करीत असूनही शेतकरी-मजुरांची दुर्दशा तिळमात्र कमी होत नाही. परिस्थितीच वाईट म्हणावी, तर ही वाईट परिस्थिती व्यापारधंदा करणाऱ्यांना चांगली मानवलेली दिसते. म्हणजे शेतकऱ्यांची दुर्दशा करणारी परिस्थिती व्यापारधंदा करणारांची प्रगती करणारी ठरली. यावरुन शेतकऱ्यांच्या हितासाठी कंबर कसून देशसेवा करणारे देशभक्त आणि त्यांची इच्छा ही शेतकऱ्यांच्या दुर्दशेस तिळभरही आळा घालू शकली नाही. ”[१०] इंग्रज राजवटीमध्ये शेतकऱ्यांवर शेतसारा भरमसाठ लादला जायचा त्यामुळे शेतक-यांचे वर्षभरात मिळणारे उत्पन्न हे कर भरण्यासाठीच खर्च होत असे त्या मुळे इंग्रज राजवटीत शेतकरी हालाखीचे जीवन जगत असे परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही शेतकरी पूर्वीप्रमाणेच दारिद्र्यात जीवन जगत आहे.

स्वातंत्र्यानंतर व्यापारी व इतर व्यवसायिकांची परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने योग्य ती काळजी घेतली. त्यामुळे त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाली तशी सुधारणा शेतकरी वर्गामध्ये होणे गरजेचे आहे. परंतु शेतक-यांचा सरकार जास्तीत जास्त फायदाच घेत आहे. यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांना डोळे उघडा असा सल्ला देतात. ते पुढे म्हणतात की, “आता चार, दोन महिन्यांनी संबंध हिंदुस्थानात निवडणुका होणार आहेत. पूर्वी जमिनीचा सारा कर यांवर मतदार ठरविले जात होते, म्हणजे ज्याला शेतसारा नाही, जो उत्पन्नाचा कर भरत नाही, त्यास मत देण्याचा हक्क नाही असा प्रकार होता. पण आता वयात आलेल्या सर्वच लायक स्त्री-पुरुषांना मत देण्याचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे मतदारांची संख्या गावभर झाली आहे. म्हणजे आता सर्वजण मतदार झाले आहेत. कायद्याच्या एका फटकाऱ्यात सर्वांना मत देण्याची संधी लाभली आहे. पण त्या एका फटकाऱ्यांत मतदार मत देण्यास लायक झाले आहेत काय ? मुळीच नाही. मत देण्यास कितपत लायक झाले आहेत हे पहाण्यासाठी सरकारने ठिकठिकाणी चाचपणी दाखल लुटपुटीच्या निवडणुका

करुन पाहिल्या. यात सरकारला काय अनुभव आला ते त्यांनाच ठाऊक, पण हा अनुभव साधारणपणे समाधानकारक असेल असे वाटत नाही. एखाद्या समंजस माणसास चलता हो म्हटले तर तो चटकन निघून जाईल, पण एखाद्या अज्ञान माणसास शहाणा हो म्हणताच जो शहाणा होणार नाही. आपल्या पुराणांत शापाने अथवा आशीर्वादाने पुरुषांच्या स्त्रिया, आणि स्त्रियांचे दगड झाल्याच्या कथा आहेत, पण ठोंब्याच्या ब्रहस्पति झालेल्या कथा नाहीत.''[११] समाजसेवेच्या नावाखाली प्रत्येक पक्षातील पुढारी स्वतःच्या मताची आणि हट्टाची हौस भागवून घेण्यासच समाजसेवा अथवा राष्ट्रसेवा समजत आहे असे मुकुंदराव पाटलांना वाटते.

आज प्रत्येक जन आपला स्वार्थ साधण्यासाठी कसा धडपड करतो हे मुकुंदराव पाटलांनी येथे दाखवून दिले आहे. कॉंग्रेस पक्षाला सत्ता मिळवूनही ही पुढारी मंडळी जनतेच्या विकासाकडे दुर्लक्ष करत आहे. सामान्य जनतेला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या परिस्थितीत सुधारणा होईल अशी आशा होती. ही आशा फोल ठरली आज प्रत्येकजण स्वतःचा स्वार्थ पहात आहे. ही परिस्थिती मुकुंदराव पाटील येथे मांडताना दिसतात.

मुकुंदराव पाटील शेतकऱ्यांना सल्ला देतात की, ''शेतकऱ्यांनो आता तरी डोळे उघडे ठेवा. पहिल्या खेपेस ज्यांनी, निवडून येण्यासाठी तुम्हास जी जी वचने दिली ती ती वचने त्यांनी पूर्ण केली काय याचा विचार करा आणि त्याबद्दल त्यांना जाब विचारा. तुमच्या मतामुळे जे आज सत्ता अधिकारावर डोलत आहेत, ते देशभक्त-नागोबा तुमच्या मताचे दूध प्याले, पण त्या दुधाचा मोबदला शेतकऱ्यास काय मिळाला याचा विचार करा. पण तुम्ही तरी काय करणार ? देवा दानवापासून तो राजेमानवापर्यंतचे अनेक राजवटी होऊन गेल्या पण तुम्हा शेतकऱ्यांच्या ज्ञानांत वाढ झाली नाही. यामुळे तुंम्हापुढे कोणाही पुढाऱ्याने यावे आणि पराक्रमाची छा छू करावी व तुम्हास मातीचा रुपया करवून दाखवावा नव्हे तुम्हास तो पटवावा असा प्रकार चालत आला आहे. एकंदरीत मते कोणास द्यावीत हे कठीण होऊन बसले आहे. पण ते पार पाडल्यावाचून गत्यंतर नाही. ज्याप्रमाणे एखादा रोगी माणसाचे प्रथम लग्नच होऊ नये पण ते झाले म्हणजे त्याला संसार करणे भागच पडते. त्याच प्रमाणे अज्ञानाने रोगी बनलेल्या तुम्हा मतदारांचे स्वातंत्र्याशी लग्न लागले आहे. म्हणून आता तुम्हास राजकारणाचा संसार करणे भागच आहे. मत देण्याची टाळाटाळ केल्याने तुमच्यावरची जबाबदारी टळत नाही. उलट नको असलेल्या माणसाचा पाडाव करण्यासाठी मते वापरण्याखेरीज दुसरे साधनच

नाही. तेव्हा तुम्ही जर मते न देता घरी स्वस्थ बसून राहिलांत तर तुमच्या विरुध्द बाजूचे मतदार त्यांना पाहिजे अशा उमेदवारास मते देऊन तो तुमच्या गळयात बांधतील. म्हणून शेतकऱ्यांनी आता डोळे उघडे ठेवून योग्य उमेदवारास आपले मत दिले पाहिजे असे मुकुंदराव पाटलांना वाटते. तुम्ही घरी बसला, मते दिली नाहीत, म्हणून तो उमेदवार रद्द होणार नाही. तेव्हा शेतकऱ्यांनो तुम्हास पाहिजे असलेला उमेदवार निवडून आणायचा असेल तर मतच वापरले पाहिजे."[१२] आज पुढारी मंडळी निवडणूका आल्या की भरपूर आश्वासने देतात. परंतु निवडणूकी नंतर ती आश्वासने पूर्ण करत नाहीत. त्यामुळे अशा पुढा-यांचा ढोंगीपणा ओळखुन त्यांना मते न देता योग्य व शेतकरी हिताचे निर्णय घेणा-या व्यक्तिसच आपला प्रतिनिधी निवडावा. जो प्रतिनिधी शेतकरी हिताच्या सुधारणा आमलात आणण्याचा प्रयत्न करील अशा उमेदवारासच आपला प्रतिनिधी निवडावा. असे स्पष्ट मत मुकुंदराव पाटील मांडतात.

### ७.५ शेतकरी चळवळ

शेतकरी चळवळ म्हणजे शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणारी संघटना होय. अशी संघटना स्थापन करुन शेतकऱ्यांची दैन्यावस्था दूर करावी, शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्यात, शेतकऱ्यांची कर्ज माफ करावे इत्यादी उद्यिष्टे डोळयासमोर ठेवून ११ सप्टेंबर १९४६ रोजी काँग्रेस पक्षांतर्गत शेतकरी कामगार पक्षाची स्थापना झाली. काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पाळली जात नाहीत यामुळे काँग्रेस पक्षाच्या सरकारला शेतकरी वर्गाकडून विरोध होत आहे. म्हणून काँग्रेस मधुन बाहेर पडून स्वतंत्रपणे चळवळ चालविली तर सरकारला शेतकरी हिताचे निर्णय घेणे भाग पडेल. असे काँग्रेस मधिलच काही पुढाऱ्यांचे मत होते.

कँाग्रेस मधील पुढा-यांनी काँग्रेस मधून बाहेर पडून शेतकरी पक्ष स्थापन करण्याचे ठरवले. परंतु मुकुंदराव पाटलांचे असे मत होते की, हा पक्ष काँग्रेस मधीलच काही असंतुष्ट लोकांनी स्थापन केला असुन या पक्षाला खरोखरच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी चळवळ चालवायची असेल तर त्यांनी स्वतंत्रपणे ही चळवळ चालवावी तरच शेतक-यांसाठी ही मंडळी सरकार बरोबर भांडू शकेल व त्यांचे हक्क त्यांना मिळवून देईल. यासाठी मुकुंदराव पाटील म्हणतात की, "शेतकऱ्यांच्या चळवळीकडे सर्वसाधारणपणे दुर्लक्ष होते म्हणून या मुद्याला महत्त्व प्राप्त होते. फार वेळा असे गृहीत धरुन चालले जाते की, पाश्चिमात्य नसलेल्या देशात उच्चवर्गीय हे बदलाला मुख्यतः चालना देणारी

शक्ती असतात आणि शेतकरी, राष्ट्रीय अथवा सामाजिक चळवळीमध्ये वरच्या वर्गाच्या पुढारीपणाचे साथीदार म्हणून ओढले जातात अथवा उत्स्फुर्त उठावातील मुके भागीदार असतात. भारताबाबतच्या अभ्यासात कनिष्ठ आणि मध्यम जातींच्या चळवळी म्हणजे संपूर्णपणे सामाजिक दर्जा बदलण्याच्या चळवळी आहेत. म्हणजे वर्णाश्रमातील वरच्या दर्जावर जात म्हणून जाण्याचे जे प्रयत्न आहेत असे मानण्याचे स्वरुप त्यांना प्राप्त होते. नवीन जातीचे नाव मिळविण्याबाबतच्या लोकांच्या दाव्यामुळे आश्चर्यचकित झालेल्या ब्रिटीश जनगणना अधिकाऱ्यापासून एम.एन. श्रीनिवास यांच्या 'सांस्कृतिकीकरण' या सुप्रसिध्द पुस्तकापर्यंत हीच कल्पना या क्षेत्रात रुढ झाली आहे. राजकीय क्षेत्रात विचार करताना हा क्रम विविधतेच्या वाढीचा क्रम म्हणून मानला जातो. त्यामध्ये जातीसंघटना व जाति फेडरेशन्स शेतकऱ्यांच्या वरच्या जातींच्या अखिल भारतीय पातळीवरील उच्चवर्गीय विचारसरणींशी संपर्क तयार करतात. एवढेच नव्हे तर, लोकशाहीवादी राजकीय क्रमांशीही त्यांचा संबंध जोडून देतात."[१३] येथे शेतकरी संघटनेने सरकारवर दबाव आणून शेतकरी हितासाठी विविध योजना मंजूर करुन घेणे गरजेचे असल्याचे मुकुंदराव पाटील सांगतात.

बहुजनसमाजातील लोक देश सेवा करण्यासाठी काँग्रेसमध्ये गेले तेथे जावून या विरांनी १५ ऑगस्टलाच देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. या यशाबद्दल मुकुंदराव पाटील या लढाऊ विरांची स्तूती करतात व पुढे सांगतात की पाकिस्तानशी भारताचा स्वातंत्र्यानंतर नवा लढा सुरु झाला आहे परंतु या देशभक्तांना या लढयाचे महत्त्व वाटत नाही. उलट शेतकरी पक्ष म्हणून एक नवी चळवळ चालू करण्याचे या देशभक्तांनी ठरवले आहे. याचा अर्थ काँग्रेसमध्ये या देशभक्तांना आपल्या इच्छेप्रमाणे जागा मिळत नाही म्हणून हे देशभक्त नवापक्ष काढत आहेत.[१४] या साहसाबद्दल मुकुंदराव पाटील त्यांचे कौतुक करतात. काँग्रेसमध्ये राहून काँग्रेसने मान्य न केलेल्या सुधारणा हा शेतकरी पक्ष करणार आहे. हे अवघड काम असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. शेतकरी पक्षाच्या पुढा-यांना जर काँग्रेसचे धोरण मान्य नसेल तर त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये न थांबता त्यातून बाहेर पडून नवा पक्ष काढावा अशी इच्छा मुकुंदराव पाटील व्यक्त करतांना दिसतात.

मुकुंदराव पाटील काँग्रेस पक्षाच्या कार्याबद्दल आपले मत मांडतांना असे म्हणतात की, "शेतकऱ्यांचे कल्याण करण्यास उदार धोरण असले म्हणजे पुरे आणि ते उदार धोरण काँग्रेसच्या सावलीतच वाढू शकते ही कल्पना चुकीची आहे. काँग्रेस संस्था जुनी आणि बलसंपन्न आहे, तर

तिच्या आश्रयाची संधी का घालवा, असे जर या पक्षसंस्थापकांचे म्हणणे असले तर मग ते वेगळा पक्ष काढतातच कशाला ? स्वतःचा भाव सांभाळण्यासाठी की दरिद्री बहुजन समाजाचे हित करण्यासाठी ? कुबेराच्या परस्वाधिनतेचे मिळमिळीत अकरा हाती धोतर नेसण्यापेक्षा, स्वतःच्या मालकीची वीतभर लंगोटी नेसण्यांतच खरा पुरुषार्थ आहे ? तेव्हा शेतकरी पक्ष काढू पाहणाऱ्या पुढाऱ्यांनी स्पष्टपणे काँग्रेसशी असलेला संबंध तोडून टाकला तरच त्याच्यावर शेतकऱ्यांचा विश्वास बसेल अशी आजची परिस्थिती आहे. काँग्रेसचे आजचे धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नाही, हे निदान महाराष्ट्रातील शेतकरी बहुजन समाजास पटले आहे आणि म्हणूनच मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व प्रांतातून नवा शेतकरी पक्ष स्थापन व्हावा अशी उत्कंठा दिसून येत आहे. पण या शेतकरी बहुजन समाजात ऐक्याचा मोठाच अभाव दिसून येतो."[१४]

सारांश, शेतकरी पक्ष स्थापन करणाऱ्या पुढाऱ्यांनी संघटित होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्व प्रांतातील शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींचे एक संम्मेलन भरवून, कार्याची रुपरेषा प्रथम ठरवून टाकावी आणि मग पक्ष स्थापन केल्यास बरे केवळ संघटन आणि मताचा उदारपणा नसल्यामुळे महाराष्ट्रीय शेतकऱ्यांचे प्रचंड सामर्थ्य वाया जात आहे. ते यापुढे तरी उपयुक्त व्हावे म्हणून शेतकरी पक्षाची स्थापना होणे खरोखरच आवश्यक आहे असे मुकुंदराव पाटलांना वाटत होते. शेतकरी पक्षाला श्रमिक वर्गातून मोठा पाठींबा मिळाला या सर्व गोष्टींची पार्श्वभूमी निर्माण करण्यामध्ये 'दीनमित्र'च्या माध्यमातून मुकुंदराव पाटलांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली असल्याचे दिसून येते.

### ७.५.१ शेतकऱ्यांनो विचार करा

काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पाळण्यास असमर्थ ठरत आहे हा एक प्रकारे शेतक-यांवर होणारा अन्याय आहे. शेतक-यांनी काँग्रेस पक्षाला सत्तेवर येण्यासाठी केलेल्या मदतीमुळे मुकुंदराव पाटील शेतक-यांना दोष देतात व यापुढे शेतक-यांनी काँग्रेस पक्षाच्या आश्वासनांना बळी पडू नये असा सल्ला देतात. यासाठी ते पुढे म्हणतात की, "दुःख दारिद्र्यांत, अज्ञान भ्रमात, हालअपेष्टांत जर कोणता मोठा समाज आज खितपत असेल तर तो शेतकरी समाज आहे. त्याच्या खालोखाल मजूर समाज हा शिक्षणांत फारच मागासलेला असल्यामुळे त्याला त्याचे हित कळत नाही. कोणीही उठावे आणि त्याने शेतकऱ्याचा कैवार घेण्याच्या सुंदर गोष्टी बोलाव्या की, हे आमचे बळीराजे झालेच आनंदीत. यामुळे शेतकऱ्याला

आवळा घेऊन त्याच्या जवळून कोहळा काढणारांची संख्या बरीच आहे. त्यांतच अलिकडील कॉंग्रेस पुढाऱ्यांची भर पडली आहे. कॉंग्रेस पुढारी शेतकऱ्यांना आवळा देऊन कोहळा काढणारे आहेत, देशसेवा अमुक एका पंथात गेल्यानेच करता येते असे नाही. करणाराला तो वाटेल त्या प्रकारे करता येते. तेव्हा कॉंग्रेसवर रुसून आम्ही तिच्यावर टीका करतो असे मुळीच नाही. कॉंग्रेस ही संस्था फार चांगली आहे." [१६] कॉंग्रेस पक्षाच्या पुढा-यांनी शेतक-यांना वेगवेगळी आश्वासने दिली परंतू प्रत्यक्षात ती पूर्ण करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. यामुळे शेतक-यांच्या बिकट अवस्थेत काहीही बदल झाला नाही. यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांना विचार करा असा सल्ला देतात.

शेतकऱ्यांसाठी शेतसारा शेकडा ५० टक्के कमी झाला पाहिजे असा ठराव कॉंग्रेसने फैजपूरच्या बैठकीत केला होता. सक्तीचे शिक्षण सर्वत्र करावे असेही तिचे म्हणणे होते. पण आता शेतसारा कमी करण्याची सत्ता कॉंग्रेसच्या हातात आली असून, सरकारी अधिकारी, बनलेले कॉंग्रेसचे पुढारी शेतसारा कमी करण्याचे टाळताना दिसत आहेत. हे पुढारी आता असे म्हणत आहेत की, दारुबंदी केल्यामुळे सरकारी तिजोरीत ३११ कोटीची मोठी तूट पडली, त्यात शेतसारा कमी केल्यास फारच मोठे खिंडार पडेल. मग देशाचा कारभार चालविण्याचा खर्च भागणार नाही. तेव्हा आहे तोच सारा शेतकऱ्यांनी सोसला पाहिजे. पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय शेतसारा कमी करता येणार नाही.[१७] कॉंग्रेस पक्षाच्या पुढाऱ्यांनी निवडणुकीच्यावेळी शेतक-यांना जी आश्वासने दिली ती प्रत्यक्षात कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आल्यानंतर पाळली नाहीत. आता कॉंग्रेसचे पुढारी शेतक-यांना पूर्ण स्वराज्य मिळाल्यानंतरच ही आश्वासने पूर्ण करता येतील. असे आश्वासने देवू लागले आहेत. याबद्दल मुकुंदराव पाटील कॉंग्रेसच्या धोरणावर प्रखर टीका करतात. कॉंग्रेस पक्षाने आता शेतक-यांची फसवणूक करु नये असे आपले मत स्पष्ट करतात.

शेतक-यांचे खरे प्रश्न हे शेतक-यांमध्ये गेल्याशिवाय कॉंग्रेसच्या पुढा-यांना समजणार नाही म्हणून मुकुंदराव पाटील पुढे म्हणतात की, "शेतकरी-शेतमजूर समाजास लाखो रुपये मिळविलेले गुजर भाटे, मारवाडी कॉंग्रेसमध्ये आहेत. त्यांची चौकशी कॉंग्रेस करु शकत नाही. कारण हेच लोक कॉंग्रेसच्या फंडास आणि कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या खासगी फंडासही लाखांनी देणग्या देतात. कॉंग्रेसमध्ये असणाऱ्या गुजर-भाटे-मारवाडी या देशभक्तांनी लढाईच्या संधीत, शेतकऱ्यांना पिळून काढले. कॉंग्रेसला जर शेतकरी मजूर यांची काळजी असती तर तिने या गरीब समाजाचे रक्त पिण्याच्या

काँग्रेसभक्त व्यापाऱ्यांचे खरे स्वरुप उघडे केले असते. गरीब शेतकऱ्यांचे रक्त परदेशी ढेकणांनी शोषले काय आणि स्वदेशी ढेकणांनी शोषले काय सारखेच. तेव्हा ढेकणं कुठलाही असो, त्याला अंधारातून उजेडात आणले पाहिजे." [१८] इंग्रज सरकार प्रमाणेच भारतीय व्यापारीही शेतक-यांच्या अडाणीपणाचा फायदा घेवून त्यांचे आर्थिक शोषण करतात. यासाठी हे व्यापारी लोक काँग्रेसमधील पुढा-यांना वेळोवेळी आर्थिक मदत करतात. शेतकरी वर्गावर व्यापा-यांकडून होणारा अन्याय पुढारी बघत असूनही त्याविषयी काही बोलत नाही. म्हणून मुकुंदराव पाटील या लोकांना ढेकणाची उपमा देतात.

शेतक-यांना लुबाडणारे सर्व लोक हे ढेकणाप्रामणे रक्त शोषण करतात व हे शोषण काँग्रेसमधिलच पुढा-यांनीच थांबवणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करतात. गरीब जनतेच्या हितासाठी हे महत्त्वाचे काम काँग्रेसने अजून केल्याचे दिसत नाही. ते का केले नाही याचा जाब शेतकऱ्यांनी काँग्रेसच्या पुढाऱ्यांना विचारला पाहिजे. म्हणून मुकुंदराव पाटील म्हणतात की, "आम्ही म्हणतो की, शेतकऱ्यांनो धीट व्हा, शेतकऱ्यांनो विचार करा आणि तुम्हाकडे तुमचे कैवारी म्हणून जे येतील त्यांना वरील अर्थाचे सरळ सवाल विचारा. असले सवाल विचारण्याचे धैर्य शेतकऱ्यांत आल्यावाचून त्यांची दाद लागणार नाही. स्वतः शेतकऱ्यांतच समंजसपणा आणि धिटाई आल्यावाचून त्यांचा उध्दार होणार नाही. काँग्रेसच्या पुढाऱ्यांना जितका तुरुंग आवडतो, तितका शेतकरी आवडत नाही आणि म्हणूनच या पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांपेक्षा तुरुंग श्रेष्ठ अशी मनाशी खुणगाठ बांधलेली दिसते. तेव्हा शेतकऱ्यांनी धीट होऊन या देशभक्तांना विचारावे की, बाबांनो आम्ही शेतकरी जर तुमच्याच देशांतले आहोत, तर तुम्ही आमची खेडी म्हणजे तुरुंगाहून तुरुंग समजून, वर्षाकांठी एक दोन महिने आम्हांत येऊन का राहात नाही ? शेतकऱ्यांसाठी जर तुम्ही अनेक वेळा तुरुंगात जाता, तर एखादे वेळी तुम्ही शेतकऱ्यांत गेलात तर तुमच्या देशभक्तीस बट्टा लागेल काय ? का खेडी ही देशसेवा करण्यास अयोग्य ठिकाणे आहेत ? खेड्यात गेल्याने तुमच्या खाण्यापिण्याच्या गैरसोयी होत असतील, तर तुम्ही ती खाद्य पेये बरोबर घेऊन या. आणि आम्हा शेतकऱ्यांस देशभक्ताचे जीणे कसे असते ते तरी कळू द्या." [१९] खेड्यातील शेतकरी जीवन कसे असते हे पुढाऱ्यांनी एकदा अनुभवायला हवे, त्यासाठी त्यांनी खेड्यात येऊन शेतकऱ्यांमध्ये राहिले पाहिजे, शेतकऱ्यांच्या समस्या काय आहे हे जवळून पाहिले पाहिजे असे मुकुंदराव पाटील यांचे स्पष्ट मत होते. स्वकीय

नेत्यांनी नेहमीच शेतक-यांची उपेक्षा केली आहे. राष्ट्रप्रेमाचे प्रदर्शन मांडण्यासाठी तुरुंगाच्या वा-या करणारे देशभक्त शेतक-यांच्या मूलभूत गरजा जाणून घेण्यास तयार नाहीत. ही वस्तूस्थिती मुकुंदराव पाटील यांच्या नजरेतून सुटली नाही.

शेतकऱ्यांच्या अज्ञानी पणाचा फायदा घेवून कॉंग्रेसच्या पुढा-यांनी शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आणली आणि आता निवडणुका डोळयासमोर ठेवून ही पुढारी मंडळी शेतकऱ्यांना परत नवीन नवीन प्रलोभने दाखवित आहेत. या पुढा-यांचा ढोंगिपणा शेतकऱ्यांना दाखवून देण्यासाठी मुकुंदराव पाटील म्हणतात की, "शेतकरी आणि मजूर यांचा कैवार घेणारे पुढारी सर्व देशभर उत्पन्न झाले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. प्रत्येक इलाखा, प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका सगळा देशभक्तांनी भरला गेला आहे. हे जळीस्थळी निर्माण झालेले देशभक्त कशासाठी ? तर शेतकरी आणि मजूर यांचे राज्य स्थापन करण्यासाठी या देशभक्तांच्या हातात इंग्रज कृपेने राज्य आले. राज्याचा कारभारही ते मनमानेल तसा पाहू लागले. पण या देशभक्तांसाठी शेतकरी-मजूर यांचे राज्य तर स्थापन केले नाहीच उलट यांच्या राजवटीत शेतकरी मजुरांना पोटभर अन्नही मिळेनासे झाले आहे. कपडे नसले तरी चालेल, उघडेवाघडे राहून जगता येईल पण उपाशी पोटी राहून जगायचे कसे ? म्हणजे या देशभक्तांच्या राज्यकारभारांत शेतकऱ्यांना उपासमारीचे राज्य मात्र मिळालेले दिसून येते."[२०] देशभक्त आणि व्यापारी यांचे पोटे मात्र रुपये-नोटांनी गच्च फुगली आहेत. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या नावाने आपली गांवे साजरी करुन बसलेले देशभक्त निवडणुकीत पुनः उभे राहण्याच्या प्रयत्नास लागले आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी आता तरी विचार करा व अशा पुढाऱ्यांना योग्य तो धडा शिकविण्यासाठी सज्ज राहण्याचा सल्ला याठिकाणी मुकुंदराव पाटील देताना दिसतात. पुढारी मंडळी ही शेतक-यांमधीलच काही विश्वास घातकी लोकांना हाताशी धरून शेतकऱ्यांचा आपल्याला निवडणूकीसाठी पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

धूर्त, विश्वास घातकी पुढा-यांच्या आश्वासनांना शेतकऱ्यांनी बळी पडू नये. शेतकऱ्यांचे हित जपणा-या व्यक्तिलाच आपला प्रतिनिधी निवडावा असा सल्ला मुकुंदराव पाटील शेतक-यांना देतांना ते म्हणतात की, "त्यांना (पुढाऱ्यांना) अजून वाटते की, शेतकऱ्यांना थापा दिल्या, त्यांच्यापाशी गोडगोड बोलले, स्वतःच्या समाजबंधूस धडका मारणारे त्यांच्यातील शिंगाळू एडके हाताशी धरले की आपण खात्रीने निवडून येऊ. शेतकरी कामकरी हे मेंढरासारखे खाली माना

घालून चालणारे आहेत. तेव्हा त्यांना हुरळून देणे कठीण नाही. अशी कावेबाज उमेदवारांची खात्री आहे. या कावेबाज पुढाऱ्यांच्या सहवासाने शेतकऱ्यांतील काही तरुण बिघडले आहेत. ही फार दु:खाची गोष्ट आहे. हे शिंगाळू एडके आपली धूर्ततेची शिंगे शेतकऱ्यांवरच रोखीत असतात. त्यांना या शिंगाळू एडक्याचे भय वाटत नसते. उलट या एडक्यांना मानसन्मान देण्यात पुढाऱ्यांचे जगण्याचे मर्म साठवलेले असल्यामुळे ते लांडगे या एडक्यास कसदार खुराकही देतात."[२१] राजकारणातील धुर्त पुढारी लोक शेतक-यांचा अडाणीपणाचा फायदा घेतात निवडणूक आली की शेतक-यांमधीलच काही स्वार्थी लोकांना लालूच दाखवून हाताशी धरतात. ते स्वार्थी शेतकरी इतर शेतक-यांना पुढारी सांगतिल तसे वागावयास लावतात. यामुळे हे स्वार्थी शेतकरी पैशाच्या लोभाने आपल्या बरोबर इतर शेतक-यांचेही नुकसान करतात. अशा भ्रष्ट लालची शेतक-यांपासून सामान्य शेतक-यांने दूर रहावे असे मुकुंदराव पाटील सांगतात.

बहुजन समाजांतील तळमळीच्या पुढाऱ्यांत दुफळी माजल्यामुळे तर, मते देण्याच्या बाबतीत म्हणजे पुढारी ठरविण्याचे बाबतीत शेतकऱ्यांपुढे कठीण पेच आला आहे. कोणत्या गटांतील कोणता माणूस पुढारीपणास लायक आहे हे शेतकऱ्यांना समजणे कठीण झाले आहे. त्यांतच प्रत्येक पुढाऱ्यांभोवती गटातील लोक गोळा झालेले असल्यामुळे जो तो जन आपल्या गटातील पुढाऱ्यांच्या लायकीचा नगारा जोराजोराने पिटीत असतोच. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी आपण एक उत्तम साधन कसे बनू याकडे या पुढाऱ्यांचे लक्ष जाण्याऐवजी, बहुजन समाजाचे आपण देव कसे होऊ याकडेच या पुढाऱ्यांचे लक्ष वेधलेले आढळते. यामुळे समाजाचे खरे कार्य बाजूस राहून यांच्या मानापमानाचे कार्यच प्रमुख होऊन बसते. सत्याग्रह म्हणून रस्त्यांत आडवे पडणे, मोर्चा म्हणून गर्दी करणे, संप म्हणून व्यत्यय आणणे असले प्रकारच सर्वत्र आढळतात. आपल्या न्याय हक्कासाठी असले प्रकार करणे यांत निंद्य असे काही नाही. पण हे प्रकार करणाऱ्यांच्या अंगी काही विशेष पात्रता असावी लागते. याचा विचारच कोणी केलेला दिसत नाही. याचा परिणाम आज काय दिसत आहे ? जिकडे तिकडे पुढारीच पुढारी आणि क्रियाशील देशभक्तच देशभक्त.[२२] तत्कालीन काँग्रेस सरकारची धोरणे ही कशी शेतकरी विरोधी आहे. या बद्दल स्पष्ट शब्दात विवेचन करणारा हा पत्रकार आहे. 'शेतक-यांनो विचार करा' या लेखातून शेतक-यांनी राजकीय दृष्टया परिपक्व व्हावे त्या खेरीज शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणारा चारित्र्यवान नेता शेतकरी वर्गातूनच पुढे आला पाहिजे. अशी अपेक्षा मुकुंदराव पाटील व्यक्त करताना दिसतात.

### ७.५.२ शेतकरी हाच खरा राष्ट्राचा संसार पुरुष

महात्मा गौतम बुध्दांनी ज्याप्रमाणे स्वार्थत्याग करून अहिंसेचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यत पोहचविण्यासाठी संन्यास स्विकारला. त्याचप्रमाणे शेतकरी हा सुध्दा आयुष्यभर काबाडकष्ट करून संपुर्ण राष्ट्राला अन्नधान्य पुरवितो आपल्या राष्ट्रातील लोकांचे जीवन हे शेतक-यांनी पिकविलेल्या अन्नधान्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे शेतकरी हाच खरा राष्ट्राचा संसार पुरूष आहे. परंतु आयुष्यभर काबाडकष्ट करूनही शेतकरी कायमच दारिद्रयात जीवन जगत आहे. हिच परिस्थिती आजही आपणास पहावयास मिळते. शेतकरी अहोरात्र शेतीमध्ये काबाडकष्ट करुन संपूर्ण राष्ट्राला पुरेल ऐवढे अन्नधान्य पिकवतो. परंतु हा शेतकरी जेंव्हा शेतीमाल बाजारात विकण्यासाठी आणतो तेंव्हा मात्र त्याला हा शेतीमाल कवडीमोल दराने विकावा लागतो. यातून या शेतक-यांचा झालेला खर्चही वसूल होत नाही. अशा बिकट परिस्थितीमध्ये शेतकरी जिवन जगत आहे. शेतक-यांच्या या बिकट परिस्थितीकडे सरकारही डोळेझाक करत आहे. कारण सरकरने शेतीमालाला योग्य तो हमीभाव ठरवून दिल तर शेतक-यांवर उपासमरीची वेळ येणार नाही . शेतक-यांची ही बिकट आर्थिक परिस्थिती मुकुंदराव पाटील यांनी शंभर वर्षापूर्वी सांगीतली होती. तीच परिस्थिती आजही आहे.मग शंभर वर्षामध्ये शेतक-यांच्या आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकार कितपत यशस्वी झाले. खरे तर सरकार जो पर्यंत शेतक-यांसाठी आर्थिक सुधारणा करत नाही तोपर्यंत शेतक-यांचे दारिद्रय कमी होणार नाही. सरकारबरोबर समाजातील परोपकारी व्यक्तींनीही आपला पैसा शेतक-यांना आर्थिक मदत करण्यासाठी खर्च करावा. या विषयी आपले मत स्पष्ट करताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, ‘‘स्वार्थत्यागाची सापेक्षता परोपकारानेच व्यक्त होत असते. म्हणजे मनुष्याच्या ठायी परोपकार करण्याची बुध्दी ज्या प्रकारची बळावली असेल, त्या प्रकारचा परोपकार त्याच्या हातून होताना दिसतो. म्हणजे स्वार्थत्याग हा केव्हाही परोपकारासाठीच असतो. तेव्हा स्वार्थत्याग करताना परोपकाराची संधी वाया जाऊ न देणे, हेच परोपकाराचे मर्म ओळखल्याचे लक्षण होय. महात्मा गौतमबुध्द हा बौध्दधर्माची स्थापना करण्यापूर्वी एक भाग्यशाली राजपुत्र होता. राज्यात तो हत्तीच्या अंबारीतून फिरत असे. घरात सोन्याच्या ताटांतून जेवत असे. सुंदर पत्नी आणि तान्हे गोजिरवाणे बालक यांच्या सुखांत तो मग्न होता त्यास कशाचीही कमतरता नव्हती. पण त्यास हिनदीन लोकांच्या उध्दारासाठी, स्वार्थत्याग करण्याची उत्कट बुध्दी झाली. त्याने आपला हा स्वार्थत्यागाचा विचार घरांत कोणाला ही कळू दिला नाही. प्रत्यक्ष अर्धांगिनीलाही त्याने थांग लागू दिला नाही. पत्नीच्या ऋणांतून

मुक्त झाल्याचा प्रत्यक्ष दाखला म्हणून तिच्या हाती नवजात पुत्र दिल्यानंतर तिला स्वार्थत्यागाचा बेत सांगण्याची आवश्यकता बुध्दाला वाटली नसेल. स्वार्थत्याग करण्याच्या दिवशी तो अंगावरील मौल्यवान अलंकारासहित आणि मौल्यवान वस्त्रासहित घोड्यावर बसून निघाला. बरोबर त्याने एक सेवक मात्र घेतला, राजधानीपासून दूर जंगलात स्वार्थत्यागास उचित अशा स्थळी येताच, बुध्दाने आपले सर्व अलंकार त्या सेवकांस दान म्हणून दिले. घोड्यास मोकळे सोडले आणि बुध्दाने संन्यास वेष धारण केला. मुकुंदराव पाटील म्हणतात की, हे एवढे सांगण्याचे कारण असे की, अलिकडे सत्याग्रहाच्या चळवळीत देशाच्या उध्दारासाठी सर्वस्वावर पाणी सोडणारे महात्मे बरेच उदयास येऊ लागले आहेत. ही मोठी महत्त्वाची आणि आनंदाची गोष्ट होय.”[२३]

समाजातील परोपकारी व्यक्तीने आपली संपत्ती दुसरीकडे परोपकारार्थ दान न करता या संपत्तीचा उपयोग शेतक-यांना आर्थिक मदत करण्यासाठी करावा. आज शेतकरी आर्थिक संकटात आहे अशावेळी परोपकारी व्यक्तींची ही मदत शेतक-यांना संजिवनी ठरु शकेल. यासाठी मुकुंदराव पाटील गौतम बुध्दांचे उदा.देवून सांगतात की, गौतम बुध्दाने राजत्याग करुन अंगावरील सर्व अलंकार सेवकास दान केले व संन्यास स्विकारला या प्रमाणे आजही परोपकारी व्यक्ती समाजात आहेत. या व्यक्तींनी आपला पैसा दानधर्म करण्यामध्ये वाया न घालवता हा पैसा शेतक-यांना आर्थिक मदत करण्यासाठी खर्च करावा. यासाठी मुकुंदराव पाटील परोपकारी व्यक्तींना शेतक-यांना मदत करण्याचे आवाहन करतांना दिसतात.

समाजातील सर्वसामान्य जनतेसाठी स्वार्थ त्याग करताना आपल्या त्यागाचा उपयोग सर्वसामान्यांना झाला पाहिजे तरच आपण परोपकार केल्याचे समाधान मिळेल. हेच आपले मत स्पष्ट करतांना मुकुंदराव पाटील शेट गोविंददासजींचे उदाहरण देताना म्हणतात की, “जबलपूरास नुकताच असा एक महात्मा उदयास आल्याची वार्ता वर्तमानपत्रांत प्रसिध्द झाली आहे. जबलपूर येथील कोट्याधीश व्यापारी शेट गोविंददासजी यांनी आपल्या वाट्याची सुमारे एक कोटी रुपयांची इस्टेट सोडून दिल्याचे समजते. शेठ गोविंददासजी हे कॉंग्रेसचे भक्त आहेत. करबंदीची चळवळ स्वतः करुन त्यांनी आपल्या जमिनीचा सारा भरला नव्हता आणि आपल्या मालकीच्या गरीब कुळाकडून खंड घेऊ नये असे त्यांचे मत होते. पण हे मत त्यांच्या वडिलांस पसंत पडलेले दिसत नाही. खंड वसूल करावा असे वडिलांनी ठरविले. जर खंड वसूल झाला तर आपण घरांत पाऊल टाकणार नाही

अशी त्यांनी प्रतिज्ञा केली. शेवटी त्यांच्या वडीलांनी गरीब कुळाजवळून खंड वसूल केला म्हणून शेठ गोविंददास घराबाहेर झाले. त्यांच्या वडीलांनी त्यांना आपली इस्टेट वाटून घेण्याविषयी सांगितले. पण गोविंददासजींनी सुमारे एक कोटीच्या इस्टेटीवरील हक्क सोडून दिला."[२४]

खरोखर शेठ गोविंददासजी यांचा हा स्वार्थत्याग प्रशंसनीय असाच म्हणावा लागेल. मुकुंदराव पाटील यांनी येथे गोविंददासजींच्या उदाहरणाद्वारे परोपकारी व्यक्तिंनी आपल्या संपत्तीचा उपयोग गरीब शेतक-यांची परिस्थिती सुधारण्यासाठी करावा. यासाठी ते पुढे म्हणतात की, "त्यांनी जरी हक्क सोडल्याचे लेखी करुन दिले असले तरी अशा स्वार्थत्यागी गोविंददासजी उपाशी मरण्याची पाळी त्यांचे वडील त्यांच्यावर येऊ देतील हे शक्य वाटत नाही. गोविंददासजींनी स्वार्थत्याग केला खरा, पण तो परोपकारांच्या दृष्टीने इष्ट असा झाला नाही. ज्या वडिलांच्या स्वार्थी आणि लोभी वृत्ती शेठ गोविंददासजींना पटल्या नाहीत त्याच वडिलांच्या तिजोरीत त्यांनी एक कोटीची भर टाकावी हे नवल म्हटले पाहिजे. या एक कोट रुपयांचा त्यांना देशकार्याकडे उपयोग करता आला असता. ज्या गरीब दुबळ्या शेतकऱ्यांच्या जवळून वडिलांनी अन्याय खंड वसूल केला म्हणून शेठ गोविंददासजी आपल्या संपत्तीचा त्याग करुन संन्याशी बनले. त्याच गरीब खंडकऱ्यांना एक कोटीची खैरात केली असती तर खंडकऱ्यांना लुबाडणाऱ्या आप्तांची शक्ती एक कोटीने कमी पडून गरीबांचे रक्त शोषण तितकेच मंद झाले असते."[२५] वास्तविक पाहिले तर शेतकऱ्यांचे हित म्हणजे कोरडे तत्त्वज्ञान नव्हे. शेतकरी हा गोविंददास शेठजी प्रमाणे घरादारावर तुळसीपत्र ठेवणारा पुढारी नसतो. [२६] थोडक्यात सांगायचे म्हणजे शेतकरी हा राष्ट्राचा संसारपुरुष आहे. तेव्हा संसारी पुरुषास ज्याप्रमाणे कवडी कवडीचा संग्रह करावा लागतो त्याप्रमाणे, शेतकऱ्यास धान्याच्या दाण्यादाण्याचा संग्रह करावा लागतो. राष्ट्राचा खरा संसारपुरुष शेतकरी असल्यामुळे त्यास आर्थिक बाबतीत शक्य तेवढी मदत करणे हेच स्वार्थ त्यागी पुढाऱ्यांचे आजचे कर्तव्य होय. कारण शेतकरी हा संपूर्ण राष्ट्राचा पोशिंदा आहे. परंतु तोच आज अर्धपोटी राहत आहे. त्यामुळे आजही समाजातील परोपकारी व्यक्तिंनी आपल्या जवळील संपत्तीचा उपयोग शेतक-यांना आर्थिक मदत करण्यासाठी करावा हेच मुकुंदराव पाटील स्पष्ट करताना दिसतात.

### ७.५.३ गरिबांनीच सावध झाले पाहिजे

इ.स. १९२९-३० च्या काळात जागतिक मंदीचे सावट पसरले होते. याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरही अनिष्ट परिणाम होऊ लागले होते. व्यापार, उद्योगाप्रमाणेच त्याचा परिणाम शेती व्यवसायावरही होऊ लागला. या सर्वांची प्रतिक्रिया भारतीय वृत्तपत्रातून व्यक्त होवू लागली. या परिस्थितीबद्दल मुकुंदराव पाटलांनी अतिशय मार्मिक विचार व्यक्त केले आहेत. या विषयी ते म्हणतात की, " गेल्या पाच सहा महिन्यापासून आर्थिक बाबतीत मोठी क्रांती घडून आली आहे. देशांतल्या सर्व प्रकारच्या मालाच्या किंमती फडाफड उतरल्या आहेत. याचा सर्वात मोठा आणि स्पष्ट असा परिणाम शेतकऱ्यांवर झाला आहे. धान्य, कापूस वगैरे मालांच्या किंमती जवळ-जवळ निंपट उतरल्यामुळे शेतकऱ्यांचे शेकडा ५० टक्के नुकसान झाले आहे. याचा परिणाम देशातल्या सर्व प्रकारच्या व्यापारावर झाल्याचे पाहावयास मिळते. शेतकरी हा धान्योत्पादक असल्यामुळे त्याच्या भरभराटीवरच देशांतल्या इतर व्यापाऱ्यांचे जीवित अवलंबून असते. आहे हीच परिस्थिती अशीच चालू राहील तर एक वर्षात शेतकरी वर्ग धुळीस मिळेल."[२७] जागतिक मंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्था कोलमडून पडली आहे. यामुळे भारतीय मालाच्या किंमतीही खाली आल्या आहेत. याचा सर्वात जास्त फटका शेतक-यांना बसत आहे.

शेतीमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात आहे या परिस्थितीतून शेतक-यांना सावरण्यासाठी सरकारने योग्य ती उपाययोजना अमलत आणावी. ज्यामुळे शेतकरी या आर्थिक संकटातून वाचू शकेल. जरी मंदीची परिस्थिती जगभर असली तरी या परिस्थितीवर नियंत्रण ठेवून देशाची आर्थिक परिस्थिती पूर्व पदावर आणण्यासाठी आपले सरकार सक्षम असल्याचेही मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

जागतिक मंदीचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेलाही बसला आहे. परंतु यातून सरकारने योग्य ती उपाय योजना करून या आर्थिक मंदिच्या संकटातून देशाला सावरले पाहिजे या विषयी मुकुंदराव पाटील म्हणतात की, "सध्याच्या चळवळीमुळे व्यापाराला मंदी आली आहे. परंतु हे सर्वस्वी खरे वाटत नाही. याला आधार म्हणून कापडाच्या व्यापाराचे एकच उदाहरण दिले तर पुरे ठरेल. येथे दरसाल ४८० कोटी वर कापड खपते. येथील सर्व ठिकाणच्या गिरण्या रात्रंदिवस चालू ठेवल्या तरी उक्त खपाइतके कापड पैदा होताना दिसत नाही. फार तर २४० कोटी वर कापड उत्पन्न होईल. यात

१२० कोटी वर कापड हात मागावर विणले जाते. अर्थातच परदेशी कापड १२० कोटी वर येते. आणि तेवढेच काय ते सध्याच्या चळवळीमुळे बंद पडले आहे. अर्थात देशी कापडास तेजीची मागणी यायला हवी होती पण वस्तुस्थिती अगदी उलट आहे. परदेशी कापडावर बहिष्कार टाकूनही स्वदेशी कापडाचा उठाव होताना दिसत नाही. ठिकठिकाणी देशी गिरण्यांचे कापडाचे ढिगच्या ढीग पडले आहे. यामुळे गिरण्या बंद पडू लागल्या आहेत, त्यामुळे बेकारी वाढत आहे. त्यांतच सरकार वाटेल त्या दराने कर्ज काढू लागल्यामुळे इतर व्यापाऱ्यांना पैशाची टंचाई जाणवू लागल्याचे दिसते. सध्याची मंदी, चालू चळवळीमुळे उत्पन्न झाली नसून तिच्या मुळाशी राजकीय आर्थिक अडचणीच आहेत." [२७] देशाला आर्थिक मंदीमुळे फटका बसल्याने उद्योग धंदे, व्यापार, व्यवसाय डबघाईस आले. याचवेळी देशात ब्रिटिश सरकार विरोधी म. गांधीच्या नेतृत्वाखाली कायदेभंग चळवळ चालू होती. काही पुढा-यांच्या मते कायदेभंग चळवळी मुळेच देशात मंदीचे संकट आले आहे. परंतु मुकुंदराव पाटील यांच्या मते आर्थिक मंदी ही जागतिक संकट असून ही मंदी कायदेभंग चळवळीमुळे निर्माण झालेली नसल्याचे ते स्पष्ट करतात.

आर्थिक मंदीमुळे सर्वात जास्त नुकसान हे शेतक-यांचेच होणार आहे. हे आपले विचार स्पष्ट करताना मुकुंदराव पाटील पुढे म्हणतात की, "सरकार वरचेवर रुप्याचे नाणे कमी करीत आहेत. चालु वर्षात सरकारने बाजारातले २१ कोटीचे रुप्याचे नाणे काढून घेतले. यामुळे चोहोंकडे नाण्याची फार तंगी झाली आहे. या तंगीत शेतकरी वर्ग प्रमुखत्वाने सापडल्यामुळे त्यांच्या हलाखीचे प्रतिबिंब इतर व्यापाऱ्यांत उमटले आहे." [२८] सरकारने आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रुप्याचे नाणेही कमी केले. शेतक-यांच्या शेतीमालाची रोजची खरेदी - विक्री या नाण्यांव्दारे होत असे.सरकरने ही नाणी कमी केल्याने शेतकरी आणखी संकटात सापडला असल्याचे मुकंदराव पाटील सांगतात.

शेतकऱ्यांस सुधारण्यासाठी सरकारने काय काय केले पाहिजे यासंबंधाने आपले विचार मांडताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, "शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांनी वेळोवेळी सरकारास सूचना केल्या पण त्यांकडे सरकारने फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. लोकांची मने दुखवतील, लोकांची तयारी नाही, खर्चास पैसा नाही वगैरे सबबी सांगून सक्तीचे शिक्षण, दारुबंदी वगैरे सुधारणा सरकारने पाठीमागे टाकल्याचे दिसते आणि लहान लहान जमिनीचे तुकडे मोठे करणे, व सारा दुप्पट वाढविणे

या गोष्टी करुन शेतकऱ्यास सुधारण्यासाठी सरकारने मोठी नेटाची चळवळ चालविलेली दिसते. पण दु:खाची गोष्ट ही की, शेतकरी मागतात ते सरकार देत नाही आणि सरकार घ्या म्हणते ते शेतकऱ्यास नको आहे. म्हणजे सरकार आणि शेतकरी यांचे शेतकी सुधारण्याच्या बाबतीत एकमत होत नाही. सरकार म्हणते आम्ही सुधारण्याचे पौष्टीक दूध पाजतो. शेतकरी म्हणतात हे खरे दूध नसून नुसते पिठाचे पाणी आहे. हे जर आमच्या पोटात गेले तर आम्ही सुधारण्याऐवजी आमची प्रकृती मात्र खात्रीने बिघडणार." [३०] सरकारने शेतक-यांसाठी सक्तीचे शिक्षण, दारुबंदी या सारख्या प्राथमिक सुधारणा राबवून शेतक-यांची प्रगती घडवून आणने गरजेचे आहे. परंतु सरकार या प्रश्नांकडे डोळेझाक करीत आहे. त्यामुळे मुकुंदराव पाटील म्हंणतात की, शेतक-यांचे खरे प्रश्न बाजूला ठेवून सरकार फक्त शेतक-यांचे शोषणच करताना दिसते. सरकार शेतक-यांना ज्या सुधारणा देवू पहात आहे. त्या आगदी वरवरच्या आहेत. या सुधारणांमुळे शेतक-यांचे कुठलेही हित होणार नाही. यामुळे शेतक-यांचे हे शोषण सरकारने थांबवावे असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

सरकारने जेंव्हा जमिनींच्या छोटया तुकडयांचे एकत्रिकरण करण्याचे ठरविले यासाठी ब्रिटिश संसदे कडून बिल पास केले. या बिलामुळे छोटया शेतक-यांवर अन्याय होणार आहे. हा अन्याय होऊ नये म्हणून शेतक-यांच्या पुढा-यांनी या बिलाला विरोध करावा यासाठी मुकुंदराव पाटील म्हणतात की, "लहान तुकड्यांची शेती मोठ्या तुकड्यांनी बनविणे वाईट नाही. केवळ जमिनीच्या तुकड्याखेरीज ज्यांना आज इंग्रज सरकारच्या राज्यांत पोट भरण्यास दुसरे कसलेही साधन नाही, त्या दीन शेतकऱ्यांच्या चतकोर भाकरी काढून घेण्याच्या सरकारी योजनेस शेतकऱ्यांतीलच काही समंजस माणसांनी संमती द्यावी ही खरोखर अत्यंत खेदाची, अत्यंत चिडीची, अत्यंत तिरस्काराची गोष्ट होय. शेतकऱ्यांचे कल्याण होऊ नये अशी इच्छा या बिलास विरोध करणा-यांचीही नाही, हे आमच्या या समंजस लोकांसही मान्य आहे. यांचे येऊन जाऊन एवढेंच म्हणणे आहे की, काही शेतकऱ्यांनी कधी तरी आपल्या जमिनीचे लहान तुकडे हातचे जाऊ देण्याचे दु:ख सोसल्याखेरीज, दुसऱ्या शेतकऱ्यांस मोठ्या जमिनीचे सुख मिळणे शक्य नाही." [३१] सरकारला शेतक-यांच्या जमिनिच्या छोटया तुकडयांचे एकत्रीकरण करावयाचे होते व ही जमीन मोठया शेतक-यांना कसण्यासाठी देवून त्यांच्याकडून आधुनिक यंत्र सामुग्रीव्दारे चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळवणे अपेक्षित होते.

शेतकरी जमिनीच्या छोटया तुकडयांवर शेती करतो या शेतीमध्ये यंत्रसामुग्रीव्दारे उत्पादन घेणे त्रासदायक ठरते यासाठी या जमिनीचे एकत्रिकरण करुन सामुदायिक पध्दतीने शेती केली तर अधिक फायदेशीर होईल. हा या योजनेमागे हेतू होता. परंतु मुकुंदराव पाटलांचा सरकारच्या या योजनेला विरोध होता कारण शेतक-यांच्या छोटया तुकडयांचे एकत्रिकरण केले तर छोटया शेतक-यांना आपली उपजिविका भागविणे अवघड होईल. शेतक-यांच्या मुख्य गरजा अन्न, वस्त्र, निवारा, या पूर्ण न झाल्यास देशात दारिद्रय, बेकारी, वाढेल. शेतकरी आपल्या शेतीच्या छोटया तुकडयांव्दारे आपल्या गरजा भागवण्याचा प्रयत्न करतात. यासाठी शेतक-यांच्या पुढा-यांनी सरकारच्या या योजनेला विरोध केला तरच शेतकरी या परिस्थितीतून वाचू शकेल असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

शेतक-यांच्या पुढा-यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देताना मुकुंदराव पाटील म्हणतात की, “म्हणून हे तुकडे बिल आम्हांस आज सर्वस्वी नको आहे. लहान लहान तुकडे कसे करावे आणि त्यांच्या फुटकळ तुकड्यास कसा आळा घालावा याचा विचार, आमच्या मते अंडरसन साहेबांपेक्षा आमचे आम्हीच करावा हे बरे, आणि असे झाल्यास कोणालाही मग सरकारवर टीका करता येणार नाही. सरकारच्या विरुध्द लोकमत चेताविता येणार नाही. सरकार संबंधाने गैरसमज पसरविता येणार नाहीत व पसरणारही नाहीत. तेंव्हा सरकारने हा कायदा करण्याचे काम शेतकी करणाऱ्या किंवा शेतकी जागणाऱ्या हिंदी लोकांकडे सोपवावे, आणि त्यांच्या संमतीने हा कायदा करुन घ्यावा. आज या बाबींत बिलाचा नुसता निषेध करुन भागणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी म्हणून हे बिल पास करुन घेण्याची पराकाष्टा करील तेव्हा प्रत्येक जिल्ह्यात निवडणुकीच्या वेळी, गावोगाव मते मागताना, मोटारी उडविणाऱ्या लोकांनी यावेळी दौरे काढून आपल्या मतदार शेतकऱ्यांस सावध केले पाहिजे. त्यांना त्यांचे हित समजावून दिले पाहिजे. असे जर त्यांच्या हातून घडले नाही तर ते कर्तव्यच्युत झाले हे तर उघडच ठरते. पण मतदार शेतकरीही अशा लोकांस पुनः मते देण्यास धजले तर तेही पापी ठरतील.”[३२] सरकारी धोरण शेतक-यां बाबत कसे उदासिन आहे हे शेतक-यांच्या प्रतिनिधींनी शेतक-यांसमोर मांडले पाहिजे व शेतक-यांमध्ये आपल्या अधिकारासाठी जागृती घडवून आणली पाहिजे. हे काम शेतक-यांच्या प्रतिनिधींनी करणे गरजेचे आहे. तरच ते आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडतात असे समजले जाईल असे स्पष्ट मत मुकुंदराव पाटील मांडताना दिसतात.

### ७.६ शेतकऱ्यांसाठी शेती मेळावा आवश्यक

भारतात दुष्काळी परिस्थितीत अमेरिकेतील  शिल्लक धान्य आयात केले जात होते. याचा अमेरिकेतील शेतक-यांनाच आर्थिक फायदा होत असे. कारण  यावेळी अमेरीकेत शेतक-यांची संघटना अस्तित्वात होती. भारतात शेतक-यांची आपल्या हक्कासाठी लढणारी इ.स. १९४६ पूर्वी एकही संघटना अस्तित्वात नव्हती. अशी शेतकरी संघटना स्थापन करून आपल्याला ख-या अर्थाने शेतक-यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देणे गरजेचे आहे  व ख-या अर्थाने  शेतक-यांची शेतीच नव महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर आधुनिक पध्दतीने करावयाची आहे. या विषयी  मुकुंदराव पाटील म्हणतात की, “भारत हा देश शेतीप्रधान आहे. ८० टक्के शेतकऱ्याचा हा देश अन्नधान्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून असल्याचे दिसते. तर या उलट परिस्थती अमेरीकेची आहे. १० टक्के शेतकी करणाऱ्यांच्या या देशातून शिलकी धान्य भारतासारख्या देशात आयात करावी लागते. याचे कारण तेथील या वर्गाची संघटना ही होय. आपल्याकडे अनेक वर्गाच्या अनेक संघटना आहेत पण शेतकऱ्यांची आजपर्यंत संघटना नव्हती. यामुळे शेती प्रधान देश असूनही भारतास अन्न धान्यासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावे लागते. ही परिस्थिती नाहीशी करण्याचे स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याकडे प्रयत्न चालु आहे. आजपर्यंत ‘शेतकरी सुखी तर जग सुखी’ अशा नुसत्या घोषणाच सर्वांनी केल्या. शेतकरी देशाचा यजमान म्हणून त्यास व्यर्थ गौरविले कारण धान्योत्पादक हा वर्ग कायमचा उपाशी कापूस पिकविणारा हा वर्ग नेहमीच उघडा नागडा शेतकरी कामकरी कारागीर कलावंत हेच देशाचे खरे आधारस्तंभ असतात. त्याची ही दशा वास्तविक त्याची थोरवी व स्थान समाजात आहे. अशा या शेतकऱ्याची शेतीच नवमहाराष्ट्राच्या निर्मितीनंतर नवी करावयाची नाही तर आपणाला अन्वर्थाने खरा शेतकरी महाराष्ट्रात आता निर्माण करावयाचा आहे.”[३३]  येथे  मुकुंदराव पाटलांना नवमहाराष्ट्राच्या निर्मिती बरोबर महाराष्ट्रातील शेतक-यामध्ये अमुलाग्र असा बदल घडवून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शेती करणे  आवश्यक वाटते.

महाराष्ट्रीयन शेतक-यांना सरकारने नवनविन प्रशिक्षण देवून शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत यासाठी मुकुंदराव पाटील सरकारकडे आग्रह धरताना दिसतात. मुकुंदराव पाटलांच्या मते आता शेती ही व्यक्तिंचे अथवा कुटुंबाचे केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून राहून भागणार नाही तर शेती हा यापुढे देशाचा धंदा म्हणून राहिला पाहिजे तरच

सध्याच्या जीवन मरणाच्या काळांत व यांत्रिक चढाओढीच्या युगात भारताचा टिकाव लागेल व तो अन्नवस्त्रांच्या बाबतीत स्वावलंबी बनेल व महाराष्ट्राचा बकासूर आवरला जाईल. पिकाची चांगली पैदास होण्यासाठी सरकार वारंवार पीक प्रदर्शन भरविते. शेतकी उपयोगी जनावराचेही प्रदर्शन भरविते व त्यातील उत्कृष्ट पिकास व जनावरास बक्षीसेही देते. चांगले बी-बियाणे व खत पुरविते. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी गावोगावी सहकारी पतपेढ्या स्थापन करीत आहे. तगाईची व्यवस्था केली व अलिकडे तर विहिरी पाडणे, विहिरी बांधणे, रुंदावणे वगैरेसाठी सरकार मदत करीत आहे. तेव्हा पहाटे गुरे ढोरे सोडणारांना मळ्यात कामगिरीवर जाणाऱ्या व दिवसभर पशुपक्षांशी हितगूज करणाऱ्या बळिराजाच्या वंशजासाठी सरकारने चालविलेल्या या प्रयत्नाचा व अशा उपक्रमाचा देशाच्या अन्नदात्याने पूर्ण फायदा घ्यावयास हवा.[३४] असे मुकुंदराव पाटील शेतक-यांना सांगतात. येथे मुकुंदराव पाटील यांना शेतक-यांबद्दल असलेली तळमळ त्यांच्या प्रत्येक विधानातून आपल्या लक्षात येते.

शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी सरकार आज विविध योजना राबवत आहे. या सुविधांचा उपयोग करुन शेतक-यांनी आपली आर्थिक परिस्थिती सुधारणा घडवून आणावी असे मुकुंदराव पाटील सांगतांना दिसतात.

## ७.७ शेतकऱ्यांस विहिरी खणून व बांधून देण्याची सोय पाहिजे

स्वातंत्र्यानंतर सरकारने शेतक-यांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक सकारत्मक गोष्टी केल्या परंतु तरीही शेतक-यांच्या स्थितीत फारसा बदल झालेला नाही. म्हणून मुकुंदराव पाटील काही मूलभूत गोष्टी सुचवतात. त्यातील शेतकऱ्यांस विहिरी खणून व बांधून देण्याची सोय पाहिजे ही त्यांची मागणी तत्कालीन दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अर्थपूर्ण वाटते या बद्दल विवेचन करताना ते म्हणतात की, “शेतकऱ्यांच्या उन्नतिसाठी सरकारचे अनेक प्रकारचे प्रयत्न चालले आहेत. पिकांची चांगली पैदास होण्यासाठी प्रदर्शने, शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी पतपेढ्या, बी-बियाणे, तगाई वगैरे अनेक सोयी सरकारने केलेल्या दिसून येतात. त्यापासून शेतकऱ्यांचे हितासाठी सरकारने विहिरी खणून दिल्यास ती पुष्कळ फायदेशीर होईल. सध्या सरकार शेतकऱ्यांस विहीर फोडण्यासाठी तगाई देतच आहे. विहिरीच्याच कामी खर्च न होता, इतर कामी खर्च झाल्याचे प्रकार आढळतात. म्हणूनच तगाई देताना विशेष लक्ष देण्यास मामलेदारांना सूचना झाल्या आहेत व तगाई दिलेल्या

प्रत्येक गावी मामलेदार स्वत: जाऊन विहिरीचे काम पहात असतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने ज्या अनेक व्यवस्था केल्या आहेत त्यांतच शेतकऱ्यांस विहिरी खणून व बांधून देण्याची सोईची भर घालण्यास काही चिंता नाही असे मुकुंदराव पाटलांना वाटते. आता यावर कोणी अशी शंका घेईल की, विहिरी खोदणे व बांधणे ही कामे सरकारच्या तंत्राने होऊ लागल्यास एक तर शेतकऱ्यास ते पारतंत्र्यासारखे जाचक होईल व दुसरे तालुका अधिकाऱ्याच्या मागे कामाचा अधिक बोजा विनाकारण वाढणार शिवाय मामलेदारासारख्या अधिकाऱ्यांना इंजिनियरींग खात्याचे ज्ञानही असणे आवश्यक होऊन बसेल. परंतु मुकुंदराव पाटलांच्या मते बांधकामावर देखरेख करण्याची व्यवस्था इंजिनियरिंग खात्याकडे सोपविली तर या असल्या शंकाच उद्‌भवणार नाहीत." [३५] सरकार शेतक-यांना विहीर बांधण्यासाठी जो पैसा देत आहे हा पैसा त्याच कामी खर्च करावे असे मुकुंदराव पाटील सांगतात. शेतकरी हा नेहमी अडचणीत असतो अशा वेळी सरकारने विहीर बांधण्यासाठी दिलेला पैसा कधी कधी इतर कामी खर्च करतो. यामुळे सरकरी योजना ब-याचदा प्रत्यक्षात अमलात आणल्या जात नाही यासाठी मुकुंदराव पाटील विहीर बांधण्याचे काम सरकरने बांधकाम खात्याकडे दयावे. ज्यामुळे हे काम उत्कृष्ठरित्या होवू शकेल व हा पैसा इतर कामी खर्च होणार नाही असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

सरकारने शेतक-यास विहीर खोदण्यासाठी व बांधण्यासाठी आर्थिक मदत न देता स्वत: शासकीय प्रतिनिधी मार्फत काम करुन घ्यावे. या बद्दल मुकुंदराव पाटील आग्रह धरतात कारण सरकार मार्फत विहिरींची निर्मिती झाली तर ती कमी खर्चात व उत्कृष्ट होईल. याबद्दल आपले मत मांडताना ते पुढे असे म्हणतात की, "जे शेतकरी विशेष चौकस, व्यवहारचतुर असतात ते आपल्या विहिरी सहज बांधू शकतात. पण जे शेतकरी अगदीच अडाणी असतात त्यांना नवी विहीर खोदून बांधणे म्हणजे मोठच संकट वाटते. कित्येकांस खऱ्या खर्चापेक्षा सवाई दिढीने अधिक खर्च येतो आणि इतके करुनही बांधकाम ढासळल्यामुळे कित्येकांस हाताश होऊन स्वस्थ बसावे लागते. तेव्हा तगाई काढणाऱ्या शेतकऱ्यांवरील ही असली संकटे टाळावीत म्हणून पुढीलप्रमाणे व्यवस्था व्हावी.

१. तगाईच्या अर्जात विहीर खोदवून बांधून घेण्याचा खुलासा करुन घेता यावा.

२. यात तीन प्रकारच्या सवलती असाव्यात.

अ) फक्त विहीर खोदून घेणे.

ब) फक्त विहीर बांधवून घेणे.

क) आणि फक्त बांधकामावर देखरेख करवून घेणे."[३६]

मुकुंदराव पाटील म्हणतात की, या सूचनाप्रमाणे सरकारास काही करता येणे शक्य आहे की नाही याची चाचणी अगोदर झालीच पाहिजे. दुष्काळासारख्या प्रसंगी चाऱ्याचा किंवा गवाताचा पुरवठा करण्यास सरकारास पडणाऱ्या त्रासापेक्षा या कामी अधिक त्रास पडण्याचा संभव नाही. आणि एकदा स्वतः विहीर बांधण्यापेक्षा सरकारच्या देखरेखीखाली बांधलेली विहीर स्वस्तात आणि बळकट होते. असे शेतकऱ्यांना पटले म्हणजे, तगाईच्या बाबीत पुष्कळ निर्धास्तपणा वाढेल. शेती ही संपूर्ण पाण्यावर अवलंबून आहे. खत नसले तर एक वेळ चालेल पण पाण्यावाचून क्षणभरही चालणार नाही आणि आमच्या नगर जिल्ह्यासारखी जी काही पावसाच्या अभावाची ठिकाणे आहेत तेथे तर शेतीची व शेतकऱ्यांची स्थिती दिवसेंदिवस फारच वाईट होत चालली आहे. बारा महिने मेहनतीपूरते तर राहिलेच परंतु निदान सरकारी पट्टी पुरतेही पीक पिकण्याची चिंता पडू लागली आहे.

सरकारने ठिकठिकाणी पाटबंधाऱ्याची योजना केल्यामुळे पुष्कळ शेतकऱ्यांची स्थिती सुधारत चालली आहे. पण अशा पाटबंधाऱ्यास मोठा खर्च येतो, त्यास पाण्याचा तसाच मोठा पुरवठा असावा लागतो आणि इतके करुनही भूमिची सपाटी पाहून पाटास न्यावे लागते अर्थात पुष्कळ गावांस पाट जवळ असूनही पाण्याची टंचाई भासते. तेव्हा ही अडचण काय ती विहिरीच्या पाण्याने दूर करावी लागते.मुकुंदराव पाटलांचे हे विचार आजही आपल्याला मार्गदर्शक ठरतात. आज सरकार शेततळी, बंधारे, यासारख्या योजना राबवून शेतक-यांना शेतीसाठी पाणीपुरवठा उपलब्ध करत आहे. त्याचप्रमाणे पाण्याचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी व शेतक-यांना चांगले उत्पन्न मिळावे यासाठी ठिबक सिंचन सारख्या योजना राबवून शासन शेतक-यांना त्यासाठी अनुदान देत आहे. आजही शेतकरी या योजनांचा लाभ घेतांना दिसत नाही. पाऊस कमी पडला व शेतीत उत्पन्न निघाले नाही तर शेतकरी आत्महत्या करतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी मुकुंदराव पाटलांनी शंभर वर्षापूर्वी सांगितलेल्या उपाययोजना आजही शेतक-यांना निश्चितच मार्गदर्शक ठरतात.

## संदर्भ


१) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे १८, अंक ३६, दि.११ जुलै सन १९२८.

२) कित्ता

३) कित्ता

४) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ३९, अंक २५, दि.३० मार्च १९४९.

५) कित्ता

६) कित्ता

७) कित्ता

८) कित्ता

९) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ३९, अंक १६, दि.२६ जानेवारी १९४९.

१०) कित्ता

११) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ४१, अंक ४८, दि.५ सप्टेंबर १९५१.

१२) कित्ता

१३) गेल ऑमव्हेट, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ. १५ ऑगस्ट १९९५.

१४) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ३७, अंक ४७, दि.३ सप्टेंबर १९४७.

१५) कित्ता

१६) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे २८, अंक ४४, दि. २४ ऑगस्ट १९३८.

१७) कित्ता

१८) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ३५, अंक ५, दि. १४ नोव्हेंबर १९४५.

१९) कित्ता

२०) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ४१, अंक ३९, दि.४ जुलै १९५१.

२१) कित्ता

२२) कित्ता

२३) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे २२, अंक ४२, दि.१७ ऑगस्ट १९३२.

२४) कित्ता

२५) कित्ता

२६) कित्ता

२७) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे २०, अंक ४४, दि.३ सष्टेंबर १९३०.

२८) कित्ता

२९) कित्ता

३०) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे १८, अंक ३८, दि. २५ जुलै १९२८.

३१) कित्ता

३२) कित्ता

३३) पाटील मुकुंदराव, 'दीनमित्र', वर्षे ५०, अंक ३१, दि.२७ एप्रिल १९६०.

३४) कित्ता

३५) बगाडे उमेश, विचारकिरण, (भाग १), दीनमित्रकार मुकुंदराव स्मारक समिती, तरवडी, ता.नेवासा, जि.अहमदनगर, प्र.आ.१० मे २००९ पृष्ठ-२८३.

३६) कित्ता

# प्रकरण - आठवे

# सारांश व  निष्कर्ष

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे शेतीविषयक विचार : दीनमित्रच्या विशेषसंदर्भात या विषयावरील संशोधन प्रबंधाचे  प्रकरण १ ते प्रकरण ७ यांची सारांश रूपाने मांडणी करून काही ठळक निष्कर्ष दिलेले  आहेत.

**प्रकरण पहिले - संशोधन पद्धती**

प्रबंधाच्या आरंभीचे प्रकरण प्रास्ताविक स्वरुपाचे आहे. त्यामध्ये प्रबंध विषयाची स्थल, काल, मर्यादा स्पष्ट केली आहे तसेच संशोधनाचे महत्व, संशोधन पद्धती, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितके याविषयाची माहिती देवून प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा मांडलेली आहे.

**प्रकरण दुसरे - महाराष्ट्रातील शेतीविषयक प्रश्न स्वरुप व व्याप्ती**

ब्रिटिश पूर्व प्रदिर्घ काळात भारतातील  ग्रामजीवन स्वयंपूर्ण असल्याचे दिसून येते. या काळात ग्रामीण भागाचा बाहय जगाशी फारसा संबंध येत नव्हता. गावातील लोक एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परांवर अवलंबून असल्याने ग्रामजीवनात सांघिक ऐक्याची व सहकार्याची भावना होती. परंतू ब्रिटीश सत्ता भारतात आल्यानंतर  ब्रिटीश राज्यकर्त्यांनी महसूल व्यवस्थेत अनेक महत्वपूर्ण बदल घडवून आणले.  या बदला मागे भारतीयांचे आर्थिक शोषण करणे हा एकच उद्देश कंपनी सरकार पुढे असल्याचा दिसतो. परंतू या व्यवस्थेत शेतक-यांचे खूप नूकसान झाले. व सावकारांचे प्राबल्य वाढत गेल्याचे दिसून येते.

खरे तर इंग्रज सरकारला भारतामध्ये साम्राज्य विस्तारासाठी सुशिक्षित वर्गाची आवश्यकता होती. यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक सुधारणा अमलात आणल्या. परंतू शेतक-यांना सुशिक्षित बनविण्याचे कोणतेही खास प्रयत्न इंग्रज सरकारकडून झाल्याचे दिसून येत नाही. ज्या तरुण वर्गाने इंग्रजी शिक्षण घेतले त्यांनी आपल्या अशिक्षित अडाणी शेतकरी समाजाला रुढी परंपरांच्या विळख्यातून  बाहेर काढण्यासाठी या समाजाला शिक्षण देणे महत्वाचे समजले. यासाठी या सुशिक्षित वर्गाने समाज सुधारणेचे

कार्य हाती घेतले. एकूणच शेतकरी समाजाला कठीण परिस्थितीत तग धरुन जीवन जगता यावे यासाठी त्यांच्या ठिकाणी प्रतिकार शक्ती निर्माण करण्याचे कार्य तात्कालीन समाज सुधारकांनी जाणीवपूर्वक केल्याचे दिसून येते.

**प्रकरण तिसरे - काही सत्यशोधकीय विचारवंतांचे कृषिविषयक विचार**

एकोणिसाव्या शतकात म.फुले यांनी सामाजिक प्रबोधनाची चळवळ उभी करण्यासाठी आपले सारे आयुष्य समर्पित केले. याकाळात सामाजिक आणि धार्मिक स्वरुपाचे सारे अधिकार मुठभर उच्चवर्णीयांच्या हातात एकवटलेले असल्यामुळे सर्व सामान्य मनुष्य सामाजिक आणि शैक्षणिक हक्कापासून वंचित झालेला होता. या सर्वसामान्य शेतकरी बहुजन समाजाच्या पायातील गुलामगिरीच्या बेडया तोडून तो मुक्त व्हावा आणि त्याचे मनुष्यपण सर्वार्थाने विकसित व्हावे ही महात्मा फुले यांची भूमिका असल्याचे आपणास दिसून येते.

महात्मा फुले यांनी पाणी आणि मातीचे महत्व त्याकाळात जाणून 'पाणी अडवा पाणी जिरवा', शेतीमध्ये सेंद्रीय खतांच्या वापरावर भर, शेतक-यांसाठी शेतकी शाळा सुरु करण्याची सरकारकडे केलेली मागणी या योजना आज देशभरातील शेती संशोधनात कृषी शास्त्रज्ञांनी सव्वाशे वर्षानंतर स्वीकारल्याचे दिसते. या सव्वाशे वर्षात भारतातील विषेशतः महाराष्ट्रातील शेतकरी 'सुधारला की खचला' ? असा प्रश्न उपस्थित केल्यास , याचे उत्तर दुर्दैवाने नक्कीच 'खचला, तोही भयंकर खचला' असेच दयावे लागते. त्यामुळे महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्व पूर्वीपेक्षा आजच्या काळात अधिकच अधोरेखित होते. हाच निकष इतर सर्व विचारवंतांच्या विचारांनाही लागू पडतो. त्यामुळे भारताच्या आजच्या स्थितीतही हे विचार तितकेच महत्वाचे आहेत. आजही म.फुल्यांचे विचार शेती व्यवस्थेला लागू पडतात. यात शंका नाही.

बदलता काळ व परिस्थितीनुसार सत्यशोधक समाजाचे नेतृत्व पुढे मुकुंदराव पाटील यांनी केले. मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाला विकासाच्या नव्या टप्प्यावर आणून ठेवले होते. बहुजन समाजोन्नती ही त्यांचे कार्य आणि आदय प्रेरणा असल्यामुळे प्राप्त परिस्थितीचा सारासार विचार करुन वस्तूनिष्ठ मते नोंदविण्यावर त्यांचा विशेष भर राहिला आहे. ग्रामीण जीवनातील रुढी, प्रथा, परंपरा नष्ट होउन एकसंघ समाज निर्माण करण्यावर मुकुंदराव पाटलांनी विशेष भर दिला आहे. त्यांच्या साहित्यातून येणा-या घटना, प्रसंग असत्य व काल्पनिक आहेत असे आजही म्हणता येत नाही. इतिहासाव्दारे त्यातील सत्यता सिध्द करता येण्यासारखी आहे.

**प्रकरण चौथे - भारतातील सामाजिक परिस्थिती आणि शेती व्यवसायः मुकुंदराव पाटील यांचे विवेचन**

भारतातील अपरिर्वतणीय जातीव्यवस्था हेच बहुजन समाजाच्या शोषणाचे मुलभूत कारण असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. खेडयातील शेतकरी जोपर्यंत जातीचे जोखड झुगारुन शेतीचे नवनवीन ज्ञान तंत्रज्ञान आत्मसात करत नाही . तोपर्यंत खेडयातील प्रगती अशक्य असल्याचे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. समाजातील जातीभेद हा मुळात ईश्वरनिर्मित आहे. त्यामुळे तो मान्य केलाच पाहिजे असे सर्वसामान्य शेतक-यावर बिंबवणा-या ब्राम्हणी वर्चस्वावर मुकुंदराव पाटील यांनी प्रहार केलेला दिसून येतो.

शेतक-यांची दैन्यावस्था दूर करण्याची जबाबदारी आजच्या तरुण विदयार्थ्यांवर सोपवतांना या विदयार्थ्यांनी खेडयापाडयात फिरुन बहुजन समाजाच्या अडचणींची माहिती घेवून त्या अडचणी दुर कराव्यात. तरच बहुजन समाजाचा खरा विकास होईल. असे मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात. आजही खेडयात हिच परिस्थिती दिसून येते. खेडयातील विदयार्थी शिक्षणासाठी शहरात गेला तेथिल शिक्षण संपल्यानंतर तो शहरातच नोकरी करतो परंतू तो आपल्या कुटुंबाकडे , गावाकडे परत लक्ष देतांना दिसत नाही. आज या परिस्थितीत बदल होणे गरजेचे आहे. आजच्या सुशिक्षित तरुण विदयार्थांनी खेडयात फिरुन तेथील शेतक-यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यांना शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. तर निश्चितच त्याच्याआर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. यासाठी मुकुंदराव पाटील यांचे विचार आजही दिशादर्शक ठरतांना दिसून येते.

एकंदरीत मुकुंदराव पाटलांचे विचार अभ्यासल्यास शेतकरी हाच त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू असल्याचे दिसते. खेडयातील शेतकरी समाज आपला भरपूर वेळ व पैसा हा धार्मिक कार्यासाठी खर्च करतो. समाजातिल या प्रवृत्तीवर मुकुंदराव पाटील प्रखर टिका करतात. त्यांचा धार्मिक कृत्य करण्याला विरोध नव्हता, तर प्रत्येक व्यक्तीने आपले धार्मिक कृत्य करतांना सदभावना व मानवतेचे मूल्य जोपासून करावी. तसेच हि धार्मिक कृत्य करण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही प्रत्येकाने ती स्वतः करावी. याची जाणीव मुकुंदराव पाटील करुन देतात. आज शंभर वर्षानंतरही या परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. आजही ब्राह्मणेत्तर समाज पुरोहितांशिवाय धार्मिक कृत्य करत नाही. आज समाजात धार्मिक कार्यावर खूप खर्च केला जातो. हाच पैसा जर लोकोपयोगी

कार्यावर खर्च केला तर त्याचा शेतीच्या विकासासाठी शेतक-याला आणि एकंदर राष्ट्राला निश्चित फायदा होईल. यामुळेच मुकुंदराव पाटलांचे विचार निश्चितच प्रेरणादायी ठरतात.

**प्रकरण पाचवे - मुकुंदराव पाटील यांनी घेतलेला शेती प्रश्नांचा ऐतिहासिक वेध व वास्तवदर्शी मिमांसा**

प्रस्तुत प्रकरणात मुकुंदराव पाटील यांनी वसाहतपूर्व काळातील शेतक-यांची स्थिती आणि वसाहतकालीन शेतक-यांची स्थिती या विवेचनातून शेतीप्रश्नांची कारणमिमांसा केलेली दिसून येते. यासाठी ते वसाहत पूर्व काळातील शेतक-यांची स्थिती अधिक चांगली असल्याचे स्पष्ट करतात. वसाहत वादी शोषण व्यवस्थेमुळे सावकारशाहीचे प्रस्त वाढले यामुळे शेतकरी कर्जबाजारी होवून कंगाल बनू लागल्याचे दिसून येते. शेतक-यांना सतत दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागतो. यासाठी दुष्काळी परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून मुकुंदराव पाटील ज्या उपाययोजना सुचवितात त्या योजना आजच्या स्थितीतही जसेच्या तसे लागू पडतात. आजही सरकार दुष्काळी परिस्थितीवर पूर्णपणे मात करण्यास असमर्थ ठरतांना दिसत आहे. अशा वेळी सरकारने दिलेली मदत गरजू शेतक-यांना मिळण्याऐवजी ती सधन शेतक-यांनाच अधिक प्रमाणात मिळते. गरजू शेतकरी सरकारी योजनांपासून वंचित राहिलेला आजही आपणास पहावयास मिळते.

सरकारने शेतक-यांना दुष्काळी परिस्थितीत आर्थिक मदती बरोबरच विविध सवलतीही दयाव्यात. यासाठी विसाव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रात शेतकरी आंदोलने उभी राहिली ती आजतागायत चालू आहेत. परंतू शेतक-यांना योग्य न्याय आजही मिळतांना दिसत नाही. शेतक-यांच्या प्रश्नासाठी ज्या शेतकरी संघटना आंदोलने करतात आणि यातून स्वतः चा स्वार्थ भागवून घेतात. शेतक-यांच्या वाटयाला यातून काहीही येत नाही. तो मात्र अहोरात्र काबाडकष्ट करुन जीवन जगतांना दिसतो. आज राज्य मंत्रीमंडळामध्ये बहुतेक मंत्री हे शेतकरी कुटूंबातील आहेत. परंतू तरीही महाराष्ट्रातील शेतकरीच जास्त प्रमाणात आत्महत्या करतांना दिसतो. यावरुन राज्य सरकारलाही शेतक-यांच्या प्रश्नांची किती तळमळ आहे याची आपल्याला कल्पना येवू शकते. सरकारने जर खरोखरच शेतकरी हिताच्या योजना राबवल्या तर शेतक-यांची आर्थिक परिस्थितीत नक्कीच सुधारणा घडवून येईल. परंतू आज तसे होतांना दिसत नाही.

**प्रकरण सहावे - शेतक-यांच्या स्थितीवर मुकुंदराव पाटील यांनी सुचविलेले उपाय**

मानवी जीवनामध्ये शिक्षणाचे अत्यंत महत्वाचे स्थान असून त्यामुळेच विकास साधता येतो. अशी मुकुंदराव पाटलांची धारणा असल्याचे दिसून येते. शेतक-यांना प्राथमिक शिक्षण तर हवेच परंतू त्याच बरोबर शेतीला उदयोगाचा दर्जा प्राप्त करुन देणारे आधुनिक तंत्रज्ञान शेतक-यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे. यासाठी मुकुंदराव पाटील सरकारकडे आग्रह धरतात. शेतक-यांची निकृष्ट स्थिती दूर करण्यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांना वायफळ खर्च थांबविण्याचा सल्ला देतात. त्याचप्रमाणे शेतक-यांनी आपल्या आयुष्यातील वेळेचा नाश न करता तो वेळ शेतीकामासाठी वापरावा तसेच शेतक-यांनी केवळ शेतीवर अवलंबून न राहता जोडधंदयाची कास धरावी. ज्यामुळे शेतक-यांच्याआर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. सरकारने शेतक-यांना सुधारण्यासाठी ज्ञान वाढविणारी योजना, धन वाढविणारी योजना,आणि ऋण फेडणारी योजना या तीन योजना अमलात आणण्याची सरकारला विनंती करतात. कारण सरकरी मदती वाचून या योजना चालू होणे शक्य नसल्याचेही मुकुंदराव पाटील स्पष्ट करतात.

तत्कालीन सर्वांगीण ग्रामीण परिस्थिती पाहता दीनमित्र खेडयातून चालवणे अधिक गरजेचे होते. कारण गावगाडा जीवन पध्दतीच्या विनाशास कारण असलेली चूकीच्या निकषावर आधारीत असलेली वर्णव्यवस्था, दोषमुलक प्रथा, परंपरा , ग्रामीण अर्थकारण, धर्मकारण, उच्चवर्णियांचे अवास्तव महत्व यातून ग्रामीण शेतकरी कष्टकरी बहुजन समाजास बाहेर काढणे गरजेचे होते. दीनमित्राने ही जबाबदारी स्वीकारलेली होती. परंतू आज शतकानंतरही या विचारांची मार्गदर्शनाची शेतक-यांना गरज आहे. कारण आज समाजात शेतक-यांचे पुढारी फार आहेत. परंतू शेतक-यांसाठी खरोखर तळमळीने कार्य करणारा एकही नेता नाही. आज समाजात प्रत्येक जातीजमातीच्या संघटना दिसत आहेत. परंतू शेतक-यांसाठी तळमळीने कार्य करणारी एकही संघटना नाही. ज्या आहेत त्या आपला राजकीय स्वार्थ पाहण्यातच गुंतलेल्या आहेत. अशा परिस्थितीत वेळोवेळी पडणारा दुष्काळ अवर्षण यासारख्या संकटामुळे शेतकरी आर्थिक विवेचनात सापडला आहे. संघर्षाचा पर्याय समोर नसल्याने निराशाग्रस्त बनून शेतकरी आज आत्महत्या करतांना दिसत आहे. अशा परिस्थितीत मुकुंदराव पाटलांचे विचार शेतक-याना निश्चितच प्रेरणादायी ठरतील असे मला वाटते.

**प्रकरण सातवे - मुकुंदराव पाटील आणि शेतक-यांची जनजागृती**

शेतक-यांनी राजकीय दृष्टया परिपक्व व्हावे यासाठी मुकुंदराव पाटील शेतक-यांना आग्रह धरतात. येथे शेतक-यानी राजकीय पुढा-यांप्रमाणे आपली प्रगती करुन घ्यावी कारण स्वातंत्र्याचा उपयोग किंवा उपभोग घेण्याची कला पुढा-यांना जशी साधली त्याप्रमाणे शेतक-यांना साधता आली नाही. यासाठी शेतक-यांनी स्वार्थी राजकीय पुढा-यांना ओळखून शेतकरी हिताच्या योजना राबवणा-या व्यक्तीलाच मतदानाव्दारे आपले नेतृत्व करण्याची संधी दयावी. परंतू शेतकरी असे करत नाही यामुळे मुकुंदराव पाटील शेतक-यांच्या दुरावस्थेला स्वतः शेतक-यांनाच जबाबदार धरतात यासाठी ते इतर पुढारलेल्या देशातील शेतक-यांचे उदाहरण देवून त्यांची परिस्थिती यापेक्षा अधिक चांगली असल्याचे स्पष्ट करतात. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतक-यांनी एकत्र येवून संघटनेच्या माध्यमातून सरकारवर दबाव आणला पाहिजे. व शेतकरी हिताच्या सुधारणा राबवल्या पाहिजे. सरकारनेही शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीच्या काळात आर्थिक साहाय्य केले पाहिजे. तरच शेतकरी नैसर्गिक आपत्तीतून वाचू शकेल परंतू सरकार शेतक-यांकडे पाहिजे त्याप्रमाणात लक्ष देतांना आजही दिसत नाही.

थोडक्यात विसाव्या शतकाच्या अखेरीस महराष्ट्रात अनेक शेतकरी आंदोलने उभी राहिली ती आजतागायत चालू आहेत. शेतक-यांची दयनिय अवस्था त्यामागची कारणे याला जबाबदार असलेले घटक आणि व्यक्ती याबद्दलचे मुकुंदराव पाटील यांनी केलेले विश्लेषण आजही जसेच्या तसे लागू पडतांना दिसते. फरक इतकाच पडला आहे की या सर्व घटकांची व्याप्ती आणि गहनता अधिक तीव्र होत आहे.

"छत्रपती शाहू महाराजांनी मुकुंदराव पाटील यांना तार करून भेटीसाठी बोलाविले."

POSTS TELEGRAPHS.

NOTICE.

This form must accompany any inquiry made respecting this Telegram.

Charges to ... NAGAR

23 AUG. 18

Handed in at (Office of Origin): Kolhapur C

Date: 23 | Hour: 14 | Minute: 55

Words: 16

mukundarao patil dinmitra
tharon ahmednagar
Come and see me
without delay
maharaja Kolapur

छ.राजर्षी शाहू महाराज यांनी मुकुंदराव पाटील यांना स्वतः तार करुन भेटीसाठी बोलाविले होते.

Yeravda Central Prison,
17th December, 1932.

Dear friend,


I thank you for your letter and the pamphlet regarding Mahatma Jotiba Fuley. I have read the pamphlet with considerable interest.

Yours sincerely,

M.K. Gandhi

महात्मा गांधी यांचे

म.गांधी यांनी मुकुंदराव पाटील यांना येरवडा कारागृहातून पत्र पाठवून त्यांच्या जोतिबा फुलें विषयी लिहिलेल्या पत्रकाची स्तुती केली होती.



AMBEDKAR,
D.D.Sc. BAR-AT-LAW.
LATIVE COUNCIL, BOMBAY.

DAMODAR HALL
PAREL
BOMBAY-12.

१२-६-२८

रा. रा. मुकुंदराव पाटील यांस, अनेक नमस्कार,

आपल्या दीन मित्राचा ताजा अंक आताच हाती आला आहे. त्यांत आपल्यावर कुलकर्णी लोकांच्या बाबतीत फौजदारी केस करण्यात आली आहे हे वाचून सखेदाश्चर्य वाटले. अशा प्रसंगी माझा काही उपयोग होत असल्यास कळवावे. मी सहाय्य करण्यास तयार आहे. माझी आवश्यकता असल्यास तसे लिहिण्यास मनांत कोणताही किंतू आणू नये.

आपला नम्र,

भी. रा. आंबेडकर

डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांनीमुकुंदराव पाटील यांना लिहिलेले पत्र

Political Department,
Bombay Castle. 26th June 1924.

From

C. W. A. Turner, Esquire,
Acting Secretary to the Government of Bombay,
Political Department.

To

Rao Saheb Mukund Ganpat Patil,
Journalist and Author,
Ahmednagar.

Sir,

His Excellency the Governor desires to present you with the sanad and badge of the title of Rao Saheb at an investiture to be held at Government House, Ganeshkhind, Poona, on Tuesday the 22nd July 1924. It is hoped that you will be able to attend, but if not, I am to request that you will kindly state for His Excellency's information, the reasons for your inability to do so. A very early reply is requested in any case as a card of admission has to be sent to you if you propose to attend.

I have the honour to be,
Sir,
Your most obedient servant.

C.W.A. Turner.

Acting Secretary to the Government of Bombay,
Political Department.

No ADMSR 13
(Through the Collector of Ahmednagar). Nagar 27-6-24.
Forwarded with compliments
[illegible]
for Collector

*मुकुंदराव पाटील यांना ब्रिटीश सरकारने २६ जुन १९२४ रोजी रावसाहेब हा किताब देऊन गौरविले.*



कै. कृष्णराव भालेकर.

यांचे स्मरणार्थ

हें पत्र प्रत्येक

संपादक, मुद्रक, प्रकाशक–
रा. रा. मुकुंदराव गणपतराव पाटील
दीनमित्र प्रेस, तरवडी, अहमदनगर.

सहसंपादक.
माधवराव मुकुंदराव पाटील.

बुधवारी प्रसिद्ध होतें. कोणत्याही अंकापासून वर्षारंभ करता येतो.

(वर्ष ३२ वें,) तरवडी. बुधवार ता. १९ मा. आगस्ट सन १९४२ (अंक ४७)

पुणें जिल्हा स्कूल बोर्ड इकडे लक्ष देईल काय?

मौजे खिकवी, ता. पुरंदर, जि. पुणें येथील लो. बो. शाळेंत १४० मुलें असून इ. ७ वी पर्यंत वर्ग आहेत. [ही शाळा प्राथमिक आहे] परंतु जून महिन्यापासून शिक्षक मात्र तीनच आहेत. १४० मुलें आणि ८ वर्ग हे ३ शिक्षकानें कसें शिकवावयाचें? बिचाऱ्या शिक्षकांना तर मुलें सांभाळतां सांभाळतांच नाकी नऊ येतात मग अशा स्थितत मुलांचें शिक्षणतरी कसें होणार?

पुणें जिल्हा स्कूल बोर्डानें शाळेस ४ था शिक्षक देण्याची व्यवस्था लवकर न केल्यास शिक्षण दृष्ट्या मुलांचें नुकसान होण्याचा संभव आहे.

एक माहितगार

लो. बो. शाळा, खिकवी ता. पुरंदर, जि. पुणें

प्रा. स्कू. लि. स. (व्ह. फा.) परीक्षेचा निकाल.

येथील शाळेंत सन १९४१–४१ सालीं (जून १९४१ मध्यें इ. ७ वीचा वर्ग (प्रथम) सुरू झाला. जून १९४२ च्या एप्रिल मध्यें जी प्रा. स्कू. लि. स. [व्ह. फा.] परीक्षा झाली त्या परीक्षेत या शाळेंतील ५ पांच विद्यार्थी पुणें सेंटरला बसले होते. ते सर्व विद्यार्थी परीक्षेंत पास झाले. त्या पैकीं २ विद्यार्थ्यांस अनुक्रमे शेंकडा ६४ व ६३ मार्क मिळाले. पहिल्या वर्षीच १०० टक्के रिझल्ट लागला हें तेथील शिक्षकांस भूषणावह आहे.

एक माहितगार.

जपान युद्धांत कां पडला?

न्यूयार्क येथें अशी माहिती आल्याचें प्रसिद्ध झालें आहे कीं, 'जपानतर्फे युद्ध पुकारिलें नाहीं तर प्रिन्स कोनोये यांच्या मंत्रिमंडळाच्या सभासदांचे खून करून खुद्द जपानी बादशहांना स्थानबद्ध करण्याची धमकी जपानी लष्कराधिकाऱ्यांनीं दिल्यामुळेंच जपानचा युद्धांत प्रवेश झाला.'

—हसनअली अहमदअली वोहरी या नांवाच्या इसमानें डोंगरे यांच्या बालामृताची नक्कल करून तें विकल्याच्या गुन्ह्यावरून खास सांगली कोर्टांत ता. २२ जून रोजीं ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा आणि १० रु. दंड झाला, असें कळतें. डोंगरे यांचें बालामृत हें सर्व हिंदुस्थानमध्यें प्रसिद्ध असून मुलांचें पौष्टिक औषध म्हणून गेलीं ५० वर्षे त्याची ख्याति आहे.

*मुकुंदराव पाटील यांनी सुरु केलेले दीनमित्र या वृत्तपत्राचे मुखपृष्ठ*

## संदर्भ- साहित्य- सूची.

### प्राथमिक साधने


१. पाटील मुकुंदराव, साप्ताहिक 'दीनमित्र', १९१०-१९६७ मधील अंक तरवडी, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

२. पाटील मुकुंदराव, विचार किरण ( भाग १), दीनमित्र प्रेस, तरवडी, १९५२.

३. पाटील मुकुंदराव, दीनमित्र सिल्व्हर जुबली अंक, २६ जानेवारी १९३८.

४. फडके य.दी., महात्मा फुले समग्र वाङःमय, म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१

५. रायकर सीताराम (संपादक), कृष्णराव भालेकर समग्र वाङमय, प्रथम आवृत्ती, महात्मा फुले समग्र वाड.मय, पुणे, १९८३


### दुय्यम साधने.

### लिखित साधने

**मराठी**


१. आत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, ( ह.अ. भावे ) वरदाबुक्स, ३९७/१ सेनापती बापट मार्ग, पुणे, पुर्णमुद्रण १ जानेवारी १९९५.

२. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, आवृत्ती २००७.

३. उगले जी.ए., सत्यशोधक समाज अधिवेशने, मराठवाडा सार्वजनिक सभा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००६.

४. एरंडे अशोक विष्णूपंत, सत्यशोधक मुकुंदराव पाटील, स्फूर्ती प्रकाशन, नगर, प्रथम आवृत्ती, १२ नोव्हेंबर १९९६.

५. कवले ह.दा.( संपा), रा.रा. कृ.पा. भालेकरांची भाषणे, १ जानेवारी १९०३.

६. कुलकर्णी गो.म., आधुनिक मराठी वाङमयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९४.

७. किर धनंजय, महात्मा फुले प्रेरणा व तत्वज्ञान, महात्मा फुले प्रतिष्ठाण, प्रकाशन मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९०.

८. खरात शंकरराव, सामाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी साहित्य, प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, ६ ऑगस्ट २००६.

९. खांदवे भाऊसाहेब, दीनबंधु कृष्णराव भालेकर, गजप्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती, मार्च २०००.

१०. गेल ऑमव्हेट, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट १९९५.

११. गुंदेकर श्रीराम, सत्यशोधकी साहित्याचा इतिहास (खंड दुसरा), सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, ४ नोव्हेंबर २०१३.

१२. घोले वि.रा., अवर्षणापासून शेतीचे रक्षण कसे करता येईल या विषयी सूचना, पुणे, १५ डिसेंबर १९८१.

१३. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङमय गृह, पाचवी आवृत्ती, डिसेंबर २००७.

१४. जावडेकर शं.द., उध्दृत, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, प्रथम आवृत्ती, १९३८.

१५. जोशी लक्ष्मणशास्त्री, महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन, अस्मिता महाराष्ट्राची.

१६. डहाळे वसंत, गणोरकर प्रभा व इतर (संपा.), मराठी वाङमयीन संज्ञा, संकल्पना कोश, जी.आर.भटकळ फाऊंडेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, डिसेंबर २००१.

१७. ढगे अशोकराव, संपा.(एरंडे अशोक), अखिल भारतीय सत्यशोधक समाज, २८ वे अधिवेशन, १९९९, तरवडी.

१८. ढेंबरे बाळासाहेब, मुकुंदराव पाटील यांचे साहित्य, अनुराधा पब्लिकेशन्स, नांदेड, प्रथम आवृत्ती, जूलै २०१३.

१९. तारकुंडे सी.र., तारकुंडे यांची संक्षिप्त हकिकत, हस्तलिखित.

२०. देशपांडे कृ.प., अग्निफुले, आवृत्ती पहिली, पुणे, १९८२.

२१. देव प्रभाकर, इतिहास संशोधन, अध्यापन, आणि लेखन परंपरा, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, पहिली आवृत्ती, ऑगस्ट २००७.

२२. देशमुख गोपाल हरि ( लोकहितवादी), लोकहितवादी कृत निबंध संग्रह (संपा.), अनंत काकाबा प्रियोळकर.

२३. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००१.

२४. पाध्ये व टिकेकर, आजकालचा महाराष्ट्र, आवृत्ती पहिली, मुंबई, १९३५.

२५. फडके य.दी., व्यक्ती आणि विचार, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७९.

२६. फडके य.दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड तिसरा (१९२१-१९२९), श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २ ऑक्टोबर १९९१.

२७. फडके य.दी., अण्णासाहेब लठ्ठे, श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार पेठ, पुणे ४११०३०, प्रथम आवृत्ती, २१ मे १९८९.

२८. फडकुले निर्मल कुमार संपा.(एरंडे अशोक), अखिलभारतीय सत्यशोधक समाज, २८ वे अधिवेशन, १९९९, तरवडी.

२९. बनकर र.दे.(संपा.), भालेकर कृत शास्त्राधार, प्रथम आवृत्ती, मुंबई, १९२२.

३०. बगाडे उमेश (संपा.), विचार किरण (दीनमित्र मधिल अग्रलेख), १९१०-१९१५, भाग-१, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समिती, प्रथम आवृत्ती, १० मे २००९.

३१. भोसले जालिंदर, भोसले सिमा, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,पायल पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २९ जूलै २००७.

३२. महात्मा फुले गौरव ग्रंथ, अनुक्रमणिका, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई, १९८२.

३३. मगर निर्मला, जोतिराव फुल्यांची समाज परिवर्तन निती, साहित्य सेवा प्रकाशन,औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २८ एप्रिल १९९१.

३४. माळी मा.गो., रा.ब.नारायण मेघाजी लोखंडे चरित्र आणि समग्र वाङमय, निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, जानेवारी २०१०.

३५. माळी गजमल ( प्राचार्य), ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, राजमुद्रा प्रकाशन, औरंगाबाद,प्रथम आवृत्ती, ऑगस्ट १९९६.

३६. मालशे स.ग., शोध निबंधाची लेखन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

३७. मंगुडकर मा.प., शिंदे लेख संग्रह, आवृत्ती पहिली, पुणे १९६३.

३८. मंगुडकर मा.प., महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ, दुसरी आवृत्ती, पुणे, १९६५.

३९. मोहोड सुधाकर , शेतकरी हिंदुस्थानचा अतिरिक्त मूल्यांचा सिध्दांत (भाग १)भाग्योदयमुद्रण,

सिताबर्डी, नागपूर १२, आवृत्ती पहिली, ५ मे १९८०.

४०. वैद्य सुमन, कोठेकर शांता, अधुनिक भारताचा इतिहास १७५७-१८५७, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली, जूलै १९९८, चौथी आवृत्ती, सप्टेंबर २००८.

४१. शिंदे अरुण, सत्यशोधकांचे शेतकरी विषयक विचार, दर्या प्रकाशन, प्रथम आवृती, १५ ऑगस्ट २०१२.

४२. क्षीरसागर शोभादेवी, आधुनिक भारताचा इतिहास १७५७-२००५, के. सागर प्रकाशन,पुणे, १९९४.

## अलिखित साधने

१. काळे गोविंद, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे खडकाव्ये, (अप्रकाशित)पीएच.डी.प्रबंध.

२. तारकुंडे सी.र., तारकुंडे यांची संक्षिप्त हकिकत, हस्तलिखित

३. बरबडे गो.गो., भालेकर कृष्णराव पांडुरंग यांचा संक्षिप्त इतिहास, हस्तलिखित.

## हिंदी

१. गुप्त शिवकुमार ( संपा.) आधुनिक भारत का सामाजिक तथा आर्थिक इतिहास, पंचशिल प्रकाशन, जयपूर, प्रथम आवृत्ती, १९९९.

## मासिके/ वृत्तपत्रे

१. चौसाळकर अशोक, महात्मा फुले यांचे लोकशाही विषयक विचार, दै.नवभारत, सप्टेंबर १९८२.

२. जाधव पंजाबराव, दीनमित्रकार पाटील मुकुंदराव, चक्रमुद्रीत लेख, सा.दीनसेवा, डिसेंबर १९६८.

३. जाधव भास्करराव, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील, शिवनेर, सत्यशोधक समाज विशेषांक, १९९८.

४. ठाकरे प्रबोधनकार, महात्मा फुले पंथीय अखेरचा सत्यशोधकीय हरपला, मार्मिक, २४ डिसेंबर १९६७.

५. पाळेकर भगवंतराव, ब्राह्मणेतर, १५ डिसेंबर १९२६.

६. बागल माधवराव ( संपा.), सत्यशोधक हिरक महोत्सव ग्रंथ, रा.पाटील मुकुंदराव व दीनमित्रचे कार्य, कोल्हापूर, १९३४.

७. माळी गजमल, गेल्या शतकातील थोर पुरूष, जोतीविचार, दिपावली, १९८२.

८. शिंदे श्रीपतीराव, विजयी मराठा, १६ एप्रिल १९२३.

९. शिंदे अण्णासाहेब, दीनमित्रकार मुकुंदराव पाटील, दै.महाराष्ट्र टाईम्स, २५ सप्टेंबर १९८३.

१०. हिवराळे सुखराम, भारतातील पहिले ग्रामीण पत्रकार मुकुंदराव पाटील, दै.लोकमत, ३ जानेवारी १९८८.